त्रैमासिक

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

वर्ष ६२, अंक १-४, शक १९०५-०६

महाराष्ट्र इतिहास परिषद, पुणे, १९८३ : निबंध

Quarterly

of the

Bharata Itihasa Samshodhaka Mandala, Pune

Year 62, No . 1-4, July 1983, October 1983,
January 1984, April 1984

Maharasht . Itihasa Parishad, Pune, 1983
Papers

भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकाचे प्रकाशन नोव्हेंबर १९२० सालापासून सुरु झाले. त्रैमासिक मुख्यत्वेकरून भारताच्या इतिहासासंबंधीची निरनिराळ्या भाषांतील मूळ, अस्सल ऐतिहासिक साधने उजेडात आणते. तसेच या इतिहासाच्या विविध अंगांचा अभ्यास करणारे संशोधन लेख प्रकाशित करते.

The Quarterly of the Bharata Itihasa Samshodhaka Mandala was started in November 1920. Since then the Quarterly has been publishing mainly original source-material available in different languages, and also research articles relating to various aspects of Indian history and culture.

त्रैमासिक

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

वर्ष ६२, अंक १-४, शक १९०५-०६

महाराष्ट्र इतिहास परिषद, पुणे, १९८३ : निबंध

Quarterly

of the

Bharata Itihasa Samshodhaka Mandala, Pune

Year 62, Nos. 1-4, July 1983, October 1983,
January 1984, April 1984

Maharashtra Itihasa Parishad, Pune, 1983
Papers

ऋणनिर्देश : महाराष्ट्र साहित्य संस्कृति मंडळाकडून या अंकासाठी त्याच्या नियमानुसार अनुदान मिळालेले आहे.

वार्षिक वर्गणी – रुपये दहा

* * *

या नियतकालिकात प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील विधानांची व मतांची जबाबदारी सर्वस्वी लेखकांकडे आहे. त्यांचे उत्तरदायित्व मंडळाकडे नाही.

* * *

प्रकाशक : म. श्री. माटे, चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

मुद्रक : य. गो. जोशी, आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

अनुक्रमणिका

भाग ३ : अर्वाचीन काळ

भाग ४ : कला–शिल्प

चुकांची दुरुस्ती

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
८५	खालून ५ वी	तर्झकरतुल्मुलूक	तज्किरतुल्मुलूक
८६	वरून ९ वी	आगा महमदी हुसेन	आगा मह्दी हुसैन
८७	वरून १० वी	तजिकरतुल्मुलूक	तज्किरतुल्मुलूक

छायाचित्रे

प्रागैतिहासिक महाराष्ट्र

१. महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगीन उत्खनित स्थळे (नकाशा).
२. इनामगाव : प्रौढाचे दफन (इ. स. पू. ११००)
३. इनामगाव : लहान मुलाचे दफन, जोर्वे कालखंड (इ.स. पू.१४००–१०००)
४. इनामगाव : मातृदेवता (इ. स. पू. १३००)

पैठण येथील काही ऐतिहासिक वास्तू

५. ढासावरील जाळी
६. मोराचे आकर्षक झुंबर
७. गुजराथी शैलीतील स्तंभ व हस्त
८. दरवाजाच्या पट्टीवरील भौमितिक नक्षी

मराठवाड्यातील मंदिर-शिल्पे

९. नीलकंठेश्वर मंदिर, निलंगे
१०. गुप्तेश्वर मंदिर, धारासूर

संपादकीय

महाराष्ट्र इतिहास परिषदेचे इ. १९८३ चे अधिवेशन पुणे येथे भा. इ. सं. मंडळाने दि. २ जून १९८३ ते ६ जून १९८३ असे पाच दिवस भरविले होते. अधिवेशनाचे उद्घाटन माननीय श्री. जयंतराव टिळक यांनी केले. स्वागतपर भाषण मंडळाचे अध्यक्ष प्रा. ह. धी. सांकलिया यांनी केले. अधिवेशनासंबंधीचे निवेदन मंडळाचे चिटणीस डॉ. म. श्री. माटे यांनी केले. प्रा. ग. ह. खरे यांनी प्रास्ताविकाचे भाषण केले.

अधिवेशनात वाचल्या गेलेल्या निबंधांच्या विषयांची विभागणी : १. प्राचीन काळ २. मध्ययुगीन काळ. ३. अर्वाचीन काळ आणि ४. कला-शिल्प, अशा चार विभागांत केली होती. अधिवेशनाचा संपूर्ण कार्यक्रम, संशोधकांनी सादर केलेले निबंध व निबंधांवरील चर्चेत ज्यानी भाग घेतला अशांची नावे इत्यादी तपशील त्रैमासिकाच्या मागील अंकात दिलाच आहे. म्हणून त्याची येथे पुनरुक्ती करीत नाही.

निबंध ज्या क्रमाने अधिवेशनात सादर झाले त्याच क्रमाने ते येथे देण्यात आले आहेत असे नाही. या अंकाला योग्य त्या संपादकीय दुरुस्त्या, काटछाट इत्यादी करणे आवश्यक झाले. आमच्या सांगण्यावरून काहींनी आपल्या निबंधांचे पुनर्लेखन करून दिले. परिषदेत वाचलेल्या निबंधांपैकी एखादा दुसरा निबंध प्रस्तुत अंकात घेता आला नाही. सुधारित स्वरूपात तो हाती आल्यावर पुढील अंकात देता येईल.

हा अंक तयार करताना निबंध-लेखकांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत.

१ एप्रिल १९८४ संपादक

भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकासंबंधी
केंद्र शासनाच्या नियमानुसार द्यावयाची माहिती

(१९५६ चे नियम ८ नमुना ४)

(१) प्रकाशन स्थळ : भारत इतिहास संशोधन मंडळ,
१३२१ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

(२) प्रकाशन काळ : त्रैमासिक

(३) मुद्रणस्थळ : आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव, पुणे ४११०३०

(४) मुद्रकाचे / प्रकाशकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : डॉ. म. श्री. माटे, भारतीय, १३२१ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.

(५) संपादकाचे नाव, राष्ट्रीयत्व व व पत्ता :
डॉ. वा. द. दिवेकर व डॉ. मा. रा. कंटक, भारतीय,
१३२१ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

(६) मालकाचे नाव व पत्ता : भारत इतिहास संशोधक मंडळ,
१३२१ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

मी, म. श्री. माटे, चिटणीस, प्रगट करतो की माझी माहिती व विश्वास याप्रमाणे वर दिलेला तपशील अचूक आहे.

१ एप्रिल १९८४

म. श्री. माटे
(प्रकाशक)

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६२ : १-४, १९८३-८४

Welcome Address

Prof. H. D. Sankalia,
President, B. I. S. Mandala, Pune

Hon. Shri Jayantrao Tilak, Prof. Khare and friends,
I am happy to welcome you for this session of the Maharashtra Itihasa Parishad. I am myself associated with researches in the history, or pre-history if you like, of Maharashtra as well as with the Maharashtra Itihasa Parishad. If I remember right, I was either the president or the sectional president of one of its sessions, very probably the one held at Ahmednagar. When the Mandala thought of holding this year's session in Pune, I advised Dr. Mate, our secretary, who had come to me with this suggestion, that this session should be different from others. It should not be a mere collection of scholars who would gather together, read papers on topics of their interest and disperse. It should be devoted to some selected theme. I was told that very similar ideas prevailed with the Chairman, Prof. Khare as well.

After consulting colleagues it was decided that since the Parishad has been active for the last twenty-five years or so it should be a good occasion to take a review of the researches in the history of Maharashtra during this period of time. History was to be taken in its broadest sense, to include pre-history, economic & social history and art history along with political history. Secondly, as many researchers as possible were to be brought together on this platform so that they could present their own findings and thoughts. Many of these might have been already published; but the point in getting all of these together lay in the effectiveness of the joint effort. And the occasion should be used to find areas of ignorance, to pin-point the problems that still awaited scholarly atten-

tion. This always is a very useful exercise. It helps us in determining the direction of future researches.

I would urge the scholars and students who have come here to attend the sessions, to participate freely in all discussions and make this 'Parishad' a success.

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६२: १-४, १९८३-८४

निवेदन

डॉ. म. श्री. माटे
चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, पुणे

माननीय श्री. जयंतराव टिळक, गुरुवर्य प्रा. सांकलिया, प्रा. खरे आणि मित्रहो,

मंडळाच्या अध्यक्षांनी महाराष्ट्र इतिहास परिषदेच्या अधिवेशनाचा प्रमुख उद्देश कोणता हे आपल्याला थोडक्यात सांगितलेच आहे. त्याचाच थोडा अधिक खुलासा करून त्याच्या परिपूर्तीसाठी कोणती योजना आखली आहे याची थोडी माहिती दिली तर ती अस्थानी ठरणार नाही.

महाराष्ट्र इतिहास परिषदेचे अधिवेशन पुण्याला मंडळाने भरवावे ही सूचना प्रथम केली ती माझे मित्र प्रा. म. आ. कुलकर्णी यांनी. कारभारी मंडळामध्ये सर्वांनीच ती उचलून धरली. हे संशोधकांचे मंडळ आहे आणि विद्वज्जनाना एकत्र आणणे, विद्वच्चर्चा वडविणे हे मंडळाचे प्रमुख काम आहे. या दृष्टीने आम्ही गतवर्षी रामदास निर्वाण त्रिशताब्दी-चर्चासत्र भरविले; त्याआधी १९८१ मध्ये अखिल भारतीय नाणकशास्त्र परिषदेचे अधिवेशन भरविले होते. आपल्यापैकी अनेकांना हे ठाऊक असेल की, आज नावारूपाला आलेल्या ' इंडियन हिस्ट्री काँग्रेस ' ची स्थापना करण्यात आपल्या मंडळाचा पुढाकार होता. त्या वेळचे चिटणीस महामहोपाध्याय द. वा. पोतदार यांच्या प्रयत्नाने काँग्रेसचे पहिले अधिवेशन येथेच भरले होते. तेव्हा महाराष्ट्र इतिहास परिषदेचे अधिवेशन मंडळाने भरवावे हे स्वाभाविकच होते.

या अधिवेशनामध्ये महाराष्ट्राच्या इतिहासाच्या विविध शाखांमध्ये झालेल्या संशोधनाचा विस्तृत आढावा घ्यावा ही कल्पना पुढे आल्यावर तिची प्रत्यक्ष कार्यवाही कशी करावी हे ठरविण्यासाठी कारभारी मंडळाने प्रा. खरे यांच्या अध्यक्षतेखाली एक सल्लागार समिती नेमली. तीत तीन चिटणिसांच्या शिवाय प्रा. म. के. ढवळीकर आणि प्रा. कृ. ना. चिटणीस यांचा समावेश होता. या समितीच्या दोन बैठका होऊन अधिवेशनाचा कार्यक्रम निश्चित करण्यात आला. कालानुक्रमे आणि विषयवारीने कोणकोणती अधिवेशने भरवावीत हे नक्की झाल्यावर, त्या त्या क्षेत्रातील श्रेष्ठ विद्वानांनी संबंधित कालखंडाचा किंवा विषयाचा सविस्तर आढावा घ्यावा, त्यानंतर इतर संशोधकांनी स्वतःच्या संशोधनाची माहिती द्यावी व नंतर त्यावर चर्चा व्हावी, अशी सामान्य योजना ठरविली. या समितीने प्रमुख वक्ता, त्या त्या अधिवेशनाचे अध्यक्ष, संशोधक यांची

नावे सुचविली व नक्की केली. महाराष्ट्रातील विद्यापीठे, संशोधनसंस्था, महाविद्यालये यातील संशोधक, त्यांच्याशी संबंध नसणारे ज्ञात संशोधक, अशा सगळ्यांना धरून जास्तीत जास्त अभ्यासकांना एकत्र आणण्याचा आम्ही यत्न केला आहे.

या अधिवेशनासाठी इंडियन कौन्सिल ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च आणि महाराष्ट्र शासन यांजकडून आर्थिक साहाय्याचे आश्वासन मिळाले आहे. स. प. महाविद्यालयाच्या अधिकाऱ्यांनी प्रतिनिधींच्या निवासाची व्यवस्था करण्याचे मान्य केले आहे.

आपणा सर्वांचे मंडळाच्या वतीने स्वागत करतो.

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६२ : १-४, १९८३-८४

प्रास्ताविक

प्रा. ग. ह. खरे
कार्याध्यक्ष, भा. इ. सं. मंडळ, पुणे

अध्यक्षमहाराज, प्रा. सांकलिया आणि उपस्थित सज्जनहो,

मराठी इतिहासासंबंधी गेल्या सुमारे २५ वर्षांत मुख्यतः हे मंडळ, महाराष्ट्र शासन, धुळ्याचे राजवाडे संशोधन मंडळ, विदर्भ संशोधन मंडळ, अहमदनगरचे इतिहास संशोधन मंडळ आणि मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाचे इतिहास संशोधन मंडळ यांनी काही प्रकाशन केले आहे. मुंबईच्या इतिहास संशोधन मंडळाच्या प्रकाशनातील इतिहासाभ्यासाच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाचे प्रकाशन म्हणजे पेशवे-दप्तर रोजकिर्दीच्या प्रसिद्ध झालेल्या नऊ भागांत आलेल्या मुक्कामांच्या याद्या यात एकत्रित केल्या आहेत व त्यातील मुस्लिम तारखांची हिंदू व ख्रिस्ती रूपांतरे करून दिली आहेत. तसेच पेशव्यांच्या काही सरदारांचे मुक्काम एकत्र करून तेही यात दिले आहेत. तेही पेशवे-दप्तराच्या काही भागांत आणि कै. फाळके यांच्या शिंदेशाही इतिहासाची साधने या मालेच्या चार खंडांत आले आहेत. असे प्रकाशन होणे अतिशय आवश्यक होते. तथापि त्यात मला एक उणीव दिसून आली. ती ही की, आजवर जी मराठी पत्रे प्रकाशित झाली आहेत त्यांतील झाडून सारे मुक्काम या पुस्तकात समाविष्ट केले असते तर हे पुस्तक आहे त्यापेक्षा पुष्कळच अधिक उपयुक्त ठरले असते. हे काम केलेल्या कामाच्या मानाने अवघड नसले तरी खूपच अधिक वेळखाऊ होते यात संशय नाही. तथापि तेही काम करणे अतिशय आवश्यक आहे. भा. इ. सं. मंडळाने असे काही मुक्काम एकत्र केले आहेत.

मराठी पत्रांबाबत, विशेषतः पेशवाईतील पत्रांविषयी, एक उणीव लक्षात ठेवली पाहिजे; ती ही की, आजवर प्रसिद्ध झालेल्या पत्रांपैकी, सनदापत्रे सोडून दिली तर, इतर पत्रांत सामान्यतः, ते पत्र केव्हा लिहिले त्या कालाचा संपूर्ण तपशील दिलेला नसतो. कधी अजिबात कालच नसतो, कधी फक्त वारच दिलेला असतो, कधी मास व तिथी किंवा महिना व तारीख हा तपशील असतो, पण वर्षाचा उल्लेख सामान्यतः नसतो. यामुळे कोणतेही मराठी पत्र अभ्यासावयास घेतले तर अभ्यासकापुढे आरंभीच हा प्रश्न येतो की, त्या पत्राचा निश्चित काल कोणता असावा ? मराठी पत्रे प्रसिद्ध व्हावयास लागून शंभर वर्षे झाली. तरी एकाही संशोधकाने याविषयी संपूर्ण विचार

केल्याचे दिसत नाही. किंवा या पत्रांचे काल कसे ठरवावे याविषयी विशेष विवेचन केलेले आढळत नाही. याविषयी काही सखोल कामगिरी करावी या हेतूने भा. इ. सं. मंडळाने मराठी इतिहासाच्या विस्तृत शकावलीची एक मोठी योजना आखली. तीसाठी पुणे विद्यापीठाने मंडळास २८ हजार रुपयांची देणगी आजवर दिली. त्या देणगीतून या शकावलीचे काम मंडळाने पद्धतशीर सुरू केले. आजवर या २८ हजार रुपयांतून मंडळाने पेशवाईतील बाळाजी बाजीराव पेशवे याचा काल सर्वाधिक महत्त्वाचा समजून त्याच्या कारकिर्दीतील कागदपत्रांचा अभ्यास करून सुमारे एक लाख विविध विषयांवरच्या चिठ्ठ्या बनविल्या. आणि याच कालातील पत्रांचे काल निश्चित ठरविण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी प्रथम पेशवे-दप्तर तपासले. तेव्हा आढळून आले की, पेशवे-दप्तरातील सुमारे साडेआठ हजार पत्रांपैकी १५६८ पत्रांना दिलेले काल निश्चितपणे चुकले होते. तीच गोष्ट इतरत्र प्रसिद्ध झालेल्या कागदपत्रांचीही आहे. तथापि पेशवे-दप्तर पत्रांचा एकत्रित साठा असल्यामुळे त्यावर या शकावलीत लक्ष केन्द्रित केले होते. हे काल ठरविण्याच्या अनुषंगाने पुरंदरे दप्तर खंड १ व राजवाडे खंड ६ यांतील पत्रांचे दुरुस्त करण्यासारखे काल मंडळाच्या इतर ग्रंथांत मी प्रसिद्ध केले आहेत.

हे काम करीत असता असे लक्षात आले की, या कालातील कोणत्याही व्यक्तीचे जन्म, अधिकारग्रहण व मृत्यू यांचे निश्चित काल ठाऊक असते तर अनेक पत्रांचे काल ठरविण्याचे काम फार सोपे झाले असते. आता पेशवाईतील शेकडो व्यक्तींचे जन्मकाल वा अधिकारग्रहणाचे काल मिळणे फार कठीण आहे. कारण, तसे ते फारसे सापडत नाहीत. पण मृत्युतिथि मात्र सापडतात. म्हणून मंडळाने या शकावली-साठी तीमधील एक काम म्हणून अशा मृत्युतिथ्या एकत्र केल्या आहेत. त्या सुमारे पाच हजार आहेत. त्यामुळे मराठी पत्रांत आलेल्या कित्येक महत्त्वाच्या व्यक्ती केव्हा मरण पावल्या हे निश्चित समजून येते. या मृत्युतिथींचा पत्रांच्या शेवटच्या कालमर्यादा ठरविण्यास उपयोग होतो. या मृत्युतिथी अजून छापावयाच्या आहेत. पण पेशवे-दप्तरां-तील पत्रांचे या योजनेतून ठरविलेले काल 'मराठी इतिहासाची विस्तृत शकावली, खंड १' म्हणून मंडळाने प्रकाशित केले आहेत. त्याच्या प्रस्तावनेत याविषयीची सविस्तर चर्चा केली आहे.

या पंचवीस वर्षांत आणखी एक महत्त्वाचे काम भा. इ. सं. मंडळाने केले. ते म्हणजे, बिकानर येथे मोगली कागदपत्रांपैकी औरंगजेबाचे दैनंदिन अखबार आहेत त्यांतील मराठी इतिहासाला उपयोगी असे सुमारे तीन हजार उतारे तेथे संघशः जाऊन उतरून आणले; पण त्यांपैकी केवळ ५०० च उतारे मंडळ आजवर प्रसिद्ध करू शकले. तथापि याच वेळी इंग्लंडमधील रॉयल एशियाटिक सोसायटीमध्ये जे ३००० हून अधिक अखबार आहेत त्यांचीही मायक्रोफिल्म मंडळाने आणविली आहे. त्याच-प्रमाणे मंडळाने याच काळात शिवकालीन कागदपत्रांचे दोन खंड प्रकाशित केले असून

पेशवे व तदुत्तरकालीन कागदपत्रांचेही काही खंड छापले आहेत. तथापि अजून किती तरी, मुख्यतः फार्सी सामग्री, मंडळाजवळ पडून आहे.

मराठी इतिहासाचा अभ्यास करताना आणखी एका उणिवेची जाणीव अलीकडे अधिक होऊ लागली आहे. ती म्हणजे, मराठी इतिहासाला उपयोगी पडणाऱ्या फार्सी साधनांचा अभ्यास व प्रकाशन ही होय. फार वर्षांपूर्वी प्रा. ग. ह. खरे यांनी, शिव-कालीन फार्सी ग्रंथांत शिवाजीविषयी जी माहिती आली आहे तिचे मराठीकरण करून दोन खंडांत ती प्रकाशित केली. तदनंतर श्री. सेतुमाधव पगडी यांनी शिवोत्तर व पेशवेपूर्व काल तसेच पेशवे काल यांसंबंधी फार्सी ग्रंथांत आलेल्या माहितीची रूपांतरे करून तिचे सात–आठ खंड प्रकाशित केले आहेत. हेही काम याच पंचविशीत झाले आहे.

फार्सी ग्रंथांतील माहिती अजिबात न समजण्यापेक्षा मराठीत रूपांतरित केलेली माहिती अभ्यासावयास मिळणे हे केव्हाही उपकारक आहेच; आणि यामुळे श्री. पगडी यांनी केलेल्या रूपांतरांना महत्त्व निश्चित आहे. पण संशोधकाची भूक रूपांतरांनी भागत नसते. मुळात काय आहे हे समजणे संशोधकाच्या दृष्टीने आवश्यक असते. तथापि महाराष्ट्राच्या इतिहासाचा अभ्यास करणाऱ्यांमध्ये फार्सी जाणणारे इतके थोडे आहेत आणि फार्सीची छपाई करण्याचे काम महाराष्ट्रात तरी इतके अवघड झाले आहे की, त्याविषयी फार मोठा प्रयत्न करणे अगदी आवश्यक आहे.

त्या मानाने अलीकडे मूळ वा अनुवाद रूपांनी पोर्तुगीज साधनांचे प्रसिद्धीकरण श्री. काकोडकर, श्री. स. शं. देसाई, श्री. शिरोडकर, डॉ. वि. त्र्यं. गुणे यांच्या प्रयत्नानी काहीसे सोपे झाले आहे, तेही या पंचविशीतच. याबद्दल उपर्युक्त विद्वानांचे अभिनंदन करणे योग्य होईल.

पण एवढ्याने पेशवाई संशोधनाचे काम भागण्यासारखे नाही. सच्च्या संशो-धकाला मुळात काय असते हे पहावे लागते. त्यासाठी मूळ पुस्तके संग्रही असणे अगदी आवश्यक आहे. मी सुमारे २० वर्षांपूर्वी ‘ महाराष्ट्र जीवन ’ या पुस्तकात एक लेख लिहून त्यात प्रतिपादन केले आहे की, आपल्या मराठी इतिहासाला उपयोगी पडणारे फार्सी तसेच युरोपीय भाषांतील ग्रंथ हे निदान महाराष्ट्रातील प्रत्येक विद्यापीठात तरी अवश्य आणून ठेवले पाहिजेत; म्हणजे कुणाला तरी, केव्हा तरी ते पाहण्याची आवश्यकता वाटेल. त्या वेळी तो स्वतः किंवा इतरांची मदत घेऊन असे ग्रंथ तपासू शकेल. पण सामग्रीच नसेल तर ती मनुष्य तपासील तरी कशी ? मराठीत एक वाक्प्रचार आहे. तो येथे अवश्य लक्षात ठेवण्यासारखा आहे. गवयाचा मुलगा रडला तरी तो तालसुरांत रडतो. याचा अर्थ येथे एवढाच घ्यावयाचा आहे की, साधनसामग्री भरपूर असली म्हणजे प्रामाणिक अभ्यासकाला केव्हा ना केव्हा तरी ती सामग्री पाहण्याची वासना होईल. आणि त्या वासनेच्या पोटी ती सामग्री तो अभ्यासक हस्ते परहस्ते समजावून घेईल. पण अशी सामग्रीच जर हाताशी नसेल तर मग त्या

मनुष्याच्या ठिकाणी सामग्री पाहण्याची इच्छा तरी कशी होईल ? मी येथे माझेच एक उदाहरण सांगतो. त्यावरून एका लहानशा सामग्रीसाठी देखील ती हाताशी नसली तर काय काय करावे लागते याचा उलगडा होईल. 'इंडियन आर्ट अॅण्ड लेटर्स' याच्या एका अंकात मी शिवाजी आणि डच वकील हर्बर्ट डी जागेर यांची भेट झाल्याचे वाचले आणि त्या भेटीत काय घडले हे जाणण्याची माझी जिज्ञासा वाढली. ही माहिती हॉलंडमधील एका अभिलेखागारात होती. पण त्याचे नाव मला ठाऊक नव्हते. माझी जिज्ञासा तर फार वाढली होती. सुदैवाने त्या सुमारास (१९५४) हैद्राबाद येथे मी इंडियन हिस्टॉरिकल रेकॉर्डस् कमिशनच्या बैठकीस गेलो असता तेथे डच दप्तरखान्यात काम करणाऱ्या एक बाई मला भेटल्या. त्यांजपाशी मी विचारणा केली की याबाबतचे कागद कोठे आहेत व ते कसे मिळतील ? त्यावर त्या बाईंनी मला सांगितले की, मी जावा-सुमात्राकडे जाऊन सुमारे ४ महिन्यांनी हेगमधील दप्तरखान्यात माझ्या कामावर रुजू होईन आणि शिवाजी व डच वकील यांविषयी आपण म्हणता तशी माहिती मिळाल्यास आपणास अवश्य कळवीन. त्याप्रमाणे सुमारे चार महिन्यांनी मला त्या बाईंचे पत्र आले. त्यात त्यांनी कळविले की, आपण म्हणता त्या वकिलाचे नाव हर्बर्ट दि जागेर असे असून त्याच्या शिवाजीशी झालेल्या भेटीचा वृत्तांत मला सापडला आहे. मी त्याची मायक्रोफिल्म पाठवू शकेन. तिचे मूल्य आपणास द्यावे लागेल. ते मूल्य मी त्या वेळी डेक्कन कॉलेजमधील एका डच अभ्यासकास दिल्यावर ती मायक्रोफिल्म मजकडे आली. तिचे वाचण्याइतपत मोठे प्रिंट मी काढविले. त्या वेळी ज्यांस डच येते असे प्रा. वाडेकर पुण्यात होते. पण त्यांना त्रास देण्याचे माझ्या मनात येईना. म्हणून मी ते फोटोग्राफ दिल्लीचे डच तज्ज्ञ डॉ. तपन रॉय चौधरी यांजकडे पाठविले. एका वर्षाने त्यांनी त्याचे भाषांतर करून मजकडे पाठविले. ते मी प्रसिद्ध केले. पण एवढे करण्यात २ वर्षे खर्च झाली. हेगच्या दप्तरखान्यातील ऐतिहासिक उताऱ्यांचे ६० वर्षांपूर्वी कै. स. म. दिवेकर यांनी आणविलेले ५० खंड सध्या नागपूर विद्यापीठाच्या ग्रंथालयात आहेत. कदाचित यांपैकीच सुमारे ३० खंडांची दुसरी प्रत मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथालयात आहे. त्यांची तपासणी करून त्यात शिवाजीविषयी काही माहिती आहे-नाही हे अद्यापि तरी कोणी पाहिलेले दिसत नाही. मी आणलेले पत्र त्यात नाही याची खात्री करून घेतल्यानंतर मी ते प्रसिद्ध केले. माझ्या माहितीप्रमाणे दिल्लीच्या राष्ट्रीय अभिलेखागारात भारताच्या इतिहासाला उपयोगी अशा सुमारे चाळीस हजार डच कागदांची फिल्म आणलेली आहे. पण ती तपासून पाहिल्याचे मला तरी अजून समजलेले नाही. अलीकडे डॉ. हाटाळकर यांनी फ्रान्सहून आणलेल्या कागदपत्रांचे सहा भाग इंग्रजी भाषांतराच्या रूपात महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळाने प्रसिद्ध केले आहेत. तसेच कै. पां. स. पिसुर्लेकर यांनी 'पोर्तुगीज-इ-मराठाज' या नावाने प्रसिद्ध केलेल्या सामग्रीचा श्री. काकोडकर यांनी केलेल्या रूपांतराचा एक खंड त्याच महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळाने इंग्रजीत प्रसिद्ध केला आहे.

याशिवाय अलीकडे श्री. स. शं. देसाई यांनी मराठी इतिहासाला उपयोगी पडणाऱ्या काही पोर्तुगीज कागदपत्रांची तीन खंडांत रूपांतरे प्रकाशित करविली आहेत.

तथापि जे काम झाले आहे त्या मानाने उरलेले तपासणी करण्याजोगे असे काम पुष्कळच व्हावयाचे आहे. हे सर्व केव्हा होणार याचा आज तरी पत्ता लागत नाही. कै. पिसुर्लेकर यांना जुने नवे पोर्तुगीज, फ्रेंच येत होते. आणि त्याचा उपयोग आपणास झाला आहे. मला असे वाटते की, आपल्या महाराष्ट्रात जी पाच-सहा विद्यापीठे आहेत त्यांपैकी प्रत्येकाने इंग्रजी भाषेशिवाय जर्मन, रशियन, फ्रेंच, पोर्तुगीज इ. भाषा जाणणारा एकेक उत्तम विद्वान् इतिहासविभागात नेमावा आणि त्याला येणाऱ्या भाषेतील भारतीय इतिहासाची जुनी-नवी साधने तपासून घेऊन ती मराठीत आणण्याचा प्रयत्न करण्यास त्याला सांगावे. एवढेच नव्हे तर तो ते काम निष्ठेने करीत राहील याचीही काळजी घ्यावी. असे केले तरच भारताच्या इतिहासाची युरोपीय भाषांतील साधने आमच्यापुढे येऊन आमचे लेखन अधिक साक्षेपी व समर्पक असे होईल.

सुमारे ८० वर्षांपूर्वी महाराष्ट्रात अनेक प्रकारची फार्सी साधने उपलब्ध होती. काही फार्सी साधने मुख्यतः कै. सरकारांनी युरोपात जाऊन आणली आणि त्यांचा उपयोगही त्यांना जितपत फार्सी समजत होते तितपत केला, पण आम्ही महाराष्ट्रीयांनी अनेक वेळा सरकारांच्या विरुद्ध उणे अधिक लिहिले. त्यांनी महाराष्ट्रातील संशोधक व त्यांनी जमविलेली साधने यांविषयी जे अनुदार लेखी उद्‌गार काढले त्यांजविषयी आम्हास वेळोवेळी साहजिक राग आला. पण त्यांनी जी फार्सी साधने वापरली त्यांजविषयी अभ्यास करून अधिक काही लिहिण्याचा आम्ही प्रयत्न केला नाही. अलीकडे मी, श्री. सेतुमाधव पगडी, जयनारायण सरकार, डॉ. गो. त्र्यं. कुलकर्णी इत्यादींनी सरकारांनी वापरलेली साधने इंग्रजी-मराठीत आणण्याचा प्रयत्न केला. पण जो प्रयत्न झाला त्या मानाने प्रयत्न न झालेली अशी कितीतरी साधने अजून त्या त्या भाषांत पडून आहेत. मी वर सांगितले आहे त्याप्रमाणे विद्यापीठांनी केले नाही तर मराठी इतिहासाच्या अभ्यासात समाधानकारक प्रगती होणे अशक्य आहे. तात्पर्य, आम्ही (१) प्रसिद्ध झालेल्या कागदपत्रांचा पद्धतशीर अभ्यास करून, म्हणजे अपूर्ण तारखा असलेल्या पत्रांच्या पूर्ण तारखा ठरविणे आणि ती कालक्रम व विषयानुक्रम लावून अभ्यासणे, (२) त्या पत्रांत आलेल्या हजारो लोकांची पक्की ओळख करून घेणे आणि (३) मराठी व इतरभाषिक साधनांचा खोल अभ्यास करून त्यांच्या साह्याने आमचा इतिहास लिहिणे, इत्यादि गोष्टी जोवर करणार नाही तोवर आम्हाला आमच्या सर्वांगीण इतिहासाची अचूक कल्पना येणे अशक्य आहे.

■ ■ ■

भाग १ : प्राचीन काळ

भा इ. सं मं. त्रैमासिक ६२ : १ –४, १९८३–८४

प्रागैतिहासिक महाराष्ट्र

म. के. ढवळीकर,
डेक्कन कॉलेज, पुणे.

गेल्या पंचवीस वर्षांत महाराष्ट्रात पुरातत्त्व संशोधन खूप मोठ्या प्रमाणावर झाले; याचे श्रेय प्रामुख्याने डेक्कन कॉलेजचे प्रा. ह. धी. सांकलिया, प्रा. शां. भा. देव आणि त्यांच्या सहकाऱ्यांना दिले पाहिजे. केवळ त्यांच्या अविरत परिश्रमांमुळे आपल्याला महाराष्ट्रातील प्रागैतिहासिक संस्कृतीचे सम्यक् दर्शन घडते. असे असले तरी त्यातही अनेक कच्चे दुवे आहेत आणि काही कूटस्थळे आहेत. त्यांची उकल होणे आवश्यक आहे.

गेल्या पंचवीस वर्षांत पुरातत्त्व विद्येचे स्वरूप संपूर्ण बदलून गेले आहे, हेही सांगणे आवश्यक आहे. इ. १९६० पासून या विद्याशाखेत अनेक नवनवे विचार-प्रवाह आले. नव्या तत्त्वप्रणालीमुळे आता त्याला ' नवे पुरातत्त्व ' असे नाव प्राप्त झाले आहे. शास्त्रीय शोधांमुळे पुरातत्त्व विद्येमध्ये अलीकडे खूप मोलाची भर पडली आहे. शास्त्रीय कसोट्यांमुळे पुरातत्त्व विद्येला आता शास्त्रीय बैठक प्राप्त झाली आहे. अमेरिकेतील प्रा. ल्युईस बिनफर्ड आणि इंग्लंडमधील डॉ. डेव्हिड क्लार्क हे या नव्या तत्त्वप्रणालीचे जनक आहेत. या नव-पुरातत्त्वाची मीमांसा येथे करण्याचे प्रयोजन नाही. परंतु त्यामुळे पुरातत्त्वाच्या अभ्यासाला नवी दिशा मिळून प्रागैतिहासिक मानवाच्या जीवनाचा सर्वंकष अभ्यास करता येतो. प्रस्तुत निबंधात महाराष्ट्रातील प्रागैतिहासिक संस्कृतीचा नवपुरातत्त्वाच्या पद्धतीने अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

पुराश्मयुग

अश्मयुगाच्या निरनिराळ्या कालखंडांत दगडी हत्यारे आणि प्राण्यांचे अवशेष महाराष्ट्रात घोड, भीमा, प्रवरा, गोदावरी, वैनगंगा इत्यादी नद्यांच्या खोऱ्यांत सापडले आहेत. त्यांपैकी प्रवरेवरील नेवाशाजवळ उत्खननही झाले आहे. त्यावरून तेथील अति-प्राचीन दगडी हत्यारे दोन ते तीन लाख वर्षांपूर्वीची असावीत असे दिसते. आद्य-पुराश्मयुगातील बेसॉल्टच्या किंवा क्वार्ट्झच्या हातकुऱ्हाडी, फरशा इत्यादी हत्यारे ओबडधोबड होती. त्यानंतर मध्ययुगात आकाराने लहान अशा विविध प्रकारच्या तासण्या वापरल्या जाऊ लागल्या. या प्रामुख्याने चर्ट जातीच्या दगडाच्या बनविलेल्या

आहेत. या प्रकारची हत्यारे महाराष्ट्रात जवळजवळ सर्वत्र आढळतात. उत्तरपुराश्म-युगातील एक महत्त्वाचे स्थळ चाळीसगावाजवळ पाटण येथे होते. तेथे डॉ. साळी यांनी उत्खनन केले. विशेष म्हणजे तेथे त्यांना कोरीव नक्षीकाम केलेला शहामृगाच्या अंड्याचा एक तुकडा सापडला; परंतु ह्या काळासंबंधीचे पद्धतशीर संशोधन पाहिजे तितके अजून झालेले नाही.

पूर्वी पुराश्मयुगीन हत्यारे गोळा करण्यापलीकडे फारसे संशोधन झाले नव्हते. परंतु गेल्या वीस वर्षांत पुरातत्त्वात पर्यावरणाचे महत्त्व वाढल्यामुळे आता तत्कालीन हवामानासंबंधी पुरावा गोळा करण्यास सुरुवात झाली आहे. डेक्कन कॉलेजमधील डॉ. शरद राजगुरू यांनी गेल्या वीस वर्षांत भारताच्या निरनिराळ्या भागांत अश्मयुगीन पर्यावरणाचा अभ्यास करून काही महत्त्वाचे निष्कर्ष काढले आहेत.[1] त्यांनी अनेक ठिकाणचे लाकडांचे व शिंपांचे नमुने गोळा करून त्यांचा रेडिओ कार्बन पद्धतीने काळही निश्चित केला आहे. त्यांच्या मते दोन ते तीन लाख वर्षांपूर्वी, म्हणजे आद्य पुराश्मयुगात, नेवाशाजवळील प्रवरा नदी सुमारे १० ते २० मीटर उंचीवरून वहात होती. तिचे पात्र उथळ होते आणि ते दगड–गोट्यांनी भरलेले होते. त्या वेळी हवामान आजच्यापेक्षा अधिक शुष्क होते. पुढे १ - १॥ लाख वर्षांपूर्वी प्रवरा, कृष्णा, गोदावरी इत्यादी नद्यांनी भूकंपीय हालचालीमुळे आपली पात्रे खोल करण्यास सुरुवात केली. त्यामुळे त्या हल्लीच्या पातळीपेक्षा १५ ते २० मीटर खाली वहात होत्या. पावसाचे प्रमाण त्या काळी २५ ते ३०टक्क्यांनी अधिक होते.

साधारण एक लाख वर्षांपूर्वी मध्यपुराश्मयुग सुरू झाले आणि तीस हजार वर्षांपूर्वीपर्यंत ते टिकून राहिले. या काळात हत्ती, रानबैल, गेंडे इत्यादी अनेक जंगली प्राणी महाराष्ट्रात इतस्ततः वावरत होते. जीवाश्मांच्या पुराव्यावरून हे सिद्ध होते. मराठवाड्यात आंबेजोगाईजवळ मांजरा नदीच्या काठी या काळातील असंख्य जीवाश्म विखुरलेले आहेत. त्यांचा सखोल अभ्यास डेक्कन कॉलेजमधील डॉ. जोशी आणि डॉ. बदाम करीत आहेत.[2] यानंतर ३० हजार वर्षांपूर्वी उत्तरपुराश्मयुग सुरू झाले. ते दहा हजार वर्षांपर्यंत टिकले. या काळात गारांची पात्यावर बनविलेली हत्यारे प्रामुख्याने वापरात होती. रानटी बैल, हत्ती, पाणघोडा, हरीण, सुसर, गवा इत्यादी अनेक प्राणी विपुल प्रमाणात उपलब्ध होते. या काळात महाराष्ट्रातील नद्या उथळ पात्रांतून वाहत होत्या. सुमारे २० हजार वर्षांपूर्वी त्या गाळाने भरून गेल्या होत्या आणि त्यांची उथळ पात्रे आजच्यापेक्षा ५ ते १० मीटर अधिक उंचीवर होती. हे बहुधा शुष्क हवामाना-मुळे झाले असावे. कोकणातही हाच परिणाम झाला असावा. त्या काळी अरबी समुद्राची पातळी आतापेक्षा २० ते ३० मीटर खाली गेली आणि त्यामुळे मोठा भूप्रदेश अस्तित्वात आला. पुराणात, परशुरामाने हजारो वर्षांपूर्वी सुपाने कोकणातील समुद्र मागे हटवून तेथील भूमी वसाहतीस योग्य केली, अशी कथा आहे. तिचे शास्त्रीय स्पष्टीकरण देता येते.

सुमारे दहा हजार वर्षांपूर्वी मध्याश्मयुग सुरू झाले. या काळातील गारांची पात्यावर बनविलेली हत्यारे महाराष्ट्रात अनेक ठिकाणी सापडली आहेत. इनामगाव आणि पाटण येथे त्यांचे शास्त्रशुद्ध उत्खननही झाले आहे. या काळात हवामानात महत्त्वाचा बदल घडून आला. मन्सूनचा पाऊस विपुल पडू लागला. हे हवामान इ. पू. १५०० पर्यंत टिकले. पाऊस वाढल्यामुळे नद्यांची पात्रे खोल गेली आणि सुमारे ७००० वर्षांपूर्वी त्या जवळजवळ हल्लीच्या पातळीवरून वाहू लागल्या. त्यांच्या काठांवर मळीच्या जमिनी तयार झाल्या. त्यांवर झाडझाडोरा खूप वाढला आणि त्यामुळे आज दिसणारी काळी जमीन तयार झाली.

मध्याश्मयुगीन लोकांचा उदरनिर्वाह कंदमुळे, फळे यांवर प्रामुख्याने होता. पूरक अन्न म्हणून मासे आणि शिकारीत मारलेले लहान प्राणी यांचा समावेश होता. पावसाचे प्रमाण वाढल्याने या काळात महाराष्ट्रात भरपूर झाडझाडोरा होता. त्यामुळे शिकारीसाठी पक्ष्यांची आणि प्राण्यांची वाण नव्हती. फार थोड्या कष्टात माणसाला विपुल अन्न मिळू लागले. किंबहुना त्यामुळेच ४००० वर्षांपूर्वी येथे शेती करण्यास सुरुवात झाली होती. तरीसुद्धा अनेक ठिकाणी मध्याश्मयुगीन टोळ्या राहत होत्या. पुढेही इ. पू. १००० पर्यंत त्या टिकून असाव्यात. अन्न गोळा करणाऱ्या वन्य जमातींच्या पाहणीवरून मानववंशशास्त्रज्ञांना असे आढळून आले आहे की, त्यांना शेतीचे ज्ञान असले तरी ती कष्टमय असल्याने जमीन कसण्यास ते उद्युक्त होत नाहीत.[3] आफ्रिकेत, दक्षिण अमेरिकेत आणि आग्नेय आशियात आजतागायत अशा अनेक वन्य जमाती आहेत की ज्यांना अन्नोत्पादन करण्याची इच्छा नाही. ३५०० वर्षांपूर्वी महाराष्ट्रातही हेच घडले असावे. येथे शेतकऱ्यांच्या वसाहती एकमेकांपासून खूप दूर अंतरावर वसलेल्या होत्या आणि मध्याश्मयुगीन टोळ्या सुखाने कालक्रमण करीत होत्या.

ताम्रपाषाणयुग

महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने नवाश्मयुग अवतरलेच नाही. मध्याश्मयुगानंतर येथे ताम्रपाषाण युगास सुरुवात झाली. त्या वेळी (इ. पू. २०००) शेतीचे ज्ञान असणाऱ्या आणि तांब्याची व दगडी हत्यारे वापरणाऱ्या टोळ्या येथे स्थायिक झाल्या. गुजरातमधून उत्तर सिंधू संस्कृतीचे लोक येथे इ. पू. १८०० च्या सुमारास आले. त्यानंतर इ. पू. १६०० मध्ये आलेल्या माळव्यातील शेतकऱ्यांनी गोदावरीच्या आणि भीमा नदीच्या खोऱ्यात वस्ती केली. इ. पू. १४०० च्या सुमारास जोर्वे संस्कृतीचा उदय झाला. या संस्कृतीच्या लोकांनी कोकण आणि विदर्भ सोडून सर्व महाराष्ट्रभर वसाहती स्थापन केल्या. या संस्कृतीचे व्यवच्छेदक लक्षण म्हणजे त्यांची खापरे. ती सोडल्यास त्यांचे भौतिक जीवन समान होते.

सांस्कृतिक कालक्रम

१. सावळदा संस्कृती (इ. पू. २००० – १८००)

सावळदा (ता. नंदुरबार, जि. धुळे) येथे सावळदा संस्कृतीचे अवशेष प्रथम सापडले.[४] या संस्कृतीच्या रंगीत खापरांवर प्रामुख्याने जलचरांची चित्रे काढलेली असतात. तापीच्या खोऱ्यात काही ठिकाणी या संस्कृतीचे अवशेष सापडले आहेत.

२. सिंधु संस्कृती (इ. पू. १८०० – १६००)

सिंधु संस्कृती साऱ्या गुजराथभर विस्तारलेली होती. परंतु इ. पू. १८०० च्या सुमारास तिचा ऱ्हास सुरू झाला. आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे भरभराटीस आलेली ही संस्कृती व्यापार मंदावल्यामुळे लयास जाऊ लागली. या काळात समुद्राची पातळी तीन मीटरहून खाली गेल्यामुळे लोथलसारखी बंदरे निकामी झाली. त्यामुळे हे लोक देशोधडीला लागले. दक्षिण गुजराथेतून तापीच्या खोऱ्यातून ते महाराष्ट्रात आले. तापीच्या खोऱ्यात त्यांचे अवशेष सापडतात. कावठे (ता. साक्री, जि. धुळे) ही उत्तर सिंधु संस्कृतीची फार मोठी वसाहत होती. दायमाबाद (जि. नगर) येथेही उत्खननात या संस्कृतीचे अवशेष सापडले आहेत.[५] विशिष्ट घाटाची खापरे आणि त्यांवरील नक्षी ही या संस्कृतीची वैशिष्टये होत. काही खापरांवर सिंधु लिपीतील अक्षरे रंगविलेली किंवा कोरलेली आहेत.

३. माळवा संस्कृती (इ. पू. १६००–१४००)

इ. पू. १७ व्या शतकात माळव्यातील ताम्रपाषाणयुगीन शेतकरी खानदेशात तापीच्या खोऱ्यात येण्यास सुरुवात झाली. तेथे त्यांनी अनेक गावे वसविली आणि पुढे ते बागलाण घाटातून गोदावरीच्या खोऱ्यात आणि दक्षिणेकडे भीमेच्या खोऱ्यातही पसरले. प्रकाश (जि. धुळे), दायमाबाद (जि. नगर) आणि इनामगाव (जि. पुणे) हीं या संस्कृतीची अत्यंत महत्त्वाची केंद्रे होतीं. महाराष्ट्रात अनेक भागांत स्थिर जीवनाची सुरुवात या लोकांनी केली. गव्हाची लागवड करण्याची सुरुवातही या लोकांनीच केली असावी. माळव्यासारख्या समृद्ध प्रदेशातून आलेली ही मंडळी येथे आल्यानंतरही भरभराटीस आली. येथील काळी जमीन त्यांनी प्रथम लागवडीस आणली. महाराष्ट्रातील यानंतरचा सांस्कृतिक विकास या लोकांमुळे झाला.

माळवा संस्कृतीची खापरे अत्यंत वैशिष्टयपूर्ण आहेत. ती तांबडया किंवा पिवळसर रंगांची असून, त्यांवर काळया किंवा तपकिरी रंगात नक्षी असते. या भांडयांचे घाट आणि त्यावरील नक्षीकाम इतके विविध प्रकारचे आहे की, त्यांना भारतात इतरत्र तोड नाही. धान्य साठवण्याचे रांजण, पाण्याचे हंडे, कुंडे, वाडगी इतकेच नव्हे तर मद्याचे चषकही या मंडळींनी अत्यंत कलात्मक बनविले होते. हत्यारे सर्वसाधारणपणे गारेच्या दगडांची आणि काही थोडी तांब्याची असत. तांबे अति दुर्मिळ, त्यामुळे ते दागिन्यांसाठीही वापरले जाई.

४. जोर्वे संस्कृती (इ. पू. १४००–१०००)

इ. १९५० मध्ये या संस्कृतीचा जोर्वे (ता. संगमनेर, जि. नगर) येथे शोध लागल्यानंतर गेल्या ३३ वर्षांत या संस्कृतीची सुमारे दोनशे स्थळे उजेडात आली आहेत. महाराष्ट्राची कोकणची किनारपट्टी आणि विदर्भाचा काही भाग सोडल्यास साऱ्या महाराष्ट्रात ही संस्कृती पसरलेली होती. हिचा उगम माळवा संस्कृतीतूनच झाला असावा असे इनामगाव उत्खननातील पुराव्यावरून वाटते. कदाचित काही नवीन जमाती इ. पू. १४०० च्या सुमारास महाराष्ट्रात शिरल्या आणि त्यांनी आधीच्या माळवा संस्कृतीच्या लोकांवर आपले वर्चस्व स्थापन केले असावे. बहुधा या संस्कृती–संघर्षातून जोर्वे संस्कृतीचा उदय झाला असावा.

जोर्वे संस्कृतीची खापरे अत्यंत वैशिष्टयपूर्ण आहेत. ती तांबडया रंगाची असून त्यावर काळया रंगात नक्षी असते. मोठाले रांजण, हंडे, तोटीची भांडी आणि वाडगे यांचे घाट लक्षणीय आहेत. ही भांडी अत्यंत खरपूस भाजल्यामुळे खणखणीत असतात. त्या मानाने माळवा संस्कृतीची भांडी निकृष्ट वाटतात. या लोकांची शेतीही भरभराटीस आलेली होती. शेतीसाठी जलसिंचनाची सुरुवात प्रथम यांनी केली.

इ. पू. १००० च्या सुमारास पश्चिम भारतातील हवामानात विलक्षण बदल घडून येऊ लागला. त्यामुळे पावसाचे प्रमाण कमी झाले. वारंवार दुष्काळ पडू लागल्याने तापी आणि गोदावरीच्या खोऱ्यांतील जोर्वे संस्कृतीच्या अनेक वसाहती उजाड पडल्या. त्या लोकांचे पुढे काय झाले याचा पुरावा अजून मिळालेला नाही. त्यातील काही मंडळींनी भीमेच्या खोऱ्यात स्थलांतर केले असावे. कारण येथे संपूर्ण दुष्काळ बहुधा नव्हता. थोडयाफार पावसावर लोक कशीबशी गुजराण करीत होते. या उत्तर जोर्वे संस्कृतीचे अवशेष भीमेच्या खोऱ्यात सापडले आहेत. आर्थिक स्थिती खालावल्यामुळे लोकांना दारिद्र्य आले, खापरे निकृष्ट झाली; पुढे लोकांना भटके जीवन जगण्याची वेळ आली. आणि अखेर इ. स. सातव्या शतकात हे लोकही परागंदा झाले.

पर्यावरण

महाराष्ट्रातील हवामान आजही निमदुष्काळी आहे आणि चार हजार वर्षांपूर्वीही ते फारसे निराळे नव्हते. परंतु इ. पू. २५०० ते १५०० या काळात पश्चिम भारतातील हवामान हल्लीपेक्षा खूपच अनुकूल होते, असे डॉ. गुरुदीपसिंग यांचे अनुमान आहे.[६] त्या काळी हल्लीपेक्षा पाऊस अधिक पडत असावा. त्यामुळे सिंधु संस्कृती आणि माळवा संस्कृतीचे लोक महाराष्ट्राकडे आकृष्ट झाले. तेथील काळी जमीन माळवा आणि गुजराथेतल्या काळया जमिनीसारखीच. तेव्हा प्रदेश त्यांना फारसा वेगळा वाटण्याचे कारण नव्हते. पुढे इ. पू. १५०० पासून हवामानात बदल घडून येऊ लागला. पाऊस कमी झाला आणि इ. पू. १००० च्या सुमारास तर जवळजवळ दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली, ती आजही कायम आहे. महाराष्ट्रात सर्वत्र

काळी चिकण जमीन आहे. तिचा थरही फारसा जाड नाही. पावसाचे प्रमाण सर्वसाधारणपणे ४०० ते ७५० मिलीमीटर असल्याने, हा प्रदेश निमदुष्काळी म्हणून गणला जातो. येथील नद्या खडकाळ प्रदेशातून वाहत असल्यामुळे त्यांची पात्रे अनेक ठिकाणी खोल आहेत. त्यामुळे त्यांच्या दोन्ही तीरांवर फारशी मळीची जमीन निर्माण झालेली नाही. किंबहुना यामुळेच महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीची सिंधु संस्कृतीसारखी प्रचंड भरभराट होऊन त्यांचे नागरी संस्कृतीत रूपांतर झाले नाही. उलट त्या ग्रामीण संस्कृतीच राहिल्या आणि निकृष्ट होऊन लयाला गेल्या. याचे मख्य कारण असे की, काळी जमीन परिणामकारकरीत्या कसण्यासाठी लोखंडी नांगरच पाहिजे. त्याच्या अभावी तिची लागवड फायदेशीर होत नाही. ताम्रपाषाणयुगीन शेतकऱ्यांजवळ लोखंड नव्हते. समृद्ध शेती असल्याशिवाय आर्थिक सुबत्ता शक्य नाही, आणि त्यामुळेच येथील ताम्रपाषाणयुगीन संस्कृती फारशा भरभराटीस न येता लोप पावल्या.

वसाहतरचना

वसाहतरचना ही भौगोलिक संकल्पना आता नवपुरातत्त्वाचे एक अविभाज्य अंग बनली आहे. एखादा विशिष्ट प्रदेश मानवसमूहाने वसाहतीसाठी का निवडला याचा अभ्यास म्हणजेच वसाहतरचना. ती त्या समूहाच्या गरजेनुसार पाणी, संरक्षण, शेतीयोग्य जमीन, शिकारीसाठी प्राणी, अन्नोपयोगी वनस्पती, हत्यारोपयोगी दगड आणि धातू इत्यादींच्या उपलब्धींवर अवलंबून असते. भारतीय पुरातत्त्वात या संकल्पनेचा वापर अद्यापि केलेला नाही हे खेदकारक आहे.

महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगीन वसाहतरचना वैशिष्ट्यपूर्ण होती. खानदेशात तापीच्या खोऱ्यात अत्यंत सुपीक काळी जमीन मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होती आणि पाणीही मुबलक; त्यामुळे तेथे मोठ्या प्रमाणावर वस्ती झाली. एकट्या धुळे जिल्ह्यात शंमराहून अधिक वसाहतींचा शोध आजवर लागला आहे. प्रकाश हे तापी आणि गोमई यांच्या संगमावर वसलेले तत्कालीन फार मोठे गाव होते. ते तापीच्या खोऱ्यातील तत्कालीन केंद्र होते यात शंका नाही. बहुसंख्य वसाहती मात्र ५ हेक्टरपेक्षा लहान होत्या. काही ठिकाणी तर दोनतीन वसाहती १-२ कि. मी. अंतरावर सापडतात. त्या १–२ हेक्टरपेक्षाही लहान होत्या. त्या हल्लीप्रमाणे शेतकऱ्यांच्या वाड्या असाव्यात. २–४ कुटुंबांची घरे तेथे असावी.

तापीच्या खोऱ्यातील वसाहतींचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्या सर्वसाधारणपणे तापीवर नसून प्रामुख्याने तिच्या उपनद्यांवर वसलेल्या आहेत. आजही तापीच्या खोऱ्यात हेच दृश्य दिसते. धुळे, अंमळनेर अशी मोठी गावे तापीवर नाहीत. त्याचे मुख्य कारण असे की तेथे पुराचा धोका असल्यामुळे तापीवर त्या मानाने वसाहती फार थोड्या झाल्या. प्रा. सी. डी. देशपांडे यांनी त्याचे स्पष्टीकरण दिले आहे. ते

म्हणतात, "The richest half is not the immediate banks of Tapi, but the immediate plain in the danger of suffering rapid erosion developed on the black cotton soil. Quite contrary to the general pattern of rivers, the Tapi discourages population concentration on its banks. Erosion and 'bad lands' topography prevent irrigation and intensive cultivation."[७] या कारणांमुळे खुद्द तापीवर वसाहती फारशा झाल्या नाहीत.

तापीच्या मानाने गोदावरीच्या खोऱ्यात कमी प्रमाणावर वसाहती झाल्या. साक्रीहून बागलाण घाटातून सटाणा मार्गाने आद्य शेतकरी गोदावरीच्या खोऱ्यात आले. दायमाबाद (ता. श्रीरामपूर, जि. नगर) हे या भागातील मुख्य केंद्र. त्याचा विस्तार वीस हेक्टरहून अधिक होता. त्यामुळे ताम्रपाषाणयुगीन महाराष्ट्रात ते सर्वात मोठे केंद्रं होते. ती प्रागतिहासिक महाराष्ट्राची राजधानी समजण्यास हरकत नाही. अपर गोदावरीच्या डोंगराळ भागात उंचसखल प्रदेश आणि हलक्या प्रतीची शेत-जमीन यामुळे तेथे फारच तुरळक वस्ती होती. त्या मानाने नाशिकपासून खाली वस्ती अधिक होती. तेथे काळी जमीन मुबलक होती. मराठवाड्यात अद्यापि फारसे अन्वेषण न झाल्यामुळे तेथे किती वस्ती होती हे सांगता येत नाही. भीमेच्या खोऱ्यात मात्र वसाहत खूपच तुरळक झाली. खडकाळ प्रदेश, निकृष्ट जमीन आणि पाण्याचे दुर्भिक्ष्य असल्यामुळे येथे फारच विरळ वस्ती झाली.

एखाद्या वसाहतीची रचना कशी होती याची कल्पना आपल्याला इनामगाव उत्खननातील पुराव्यावरून करता येते.[८] दायमाबाद येथेही काही घरांचे अवशेष सापडले. माळवा संस्कृतीची घरे आकाराने चौकोनी व मोठी होती. साधारणपणे ती ७ × ५ मी. या आकाराची असून त्यांत मध्ये छोटी भिंत असे. त्यामुळे त्यांची दोन खोल्यांत विभागणी होई. जमीन चोपून काळजीपूर्वक तयार करीत. त्यासाठी खाली काळी माती, वर वाळू आणि पिवळी माती (Silt) यांचे थर असत. घराच्या भिंती-खाली ३० सें. मी. मातीच्या आणि वर कुडाच्या असत. त्या दोन्ही बाजूंनी मातीने लिंपल्या जात. भिंतीत लाकडी खांब असत. १०-१२ सें. मी. व्यासाच्या खांबांवरून घराच्या उंचीची कल्पना येते. मातीची भिंत बाहेरून उतरती असे. तिचा मुख्य उद्देश, पावसाचे पाणी घरात येऊ न देणे हा होता, असे हल्लीच्या झोपड्यांवरून वाटते.

घरात एका कोपऱ्यात चूल असे. सुमारे ७० × ४० सें. मी. आकाराचा लंब-गोल खड्डा ३० सें. मी. खोल खणून त्याचा चूल म्हणून वापर होई. बाहेर अंगणात मोठा चर (१ मी. × ५० सें. मी., ५० मी. खोल) खणून तेथे शिकारीतील प्राणी भाजले जात. या चुलाणात मध्यभागी एक चपटा दगड असे. त्यावर चिखल थापून भांडे घेवण्याची सोय केलेली असे. त्यामुळे येथे स्वयंपाकही होत असावा. फक्त पावसाळ्यात ठ रातील चुलीचा वापर होत असावा.

घरात दुसऱ्या कोपऱ्यात एक मातीचा गोल कट्टा (व्यास १ मी., उंची १० से.मी.) असे. त्यावर धान्याची कणिग असे. असे कट्टे आजही इनामगावच्या घरांत दिसतात. त्यात खाली बोरीचे काटे आणि वाळू ठेवतात. त्यामुळे धान्याला उंदीर लागत नाहीत. घरात धान्याचे बळदही (१ मी. व्यास आणि खोल) असे. त्याचा तळ आणि बाजू चुन्याने सारवीत. हल्ली कणगीत गहू आणि बळदात ज्वारी साठवतात. पूर्वीही हीच पद्धत प्रचलित असण्याची शक्यता आहे.

पाण्याचे आणि धान्याचे रांजण आणि माठ अर्धे पुरले जात. पाटा–वरवंटा दाराजवळ असे. घराबाहेरील अंगण काळजीपूर्वक तयार केले जाई. त्याची जमीनही चोपून तयार करीत. भारतासारख्या उष्ण कटिबंधातील प्रदेशात अंगणाचे महत्त्व पटवून देण्याची गरज नाही. घर फक्त धनधान्य आणि मौल्यवान वस्तूंसाठी तसेच पावसाळ्यात उपयोगासाठी; बाकी सारा काळ अंगणात. अंगणात आणि परसात गुरे बांधीत. जमिनीतील नायट्रोजनच्या विश्लेषणावरून गुरे कोठे बांधत असत याची माहिती होते.

माळवा संस्कृतीची काही घरे खड्डा करून बांधलेली होती. सुमारे दोन ते तीन मी. व्यासाचा तीस सें. मी. खोल खड्डा गोलाकार खणून त्यावर कुडाच्या भिंती आणि गवताचे छप्पर उभारीत. आतील जमीन आणि खड्ड्याची बाजू चुन्याने लिंपून काढीत. ही घरे गरिबांची असावीत. लांब वासे त्यांना मिळविणे शक्य नव्हते. त्यामुळे घराला उंची आणण्यासाठी खड्डा खणत. या प्रकारचे गर्तावास हल्लीही इनामगावच्या परिसरात बांधलेले आहेत. काही घरे १ मी. खोल असत. ३ मी. व्यासाची एक झोपडी उत्खननात आढळली आहे.

पूर्व जोर्वे काळात (इ. पू. १४०० ते १०००) मात्र गर्तावास किंवा गोल झोपड्या बांधल्या जात नसत. या काळातील सर्व घरे आकाराने चौकोनी आणि ऐसपैस (७ × ५ मी.) असत. या घरांचे एक वैशिष्टय असे की ती पूर्व-पश्चिम अशी ओळीत बांधली जात. त्यावरून वसाहत पूर्वरचनेनुसार आखली जात असावी असे वाटते. अशा प्रकारची वसाहतीची आखणी यवतमाळ आणि नांदेड जिल्ह्यांतील कोलाम आजही करतात. तसेच बस्तरमध्ये गोंडांची घरेही अशीच रांगेत बांधली जातात. इनामगाव येथे सापडलेल्या घरांमध्ये बाजूला १ मी. आणि समोर २ मी. अंतर सोडलेले असे. त्याचा रस्ता आणि गल्लीसारखा उपयोग होत असावा. वसाहतीच्या मध्यभागी मोकळी जागा सोडलेली असे. ती पंचायत किंवा प्रसंगोपात लोकांना जमविण्यासाठी असावी.

या काळातील घरांचे मध्ये भिंत घालून दोन भाग केलेले असत. परंतु चूल, कणगीचा ओटा, बळद, पाटा-वरवंटा, अंगणातील चुलाणे आणि घरातील भांड्यांची रचना ही माळवा संस्कृतीच्या घरांप्रमाणेच होती. पूर्वी जोर्वे काळ हा महाराष्ट्रातील आद्य शेतकऱ्यांच्या जीवनातील अत्यंत भरभराटीचा काळ होता. त्यामुळे धनधान्य विपुल होते. ते साठविण्यासाठी कणगी आणि बळदाच्या जोडीला चार खुरांचा मातीचा

रांजण किंवा कोठी नव्याने बनविण्यात आली. तिला आधार म्हणून पायाशी चपटे दगड ठेवीत किंवा मातीच्या गोळ्यात ते लिंपून टाकीत.

या काळातील सर्व घरे, क्वचित अपवाद सोडल्यास, एका खोलीची आहेत. परंतु वसाहतीच्या मध्यभागी अनेक खोल्यांचे एक घर सापडले. ते ५ खोल्यांचे होते. घरातील पुराव्यावरून ते वसाहतीच्या प्रमुखाचे असावे असे वाटते. या घराशेजारी दक्षिणेच्या बाजूला १० × १० मी. आकाराचे एक धान्याचे कोठार सापडले. ते चौकोनी आकाराचे असून त्यात मातीचे अनेक गोलाकार कट्टे आणि बळदे होती. चूल, खापरे इत्यादी मनुष्यवस्तीच्या खुणा तेथे आढळल्या नाहीत. तेव्हा ते वसाहतीचे कोठार होते यात शंका नाही. तें वसाहतप्रमुखाच्या घराशेजारी आहे हे लक्षणीय आहे. त्यावरून, वस्तीच्या रहिवाश्यांकडून हा प्रमुख धान्याच्या रूपात कर वसूल करीत असावा आणि हे धान्य साठविण्यासाठी कोठार बांधले गेले असावे असे दिसते.

जोर्वे संस्कृतीच्या मोठ्या वसाहतीच्या संरक्षणाची विशेष काळजी घेतलेली असे. प्रकाशचे उत्खनन मर्यादित स्वरूपाचे असल्यामुळे तेथे यासंबंधीचा पुरावा प्राप्त झाला नाही. दायमाबाद येथे तटबंदीचा पुरावा उपलब्ध असल्याचे डॉ. साळी याचे मत आहे.[९] परंतु त्याचे स्वरूप आपल्याला निश्चितपणे माहीत नाही. इनामगांव येथे मात्र पूर्व जोर्वे वसाहतीला दक्षिणोत्तर असा खंदक खणलेला होता. तो १५० मी. लांब आणि १७ मी. रुंद आहे. तो किती खोल असावा हे उत्खनन केल्यानंतर कळून येईल. या खंदकातून खणून काढलेली माती तटबंदी बांधण्यासाठी वापरली गेली. ती मातीची असली तरी भक्कम होती. तिला सुमारे चाळीस पन्नास मी. अंतरावर दगडगोट्यांचे गोलाकार बुरूज बांधलेले होते. तसेच या काळात नदीच्या पात्रात उतरण्यासाठी उत्तरतीरावर एक दगडी घाटही बांधलेला होता. तो होडयांसाठी असावा. होडयांची चित्रे खापरावर चितारलेली आहेत.

पूर्व जोर्वेकालीन वसाहतींचे आणखी एक वैशिष्टय असे की तिच्यातील कारागिरांची घरे एका भागात बांधलेली असत. इनामगाव येथे ती मुख्य वस्तीच्या पश्चिमेच्या भागात होती. तेथे कुंभार, तांबट, सोनार, मणिकार, लोणारी इत्यादींची घरे उत्खननात सापडली आहेत. पूर्वेकडच्या अर्ध्या भागात सधन शेतकऱ्यांची घरे होती. प्रमुखाचे घर तेथेच असे. इतरेजन दक्षिणेच्या भागात रहात होते. भूमिहीन मजूर मुख्य वसाहतीच्या पश्चिमेस १०० मी. दूर झोपडयांतून रहात असत. महाराष्ट्रात अगदी अलीकडे, म्हणजे ५० वर्षांपूर्वी, याच प्रकारची ग्रामरचना होती, याचा या संदर्भात अवश्य उल्लेख केला पाहिजे. गावाच्या कडेला वेशीजवळ बलुतेदारांची घरे, मध्यभागात पाटील–देशमखांची आणि गावाबाहेर हरिजनांची घरे आजही आपणास पहावयास मिळतात. य। ाम रचनेची प्राचीनता साडेतीन हजार वष मागे नेता येते.

उत्तर जोर्वे कालखंडात हे चित्र संपूर्णपणे पालटले. इ. पू. १००० नंतर पडलेल्या अवर्षणामुळे लोकांची आर्थिक स्थिती खालावली. पूर्वीची ऐसपैस घरे बांधणे

आता शक्य नव्हते. त्याऐवजी लहान गोलाकार झोपड्या बांधण्यात येऊ लागल्या. त्या दोन मी. व्यासाच्या आहेत. त्यांची जमीनही चोपून तयार केली जाई. भिंती कुडाच्या आणि वर गवताचे (Typha) छप्पर असे. या झोपड्यांचे तीन–चारांचा एक असे गट आढळतात. या घरांत धान्य चार खुरांच्या रांजणात साठविले जाई. कणग्यात आणि वळदांत साठविण्याइतके धान्य आता नव्हते. प्रत्येक घरात रांजणाला आधार म्हणून चार चपटे दगड ठेवलेले आढळतात. घरात लहान गोल खड्डयात (व्यास ४० सें. मी.) चूल असे. अंगणात मात्र चुलाण असे.

उत्तर जोर्वे काळाच्या अखेरीस या आद्य शेतकऱ्यांचे स्थिर जीवन संपुष्टात येऊन ते विमुक्त झाले. पावसाळ्यातील चार महिने घरात राहणे आणि इतर वेळी भटकंती करावी लागल्यामुळे लहानशा झोपड्या बांधल्या गेल्या. त्यांची जमीनही चोपून केलेली नसे. ही घरे हल्लीच्या धनगरांच्या पालासारखी होती. त्यामुळे उत्खननात ती शोधून काढणे फार अवघड होते.

उपजीविका

ताम्रपाषाणयुगीन मानवाची उपजीविका शेती, पशुपालन, मासेमारी आणि शिकार यांवर आधारलेली होती. शेतीचे ज्ञान ४००० वर्षांपूर्वी येथे उपलब्ध झाले होते. ही शेती जिरायती होती. पाऊस सुमारे ४००–७५० मि. मी. असल्यामुळे हा सर्व प्रदेश निमदुष्काळी होता. साधारणपणे ८००० वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील हवामानात लक्षणीय परिवर्तन झाले. पावसाचे प्रमाण तेव्हापासून वाढले ते ३५०० वर्षांपूर्वीपर्यंत टिकून राहिले. परिणामी इ. पू. २००० ते १५०० या काळात पाऊस मुबलक असल्यामुळे शेती भरभराटीस आलेली होती. परंतु इ. पू. १५०० पासून पावसाचे प्रमाण कमी होऊ लागले. असे असले तरी आठ हजार वर्षांपूर्वी तयार झालेली काळ्या मातीची आर्द्रता धारण करण्याची क्षमता विशेष असल्यामुळे फारशी चिंता नव्हती. तरीसुद्धा हिवाळी पिके घेण्यासाठी उपयोगात आणलेल्या जलसिंचनाचा पुरावा इनामगाव येथे उपलब्ध झाला आहे. याच प्रकारची सोय इतर ठिकाणीही असणे अशक्य नाही. माळवा संस्कृतीचे शेतकरी प्रामुख्याने सातूची आणि मसुरीची लागवड करीत. त्याबरोबर कुळीथ, रागी, वाटाणे ही पिकेही घेतली जात. पूर्व जोर्वे काळात कालव्याचे पाणी उपलब्ध झाल्यामुळे आजच्याप्रमाणे खरीप आणि रब्बी अशी दुबार पिके घेऊ जाऊ लागली. सातू, गहू, ज्वारी आणि तांदूळ या मुख्य पिकांशिवाय मसूर, वाटाणे, कुळीथ, रागी आणि कडवेवाल इत्यादी अनेक पिके शेतकरी काढू लागले. गहू हे हिवाळी पीक आहे; त्याला हिवाळी पाऊस लागतो. तो नसल्यास कालव्याद्वारे पाणी-पुरवठा करावा लागतो. पूर्व जोर्वे काळात हे शक्य झाल्यामुळे गहू पिकविला गेला.

ताम्रपाषाणयुगात काळ्या जमिनीत शेती केली जात नसावी असा निष्कर्ष कोसंबी यांनी काढला आहे.[१०] काही पुरातत्त्वज्ञांच्या मते ही शेती नदीच्या दोन्ही

तीरांवरील मळीच्या जमिनीत (alluvium) केली जात होती.[११] परंतु इनामगाव सारख्या १०००-१२०० वस्तीच्या गावात अशी १००० हेक्टर मळीची जमीन उपलब्ध नाही. तेव्हा काळी जमीन कसण्याशिवाय पर्याय नव्हता. ही जमीन लोखंडी नांगराशिवाय कसता येणे शक्य नाही असे कोसंबी म्हणतात. १२५ वर्षांपूर्वी भारतात आलेल्या एका ब्रिटिश कृषीतज्ञाने काळी जमीन क्वचितच नांगरली जात असल्याचा निर्वाळा दिला आहे.[१२] हल्लीसुद्धा ज्वारीची लागवड करण्याची जमीन तीन वर्षांतून एकदा नांगरतात. काळया जमिनीत उन्हाळयात मोठया भेगा पडतात. त्या खोलवर असल्याने नायट्रोजनचे अभिसरण – जे नांगरटीमुळे होते – आपोआप होते. तेव्हा "The black cotton soil ploughs itself" ही म्हण खरी ठरते.

काळया जमिनीची नांगरट लाकडी नांगराने केली जात असावी. मध्यप्रदेशात अजूनही काही ठिकाणी खैराच्या लाकडाचा (Aveca catechu) नांगर वापरतात. ताम्रपाषाणयुगीन शेतकऱ्यांनी हेच केले असावे. अर्थात नांगराचा वापर सर्रास नसावा. त्याऐवजी पेरण्यासाठी टोकदार लाकडी काठीने जमिनीत भोक पाडून त्यात बी टाकले जात असावे. लाकडाच्या काठीला बसवलेल्या दगडी कडया अनेक ठिकाणी सापडल्या आहेत. युरोपातसुद्धा काही भागात गेल्या शतकापर्यंत नांगर वापरला जात नव्हता हे या संदर्भात ध्यानात ठेवले पाहिजे.

पशुपालन हे ताम्रपाषाणयुगीन आर्थिक व्यवस्थेचे महत्त्वाचे अंग होते. गाय, बैल, म्हैस, शेळी, मेंढी, डुक्कर, घोडा इत्यादी प्राणी पाळले जात. त्यांतील काहींचा अन्नात निश्चितच समावेश केला जात असावा. मासेमारीचे तांब्याचे गळ आणि माशांची हाडे उत्खननात सापडतात. इनामगाव येथे सागरी माशांची हाडेही सापडली आहेत. ते महाड किंवा कल्याणहून येत असावेत. शिकार हे हल्ली काही जमातीत (उदा. कोलाम) पुरुषत्वाचे लक्षण समजले जाते. रानडुक्कर आणि हरणांची शिकार केल्याचा पुरावा उत्खननात मिळतो. उत्तर जोर्वे काळात शेतीला अवकळा प्राप्त झाल्यावर शिकारीचे प्रमाण वाढले. आधीच्या काळात हरणांच्या हाडांचे प्रमाण १॥ टक्का होते, ते १४ टक्क्यांपर्यंत वाढले. माळढोक पक्षी तर अतिशय आवडता. सव्वा मीटर उंचीच्या या पक्ष्याचे दहा किलो मांस असते. ते अत्यंत रुचकर असल्यामुळे त्याची सर्रास कत्तल झाली असावी. इनामगावच्या परिसरात श्रीगोंदे तालुक्यात (जि. नगर) रेहाकुरी येथे गेल्याच वर्षी महाराष्ट्र सरकारने हरणे आणि माळढोक पक्ष्यांसाठी अभयारण्य काढले आहे हे सांगितले पाहिजे.

उत्तर जोर्वे काळात भटके जीवन जगावे लागल्यामुळे गाई, बैलांच्याऐवजी शेळयामेंढयांचे कळप बाळगावे लागले. त्यांचाही अन्नात समावेश होताच. परंतु त्यांचे दूध हे आद्य शेतकरी पीत नसावेत असे वाटते. अनेक वन्य जमातींत गाय किंवा शेळी यांचे दूध काढत नाहीत. पश्चिम आशियातही याला पुष्टी देणारा पुरावा उपलब्ध झाला आहे.[१३]

शासन आणि समाजरचना

उत्खनित पुराव्यावरून प्रागैतिहासिक काळातील राजकीय आणि सामाजिक परिस्थितीबद्दलचे आडाखे बांधणे हे केवळ अशक्यप्राय आहे. भारतात अद्यापि हे कोणीही केलेले नाही. परंतु पाश्चात्य देशांत मात्र आता पुरातत्त्वज्ञांनी हे कार्य सुरू केले आहे. वसाहतींचा विस्तार, त्यातील सार्वजनिक वास्तू आणि दफने यांच्या पुराव्यावरून आपल्याला तत्कालीन शासन आणि समाजव्यवस्थेसंबंधी वांशिक पुरातत्त्वाच्या आधारे निष्कर्ष काढता येतात.

ताम्रपाषाणयुगीन वसाहतींचे प्रादेशिक केंद्रे आणि छोटी खेडी असे दोन प्रकार पाडता येतात. प्रादेशिक केंद्रांचे त्या भागातील छोट्या वसाहतींवर नियंत्रण असावे असे दिसते. अशा द्विदल पद्धतीत नायकशाही (chiefdom) पद्धतीची शासनव्यवस्था असते असे मानववंशशास्त्रज्ञांना आढळून आले आहे.[१४] अंतर्गत व्यापारावर सुद्धा या नायकाचे नियंत्रण असते. नायकशाहीचे अस्तित्व तटबंदी, खंदक, मंदिर, धान्याचे कोठार इत्यादी सार्वजनिक वास्तूंवरून सिद्ध होते. या प्रकारचा निर्णायक पुरावा इनामगाव उत्खननात मिळाला आहे. तेथील तटबंदी, बुरूज, खंदक आणि कोठारांचा उल्लेख पूर्वी केला आहे. याशिवाय तेथे कालव्याद्वारे नदीचे पाणी शेतीला पुरविण्याचाही पुरावा आहे. मानवी इतिहासात कालव्याच्या पाण्याच्या वाटपावर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्रीय शासनाची आवश्यकता निर्माण झाल्याचे दिसून येते. शासनव्यवस्थेच्या निदर्शक मुद्रा त्याच वेळी अस्तित्वात आल्या. दायमाबाद येथे एक मृण्मय मुद्रा सापडली आहे. नायकशाहीचा पुरावा दफनामध्येही मिळतो. इनामगाव येथील एका मोठ्या घराचा उल्लेख पूर्वी केला आहे. तेथे अंगणात एक अत्यंत आगळे दफन सापडले. चार पायांच्या एका कच्च्या रांजणात एका ३५ वर्षे वयाच्या पुरुषाचे शव मांडी घालून ठेवलेले होते. त्याच ठिकाणी आधीच्या थरात तसले आणखी एक दफन होते. त्यावरून वस्तीतील सर्वसामान्यांना लागू असणारे नियम याना लागू नव्हते हे सिद्ध होते. म्हणजे तो त्यांच्यापेक्षा वेगळा होता. दफन करण्यापूर्वी माणसाच्या घोट्यापासून खालचा भाग तोडून टाकीत. परंतु या दफनात तसे केलेले नव्हते. तेव्हा तो वसाहतीचा नायक असावा असे समजणे चूक ठरणार नाही.

उत्तर जोर्वे काळातील नायकाचे घर इनामगावच्या वसाहतीत पूर्वेच्या भागात नदीजवळ होते. तेसुद्धा चार खोल्यांचे होते. त्यातील एका खोलीत एक दफन सापडले. त्यात खाली पुरुष आणि त्यावर स्त्रीचे शव होते. बाजूने अनेक भांडी ठेवलेली होती. विशेष म्हणजे त्या दोघांचे पाय तोडलेले नव्हते. या घराचा काही भाग आगीने जळून गेलेला होता. त्यात धान्याने भरलेले अनेक रांजण आणि मडकी होती. वसाहतीच्या उतरत्या काळात सर्वत्र हलाखीची स्थिती असताना फक्त येथेच समृद्धी होती हे कशाचे निदर्शक आहे ?

ताम्रपाषाणयुगीन नायकशाही (Chiefdom) वंशपरंपरागत होती याला सबळ पुरावा आहे. वर उल्लेखिलेल्या रांजणातील दफनाच्या जवळ परंतु त्या आधीच्या थरात आणखी एक याच प्रकारचे दफन होते. चार पायांच्या एका रांजणाला आणखी एक तसाच रांजण अर्धा कापून लावला होता. परंतु आत शव मात्र नव्हते. यावरून हा माणूस शेजारच्या वन्य टोळीशी झालेल्या चकमकीत मारला गेला असावा किंवा शिकारीत त्याला वन्य श्वापदाने मारले असावे आणि त्याचे शव हाती न लागल्यामुळे असे झाले असावे. परंतु माणूस एवढ्या योग्यतेचा की त्याचे विधिपूर्वक दफन आवश्यक होते. किंबहुना म्हणूनच असे प्रतीकात्मक दफन करावे लागले असावे.

ताम्रपाषाणयुगीन समाजात शासक, सधन शेतकरी, पूर्णवेळ कारागीर आणि भूमिहीन मजूर असे वर्ग निर्माण झाले होते. त्यांच्यातही खाजगी मालमत्ता प्रत्येकाची असावी असे वाटते. शिवाय ती वारसाहक्काने वंशपरंपरागत चालू रहात असावी. इनामगाव येथील एका मणिकाराचे घर वंशपरंपरागत त्याच्या वारसाकडे गेले. हा वारस मणिकारच होता. खाजगी मालमत्तेची निदर्शक म्हणजे वैयक्तिक मुद्रा. अशी एक भाजक्या मातीची मुद्रा दायमाबाद येथे सापडली. माळवा संस्कृतीचे लोक प्रामुख्याने स्थिर जीवन जगत होते. परंतु काहींचे जीवन विमुक्त होते. साधारणपणे चौकोनी घरात राहणारी मंडळी स्थिर जीवन जगतात असे मानववंशशास्त्रज्ञांनी जगाच्या निरनिराळ्या भागांत केलेल्या पाहणीवरून आढळून आले आहे. तसेच गोल झोपड्यांत राहणाऱ्या लोकांचे जीवन स्थिर नसते असा पुरावा उपलब्ध आहे. या कसोटीनुसार पूर्व जोर्वे काळात महाराष्ट्रात स्थिर जीवन बहुसंख्य शेतकऱ्यांचे होते. परंतु उत्तर जोर्वे काळात मात्र ते परवडण्यासारखे नव्हते. बहुधा पावसाळ्यात चार महिने एके ठिकाणी राहून, राहिलेल्या काळात शेळ्या-मेंढयांचे कळप घेऊन हल्लीच्या धनगरांसारखे जीवन जगणे लोकांच्या वाट्याला आले असावे.

तत्कालीन समाजात बहुपत्नीत्वाची चाल असावी असे वाटते. पूर्व जोर्वे काळातील एक मोठे घर सहा खोल्यांचे होते. या खोल्या एकमेकांजवळ पण स्वतंत्र बांधलेल्या होत्या. त्यांपैकी एका मोठ्या झोपडीत फक्त एक चूल आणि धान्याची तीन बळदे होती. बाकीच्या झोपड्या स्वतंत्र असल्या तरी त्यांत स्वयंपाकाची आणि धान्य साठवण्याची सोय नव्हती. यावरून या सर्व झोपड्यांचे मिळून एकच घर असावे यात शंका नाही. उत्तर जोर्वे काळातही गोल झोपड्यांच्या गटात हाच प्रकार दिसतो. स्वतंत्र झोपड्यांत जर स्वयंपाकाची सोय नसेल तर अशी प्रत्येक झोपडी त्या कुटुंब-प्रमुखाच्या प्रत्येक बायकोसाठी असते असे मानववंशशास्त्रज्ञांना आढळून आले आहे. विदर्भातले कोहाळी जमातीचे पुरुष नवीन बायको आणली की तिच्यासाठी नवी झोपडी बांधतात, असे इरावती कर्वे सांगतात. दायमाबाद येथे या निष्कर्षाला पुष्टी देणारा पुरावा उपलब्ध झाला आहे. तेथे सापडलेल्या एका मातीच्या चित्रात एका पुरुषा-समोर तीन स्त्रिया दाखवल्या आहे.[१५] पितरपूजेचा (Ancestor worship) हा

पुरावा असला तरी एक पुरुष आणि त्याच्या तीन स्त्रिया यांचे चित्रण या मूर्तीत केले आहे. ते बरोबर असल्यास बहुपत्नीत्वाची चाल ताम्रपाषाणयुगीन महाराष्ट्रात होती असे म्हणणे चूक होणार नाही.

तंत्रविज्ञान

ताम्रपाषाणयुगात मातीची भांडी बनविण्याचे तंत्र प्रगत होते यात शंका नाही. त्या काळची रंगीत भांडी चाकावर घडवली जात. कुंभाराचे चाक प्रत्यक्ष उत्खननात सापडलेले नसले तरी भांडयांच्या आतल्या बाजूस दिसणाऱ्या रेषांवरून तीं चाकावर घडविल्याचे सिद्ध होते. कुंभाराच्या चाकाचे आरे दायमाबाद आणि इनामगाव येथे सापडले आहेत. दायमाबाद येथील दोन्ही भट्टया जोर्वेकालीन आहेत. त्या चौकोनी आकाराच्या असून त्यांच्या मातीच्या भिंती भाजून पक्क्या झाल्या आहेत.[१६] त्यांच्या मध्यभागी एक आडवी भिंत असून, तिच्यामुळे भट्टीचे दोन भाग पडतात. बाहेरील भिंतीत जळणासाठी एक मोठे छिद्र आहे. या दोन्ही भट्टया हल्ली महाराष्ट्रातील खेडेगावात असणाऱ्या भट्टयांसारख्या आहेत.

इनामगाव येथेही दोन कुंभाराच्या भट्टया सापडल्या. या अत्यंत वेगळ्या धर्तीच्या आहेत. त्यापैकी एक माळवाकालीन (इ. पू. १५००) असून दुसरी पूर्व जोर्वेकालीन (इ. पू. १३००) आहे. दोन्ही सारख्याच असल्या तरी जोर्वे भट्टी आकाराने मोठी आहे. ती मातीची बनवलेली असून एखाद्या प्रचंड कढईसारखी (व्यास १·७५ मी.) दिसते. तिचा पाया दगडांनी बांधून काढलेला असून खालच्या बाजूस जळण ठेवण्याची सोय केलेली आहे. भट्टीत उष्ण हवा खेळवण्यासाठी तिच्या तळाशी केंद्रातून निघालेल्या पन्हळी आहेत. एका वेळी भट्टीत १०० लहानमोठी मडकी भाजली जाऊ शकतात. माळवाकालीन भट्टी आकाराने यापेक्षा लहान आहे. तांत्रिक-दृष्टया या भट्टयांचे सिंधु-संस्कृतीच्या भट्टयांशी साम्य आहे. त्या विटांच्या बांधलेल्या असतात.

उत्तर जोर्वेकालीन (इ. पू. ९००) एक भट्टी उघडयावर खड्ड्यात होती. मध्य प्रदेशात आजही अशा खड्ड्यांतील भट्टया असतात. त्यात कच्ची मडकी रचून गवताने झाकतात व पेटवून देतात. मडकी बांधण्याची ही पद्धत अतिप्राचीन आहे. या प्रकारच्या अतिप्राचीन भट्टया अलीकडे क्वेट्टयाजवळ मेहेरगढ येथील उत्खननात सापडल्या आहेत. त्या ७००० वर्षांपूर्वीच्या आहेत.

तांब्याचे तंत्रज्ञानही या काळात प्रगत असावे असे वाटते. बहुसंख्य वस्तू धातू तापवून, ठोकून तयार केलेल्या असल्या तरी काही साच्यात बनविलेल्या असणे अशक्य नाही. सोन्याचे अलंकार क्वचित आढळतात. दायमाबाद येथील सर्पकुंडल आणि इनामगाव येथील मणी ठोकून तयार केलेले आहेत. इनामगाव येथे दोन मुशी आणि तांब्याचे चिमटे सापडले आहेत. ते सोनाराचे आहेत. परंतु ते तांबटांनी वापरले असणे

अशक्य नाही. मणी प्रत्येक ठिकाणी निदान मोठया केंद्रात तयार केले जात असत. मण्याला गारेच्या सुरशीने छिद्रे पाडीत. तांब्याच्या सुरशीही वापरात होत्या.

इनामगाव येथे चुन्याच्या भट्टया सापडल्या आहेत. त्या दगडांनी बांधून काढलेल्या आहेत. चुना प्रामुख्याने कंकरचा आणि क्वचित शिंपाचा बनवीत. त्याचा मुख्य उपयोग घरे आणि वळदे सारवण्यासाठी होता. जनावरांची कातडी कमावण्यासाठी चुन्याची निवळी फार मोठ्या प्रमाणावर लागते. चुन्याचे असंख्य गोळे इनामगाव उत्खननात सापडले आहेत.

विनिमय (Exchange)

ताम्रपाषाणयुगीन महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे मध्यप्रदेश, गुजराथ आणि कर्नाटकातील समकालीनांशी व्यापारी संबंध होते. तसेच खुद्द महाराष्ट्रातही अंतर्गत व्यापार होता. हा व्यापार देवाणघेवाणीच्या स्वरूपात होता. या व्यापारी संबंधावर बहुधा विवक्षित केंद्रातील नायकाचे नियंत्रण असावे. सोने अर्थातच कर्नाटकातून येत असावे. हट्टी (जि. गुलबर्गा) येथील खाणीतून ४००० वर्षांपूर्वी सोने काढले जात असल्याचा पुरावा आहे. तेथून ते येत असावे. हस्तिदंतही कर्नाटकातूनच येत असावे. सबंध भारतात तांबे फक्त राजस्थानात होते. मध्य आणि पश्चिम भारताला ताम्रपाषाणयुगात तांब्याचा पुरवठा राजस्थानातून होत होता. परंतु ते सरळ महाराष्ट्रात न येता प्रथम मध्यप्रदेशातील केंद्रात आणि तेथून इकडे येत असावे. गुजराथेत अमरेली जिल्ह्यात तांब्याचे खनिज सापडते तेही आणले जात असावे. धातूबरोबर तयार वस्तूही आयात होत होत्या. केसातील सर्पिलशीर्ष आकडे आणि तीराग्रे या तांब्याच्या वस्तू म्हणजे सिंधु-संस्कृतीचे वैशिष्ट्य; त्या येथे बनविल्या जात नसाव्यात. बांगड्यांसाठी लागणारा शंख सौराष्ट्राच्या किनारपट्टीतला; ताम्रपाषाणयुगात तो सर्वत्र तेथून पुरविला जाई.

अंतर्गत देवाणघेवाणीत धान्य, सागरी मासे आणि मातीची भांडी यांचा समावेश होता. इनामगाव येथील कडवेवाल (hyacinth bean) १००० मि. मी. हून अधिक पाऊस असलेल्या प्रदेशात पिकतात. ते मावळातून आणले जात असावेत. सागरी मासे कल्याण आणि महाडच्या खाडीतील असणार. महाडजवळ रायगडच्या पायथ्याशी असलेल्या नैसर्गिक गुहेत मध्याश्मयुगीन दगडी हत्यारांबरोबर सापडलेली खापरे ताम्रपाषाणयुगीन संपर्क दर्शवितात. इनामगाव, दायमाबाद, प्रकाश या सारख्या मोठ्या केंद्रांकडून त्या प्रदेशातील छोट्या वसाहतींना मातीची भांडी पुरविली जात असे आता निश्चित म्हणता येईल. याशिवाय तत्कालीन वन्य जमातींकडून औषधी वनस्पती, मध इत्यादी वस्तू घेतल्या जात असाव्यात यात शंका नाही.

धार्मिक समजुती

ताम्रपाषाणयुगीन शेतकरी मातृदेवतांची, पुरुषदेवतांची आणि प्राण्यांची पूजा

करीत होते. पितरपूजाही अस्तित्वात असावी. मातृदेवता ही धनधान्याची आणि समृद्धीची निदर्शक. तिच्या मातीच्या मूर्ती अनक ठिकाणी सापडतात. त्यांपैकी काही भाजलेल्या आणि काही कच्च्या मातीच्याही आहेत. कच्च्या मातीच्या मूर्ती नैमित्तिक विधींसाठी तयार केलेल्या असाव्यात. या सर्व मूर्ती हाताने बनविल्या असून त्यांमध्ये कलाकुसरीचा मागमूसही दिसत नाही. कच्च्या मातीची एक मातृदेवता इनामगाव येथे एका घरातील कोपऱ्यात खड्डा खणून एका डबीत ठेवलेली आढळली. तिच्याबरोबर एक शिरोहीन स्त्रीमूर्ती व बैलाची आकृती होती. या सर्व मूर्तींचे नैमित्तिक पूजेनंतर विसर्जन केलेले असावे. काही स्त्रीमूर्तींच्या अंगावर छिद्रे पाडलेली दिसतात. त्यांचा देवीच्या रोगाशी म्हणजे हल्लीच्या शीतळामातेसारखा संबंध असावा. काही स्त्रीमूर्ती बळदात ठेवलेल्या असत. त्या अर्थातच धनधान्याच्या समृद्धीशी निगडित असाव्यात. आंध्र-कर्नाटकात आजही काही ठिकाणी शेतकरी सुगीनंतर धान्य बळदात साठवण्यापूर्वी त्यात मातृदेवता ठेवतात याचा या संदर्भात अवश्य उल्लेख केला पाहिजे.

शिरोहीन मूर्तींचा उल्लेख वर केलाच आहे. अशा काही कच्च्या आणि भाजलेल्या स्त्रीमूर्ती इनामगाव येथे आढळल्या. डॉ. ढेरे यांनी त्या महाभारतात उल्लेखिलेल्या विशिरा या बालग्रहांसारख्या असाव्यात असे प्रतिपादन केले आहे.[१७] त्यांचे म्हणणे संयुक्तिक आहे, परंतु या शिरोहीन मूर्तीसुद्धा समृद्धीच्या निदर्शक असाव्यात असे वांशिक पुरातत्त्वाच्या आधारे म्हणता येईल. डॉ. यशोधरा डालमिया यांनी ठाणे जिल्ह्यातील वारली जमातीचा सखोल अभ्यास केला आहे. त्यांच्यात अशा शिरोहीन दैवतांची विवाहप्रसंगी घरात भिंतीवर चित्रे काढतात. या देवतेला 'पालघट' असे नाव आहे. प्राचीन घटपल्लव चिन्हांची या संदर्भात आठवण होते. तेव्हा या देवताही समृद्धीच्या निदर्शक असाव्यात असा निष्कर्ष काढता येतो.

माळवा संस्कृतीचे लोक पुरुषदैवतांचीही पूजा करीत. दायमाबाद येथील एका भांड्यावर एक पुरुष चितारलेला असून, त्याच्याभोवती वाघ, हरणे, मोर इत्यादी प्राणी आहेत.[१८] त्याला पाहून वेदातील पशुपतीची आठवण होते. दायमाबाद येथे सापडलेला रथातील पुरुष हाही पशुजीवनाशी निगडित असावा. कारण त्याच्याबरोबर हत्ती, गेंडा आणि रानबैल यांच्याही ब्रॉंझच्या मूर्ती आहेत.[१९] सिंधु संस्कृतीच्या पशुपतीच्या मुद्रेवर हेच प्राणी आहेत. तेव्हा कदाचित या दैवताचा वारसा तेथूनच आपल्याकडे आला असावा. या दैवताच्या रथाला बैल जोडलेले असून रथावर कुत्रे आणि पक्षी आहेत. तसे पाहिल्यास वेदातील पशुपतीचे वर्णन त्याला लागू होत नाही. याउलट 'त्वष्टा' या देवतेचे वर्णन मात्र त्याच्याशी जमण्यासारखे आहे.

इनामगाव येथील जोर्वेकालीन पुरुषदैवताच्या कच्च्या आणि भाजलेल्या मूर्ती आहेत. त्यांपैकी दोन कच्च्या मूर्ती एका घराच्या अंगणात चुलीजवळ ठेवलेल्या आढळल्या. हल्लीसुद्धा गावजेवण घालताना, ते सुरळीत पार पडावे म्हणून अशा मूर्ती करून त्यांची पूजा करतात आणि समारंभ संपल्यानंतर त्यांचे विधिपूर्वक विसर्जन करतात.

दायमाबाद येथे सापडलेल्या एका मातीच्या चित्रात एका पुरुषासमोर तीन स्त्रिया दाखविल्या आहेत. हा पितरपूजेचा पुरावा समजणे चूक ठरणार नाही. अजूनही बहुसंख्य जमातींत पितरपूजा अस्तित्वात आहे हे सर्वश्रुत आहे.

ताम्रपाषाणयुगीन शेतकऱ्यांचा मरणोत्तर जीवनावर विश्वास होता. ते मृतांचे दफन करीत. घरात किंवा अंगणात खड्डा खणून मोठया माणसाचे शव उताणे ठेवीत. त्याला मरणोत्तर जीवनात उपयोगी पडावे म्हणून अन्नपाणी आणि क्वचित आभूषणे आणि हत्यारे ठेवीत. दफन करण्यापूर्वी त्याच्या पायांचा घोटयाखालचा भाग तोडून टाकीत. ते भूत होऊन पळून जाऊ नये म्हणून बहुधा असे करीत असावेत. आजही गोव्यात बाळंतीण मेल्यावर तिचे पाय तोडतात असे ऐकिवात आहे. त्यामागे हीच कल्पना आहे. घरात दफन करण्यामागे, मृताचा आत्मा सदैव आपल्यात वावरावा अशी कल्पना असेल. बहाळ (जि. जळगाव) येथे मात्र नदीच्या पलीकडच्या तीरावर स्वतंत्र दफनभूमी होती.

लहान मुलाचे दफन करण्याची पद्धत म्हणजे तोंडाला तोंड लावलेल्या दोन माठांत ते पुरले जाई. यापकी एक माठ मोठा आणि दुसरा लहान असे. ऋग्वेदामध्ये जननाचे निदर्शक म्हणून पृथ्वी आणि आकाश हे असेच दोन कुंभ कल्पिले आहेत त्याचे तर हे निदर्शक नसावेत ?

दफनामध्ये उत्तरेकडे डोके आणि दक्षिणेकडे पाय करून शव ठेवीत. तसेच बहुतेक दफनांतून एक तोटीचे भांडे पाण्यासाठी ठेवलेले असते. त्यावर वल्हे असलेल्या होडीचे चित्र रंगविलेले असते. मृत्यूनंतर आत्म्याला होडीतून नदी पार करावी लागते ही आपली समजूत त्या काळीही प्रचलित असावी. रांजणातील दफनांचा उल्लेख पूर्वी केलाच आहे.

स्वास्थ्य

उत्खनित सांगाड्यांच्या अभ्यासावरून तत्कालीन लोकांचे आयुर्मान, आरोग्य यांसंबंधीचे निष्कर्ष काढणे आता शक्य झाले आहे.[२०] सरासरी आयुर्मान २८ ते ३० वर्षांचे होते. युरोपमध्येही तेथील आद्य शेतकरी तिशीतच म्हातारा झालेला असे. पूर्व जोर्वेकाळातील माणसापेक्षा उत्तर जोर्वेकालीन लोक अधिक निरोगी असल्याचे शास्त्रीय पाहणीत आढळून आले आहे. पूर्व जोर्वेकाळातील लोक मध्यम उंचीचे आणि मध्यम बांध्याचे होते. त्या मानाने उत्तर जोर्वेकालीन लोक उंचेपुरे (५′ ९″) आणि मजबूत हाडापेराचे होते. तसेच त्यांचे दातही अधिक निरोगी होते. इ. पू. १००० नंतर वारंवार पडणाऱ्या दुष्काळांमुळे शेती खालावली आणि लोक शिकारीवर अधिक जग लागले. पाळीव प्राण्यांचे मांसही ते खात असत. त्यामुळेच ते धष्टपुष्ट झाले असावेत. शाकाहारी अन्नात खडे असतात. त्यामुळे दात लवकर खराब होतात. परंतु मांसाशन करणाऱ्यांना ही भीती नसते असे मानववंशशास्त्रज्ञांचे मत आहे.

त्या काळी देवी आणि हिंवताप या दोन रोगांचा प्रादुर्भाव झालेला होता. देवी या रोगाचा पुरावा हाडावर शिल्लक राहत नाही. परंतु हिंवतापाने लाल पेशींचे प्रमाण कमी होऊन कवटीचे हाड जाड होते. याचा पुरावा इनामगाव येथे प्राप्त झाला आहे.

उगम आणि अंत

ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीचा उगम महाराष्ट्रात कसा झाला हे निश्चित सांगता येत नाही. माळव्यातून आलेल्या लोकांनी येथे फार मोठ्या प्रमाणात वसाहत केली हे पूर्वी सांगितले आहे. त्या संस्कृतीतूनच जोर्वे संस्कृती निर्माण झाली असल्याची दाट शक्यता आहे. रंगीत भांडी, हत्यारे, घरे इत्यादींच्या पुराव्यावरून हे सिद्ध होते. उत्तर जोर्वे संस्कृती म्हणजे जोर्वे संस्कृतीचा अंतकाळ. आर्थिक स्थिती खालावल्यामुळे तिचा ऱ्हास झाला. तसेच हवामानातील बदलामुळे हे झाले असावे. पाऊस कमी झाला. त्यामुळे शेती खालावली आणि स्थिर जीवन अशक्य झाले. इ. पू. आठव्या शतकात शेतकऱ्यांना मेंढपाळांचे भटके जीवन जगणे नशिबी आले आणि थोड्याच काळात, म्हणजे इ. पू. ७०० च्या सुमारास, ते देशोधडीला लागले. दक्षिणेत कर्नाटकातून होणाऱ्या महापाषाणयुगीन संस्कृतीच्या घोडेस्वारांनीही त्यांना पिटाळून लावले असण्याची दाट शक्यता आहे.

■ ■


संदर्भ

1. " Problem of Late Pleistocene Aridity in India ", *Man in India*, Vol. VII (1983), pp. 107–111.
2. " Archaeological Studies in the Manjra Valley " *Bulletin of the Deccan College Research Institute*, Pune, Vol. 40 (1981).
3. Ester Boserup, '*The conditions of Agricultural Growth*' (London, 1965), p. 17.
4. S. A. Sali, " A New Ceramic of the Chalcolithic from Dhule District, Maharashtra ", *Journal of Asiatic Society*, Bombay, Vol. 38, pp. 207-210.
5. S. A. Sali, " The Harappans of Daimabad ", in G. L. Possehl, (ed.), *Harappan Civilization – A Contemporary Perspective*, (New Delhi, 1982), pp. 175–84.

6. " The Indus Valley Culture seen in the context of post-glacial climatic and ecological studies in NW India ", *Arch. and Physical Anthropology in Oceania*, Vol. 6 (1971), pp. 177–88.
7. *Western India – A Regional geography*, (Dharwar 1948), p. 48.
8. M. K. Dhavalikar, " Settlement Archaeology of Inamgaon ", *Puratattva*, No. 8 (1975–76), pp. 44–54.
9. *Indian Archaeology– 1958–59, A Review*, p. 18.
10. " The Beginning of Iron Age in India ", *Journal of the Economic and Social History of the Orient*, Vol. VI, 1963, pp. 309–18.
11. D. P. Agrawal, *The Archaeology of India*, (London, 1982), p. 218.
12. R. Wallace, *India in 1887*, (Edinburgh, 1888), p. 180.
13. A Sherrat, " Plough and Pastoralism aspects of the secondary products revolution ", In Ian Hodder (ed.), *Patterns of the Past–Studies in honour of David Clarke*, (Cambridge, 1981), pp. 275–77.
14. Peeble C. S. & Kus, Susan M., " Some Archaeological Correlates of Ranked Societies ", *American Antiquity*, Vol. 42 (1977), pp. 421–48.
15. S. A. Sali, " A Unique Terracotta Figurine from Daimabad ", *Puratattva*, No. 11 (1982), pp. 128–129.
16. S. A. Sali, " A Potter's kiln of Jorwe Culture from Daimabad ", *Madhu*, M. N. Deshpande Volume, (New Delhi, 1981), pp. 59–62.
17. रा. चिं. ढेरे, लोकसंस्कृतीची क्षितिजे (पुणे, १९७२), पृ. १६१–१८२
18. M. K. Dhavalikar, " Chalcolithic Religion ", In U. V. Singh (ed.), *Archaeological Congress and Seminar, 1972*, pp. 74–84.
19. M. K. Dhavalikar, " Daimabad Bronzes ", In G. L. Possehl (ed.), *Harappan Civilization – A contemporary Perspective*, (New Delhi, 1982), pp. 361–66.

20. Lukacs, John R. & Badam G. L., "Palaeo-demography of Post-Harappan Inamgaon – A Preliminary Report", *Journal of Indian Anthropological Society*, Vol. 16 (1981), pp. 59–74

■ ■ ■



१. महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगीन उत्खनित स्थळे



२. इनामगाव : प्रौढाचे दफन (इ. स. पू. ११००)



३. इनामगाव : लहान मुलाचे दफन, जोर्वे कालखंड (इ. स. पू. १४००-१०००)



४. इनामगाव : मातृदेवता (इ. स. पू. १३००)

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६२ : १-४, १९८३-८४

महाराष्ट्रातील प्रागैतिहासिक पर्यावरण

श. न. राजगुरू आणि हेमांगी अभ्यंकर
डेक्कन कॉलेज, पुणे

प्रस्तुत निबंधात महाराष्ट्रातील पर्यावरणाचा विचार मुख्यत्वेकरून मध्य प्लाइ-स्टोसिन ते होलोसिन (सुमारे २ लाख ते २००० वर्षांपूर्वी) काळापुरताच केलेला आहे. भूशास्त्रीय भाषेत ज्याला क्वाटर्नरी अगर चतुर्थक कालखंड असे म्हटले जाते, त्या कालखंडातील हवामान, भूस्वरूप, मृदा, प्राणी व वनस्पतिजीवन आणि पर्यावरणातील झालेल्या बदलांचा आदिमानवाच्या जीवनपद्धतीवर झालेला परिणाम, यांचा मागोवा ह्या ठिकाणी घेतला आहे.

भारतात गेल्या ५० वर्षांत झालेल्या प्रागैतिहासिक संशोधनाचा विचार केला तर असे दिसून येते की, पर्यावरणाचा अभ्यास मुख्यत्वेकरून हवामानातील झालेले बदल इतक्याच मर्यादित दृष्टिकोणातून केला गेला. प्रागैतिहासिक आणि पुरापर्यावरणातील संशोधनावर पाश्चात्त्य विचारसरणीचा विशेष भर आढळतो. साहजिकच २०व्या शतकाच्या आरंभी युरोप, आल्पस् आणि उत्तर अमेरिकेतील हिमयुगांचा भारता-सारख्या उष्ण कटिबंधातील आणि मोसमी वाऱ्यांच्या टप्प्यात येणाऱ्या प्रदेशावर काय परिणाम झाला असावा याचाच सखोल विचार पाश्चात्त्यांनी केला आणि संशोधनाची हीच दिशा आजतागायत तशीच टिकली. पर्यावरणातील झालेल्या बदलांचा मानवी जीवनावरील परिणाम किंवा पर्यावरण आणि मानव यांचा अन्योन्य संबंध यांचे संशोधन त्या मानाने भारतात फारच कमी झाले आहे. अपवाद म्हणजे ताम्रपाषाण-कालीन इनामगावचा. पुणे जिल्ह्यातील घोडनदीच्या काठी असलेल्या, सुमारे १६०० ते २७०० वर्षांपूर्वीच्या या शेतकीप्रधान संस्कृतीचा भूशास्त्र, पुराजीवशास्त्र आणि पुरातत्त्व यांच्या सहाय्याने सुमारे तपभर केलेल्या संशोधनामुळे पर्यावरण आणि मानवी जीवनासंबंधी बरीच माहिती उपलब्ध झाली आहे.

महाराष्ट्रात क्वाटर्नरी काळातील अवसाद बहुतेक नद्यांच्या काठी मिळतात व हे अवसाद मुख्यत्वेकरून जलोढ आहेत. त्यांची पश्चिम महाराष्ट्रातील जाडी ५० मीटरपेक्षा जास्त नसून, नद्यांच्या दोन्ही किनाऱ्यांवर त्यांचा विस्तार १ ते २ किलो-मीटरपर्यंत आढळतो. तापी आणि पूर्णा नद्यांच्या खोऱ्यांत मात्र जलोढांची जाडी ३०० ते ४०० मी. असून, त्यावरून त्या नद्या खचदरीतून वाहत असाव्यात असे

दिसते. कोकणातील नद्यांकाठचे जलोढ १० ते १५ मी. पेक्षा कोठेही जाड नसून, त्यांचा विस्तारही ½ ते १ कि. मी. पेक्षा जास्त आढळत नाही. पर्यावरण आणि आदिमानव–संस्कृती यांचा जास्त अभ्यास पश्चिम महाराष्ट्रातील कृष्णा, भीमा व गोदावरी नद्यांच्या खोऱ्यांत तसेच काही प्रमाणात तापी खोऱ्यात झाला असल्यामुळे, या भागात झालेल्या संशोधनाचाच आढावा प्रस्तुत निबंधात घेण्यात आलेला आहे.

नद्यांच्या पात्रांत झालेले बदल, त्यांच्या काठी असलेल्या जलोढांचे खनिज, रासायनिक आणि अवसादि गुणधर्म ह्यांवरूनच मुख्यत्वेकरून पुराहवामानाबद्दल संशोधन झाले. २० व्या शतकाच्या पहिल्या अर्धातील सर्वांत उल्लेखनीय संशोधन सांकलिया (१९५२), डी टेरा आणि पॅटरसन (१९३९) यांचे होय. या संशोधनातून असे निष्पन्न झाले की, युरोपात अगर हिमालयात ज्या वेळेस हिमयुग होते, त्या वेळेस दख्खनच्या पठारी भागात आणि महाराष्ट्रात आर्द्र हवामान होते आणि आंतरहिमयुगात शुष्क हवामान होते. हे निष्कर्ष नद्यांचा गाळ वाहून नेण्याच्या क्षमतेतील चढउतारांच्या अभ्यासावर आधारित होते. झॉयनर (१९५०) यांनी गोदावरीच्या उगमस्थानाजवळ जे संशोधन केले, त्यावरून त्यांनी असा निष्कर्ष काढला की, उत्तर हिमयुगात गोदावरीत आणि तिच्या उपनद्यांत गाळ भरण्याची अगर उच्चयन होण्याची क्रिया शुष्क हवामानामुळे झाली. त्यांचा हा सिद्धान्त पुराहवामानशास्त्राच्या संशोधनाच्या दृष्टीने क्रांतिकारक ठरला. त्यांनी पर्यावरणीय पुरातत्त्वाचा पाया तर घातलाच, पण संशोधनास एक नवीन दिशा प्राप्त करून दिली. पुढील पंचवीस वर्षांत कृष्णा (पप्पू–इ. १९७४), भीमा (राजगुरू–इ. १९७०, काजळे–इ. १९७६), प्रवरा (कॉर्विनस–इ.१९७३), गोदावरी (जोशी इ.–१९७८), तापी आणि तिच्या उपनद्या (साळी–इ. १९६४–६५) यांच्या खोऱ्यांत जे संशोधन झाले, त्यामुळे पर्यावरणासंबंधी जी नवीन माहिती उपलब्ध झाली तिचा सारांश येथे दिलेला आहे.

इ. १९६७ च्या कोयना भूकंपानंतर, दख्खनचे पठार विवर्तनीयदृष्ट्या पूर्णपणे स्थिर नाही हे सिद्ध झाले. या भूकंपानंतर भूशास्त्रीय, भूभौतिक निरीक्षणे तसेच उपग्रह व हवाई छायाचित्रांच्या सहाय्याने केलेल्या अभ्यासावरून, हा प्रदेश विवर्तनीयदृष्ट्या अस्थिर आहे यास दुजोरा मिळाला. तरी या प्रदेशात विस्तृतपणे आढळणाऱ्या " डेक्कन ट्रॅप " अगर बेसाल्ट या खडकात मात्र कोठेही भ्रंश आढळत नाही. त्यावरून असे म्हणता येईल की, या भूखंडजनक हालचाली हिमालयातील तीव्र प्रकारच्या विवर्तनीय हालचालींच्या तुलनेने सौम्य व संथ असाव्यात आणि पश्चिम महाराष्ट्रातील नद्यांच्या पात्रांत अगर गाळांच्या प्रकारांत झालेल्या बदलांस क्वाटर्नरी काळातील हवामानातील बदलच मुख्यत्वे कारणीभूत असावेत.

प्लाइस्टोसिन काळातील हवामान

आद्य प्लाइस्टोसिन काळात हवामान आजच्यापेक्षा ५० टक्के जास्त आर्द्र होते

असे निमशुष्क हवामानाच्या सांगली जिल्हयातील विटा, मिरज, जत इत्यादींच्या आसपासच्या प्रदेशांत समुद्रसपाटीपासून ८०० ते ९०० मी. उंचीवर सापडणाऱ्या जांभा खडकावरून म्हणता येईल. विटेसारखा दिसणारा जांभा खडक हा कोकण, घाटमाथा ह्या भरपूर पावसाच्या प्रदेशात आढळतो.

अंतिम मध्य प्लाइस्टोसिन काळात मात्र हवामान आजच्यासारखे निमशुष्क झाल्याचे दिसते. प्रवरा नदीकाठी नेवाश्याजवळ आणि गोदावरीच्या काठी पैठणजवळ त्या नद्यांच्या पात्रांच्या सुमारे २० ते २५ मी. उंचीवर गोटे आणि वाळूचा जवळजवळ १ ते १॥ मी. जाडीचा थर बेसाल्टवर मिळतो. हा थर निमशुष्क हवामानात नद्यांच्या उथळ आणि गुंफित प्रवाहामुळे तयार झाला. आद्य उत्तर प्लाइस्टोसिन काळातील निमआर्द्र हवामानात या रेतीच्या थरांचा अपक्षय होऊन कॅल्शियम कार्बोनेटचा (कंकरचा) पूर्णपणे निचरा झाला. बेसाल्टच्या बहुतेक गोट्यांवर वातावरणाची क्रिया होऊन ते ठिसूळ झाले. निमआर्द्र हवामान असतानाच महाराष्ट्र आणि दख्खनच्या पठारी भागात तीव्र स्वरूपाच्या भूखंडजनक हालचाली झाल्याचे दिसते. त्या हालचालींमुळे बहुतेक नद्यांनी आपली पात्रे कठीण अशा डेक्कन ट्रॅपमध्ये २० ते ३० मी. खोल खणली.

यानंतरच्या काळात, म्हणजे अंत्य उत्तर प्लाइस्टोसिनमध्ये (सुमारे २५,००० ते १०,००० वर्षापूर्वीच्या काळात) महाराष्ट्रातील बहुतेक प्रमुख नद्या आणि त्यांच्या उपनद्या यांच्या काठांवर गाळाचे संचयन होण्याची क्रिया सतत चालू होती. नद्या उथळ, रुंद परंतु कधी कुंडलाकार तर कधी सरळ पात्रांतून वाहत होत्या. याच काळात पूर, मैदाने आणि त्यातील सरोवरे यांची निर्मिती झाली. याच काळात अर्धशुष्क ते शुष्क हवामानामुळे जलोढांमधे कंकरचा बऱ्याच मोठ्या माणात संचय झाल्याचे दिसून येते. अर्धशुष्क ते शुष्क हवामान असूनसुद्धा नद्यांच्या काठच्या प्रदेशांत मध्य आणि उत्तर पुराश्मयुगीन मानवी वस्त्यांचे भरपूर पुरावे मिळतात. या काळी प्राणिजीवनदेखील विपुल होते. हत्ती, रानबैल, हरणे, सुसरी, पाणघोडे वगैरे प्राण्यांची अश्मीभूत हाडे जलोढांमध्ये मिळतात. घोडनदीकाठी इनामगावजवळ आणि मांजरा नदीकाठी वडुला आणि तदुला या गावांजवळ अशा प्रकारची अश्मीभूत हाडे विपुल प्रमाणात मिळाली आहेत. मांजरेसारख्या निमशुष्क प्रदेशातून उगम पावून तशाच प्रकारच्या प्रदेशातून वाहणाऱ्या नदीकाठी प्राणिजीवन इतके समृद्ध होते. त्यावरून असा निष्कर्ष काढता येतो की, अंत्य उत्तर प्लाइस्टोसिन महाराष्ट्रात नैर्ऋत्य मोसमी वारे कमकुवत असले तरी ते पूर्णपणे वाहण्याचे कधीच थांबले नाहीत. या काळात मोसमी पाऊस अनियमित पण कधी कधी जोरदार असावा, असे जलोढांमध्ये नाल्यांनी वाहून आणलेले गाळेचे आणि वाळूचे थर दर्शवितात. अंत्य उत्तर प्लाइस्टोसिन काळात भारतातील बऱ्याच भागात अर्धशुष्क ते शुष्क किंवा अतिशुष्क हवामान होते, हे गुजरात, राजस्थान, काश्मीर, मध्यप्रदेश, मेघालय आणि मणिपूर या भागांतील

संशोधनावरून सिद्ध होते. झॉयनरने सुमारे ३१ वर्षांपूर्वी मांडलेला " हिमयुग = शुष्क हवामान " हा सिद्धान्त सिद्ध झाला आहे.

होलोसिन काळातील हवामान

सुमारे १०,००० वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील नद्यांमध्ये येणाऱ्या गाळाचे प्रमाण कमी झाल्यामुळे नद्यांचे पुनर्युवायन होऊन त्या आपल्याच पात्रांचे खनन करू लागल्या. ही खनन करण्याची क्रिया सुमारे ७००० वर्षांपूर्वीपर्यंत चालू होती. याच काळात निमआर्द्र हवामानामुळे महाराष्ट्रातील प्रसिद्ध काळी माती तयार झाली. सुमारे ७००० ते ४००० वर्षांच्या या काळात नद्या आजच्या पातळीतच वाहत होत्या. इनामगाव येथे घोडनदीकाठी केलेल्या सखोल भूरूपिकी संशोधनात असे दिसून येते की, सुमारे ३००० ते २७०० वर्षांपूर्वीच्या काळात घोडनदी आपले पात्र पुन्हा गाळाने भरू लागली व तिचे पात्र आजच्या पातळीपेक्षा ४ ते ५ मी. ने उंचावले गेले. या काळातच इनामगाव येथील ताम्रपाषाणयुगीन वस्तीला पुराचा धोका वारंवार निर्माण झाल्यामुळे तेथील लोकांनी नदीच्या पात्रातून येणारे पुराचे पाणी कालव्याद्वारे वळवून घेऊन एक बंधारा बांधला व पूररक्षणासाठी तट उभारले. या अडवलेल्या पाण्याचा उपयोग करून त्यांनी गहू, हरभरा अशी हिवाळी पिके काढल्याचा पुरावा मिळतो. घोडनदीच्या पात्रात या काळी आणि त्यानंतर जे बदल झाले ते हवामानातील बदलांमुळे का मानवाने नैसर्गिक समतोल बिघडवल्यामुळे हे आज सांगणे कठीण आहे. भूपुरातत्त्व आणि जीवपुरातत्त्व यांच्या सहाय्याने घोड आणि तिच्या उपनद्यांचा सखोल अभ्यास होणे आवश्यक आहे.

भारतीय उपखंडात झालेले पुरापर्यावरणातील महत्त्वाचे बदल हे मुख्यत्वे नैऋत्य मोसमी वाऱ्यांच्या कार्यक्षमतेतील बदलांमुळे झाले असावेत; कारण भारतातील ७५ ते ८० टक्के पाऊस हा नैर्ऋत्य मोसमी वाऱ्यांमुळे मिळतो. भारतीय मन्सून वारे जेवढे प्रकर्षाने निर्माण होतात तेवढे अन्य भूखंडांतील वारे प्रकर्षपूर्ण नसतात. उत्तर गोलार्धातील नैर्ऋत्य मोसमी वारे म्हणजेच विषुववृत्त ओलांडून आलेले दक्षिण गोलार्धातील आग्नेय व्यापारी वारे होत. विषुववृत्त ओलांडल्यावर ते वारे उजवीकडे वळतात आणि नैर्ऋत्य मोसमी वाऱ्यांच्या स्वरूपात ते भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर आक्रमण करतात. भारतीय द्वीपकल्पाच्या दक्षिणतम टोकाजवळ मन्सूनप्रवाह हा दोन शाखांत विभागला जातो :

१. अरबी समुद्रावरील शाखा.

२. बंगालच्या उपसागरावरील शाखा.

या दोनही शाखांचा प्रवास वेगवेगळ्या मार्गांनी सिंधू आणि गंगा नद्यांच्या खोऱ्यांत तयार झालेल्या विस्तृत आणि लांबट " प्रेरण द्रोणी " किंवा मन्सून द्रोणीच्या (trough or extended low pressure area) दिशेने होतो. आणि ही मन्सून ोणी ज्या वेळी स्वतःच्या अक्षाच्या उत्तरेस म्हणजेच हिमालयाच्या पायथ्याकडे सरकते

त्या वेळी हे दोन्ही मन्सून प्रवाह उत्तर भारतात एकत्र मिळतात. या मन्सून द्रोणीच्या अक्षाच्या दक्षिणोत्तर स्थानांतरावर उष्ण कटिबंधीय आघाडी (Inter tropical convergence zone, ITCZ) अवलंबून असते. साधारणतः असे आढळून आले आहे की ह्या अक्षाचे जेव्हा थोडे दक्षिणेकडे स्थानांतर होते तेव्हा मन्सूनचा जोर वाढतो आणि देशाच्या बऱ्याच भागावर विस्तृत प्रमाणात वृष्टी होते. परंतु या अक्षाचे जर उत्तरेकडे स्थानांतर झाले तर ही उष्ण कटिबंधीय आघाडी उत्तरेकडे सरकते आणि हिमालयाच्या पायथ्याशी चांगली वृष्टी होते. त्याच वेळी उष्ण कटिबंधीय आघाडी उत्तरेकडे सरकल्यामुळे अरबी समुद्रावरील तसेच बंगालच्या उपसागरावरील मन्सून-शाखा क्षीण होते आणि देशावरील पर्जन्याचे प्रमाण बऱ्याच अंशी कमी होते. यालाच प्रचलित भाषेत "खंडित मन्सून" असे म्हणतात. मन्सूनमधील हे खंड नवीन उष्ण कटिबंधीय आघाडी अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरावर तयार होईपर्यंत टिकून राहतात. त्यामुळेच कधी कधी हे खंड दीर्घकाल टिकतात.

या मोसमी वाऱ्यांचा सुकर आणि यशस्वी असा भारतीय उपखंडातील प्रवास हा खालील गोष्टींवर अवलंबून असतो असे बऱ्याच संशोधनांती लक्षात आले आहे :

१. दक्षिण अमेरिकेतील उच्च प्रेरण (high pressure) तसेच हिंदी महासागरातील कमी प्रेरण (low pressure) जोरदार मन्सून निर्मितीस सहाय्यक ठरते.

२. हिमालयाच्या पायथ्याशी वाहणारा वायुस्रोत तसेच भारतीय द्वीपकल्पावरील प्राच्य वायुस्रोताच्या (jet-stream) स्थित्यंतरावर मन्सूनचे आगमन अवलंबून असते.

३. तिबेटच्या पठारावर तयार होणारा उच्च तपमानाचा प्रदेश मन्सून आघाडीस उपयोगी ठरतो.

वरील विवेचनावरून असे म्हणता येईल की पृथ्वीवरील वातचक्रातील फेरफारांचा परिणाम मन्सूनच्या भारतातील वाटचालीवर निश्चितपणे होतो. ह्याचाच अर्थ, क्वाटर्नरीमधील हवामानातील बदलांचा परिणाम म्हणून मन्सून कधी कमकुवत तर कधी बलवान होऊन भारतात आर्द्र अगर शुष्क हवामान निर्माण झाले. सुमारे १८००० वर्षांपूर्वी पृथ्वीवरचे हवामान अतिथंड आणि शुष्क होते. युरोप, अमेरिका आणि हिमालयातील बराचसा भाग बर्फाच्छादित होता, तर आफ्रिका, आशिया, दक्षिण अमेरिका आणि ऑस्ट्रेलियाच्या बऱ्याच भागात पावसाचे प्रमाण खूपच कमी होऊन हवामान शुष्क ते अतिशुष्क झाले. या भागातील सरोवरे आटली, नद्या कोरड्या पडल्या आणि वाळवंटी भाग विस्तारले. काश्मीरच्या खोऱ्यात "लोएस" अगर वाऱ्याने वाहून आणलेली धुळीसारखी माती सर्वत्र पसरली, तर पश्चिम राज्यस्थानातील सरोवरे खारी झाली आणि वाळूच्या टेकड्यांनी व्यापलेला प्रदेश विस्तारला. या प्रदेशातील पुरापर्यावरणासंबंधीची महत्त्वाची माहिती राजस्थानातील लुंकरसन आणि डीडवाना या सरोवरांतील गाळाचा अभ्यास करून मिळाली.

ब्रह्मपुत्रा आणि गंगा यांची पाण्याची पातळी कमी झाल्यामुळे, गाळ वाहून नेण्याची त्यांची क्षमता कमी झाली, तर कोकणातील नद्या फारच थोडा गाळ अरबी समुद्रात वाहून आणत होत्या. नुकतेच डुप्लेसी आणि त्यांच्या सहाध्यायांनी (१९८२) अरबी समुद्रातील आणि बंगालच्या उपसागरातील तळांवर साठलेल्या गाळांचे पुराजीवशास्त्राच्या सहाय्याने केलेले संशोधन असे दाखविते की, नैर्ऋत्य मोसमी वारे १८,००० ते १०,००० वर्षांपूर्वीच्या काळात क्षीण अगर कमकुवत होते आणि १०,००० ते ४००० वर्षांपूर्वीच्या काळात ते प्रबळ होऊन निमआर्द्र हवामान भारतातील बऱ्याच भागात निर्माण झाले. त्यानंतर ३५०० ते २००० वर्षांपूर्वीच्या काळात हवामान परत निमशुष्क ते शुष्क झाल्याचे दिसते.

समारोप

सुरुवातीलाच सांगितल्याप्रमाणे पर्यावरणाच्या एकाच अंगाचा, म्हणजे हवामानासंबंधीचाच बराचसा अभ्यास गेल्या २५ वर्षांत झाल्याचे दिसते. २५ वर्षांपूर्वीच्या आणि आज चाललेल्या संशोधनातील महत्त्वाचा फरक म्हणजे आज एखादा सिद्धांत अनेक शास्त्रांच्या आधारे तपासून घेतला जात आहे. एखाद्या मर्यादित भूभागाचे सखोल संशोधन करून जे निष्कर्ष काढले जातात त्यांची छाननी सबंध भारतीय उपखंडाच्याच नव्हे तर जागतिक हवामानातील बदलांच्या ज्ञानाच्या संदर्भात केली जात आहे. पुराहवामानशास्त्राच्या निष्कर्षांचा उपयोग नैर्ऋत्य मोसमी वाऱ्यांच्या भावी वाटचालीबद्दल अंदाज बांधण्यास होईल असा हवामानशास्त्रज्ञांचा विश्वास आहे. असे झालेच तर पुरापर्यावरणाच्या संशोधनाचा भारतीय शेतीची अनिश्चितता, दुष्काळ वगैरे सतत भेडसावणाऱ्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी थोडाफार उपयोग होईल.

पुढील दशकात आम्ही पुरापर्यावरण आणि मानवी जीवन यांचा जास्त सखोलपणे अभ्यास करण्याचे ठरविले आहे. त्याकरिता महाराष्ट्राची पश्चिम किनारपट्टी आणि तिच्या लगतचा सागरतळाचा भाग आणि त्याचबरोबर पठारी भागातून, निमशुष्क भागातून वाहणाऱ्या छोट्या नद्यांची खोरी यांचा भूरूपिकी आणि पुरातत्त्वीय दृष्टिकोणातून अभ्यास करण्याचे योजिले आहे. महाराष्ट्रातील इतिहासपूर्व आणि इतिहासकालातील सरोवरांच्या तळांवर साचलेल्या गाळाचे परागविश्लेषण करून महाराष्ट्रातील वनस्पतींमध्ये झालेल्या फरकाचा अभ्यासही हाती घेण्यात येणार आहे. त्याचबरोबर पुरामृदांचे शास्त्रीय संशोधन, महाराष्ट्रातील शेती आणि त्यावर मानवाने केलेले प्रयोग आणि परिणाम हे समजण्यास उपयुक्त ठरेल. थोडक्यात म्हणजे, पर्यावरण आणि मानव यांचा अन्योन्य संबंध शोधून काढून, प्रागैतिहासिक संशोधन हे केवळ तात्त्विक संशोधनाच्या पातळीवर न ठेवता मानवाचे आजचे प्रश्न काही प्रमाणात सोडविण्यास उपयोगात आणण्याचा प्रयत्न केला जाईल.

भूशास्त्रीय पुरावा	अंदाजें काळ	पुरापर्यावरण (आजच्या तुलनेत)
महाराष्ट्रात विस्तृत प्रमाणात आढळणारा जांभा खडक	आद्य प्लाइस्टोसिन	सुमारे ५० टक्के आर्द्र हवामान
२० ते २५ मी. उंचीवर मिळणारे गोटे आणि वाळूचा थर	अंतिम मध्य प्लाइस्टोसिन	निमशुष्क हवामान
कॅल्शियम कार्बोनेटचा निचरा आणि नद्यांनी स्वतःच्याच पात्रांत केलेले खनन	आद्य उत्तर प्लाइस्टोसिन	निमआर्द्र हवामान
नद्यांच्या काठांवर झालेले गाळाचे संचयन, तसेच कॅल्शियम कार्बोनेटचा संचय	अंत्य उत्तर प्लाइस्टोसिन (सुमारे २५,००० ते १०,००० वर्षांपूर्वी)	अर्धशुष्क ते शुष्क हवामान
नद्यांचे खनन आणि काळी माती	होलोसिन (सुमारे १०,००० ते ७००० वर्षांपूर्वी)	निमआर्द्र हवामान
नद्यांच्या काठांवरील गाळाचे संचयन	सुमारे ३५०० ते १५०० वर्षांपूर्वी	निमशुष्क हवामान

■ ■

संदर्भ–सूची :

1. Corvinus, G. and Rajaguru, S. N. 1973. " Some observations on the Quaternary of Western Maharashtra, India. " *Quartar*, 23–24 : 53–69.
2. De Terra, H. and Paterson, T. T. 1939. " Studies on the Ice Age in India and associated Human Cultures. " Carnegie Institution of Washington Publication no. 499
3. Duplessey, J. C. 1982. " Glacial and Interglacial contrasts in the Northern Indian Ocean ", *Nature* 295 : 494–498.
4. Joshi, R. V., Rajaguru, S. N. and Badam, G. L. 1978. " Environment and Culture of Early Man in Northwest India ", *Journal of Geological Society of India*, 19 (2) : 83–86.
5. Kajale, M. D., Badam, G. L. and Rajaguru, S. N. 1976. " Late Quaternary history of the Ghod valley, Maharashtra, " *Geophytology*, 6 (1) : 122–32.
6. Pappu, R. S. 1974. "*Pleistocene studies in the Upper Krishna basin*, " Deccan College, Pune.
7. Rajaguru, S. N. 1970. " Studies in the Late pleistocene of Mula–Mutha valley, " Unpublished Ph. D. thesis, Poona University.
8. Sali, S. A. 1964–65. " Quaternary stratigraphy in the kna basin at Bhadne and Yesar–Results of recent preliminary exploration, " *Journal of Asiatic Society*, 39–40 : 157–67.
9. Sankalia, H. D. 1952. "*The Godavari Palaeolithic Industry*," Deccan College, Pune.
10. Zeuner, F. E. 1950. " *Stone age and pleistocene chronology in Western India*, " Deccan College, Pune.

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६२ : १–४, १९८३–८४

अश्मयुगीन महाराष्ट्र–नवे संशोधन

र. सु. पप्पू
डेक्कन कॉलेज, पुणे

प्रास्ताविक

गेल्या २५ वर्षांत भारतातील निरनिराळ्या विभागांमध्ये झालेल्या पुरातत्त्वीय अन्वेषणामुळे, अश्मयुगीन संस्कृतीच्या निरनिराळ्या अवस्थांचा युरोप व आफ्रिकेमध्ये स्तरोत्क्रमदृष्ट्या सुसूत्र पुरावा ज्याप्रमाणे आढळतो, त्याप्रमाणे तो आता इतर बऱ्याच ठिकाणी मिळालेला आहे. युरोपमध्ये अश्मयुगाची प्राचीनाश्मयुग (Palaeolithic), मध्याश्मयुग (Mesolithic) व नवाश्मयुग (Neolithic) अशी सामान्यतः तीन वर्गांत विभागणी केली जाते. यातील प्राचीनाश्मयुगाचे, आद्य (Lower), मध्य (Middle) व उत्तर (Upper) असे आणखी तीन उपविभाग कल्पिले आहेत.

नुकत्याच झालेल्या संशोधनातून जगातील सर्वांत जुने मानवी अवशेष आफ्रिका खंडातील टांझानिया, केनया, इथोपिया इत्यादि भागांत मिळाले असून, मानवाच्या प्राचीनतेचा व उत्पत्तीचा काल आता ४० ते ४२ लाख वर्षे (वर्तमानपूर्व–व. पू.) इतका मागे गेला आहे. भारतात मात्र आदिमानवाच्या अस्तित्वाच्या खुणा साधारणपणे १.५० ते २ लाख वर्षांपेक्षा (व. पू.) मागे जात नाहीत. प्राचीनाश्मयुगात व मध्याश्मयुगात मानव हा भटक्या होता. वन्य प्राण्यांची शिकार व कंदमुळे गोळा करून त्यावर तो आपली उपजीविका करीत असे. नवाश्मयुगात मात्र मानवी जीवनात अनेक क्रान्तिकारक बदल झाले. या काळापासून अन्नोत्पादनास व स्थिर जीवनास प्रारंभ झाला.

अश्मयुगीन संस्कृतीसंबंधी जेव्हा प्रथम संशोधनास सुरुवात झाली तेव्हा संशोधनाचा मुख्य हेतू कोठल्याही नवीन प्रदेशात अन्वेषण करून आदिमानवांनी बनविलेली दगडाची हत्यारे शोधून त्या भागात आदिमानवाचे अस्तित्व सिद्ध करणे एवढाच मर्यादित होता. गेल्या २५ ते ३० वर्षांत या क्षेत्रात बरीच प्रगती झाली आहे. आदिमानवाचा शोध घेताना त्याने वापरलेली हत्यारे मिळविणे हाच एक केवळ हेतू न ठेवता, तो कोणत्या प्रकारे राहत होता, काय खात होता, तत्कालीन हवामान, प्राणी व वनस्पती जीवन कशा प्रकारचे होते हे कळून घेण्याचा प्रयत्न या संशोधनाद्वारे केला

जाऊ लागला. आदिमानवाच्या जीवनपद्धतीचा विविध अंगांनी वरीलप्रमाणे सविस्तर अभ्यास करावयाचा झाल्यास अशा अभ्यासात इतर शास्त्रांची मदत घेणे आवश्यक ठरते. वरील प्रकारे सर्वांगीण अभ्यास शास्त्रीय दृष्टिकोणातून करण्याची सोय भारतात केवळ पुण्यातल्या डेक्कन कॉलेजातील पुरातत्त्व विभागात असून या संस्थेतील शास्त्रज्ञांनी भारतातील निरनिराळया भागांत संशोधन करून या क्षेत्रात मोलाची भर घातली आहे. या लेखात, आदिमानवाच्या जीवनपद्धती कळून घेण्यासाठी आधुनिक दृष्टिकोणातून जे नवीन संशोधन गेल्या २५ वर्षांत झाले, त्याचा थोडक्यात परामर्श घेण्यात आला आहे.

भौगोलिक व्याप्ती

भौगोलिक वैशिष्टयांच्या दृष्टीने पाहता स्थूल मानाने कोकणची किनारपट्टी आणि देश या नावाने ओळखला जाणारा पठारी प्रदेश हे महाराष्ट्राचे दोन प्रमुख विभाग आढळून येतात. पठारी प्रदेशातही खानदेश, मराठवाडा, पश्चिम व दक्षिण महाराष्ट्र आणि विदर्भ असे निरनिराळे उपविभाग पाडण्यात आले आहेत. गेल्या २५ वर्षांत महाराष्ट्रात झालेल्या पुरातत्त्वीय अन्वेषणात त्याच्या निरनिराळया भागांत अश्मयुगीन अवशेष प्रामुख्याने दगडी हत्यारांच्या स्वरूपात मिळालेले आहेत. हीं हत्यारे मिळालेल्या प्रमुख स्थळांची यादी लेखाच्या शेवटी परिशिष्टात दिलेली आहे.

वायने या भूशास्त्रज्ञाला महाराष्ट्रात गोदावरीकाठी पैठणनजीक मुंगी येथे इ.१८६५ मध्ये अगेट या दगडापासून काढलेला एक छिलका (Flake) मिळाला (ओल्डहॅम, १८६८). इ. १९५४ सालापर्यंत प्राचीनाश्मयुगाच्या विविध अवस्थांचा भरभक्कम पुरावा भारतात मिळालेला नव्हता. अश्मयुगासंबंधी जी थोडीफार माहिती उपलब्ध होती ती फक्त आद्यपुराश्मयुग, मध्याश्मयुग व नवाश्मयुग यांपुरती मर्यादित होती. इ. १९५४ मध्ये डॉ. ह. धी. सांकलिया यांना मध्य पुराश्मयुगीन हत्यारे महाराष्ट्रात स्तरीय संदर्भात प्रवरा नदीकाठच्या नेवासा (जि. अहमदनगर) या ठिकाणी मिळाली (सांकलिया, १९५६). यानंतरची उल्लेखनीय घटना म्हणजे इ. १९६३ मध्ये डॉ. म. ली. कृष्णमूर्ती यांना आंध्रप्रदेशात चित्तूर जिल्हयात रेणीगुंठा येथे उत्तरपुराश्मयुगासंबंधीचा पुरावा मिळाला (मूर्ती, १९६६). मध्य व उत्तर या दोन्ही पुराश्मयुगांचा पुरावा आता गेल्या २०–२५ वर्षांत महाराष्ट्रात अनेक ठिकाणी आढळून आलेला आहे. या सर्व संशोधनाधारे महाराष्ट्रात अश्मयुगीन संस्कृतीचा सुसंगत क्रमबद्ध इतिहास मांडणे आता बऱ्याच प्रमाणात शक्य झाले आहे.

आदिमानवाची वसतिस्थाने

अश्मयुगीन दगडी हत्यारे, नद्यांच्या खोऱ्यात आढळून येणाऱ्या दगडगोटे व वाळूच्या थरात (निक्षेप – Alluvium) अथवा या थरांच्या झालेल्या धुपीमुळे थरांतून बाहेर पडून सध्याच्या नद्यांच्या पात्रांत आढळून येतात. हा पुरावा मानवी अस्तित्व

निश्चितपणे सिद्ध करीत असला तरी त्याचे स्वरूप फारच मर्यादित आहे. कारण अशा ठिकाणी मिळालेली हत्यारे कित्येक मैल लांब अंतरावरून नद्यांच्या पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाहून आलेली असतात. वरील कारणामुळे ही स्थाने आदिमानवाची मूळ वसतिस्थाने ठरण्याचा संभव कमी असतो. गेल्या १५–२० वर्षांत आदिमानव प्रत्यक्ष वास्तव्य करीत असलेली मूळ वसतिस्थाने (Primary camp or occupation sites) भारतात अनेक ठिकाणी उजेडात आली आहेत. अशा ठिकाणी अवशेष बऱ्याच प्रमाणात मूळ स्थितीत आढळून येतात. अशा स्थळी उत्खनन करून मिळालेल्या पुराव्याधारे मानवी जीविताच्या विविध पद्धतींविषयी (उदा. भौगोलिक परिस्थिती, हवामान, आहार, निवास, शिकार इ.) माहिती करून घेता येते. महाराष्ट्रात आदिमानवाची मूळ वसतिस्थाने बऱ्याच ठिकाणी (उदा. चिरकी–नेवासा, भाडणे, पाटणे, गंगापूर, हातखंबा, वडोळी–वाघेली) अलीकडेच उजेडात आली आहेत.

चिरकी–नेवासा हे यातील प्रमुख ठिकाण प्रवरेकाठी अहमदनगर शहरापासून पूर्वेला ६० कि. मी. अंतरावर आहे. या वसतिस्थानाचा शोध डॉ. गुडसन कॉर्विनस यांनी इ. १९६३ मध्ये लावला. डेक्कन कॉलेज पुरातत्त्व विभागातर्फे प्रा. ह. धी. सांकलिया यांच्या मार्गदर्शनाखाली या ठिकाणी इ. १९६४ ते १९६९ या काळात उत्खनन करण्यात आले व त्यात डॉ. गुडसन कॉर्विनस, डॉ. र. सु. पप्पू, डॉ. झै. दा. अन्सारी, डॉ. म. ली. कृष्णमूर्ती व डॉ. श्री. ग. सुपेकर यांनी भाग घेतला (कॉर्विनस, १९६८; राजगुरू व पप्पू, १९७१, १९७३; अन्सारी व पप्पू, १९७५). चिरकी–नेवासा येथील आद्य पुराश्मयुगीन संस्कृती ही ॲश्युलियन परंपरेतील आहे. हे स्थान चिरकी व प्रवरा संगमानजीक प्रवरेच्या उजव्या तीरावर आढळून आले. नदीच्या पात्रापासून ३ ते २० मीटर उंचीवर दगडगोटे व वाळू यांनी घट्ट बनलेल्या थरांत या संस्कृतीची हत्यारे येथे मुबलक प्रमाणात आढळून येतात. या थरात बेसाल्ट या दगडाच्या मोठ्या आकाराच्या शिळा व कडा धारदार असलेले विविध आकाराचे दगडगोटे पण मिळाले. येथे आढळून येणाऱ्या धारदार कडांच्या हत्यारांवरून त्या थरातील घटकांवर वाहत्या पाण्याचा परिणाम झालेला नाही, असा निष्कर्ष काढता येतो. याचाच अर्थ असा की, या थरातील घटक हे नदीच्या प्रवाहाबरोबर वाहून आलेले नसून स्वस्थानीच स्थानिक खडकावर ऊन, पाऊस, थंडी वगैरेंचा परिणाम होऊन तयार झालेले आहेत, अथवा जवळपासच्या थोड्याशा उंचीच्या ठिकाणापासून उतारावर घरंगळत आलेले असावेत. कालांतराने हे घटक कॅल्शियम कार्बोनेटसारख्या लुकणाने एकत्र सांधले गेले व त्यांचे रूपांतर सिमेंट क्रॉक्रीटसारख्या घट्ट थरात झाले. थरांची व्याप्ती कळून घेण्यासाठी अनेक ठिकाणी खड्डे घेण्यात आले, तेव्हा असे आढळून आले की, या अश्मयुगीन वसाहतीचे क्षेत्रफळ सुमारे ५०० ते ६०० चौ. मी. एवढे असावे. काही खड्ड्यांत दगडी हत्यारांबरोबर हत्ती, घोडा, बैल व हरिण यांचे जीवाश्म मिळाले. उत्खननित खड्ड्यांत दगडी हत्यारे सर्वत्र विखुरलेली असली तरी एकदोन खड्ड्यांत ती

फारच मोठ्या प्रमाणात मिळाली. एका ५ × ५ मीटरच्या खड्डयात जवळजवळ ४०० ते ५०० हत्यारे एकत्रितच मिळाली. या खड्डयात बसाल्ट या दगडाच्या मोठ्या आकाराच्या (१×१५×२ मीटर) तीन शिला आढळून आल्या व या शिलांभोवती हत्यारे मोठ्या प्रमाणात केंद्रित झालेली आढळून आली. या शिलांचा उपयोग कदाचित हत्यारे बनविताना बैठकीसारखा केला असावा. दुसऱ्या एका खड्डयात बसाल्टच्या मोठ्या शिला अर्धवर्तुळाकार स्वरूपात मुद्दाम रचून ठेवाव्यात अशा स्थितीत आढळल्या. या शिळा वसतिस्थानाला तट अथवा कुंपण घालण्यासाठी योजनापूर्वक रचल्या असण्याची शक्यता वाटते. आदिमानवाने हेतुपूर्वक निर्मिलेल्या प्राथमिक वास्तूची ही पहिलीच नोंद आहे असे म्हणावयास हरकत नाही.

आदिमानवाने चिरकी याच विशिष्ट जागेची वसतिस्थानासाठी निवड करण्यामागे अनेक कारणे असू शकतील. हे ठिकाण नदीकाठी तर आहेच, पण या विशिष्ट जागी अनेक डोह असल्याने बारमाही पाणीपुरवठा उपलब्ध आहे. चिरकी ओढयाच्या पात्रात अनेक जिवंत झरे सध्या अस्तित्वात असून ते पूर्वकाळातही असावेत. बसाल्टच्या मोठ्या शिलांचा उपयोग अनेक रीतींनी करून घेतला असावा. पाणी पिण्याकरता पाणवठ्यावर श्वापदे आली असता लपून बसून शिकार साधण्यास या शिला योग्य आकाराच्या वाटतात. दगडी हत्यारे बनविण्यासाठी वापरलेला टणक प्रतीचा बसाल्ट व डोलेराईट जवळपास विविध स्वरूपांत मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. या ठिकाणी किती लोकांचा गट किती काळ राहिला असावा हे कळून घेण्याला काहीच मार्ग नाही. तथापि समान जीवन जगणाऱ्या भारतातील व जगातील इतर भागातील आदिवासींच्या जीवनपद्धतीशी तुलना करता अंदाजे १० ते १२ लोकांचा गट येथे एका वेळी कमीत कमी एक ते दोन महिने याप्रमाणे अनेक वेळा राहिला असावा. हत्यारांमधील प्रमुख प्रकार फरशी, हातकुऱ्हाड, तासण्या, चाकू हे आहेत. या हत्यार-समूहांचा उपयोग दैनंदिन जीवनात शिकारीसाठी अथवा मारलेल्या प्राण्यांचे मांस खरडून काढण्यासाठी, तसेच हाडे व लाकडे यांच्यापासून निर्मिलेल्या हत्यारांना योग्य तो आकार देण्यासाठी केला जात असावा. चिरकी-नेवासा येथील ॲश्युलियन संस्कृतीचा काळ निश्चित करण्यास पुरेशी साधने उपलब्ध नाहीत. दगडी हत्यारांत वापरलेल्या तंत्राधारे तसेच येथे मिळणाऱ्या हत्यार-समूहांची इतरत्र (आफ्रिका व युरोप) मिळणाऱ्या समूहांशी तुलना करता साधारणपणे १ ते १.५० लाख वर्षे (व. पू.) हा या संस्कृतीचा काल म्हणून सुचविता येईल.

हत्यारे बनविण्याची केंद्रे

आद्य पुराश्मयुगात साधारणपणे मानव नदीकाठी वास्तव्य करीत असे व नदीच्या पात्रात मिळणारे योग्य आकाराचे गोटे निवडून त्याचे छिलके काढून पाहिजे त्या प्रकारची हत्यारे बनवीत असे. मध्यपुराश्मयुगीन व नंतरच्या काळातील स्थाने हत्यारे बनविण्यास

आवश्यक असा दगड विपुल प्रमाणात जेथे उपलब्ध असतो अशा ठिकाणी आढळून येतात. अश्मयुगीन मानव योग्य प्रतीच्या दगडाच्या शोधात भटकत असताना अशा जागा नेमक्या हेरून हत्यारे बनविण्याचे केन्द्र (Factory or workshop site) तेथे स्थापीत असे. अशी ठिकाणे नद्यांच्या मुख्य पात्रांपासून कित्येकदा अनेक मैल लांब अंतरावर वसलेली आढळून येतात. अशा प्रकारची अनेक स्थाने महाराष्ट्रांतील निरनिराळ्या भागांत उजेडात आलेली आहेत. त्यातील धळे जिल्ह्यातील नंदुरबार तालुक्यातील रनाळे व रायगड (जोशी व साळी, १९६८) व नांदेड जिल्ह्यातील किवळा व भोकर (जोशी व पप्पू, १९७९), ही प्रमुख होत. मराठवाड्यात नांदेडच्या दक्षिणेस १० कि. मी. अंतरावर किवळा या खेड्यानजीक मध्यपुराश्मयुगीन हत्यारे बनविण्याचे केन्द्र आढळले. हत्यारे तयार करण्यास लागणारा उत्कृष्ट प्रतीचा चर्ट (Chert) जातीचा दगड येथे विपुल प्रमाणांत उपलब्ध आहे. येथे सापडलेल्या हत्यारांमध्ये निरनिराळ्या प्रकारच्या तासण्या, टोच्यासारखी हत्यारे प्रामुख्याने आहेत. वरील प्रकारचेच दुसरे महत्त्वाचे मध्यपुराश्मयुगीन स्थान धुळे जिल्ह्यातील रनाळे हे होय. येथे टणक जातीच्या लालसर बसाल्ट या दगडाचा उपयोग हत्यारे बनविण्यासाठी केला आहे. नांदेडपासून ३० कि. मी. दक्षिणेला भोकर येथे आढळून आलेले हत्यारे बनविण्याचे केंद्र फारच विस्तृत आहे. उत्तर पुराश्मयुगीन, म्हणजे २० ते २५ हजार वर्षांपूर्वीची दगडाची उपकरणे येथे फारच मोठ्या प्रमाणात मिळालेली आहेत. येथे असलेल्या लहान टेकडीवर करड्या रंगाच्या चर्टचे (गारगोटीचा प्रकार) अनेक पट्टे आहेत. टेकडीच्या माथ्यावर, उतारावर व पायथ्याजवळ दगडी हत्यारे शेकडोंनी मिळतात. या हत्यारांच्या कडा अतिशय तीक्ष्ण व धारदार आहेत. तसेच पूर्ण बनविलेल्या हत्यारांबरोबर अपूर्ण अवस्थेत असंख्य हत्यारे व लहानमोठ्या आकाराचे छिलके तसेच गाभे (Cores) मुबलक प्रमाणात मिळतात. हे ठिकाण म्हणजे उत्तरपुराश्म-कालीन हत्यारे बनविण्याचा एक प्रकारचा कारखानाच होता असे म्हणता येईल.

अश्मयुगीन प्राणिजीवन

अश्मयुगीन प्राणिजीवनाची कल्पना आपल्याला मुख्यत्वेकरून प्राण्यांच्या अश्मीभूत झालेल्या हाडांच्या (जीवाश्म–Fossils) अभ्यासावरून येते. अशा प्रकारचे जीवाश्म महाराष्ट्रात अनेक ठिकाणी दगडी हत्यारांबरोबर गाळांच्या थरांमध्ये आढळून आलेले आहेत. कृष्णा, प्रवरा, गोदावरी, घोड, पूर्णा, वर्धा इत्यादी अनेक नद्यांच्या खोऱ्यांत रानटी बैल, घोडा, हरिण, रानडुक्कर, पाणघोडा वगैरे प्राण्यांचे अवशेष मिळाले आहेत (बदाम, १९७९). मराठवाड्यांतील मांजरा नदीच्या खोऱ्यात नुकत्याच झालेल्या संशोधनांत प्राण्यांची अश्मीभूत हाडे विपुल प्रमाणांत मिळाली (जोशी व इतर, १९८१). बीड जिल्ह्यात आंबेजोगाइजवळ धनेगांव येथे मांजरा नदीवर धरण बांधण्याचे काम चालू होते व त्यासाठी खोल चर दोन्ही तीरांवर खणलेले होते. अशा प्रकारे अनायासेच

उत्खनन केलेल्या थरांमध्ये प्राचीन प्राण्यांची अश्मीभूत हाडे तसेच शिंपले मोठ्या प्रमाणात मिळाले. धनेगावखेरीज नजीकच तांदुळा, वागदरी व गांजपूर येथेसुद्धा जीवाश्म फारच विपुल प्रमाणात आढळून आले. या स्थानांचे अनन्यसाधारण महत्त्व म्हणजे भारतात इतक्या मोठ्या प्रमाणांत जीवाश्म फक्त उत्तरेत शिवालीक टेकड्यांत आणि मध्यभारतात नर्मदेच्या खोऱ्यांतच आढळून आलेले आहेत. मांजरेच्या खोऱ्यांत तीन-चार प्रकारचे जंगली हत्ती, रानडुकर, रानटी घोडा, काळवीट, म्हैस, बैल इत्यादी प्राण्यांचे अवशेष भरपूर मिळाले. हे अवशेष तीस ते पन्नास हजार वर्षांपूर्वीचे असावेत. वरील भागांत मांजरा नदीचा उतार अगदीच सौम्य आहे (Low gradient). त्यामुळे नदीच्या प्रवाहांत नागमोडी वळणे (meanders) मोठ्या प्रमाणात तयार झालेली आहेत. अशा प्रकारच्या वळणांमुळे या भागांत अनेक ठिकाणी तळ्यासारखी परिस्थिती निर्माण होऊन दलदलीचा पट्टा तयार झाला असावा. या पट्ट्यात फसून अडकल्यामुळे जनावरे आपोआप गाडली गेली असावी.

पुरापर्यावरण

महाराष्ट्रातील नद्यांच्या काठी सापडणाऱ्या निक्षेपांची (गाळाच्या थरांची) जाडी ५ ते ३० मीटर व विस्तार १ ते ५ कि. मी. एवढा दोन्ही तीरांवर आढळून येतो. ह्या निक्षेपांचा बराचसा अभ्यास जोशी (१९८१), राजगुरू (१९७०) व पप्पू (१९७४) यांनी महाराष्ट्रातील अनेक नद्यांच्या खोऱ्यांत केला आहे व त्यावरून असे आढळून आले आहे की नदीकाठी आढळून येणारा प्राचीन निक्षेप हा पस्तीस ते चाळीस हजार वर्षांपूर्वीचा असावा. भूशास्त्राच्या भाषेत हा निक्षेप उत्तर प्लाइस्टोसिन (Upper Pleistocene) काळातील आहे. या अभ्यासावरून नद्यांच्या पात्रांत व हवामानात झालेल्या बदलांची बरीच माहिती उपलब्ध झाली आहे. गाळ साचण्याची क्रिया (Aggradation) पन्नास ते वीस हजार वर्षे (व. पू.) या काळात प्रामुख्याने चालू होती. सुमारे दहा हजार वर्षांपूर्वी होलोसीन (Holocene) काळाच्या सुरुवातीला खननक्रिया प्रामुख्याने सुरू झाली. ह्या काळात नद्यांनी आपल्या पात्रांतील गाळांचे खनन केले. इतकेच नव्हे तर काही ठिकाणी गाळाखालील कठीण अशा खडकांतही खनन केल्याचा पुरावा अनेक ठिकाणी मिळतो. थोडक्यात असे म्हणता येईल की महाराष्ट्रात गेल्या सत्तर हजार वर्षांत हवामानात जे बदल, विशेषतः हल्लीच्या निमशुष्क व कमी पावसाच्या प्रदेशात झाले, ते फार तीव्र स्वरूपाचे नव्हते व सर्वसाधारणपणे हवामान आजच्यासारखेच निमशुष्क मोसमी होते. पावसाचे प्रमाण फार वाढले नसावे अथवा वातावरणातील शुष्कता पण फार कमी झाली नसावी. नद्यांच्या पात्रांत मात्र भूरचनात्मक बदल झाल्याचे दिसून येते. नद्या आजच्यापेक्षा वरच्या व खालच्या पातळीवर वाहत असल्याचा पुरावा मिळतो. हे बदल घडवून आणण्यात भूपृष्ठात होणाऱ्या सौम्य स्वरूपाच्या हालचाली, हवामानातील संभवणारे बदल व समुद्रपातळीत होणारे फेरफार कारणीभूत असतात.

अश्मयुगीन कला

अश्मयुगात, विशेषतः उत्तर पुराश्मयुगात, युरोपमध्ये फ्रान्स व स्पेन या भागात कलेच्या क्षेत्रात अत्युच्च प्रगती झाल्याचे दिसून येते. गुहेतील भिंतीवर आणि छतावर केलेले कोरीव काम व चित्रकला अनेक ठिकाणी आढळून येते. भारतात मात्र या प्रकारचा अश्मयुगीन कलेचा पुरावा मिळालेला नाही. जळगाव जिल्ह्यात मिळालेला पुरावा याला एकमात्र अपवाद होय. पाटणे या खेड्यानजीक उत्तर पुराश्मयुगीन संस्कृतीचा पुरावा डॉ. साळी यांना उपलब्ध झाला आहे (साळी, १९७४). शहामृगाच्या अंड्याच्या कवचाच्या काही तुकड्यांवर नक्षी कोरलेली येथे आढळली.

वसाहत-रचना

अश्मयुगीन मानवाने वसाहतीसाठी स्थळाची निवड करताना, स्थळाच्या परिसरातील भूरचना, बारमाही पाण्याचा पुरवठा, हत्यारांसाठी लागणाऱ्या दगडांची उपलब्धता, शिकारीस योग्य प्राणी असलेली ठिकाणे, या सर्व बाबींचा निश्चित विचार केलेला दिसतो. आतापर्यंत आढळून आलेल्या पुराव्यावरून सर्वसाधारणपणे असे दिसून येते की, डोंगराळ व पाऊस जास्ती असलेल्या भागात (कोकण, सह्याद्रीचा घाटमाथा व उतार) अश्मयुगांत वस्ती विरळ होती. देशावर, त्यातल्या त्यात ५०० ते ७५० मि. मी. पाऊस पडणाऱ्या निमशुष्क भागांत, वस्ती थोडीफार दाट असावी. महाराष्ट्रात प्रवरा गोदावरीच्या खोऱ्यांत अश्मयुगीन स्थळे विपुल प्रमाणांत आढळतात. आद्य पुराश्मयुगीन स्थळे महाराष्ट्रात फारच थोडी आढळून आली आहेत. मध्य व उत्तर-पुराश्मयुगीन स्थळे त्या मानाने बरीच आढळतात. मध्याश्मयुगीन स्थळे मात्र सर्वत्र विविध भौगोलिक परिस्थितीत (डोंगराळ व जास्त पावसाचा भाग आणि कमी पावसाचा शुष्क भाग) आढळतात. या कालात आदिमानवाची लोकसंख्या जास्त असावी व त्याची सभोवतालच्या नैसर्गिक वातावरणाशी समरस होण्याची प्रक्रिया पण अधिक विकसित असावी.

आद्य पुराश्मयुगात आदिमानवाने क्वार्टझाईट या खडक प्रकाराला हत्यारे बनविण्यासाठी प्राधान्य दिल्याचे आढळून येते. भारतात जेथे हा खडक मुबलक प्रमाणात आढळतो (उदा. आंध्रप्रदेश, कर्नाटक, मध्यप्रदेश इत्यादि) तेथे हाच खडक प्रकार आद्य पुराश्मयुगात हत्यारे निर्मिण्यासाठी वापरलेला आहे, असे आढळून येते. महाराष्ट्राची भूमी, थोडासा विदर्भाचा व दक्षिण महाराष्ट्राचा भाग वगळता, पूर्णपणे "डेक्कन ट्रॅप" या अग्निजन्य ज्वालामौखिक खडकांनी व्यापलेली आहे. क्वार्टझाइट जातीचा खडक प्रकार फक्त विदर्भात चंद्रपूर आणि दक्षिण महाराष्ट्रात कोल्हापूर व सिंधुदुर्ग जिल्ह्यांत आढळून येतो. वरील भागांत आद्य पुराश्मयुगीन थोडी फार स्थळे मिळाली आहेत. महाराष्ट्रातील इतर भागांत या काळात आदिमानवाने टणक प्रतीचा बसाल्ट डोलेराईट ट्रॅप चिरकी-नेवासा, भाडणे, गंगापूर, व गंगावली येथे हत्यारे

बनविण्यासाठी वापरला आहे. मध्य व उत्तरपुराश्मयुगांत तसेच मध्याश्म्युगांत मानवाने सिलिका (क्वार्टझ) समूहाचे अनेक प्रकार उदा. चर्ट, अगेट, चालसीडोनी, जस्पर वगैरे वापरलेले दिसून येतात. ही खनिजे महाराष्ट्रात दख्खनच्या पठारावर सर्वत्र आढळतात. या कारणाने मध्य व उत्तर पुराश्मयुगीन तसेच मध्याश्मयुगीन स्थाने महाराष्ट्रात सर्वत्र मोठया प्रमाणात आढळून येतात.

महाराष्ट्रातील हवामान अश्मयुगात फार तीव्र थंड स्वरूपाचे नसल्याने गुहेसारख्या निवासाची गरज मानवाला भासली नसावी, कारण अश्मयुगीन अवशेष साधारणपणे नद्यांच्या खोऱ्यांत तसेच पठारावर मिळतात. कोकणांत मात्र पाचाड व हातखंबा येथील नैसर्गिक गुहांचा वापर मध्याश्मयुगांत मानवाने केलेला आढळतो (जोशी व बोपर्डीकर, १९७२).

अश्मयुगाचा कालखंड

महाराष्ट्रातील आद्य पुराश्मयुगाचा काल निश्चित करण्यास पुरेशी साधने उपलब्ध नाहीत. मागे उल्लेख केल्याप्रमाणे या संस्कृतीची हत्यारे ॲश्युलियन तंत्रपद्धतीनुसार बनविलेली आहेत. इतरत्र मिळणाऱ्या याच प्रकारच्या हत्यार–समूहांशी तुलना करता या संस्कृतीचा १॥ लाख ते ५०,००० वर्षे (व. पू.) हा काळ सुचवता येईल. मध्य पुराश्मयुगाचा काळ निश्चित करणे त्या मानाने बरेच शक्य झाले आहे. नदीच्या गाळात सापडलेल्या विविध अवशेषांवरून रेडिओ कार्बन–१४ पद्धतीचा अवलंब करून ठरविलेला हा काल साधारणपणे २० ते ४० हजार वर्षे (व. पू.) एवढा आहे (राजगुरु, १९७०). या कालमापनास उपयोगी पडणारा पुरावा कृष्णानदीवरील धोम (जि. सातारा) व बारगाव-नांदूर (जि. अहमदनगर) येथे मिळाला आहे. मध्यपुराश्मयुगाला आणखी प्राचीनता देणारा एक महत्त्वाचा पुरावा आम्हाला नुकताच गोदावरीकाठी मिळाला आहे. पैठणजवळ वाघोडी–वडोळी (जि. औरंगाबाद) येथील मध्यपुराश्मयुगीन वसतिस्थानाचे उत्खनन डॉ. रा. वि. जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही केले (जोशी व इतर, १९८०). येथे या संस्कृतीची हत्यारे ही नदीच्या सध्याच्या पात्रापासून सुमारे २०–२२ मीटर उंचीवर आढळणाऱ्या दगडगोटे व वाळूच्या थरात सापडतात. हा थर नदीकाठी मिळणाऱ्या निक्षेपांपेक्षा प्राचीन आहे असे भूशास्त्राधारे सांगता येते. नदीकाठी मिळणारा निक्षेप हा ४० हजार वर्षांपूर्वीचा आहे (राजगुरु, १९७०). तेव्हा वरच्या पातळीवरील स्तरांत मिळणारी दगडी हत्यारे ही ४० हजार वर्षांपेक्षा जुनी निश्चितच आहेत.

उत्तर पुराश्मयुगाचा अंदाजे काळ कार्बन १४ पद्धतीनुसार २५ ते १० हजार वर्षे (व. पू.) एवढा आहे. गोदावरी नदीवरील पैठण येथे आणि घोडनदीवरील इनामगाव (जि. पुणे) येथे नदीकाठच्या निक्षेपात या काळातील दगडी हत्यारांबरोबर सापडलेले शिंपले तसेच पाटणे (जि. जळगांव) येथे सापडलेल्या शहामृगाच्या

अंड्याच्या कवचावरून कार्बन–१४ पद्धतीनुसार हे कालमापन करणे शक्य झाले आहे (साळी, १९७४). मध्याश्मयुगाचा काल आता काही नवीन कार्बन–१४ टेस्टवरून मिळालेल्या तारखांनुसार थोडा फार मागे रेटला गेला आहे. इनामगाव येथे मध्याश्मयुगीन हत्यारांबरोबर स्तरीय संदर्भात जे शिंपले सापडले, त्यांचा काळ कार्बन–१४ पद्धतीनुसार १२ ते १३ हजार वर्षे (व. पू.) एवढा आढळला. तेव्हा मध्याश्मयुगाची कालमर्यादा १२ ते ५ हजार वर्षे (व. पू.) एवढी समजण्यास हरकत नसावी (राजगुरू व इतर, १९७९).

पुरातत्त्वीय संख्याशास्त्र

पुरातत्त्वीय पुराव्यांच्या मूल्यमापनासाठी संख्याशास्त्राची मदत घेण्यात येते. अश्मयुगीन हत्यारे शेकड्यांनी मिळतात. तेव्हा ती बनविताना मानवाने काही विशेष परिमाण मनात योजिले असल्याचे शक्य आहे. या विषयात पाश्चात्त्य देशांत गेल्या २०–२५ वर्षांत बऱ्याच प्रमाणात संशोधन करण्यात आले आहे. भारतातसुद्धा थोडी फार प्रगती या क्षेत्रात झाली असून महाराष्ट्रातील चिरकी–नेवासा येथे मिळालेल्या आद्य पुराश्मयुगीन ॲश्युलियन संस्कृतीच्या दगडी हत्यारांचा अभ्यास या दृष्टिकोनांतून डॉ. रा. वि. जोशी व डॉ. अशोक मराठे यांनी केला आहे (जोशी व मराठे, १९७६). त्यांनी ९० हातकुऱ्हाडी व फरशा या हत्यारांची विविध १० मापने (लांबी, रुंदी, जाडी, वजन इत्यादी) घेऊन त्या आधारे खालील महत्त्वाची अनुमाने काढली :

१. हातकुऱ्हाडी व फरश्या यांचे वजन ५०० ते ५५० ग्रॅम एवढे आहे.

२. हत्यारांसाठी वापरलेला दगडाचा प्रकार जरी बदलला तरी वजनात फार मोठ्या प्रमाणात फरक पडत नाही. कदाचित माणसाच्या पात्रतेमध्ये विशेष फरक पडत नसल्याने हे साधर्म्य दिसून येत असावे.

३. हत्यारांची रुंदी आणि जाडी यांची बेरीज कायम राहते. ती सर्वसाधारणपणे एक वीत लांबीपेक्षा थोडी कमीच आहे. त्यामागे ही हत्यारे हाताने वापरता यावी हा उद्देश संभवतो.

४. हत्यारांची लांबी व वजन ह्यांच्यातील बदल एकमेकांवर पूर्णपणे अवलंबून असणारे आहेत.

५. विविध ठिकाणच्या अश्मयुगीन हत्यारांची माहिती एकत्रित करून केवळ ह्याच पद्धतीने विश्लेषण केल्यास त्यांचा सांस्कृतिक क्रम लावणे शक्य आहे.

समालोचन

गेल्या पंचवीस वर्षांत अश्मयुगीन संस्कृतीविषयी जे नवीन संशोधन झाले ह्याचा थोडक्यात आढावा या लेखात घेण्यात आला आहे. अश्मयुगीन संस्कृतीच्या विविध

अवस्थांचा विकास टप्प्याटप्प्याने कसा होत गेला हे यावरून कळून येईल. आजपर्यंत आदिमानवाचे जीवावशेष कोठेही मिळाले नसल्याने सध्याच्या महाराष्ट्रभूमीवर वावरणारा आदिमानव कसा होता याची काहीही माहिती मिळत नाही. तथापि आदिमानवांनी बनविलेली दगडी हत्यारे विपुल प्रमाणात सापडतात. अश्मयुगीन मानवाची हत्यारे ही त्याच्या जीवनाची महत्त्वपूर्ण साधने आणि प्राप्त होणारे मुख्य पुरावे असल्याने ह्या व इतर मिळालेल्या पुराव्यांधारे आदिमानवाच्या जीवनपद्धतीविषयी, थोडीफार का होईना, माहिती करून घेता आली आहे. महाराष्ट्रातील काही भागांत नैसर्गिक परिस्थितीच्या अनुकूलतेमुळे गेल्या १॥ लाख वर्षांच्या कालावधीतील मानवी अस्तित्वाचा सलग पुरावा हाती आला आहे व यावरून मानवी जीवन हे सभोवतालच्या नैसर्गिक परिस्थितीचा एक अविभाज्य घटक कसा होता हे लक्षात येते. महाराष्ट्रात १॥ लाख वर्षांपासून ते ५ ते ६ हजार वर्षांपर्यंत (व. पू.) एवढ्या मोठ्या अश्मयुगीन कालात जे नैसर्गिक व भौगोलिक बदल झाले त्यांचा थोडाफार अभ्यास झाला आहे. तथापि या बदलांचा मानवी जीवनावर व तत्कालीन प्राणी व वनस्पती जीवनावर काय परिणाम व प्रक्रिया झाल्या व मानव या बदलत्या परिस्थितीशी कसा समरस होत गेला ह्याचा सखोल अभ्यास शास्त्रीय दृष्टिकोनातून करणे अत्यंत आवश्यक आहे.

■ ■

परिशिष्ट

महाराष्ट्रातील प्रमुख अश्मयुगीन स्थळे

आद्य पुराश्मयुग (Lower Palaeolithic)

१. गोदावरी खोरे – गंगापूर (जि. नाशिक)
२. प्रवरा खोरे – चिरकी–नेवासा (जि. अहमदनगर)
३. तापी खोरे – भाडणे (जि. धुळे)
(कान नदी)
४. झारपट नदी – पापामिया टेकडी (जि. चंद्रपूर)

मध्य पुराश्मयुग (Middle Palaeolithic)

१. गोदावरी खोरे – नांदूर मध्मेश्वर, काळेगाव (जि. नाशिक)
किवळा (जि. नांदेड)
२. प्रवरा खोरे – नेवासा (जि. नाशिक)

३. कृष्णा खोरे – टेंभू (जि. सातारा), वाळवे (जि. सांगली)
४. घोड खोरे – इनामगाव (जि. पुणे)
५. वैनगंगा खोरे – पवनी (जि. भंडारा)
६. झारपट नदी – पापामिया टेकडी (जि. चंद्रपूर)
७. मुळा–मुठा – दौंड (जि. पुणे)

उत्तर पुराश्मयुग (Upper Palaeolithic)

१. तापी खोरे – पाटणे (जि. जळगाव)
आडनाला
२. प्रवरा खोरे – नेवासा (जि. अहमदनगर)
ढवळपुरी (जि. अहमदनगर)
३. घोड खोरे – इनामगाव (जि. पुणे)
४. गोदावरी खोरे – भोकर (जि. नांदेड)

मध्याश्मयुग (Mesolithic)

या संस्कृतीची हत्यारे अतिशय विस्तृत प्रमाणात नद्यांच्या पात्रांत, काठांवर, तसेच डोंगरपठारांवर व उतारांवर आढळून येतात.

उत्खनन केलेली स्थळे

१. पाचाड – जि. रायगड
२. हातखंबा – जि. रत्नागिरी

प्राण्यांचे अवशेष (Fossils) मिळालेली स्थळे

१. गोदावरी खोरे – गंगापूर (जि. नाशिक)
नांदूर मध्मेश्वर (जि. नाशिक)
२. प्रवरा खोरे – नेवासा (जि. अहमदनगर)
३. घोड खोरे – इनामगाव (जि. पुणे)
४. पूर्णा खोरे – येलदरी (जि. परभणी)
५. मांजरा खोरे – धनेगाव, तांदुळा, गांजूर व वांगदरी (जि. बीड) आंबेजोगाईनजिक.

संदर्भ–सूची

1. Z. D. Ansari, and R. S. Pappu, 'Some observations on the excavation at Acheulian Site, Chirki–Nevasa, Dist. Ahmednagar', *Bulletin of the Deccan College Research Institute*, 1975, 35 : 1–8.
2. G. L. Badam, *Pleistocene fauna of India*, Deccan College Postgraduate and Research Institute, Pune, 1979.
3. G. Corrinus, 'Stratigraphy and geological background of an Acheulian Site Chirki on Pravara, India', *Anthropos*, 1968, 63/64 : 921–940.
4. R. V. Joshi, and S. A. Sali, 'Middle Stone Age factory Sites in Western India', *Anthropos*, 1968, 63/64 : 818–827.
5. R. V. Joshi, and B. P. Bopardikar, 'Stone Age cultures of Konkan', *Archaeological Congress and Seminar Papers*, 1972, Nagpur : 47–57.
6. R. V. Joshi, and A. R. Marathe, 'Metrical analysis of hand-axes from Chirki–on–Pravara, W. Maharashtra, India', *Puratattva*, 1976, 8 : 3–12.
7. R. V. Joshi and R. S. Pappu, 'Bhokar : An Upper Palaeolithic factory Site from Central Godavari Basin, Maharashtra', *Man and Environment*, 1979, 3 : 86–91.
8. R. V. Joshi, R. S. Pappu, A. R. Marathe, and R. P. Pandey, 'Excavation at Wadoli–Waghodi—A Middle Palaeolithic site on the high level grovel of the Godavari river', *Bulletin of the Deccan College Research Institute*, 1980, 39 : 47–64.
9. R. V. Joshi, S. V. Chitale, S. N. Rajaguru, R. S. Pappu and G. L. Badam, 'Archaeological Studies in the Manjra Valley Central Godavari Basin', *Bulletin of the Deccan College Research Institute*, 1981, 40 : 67–94.
10. M. L. K. Murty, *The Stone Age cultures of Chittoor Dtstrict*, unpublished doctoral thesis, Poona University, 1966.

11. T. Oldham, ' On the Agate Flake found by Mr. Wynne in the Pliocene deposits of the Upper Godavari ', *Records Geological Survey of India*, 1868, 65–69.
12. R. S. Pappu, *Pleistocene Studies in the Upper Krishna Basin*, (Poona : Deccan College Postgraduate and Research Institute), 1974.
13. S. N. Rajaguru, *Studies in the late Pleistocene of Mula–Mutha valley*, unpublished doctoral thesis, Poona University, 1970.
14. S. N. Rajaguru and R. S. Pappu, ' Environments as reflected in the alluvial deposits of Chirki–Nevasa, Dist. Ahmednagar ', *Journal of the University of Poona*, 1971, 40 : 115–121.
15. S. N. Rajaguru, and R. S. Pappu, ' On the Problem of Stone Age chronology at Chirki–Nevasa, Dist. Ahmednagar ', *Bulletin of the Deccan College Research Institute*, 1973, 31 : 360-369.
16. S. N. Rajaguru, R. S. Pappu, A. R. Marathe, and B. C. Deotare, ' The Terminal Pleistocene Microlithic industry at Inamgao, Maharashtra ', *Bulletin of the Deccan College Research Institute*, 1979, 39 : 150–159.
17. S. A. Sali, ' Upper Palaeolithic research since Independence ', *Bulletin of the Deccan College Research Institute*, 1974, 34 : 147–160.
18. H. D. Sankalia, ' Animal fossils and palaeolithic industries from Pravara basin at Nevasa, Dist. Ahmednagar. ', *Ancient India*, 1956, 12 : 35–52.

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६२ : १-४, १९८३-८४

प्राचीन महाराष्ट्र

शां. भा. देव
डेक्कन कॉलेज, पुणे

अलीकडील काही पुरातत्त्वीय संशोधनानुसार सध्याच्या महाराष्ट्रभूमीचा इतिहास पार अश्मयुगापर्यंत मागे नता येतो. गेल्या तीस वर्षांमध्ये महाराष्ट्राच्या विविध भागांत जे संशोधन झाले त्यानुसार पाषाणयुगापासून ते मध्ययुगापर्यंत महाराष्ट्राचा इतिहास बराचसा सलगपणे मांडण्याइतकी सामग्री उपलब्ध झालेली आहे. प्राचीन पाषाणयुग, नवाश्मयुग, ताम्र-पाषाणयुग, लोहयुग आणि ऐतिहासिक काल असे प्रमुख टप्पे या इतिहासामध्ये योजता येतात. असे असले तरी प्रस्तुत निबंधामध्ये प्रामुख्याने प्राचीन ऐतिहासिक काळावरच विशेष लक्ष केंद्रित केलेले आहे.

प्राचीन ऐतिहासिक काळाचा मागोवा घेताना या कालाची जडणघडण कशी झाली हे समजून घेण्यासाठी इतिहासपूर्वकालातील काही वैशिष्ट्यांचा निर्देश करणे आवश्यक ठरते. उदाहरणार्थ, नवाश्मयुगापासून ते लोहयुगापर्यंत सध्याच्या महाराष्ट्रभूमीवर इतर प्रदेशांतील अनेक संस्कृतींचे लोक येथे आले. आंध्र कर्नाटकातील नवाश्मयुगीन संस्कृतीचे लोक आले; त्यानंतर माळव्यातील ताम्रयुगीन संस्कृतीचे लोक आले; सिंध, पंजाब, गुजरातमधील सिंधू संस्कृतीचा संपर्क महाराष्ट्राच्या प्रवरा खोऱ्यापर्यंत दिसून आलेला आहे. इसवी सनपूर्व सातव्या–आठव्या शतकात लोहयुगीन महापाषाण संस्कृतीचे लोक विदर्भामध्ये आले आणि त्यांचा प्रभाव पश्चिम महाराष्ट्रातही पडला. या विविध घटकांनी महाराष्ट्राच्या इतिहासाचा आणि संस्कृतीचा पाया घातला. ऐतिहासिक काळातही ही प्रक्रिया चालू राहिली.

महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास लक्षात घेता एक गोष्ट प्रामुख्याने जाणवते ती ही की, जवळपास इसवी सनपूर्व दुसऱ्या शतकापर्यंत हा भूभाग राजकीयदृष्ट्या एकसंध असा झालेला नव्हता. ऐतिहासिक काळाची सुरुवात सर्वसाधारणपणे लिखित पुराव्याच्या उपलब्धीशी जोडली जाते. आणि त्या दृष्टीने पाहिले तर असे दिसून येते की, अशोकाच्या सोपारा येथील लेखाच्या आधीचा लिखित पुरावा सध्या तरी उपलब्ध नाही. त्यामुळे महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास मौर्य कालाच्या आधी 'इतिहास' या संज्ञेत मोडत नाही असे मत मांडले जाते आणि ते एका अर्थी खरेही आहे. याचे कारण असे की, महाजनपदांच्या काळी किंवा त्यानंतर नंद साम्राज्याच्या वेळी सध्याच्या

महाराष्ट्राच्या स्थितीबद्दलचा अंदाज निश्चितपणे करता येत नाही. महाजनपदांना उत्तर भारतात जरी महत्त्वाचे स्थान असले, तरी त्यांचा सध्याच्या महाराष्ट्राशी फारसा संबंध आलेला दिसत नाही. तीच गोष्ट थोड्याफार फरकाने नंद सम्राटांबद्दल म्हणता येईल. काही विद्वानांच्या मते नंद साम्राज्य सध्याच्या महाराष्ट्र भूभागावरही पसरलेले होते. नव नंद डेहरा हे नंद साम्राज्यात होते आणि त्याची सांगड मराठवाड्यातील गोदावरीच्या काठी असलेल्या नांदेडशी घातली जाते. नंतरच्या काळातील काही पुराभिलेख कुंतल प्रदेशाच्या नंद साम्राज्याशी संबंध जोडतात. यापलीकडे दुसरा कुठलाही पुरावा उपलब्ध नाही. त्यामुळे मौर्य काळाच्या आधी महाराष्ट्राच्या इतिहासाची रूपरेखा स्पष्ट झालेली नाही.

वर उल्लेखिल्याप्रमाणे अशोक मौर्याचा प्रस्तर – शासन लेख (आठवा) सोपारा येथे काही वर्षांपूर्वी सापडलेला आहे. आंध्र–कर्नाटकामध्येसुद्धा अशोकाचे प्रस्तर लेख सापडलेले असल्याने महाराष्ट्रभर अशोक मौर्यांची अधिसत्ता होती असे स्पष्ट होते. **महावंस** या बौद्धधर्मग्रंथानुसार पाटलीपुत्र येथे भरलेल्या महासभेनंतर बौद्ध धर्मप्रसारासाठी महाधर्मरक्षित याला ‘ महारठ्ठ ’ प्रदेशात पाठविण्यात आले. सध्याच्या महाराष्ट्राच्या दक्षिणेस असलेल्या सध्याच्या कर्नाटकातील श्रवण बेळगोळ येथील फार नंतरच्या काळातील शिलालेखानुसार चंद्रगुप्त मौर्याचा कर्नाटकाशी संबंध आला असे दिसते. चंद्रगुप्त मौर्य कर्नाटक प्रदेशात कसा गेला, हे निश्चितपणे सांगता येत नाही. परंतु अशोक मौर्याच्या काळात सध्याच्या महाराष्ट्र भूभागाचा अंतर्भाव मौर्य साम्राज्यात होत होता असे निश्चितपणे म्हणता येते. अशोक मौर्याच्या काळीच महाराष्ट्रात बौद्ध धर्माचा शिरकाव झाला. आणि त्यानंतरच्या काळात बौद्ध धर्माने जनमानसावर आपली पकड बसविली. भारतातील जवळपास बाराशे लेण्यांपैकी जवळजवळ आठशे महाराष्ट्रात आहेत आणि यांतील बरीचशी लेणी बौद्ध धर्मीयांची आहेत. हा पुरावा वरील विधानाला पुष्टी देतो. मात्र यापलीकडे महाराष्ट्र इतिहासाबद्दलची फारशी माहिती उपलब्ध झालेली नाही. असे असले तरी मौर्यांच्या काळात सुसंघटित राज्यकारभाराचा, त्याचप्रमाणे संघटित व्यापाराचा फायदा महाराष्ट्राला मिळाला असला पाहिजे. प्राकृत भाषेलाही राजाश्रय आणि लोकाश्रय मिळाला. पाटलीपुत्र, उज्जयिनी, भरुकच्छ, शूर्पारक, प्रतिष्ठान आणि तगर या विविध शहरांना जोडणारे मार्ग महाराष्ट्र भूमीवरूनच जात असले पाहिजेत. त्यामुळे नागरीकरणाची प्रक्रिया या कालातच जोमाने झाली असावी असे म्हणण्यास प्रत्यवाय नसावा.

महाराष्ट्राचा सातवाहन कालातील इतिहास यापेक्षा जास्त सुस्पष्ट आहे. मौर्यांनंतर आलेल्या शुंग घराण्याचा प्रभाव महाराष्ट्रावर फारसा दिसून येत नसला, तरी शुंग कलाशैलीचे प्रत्यंतर भाज्यासारख्या काही ठिकाणी जाणवते यात शंका नाही. त्याचप्रमाणे सध्या महाराष्ट्रात असलेल्या विदर्भाचा शुंग घराण्याशी निकटचा संबंध आलेला होता हे **मालविकाग्निमित्र**सारख्या वाङ्मयीन साधनावरून दिसून येते. उत्तरेकडील

शिल्पशैलीचा, त्याचप्रमाणे हीनयान बौद्ध धर्माचा पगडा विदर्भावर मौर्य–शुंग कालामध्ये बसलेला होता, हे पौनी येथे झालेल्या उत्खननावरून, त्याचप्रमाणे मांढळनजिक सापडलेल्या शैलोत्कीर्ण पुराभिलेखावरून सूचित केले गेले आहे.

सध्याच्या महाराष्ट्राचा बराचसा भूभाग सातवाहनांच्या अमदानीत एकत्रित झाला असे दिसते. त्यामुळे सातवाहनांना महाराष्ट्राचे खरेखुरे पहिले सम्राट म्हणणे यथार्थ ठरते. सातवाहनांच्या निश्चित कालखंडाबद्दल, त्यांच्या नावाबद्दल, राजांच्या संख्येबद्दल, त्यांच्या मूलस्थानाबद्दल संशोधकांत, त्याचप्रमाणे उपलब्ध साधनांत मतभिन्नता आहे. असे असले तरी, गेल्या काही वर्षांत सातवाहनांबद्दलची बरीचशी नवी माहिती उपलब्ध झालेली आहे. सिमुकाची आंध्रमध्ये सापडलेली नाणी, त्याचप्रमाणे गौतमीपुत्र सातकर्णी, वासिष्ठीपुत्र पुळुमावी, वासिष्ठीपुत्र सातकर्णी, वासिष्ठीपुत्र स्कंद सातकर्णी आणि वासिष्ठीपुत्र विजय सातकर्णी यांची प्रतिमायुक्त नाणी, कोल्हापूर, नेवासा, भोकरधन इत्यादी उत्खननांमध्ये सापडली. आधिभौतिक संस्कृतीचे अवशेष, त्याचप्रमाणे याच कालातील उत्खननात हाती आलेले रोमन अवशेष तत्कालीन महाराष्ट्राच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीची माहिती देतात. या कालातील आर्थिक आणि सामाजिक जीवनाबद्दल प्लिनी, टॉलेमी आणि पेरिप्लस यांमधूनही बरीचशी माहिती मिळते.

अर्थात ही सर्व साधने उपलब्ध असतानाही सातवाहन कालाबद्दल किंवा त्यांच्या वंशावळीबद्दल निश्चितपणे सांगता येण्यासारखी परिस्थिती निर्माण झालेली नाही. परंतु राजकीय इतिहास सोडला तर महाराष्ट्रातील तत्कालीन सामाजिक, धार्मिक व आर्थिक परिस्थितीची कल्पना उपलब्ध पुराव्यावरून जितकी येते, तितकी इतर कालाबद्दल येत नाही. राजकीय इतिहासापेक्षा ही माहिती इतकी चांगली आहे, की त्यामुळे राजकीय माहितीचा अपुरेपणा जाणवत नाही. या माहितीवरून असे दिसून येते की, महाराष्ट्राच्या इतिहासात सातवाहन काल सर्व दृष्टींनी भरभराटीचा होता. टॉलेमीच्या माहितीनुसार, सातवाहन साम्राज्यात तीस तटबंदीयुक्त शहरे अस्तित्वात होती. उत्खननात तेर येथे लाकडी तटबंदीचे, त्याचप्रमाणे नाशिक, नेवासा, भोकरधन इत्यादी ठिकाणी विटांनी बांधलेल्या घरादारांचे अवशेष आणि सांडपाण्याकरता बांधलेले विटांचे, मातीच्या कड्यांचे किंवा रांजणांचे सांडपाण्याचे कूप आढळून आलेले आहेत. ही सुबत्ता, राजकीय स्थैर्य त्याचप्रमाणे अंतर्गत व सागरी व्यापारामुळे आलेली होती. रोमन साम्राज्यातून महाराष्ट्रात उत्कृष्ट बनावटीची नक्षीदार मातीची भांडी, काचसामान, चार फूट उंचीचे मद्याने भरलेले कुंभ, रोमन देवदेवतांचे पुतळे, रोमन युवती, त्याचप्रमाणे रोमन सम्राटांची नाणी फार मोठ्या प्रमाणावर याच कालात महाराष्ट्रात व इतरत्र उपलब्ध होतात. महाराष्ट्रात अशा तऱ्हेचा पुरावा कोल्हापूर, नाशिक, तेर, भोकरधन, पैठण, पवनार आणि कल्याण इत्यादी ठिकाणी मिळालेला आहे. सोपारा, कल्याण आणि चौल यांसारखी बंदरे सातवाहन–क्षत्रप कालात भरभराटीत होती.

याउलट भारतातील दालचिनी, सुती कापड, रेशमी कापड आणि हस्तिदंताच्या वस्तू निर्यात केल्या जात असत. याचे प्रत्यंतर भोकरधन आणि तेर येथील उत्खननामध्ये मिळालेले आहे. भोकरधन येथे हस्तिदंताच्या उत्कृष्ट स्त्रीमूर्ती मिळालेल्या आहेत. अशाच स्त्रीमूर्ती रोमन साम्राज्यातील पाँपे येथेही मिळालेल्या आहेत. रोमन देवतांचे ब्राँझचे पुतळे कोल्हापूर येथे मिळाले आहेत. टायबेरियस आणि ऑगस्टस या राजांची नाणी अनेक ठिकाणी सापडलेली आहेत आणि त्यांच्या मातीच्या प्रतिकृती उत्खननात सापडलेल्या आहेत. यांचा पुतळयांच्या माळेसारखा उपयोग केला जाई.

या व्यापारउदीमामुळे यवनांच्या वसाहती महाराष्ट्रात झाल्या. कार्ले, कान्हेरी, नाशिक, जुन्नर, कुडा इत्यादी लेण्यांमध्ये यवनांच्या देणग्यांचे स्पष्ट उल्लेख आहेत. हे यवन म्हणजे आयोनियन ग्रीक. यांच्याचप्रमाणे शक आणि पहलव या विदेशी देणगीदारांची नावेही महाराष्ट्रातील बौद्ध लेण्यांमध्ये आढळून येतात. केवळ नावेच आढळून येतात असे नसून, काही ग्रीक स्थापत्य वैशिष्टये नाशिक व जुन्नर अशा ठिकाणी आढळून आलेली आहेत. नाशिकच्या लेण्यात तुळईच्या मुखावर रोमन मानवी मुखे आढळून येतात, तर जुन्नरला खिडक्यांच्या जाळयांचे अलंकरण ग्रीक पद्धतीचे आहे. नाशिक येथे आढळून येणारी घुबडाची आकृती आणि वजन पेलणाऱ्या ॲटलांटिसची शिल्पे ही भारतीय म्हणता येणार नाहीत. तेर येथे सापडलेल्या मृण्मय मूर्तीत अनेक विदेशी चेहरेपट्टया दिसून येतात.

या सर्वांना जोडणारा दुवा म्हणजे बौद्ध धर्म होय. याच्या प्रसारात, आधी सांगितल्याप्रमाणे, परदेशीयांचाही वाटा आहे, हे कान्हेरी, नाशिक, जुन्नर इत्यादी ठिकाणच्या पुराभिलेखांवरून स्पष्ट होते. तत्कालीन भरभराटीची अवस्था संघटित व्यापारउदीमामुळे होती हे अनेक पुराभिलेखांवरून स्पष्ट होते. नाशिकच्या लेण्यांमध्ये विविध धंद्यांचा आणि कारागिरांच्या श्रेणींचा उल्लेख आलेला आहे. कुंभार, तेली, धान्याचे व्यापारी, सुतार, बुरूड, पाथरवट, विणकर, सोनार, धातुकाम करणारे कारागीर, सुगंधी. वैद्य इत्यादींचे आणि त्यांच्या श्रेणींचे उल्लेख आलेले आहेत. महाराष्ट्रातील बौद्ध लेण्यांत सापडलेल्या लेखांतील बरेच देणगीदार व्यापारी वर्गातील आहेत. फार थोडे लेख राजघराण्यातील व्यक्तींचे आहेत. तर काही सर्वसामान्यांचे आहेत. यावरून असे म्हणता येते की, व्यापारउदिमामुळे आलेली सुबत्ता व्यापारी वर्गाने बऱ्याच अंशी बौद्ध धर्माच्या प्रसाराकरिता उपयोगात आणली. बौद्ध लेणी ही बऱ्याच वेळा प्राचीन व्यापारी मार्गांवर असल्याने नाणाघाट. जुन्नर येथे फार मोठया प्रमाणावर लेणी कोरण्यात आली. आणि येथे रहाणाऱ्या भिक्षूंकरिता विविध सुविधा उपलब्ध करण्यात आल्या. नाशिक, कान्हेरी, कुडा व जुन्नर ही उदाहरणे या बाबतीत देता येतील. व्यापारउदिमामुळे तत्कालीन महाराष्ट्रात सोपारा, कल्याण, चौलसारखी बंदरे, कोल्हापूर, तेर, भोकरधनसारखी कलाकेंद्रे आणि तेर, कराडसारखी व्यापारी केंद्रे उदयास आली.

व्यापाराची वाढ, शहरांचा उदय, सुसंघटित आर्थिक व्यवस्था, एकसंध राज्य-व्यवस्था आणि बौद्ध धर्मासारख्या उदार दृष्टिकोनाच्या धर्माचा प्रभाव यामुळे व्यापाऱ्यांचा आणि कारागिरांचा इतर प्रदेशांशीही संबंध आल्यासारखे दिसते. कान्हेरी, कार्ले, भारहूत, नाशिक इत्यादी ठिकाणी सापडलेल्या पुराभिलेखांवरून बौद्ध धर्माचे उपासक किती वेगवेगळ्या प्रदेशांत पसरलेले होते आणि धार्मिक भावनेतून किती दूरवरच्या प्रदेशात त्यांनी दाने दिली होती हे स्पष्ट होते. यावरून असे दिसते की, सध्याच्या कर्नाटक, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश इत्यादी प्रदेशांशी तत्कालीन महाराष्ट्रीयांचा संबंध निकटचा होता.

सातवाहनांच्या राज्यकालामध्ये शक–क्षत्रप हे काही काल उत्तर भारत व उत्तर महाराष्ट्रात प्रबळ झाले, तरी सातवाहनांनी त्यांचा बीमोड करून आपले वर्चस्व पुनः प्रस्थापित केले. काही काळ क्षत्रप आणि सातवाहन ही घराणी विवाहसंबंधात जवळही आली. परंतु ही मैत्री चिरकाल टिकली नाही. सातवाहन घराण्यातील राजांनीच या परकीयांचा पाडाव करून ‘ शक–पहलव–निसूदन ’ हे विरुद सार्थ केले. परंतु काही काळ का होईना, कल्याणसारखी बंदरे या परकीयांच्या प्रभावाखाली आल्याने व्यापारी जहाजे भरूकच्छकडे वळवावी लागली असे परकीय साधने सांगतात. असे असले तरी हे शक–क्षत्रप तत्कालीन महाराष्ट्रीय समाजाचे घटक बनले होते, हे त्यांनी बौद्ध लेण्यांना दिलेल्या देणग्यांवरून दिसून येते.

सातवाहनांचा अस्त इसवी सनाच्या तिसऱ्या शतकाच्या प्रथम चतुर्थकाच्या शेवटी झाला. त्यांच्या कारकीर्दीतील काही अधिकाऱ्यांच्या नावाशी ‘ महाराष्ट्र ’ या संज्ञेचा संबंध लावला जातो. ‘ महारठी ’ आणि ‘ महारठीनी ’ यांचे काही लेख बेडसा, कान्हेरी आणि कुडा येथील लेण्यांमध्ये आहेत. काही विद्वानांच्या मते जो प्रदेश या महारठींच्या आधिपत्याखाली होता त्यालाच ‘ महारठ ’ म्हणजे महाराष्ट्र असे नाव पडले. खुद्द सातवाहनांच्या कुठल्याही लेखात महाराष्ट्राच्या व्युत्पत्तीशी उपयोगी पडेल असा उल्लेख नाही. या संज्ञेचा पहिला उल्लेख बौद्ध धर्मीयांच्या **महावंस** या ग्रंथात मिळतो. त्यानंतर एकदम सातव्या शतकामध्य चालुक्य घराण्याचा दुसरा पुलकेशी याच्या ऐहोळे लेखामध्ये येतो. यामध्ये ‘ तीन महाराष्ट्रक ’ असा उल्लेख आलेला आहे. या तीन महाराष्ट्रकांबद्दल विद्वानांत एकमत नाही. काही विद्वानांच्या मते विदर्भ आणि अपरान्त यांचा या महाराष्ट्रकांशी संबंध असावा. याउलट याझदानी, गोदावरी-थडी, भीमाथडी आणि नीराथडी हे ते तीन महाराष्ट्रक असावेत असे मत मांडतात. ह्युएनसँग ‘ मोहलच ’ (महाराष्ट्र) चा उल्लेख करून असे सांगतो की, या प्रदेशाचा विस्तार सहा हजार ली म्हणजेच एक हजार मैल असा होता. यावरून महाराष्ट्राच्या विस्ताराची नेमकी कल्पना येऊ शकत नाही.

सातवाहनांच्या नंतर महारष्ट्राचा इतिहास सुस्पष्ट आणि सुसंगत आहे असे फारसे म्हणता येत नाही. उत्तरेमध्ये कुशाण, गुप्त यांच्यासारखी साम्राज्ये उदयाला

आली तरी त्यांचा दृश्य परिणाम महाराष्ट्रावर फारसा जाणवला नाही. असे झाले असावे की, छोटी छोटी राज्ये उदयास आली असावीत किंवा सातवाहनांनंतर प्रादेशिक अधिकाऱ्यांनी आपापले प्रदेश स्वतंत्रपणे जपले असावेत. दक्षिण महाराष्ट्रात सापडलेली ' कुर ' राजांची नाणी याला दुजोरा देतात.

अशाच प्रादेशिक राजसत्तांत विदर्भात उदयास आलेल्या वाकाटकांचा समावेश करता येतो. वाकाटकांचे अधिराज्य प्रामुख्याने विदर्भ विभागामध्ये आढळून येते. या घराण्याचे गुप्त राजघराण्याशी जरी वैवाहिक संबंध होते तरी त्याचे फलित, दृश्य स्वरूपामध्ये प्रामुख्याने कलाक्षेत्रात दिसून येते. त्यांच्या राज्यकारभाराचा ढाचा गुप्तांच्या-सारखाच राहिला. या सम्राटांचे जे ताम्रपट उपलब्ध झालेले आहेत, त्यांत दुसरा प्रवरसेन याचे बहुसंख्य आहेत आणि तेही बहुतांशी विदर्भातच सापडलेले आहेत. या राजघराण्याच्या इतिहासाबद्दल डॉ. मिराशींची मते बदलण्यासारखा पुरावा उजेडात आलेला नसला तरीही रामटेक, नगरधन, पवनार, नागरा आणि अजंठा येथील पुरावा मुद्दाम लक्षात घेणे आवश्यक ठरते. नागरा येथे सापडलेले वाकाटककालीन विटांनी बांधलेल्या देवळांचे अवशेष, मांढळ आणि पवनार येथे सापडलेली शिल्पे, रामटेक-जवळ सापडलेल्या बौद्ध ब्राँझ प्रतिमा आणि रामटेक येथील वाकाटककालीन मंदिरांच्या भिंतीवर अलीकडे सापडलेला प्रभावती गुप्ताचा लेख हा महत्त्वपूर्ण पुरावा नवीन आहे यात शंका नाही. असे असले तरी सातवाहनांच्यासारखे मोठे साम्राज्य वाकाटकांचे नव्हते. धार्मिक क्षेत्रात मात्र त्यांनी ब्राह्मण धर्माला पुनः उजाळा आणला.

मौर्यांपासून महाराष्ट्राच्या इतिहासावर दृष्टिक्षेप टाकला, तर असे दिसून येते की, महाराष्ट्राच्या इतिहासात बरेच चढ–उतार झाले. परंतु यामध्ये सातवाहनांचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. त्यांच्या काळी देखील अपरांत, अश्मक, मूलक, विदर्भ असे विभाग असतानाही या सर्वांना एकत्र आणण्याची प्रक्रिया सातवाहन कालातच झाली. मात्र यानंतर राजकीय, सामाजिक आणि आर्थिक एकसंधपणा येण्यासाठी महाराष्ट्राला यादवांच्या उदयापर्यंत वाट पहावी लागली.

■ ■ ■

भा. इ. सं मं त्रैमासिक ६२ : १-४, १९८३-८४

महाराष्ट्राचा इतिहास : बदामी चालुक्य ते यादवकाल

शोभना गोखले
डेक्कन कॉलेज, पुणे

प्राचीन इतिहासाच्या लेखनामध्ये शिलालेख, ताम्रपट आणि नाणी यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. प्राचीन इतिहासाची पुनर्रचना करताना लिखित पुरावे उपलब्ध नसतात. ताम्रपट, शिलालेख आणि नाणी यांच्यामधून साकार होणाऱ्या पुराव्याच्या आधारेच इतिहासाची जुळणी करावी लागते.

गेल्या पंचवीस वर्षांत महाराष्ट्राच्या इतिहासाच्या अभ्यासामध्ये मोलाची भर पडली असेच म्हणावे लागेल. बदामी चालुक्य ते यादवकाळ या जवळजवळ १००० वर्षांच्या कालखंडातील पुष्कळ ताम्रपट आणि नाणी नव्याने उपलब्ध झाली आहेत. इतिहासाच्या अभ्यासाबाबत असे म्हणता येईल की, संशोधनाच्या कक्षा विस्तारल्या आहेत, दृष्टिकोन बदललेला आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या इतिहासाच्या अभ्यासाच्या दिशा बदललेल्या आहेत. या पार्श्वभूमीवर, गेल्या काही वर्षांमध्ये जे ताम्रपट आणि शिलालेख नव्याने उपलब्ध झाले, त्यांचा थोडक्यात आढावा घेतला, तर महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये आणि पर्यायाने भारतीय इतिहासामध्ये मोलाची किती भर पडली हे लक्षात येईल.

ग्रंथ आणि नियतकालिके

भारत इतिहास संशोधक मंडळाचे त्रैमासिक (पुणे), **भारतीय इतिहास आणि संस्कृती** (मुंबई), **'संशोधक'** (धुळे), **नवभारत** (वाई) या नियतकालिकांतून प्राचीन इतिहासावरील लेख वेळोवेळी प्रसिद्ध झाले आहेत. विदर्भ संशोधन मंडळाचे आणि मराठवाडा संशोधन मंडळाचे वार्षिक, या ग्रंथांतून महाराष्ट्रात नव्याने उपलब्ध झालेल्या सामग्रीचा आढावा घेतला गेला आहे. डॉ. वा. वि. मिराशी यांनी **संशोधन मुक्तावलीचे** नऊ सर प्रसिद्ध केले आहेत. **शिलाहार राजवंशाचा इतिहास** हा ग्रंथ १९७४ साली लिहून तत्कालीन राजकीय, आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीचा आढावा उत्कृष्टपणे डॉ. मिराशी यांनी घेतला आहे.

डॉ. श्रीनिवास रित्ती आणि प्रा. शेळके यांनी नांदेड जिल्ह्यातील शिलालेख व ताम्रपट यांची यादी प्रसिद्ध केली. प्रत्येक लेखास प्रस्तावना व त्याची थोडक्यात माहिती प्रस्तुत ग्रंथात दिली आहे. डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी 'प्राचीन मराठी कोरीव लेख' (१९६३) हा ग्रंथ लिहून मोलाची भर घातली आहे. यादववंशाचे साम्राज्य फार मोठे होते. त्याच राजवंशाचे लेख विपुल आहेत. कै. डॉ. मु. ग. पानसे यांचा **यादवकालीन महाराष्ट्र** हा ग्रंथ प्रसिद्ध आहे, तर डॉ. ओ. पी. वर्मा यांचा *Yadavas and their times* (1970), डॉ. नरसिंहमूर्ती यांचा *Sevanas of Devgiri* (1971), व डॉ. श्रीनिवास रित्ती यांचा *The Seavunas* (1973) हे इंग्रजी ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. संशोधनक्षेत्रामध्ये सूचीला अतिशय महत्त्व असते. ही उणीव डॉ. शां. भा. देव यांनी भरून काढली आहे. महाराष्ट्र आणि गोवा यातील सर्व शिलालेख आणि ताम्रपटांची त्यांनी यादी तयार केली आहे. लेखांचे प्राप्तिस्थळ, भाषा, याबरोबर लेखांचा सारांशही त्यामध्ये दिला आहे. महाराष्ट्र शासन ती सूची प्रसिद्ध करीत असून ती आता प्रकाशनाच्या मार्गावर आहे.

नवा दृष्टिकोन

ताम्रशिलाशासनांचे ग्रंथ आणि स्फुटलेख नियतकालिकांतून प्रसिद्ध झाल्यानंतर त्यातून कितीतरी संशोधनाचे विषय निघाले. त्यातील निरनिराळे संवत् अंक, गोत्र, व्यक्तिनामे, ग्रामनामे, सांस्कृतिक भूगोल, भाषा, काव्य इत्यादी वैशिष्ट्ये संशोधकांच्या अभ्यासाचे विषय झाले. ताम्रशिलाशासनातील ग्रामनामांचा आणि व्यक्तिनामांचा अभ्यास करण्याचे मार्गदर्शन प्रथम डॉ. हसमुख धीरजलाल सांकलिया यांनी केले.

नवे साहित्य

गेल्या पंचवीस वर्षांत पुष्कळ नवे साहित्य उपलब्ध झाले आहे. रत्नागिरीजवळ मालवण येथे दोन ताम्रपट सापडले. या ताम्रपटांवरून त्रैकूटक वंशाचे मध्यमसेन आणि विक्रमसेन असे दोन राजे नव्याने माहीत झाले. मध्यमसेनाच्या ताम्रपटात कलचुरीचेदी संवत् – २५६ (इ. स. ५०५) याचा, आणि कलचुरीचेदी संवत् – २८४ (इ. स. ५३३) या संवताचा विक्रमसेनाच्या ताम्रपटात उल्लेख आहे. विक्रमसेनाच्या ताम्रपटात महाडचा **महाकटाहार** असा उल्लेख आहे. महाडचा अभिलेखातील हा सर्वांत प्राचीन उल्लेख म्हणावा लागेल.

बदामी चालुक्य नरेश प्रथम विक्रमादित्य याचा टेंभुर्णी ताम्रपट डॉ. ठोसर आणि प्रा. हिंगमिरे यांनी प्रसिद्ध केला. त्या ताम्रपटात सोलापूर जिल्ह्यातील परांड्याचा **प्रत्यंडक** आणि करंज्याचा **करकिचनगर** असा उल्लेख आहे.

कान्हेरी येथील बौद्धगुंफा

मुंबईजवळ कान्हेरी येथे बौद्धगुंफा आहेत, हे सर्वांना ज्ञात आहे. या ठिकाणी

एक स्मशानगुंफा आहे. या स्मशानगुंफेसमोरील दरीमध्ये जवळजवळ चोवीस स्मृति–शिलालेख डॉ. शोभना गोखले यांनी शोधले. या लेखांची लिपी पाचव्या-सहाव्या शतकातील पोटिकाशीर्षक ब्राह्मी लिपी असून भाषा प्राकृत आहे. या सर्व लेखांमध्ये स्थविरवादी भिक्षूंची नावे आहेत. साची येथे स्थाविरवादी गुरूंची परंपरा होती. पश्चिम महाराष्ट्रात अशा तऱ्हेचा पुरावा प्रथमच मिळत आहे. येथील शैक्षणिक केंद्र राष्ट्रकुटांच्या काळामध्येही अस्तित्वात होते. राष्ट्रकूट राजा प्रथम अमोघवर्ष याचा मांडलिक पुल्लशक्ती याचा कान्हेरी येथे लेख आहे. या लेखात बौद्धविहाराला दिलेल्या देणगीमध्ये काही रक्कम पुस्तके विकत घेण्यासाठी होती. ही गोष्ट कान्हेरी येथील शैक्षणिक परंपरेचा पाठपुरावा करणारी आहे.

राष्ट्रकूटवंश

राजवंशाचा इतिहास

जवखेडा ताम्रपटावरून, इ. स. ८२० च्या सुमारास प्रथम अमोघवर्षाने आपले आसन पुनः स्थिरस्थावर केल्याचे दिसून येते. अंदुरा ताम्रपटात चतुर्थ गोविंदाची पत्नी भागियव्वा हिचा पिता चालुक्य वंशातील भीमरा याची वंशावळ दिली आहे. कंधार येथील शिलालेखात तृतीय कृष्णाची तुडिग आणि काठमे ही उपनावे आली आहेत. अर्धापूर येथील मुहित लेखामध्ये रट्टवंशातील हंसपाल या राजाचा उल्लेख आहे.

राष्ट्रकुटांचा पराक्रम

धारूर ताम्रपटात तृतीय गोविंदाच्या उत्तरेकडील आणि दक्षिणेकडील स्वाऱ्यांचे वर्णन असून गंगराजा मुत्तरसाचा त्याने कसा पराभव केला याचे वर्णन आहे. जांबगाव ताम्रपटामध्ये तृतीय इंद्राच्या पराक्रमाचे वर्णन आहे. बाण राजाचा पराभव, कनोज-वरील स्वारी यांचे संस्कृत भाषेमध्ये अतिशय सुरेख वर्णन आहे. या ताम्रपटात त्यास कीर्तीनारायण, रट्टकंदर्प, राजमार्तंड, गेयचतुर्मुख अशी नामाभिधाने दिली आहेत. अंदुरा ताम्रपटात चतुर्थ गोविंदाची गुप्त सम्राट चंद्रगुप्ताबरोबर तुलना केली आहे.

राष्ट्रकूट राजांनी पराक्रम केल्यानंतर अनेक ताम्रपट दान दिले. त्यांमध्ये संयाण-मंडळातील कोलीमहारविषयाचा उल्लेख विशेष म्हणावा लागेल. कोळी आणि महार जमातींच्या वसाहतीवरून शासनविषय व्हावा, यावरून समुद्रकिनारी या लोकांची फार मोठ्या प्रमाणावर वस्ती असल्याचे दिसून येते. तृतीय इंद्राने समानमंडलावर ताजिक कुंडातील मधुमती सुगतिप या अरब राज्यपालाची नेमणूक केली होती.

कंधार येथील शिलालेखामध्ये राष्ट्रकूट राजांची वंशावळ तर आहेच, परंतु शिला-लेखातील वर्णनावरून तृतीय कृष्णाने कंधार गाव वसविले असावे याची खात्री पटते. त्यामध्ये राजाने 'कंधारपुरवराधीश्वर' अशी पदवी घेतली आहे. राजवाड्यामध्ये राजाचे गुणवर्णन करण्यासाठी नंदिजनांची नेमणूक करून त्यांना वर्षाला दोन वस्त्रे आणि

शंभर द्रम्मांची नेमणूक दिली. पवित्र वेदांचे पठण दिवसातून चार वेळा करण्यासाठी ब्राह्मणांची नेमणूक केली. लोकांना बाहेरगावाहून आल्यावर उतरण्यासाठी विश्रांतिगृह बांधून त्यास ' सर्वलोकाश्रय मंडप ' हे नाव दिले. विद्यास्थान बांधले. त्यामध्ये जवळ-जवळ ६०-७० विद्यार्थ्यांची सोय केली.

राष्ट्रकुटांची नाणी अद्याप सापडली नाहीत. परंतु चिंचणी ताम्रपटात (एपि. इंडि. ३२, पृ. ५७) गंभूरक या श्रेष्ठीला नाणी पाडण्याची परवानगी होती असा उल्लेख आहे. राजांनी ताम्रपट दान दिल्यानंतर ते दान घेणाऱ्या ब्राह्मणांना विशेष अधिकार दिले होते. त्यांमध्ये आलीपक हा उल्लेख आहे. भूगर्भातील धातूचा हा उल्लेख आहे. भूगर्भातील धातचाही मालकी हक्क ज्यास भूमिदान मिळाले असेल त्यास प्राप्त होतो. अशा तऱ्हेचा उल्लेख ताम्रपटात प्रथमच आला आहे. आणखी एका विशेष हक्काचा चिंचणी ताम्रपटात उल्लेख आहे. तो म्हणजे, कुमारी-साहस-दोष. कुमारिकेचा कोणी विनयभंग केला तर त्यास शासन करण्याचा अधिकार त्या क्षेत्राचे ज्या ब्राह्मणास दान मिळाले असेल त्यास प्राप्त होत असे.

धार्मिक परिस्थिती

राष्ट्रकूट राजांनी सर्व धर्मपंथांना चांगली वागणूक दिली, याबद्दलचे कितीतरी पुरावे उपलब्ध आहेत. शिव, महालक्ष्मी, विष्णू ही तर त्यांची दैवते होती. परंतु जैनधर्मालाही त्यांनी आश्रय दिला ही गोष्ट वाजिरखेडा ताम्रपटावरून कळते. या ताम्र-पटात सुरुवातीस जिनाला नमस्कार असून ताम्रपटात जन बसदीला दान दिले आहे. त्या बसदीचे नाव ' अमोघ ' असे आहे. याशिवाय ताम्रपटामध्ये द्रविडसंघ आणि वीरगणाचा उल्लेख आहे. कंधार येथील शिलालेखामध्ये छल्लेश्वर, बंकेश्वर, कृष्णेश्वर, गोज्जिगसोमनाथ इत्यादी देवळांचा केवळ नामोल्लेख नाही, तर राजाने पंचोपचार पूजेसाठी पाचशे द्रम्म दिल्याचा उल्लेख आहे. याशिवाय क्षेत्रपाळ कामदेव आणि कालप्रियनाथाच्या देवळांचा उल्लेख आहे. काझिन्स यांच्या मते राष्ट्रकूट राजांनी शैलमंदिरे बांधली, वास्तुमंदिरे नाहीत. परंतु कंधार येथील शिलालेखामध्ये अनेक वास्तुमंदिरांचा उल्लेख आहे. विशेष म्हणजे कामदेवाच्या देवळाचा महाराष्ट्रातील हा सर्वांत प्राचीन उल्लेख म्हणावा लागेल.

राष्ट्रकुटांच्या ताम्रपटांमध्ये तुलापुरुषदान, हिरण्यगर्भदान, राज्याभिषेक, पट्टबंध समारंभ यांचे उल्लेख आहेत. विशेष उल्लेख म्हणजे, ' उभयमुखीदान '. गाय प्रसूत होत असताना दिलेल्या दानास उभयमुखीदान असे म्हणतात. भागियव्वा या राणीच्या पुण्याभिवद्धीसाठी हे दान दिले. याशिवाय तृतीय कृष्ण या राजाने कंधार या गावात पाच ठिकाणी शेकोटया आणि पाणपोया बांधल्याचे उल्लेख आहेत.

वास्तुशिल्प

राष्ट्रकुटांच्या वेळी महाराष्ट्रात भरभराटीचा काळ होता, हे अनेकविध पुराव्या-

वरून दिसून येते. कंधार येथील शिलालेखामध्ये राजगृहाचा उल्लेख असून त्यास मध्यभागी गणेश असलेले प्रवेशद्वार होते. त्याच्या बाजूस यक्ष होते. दाराला मकर-तोरण होते. राजाने सर्व लोकांना राहता येईल असे विश्रान्तिस्थान बांधले. त्यास 'सर्वलोकाश्रय मंडप' असे नाव दिले. शिवमंदिरांना पंचोपचारपूजेसाठी पाचशे द्रम्मांचे वर्षासन दिले. पाणपोया, शेकोट्या बांधल्या. 'जगत्तुंग' नावाचा तलाव बांधला. गजबजलेल्या बाजारात आणि गुजराती व्यापारी आळीमध्ये गुरांना पाणी आणि चारा यांची सोय केली. याशिवाय लेखामध्ये राजाच्या मुख्य गणिकेच्या वाड्याचा उल्लेख आहे. तो वाडा कामदेवाच्या देवळाजवळ होता.

चिंचणी ताम्रपटात (एपि. इंडि. ३२, पृ. ५८) मठाचा उल्लेख आहे. मठ शिक्षण-केंद्र असे. कंधार ताम्रपटात विद्यास्थानाचा उल्लेख असून विद्यार्थ्यांना लागणाऱ्या तेल आणि मिठाच्या तरतुदीसाठी लागणाऱ्या खोल्यांचा उल्लेख आहे. राजगृह, बाजार, गुजरआळी, विद्यास्थान, प्रधानराजविलासिनीपाटक इत्यादी वर्णना-वरून आणि 'कंधारपुरवराधीश्वर' या तृतीय कृष्णाच्या नावावरून कंधार ही राजाची कदाचित दुय्यम राजधानी असावी आणि त्या राजधानीची बांधणी योजनापूर्वक केली असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सांस्कृतिक इतिहास

राष्ट्रकुटांचे नवे ताम्रपट मिळाल्यामुळे त्या काळातील सांस्कृतिक इतिहासाचे अनेक नवे पुरावे उपलब्ध झाले आहेत.

चिंचणी ताम्रपटावरून, तृतीय इंद्राने मधुमती सुगातिप या अरब राज्यपालाची संजाणमंडलावर नेमणूक केली होती हे दिसते. तृतीय कृष्णाच्या चिंचणी ताम्रपटावरून, राजस्थानमधील भिनमाल येथील व्यापाऱ्यांनी भिनमालदेवाची स्थापना केली. कंधारला गुजराती व्यापाऱ्यांची वस्ती होती.

कंधार येथील शिलालेखामध्ये कालप्रियनाथाचा उल्लेख तर आहेच, परंतु त्या कालप्रियनाथाच्या प्रचंड मूर्तीचे अवशेषही कंधारला सापडले आहेत. तृतीय इंद्र या राजाने महोदयावर स्वाऱ्या केल्याची वर्णने आहेत. या स्वाऱ्यांमध्ये काल्पी येथील कालप्रियनाथाच्या देवळाजवळ सैन्याचा तळ होता असा उल्लेख आहे. या देवळामध्ये पूर्वी भवभूतीची नाटके होत असत. प्रतिहारावर स्वारी केली असता तृतीय इंद्रास कालप्रियनाथाबद्दल इतकी भक्ती वाटू लागली की त्याने आपल्या राज्यात आल्यावर कालप्रियनाथाची स्थापना केली. या मूर्तीच्या अवशेषांवरून ही मूर्ती ५० ते ६० फूट उंच असावी असे दिसते.

भाषा

तृतीय इंद्र याच्या जांबगाव ताम्रपटाची (एपि. इंडि. ३६, पृ. २५७) भाषा अभिजात संस्कृत असून ताम्रपटाचा लेखक त्रिविक्रमभट्ट आहे. या ताम्रपटात श्लेष

आहेत. **नलचंपूचा** लेखक त्रिविक्रमभट्टच होता. कदाचित् याच त्रिविक्रमाने ताम्रपटातील मजकुराची रचना केली असेल. तीच गोष्ट वाजिरखेडा ताम्रपटाची. त्या ताम्रपटाचा रचयिता राजशेखर आहे. काव्यमीमांसाकार राजशेखर आणि ताम्रपटाचा रचयिता राजशेखर दोन्ही एकच असल्याची शक्यता नाकारता येत नाही. शिलाहार राजांचे आणि यादवकाळातील शिलालेखांचे आणि ताम्रपटांचे परिशीलन म. म. मिराशी आणि कै. डॉ. पानसे यांनी आपल्या ग्रंथांत केले आहे.

या काळातील पंढरपूरच्या दोन लेखांचा परामर्श घेणार आहे. पंढरपूर आणि महाराष्ट्र संस्कृती यांचे नाते अतूट आहे. महाराष्ट्राच्या संस्कृतीचा घाट ठरविण्यात विठ्ठल आणि विठ्ठलभक्तिसंप्रदाय यांचा वाटा फार मोठा आहे.

पंढरपूरच्या देवळातील सोळखांबी मंडपामध्ये तुळईवर लेख आहे. देवनागरी लिपीमध्ये आणि कानडी व संस्कृत भाषांमध्ये हा लेख आहे. यामध्ये शके ११५९ दुर्मुखी संवत्सर पुष्य वहुल एकादशी उत्तरायण संक्रांती असा काळाचा उल्लेख आहे. भीमरथीतीरावरील पंडरंगे नावाच्या महाग्रामातील श्रीविठ्ठलास अंगभोग रंगभोगासाठी आसंदिनाड या अग्रहारातील हिरियगराजे हे गाव होयसळ राजा सोमेश्वर याने दान दिल्याचा उल्लेख प्रस्तुत लेखात आहे. यावरून पंढरपूरच्या विठ्ठलाशी होयसळ राजवंशाचे फार घनिष्ट संबंध होते, ही गोष्ट स्पष्ट होते. शके ११५९ (इ. स. १२३७) मध्ये पंढरपूर विभागावर यादवांची अधिसत्ता होती ही गोष्ट निर्विवाद आहे. होयसळ राजा सोमेश्वर हा इ. स. १२३६ मध्ये गादीवर आला. दक्षिणेकडे त्याने आपले बस्तान बसविल्यावर आपले वडील, पितामह यांच्या नावाने विठ्ठलमूर्तींची अनेक ठिकाणी प्रतिष्ठापना केली. या राजाचा पूर्वज विष्णवर्धन हा पराक्रमी राजा होता. या राजाने आपल्या राज्याची सीमा भीमरथीनदीपर्यंत पोहोचविली होती. विष्णुवर्धन हा प्रथम जैन होता. नंतर तो रामानुजांचा शिष्य बनला आणि विष्णुभक्त झाला. त्याचे नावही शिलालेखातून बिट्टी असे आढळते. पंढरपूरचे देऊळ भीमेच्या उजव्या तीरावर आहे. होयसळ राजा विष्णुवर्धनाने बेलूरचे चेन्नकेशवाचे मंदिर बांधले. पंढरपुरास होयसळ काळातील मंदिराचे काही अवशेष शिल्लक आहेत. पंढरपूरची ही पूर्वपीठिका असल्यामुळे होयसळ राजा सोमेश्वर याने पंढरपूरच्या विठ्ठलास आपल्या राज्यातील गाव दान दिले. पूर्वीच्या काळी दुसऱ्याच्या राज्यामध्ये देवास दाने देण्यास काहीच प्रत्यवाय नसे.

या लेखाच्या काही भागाचे वाचन प्रा. ग. ह. खरे यांनी आपल्या **श्रीविठ्ठल आणि पंढरपूर** (१९६३) या पुस्तकात दिले आहे. कै. डॉ. भांडारकर, काझिन्स आणि डॉ. कृष्ण यांनी हा लेख वाचण्याचा थोडाफार प्रयत्न केला होता. या शिलालेखाच्या मध्यभागी होयसळ राजवंशाची वंशावळ दिली आहे. त्यामध्ये काही ओळी शार्दूलविक्रीडित या वृत्तामध्ये आहेत. त्यामध्ये एरयंग बल्लाळ बिट्टीदेव या राजाचे उल्लेख आढळतात. याशिवाय सोमेश्वरदेव, काडनराय, पद्मलादेवी असे उल्लेख

आहेत. या मजकुरामध्ये ' विठ्ठलमुखदर्शनी ', ' पताकापट ', ' देवमंदिरमुख ' हे महत्त्वाचे शब्द आले आहेत.

शिलालेखातील पूर्वभागातील बराचसा मजकूर वाचता येण्यासारखा आहे. अंग-भोग रंगभोगासाठी आसंदिनाड हे गाव दान दिल्याचा उल्लेख त्यामध्ये आहेच. परंतु याशिवाय नंदादीप, धूप, अर्घ्य, आरती यासाठी गद्याणांची दाने दिल्याचा उल्लेख आहे. देवासाठी दूध, शेवया, दही, खीर, मांडे, कणिक, हिंग, वेलदोडे, लवंगा दान दिल्याचे उल्लेख आहेत. महानैवेद्यासाठी १०० गद्याण दिल्याचा उल्लेख असून वारी-साठी १३ गद्याण दिले आहेत.

पंढरपूर आणि विठ्ठलमंदिर यांच्या संदर्भामध्ये प्रस्तुत लेख सर्वात प्राचीन असल्यामुळे तो अतिशय महत्त्वाचा आहे. या लेखातील पूर्वभागातील मजकूर कानडी व उर्वरित मजकूर संस्कृतात असल्यामुळे कर्नाटक व महाराष्ट्र या देशांतील लोकांना तो लेख सहजी वाचता यावा ही गोष्ट अपेक्षित असल्याचे दिसून येते. पूर्वभागातील मजकुरात विठ्ठलास जी निरनिराळी दाने दिली आहेत त्यांमध्ये बहुतेक सर्व नावे कानडी आहेत. या मजकुरात ' वारी ' चा उल्लेख आहे. पंढरपूरच्या वारीचा हा सर्वात प्राचीन उल्लेख म्हणावा लागेल.

दुसरा महत्त्वाचा शिलालेख महाद्वारासमोरील रस्त्यावर, कोपऱ्यावर पोलीसचौकी आहे, त्या वास्तूत आहे. पंढरपूरच्या देवळाचा इतिहास जाणून घेण्यात या लेखाची फारशी मदत होत नसली तरी हा लेख इतर अनेक दृष्ट्या महत्त्वाचा आहे.

या लेखात यादव राजा महादेव याचा उल्लेख असून, शक वर्ष ११९२, प्रमोद संवत्सर, ज्येष्ठ शु. एकादशी म्हणजे १५ जून १२७० असा कालोल्लेख आहे.

प्रस्तुत लेखामध्ये यादव राजा महादेव याचा मांडलिक भानू याचा उल्लेख आहे. महादेवाच्या कारकिर्दीतील हा शेवटचा लेख असावा. महादेवराजाला ' प्रौढप्रताप-चक्रवर्ती ' हे बिरुद आहे. या शिलालेखामध्ये पंढरपूरचा ' पांडुरंगपूर ' असा उल्लेख आहे. या भानू मांडलिकाने ' अप्तोर्याम ' यज्ञ केल्याचा उल्लेख आहे. पंढरपूर येथे अप्तोर्याम यज्ञ झाल्याचा उल्लेख विशेष म्हणावा लागेल. राजसूय किंवा अश्वमेध यज्ञां-प्रमाणे त्याचे खास वैशिष्ट्य नाही. परंतु हा यज्ञ नदीच्या काठी करतात. यज्ञस्थंडिल आणि नदी यांच्यामध्ये फारसे अंतर नसते. या दोन्हीमधून रथ किंवा गाडी जाता कामा नये असा संकेत आहे. हा यज्ञ वसंतऋतूमध्ये करावा आणि त्यासाठी यज्ञमंडप उभारावा असा दंडक असल्यामुळे अप्तोर्याम यज्ञ विठ्ठलमंदिर आणि भीमरथी नदी यांच्यामध्ये झाला, तो प्रत्यक्ष विठ्ठलमंदिरात झाला नाही, ही गोष्ट स्पष्ट होते. हा अप्तोर्याम यज्ञ एकादशीच्या दिवशी झाला. एकादशी हा विष्णूचा दिवस आणि त्या दिवशी यज्ञसमारंभ होणे ही गोष्ट विशेषच समजली पाहिजे. ही एकादशी ज्येष्ठ शुक्ल पक्षातील निर्जला एकादशी होती. या दिवशी यज्ञसमारंभ करण्यात एक विशेष औचित्य साधले आहे. पंढरपूर हे वारकरी संप्रदायाचे पीठ होते. त्या ठिकाणी एकादशीच्या दिवशी यज्ञसमारंभ

केल्यामुळे भक्तिसंप्रदाय व सनातनधर्म या दोन धर्मविषयक विचारप्रवाहांची एकवाक्यता झालेली दिसते. एकादशीस अशा तऱ्हेने पर्वकालाचे माहात्म्य प्राप्त झाले होते.

यादवकाळामध्ये भक्तिसंप्रदायाला उधाण आले होते हे जरी खरे असले तरी अन्य संप्रदायांचेही उल्लेख पुष्कळ सापडतात. प्रकाशे येथील सिंघणाच्या शके ११५६ च्या लेखामध्ये (एपि. इंडि., पृ. १९) सूर्यमंदिराच्या स्थापनेचा उल्लेख आहे.

काही करांचाही उल्लेख विशेष आहे. उदा. महादेव राजाचा कोळेगाव येथील ताम्रपट प्रौढप्रतापचक्रवर्ती महादेव याच्या राज्याभिषेकाच्या वेळी दिलेल्या दानांसंबंधी आहे. त्यामध्ये जवळजवळ बावन्न ब्राह्मणांची नावे आहेत. त्यांना ज्या करवसुलीची परवानगी दिली होती, त्यामध्ये ' कारुक ', म्हणजे कारागिरांना लागू असलेला कर, ' मौलिक ' म्हणजे डोक्यावरून आणलेल्या वस्तूंवरील कर हे आहेत. हे कर वसूल करण्याची परवानगी, ज्या ब्राह्मणांनी दान घेतले होते, त्यांना देण्यात आली होती.

बदामी चालुक्य ते यादवकाळ या काळामधील कोरीव लेखांचे पुष्कळ साहित्य प्रकाशित झाले आहे. त्या सर्वांचा तपशीलवार इतिहास सांगणे सोपे नाही. परंतु राष्ट्रकूट काळातील साहित्य अधिक विखुरलेले आहे. यादवकालातील साहित्य कै. मु. ग. पानसे यांनी एकत्रित आणले आहे. शिलाहारांचे साहित्य डॉ. मिराशी यांनी एकत्रित आणले आहे. कै. डॉ. अळतेकर यांचे ' राष्ट्रकूटाज् अँड देअर टाइम्स ' हे पुस्तक १९४२ साली प्रसिद्ध झाल्यानंतर राष्ट्रकुटांच्या साहित्याची फारशी दखल घेतली गेली नसल्यामुळे प्रस्तुत लेखामध्ये राष्ट्रकुटांच्या लेखांचा तपशीलवार परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातील विशेष म्हणजे आतापर्यंत संशोधकांचा असा समज होता की, राष्ट्रकूट राजांनी शैलमंदिरे बांधली, वास्तुमंदिरे बांधली नाहीत. राष्ट्रकुटांच्या मान्यखेट या राजधानीचा अजून नेमका आढळ झालेला नाही. कंधारच्या शिलालेखामुळे कंधार ही दुय्यम दर्जाची राजधानी होती ही गोष्ट स्पष्ट झाली. वास्तुमंदिरांचेही या लेखामध्ये पुरावे सापडले. पंढरपूरच्या लेखावरून यादवकालीन भक्तिसंप्रदायावर अधिक प्रकाश पडला आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे कान्हेरी येथे शिलास्मारकपट्टिका सापडल्या. अशा तऱ्हेचा पुरावा पश्चिम महाराष्ट्राच्या लेण्यांमध्ये प्रथमच मिळाला आहे (जर्नल ऑफ एपिग्राफिकल सोसायटी, १९७८, पृ. १०).

नाणी

बदामी चालुक्य ते यादवकाल या कालखंडामध्ये आतापावेतो यादवराजांची सुवर्णाची पद्मटंक नाणी सापडली होती. परंतु आता चतुर्थ भिल्लम आणि सिंघणदेवाची चांदीची नाणी सापडली आहेत. या नाण्यांच्या सुलट बाजूस डाव्या बाजूस पाहात असलेल्या आणि एक पंजा वर उचललेल्या सिंहाचे सुबक चित्र आहे. मागील बाजूस देवनागरी लिपीमध्ये राजाचे नाव आहे. सिंघणदेवाच्या नाण्यावर पृष्ठमात्रा आढळून येते. ही नाणी डॉ. आनंद केळकर, पुणे यांच्या संग्रहात आहेत.

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६२ : १-४, १९८३-८४

जुन्नर परिसरातील संशोधन

सु. व. जाधव
पुणे

जुन्नर (उत्तर अक्षांश १९°-१२' आणि पूर्व रेखांश ७३°-५३') पुण्याच्या वायव्येस ९० किलोमीटरवर आहे आणि त्याच दिशेस पुढे २७·२ कि. मी.वर नाणेघाट वसलेला आहे. प्राचीन काळी पश्चिम आशियातून येणारा व्यापारी माल मुंबईच्या उत्तरेस असलेल्या भडोच (भरुकच्छ), सोपारा (शूर्पारक), तसेच दक्षिणेकडील कल्याण व चेऊल (चौल) या बंदरांत येत असे. या बंदरांपैकी सोपारा येथे येणाऱ्या व्यापारी मालाची वाहतूक विशेषेकरून नाणेघाट खिंडीमार्गे देशावर होत असे. सोपारा व कल्याण येथून देशावर येण्यास नाणेघाट हा अगदी जवळचा मार्ग होता. नाणेघाटापासून पुढे हा मार्ग देशावर जुन्नर–नेवासा–पैठण–नगर असा जातो. त्यामुळे नाणेघाट तळकोकण व देश यांस जोडणारा दुवा आहे. अशा या मोक्याच्या जागी इ. स. पूर्व पहिल्या शतकातील सातवाहन राजांच्या भग्न झालेल्या मूर्तींचे अवशेष व त्यांवरील त्यांची नांवे आढळतात. तसेच सातवाहन राणी नागनिका हिने केलेल्या वैदिक यज्ञांचा व दानांचा प्रदीर्घ शिलालेख दोन भिंतींवर कोरून ठेवला आहे. हा प्रदीर्घ शिलालेख बराचसा तुटला आहे. तरीसुद्धा सध्याच्या स्थितीत, त्यांतील महत्त्वाच्या मजकुरावरून तत्कालीन सामाजिक, आर्थिक व राजकीय जीवनावर बराच प्रकाश पडतो.

जुन्नर–नाणघाट या २५–३० किलोमीटरच्या परिसरास अनेक डोंगरांच्या रांगांनी वेढलेले आहे. या परिसरातून मीना, कुकडी आणि पुष्पावती या नद्यांचा उगम होतो. नाणेघाटाच्या उत्तरेस हरिश्चंद्रगड, माळसेज घाट, तसेच नाणेघाट ते जुन्नरमधील प्रदेशांत जीवधन, हडसर, चावंड व शिवनेरी असे अभेद्य किल्ले आहेत. रशियन प्रवासी निकितीन (इ. स. १४७०), महमंद कासीम फिरिश्ता (इ. स. १५८९–१६११), आणि इंग्रज वैद्य डॉ. जॉन फ्रायर (इ. स. १६७२–१६८१) यांच्या लिखाणातून तत्कालीन जुन्नरविषयीची बरीच माहिती मिळते. शिवनेरी किल्ल्यावर छत्रपती श्रीशिवाजीमहाराज यांचा जन्म, तसेच लेण्याद्रि (अष्टविनायक गणेशाचे तीर्थस्थान) या गोष्टी आता नित्य परिचयाच्या झाल्या आहेत. या लेखात जुन्नर परिसरातील प्राचीन वस्तु आणि वास्तु यांची थोडक्यात माहिती दिलेली आहे.

प्रस्तुत लेखक जुन्नर येथील प्राचीन हीनयानपंथीय बौद्ध लेणी व त्यांतील शिलालेखांचा अभ्यास करीत असताना त्यास तेथील शिवनेरी गटातील दोन शिलालेख अत्यंत महत्त्वाचे वाटले. या शिलालेखांचा आशय असा आहे : अपगुरीय नावाचा एक संघ (?), यांतील कुटुंबप्रमुख सवगिरीय याचा मुलगा पतीवधक गिरिभूती सखुयारू व त्याची पत्नी (म्हणजे गिरिभूतीची) सिवपालितनिका यांनी दोन लेणी व दोन पोढीस (पाण्याचे कुंड) दान दिले. तसेच त्यांनी गावातील धर्मोत्तरीय पंथाच्या भिक्षुणी संघास .... काही कार्षापणांची कायम ठेव दिली. पुढील खंडित अक्षरावरून असे वाटते की, या भिक्षुणी संघाची प्रमुख सिवपालितनिका ही होती.

जुन्नर लेण्यांतील इतर सर्वच लेख महत्त्वाचे आहेत. त्यांचा थोडक्यांत उल्लेख पुढे केला आहे. वरील शिलालेखातील महत्त्वाचा भाग म्हणजे, 'गावातील धर्मोत्तरीय पंथाचा भिक्षुणी संघ' हा होय. हा भिक्षुणी संघ गावात नेमका कोणत्या ठिकाणी होता हे सांगणे अवघड आहे. प्राचीन काळच्या इमारती लाकूड आणि विटांत बांधीत असत आणि हे सर्व अवशेष भग्न स्वरूपात 'टेकाडे', 'पांढरी' किंवा 'गढी' या स्वरूपात मिळतात. वरील लेखाच्या आधारे जुन्नर परिसरातील तीन नद्या– मीना, कुकडी व पुष्पावती–यांच्या काठांवरील गावांची पाहणी (exploration) मी केली. त्यांत जुन्नरच्या उत्तरेस सुमारे १३ किलोमीटर अंतरावर पुष्पावती नदीच्या किनारी उदापूर येथे एक 'पांढरी' किंवा प्राचीन अवशेषांची गढी मिळाली. जुन्नरच्या दक्षिणेस वाहणाऱ्या मीना नदीच्या किनारी कुसुर व निरगुडे या गांवी काही टेकाडे आहेत. जुन्नर गावाला लागून वाहणाऱ्या कुकडी नदीच्या किनारी माणिकडोह, पाडळी वगैरे भागांत काही अवशेष मिळाले. विशेषतः जुन्नर गांवातील माळीवाडा, आगर तसेच जुन्या एस्. टी. स्टॅण्डच्या परिसरात भरपूर प्रमाणांत प्राचीन काळच्या वस्त्यांचे अवशेष आजही दिसतात. त्यात सातवाहनकालीन पाटे–वरवंटे, रुंद आकाराच्या विटा, खापरे, सुपारीच्या आकाराचे भाजक्या मातीचे मणी, एक किंवा दोन भोके असलेली छपरांची कौले वगैरे वस्तू मिळाल्या. आगर भागातील एक टेकाड खाजगी मालकीचे आहे. तेथे राहणाऱ्या गृहस्थाने आपल्या घराच्या बांधकामात आधुनिक विटा व दगड यांच्या वापराबरोबर सातवाहनकालीन विटांचाही वापर केला आहे.

माझ्या वरील निरीक्षणावरून किंवा पाहणीवरून मला असे म्हणावयाचे नाही की, मी अगोदर सांगितलेल्या शिलालेखानुसार 'गावांतील भिक्षुणी संघाचे ठिकाण' शोधून काढले. त्यावर उत्खनन केल्यासच प्रकाश पडू शकेल. परंतु एक गोष्ट निश्चित की, जुन्नर परिसरातील असंख्य लेण्यांत जे शेकडो बुद्ध भिक्षु निवास (वर्षावास) करीत असतील, त्यांच्या भिक्षेसाठी, निर्वाहासाठी आश्रय देणाऱ्या लोकांच्या वस्त्या (early historic habitational sites) या प्राचीन परिसरांत ठिकठिकाणी दिसून येतात. म्हणून या प्राचीन अवशेषांचे विशेष महत्त्व आहे.

गावात स्थानिक लोकांना अनेक वेळा शिसे, तांबे व चांदीची नाणी मिळतात. ती बहुतेक भंगारामध्ये तांबट व सोनारांकडे जातात. सोनार ती वितळवतात.

इ. १८४६ साली जुन्नरच्या पूर्वेस शिरोली येथे सौराष्ट्र क्षत्रपांची ४०० नाणी सापडली. त्यांवर रेव्हरंड जॉन स्टीव्हन्सन याने ' जर्नल ऑफ बॉम्बे ब्रँच ऑफ रॉयल एशियाटिक ' मध्ये अपूर्ण माहितीचा निबंध लिहिला. पुढे या नाण्यांचे काय झाले याचा कोठेही उल्लेख सापडत नाही. १२ मार्च, १९०८ रोजी जुन्नरजवळील आगर येथे अकबराची ४४ नाणी मिळाली.

१९६९ साली गणेश लेण्याच्या पूर्वेस बल्लाळवाडीजवळ ॲलाबॅस्टर दगडांत इरॉस या ग्रीक देवतेचे अंडाकृती लहानसे शिल्प मिळाले. हे शिल्प यवनांचा म्हणजे ग्रीकांचा जुन्नरशी तत्कालीन संपर्क दर्शविते.

आणखी एक महत्त्वाचा शोध म्हणजे, प्रसिद्ध नाणकशास्त्रज्ञ कै. पा. ज. चिन्मुळगुंद यांना इ. १९७६ साली जुन्नर गावी एका शेतकऱ्याकडून चांदीचे एक नाणे मिळाले. त्यावर ब्राह्मी लिपीत ' नायनिका ' (नागनिका) व तिचा पती ' सिरि-सातकनी ' (श्रीसातकर्णी) असा अुल्लेख आहे. या दोघांची नांवे नाणेघाटातील शिलालेखात आढळतात.

प्रस्तुत लेखकास इ. १९७८ साली जुन्नर येथील खाजगी संग्रहातून शिशाचे एक अत्यंत महत्त्वाचे नाणे मिळाले. त्यावर एका बाजूस सिंह आणि यूप (वैदिक यज्ञस्तंभ) व ब्राह्मी लिपीत ' वासिठिपुतस ' (वाशिष्ठीपुत्रस्य), आणि दुसऱ्या बाजूस बोधिवृक्ष, धनुष्यबाण व ब्राह्मी लिपीत ' महाखतपस ' (महाक्षत्रपस्य) अशी अक्षरे आहेत. याचा अर्थ, नाण्याच्या एका बाजूस सातवाहन वंशातील एक राजा, तर दुसऱ्या बाजूस महाक्षत्रप ही बिरुदावली. दुर्दैवाने या महाक्षत्रपाचे नांव दिलेले नाही. नाशिक येथील लेण्यातील शिलालेखानुसार, गौतमीपुत्र सातकर्णी याने महाक्षत्रप नहपान याचा पराभव केला. गौतमीपुत्रानंतर वाशिष्ठीपुत्र गादीवर आला. इसवी सनाच्या पहिल्या व दुसऱ्या शतकांत क्षत्रपांचा जुन्नर-नाशिक-कार्ले या प्रदेशांशी संबंध आला होता, हे तेथील शिलालेखांवरून आपणास दिसून येते. क्षत्रप व सातवाहन राजे यांचे एकमेकांशी वैर होते. परंतु वरील नाण्यांत दोन्ही नांवे एकत्र आलेली दिसतात. त्यांचा मेळ बसविणे कठीण आहे. या बाबतीत दोन शिलालेख थोडासा प्रकाश पाडू शकतात. सौराष्ट्रातील गिरनार येथे महाक्षत्रप रुद्रदामन् याचा एक प्रदीर्घ शिलालेख आहे. त्यात त्याने सातवाहन राजाचा दोनदा पराभव केल्याचा व त्याचा अपरांत प्रदेश जिंकल्याचा उल्लेख आहे. परंतु त्याचा या सातवाहन राजाशी रोटीबेटी संबंध जुळल्यामुळे त्याचा घेतलेला काही प्रदेश त्याने (रुद्रदामनने) परत केला, असेही तो म्हणतो. तसेच मुंबईजवळील कान्हेरी येथील एका खंडित शिलालेखात एक सातवाहन राणी आपण रु........ (म्हणजे रुद्रदामन्) याची कन्या असल्याचे सांगते. या दोन्ही लेखांवरून मी असे अनुमान काढले की, कदाचित् महाक्षत्रप रुद्रदामन् याने

वरील घटना घडल्यानंतर व एकमेकांचे संबंध जुळल्यानंतर त्या स्मरणार्थ हे नाणे पाडले असावे.

अलीकडेच एप्रिल १९८३ च्या पहिल्या आठवड्यांत प्रस्तुत लेखकास आणखी दोन क्षत्रप राजांची चांदीची नाणी खाजगी संग्रहात मिळाली. त्यातील पहिले, इतर अनेक ठिकाणी (उदा. महाराष्ट्रातील रांजणगांव, राजस्थानमधील सर्वानिया वगैरे) मिळालेले ' महाक्षत्रप भर्तृदामन याचा पुत्र क्षत्रप विश्वसेन ' याचे शके २२० (इ. स. २९८) ही तारीख असलेले आहे. त्यावर दर्शनी बाजूस राजाचा मुखवटाही (bust) आहे. दुसरे नाणे नाणकशास्त्राच्या दृष्टीने कदाचित् अत्यंत महत्त्वाचे ठरण्याची शक्यता आहे. त्यावर वरील बाजूस (obverse) राजाचा मुखवटा (portrait) व त्यापुढे ग्रीक भाषेतील अक्षरे दिसतात (ornamental Greek script which does not give any meaning). नाण्याच्या दुसऱ्या बाजूस मध्यभागी ' चैत्य ' चिन्ह (symbol) व सभोवताली ' महाराज महाक्षत्रप स्वामी सिंहसेन याचा पुत्र महाक्षत्रप रुद्रसेन ' असा ब्राह्मी लिपीत व संस्कृत भाषेत उल्लेख आहे. क्षत्रपांच्या अखेरच्या काळांतील वरील क्षत्रप रुद्रसेन हा ४ था आहे. या नाण्या-तील महत्त्वाची गोष्ट म्हणजे, त्यावरील ' महाराज ' ही बिरुदावली होय. आतापर्यंत संपूर्ण भारतात क्षत्रपांची ' महाराज ' बिरुदावली असलेली फक्त दोनच नाणी मिळाली आहेत. गेल्या शतकात सर अलेक्झांडर कनिंगहॅम यास राजस्थानमध्ये एक व त्याच काळांत कर्नल जे. बिडुल्फ यास गुजरातमध्ये एक नाणे मिळाले. या दोन्ही नाण्यांवरील लेखांनुसार ती एकाच राजाची म्हणजे, ' राज्ञो महाक्षत्रप स्वामी सिंहसेन याच्या बहिणीचा मुलगा महाराज क्षत्रप स्वामी रुद्रसेन ' याची होत. याचा काळ सुमारे इ. स. ३८२ ते ३८४ असा धरला जातो. जुन्नरच्या नाण्याशी वरील दोन नाण्यांची तुलना केली असता असे दिसून येते की हे दोघे पितापुत्र होत नि दोघांनीही आपल्या नांवांमागे ' महाराज ' ही बिरुदावली लावली होती. तत्कालीन त्रैकूटक व गुप्तवंशीय राजांच्या नाण्यांवर ' महाराज ' हे शब्द येतात. यावरून असे वाटते की, वरील दोन राजवटींचा प्रभाव अखेरच्या क्षत्रप राजावर पडला असावा व यामुळे त्यांच्या नाण्यावर ' महाराज ' ही बिरुदावली आली असावी. यास्तव मला जे जुन्नरचे नवीन नाणे मिळाले ते नाणकशास्त्रात महत्त्वाची भर घालेल असे वाटते.

जुन्नर परिसरातील डोंगरात एकूण किती लेणी आहेत याचे पूर्वीच्या संशोधकांनी वेगवेगळे आकडे दिले आहेत. जुन्नर लेण्यांचा अभ्यास करीत असतांना मी प्रत्येक पूर्ण अपूर्ण लेण्याचे मोजमाप घेतले, तसेच त्याचे आलेख आणि छायाचित्रे काढली. लेणीसमूहांची गट-विभागणी केली. त्यात एकूण ९ गटसमूह आहेत ते असे : १. तुळजा लेणी, २. गणेश लेणी, ३. गणेश लेण्यांच्या पूर्वेकडील एकांगी गट, मानमोडी डोंगरातील तीन गट, ४. भीमाशंकर, ५. अंबा-अंबिका, ६. भूतलेणी तसेच शिवनेरी किल्ल्याभोवतीचे तीन गट, ७. शिवनेरी पूर्व, ८. शिवनेरी दक्षिण आणि ९. शिवनेरी

पश्चिम. या सर्व गटांत मिळून एकूण २०९ लेणी कोरली गेली. त्यांतील बरीचशी लेणी अपूर्ण आहेत. त्यांत वेगवेगळ्या आकारांची एकूण १० चैत्यगृहे, तसेच बाकीचे विहार व सामान्य खोल्या वगैरेंचा समावेश होतो. या लेण्यांच्या आसपास दगडांत एकूण ११५ पाण्याची कुंडे (Cisterns) खोदली गेली. तसेच या संपूर्ण लेणीसमूहात मिळून एकूण ३६ शिलालेख ब्राह्मी लिपीत सुबक अक्षरात कोरले गेले. या शिलालेखांत दानकर्त्याचे नाव, त्याचे गाव, हुद्दा वगैरे माहिती मिळते. या लेखांतील नोंदणीवरून असे दिसते की, सातवाहन-क्षत्रप राजवटीत जुन्नर येथे बौद्ध धर्मीयांचे (हीनयान पंथीय) कदाचित् महाराष्ट्रातील सर्वांत मोठे केंद्र असावे. याचे प्रमुख कारण म्हणजे जुन्नर, सुरुवातीस सांगितल्याप्रमाणे, राजमार्गावर (सार्थवाहन पथावर) वसलेले होते. त्यामुळे बौद्ध अनुयायांना लोकाश्रय भरपूर मिळाला.

संपूर्ण शिलालेखात राजकीय उल्लेख असलेला एकच लेख मिळतो. राज्ञो महाक्षत्रप स्वामी नहपान याचा मंत्री आयम (आर्यमन) याने एका लेण्यास (मंडप) व त्यालगतच्या कुंडास (पोढीस) नहपानाच्या ४६ व्या वर्षी पुण्यकार्यार्थ दान दिले. आयम स्वतः वत्सगोत्रातील असल्याचे सांगतो. वरील शिलालेखातील ' वर्षे ४६ ' हा तज्ञांनी शककाल ठरविला. त्यानुसार हे लेणे इ. स. १२४ साली कोरले गेले याची हमखास नोंद घेता येते. शिलालेखांतून ' धर्मोत्तरीय ' पंथ, तसेच ज्याचा अर्थ लागत नाही असे ' अपगुरीय ', ' लंकुडीय ' असे पंथ आढळतात. लेणी कोरण्यासाठी दान देणारे काहीजण भडोच, सोपारा, दमण, कल्याण वगैरे ठिकाणचे आहेत. एक ' आदुथुमा ' नावाचा शक, जो कदाचित जुन्नर परिसरात स्थायिक झाला असावा, आपण बुद्धधर्मीय संघास काही जमिनी निर्वाहासाठी दिल्याचा निर्देश करतो. काही स्थानिक दात्यांनी संघास जमिनी व कार्षापणांची कायम ठेव निर्वाहासाठी दिल्याचा उल्लेख आढळतो. अनेक व्यापारी श्रेणी, उदा. सोनार, कासार, टोपल्या विणणारे कारागीर तसेच मल्ल, गवळी, काही स्त्रिया व त्यांच्या मुली यांनी अनेक चैत्यगृहांस, विहारांस व पाण्याच्या कुंडांस दान दिले. तीन यवन म्हणजे ग्रीक लोक, जे उत्तरेकडून आले, त्यांनी येथील लेण्यांस व कुंडास दान दिल्याचा शिलालेखांत निर्देश आहे. कार्ले व नाशिक येथील लेण्यांतही यवनांचे शिलालेख आहेत. त्यावरून असे दिसते की, नाशिक–जुन्नर–कार्ले परिसरात ग्रीकांची वस्ती होती.

जुन्नर शैलगृहांचा अभ्यास करीत असताना तेथील दहा चैत्यगृहांची विविधता ठळकपणे नजरेस भरते. इतक्या मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात दुसरीकडे कोठेही चैत्यगृहे कोरली गेली नाहीत. या चैत्यांचे आलेख मुख्यतः वर्तुळाकार (circular), गजपृष्ठाकृती (apsidal), चौरस (square), आणि चतुष्कोणाकार (quadrilateral) असे आहेत. यातील तुळजा लेणी क्र. ३ चे चैत्य हे संपूर्ण भारतातील एकुलते एक वर्तुळाकार, आंतील स्तंभांसहित असलेले, चैत्यगृह आहे. यातील कलाकुसरीवरून हे चैत्य इ. स. पूर्व पहिल्या शतकात कोरले गेले असे दिसते.

गणेश लेण्याच्या पूर्वेस सुमारे दीड किलोमीटर अंतरावर असलेले चैत्यगृह बरेचसे अज्ञात आहे. त्याचा आतून आकार गजपृष्ठाकृती असून त्याच्या दर्शनी भागी मोठे चैत्य गवाक्ष आहे. गवाक्षाच्या भोवताली फारच सुंदर नक्षीकाम असून, महाराष्ट्रातील कोणत्याही चैत्यगृहात अशी सुबक नक्षी सापडत नाही. त्यात स्तूप, चैत्यकमानीत बोधिवृक्ष व धर्मचक्र, चार व सहा पाकळयांची फुले, त्रिरत्न, वेदिका, स्वस्तिक व त्रिदल (Triskelion) यांचा समावेश होतो. यातील त्रिदल नक्षी नाशिक येथील चैत्याच्या दर्शनी भागावर थोडया प्रमाणात दिसते. ती महाराष्ट्रात इतर कोठेही पाहण्यास सापडत नाही. प्राचीन काळी, इ. स. पूर्व ३ऱ्या शतकानंतरच्या ग्रीस देशांतील लिसीयन नाण्यावर ही नक्षी दिसते. यावरून एखाद्या ग्रीक दानकर्त्याचा हे लेणे कोरण्यात अथवा दान देण्यात हातभार लागला असावा असे वाटते.

राहिलेली आठ चैत्यगृहे आणि काही विहार यांची विविधता उल्लेखनीय आहे. परंतु विस्तारभयास्तव त्यासंबंधी येथे विवेचन करणे कठीण आहे.

प्रस्तुत लेखकास प्रसिद्ध अष्टविनायक लेण्याद्रि विहारातील एका खोलीत मराठे-कालीन भित्तिचित्रे आढळली. त्यांतील दत्तात्रेय, शिव आणि विशेषतः गणेश सारीपाट खेळत असल्याचे चित्र उल्लेखनीय आहे. त्यावर स्वतंत्र लेख लिहिण्याचे योजिले आहे.

अशा प्रकारे जे अल्पसे संशोधन माझ्या हातून गेल्या काही वर्षांत या परिसरांत केले गेले त्यावरून जुन्नरची तुलना भरभराटीत असलेल्या तत्कालीन पैठण व नगर या प्राचीन नगरांशी करता येईल असे वाटते. महाराष्ट्र शासन किंवा डेक्कन कॉलेज यांनी जुन्नर गावी पुढे-मागे उत्खनन केले तर संशोधनात अधिक भर पडेल.

■ ■ ■

भाग २ : मध्ययुगीन काळ

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६२ : १-४, १९८३-८४

महाराष्ट्रातील मुसलमानी काल : संशोधनाच्या दिशा

ग. ह. खरे
भा. इ. सं. मंडळ, पुणे

माझे मित्र डॉ. गो. त्र्यं कुलकर्णी हे महाराष्ट्रातील मुसलमान कालासंबंधी गेल्या २५ वर्षांत कोणकोणती पुस्तके व लेख प्रसिद्ध झाले याचा आढावा घेणार आहेत. तेव्हा तसा आढावा न घेता मी या कालासंबंधी काय व्हावयास पाहिजे याविषयी काही विचार प्रदर्शित करतो.

महाराष्ट्रात मुसलमानी अंमल कसा चालू झाला ते इसामीच्या 'फुतूहुस्सलातीन' या ग्रंथामध्ये आले आहे. तो ग्रंथ आग्रा व मद्रास अशा दोन ठिकाणी प्रकाशित झाला आहे. महाराष्ट्राच्या या मुसलमानी कालात येथे मुख्यतः बहमनी आणि ती फुटल्यावर निजामशाही, आदिलशाही, कुत्बशाही, बरीदशाही आणि इमादशाही या पाच शाह्या होऊन गेल्या. या राजवटी चालू असताना खानदेशात फारुकी सुलतान आणि बागलाणात राठोडवंशी बागूल यांची राज्ये चालू होती. यांपैकी आपल्या महाराष्ट्रात आजवर जे संशोधन झाले आहे त्यातून मुख्यतः आदिलशाही, त्याखालोखाल निजामशाही व या दोन्ही शाह्या बुडविण्यासाठी मोगलांनी केलेल्या हालचालींविषयी काही माहिती उपलब्ध झाली आहे. तथापि ती माहिती पुरेशी आहे असे वाटत नाही. पण त्या माहितीच्या तुलनेने बहमनी, फारुकी आणि राठोडवंशी बागूल यांविषयी फारच थोडी माहिती गेल्या २५ वर्षांत नव्याने उपलब्ध झाली असेल. वऱ्हाडातील इमादशाही जरी महाराष्ट्रात झाली तरी ती या सर्व शाह्यांच्या अगोदर म्हणजे इ. १५७३ मध्ये अकबराने बुडविली. त्यानंतर काही वर्षांनी बेदरची बरीदशाही बुडाली. फारुकी शाही हीही अकबरानेच इ. १६०५ च्या सुमारास बुडविली, आणि कुत्बशाहीचा प्रदेश महाराष्ट्रात फारसा नसल्यामुळे त्याविषयी आमच्याकडे विशेष संशोधन झाले नसेल तर त्याबद्दल आपणास फारसा दोष देता येणार नाही.

वर ज्या शाह्यांचा मी निर्देश केला त्या सर्व शाह्यांची माहिती देणारे एक महत्त्वाचे पुस्तक म्हणजे फिरिश्त्याचा 'नवरसनामा'. त्याचे भाषांतर निदान सुमारे १५० वर्षांपूर्वी मि. ब्रिग्ज याने केले. त्यात पुष्कळ चुका झाल्या असल्या तरी त्याहून अधिक चांगले भाषांतर मिळत नाही तोवर फार्सी न जाणणाऱ्या इतिहासलेखकांना ते इंग्रजी रूपांतर पुढे ठेवूनच लिहावे लागते. या विषयावरील दुसरे महत्त्वाचे पुस्तक

म्हणजे तबातबाक्त 'बुर्हान-इ-मासिर' हा ग्रंथ. पण दुर्दैवाने हा ग्रंथ व त्यास जोडलेली पुरवणी यांत बहमनी व निजामशाही या दोनच वंशांचा इतिहास आला आहे. त्यामुळे फिरिश्त्याच्या मानाने या पुस्तकास दुय्यम स्थान द्यावे लागते. 'इन्स्क्रिप्शन्स फ्रॉम दि बॉम्बे प्रेसीडेन्सी' या नांवाचे एक सरकारी पुस्तक श्री. मुनीर यांनी आपणास स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीच प्रसिद्ध केले. पण त्यात सलग इतिहास सांगितलेला नसून निरनिराळे सुलतान व बादशाहा यांनी महाराष्ट्रात केलेल्या, विशेषतः वास्तुशिल्पकृतींची, अरबी-फार्सी शिलालेखांनी कळणारी माहिती आहे.

याशिवाय मेजर किंग यांनी 'बुर्हान-इ-मासिर' मधील बहमनी विभागाचे इंग्रजी भाषांतर प्रकाशित केले त्यावेळी, म्हणजे इ. १८९९ मध्ये, त्यांनी 'तज्किरतुल्-मुलूक' या पुस्तकाचे अगदी थोडक्यात मुद्देवजा टिपण प्रसिद्ध केले. दुसऱ्या इब्राहीम आदिलशाहाच्या कारकिर्दीत आदिलशाहीमध्ये खजिनदार असलेल्या रफी-उद्दीन शीराझी या मनुष्याने ते लिहिले असून त्याच्या स्थानाचा विचार करता ते पुस्तक महत्त्वाचे असले पाहिजे याविषयी शंकाच नाही. पण दुर्दैवाची गोष्ट अशी की ज्याचे त्रोटक सार इ. १८९९ मध्ये प्रसिद्ध झाले ते पुस्तक आता ८४ वर्षे होत आली तरी मूळ वा अनुवाद या स्वरूपात प्रसिद्ध झालेले नाही.

डेक्कन कॉलेजमधील एक वेळचे प्रपाठक श्री. चांद यांनी बहमनी अमदानी-तील एक प्रसिद्ध मुख्य मंत्री व मुत्सद्दी महमूद गावान याच्या पत्रव्यवहाराचा एक ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. पण त्या ग्रंथामुळे उपरिनिर्दिष्ट अनेक शाह्यांच्या इतिहासाची भूक मुळीच भागत नाही. हैद्राबादहून अलीकडे प्रसिद्ध झालेल्या 'दक्षिणेचा इतिहास : मध्यकाल' या पुस्तकात दक्षिणेच्या इतिहासाला उपयोगी पडणाऱ्या काही ग्रंथांची एक सूची दिली आहे. तीत वर सांगितलेल्या पुस्तकांपैकी फिरिश्ता, तबातबा व महमूद गावान यांचा निर्देश आहे. त्याबरोबरच काही उत्तरेच्या इतिहासकारांचा समावेश आहे. त्या पुस्तकात महाराष्ट्रातील घडामोडींची माहिती अजिबात नाही असे नाही; पण उपर्युक्त तीन पुस्तकांच्या मानाने अगदी थोडी आहे. तात्पर्य, महाराष्ट्राच्या मुसलमानकालीन इतिहासावर प्रकाश टाकणारी फार्सी, अरबी साधने अद्यापि मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध झाली नाहीत असेच म्हटले पाहिजे.

आजवर मुसलमान कालाचा इतिहास समजण्यास उपयोगी अशी जी साधने ठाऊक झाली आहेत त्यांपैकी थोडीशीच आम्ही महाराष्ट्रीयांनी अभ्यासिली आहेत. त्या मानाने आणखी कितीतरी अभ्यासावयाची आहेत. इतकेही करून मुसलमान काला-विषयी आम्हाला सर्वांगीण इतिहास लिहिता येईल का असे विचारले तर नाही असे उत्तर मोठ्या खेदाने द्यावे लागेल. या कालाचे साधनीभूत असे जे ग्रंथ उपलब्ध आहेत त्यांत त्या काली जे राज्यकर्ते होऊन गेले ते व त्यांची राज्ये यांचा राजकीय इतिहासच फक्त सापडतो. आणखी थोडासा इतिहास सापडला तर तो राज्यकर्त्यांनी आश्रय दिलेले तद्धर्मी साधुसंत आणि विद्वान् यांजविषयीच सापडतो.

पण त्या राज्यकर्त्यांनी ज्यांवर राज्य केले ते सामान्यतः धर्म, भाषा व संस्कृती या बाबतीत राज्यकर्त्यांहून भिन्न असल्यामुळे त्यांजविषयींचा इतिहास आम्हाला समजणे आवश्यक असूनही ते प्रायः अशक्य झाले आहे. उदा., आम्ही जे शासित त्यांमध्ये जातिव्यवस्था कशी होती, त्या जातींचे आपसांत झगडे होत असत का, त्यांची आर्थिक परिस्थिती कशी होती, म्हणजे ज्यांना आपण सुखवस्तू म्हणू शकू असे किती लोक होते, त्यांचे वार्षिक उत्पन्न सरासरी किती होते, त्यांवर कोणकोणत्या प्रकारचे कर होते इत्यादी. जुन्या कितीतरी करांचे निर्देश येतात, पण त्यांची प्रमाणे समजत नाहीत. ते सार्वत्रिक होते का विशिष्ट व्यक्तिसंबद्ध होते ? ते त्यांच्या आर्थिक परिस्थितीच्या मानाने अधिक होते का कमी होते ? त्यांमध्ये शिक्षणाची व्यवस्था कशी होती ? म्हणजे ज्यांना आपण शिक्षित म्हणू असे किती व अशिक्षित किती होते ? व्यापार उदीम कसा चालत होता ? इत्यादीविषयी आम्हाला काहीही माहिती मिळत नाही. एवढेच काय पण येथले बहुसंख्य लोक कोणती भाषा बोलत होते याविषयीदेखील आम्हाला या फार्सी ग्रंथांतून माहिती मिळत नाही. 'बुर्हान-इ-मासिर'मध्ये येथील लोक कोणती भाषा बोलतात हे सांगताना ' मुंडासा ले बांध ' अशी फक्त दोन वाक्ये नमूद केली आहेत. आम्हाला हे ठाऊक आहे की, या काळात सुमारे १०० तरी संस्कृत-मराठी लहानमोठे ग्रंथकार होऊन गेले असून त्यांनी ४००-५०० तरी ग्रंथ लिहिले आहेत. तथापि यांपैकी एखाद्या तरी ग्रंथकाराचा त्या मुसलमानी ग्रंथांत उल्लेख आहे का हे तपासले तर नाही असेच उत्तर द्यावे लागते. याचा अर्थ या मध्ययुगीन कालाचा इतिहास सांगणारे जे मुसलमानी ग्रंथ आहेत ते राज्यकर्त्यांचा केवळ राजकीय इतिहास व अरबी, फार्सी ग्रंथकारांची माहिती देऊन थांबलेले आहेत. येथील बहुसंख्य प्रजेविषयी त्यांनी लक्षात ठेवण्यासारखी अशी काहीही माहिती दिलेली नाही.

ही माहिती काहीशी महिकावतीची बखर, स्मृती व निबंध-ग्रंथ, तसेच फार जुनी मराठी व फार्सी १५ ते १७ व्या शतकातील कागदपत्रे यांत सापडेल; पण ती अपुरी पडेल असे निश्चित वाटते !

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६२ : १-४, १९८३-८४

दक्षिणेतील सल्तनत कालाविषयीचे संशोधन

गो. त्र्यं. कुलकर्णी
डेक्कन कॉलेज, पुणे

मराठी इतिहास आणि इतिहास संशोधन या विषयाचा एक भाग असलेल्या दक्षिणेतील सल्तनत कालाविषयी गेल्या पंचवीस वर्षांत महाराष्ट्रेतिहासाच्या दृष्टीने जे संशोधन प्रसिद्ध झाले त्याचा धावता आढावा घेणारा प्रस्तुतचा लेख आहे.

मराठी इतिहास आणि इतिहास संशोधन या विषयाचा आढावा सुमारे ४८ वर्षांपूर्वी (सन १९३५) महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांनी घेतला होता. निमित्त होते इंडियन हिस्टरी काँग्रेसचे पहिले अधिवेशन. त्या वेळी त्यांनी असे मत व्यक्त केले होते की, " महाराष्ट्रात गेल्या शतकात झालेल्या विशेष कामगिरीविषयी विचार केला तर असे म्हणावे लागेल की, महाराष्ट्रात इतिहास संशोधनाच्या क्षेत्रातच काही टिकाऊ स्वरूपाचे व इतरत्र न झालेले असे काम झाले व होत आहे. " याबद्दल त्यांना गौरव आणि अभिमान वाटत असल्याचे त्यांनी नोंदवून ठेवले आहे.

आता पन्नास वर्षांनंतर आढावा घेताना, या काळात इतिहास संशोधन–लेखनाविषयी काय कामगिरी झाली असा प्रश्न पडतो. तसेच तिचे मूल्यमापन करणे आवश्यक ठरते. त्या दृष्टीने निरनिराळ्या भाषांतून ग्रंथ, लेख यांच्या रूपात, तसेच इतर अनेकविध प्रकारांनी महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील इतिहास-संशोधकांनी गेल्या पंचवीस वर्षांत महाराष्ट्रेतिहासाच्या संशोधनाविषयी जी मोलाची भर घातली आहे तिचे येथे थोडक्यात विहंगमावलोकन केलेले आहे.

गेल्या पंचवीस वर्षांतील लिखाणावरून असे वाटते की, बखरी आणि तवारिखांचे युग सुसंबद्ध इतिहास लिहिण्याच्या दृष्टीतून मागेच संपलेले आहे. एवढेच नव्हे तर या काळात आपल्या भाषेप्रमाणेच इतर भाषांतून कशा प्रकारचे साहित्य आणि ऐतिहासिक पुरावे उपलब्ध होतील याच्याकडे खास लक्ष पुरविण्यात आल्याचे दिसून येते. त्यामुळे ग्रंथकार हिंदू असो, मुसलमान असो वा अन्य धर्माचा असो, त्याने आपल्या लिखाणात समतोलपणा साधण्यासाठी निश्चितपणे उपलब्ध प्रसिद्ध संशोधकीय साहित्याचा अगत्याने वापर करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. इतिहासलेखन प्रगत होण्याच्या दृष्टीने ही खरोखरच एक उत्तम व स्वागतार्ह बाब आहे. गेल्या पंचवीस वर्षांतील ग्रंथकार प्रामुख्याने समकालीन कागदपत्रे, फर्माने, महजर, निवाडपत्रे, निशाणे,

समकालीन व्यक्तींचा आपसांतील पत्रव्यवहार, दरबारातील अखबार, वकिलांनी पाठविलेले अहवाल, रोजनामे इत्यादींचा आधार घेऊन आपले लिखाण समतोल आणि परिपूर्ण करण्याकडे आकर्षित झालेले दिसतात.

इतिहास संशोधन हाच ज्यांनी आपला प्रपंच मानला ते जुन्या पिढीतील इतिहासाचार्य राजवाडे, दत्तो वामन पोतदार आणि विद्यमान गणेश हरि खरे यांच्यासारखे इतिहास संशोधक विरळाच. या विद्वानांनी महाराष्ट्रात इतिहास संशोधनाची जागती ज्योत लावून, सर्व बाजूंनी मागे पडत चाललेल्या महाराष्ट्रास एक अभिमानाचे आणि विश्वासाचे स्थान निर्माण करून दिले. गेल्या पंचवीस वर्षांतील ग्रंथसंपदा पाहता असे म्हणावे लागेल की, नवीन पिढीने त्यात भर घालून संशोधनाची पूर्वीची परंपरा पुढे चालू ठेवली आहे. परंतु त्यास कोणत्याही युगाचे संबोधन देता येणार नाही. त्याचबरोबर हेही लक्षात ठेवले पाहिजे की, राजवाड्यांनी जागोजागी अनेक लहानमोठी मंडळी संशोधनाच्या कार्यात गुंतविली. त्यांच्या प्रस्तावनांतून इतिहाससंबंधाने जे अभिनव प्रतिपादन झाले आहे ते अनेकांस मार्गदर्शक होऊन, गेल्या पंचवीस वर्षांतील मराठी इतिहासलेखनावरील त्यांची छाप पक्केपणाने दिसून येते. भारत इतिहास संशोधक मंडळ, तेथील विद्वान संशोधक आणि त्यांनी केलेली कामगिरी ही त्याचेच द्योतक आहे.

अशा या पार्श्वभूमीवर सांप्रतच्या ऐतिहासिक लिखाणाचा आढावा घ्यावयाचा आहे. हा आढावा घेत असताना या विषयाचे खालील तीन प्रमुख भाग पाडलेले आहेत :

१. साधनग्रंथ साहित्य.

२. प्रसिद्ध आणि अप्रसिद्ध कागदपत्रे, ग्रंथ इत्यादि साधनांच्या साह्याने एका विशिष्ट विषयास धरून खलजी, तुघलक, बहमनी, निजामशाही, आदिलशाही या कालखंडांविषयी तयार झालेले ग्रंथ.

३. उल्लेखित कालखंडांसंबंधी संकीर्ण अथवा स्फुट लेख, शोध निबंध इ.

प्रस्तुत लेखामध्ये देवगिरीच्या यादवांच्या पराभवापासून म्हणजे इ. १२९६ पासून इ. १६३६ पर्यंतचा काल घेतला आहे. त्यातही या कालातील दक्षिणेतील निरनिराळ्या शाहयांचा अथवा इस्लामी राज्यांचा महाराष्ट्राच्या इतिहासापुरता जेवढा संबंध आलेला आहे, तेवढ्याचाच प्रामुख्याने विचार केला आहे.

या कालखंडांविषयी, समकालीन अथवा थोडेसे नंतर लिहिले गेलेले प्रमुख फार्सी ग्रंथ म्हणजे इसामीचा 'फुतूहुस्सलातीन', फिरिश्त्याचा 'तारीख–इ–गुलशन–इ–इब्राहिमी,' रफीउद्दीन शीराझीचा 'तझकरतुल्मुलूक,' सय्यिद अली तबातबा याचा 'बुर्हान–इ–मासिर' हे होत. याशिवाय आदिलशाही कालखंडाविषयी साधनसामग्री विपुल प्रमाणात मिळते. खलजीकालाविषयी अमीर खुस्रोचा उपयोग अनेक इतिहासकारांनी केलेला आहे.

मेजर किंग व सर वुल्सूले हेग यानी 'बु नि–इ–मासिर'चे इंग्रजी भाषांतर

इ. १८९९ व १९२३-२५ मध्ये केले होते (इंडियन अँटिक्वेरी, खंड २८ व ४९-५२). त्यात मुख्यतः उत्तरोक्ताने या फार्सी ग्रंथातून किती आणि कशा प्रकारच्या चुका आढळतात याचे विस्तृत विवेचन केलेले आहे. या व दुसऱ्या ग्रंथात अनेक प्रकारच्या चुका असल्या तरी, जोपर्यंत दुसरे समकालीन ग्रंथ अथवा कागदपत्रे उपलब्ध होत नाहीत तोपर्यंत या ग्रंथांना पर्याय नाही. किंबहुना पुढील काळातील बहुतेक ग्रंथलेखकांचा हे ग्रंथच पायाभूत आधार आहेत. गेल्या पंचवीस वर्षांत प्रस्तुतच्या कालखंडांविषयी प्रसिद्ध झालेले साधनग्रंथ खालीलप्रमाणे आहेत —

१. फुतूहुस्सलातीन अथवा इसामीचा शाहनामा-इ-हिंद, खंड १, संपादक – आगा महमदी हुसेन, इ. १९६७. "In these days when learning is at a discount and knowledge is not in request, I have set my hands to composing the Futuh-us-Salatin, which contains 12 thousand verses !" अशा शब्दांत इसामी या ग्रंथकर्त्याने आपल्या ग्रंथाविषयी माहिती दिली आहे. मूळ ग्रंथ फार्सीत असून डॉ. आगा महमदी हुसेन यांनी त्याचा इंग्रजी तर्जुमा इतिहासाभ्यासकांसाठी केला आहे. हा ग्रंथ म्हणजे प्रसिद्ध फार्सी कवी फिर्दोसी याच्या 'शाहनामा' या ग्रंथाचा हिंदुस्थानी अवतार असेच म्हटले आहे. इ. १३११ मध्ये अलाउद्दीन खिलजीच्या काळात याचा जन्म झाला. याचे वडील सरकारी अधिकारी होते. आपल्या ग्रंथात इसामीने इस्लामी धर्म हिंदुस्थानात कसा प्रसार पावला, त्याला शाही आश्रय कसा मिळाला आणि त्यामुळे पुढे धर्माचे राजकारण बदलून सत्तेचे राजकारण कसे झाले हे विस्ताराने मांडले आहे. हिंदुस्थानातील मुसलमानी कर्तृत्वाचा तीन शतकांचा हा इतिहास आहे. त्यात खलजीकाळातील दक्षिण भारत, आणि त्यानंतर तुघलकांच्या काळात इस्लामी शक्तीचा झालेला ऱ्हास विस्ताराने दिला आहे. मुहमद तुघलकाबद्दल मात्र तो पुढीलप्रमाणे कडवटपणे लिहितो —

"Two namesake vine-dressers in this garden did the work of spring and autumn respectively. While the son of Shihab populated it, the son of Tughluq destroyed it completely."

खलजी आणि तुघलकांच्या काळातील ऐतिहासिक घटनांविषयी माहिती देणारा हा एक अत्यंत प्राचीन आणि महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. सुलतान अलाउद्दीन बहमदशाह (इ. १३४९) पर्यंतचा काळ यात आलेला आहे. या ग्रंथात दक्षिणेतील अनेक भौगोलिक स्थळांची माहिती प्रथमच मिळते. तसेच दक्षिणेतील सुफी पंथाच्या अनेक कवींचा उल्लेखही यात आलेला आहे. बहमनी राज्यकर्त्यांचा अभ्यास करण्यासाठी हा ग्रंथ त्यांच्या कालापुरता उपयुक्त आहे.

२. अहमदनगरची निजामशाही (बुर्हान-इ-मासिर)

बहमनी व अहमदनगरच्या निजामशाही राज्यांचा इतिहास (१९६६)

इंग्रजी भाषांतर – सर वुल्स्ले हेग, मराठी अनुवाद – श्री. भ. ग. कुंटे, मूळ लेखक सय्यिद तबातबा, इ. १९६२. मूळ फार्सी ग्रंथ १९३६ मध्ये हैद्राबाद येथे प्रसिद्ध करण्यात आला.

सय्यिद अलीने जेव्हा बुर्हान लिहावयास घेतले तेव्हा फिरिश्ता, रफीउद्दीन शीराझी किंवा फुझून–इ–अस्त्राबादी यांचे ग्रंथ लिहून झालेले नव्हते. निजामशाही घराण्याच्या इतिहासाला उपयुक्त अशी दोन साधने, (१) शाह ताहिरचा पत्र-व्यवहार, (२) तारीफ–इ–हुसैन शाह दखनी हा आफतावी याचा काव्यात्मक ग्रंथ त्याच्यासमोर होते. फार्सी व इंग्रजी न येणाऱ्या मराठी संशोधकांसाठी श्री. कुंटे यांचा अनुवाद उपयुक्त ठरेल. ठळक घटना आणि वंशावळी त्यात दिल्या आहेत.

३. रफीउद्दीन शीराझी–तजिकरतुल्मुल्क. त्यातील माहितीची अनुक्रमणिका मेजर किंगने आपल्या बहमनी विभागाच्या भाषांतरात दिली आहे. या ग्रंथाचा अजूनपर्यंत अनुवाद झालेला नाही असे आम्हास खात्रीपूर्वक माहीत आहे. श्री. कुंटे तो झाला असे म्हणतात, परंतु त्याविषयी नेमकी माहिती त्यांनी दिलेली नाही. यानंतर दखनी उर्दूतील दोन काव्यग्रंथ प्रसिद्ध झालेले आहेत :

१) मसनवी कदमराव-पदमराव हे कवी निझामी याने रचलेले काव्य असून, चौदाव्या शतकातील महानुभाव तसेच नाथपंथाविषयी बरीच माहिती यात आलेली आहे.

२) मसनवी तारीफ–इ–हुसैन निजामशाह हे काव्य हसन शौकी याने रचलेले आहे. या काव्यात हुसेन निजामशाह आणि विजयनगरचा रामराजा यांचे धर्मयुद्ध कसे झाले आणि त्यांत हिंदूंचा पराभव कसा झाला इ. वर्णन आले आहे. ग्रंथ सम-कालीन असल्यामुळे अभ्यासास उपयुक्त आहे. ह्या दोन्ही ग्रंथांचे दिग्दर्शन डॉ. जमील जालबी यांनी केले असून कराची, पाकिस्तान येथे हे ग्रंथ प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत.

३) तारीफ–इ–हुसैन निजामशाह बादशाह दखन—हा कवी आफताबी याचा ग्रंथ भा. इ. सं. मंडळातर्फे प्रसिद्धीच्या वाटेवर आहे. यातील विषय हसन शौकीच्या काव्याप्रमाणेच आहे.

४) भा. इ. सं. मंडळ, ऐतिहासिक फार्सी साहित्य, ४ था आणि ५ वा खंड. हे साधनग्रंथ काही वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेले आहेत.

याचप्रमाणे पाकिस्तानातून Indian History Congress च्या धर्तीवर लेख प्रसिद्ध झालेले आहेत.

The Proceedings of the Pakistan History Conference, 8th Session, 1958.

Dr. S. Moinul Haq. (ed.)

' Tha Medieval Muslim Treatise on Government, ' by
Dr. (Mrs.) Afsar Salim Khan
लेखिकेने ' फतवा-इ-जहाँदारी ' (Precepts on Government) या ग्रंथात जो विषय मांडला आहे त्याचा प्रस्तुत लेखात अल्प परिचय करून दिला आहे. मध्ययुगातील सरकारी खाती आणि राज्यकारभार हा कसा असावा अथवा कसा चालवावा याविषयी या ग्रंथात काही मार्गदर्शक तत्त्वे घालून दिली आहेत. त्यामुळे मुस्लिम राज्यकर्त्यांसमोर पाश्चिमात्य राज्यकर्त्यांसारखी मार्गदर्शक तत्त्वे नव्हती हा पाश्चिमात्य इतिहासकारांचा दावा त्यांनी खोडून काढला आहे. हा ग्रंथ ११ व्या शतकात तयार झाला असून तो गझनीच्या महमुदास अर्पण केला आहे. तसेच या ग्रंथाचा फार मोठा परिणाम झियाउद्दीन बर्नीच्या लेखनावर झाला आहे असे लेखिकेचे मत आहे.

९ वे अधिवेशन, सन १९५९ : या ग्रंथात यार मुहमद खान (हैद्राबाद) यांचा एक उद्‌बोधक लेख आहे. त्याचे शीर्षक आहे–

' Was Shah Jahan Justified in ordering the annexation of Bijapur to the Mughal Empire and why did the Campaign fail ?' इ. १६३६ मध्ये विजापूरकर आणि मुघल यांच्यामध्ये एक तह झाला. त्यात आदिलशाहाने मुघल सम्राट शाहजहानचे वर्चस्व मान्य केले आणि त्याला पेशकश देण्याचे कबूल केले. परंतु त्यात पुढे तेढ आली आणि नंतर औरंगजेबाला विजापूरकरांवर स्वारी करावी लागली. तरीही विजापूरकरांनी दारा आणि औरंगजेब यांच्या भांडणाचा पुरेपूर फायदा घेऊन मुघली फौजांचा पराभव केला. डॉ. खान यांनी ' आदाब, ' ' अमल-इ-सालेह ' भा. २, ' वाकीयात-इ-आलमगिरी ' तसेच लाहोरीचा ' बादशाहनामा ' इ. ग्रंथांचा आधार घेतला आहे.

Mughal Archives : A descriptive catalogue of the documents pertaining to the reign of Shah Jahan (1628-1658)

खंड १, दरबार पेपर्स, संपादक-मुहमद झियाउद्दीन अहमद, सन १९७७. हा अेक ४०० पृष्ठांचा ग्रंथ असून शाहजहानकालातील दक्षिणच्या सुभ्यासंबंधी उपलब्ध कागदपत्रांचा या ग्रंथात समावेश आहे. सुरुवातीलाच ग्रंथकर्त्याने अनेक फार्सी नामावली, बिरुदावली आणि राज्यकारभारात सतत येणारी विशेषणे यांच्या व्याख्या व व्याप्ती यांविषयी विस्ताराने माहिती दिली आहे. ऐतिहासिक कागदपत्रांच्या अभ्यासाच्या दृष्टीने हे पुस्तक उत्तम मार्गदर्शक आणि उपयुक्त आहे. महाराष्ट्रापुरते बोलावयाचे म्हणजे यात सतराव्या शतकातील अनेक मराठे सरदारांची नावे, त्यांना दिलेल्या मनसबी आणि त्यांनी बजावलेली कामगिरी यांचा उल्लेख विस्ताराने येतो. तसेच या कागदपत्रांचा बारकाईने अभ्यास केल्यास मुघली सत्ता सोळाव्या सतराव्या शतकात

दक्षिणेत कशी पसरत गेली व स्थिर होत गेली हे उत्तम तऱ्हेने ध्यानात येते. या ग्रंथावरून वऱ्हाड आणि खानदेश हे दोन प्रांत आणि तेथील मराठी अधिकारी हे मुघलांनी पक्केपणाने बांधून घेतलेले दिसतात.*

गेल्या पंचवीस वर्षांतील या विषयासंबंधी प्रसिद्ध झालेले ग्रंथ खालीलप्रमाणे आहेत :

कोकणच्या इतिहासाची पार्श्वभूमी – लेखक प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर (द. वि. आपटे स्मारक मंडळ प्रकाशन), इ. १९६१. महाभारतकालापासून शिवपूर्वकालापर्यंत संशोधनाधिष्ठित अनुमानाच्या आधारे कोकणच्या इतिहासाची रेखाटलेली ही रूपरेखा या छोट्या निबंधात, विद्वानांनी दुर्लक्ष केलेल्या अनेक स्थलांची निश्चिती पहिल्यानेच केलेली आढळेल. त्यातील पाच प्रमुख स्थळे त्रिकूट, वलीपट्टण, पुरी, मुरला आणि हरिश्चंद्रगड ही होत. मुरला म्हणजे कल्याणची खाडी, रघुराजाने जयस्तंभ केलेला त्रिकूट, शिलाहारांची पुरी, वलीपट्टण हेच खारेपाटण इ. माहिती यात आली असून या स्थलनामांचे फिरिश्त्याने केलेले लिखाणाचे घोटाळे दूर केले आहेत. त्याचबरोबर अव्वल मुसलमानी काळाचे खरे स्वरूप दाखविण्याचा प्रयत्न शेजवलकरांनी केला आहे. तसेच समकालीन इतिहासलिखाणावर टीकाही केली आहे. खुद्द ग्रंथकर्त्याच्याच शब्दांत सांगावयाचे तर "आमच्यातील जे इतिहासकार म्हणून समजले जातात ते फक्त तंत्रज्ञ आहेत. म्हणजे त्यांस काही भाषा येतात, शिलालेख, हस्तलिखिते वाचता येतात आणि त्यावरून, भांडारकरांनी आपल्या संस्कृतज्ञानाचे एक उपांग म्हणून ज्याप्रमाणे दक्षिणचा इतिहास लिहिला, त्याचाच श्रीगणेशा गिरवीत असतात. नकाशा पुढे ठेवल्याशिवाय, स्थलनिश्चिती झाल्याशिवाय कल्पिलेला इतिहास हा आंधळ्या कोशिंबिरीचा खेळ होय" (पृ. ३५–३६). आजच्या काळातही, शेजवलकरांनी इतिहासलेखनाबद्दल दिलेल्या जळजळीत इशाऱ्याची आवश्यकता पदोपदी जाणवते गेल्या पंचवीस वर्षांतील इतिहासलिखाणात या त्रुटी नुसत्या नवोदितांच्या बाबतीतच नव्हे, तर प्रस्थापितांच्या बाबतीतही जाणवतात.

डॉ. के. एन्. अश्रफ यांचा ग्रंथ ' Life and conditions of the people. of Hindustan ' (पृ. २५५, इ १९५९) हा एक अत्यंत महत्त्वाचा वैचारिक ग्रंथ आहे असे म्हटले पाहिजे.

---

* मूळ कागदपत्रे प्रसिद्ध करण्याच्या दृष्टीने दक्षिणच्या इतिहासाअभ्यासकांना हा ग्रंथ अत्यंत मोलाचा वाटल्यावाचून राहणार नाही. मूळ फार्सी कागद, त्यांचे इंग्रजी भाषांतर आणि त्यावरती सयुक्तिक टीका, टिपणी करून संपादकाने कागदपत्रांचा अभ्यास सखोल केल्याचे दाखवून दिले आहे. तरीसुद्धा मराठी मुलखातील ग्रामनामे आणि मराठे सरदारांची नावे, आडनावे इत्यादी गोष्टीविषयी संपादकाच्या हातून अज्ञानाने काही वाचनाच्या चुका राहिल्या आहेत.

मुघली सत्तेच्या प्रस्थापनेच्या अगोदर सल्तनत कालातील मुसलमान राजांच्या कारकिर्दीत हिंदुस्थानातील आम जनतेचे, विशेषतः हिंदू आणि मुसलमान यांचे सामाजिक आणि आर्थिक जीवन कशा प्रकारचे होते याविषयी प्रस्तुत ग्रंथात विस्ताराने माहिती आलेली आहे. हा ग्रंथ जरी उत्तर भारतविषयक असला तरी त्यातील विषय आणि आशय समकालीन दक्षिणेतील लोकांच्या बाबतीत देखील तितकाच लागू पडतो. किंबहुना अशा प्रकारे महाराष्ट्रातील मध्ययुगीन सामाजिक जीवन दिग्दर्शित करणारा हा एक उत्तम ग्रंथ आहे असे म्हटले पाहिजे. इ. १२५० ते १५५० या कालाविषयी माहिती देताना ग्रंथलेखक म्हणतो, " Under Muslim rule we do not enter upon a new era in Indian history but only on a stage in the great social development which has been going on since the first dawn of Indian history and still remains to be completed " (पृ. ५). खेडुताचे जीवन कसे होते हे सांगत असताना, हिंदु-मुसलमान भेद करण्याचे कारण नाही; बव्हंशी तो शेतकरी होता आणि जमीन पिकविणे, मशागत करणे यातच त्याचा मुख्य वेळ जात होता; स्वतःच्या समाजाच्या गरजेएवढे उत्पादन करणे हा त्याचा मुख्य उद्देश होता; तसेच या देशात त्या काळात कशा प्रकारची पिके घेतली जात होती आणि सरकारी करांचा बोजा सामान्यांवर कितपत पडत होता याविषयी मुद्देसूद विवेचन या ग्रंथात आहे. शिवाय सामाजिक आणि धार्मिक जीवनाविषयी खूपच उपयुक्त माहिती या ग्रंथातून मिळते.

महाराष्ट्र आणि मराठे – मध्ययुगीन कालाचा इतिहास असा लिहिला तर, सेतुमाधवराव पगडी (सन १९६२)

यातील पहिली चार प्रकरणे मध्ययुगीन मुसलमानी कालातील राजकीय घडामोडींची सविस्तर माहिती देणाऱ्या फार्सी आधारग्रंथांच्या साहाय्याने लिहिली आहेत.

" तेराव्या शतकाच्या शेवटी देवगिरीच्या यादवांचे राज्य महाराष्ट्रभर पसरले होते. भंडाऱ्यापासून वेंगुर्ल्यापर्यंत आणि पश्चिम खानदेशापासून नांदेड देगलूरपर्यंत इतिहासात पहिल्यानेच सगळा मराठी मुलूख एका मराठी राज्याखाली आला. यादवांचे राज्य महाराष्ट्राबाहेर कर्नाटकाच्या निम्म्या भागावर आणि आंध्र प्रदेशातील कडापा, कर्नूळ इ. जिल्ह्यांवर पसरले होते. ही परिस्थिती ३०–४० वर्षांपेक्षा जास्त काळ टिकली नाही " असे सांगून पगडी यांनी आपल्या या ग्रंथात पहिल्या चार प्रकरणांमध्ये इसामीच्या फार्सी ' फुतूहुस्सलातीन ' या खंडकाव्यात असलेली बहमनी कालाविषयीची ऐतिहासिक माहिती दिली आहे. पुढील प्रकरणात बहमनी सुलतानांची कोकण मोहीम मुहमद गावानाच्या फार्सी पत्रांद्वारे विशद केली आहे. तर चौथ्या प्रकरणात अहमदनगरच्या निजामशाहीतील काही हिंदू सरदारांविषयी म्हणजे दानव्या जयसिंह, कान्हू नरसी, साबाजी चिटणीस, व्यंकटराव कोळी इत्यादींविषयी माहिती अली तबातबाच्या ग्रंथावरून दिली आहे.

याशिवाय ग्रंथलेखकाने, थोड्याबहुत अंशाने दक्षिणेत मुसलमानी सत्तेबरोबर पीर, सुफी कलंदर, फकीर यांनी राजसत्तेच्या आश्रयाने इस्लामी धर्म महाराष्ट्रीय समाजात प्रभावित करण्याचा प्रयत्न केला अशासारखी विधाने केली आहेत. परंतु सविस्तरपणे आधारभूत अशी या विषयाची मांडणी मात्र केली नाही. त्यामुळे हिंदु-मुस्लिम संघर्ष खरोखरच खोलवर पोचला होता की त्यांच्यामध्ये या सर्वांनी समन्वय घडवून आणण्याचा प्रयत्न केला हे निश्चितपणे समजत नाही. हिंदू प्रजेने चौदाव्या, पंधराव्या तसेच सोळाव्या शतकात मुसलमानी राजवटीस प्रखर विरोध केला असे ग्रंथलेखकाने विधान केले आहे. परंतु या तीनशे वर्षांत इतिहासाने नोंद घेतली आहे असे प्रखर विरोधाचे प्रसंग कोणते ते मात्र वाचकांच्या समोर मांडलेले नाहीत.

'यादवकालीन महाराष्ट्र' (काल १०००-१३५०) हा मुरलीधर गजानन पानसे यांचा ग्रंथ (इ. १९६३. पृ. २२०) बराच गाजलेला आहे.

त्यांनी ग्रंथात संदर्भग्रंथांची विस्तृत यादी दिलेली आहे. विशेषतः प्रसिद्ध झालेले संस्कृत वाङ्मय, ताम्रपट, शिलालेख आणि इंग्रजी नियतकालिकांतून या विषयावर प्रसिद्ध झालेले संशोधकीय लिखाण, तसेच मराठी कागदपत्रे इत्यादींचा प्रमाणभूत आधार घेतलेला असल्यामुळे मुसलमानी अंमल दक्षिणेत सुरू होण्यापूर्वी आमच्या समाजाची स्थिती कशी होती याबद्दल तसेच तेथील न्यायसंस्था, ग्रामसंस्था, राज्य-व्यवस्था याविषयी खूपच मूलगामी माहिती उपलब्ध करून दिलेली आहे. मध्ययुगीन महाराष्ट्राच्या अभ्यासासाठी हा एक अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ आहे.

या ठिकाणी डॉ. रा. चिं. ढेरे यांनी केलेल्या संशोधनाचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. जुने मराठी वाङ्मय, लोकसाहित्य आणि संतसाहित्य यांचा गेली दोन तपे निष्ठेने सखोल अभ्यास करून त्यानी शिवपूर्वकालीन महाराष्ट्राच्या धार्मिक व सांस्कृतिक इतिहासावर अनेक अंगांनी नवीन प्रकाश टाकला आहे. जुन्या मराठी वाङ्मयाचे व लोकसाहित्याचे एक नवे दालन शिवपूर्वकालीन महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहा-हासाच्या दृष्टीने त्यानी अभ्यासकांना खुले करून दिले आहे. त्यांच्या विवेचनात्मक तसेच संपादित केलेल्या ग्रंथांची संख्या लक्षणीय आहे. उदाहरणादाखल म्हणून 'नाथ संप्रदायाचा इतिहास', 'चक्रपाणि', 'संतसाहित्य आणि लोकसाहित्य', 'लोक-संस्कृतीची क्षितिजे, 'लज्जागौरी,' इत्यादी ग्रंथांचा निर्देश करता येण्यासारखा आहे.

Muslim Civilization in India
by S. M. Ikram & A. T. Embree, 1964, p. 296.

या ग्रंथात, लेखकाच्याच शब्दात सांगावयाचे म्हणजे, " In addition to the political narrative which furnishes the essential background, the book gives an account of the cultural developments, the changes in political philosophy and institutions, the rise of Indo-Muslim law, and above all these religious and intellectual movements

which in the long run proved more powerful than the mighty rulers; the general features of the cultural, administrative, social and economic history have been outlined in separate chapters. "

याच ग्रंथाच्या पाचव्या आणि सहाव्या प्रकरणात Expansion in the South : The Khaljis and the Tughluqs, and the disintegration of the Sultanate बद्दल माहिती दिली आहे. तसेच दक्षिणेतील बहमनी राज्य, आणि त्यानंतर झालेल्या पाच शाह्यांचा विकास आणि ऱ्हास समजावून सांगितला आहे. यातच विजयनगरचे हिंदू राज्य आणि पुढे शाहजी भोसल्यामुळे झालेला मराठी सत्तेचा उगमही समजावून सांगितला आहे.

The Kingdom of Ahmednagar by Dr. Radhey Sham,
1966, p. 399.

या ग्रंथात डॉ. राधेशाम यांनी अहमदनगरच्या निजामशाही घराण्याचा इतिहास स्थापनेपासून ऱ्हासापर्यंत दिला आहे. राजकीय इतिहास देताना संघर्षाची कारण-मीमांसा उत्तम केली आहे. फार्सी साधनांवर मुख्यतः हा ग्रंथ आधारित आहे. राजकीय घडामोडींबरोबर जनसामान्यांचे जीवनमान, धर्म, जातिसंघर्ष, राज्यव्यवस्था, लोकोपयोगी कार्ये आणि संस्था, तसेच कला, साहित्य या विषयांची झालेली भर-भराटही त्यांनी उत्तम तऱ्हेने अभ्यासकांच्या समोर मांडली आहे. निजामशाही राज्याच्या अस्तित्वासंबंधी लेखक म्हणतो – " The picture of the struggle on this part of Nizam Shahis may not be very exhilarating or instructive, but it is interesting in the sense that they did not allow the neighbouring powers to attain the status of imperial powers and thereby they maintained proper balance between North and South. " त्याचबरोबर निजामशाहीचा आणखी एक विशेष म्हणजे महाराष्ट्रासाठी मलिक अंबरने घालून दिलेली जमीनधारा – मोजणी – महसूलपद्धती. परंतु दुर्दैवाने ग्रंथकर्त्याने या विषयावर फारसे भाष्य केलेले दिसत नाही. वास्तविक मलिकंबरी धारापद्धतीचा उगम आणि विकास आणि पुढे शिवाजीच्या राज्यात देखील ती पद्धती कशी शिरली आणि जनमानसात ती लोकप्रिय कशी ठरली याविषयी माहिती यात यावयास पाहिजे होती. परंतु ती आलेली नाही. त्यामुळे अभ्यासकांची थोडी निराशा आणि कुचंबणा होते. परंतु इतर अनेक अंगांनी नटलेला हा ग्रंथ मराठ्यांच्या इतिहासाविषयीच्या अभ्यासासाठी निश्चितच उपयोगी आहे.

यानंतरच्या काळातही याच विषयावरती निजामशाहीतील प्रसिद्ध वजीर मलिक अंबर याचे चरित्र, राधेश्याम तसेच बी. डी. तामसकर यांनी लिहिले आहे. त्यांनी प्रसिद्ध फार्सी, मराठी आधारभूत ग्रंथसाहित्याशिवाय पोर्तुगीज साधनांचा वापर केला आहे. राधेश्यामांच्या ग्रंथाचा विशेष म्हणजे, निजामशाहीतील कारभार कसा

प्रकारे चालत होता याचे लेखकाने केलेले उत्तम दिग्दर्शन. ंतर झालेल्या तामसकरांच्य ग्रंथात ही बाब अभावानेच तळपते. परंतु दोन्ही ग्रंथांचा एक दोष-जो निश्चितपणे जाणवतो-तो म्हणजे मलिक अंबरची महसुली पद्धत अथवा मराठी कागदपत्रात ज्याबद्दल 'मलिकंबरी धारा' असे शेतीविषयक उल्लेख आढळतात, त्याबद्दल फारसे विवेचन नाही. या विषयाचा आणखी अभ्यास होणे आवश्यक आहे.

मालोजीराजे आणि शहाजीमहाराज : वा. सी. बेंद्रे १९६९, पृ. ५७५, आधारग्रंथ मुसलमानी कालखंडासाठी :

१) बुर्हान-इ-मासिर, अनुवाद, भ. ग. कुंटे व ऐ. फा. सा., खं. १, २, ३, ४, व ५.

२) दाग रजिस्टर-डच रेकॉर्डस्, बुसातीनुस्सलातीन (विजापूरची बखर . महाराष्ट्राचा व कर्नाटकाचा प्रांत दाखविणारा एक नकाशा या ग्रंथात दिलेला आहे. शहाजीचे चरित्र विस्ताराने दिले आहे. त्यामुळे निजामशाहीअखेर आदिलशाही आणि मुघली सत्ता याविषयीचे अनेक प्रसंग आहेत. यातच शहाजीकडे शिवाजीच्या स्वराज्याच्या कल्पनेचे श्रेयही लेखकाने दिलेले दिसते. परंतु यात काही त्रुटी राहिल्या आहेत. सर्वसाधारण मराठी समाजाविषयी तसेच त्याच्या आर्थिक, सामाजिक व्यवहारा-संबंधी, समाजात असलेल्या जातिपद्धतीविषयी काहीही माहिती, ग्रंथ मोठा असूनही मिळत नाही.

History of Medieval Deccan

संपादक - प्रा. शेरवानी आणि डॉ. पु. म. जोशी, १९७३.

मध्ययुगीन दक्षिणचा द्विखंडात्मक इतिहास, आंध्र प्रदेश सरकारने १९७३ साली प्रा. शेरवानीसारख्या विद्वान संशोधकाच्या साह्याने संपादन आणि प्रसिद्ध करून, दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाविषयीच्या ज्ञानामध्ये खूपच मोठी भर घातली आहे. एका मोठया वचनपूर्तीचा त्यात आनंद आहे. विशेषतः डेकन हिस्ट्री हा ग्रंथ अनेक विद्वानांच्या सहकार्याचे प्रतीक आहे. संशोधनाचे एक उत्तम फलित म्हणून सर्व विद्वानांनी त्याकडे पाहिल्यास त्यात काहीच आश्चर्य नाही. ३०-३५ वर्षांपूर्वी उस्मा-निया विद्यापीठाच्या इतिहास विभागाने मध्ययुगीन दक्षिणच्या समग्र इतिहासाविषयी एक प्रकल्प उभा केला होता. दक्षिणच्या प्राचीन इतिहासाविषयीचा खंड १९६० सालापर्यंत डॉ. गुलाम यझदानी यांच्या समर्थ लिखणातून प्रगट झालेला होता. आणि त्या ग्रंथास विद्वानांची मान्यताही प्राप्त झाली होती. त्यामुळे पुढील खंडाविषयी म्हणजे खलजीकालापासून ते आदिलशाही, कुत्बशाहीच्या अंतापर्यंतच्या साधारण ३००-३५० वर्षांच्या अनेक नाट्यपूर्ण ऐतिहासिक घटनांनी भरलेल्या या काला-विषयी संशोधक खूपच उत्सुक होते. दुसऱ्या खंडात दक्षिणेतील सामाजिक आणि सांस्कृतिक लोकजीवनाविषयी विवेचन आहे.

ग्रंथाची रचना इतर प्रसिद्ध ग्रंथांपेक्षा फारशी निराळी नाही. कालानुक्रमे जी घराणी सत्तेवरती आली आणि ज्या सुलतानांनी राज्यकारभार सांभाळला त्यांच्या-भोवती सर्व सूत्र गुंफलेले आहे. या ग्रंथाच्या सुरुवातीस संपादकांनी, दक्षिण म्हणजे नेमका भौगोलिक भाग कोणता याविषयी विस्तृत चर्चा केली आहे. परंतु याविषयीचा हा काही पहिला प्रयत्न नव्हे. त्याअगोदर Cambridge History of India च्या तिसऱ्या खंडात थोडक्यात पण अत्यंत प्रभावीपणे हा विषय मांडलेला आहे. त्यानंतर भारतीय विद्या भवनाच्या पाचव्या आणि सहाव्या खंडात, तसेच Comprehensive History of India च्या पाचव्या खंडातदेखील या विषयास स्थान देण्यात आले आहे. खेरीज थोड्याबहुत प्रमाणात अनेक घराण्यांचे इतिहास प्रसिद्ध झालेले आहेत. अशी विपुल ग्रंथसंपदा आधीच प्रसिद्ध झालेली असल्यामुळे, प्रस्तुत खंडाच्या लेखक संपादकांबद्दल अभ्यासकांच्या अपेक्षा खूपच वाढलेल्या होत्या. याबद्दल एका विद्वान समीक्षकाच्या शब्दांत सांगावयाचे तर 'The task of the editors and contributors to this volume was in a way made easy by all this literature, while at the same time making it more difficult in that sights had to be traincd higher than their predecessors by the present contributors. And comparisons, however, disagreeable, became inevitable." आणि अशा प्रकारे या ग्रंथाची तुलना इतर प्रसिद्ध ऐतिहासिक साहित्याशी करावी लागल्यामुळे जे थोडक्यात दिसून येते ते असे : दक्षिण अथवा दक्षिणपथ याविषयीची व्याख्या अधिक समर्पक हवी होती. यातील दक्षिणेमध्ये माबार अथवा मलबार आणि तंजावरच्या प्रांताचा समावेश केलेला आहे. पण त्याचबरोबर मदुरा आणि मदुरेच्या नायकांना मात्र अर्धचंद्र देण्यात आला आहे. त्यामुळे साहजिकच अभ्यासकाचा असा समज होतो की, येथे संपादकांना तापी–नर्मदेच्या दक्षिणेस असलेल्या फक्त मुसलमानी शाह्या अथवा राजवटींबद्दलचाच इतिहास तर अभिप्रेत नाही ना !

त्याचप्रमाणे ऐतिहासिक भूगोल हे वैशिष्ट्यपूर्ण प्रकरण डॉ. पु. म. जोशी यांनी लिहिलेले आहे. यात भौगोलिक परिस्थिती आणि अर्थोत्पादन ही हातात हात घालून कशी जात ते मात्र त्यांनी दाखवले नाही. ज्याला आपण इंग्रजीत Eeonomic compulsions of geography असे म्हणू त्याविषयी त्यांनी विस्ताराने लिहावयास पाहिजे होते. लोकवस्त्या तसेच मुसलमानी आणि हिंदू राज्ये यांच्यामध्ये अनेक वर्षे ज्या लढाया झाल्या त्यांची मूळ कारणे याच्यातच शोधावयास पाहिजेत. पण तसे जोशी यांनी केलेले दिसत नाही. 'There is no discussion on strategic use of geographic factor and also the ability or otherwise to exploit the geography on the part of dynasties and generals. In this context one question that merits answer is why the tide of Muslim

conquest from north could not be stemmed ? Since the early days the campaigns from the north against the Deccanis including rulers of Gujrat, whether they were Hindus or Muslims, have been always successful. It is quite obvious that the obstacles posed by the Satpudas, the Narmada and the Tapti are more illusory than real. ' या सर्वांचा एकत्रित विचार होऊन त्याचे निरनिराळया कालखंडांमध्ये दक्षिणमुलखावर झालेल्या इस्लामी आक्रमणाच्या संदर्भात सखोल विवेचन हवे होते.

देवगिरी आणि दक्षिण प्रांतावर आधी खलजींचे आणि त्यानंतर तुघलकांचे आक्रमण झाले. परंतु त्या दोन्ही आक्रमणांमागे नेमका हेतू काय होता, धनप्राप्ती, राज्यविस्तार अथवा धर्मप्रसार, ह्याबद्दल दोनशे पानांच्या लिखाणात कोठेही सूत्र सापडत नाही. आणि यातूनच पुढे बहमनी राज्याचा उदय झालेला आहे. पण त्याची देखील मूलगामी प्रेरणा कोणती होती याबद्दलही कोठल्याही फार्सी ग्रंथाच्या आधारे अभ्यासकाच्या समोर काही मांडण्यात आलेले नाही. याबद्दल प्रा. के. ए. निझामी यांनी व्यक्त केलेले विचार मननीय आहेत. ते म्हणतात, ' Foreign gouernment–a government of the South by the North–was intolerable to the Sada Amirs of the empire as to the Hindu population whom they were expected to control. Everyone saw that it could not last beyond a decade, the forces of opposition were too strong. The success of Islam indigenous. ' (A Comprehensive History of India, Vol. V, pp. 508–509).

प्रस्तुत ग्रंथातील बहमनी राजवटीविषयी प्रा. हरून खान शेरवानी यांनी लिहिलेले प्रकरण मात्र प्रशंसनीय आहे. जुनी ऐतिहासिक कागदपत्रे, समकालीन फार्सी ग्रंथ, पुरातत्त्वाचे आधार, इ. मूलभूत संशोधनावरून बहमनी राजवट खूपच विस्ताराने लेखकाने मांडली आहे. हिंदु-मुसलमान यांचे संबंध कसे वाढत गेले याविषयीचे विवेचन खूपच तर्कशुद्ध आणि साधार आहे. बहमनी राज्यामध्ये, आफाकी म्हणजे परदेशी, आणि हबशी व एतद्देशीय मुसलमान यांचा काही बाबतीत संघर्ष आणि समन्वय कसा घडत गेला हे त्यांनी सोदाहरण दाखविले आहे. राजकीय घडामोडींबरोबरच लेखकाने अत्यंत तपशीलवारपणे ह्या काळात हिंदू व मुसलमान या दोन भिन्न संस्कृतींचा संगम काही प्रमाणात कसा घडला हे उत्तम तऱ्हेने दिग्दर्शित केले आहे. आणि ह्या ग्रंथाचे हे सर्वांत मोठे गुणवैशिष्टय आहे. लेखकाच्याच शब्दांत सांगावयाचे म्हणजे, " Like his brother Firoz, Ahmad was believer in the fusion of cultures and the influence of Hindu culture also had a place in the economy of Bidar ' (p. 166). त्याचप्रमाणे इराणातून आलेल्या लोकांचा येथील संस्कृतीवर परिणाम कसा झाला याची बोलकी उदाहरणे म्हणजे

बिदर येथील तख्त–इ–किरमानी, दौलताबादेच्या किल्ल्याच्या पायथ्याशी असलेला चांद मिनार आणि महमूद गावानची बिदर येथील मदरसा.

प्रा. शेरवानी यांनी या कालातील हिंदु–मुसलमानांच्या लढायांविषयी एक नवीन दृष्टिकोन मांडला आहे, तो खरोखरच विचारात घेण्यासारखा आहे. बहमनी राजे आणि विजयनगरचे अथवा तेलंगणचे हिंदू राजे यांच्या आपसांतील लढाया या जातीय नव्हत्या. ' If there ever was a communal outlook as between the Hindus and Muslims of Deccan, it had disappeared by this time. ' आणि या सर्व लढाया केवळ परस्परांच्या आर्थिक लाभासाठीच झालेल्या आहेत.

असो. सल्तनत कालातील महाराष्ट्र इतिहासापुरते यातील लिखाण बरेच उपयुक्त आहे.

The Mughal Empire, भारतीय विद्याभवन, १९७४

भारतीय विद्याभवनतर्फे भारतीय इतिहासाविषयी एक मालिका प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यातील हा सातवा खंड, ' The Mughal Empire ' या नावाने प्रसिद्ध आहे. या ग्रंथाच्या पोटात १४ व्या प्रकरणात ' Muslim Resistance to Mughal Imperialism and the five Sultanates of the Deccan ' असा विषय प्रा. जे. एन. चौधरी यांनी मांडला आहे. त्याचप्रमाणे सहाव्या खंडात ११ व्या प्रकरणात बहमनी राज्याचा विकास आणि ऱ्हास यांविषयी विवेचन करण्यात आले आहे. मध्यवर्ती सरकार कमकुवत ठरल्यामुळे छोट्या सुभेदारांना स्वतंत्रपणे आपली राज्ये स्थापता आली वगैरे विधाने केलेली आहेत. ही प्रकरणे वाचल्यानंतर असे वाटते की, ग्रंथकर्त्यांने दक्षिणच्या इतिहासातील अनेक महत्त्वाच्या घटनांना गौण स्थान दिले आहे.

निजामशाही सावरण्यामध्ये शाहजी भोसले याने फार मोठ्या प्रमाणात भाग घेतला होता. परंतु त्याचा साधा उल्लेखही यात कुठे आलेला नाही. अशाच तऱ्हेचे हे इतिहासाचे पुनर्लेखन असेल तर त्याचे मूल्यमापन अत्यंत कठोरपणे व्हावयास हवे.

निजामशाही आणि आदिलशाहीचा ऱ्हास झाल्याने दक्षिणेतील तत्कालीन परिस्थिती कशा तऱ्हेने बिघडली अथवा सुधारली आणि त्याचे एकूण परिणाम काय घडले याविषयी कोठेही विवेचन ग्रंथात नाही. इतर ग्रंथांप्रमाणे, उदा. Cambridge History of India प्रमाणे, यामध्ये एका राजानंतर दुसरा कसा आला आणि त्याने एखाद दुसरी कामगिरी केली असल्यास त्याचा उल्लेख, याच्यापलीकडे दुसरे काही सापडत नाही हे दुर्दैव. वास्तविक राजकीय घटनांचा, राज्यकर्त्यांच्या धोरणांचा जनमानसावर, समाजावर होणाऱ्या परिणामांचे मोजमाप अशा ग्रंथातून यावयास हवे. परंतु तसे काही दिसत नाही. उदाहरणच द्यायचे झाले तर हिंदू आणि इस्लामी संस्कृती यांचा संघर्ष कशा प्रकारे घडत गेला आणि इस्लामी धर्माला सत्तेचा आश्रय असूनदेखील ती संस्कृती जनमानसावर कायम पकड का घेऊ शकली नाही याचे

विवेचन आवश्यक होते. तसे करण्याचा प्रयत्न झाला असता तर या ग्रंथाचे मूल्य द्विगुणित झाले असते.

History of Bijapur, D. C. Varma, 1973, pp. 265

प्रस्तावनाकार एच. के. शेरवानी म्हणतात, ' Dr. Varma's history of Adil Shahi Dynsaty fills a lacuna in the series (History of Deccan).' या ग्रंथात डॉ. वर्मा यांनी राजकीय इतिहासास प्राधान्य दिले असून त्याचबरोबर राज्य-व्यवस्थेविषयी देखील थोडीफार माहिती दिली आहे. इ. स. १४९० ते १६८६ हा त्यांच्या अभ्यासाचा काल आहे. यात विजापूरकर आणि विजयनगरकरांचे संबंध आणि त्यांच्यातील संघर्षांची कारणे विस्ताराने दिली आहेत. विजयनगरकरांच्या पराभवानंतर आदिलशाही सत्तेचा झालेला प्रसार आणि उत्कर्ष, त्याचबरोबर इतर राज्यांशी आलेला त्याचा संबंध याविषयी माहिती बऱ्यापैकी आहे.

या ग्रंथासाठी प्रामुख्याने फार्सी साधनांपैकी 'तारीख-इ-फिरिश्ता', ' तुझकरत -उल्-मुल्क ' (परंतु याचे भाषातर त्यांना कोठून उपलब्ध झाले याविषयी ते गप्प आहेत), ' फतुहात-इ-आदिलशाही ', फुझूनी अस्त्राबादी, जहुरीचा ' मुहमदनामा ', नुस्नतीचा ' अलीनामा ' इ. अठ्ठावीस ग्रंथांचा आधार घेतलेला आहे.

महाराष्ट्र संस्कृती – महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास (इ. पू. २२५ ते इ. १९४७.), डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे, पृ. ३२०, १९७९. पृ. २४७ ते २६८ वर बहमनी व मराठाकाल, नाकर्ते यादव, बहमनी राजे, शियासुन्नी, देशी-विदेशी वाद, हिंदूंचा छळ, हिंदू प्रजेची स्थिती इत्यादीबद्दल माहिती दिली आहे. याच काळात रशियन प्रवासी निकितीन जुन्नर, अहमदनगर या ठिकाणी आलेला होता. तो लिहितो, " सरदार लोक सर्व गबर झाले असून या भूमीचे पुत्र हे दुःख व दारिद्र्यात पिचले होते. इ. १३८७ पासून बारा वर्षे महाराष्ट्रात अत्यंत भीषण दुष्काळ पडला होता. त्यावेळी सुलतान मुहमद याने एक हजार बैलांचा तांडा ठेवून गुजरात व माळवा येथून धान्य आणविण्याची व्यवस्था केली होती. ते धान्य स्वस्त दराने विकले जात होते, पण ते केवळ मुसलमानांना, हिंदूंना नव्हे " (Cambridge History of India, Vol. 3, p. 485). बहमनींची कारकीर्द वारसाहक्कासाठी झालेली बंडे व खून यांनी भरलेली आपणास दिसेल; महमद गावान याचा कालखंड सोडून बहमनींना राजकीय स्वास्थ्य व शांतता यांचा लाभ कधीच झाला नाही; अशा प्रकारची मते, तसेच विजयनगर व बहमनी यांचे संबंध, तसेच बहमनी राज्याचे झालेले पाच तुकडे येथपर्यंत ग्रंथकर्ता माहिती देतो. याच कालात ' History of Deccan ' by Sherwani & Joshi हा दोन खंडांत प्रसिद्ध झालेला ग्रंथ लेखकाने पाहिला नसावा याचे आश्चर्य वाटते. या ग्रंथामुळे त्यांचा इतिहासलिखाणातील पूर्वग्रह बराचसा बदलला असता, असे वाटते. आधारग्रंथांसंबंधी कोठेही निर्देश नाही. त्यामुळे व्यक्त केलेली मते ही निश्चितपणे त्या

त्या आधाराच्या साहाय्याने तपासून पाहता येत नाहीत, हा एक मोठाच दोष या ग्रंथात आहे असे म्हणावे लागते.

गेल्या पंचवीस वर्षांत विजापूरच्या आदिलशाहीविषयी चारपाच ग्रंथ कमीअधिक प्रमाणात निघाले. ते सर्व ग्रंथ बहुतेक विवेचनात्मक आहेत. आणि त्यांचा मुख्य आधार फार्सी भाषेतील साहित्य, तवारिखा, महजर, फर्माने, पत्रव्यवहार अशा प्रकारचा आहे. प्रसिद्ध झालेली कानडी आणि मराठी साधने व साहित्यसामग्री क्वचित् प्रसंगीच वापरलेली दिसते. पैकी ' External relations of the Bijapur kingdom (1489–1686) ' हा डॉ. नयीम यांचा प्रबंध पुढे पुस्तकरूपाने छापला गेला. यात आपण विजापूरकर आणि इतर दक्षिणी शाह्या तसेच विजयनगरकर यांचे राजकीय संबंध कशा प्रकारचे होते, तसेच इजिप्त, इराण या देशांशीदेखील विजापूरच्या बादशाहांचे राजनैतिक संबंध कसे होते याविषयीचा नवीन दृष्टिकोनातून अभ्यास करून मांडणी केली आहे, असा दावा ग्रंथकर्त्याने केला आहे. खरे म्हणजे हा दावा तितकासा बरोबर वाटत नाही. कारण दक्षिणेतील कोठल्याही प्रांतिक सरकारास दुसऱ्याबरोबर बरेवाईट संबंध इच्छेने अथवा अनिच्छेने ठेवावेच लागत होते, तेव्हा प्रश्न असा आहे की या सर्व संबंधांचा त्या राज्यांच्या अंतर्गत राज्यकारभारावर काय परिणाम घडला ? या ग्रंथाचे निरीक्षण करीत असताना असा प्रश्न निर्माण होतो की विजापूरचा इतिहास ज्या प्रकारे इतरांनी लिहिला आहे आणि अगदी आधीचा म्हणजे बुसातीन वगैरेमध्ये दिला आहे, त्यांच्यापेक्षा किती निराळ्या पद्धतीने याची मांडणी केली आहे ? अथवा नवीन घटना, ध्येय, धोरण विशद करण्यात आले आहे काय ते पाहणे महत्त्वाचे आहे. परंतु तसे फारसे नाही. कालानुक्रमे घटना, जशा घडल्या तशाच त्या दिल्या आहेत. इतर प्रांतिक राज्यांशी कशा प्रकारचे धोरण राबविले गेले आणि त्याची सुसूत्रता दीड-दोनशे वर्षे टिकून राहिली अथवा नाही यावर काहीच प्रकाश पाडलेला दिसत नाही. तरीही विजापूरकरांच्या राजवटीविषयी माहिती देणारा, एकसंध ग्रंथ म्हणून अभ्यासकाने तो अवश्य पाहिला पाहिजे.

दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाविषयी स्फुट लेखन :

यादवांच्या पराभवापासून ते मुघली सत्तेचा अंमल कायम होईपर्यंतच्या कालखंडाविषयी थोडेबहुत संकीर्ण लिखाण आजपर्यंत झाले आहे. त्याविषयी विचार करणे आवश्यक ठरते. Indian History Congress, Indian Historical Records Commission, यासारख्या विद्वत्परिषदांत झालेल्या निबं वाचनातून आणि चर्चांतून काही लेख प्रसिद्ध झाले आहेत. पण त्यांची संख्या वीस–पंचवीस लेखांपेक्षा जास्त नाही. विशेष उल्लेखिण्यासारखे लेख म्हणजे, काझीम मासूम रिझा यांचा ' Genesis of Indian diplomacy in the Deccan ' (१९६५), जुहारी यांचा ' Royal Karkhanas of the Tughlaq Sultans ' (1965), पाऊल यांचा ' Muslim

Ladies in India' (1965), डॉ. सिंग यांचा 'Peace Policy in early Medieval India', अस्करी हसन यांचा 'Medicines and Hospitals in Muslim India' आणि प्रस्तुत लेखकाचा 'Origin of Chauth and Chauthai kul' हे होत.

महाराष्ट्रेतरांचा विचार करताना कलकत्ता येथील डॉ. एस. पी. सेन यांनी स्थापन केलेल्या Institute of Historical Studies या संस्थेचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. या संस्थेने आपल्या त्रैमासिकातून एक लेखमाला प्रसिद्ध केलेली आहे. तिचे शीर्षक आहे— 'The North and South in the Medieval Indian History–contact and adjustments, religious, cultural, political, and administration, language and literature, religion and culture.'

या विविध विषयांवर प्रा. अहलुवालिया, प्रा. जगदीश नारायण सरकार, आशीर्वादीलाल श्रीवास्तव, डॉ. जी. एस. दीक्षित आणि प्रा. हरून शेरवानी यांसारख्या विद्वानांनी अत्यंत माहितीपूर्ण आणि ऐतिहासिक माहितीत भर घालणारे लेख लिहिले आहेत. ते इतिहासाभ्यासकांस निश्चितच उपयोगी पडतील. आता सर्वात शेवटी भारताच्या मध्ययुगीन अभ्यासाच्या आणखीही एका शाखेचा विचार आवश्यक आहे. ती शाखा म्हणजे मध्ययुगीन पुरातत्त्व ही ‍होय. डॉ. म. श्री. माटे आणि त्यांचे इतर सहकारी हे गेली तीनचार वर्षे देवगिरी उर्फ दौलताबाद येथे महत्त्वाचे उत्खनन करीत आहेत. आणि त्यांच्या या मोहिमेत तत्कालीन समाज आणि किल्ल्यांची व्यवस्था यासंबंधी बरीच नवीन माहिती उपलब्ध झालेली आहे. याविषयी, World Archaeology या मासिकाने 'Islamic Architecture' नावाचा अंक काढला आहे, त्यात विस्ताराने माहिती दिली आहे. मध्ययुगीन फार्सी ग्रंथांमधून अथवा इतरत्र जी माहिती उपलब्ध होत नाही ती उत्खननातून प्रथमच उजेडात येत आहे. तेव्हा मध्ययुगीन इतिहासाच्या अभ्यासाचे एक नवीन दालन यशस्वीरीत्या डॉ. माटे यांनी इतिहाससंशोधकांना उघडून दिले आहे, त्याचा निश्चितच फायदा होईल, असे वाटते.

आता शेवटी, गेल्या पंचवीस वर्षांत प्रसिद्ध झालेल्या मध्ययुगीन महाराष्ट्राच्या इतिहासाविषयी पुढील अनुमान काढता येईल :

फार्सी, मराठी आणि संस्कृत ग्रंथांच्या अभ्यासावरून दिसून येते ते असे की बहमनी कालाचा इतिहास सांगणारी, पातशाह्यांचा प्रारंभिक इतिहास सांगणारी पत्ररूप साधने फारशी उपलब्ध नाहीत. शिलाशासने व नाणी यांच्या योगाने केवळ एकदोन अंगांचाच इतिहास समजतो. तेव्हा त्या इतिहासासाठी फिरिश्ता, तबातबा, महमूद गावान यांसारख्या ग्रंथकारांवर अवलंबून रहावे लागते. या ग्रंथांत मुख्यतः सत्ताधाऱ्यांचा राजकीय इतिहास आला आहे. येथील लोकांच्या सर्वांगीण इतिहासावर लख्ख प्रकाश टाकणारी सामग्री प्रायः त्यात नाही. राजकीय व धार्मिक इतिहासावरून असे दिसते की शास्ते आणि शासित एकरूप झालेले नव्हते. शासितांना आपण सुखी नाही याची

खात्री होती आणि त्यातूनच नवीन संघर्षाची जाणीव निर्माण झाली असे मत प्रदर्शित करता येईल. या अनेकविध संघर्षांचा सखोल अभ्यास होणे आवश्यक आहे आणि ह्या अपेक्षेची पूर्तता इतिहासकारांची नवीन पिढी ऐतिहासिक कागदप त्रांच्या सखोल अभ्यासाद्वारे पार पाडील असा विश्वास वाटतो.

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६२ : १-४, १९८३-८४

Maratha historical writings : a general survey (1963–1983)

K. N. Chitnis
University of Poona, Pune

The first session of the Maharashtra History Congress was held in 1965, at Bombay. Its second session was held at Nasik in 1966. And it was in 1968, when its third session was held at Ahmednagar, that it was formally registered as '*Maharashtretihasa-Parishad*' under the "*Societies Registration Act*" and "*Public Trust Act.*" The fourth session was held in 1969 under the auspices of the Shivaji University, Kolhapur. But owing to certain difficulties, the next sessions of the Congress could not be held. Only recently attempts are being made again to revive the Parishad.

The motives that have inspired the scholars of Maharashtra History to launch the *Maharashtretihas Parishad* and similar other institutions have been :

(1) to undertake researches and writings on various aspects of the history of Maharashtra in English and Marathi and also in other Indian languages.

(2) to write, ultimately, a comprehensive and objective history of Maharashtra based on original, authentic and credible sources.

(3) to interest university and college teachers to undertake this important and difficult task.

(4) to publish source material available in different local languages; they could also be made available, in their translations into English, Hindi etc, to the non-Marathi scholars so that they also be acquainted with the objective

history of Maharashtra (and also the sources on which it is based).

The idea of ' removing the misunderstandings ' in the minds of the people outside Maharashtra about Maratha history was born at Jaipur. There, at a meeting of the Maharashtrian representatives, then attending the session of the Indian History Congress, and the local Maharshtrians, Prof. N. R. Phatak of Bombay expressed a desire that Maharashtrian scholars should make a united effort to remove such misunderstandings.

When an objective and scientific history of Maharashtra based on contemporary, reliable, and authentic sources is provided, naturally the misconceptions and misunderstandings, if any, based on hearsays, or unreliable materials or biased historical writings, will naturally be removed. The translations of local source materials into English will also, no doubt, further the cause of Maratha historical research.

Shri. V. S. Bendre, in his Presidential address at the Kolhapur session of the Parishad (1969), had among other things, observed that, college lecturers must be acquainted with the problems of historical research through orientation courses specially organised for them. The lecturers, on their part, should study the research literature and see that their teaching is enriched thereby. The teachers in the schools and lecturers in the colleges must also be exposed to knowledge of philosophy of history so that they may play their roles as teachers more efficiently and effectively.

I feel that now a time has come when the valuable treasure of historical knowledge needs to be brought within the reach of the common man also. And this could be done only through the teachers working at the school level, and also at the college level. Some steps in this direction are indeed being taken now in some institutions. M. Phil. courses have already been started in some universities

educating the students and teachers in the philosophy of history, in the methodology of history and in the study and use of original and authentic sources in historical writing. The orientation courses for college teachers are being held regularly wherein the students are apprised of the recent trends in historical studies and are also oriented in their teaching methods. We have organisations such as Maharashtra Secondary School Teachers' Association, Pune Secondary School Teachers' Association, etc. which arrange lectures for the teachers every year. The lectures on history are given by scholars who are in touch with the recent advances made in historical studies. These teachers are thus acquainted with the latest research in the field. This Jnāna-Gangā would thus flow down to the masses through the teachers at University, college, and school levels. It would be in the fitness of things if the present session of the Parishad could take concrete steps in making this system more effective and more widespread.

The research institutes in Maharashtra such as Bharata Itihasa Samshodhaka Mandala (Pune), Rajwade Samshodhana Mandala (Dhule), Godatir Itihasa Samshodhana Mandala (Nanded), Royal Asiatic Society, Bombay Branch, Itihasa Samshodhana Mandala (Bombay), Samarth Vagdevata Mandir (Dhule), Indian Historical Research Institute (St. Xavier College, Bombay), Xavier Centre for Historical Research (Panaji), and the like can themselves take part with universities and colleges in producing standard objective works on Maratha history, and in bringing this historical knowledge within the reach of the common people.

To come back again to the main objectives of the Maharashtretihas Parishad, *viz.*, (1) publication of source materials, and (2) writing a good and standard history of Maharashtra. From 1965 to 1983, i.e., roughly in the last two decades from the establishment of this body till today,

one feels sorry to note that, not much work has been done along the lines suggested by the Parishad. Few books have been written, in English or Marathi, but they have not fulfilled the requirements of real research. The critical examination of the sources pressed into service for writing history has often been neglected, or has been done most unsatisfactorily. Nobody has, during this period, risen to the level of earlier great historians such as V. K. Rajwade, Jadunath Sarkar, Shejwalkar or S. N. Joshi in writing the history of the Marathas. It is still true that the *New History of the Marathas* of G. S. Sardesai has not been effectively replaced. Whatever its shortcomings might be, it is still the only History of the Marathas written in English by a Maratha, that is available to the non-Marathi readers. So it is high time that a concerted action was taken by a band of well-equipped Maharashtrian scholars in the direction of writing a well-authenticated, objective, interpretative & comprehensive history of the Marathas. This must be undertaken immediately and in right earnest. The project will have to be followed up and completed within a prescribed time.

In the field of the second important task, that of editing and publishing the source materials, Maharashtra has made important strides. Since 1963, an immense amount of source material has been brought to light by both individuals and institutions through various periodicals, independent books and research papers. For example, the periodicals such as the *Traimasik* of the Bharata Itihasa Samshodhaka Mandala (Pune), the *Samshodhaka* of the Rajwade Samshodhana Mandala (Dhule), the *Itihasa ani Sanskriti* of the Mumbai Marathi Granthalaya, Bombay, the Vidarbha Samshodhana Mandala, Nagpur, the Marathwada Samshodhana Mandala, Shirurtajband, and the like, have been publishing stray articles as well as source materials. The BISM has brought out since 1964 twenty two Numbers of the Traimasik,

each having 4 quarterly issues. These contain 2 volumes of *Shiva-Charitra-Sahitya* (12th & 13th), 8 volumes of *Aitihasika Sankirna Nibandha* (7th to 15th), 6 of *Aitihasika-Sankirna-Sahitya* (12th to 17th), two of *Aitihasika-Farsi-Sahitya* (5th and 6th volume), and one special issue on Sri Jnaneshwar. These contain both source materials and articles. Vol. No. 14, for example, is devoted only to the publication of sources, while Vol. No. 16 contains articles of scholars.

In the *Samshodhaka* issued by the Rajwade Samshodhana Mandala, Dhule, from 1963-64 to 1980, there were stray articles mostly on literature and linguistics. A few articles on Rajwade's works were included. But from 1980 onwards articles on history begin to appear on social, economic and cultural aspects of Maratha history, which is a welcome development. The golden jubilee number of the *Samshodhaka* is indeed a valuable work, containing as it does, many important original sources as well as articles based on original unpublished sources deposited in the Rajwade Mandala, Dhule. It is important to note that the chief object of the *Samshodhaka* has been to publish important historical sources such as documents, manuscripts, correspondence, papers, coins etc. collected by the great Rajwade and deposited in the Mandala at Dhule. Another object, which is now almost fulfilled, has been the publication of the unpublished articles of V. K. Rajwade. But many important manuscripts, from the total collection of about 4,000 preserved in the Mandala are still awaiting publication.

The Quarterly of the Mumbai Marathi Grantha-Sangrahalaya's Itihasa Samshodhana Mandala, entitled *Bharatiya Itihasa Ani Sanskriti* has been publishing consistently a number of articles on Maratha history.

The Itihasa Samshodhana Mandala was established in 1958 as an offshoot of the Mumbai Marathi Grantha-sangrahalaya. In 1962 it got the recognition of the Govern-

ment of Maharashtra as an " Institute for research in Indian history and culture ", and since then it has been enjoying a financial grant-in-aid from the Government. It brings out its Quarterly regularly in April, July, October and January. Besides the Book Reviews, it has a special column called *Ithihasa Jagat* wherein the articles on history appearing in different dailies, monthlies and other periodicals in Maharashtra during the quarter are noticed briefly. This is an important feature and keeps the readers abreast of the times in historical knowledge.

Through the periodical, *Artha Vijnana* of the Gokhale Institute of Politics and Economics, Pune and the *Bulletin* of the Deccan College, Pune, some articles on Maratha History have been published. The Marathwada Samshodhana Mandala has also brought out some collections of articles.

The Maratha History Seminars held at Pune, Kolhapur and Bombay have produced some historical material in the form of articles in English throwing light on Maratha history. Of all these seminars, only the proceedings of the Kolhapur session have been published, while those of other sessions, containing some excellent papers, await publication. Attempts were made to convert this seminar into a permanent institution, but in vain. The seminar indeed has provided a national forum for the study of Maratha history, and it is highly desirable that it should be made a permanent institution with the necessary support of the Government of Maharashtra and the active involvement of the Universities in Maharashtra. The seminars held so far had, truly an all-India character, as the delegates attending these seminars came from different states of India, such as Bengal, Uttar Pradesh, Rajasthan, Himachal Pradesh, Orissa, Andhra Pradesh, Karnataka, and others. It is at such seminars that the misconceptions and misunderstandings of scholars outside Maharashtra about Maratha history could be removed by free and

frank discussions based on original authentic source materials.

Even outside Maharashtra the study of Maratha history was carried on in some form or the other. Papers were read at the sessions of Indian History Congress, or at the seminars sponsored by the ICHR at the sessions of the Epigraphical Society of India, of the Numismatic Society of India, and the like. Articles appearing in the "*Idea of History*", in the "*Marga*", in the "*Journal of Indian History*", and such other journals throw important light on the history of the Marathas.

In the publication of source materials, articles and even books, the universities and colleges can take an active part. That this can be done is well demonstrated by the Shivaji University, Kolhapur. It has brought out in the last decade three volumes of *Tarabai-Kalina Kagadapatre*, one volume of *Jijabai-Kalina Kagadapatre* and two volumes of *Farsi Kagadapatre.* Recently, the Department of History of the University of Poona was successful in forming an academic association of the teachers of history of the Poona University called the 'History Academy', which has started issuing a historical bulletin called *Rojnishi*. The Marathwada University was lucky enough to purchase the remnant of the Menavali Daftar from the Parasnis family, and it can render good service to the cause of historical research, if it could publish the important documents from this collection.

The Government archives in Maharashtra have caught up with the times by bringing out printed catalogues of unpublished documents available in their different sections. Thus two volumes of *Shahu Daftaratil Kagadapatranchi Suchi*, in Pune Archives, one volume of *Niwadi Daftaratil Kagadapatranchi Suchi*, and *Rajarshi Shahu-Sambandhi Kagadapatranchi Suchi* in Kolhapur Archives have come out.

The Nivadi documents are 24, 995 in number and are bound in 154 Rumals. The catalogue lists the documents

relating to Chhatrapati Sambhaji (1715-60), Shivaji III, Shahaji, Shivaji IV, and Rajaram II, and various Sardars, to trade and commerce, to watan decisions, to the judicial decisions of village disputes and the like. The Directorate of Maharashtra Archives has published a collection of the original letters of the times of Shivaji, a collection of Hindi documents in the Pune Archives by Raghubir Sinh, and the specimen handwritings of the notable personalities of the Maratha times. The Nagpur Museum has published two books containing the catalogues of coins belonging to Mughal times. Recently a book has been brought out in Indore on the Holkar coins. The Maharashtra Archives have been popularising the study of documents by arranging their annual exhibitions. Their efforts in this direction are indeed praiseworthy.

Besides the source materials and articles in various periodicals or journals, some independent books also have appeared on Maratha history in the last two decades. Sri Setu Madhavrao Pagadi's book on *Chhatrapati Shivaji* (1974), Dr. A. R. Kulkarni's monograph on *Maharashtra in the Age of Shivaji* (1969), Dr. B. K. Apte's *Maratha Navy and Merchant-ships*, *Bajirao II* by Dr. (Smt.) Suman Vaidya, *Chhatrapati Sambhaji* by the late Dr. (Mrs.) Kamal Gokhale, *Bhosle Raghuji II of Nagpur* by Dubey, the *Battle of Kharda* by Dr. G. T. Kulkarni and Dr. M. R. Kantak, *Chhatrapati Rajaram* by P. S. Joshi, *The Maratha Supremacy* (ed. R. C. Mujumdar and V. G. Dighe), Vol. 8 of the series, *The History and culture of the Indian People*, *Parasarama - Charitam* by Dr. N. Wagle and Dr. A. R. Kulkarni, *A Survey of Material in Marathi on the Economic and Social History of India* by V. D. Divekar (1981), are some of the books published on Maratha history. Similarly in Marathi we have a number of books on Maratha history such as शिवचरित्र – एक अभ्यास, by Shri. Setu Madhavrao Pagadi, शिवकालीन महाराष्ट्र by Dr. A. R. Kulkarni, शिवकालातील व पेशवाईतील

स्त्रीजीवन by Smt. Deshmukh, थोरले बाजीराव by Sri. Dikshit, निजाम-पेशवे संबंध by T. S. Shejwalkar, मराठे-पोर्तुगीज संबंध by Shri. Pandurang Pisurlenkar, शहाजीराजे, शिवछत्रपति महाराज, मालोजीराजे by Shri. V. S. Bendre, निवडक लेख by Prof. G. H. Khare, करवीर रियासत (3 Vols.) by S. M. Garge and the like. Further some of the books are of a comprehensive nature in which some chapters would be found written on Maratha history. Such, for example, are the *History of Medieval Deccan* edited by Dr. H. K. Sherwani and Dr. P. M. Joshi (1973), *Glimpses on Medieval Indian Ideas and Institutions* and the *Socio - economic aspects of Medieval India*, both by K. N. Chitnis, and *Medieval India* by Satish Chandra. Such, in brief, is the output of history works on Maratha history in the last two decades.

When we thus take stock of the work done on Maratha history, we notice that comparatively more has been done by way of publication of source materials than by way of writing independent interpretative books. Even in the case of publication of sources much remains to be done as yet. By and large only the Marathi and Persian sources have been brought to light. The Portuguese sources contain a mine of information throwing light on Maratha history. Only Dr. P. S. Pisurlencar and Shri. S.S. Desai have brought out translations of some Portuguese documents. The History Department of Poona University has introduced a Certificate Course in Portuguese which can train some workers with the necessary equipment for making available to the scholars the translations of the important Portuguese documents. Next, it is also necessary to tap the Gujarati sources, which lie in 644 Rumals in the Pune Archives, eagerly waiting to render their services if only somebody cares to look at them. Last, but not the least, there are Kannada documents also relating to Maratha history which could be pressed into service by getting them properly translated, edited and published.

With all these shortcomings, it could be safely asserted

that for writing Maratha history fairly enough source material is available. It was in 1898 that Rajwade wrote in the Introduction to the first Volume of his मराठ्यांच्या इतिहासाची साधने that the first task of the history scholars in the next ten to twenty years was to find out original documents and publish them (p. 6). This tradition has been carried on faithfully by the Maratha researchers till today. However, while doing so, the other side of the complex task is not fully attended to. We have now enough sources (enough, not all), for writing a comprehensive interpretative Maratha history in its different aspects. If M. G. Ranade could write in the last century a thought-provoking and interpretative work when the sources were not available in sufficient numbers, why can't the present-day scholars write such works when there is an abundance of such sources ?

Formerly, more stress was laid on political history. But now the trend in historiography is to know how the common man lived and worked through the ages. Researchers are no longer interested in mere compiling the chronological records of court intrigues and conspiracies, of battles fought and treaties concluded, of kings' campaigns and achievements, but wish to discuss and analyse various aspects of the life of the people such as religion, ethics, education, social life, trade and commerce, agriculture, fine arts, law and legal institutions, political changes and statecraft, etc.

Happily, beginning in this direction has already been made. In the Universities, theses are being written by adopting, in many cases, a well-accepted research methodology under the supervision of experienced professors. Various topics relating to Maratha history are judiciously selected. The selection of topics so far made, in keeping with the modern trends of historiography, relate to such subjects as, Military History : the Maratha forts, the First Anglo-Maratha War, the Third Anglo-Maratha War etc., Economic History :

Trade, Industry and Commerce in Western Maharashtra during the Peshwa Period, Peshvekalina Khandesh, Maratha agrarian system, etc., Social History : Social life under the Peshwas (by Dr. Miss Sudha Desai, Bombay and also by Dr. G. B. Joshi, Pune), शिवकालातील व पेशवाईतील स्त्रीजीवन (by Mrs. Sharada Deshmukh, Tilak Vidyapeeth). Some of the topics on which Ph. D. theses are in the offing are–" Female education under the Peshwas ", " A Socio - Economic study of Ahmednagar Sarkar during the Peshwa period ", " Bara balutes under the Marathas ", " Social Life in Konkan during Peshwa period ", and the like.

Research by M. Phil. students is being carried on on such topics as " The Agrarian System in Ahmednagar District, 1750–1850 ", " Survey Settlements in Konkan, 1756–1856 ", " Dharwad in transition ", " Karnataka under the Maratha rule with special reference to socio - economic conditions ", " Saints and Yogis during the Peshwa period ", " Temple architecture in Saswad Pargana during the Peshwa Period ", " Rajwade on Bakhars ", and " The Socio - economic conditions in the Jamkhandi State, " and also " The Socio - economic conditions in the Sangli State ".

Such are the topics on which theses and dissertations are being written in the Universities in Maharashtra today. Although the standard and quality of these research works are sought to be maintained at a fairly good level, certainly they cannot be compared with the treatises written by experienced and well–qualified historians. Yet the new trend of historical writings in the academic world, as indicated above, has to be developed further. The experienced historians have now to step forward for writing full - length objective historical works on Maharashtra which would meet the demands of the day.

Another important feature of modern research is the inter disciplinary approach to the subject. To write on the

economic aspects of Maratha history, one should have a good grounding in the economic theories and their applications. Similarly, for writing a social history of medieval Maharashtra, one has to have a good background of sociology, anthropology, linguistics and even of law and legal institutions. One has to be also conversant with the basic ideas contained in Marxian and Weberian theories concerning these fields. It is also increasingly felt that without an adequate knowledge of medieval Indian archaeology, the social life under the Marathas cannot be properly studied. The excavations now being conducted at Daulatabad by a band of scholars like Dr. Pathy, Dr. Mate and Dr. Morwanchikar, or the excavations, though on a smaller scale, conducted at Nasik, Kolhapur, Karad and other places, would certainly enrich our knowledge of the social life in medieval Maharashtra. They also indirectly throw light on trade, commerce and industries of the people in those days.

As for the Maratha period, we find that for the 'royal times' i. e. mostly, the seventeenth and early eighteenth centuries, the original authentic source materials are comparatively few, and hence the writing of economic, social, cultural history of this period has its limitations. For the 'Peshwa period', there are numerous documents in the Government archives at Pune Bombay, Kolhapur, Nagpur and Aurangabad, also in various private archives such as Bharata Itihasa Samshodhaka Mandala (Pune), Rajwade Samshodhana Mandala (Dhule),etc. Besides these, much useful archival material is available in the Goa Archives (Panaji), State Archives (Hyderabad), Karnataka Archives (Bangalore), Saraswati Mahal Library (Tanjore), the Meckenzie Collection in the Madras Oriental Government Library (Madras), the National Archives of India (Delhi), the British Museum Library (London), and the Government Archives (Lisbon). The quantification methods also could be pressed into service

while using the accounts papers available in these archives and repositories of documents.

Some attempts, no doubt, have been made to write on different aspects of the economic history of the Marathas. Avlaskar wrote on the Zakat System under the Peshwas on the basis of the documents selected from the Pune Archives.

Avlaskar's book Nāgāv : arthika va samajika jeevan, 1760–1840 (1962), and Madhav Apte's thesis on Income and Expenditure of the Maratha Government (1763–73), C. B. Joshi's essay on Indapur entitled " Indapur Village – A Study in economic histoty " and M. D. Apte's work on ' Gulumb ' in Vai Taluka, " मौजे गुळुंब .... या गावचा १८ व्या शत-कातील आर्थिक इतिहास " (भारतीय इतिहास आणि संस्कृति, Jan. 1973) V. D. Divekar's paper on ' The Emergence of an Indigenous Business class in Maharashtra in the Eighteenth Century ' (Mod. Asian Studies, 1982), and finally A. R. Kulkarni's study on Indapur, are some of the attempts made in this direction.

Similarly on social, cultural and other aspects of Maratha history, there have been some works and articles. But a comprehensive treatment of the different aspects, especially of the socio – economic and cultural aspects of Maratha history, is still in the realm of ideas, and it is to be hoped that, the idea of such a history will become a realised act in the near future.

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६२ : १-४, १९८३-८४

मराठी सत्तेच्या उदयास्ताची भौगोलिक मीमांसा

दि. मु. वाघ.
स. प. महाविद्यालय, पुणे

मराठ्यांचा इतिहास १७ व्या शतकाच्या मध्यास सुरू होतो. या इतिहासाचा एकूण कालावधी सुमारे १५० वर्षांचा आहे. या कालावधीत मराठी राज्याचा विस्तार होत असताना मराठ्यांचा संबंध कितीतरी बिगर-मराठी सत्तांशी आला. त्यांत प्रामुख्याने मुघल (दिल्ली), अफगाण, सिद्दी, दक्षिणेकडील मुसलमानी राज्ये, पोर्तुगीज व इंग्रज यांची गणना होते.

मराठ्यांचे बिगर-मराठी सत्तांशी आलेले संबंध निरनिराळ्या भौगोलिक पार्श्वभूमीवर आधारित होते. मराठ्यांचा इतिहासकाल बराच मोठा असल्याने व हा इतिहास भारताच्या फार मोठ्या क्षेत्रांशी निगडित असल्याने, इतिहासातील प्रत्येक ऐतिहासिक धटनेची भौगोलिक पार्श्वभूमी उकलून पाहणे व अभ्यासणे या लहानशा निबंधात अशक्य आहे. तरीसुद्धा मराठ्यांचे बिगर-मराठी सत्तांशी जे संबंध आले त्यांपैकी ज्या संबंधांवर एखाद्या विशेष भौगोलिक घटकाचा परिणाम प्रकर्षाने जाणवतो, त्याविषयीची स्थूल कल्पना पुढील तक्त्यावरून येऊ शकेल :

विशेष भौगोलिक घटक	महत्त्वाची बिगर-मराठी सत्ता	काळ
१. भू-रचना	आदिलशहा-मुघल	१६४५-१७०७
	इंग्रज	१७७४-१८१८
२. हवामान	निजाम	१७२०-१७९५
३. जलस्थिती	अफगाण, रोहिले	१७५९-१७६२
४. जंगले	हैदरअली	१७६२-१७७२
५. समुद्रकिनारा	सिद्दी, पोर्तुगीज, इंग्रज	१६६०-१८००

वर उल्लेख केल्याप्रमाणे मराठ्यांच्या इतर सत्तांशी आलेल्या संबंधांवर भौगोलिक दृष्टिकोनातून प्रकाश टाकणे जागेअभावी अशक्य असल्याने, मराठी सत्तेचा

उदय, विस्तार व अस्त या तीन टप्प्यांची भौगोलिक मीमांसा स्थूलरूपाने करण्याचा प्रयत्न येथे केला आहे.

(अ) मराठी सत्तेचा उदय :

(**१**) **भौगोलिक स्थान :** कोणत्याही समाजास त्याच्या देशातील भोगोलिक स्थानापासून मिळणारे फायदे–तोटे हे त्याच्या सांस्कृतिक पातळीवर अवलंबून असतात. मराठी सत्तेचा उदय महाराष्ट्राच्या ज्या पश्चिम भागात झाला, त्या पश्चिम महाराष्ट्राचा विस्तार १६° उ. ते २०° उ. आणि ७३° पू. ते ७४° पू. असून, १७ व्या शतकातील राजमार्गांपासून दूर आणि दुर्लक्षित असा तो भाग होता. त्या काळात पश्चिम किनाऱ्यापासून देशांतर्गत भागात सहज प्रवेश प्राप्त करून देतील असे मार्गही या भागातून जात नव्हते. त्यामुळे व्यापार आणि उदीम या दोन्ही दृष्टींनी दिल्लीकर किंवा विजापूरकर यांना या भागात विशेष रस नव्हता. इतकेच नव्हे तर, वरील दोन्ही राज्यांतील हा भाग इतर शासकीय प्रदेशांपासून दक्षिणोत्तर पसरलेल्या ' पर्जन्यछाये 'च्या प्रदेशामुळे व तेथे वारंवार पडणाऱ्या दुष्काळांमुळे शास्त्रीय दृष्टया विलग होता.

मराठी सत्तेचा उगम ज्या मावळ भागात झाला त्या मावळचे भौगोलिक स्थान वैशिष्टयपूर्ण आहे. पश्चिमेकडील तत्कालीन अविकसित समुद्रकिनाऱ्याचा प्रदेश व पूर्वेकडील पर्जन्यछायेचा दुष्काळी प्रदेश या दरम्यान मावळ प्रांत पसरलेला आहे.

दिल्लीकर आणि विजापूरकर या दोन्ही भू–सत्ता होत्या. महाराष्ट्राच्या पश्चिमेकडील समुद्रकिनाऱ्याचे त्यांना फारसे आकर्षण कधीच वाटले नाही. शिवाय हा समुद्रकिनारा महाराष्ट्रात दक्षिणेकडे खडकाळ व डोंगराळ आणि उत्तरेकडे दलदलीचा व रोगट असल्याने दोन्ही सत्तांचे त्याकडे दुर्लक्षच होते.

मावळच्या पूर्वेकडील पर्जन्यछायेचा प्रदेश हा सतत दुष्काळी प्रदेश राहिलेला आहे.कमी लोकसंख्येचा हा प्रदेश शासकीय दृष्टयाही अस्थिर होता. दुष्काळाच्या वेळी अंमलदार आपली ठाणीही सतत बदलत; त्यामुळे शासकीय अंमलही या भागात ढिला होता. त्यामुळे या भागाच्या पडद्याआड चालणाऱ्या मराठी सत्तासंपादनाच्या प्रयत्नांकडे विजापूर आणि दिल्ली येथील सत्तांचे सुरुवातीस फारसे लक्ष गेले नाही.

शिवाजीच्या राज्यास पश्चिमेस समुद्रकिनाऱ्याची सीमा मिळाल्याने त्या दिशेने त्याचे राज्य अधिक सुरक्षित होते. अर्थात याचा अर्थ असा नव्हे की त्याने त्या बाजूने शक्य असलेल्या धोक्यांकडे (सिद्दी किंवा इतर सत्ता) दुर्लक्ष केले किंवा त्यांना कमी लेखले. एवढे मात्र खरे की त्याचे प्रयत्न प्रामुख्या ` भूप्रदेशाकडे रोखून होते. त्याची कारणे खालीलप्रमाणे होती :

१. त्याची सागरी शक्ती मर्यादित होती.

२. एकाच वेळी जमीन आणि सागरी सत्तांशी लढणे त्यास अशक्य होते.

३. मराठी स्वराज्यनिर्मितीच्या त्याच्या प्रयत्नास जमिनीकडूनच खीळ बसणार होती. शिवाजीचे लक्ष त्यामुळे भूसीमेच्या रक्षणाकडे अधिक होते.

पश्चिम महाराष्ट्राचा काही भाग दिल्लीच्या मुघल साम्राज्यात तर काही भाग विजापूर राज्यात मोडत होता. तरी देखील तेथील चढउताराच्या भूमीमुळे व अविकसित दळणवळणाच्या साधनांमुळे तो वरील राज्यांच्या उर्वरित प्रदेशांशी घनिष्टपणे जोडला गेला नव्हता. पश्चिम महाराष्ट्र हा दोन्ही राज्यांच्या विजन भागांचा मिळून एक प्रदेश तयार झाला होता. या प्रदेशातील शासनही मुलकी अधिकाऱ्यांकडे म्हणजे देशमुख देशपांडयांकडे होते. शिवाजीने या प्रदेशाच्या एकांतवासाचा फायदा घेऊन, देशमुखांचा बीमोड करून मावळ भागात स्वराज्याचे अधिष्ठान स्थापले.

२. भू-रचना : 'भू-रचना' ही संज्ञा भूरूपवाचक आहे. भू-रचनेचे मराठी राज्याच्या उदयावर झालेले परिणाम थोडक्यात असे :

१. पश्चिम महाराष्ट्रातील डोंगराळ जमीन व घाट-प्रदेश यांचा उपयोग शिवाजीने योग्य त्या ठिकाणी किल्ले बांधण्यात व त्यांच्या साहाय्याने जलद संचार करण्यात केला. फार मोठया मुघल सैन्याच्या विरुद्ध जलद हालचाली करणे मराठयांना किल्ल्यांमुळे शक्य झाले; तसेच अशा प्रकारच्या भू-रचनेस सुसंगत अशा गनिमी काव्याचे तंत्र त्यांनी आत्मसात केल्याने मुघल आक्रमणाविरूद्ध ते टिकाव धरू शकले.

२. येथील विशिष्ट भू-रचनेचा परिणाम अप्रत्यक्षपणे व अल्पांशाने ग्राम-वसाहती व त्यांच्या पंचायत-पद्धती निर्माण करण्यात झाला. त्याचप्रमाणे जमीन-महसुलाची रयतवारी मिरासदार पद्धतीही अस्तित्वात येण्यास मदत झाली. डोंगराळ भू-रचनेचा परिणाम हा पश्चिम महाराष्ट्रातील लोकात उत्पन्न झालेली स्वातंत्र्याची जाण, साहसवृत्ती, स्वावलंबन, काटकपणा इत्यादी गोष्टींत दृग्गोचर होतो. लोकांच्या या वृत्तीमुळेच मुघल सत्ता पश्चिम महाराष्ट्रात फार काळ टिकू शकली नाही.

३. कोकण आणि घाट प्रदेश या महाराष्ट्राच्या पश्चिम भागास सह्य पर्वताने नेहमीच पूर्वेकडून संरक्षण दिलेले आहे. या गोष्टीचा उपयोग शिवाजीने स्वराज्य निर्माण करण्यास पूर्णपणे करून घेतला. दिल्लीकर आणि विजापूरकर यांच्या आक्रमक वृत्ती आणि कृतीपासून सह्याद्रीमुळे मराठी स्वराज्यास कसे संरक्षण मिळाले हे सर्वश्रुत आहे.

४. हवामान : पश्चिम महाराष्ट्राच्या पूर्व भागात, तेथे वारंवार पडणाऱ्या दुष्काळांमुळे, समाजजीवन विस्कळीत झाले होते, याचा उल्लेख पूर्वी आलाच आहे. दुष्काळ पडला की ह्या भागातील मुलकी अधिकारी त्यांची ठाणी इतरत्र नेत; लोकांना मात्र ते ईश्वरी कोपावर सोपवून जात. हवामानदृष्टया असुरक्षित असलेल्या या भागात स्थैर्य व शांतता टिकविण्याइतके सामर्थ्य तत्कालीन कोणत्याही सत्तेजवळ नसल्याने शिवाजीस या भागात उठाव करणे शक्य झाले. लोकांना गावात वस्ती करण्यास तसेच पडीक जमिनी कसण्यासाठी प्रलोभने दाखवून व प्रोत्साहन देऊन त्याने स्थानिक लोकांन

विजापूर दरबारविरुद्ध संघटित केले व त्यांचा स्वराज्यनिर्मितीच्या उद्योगास पाठिंबा मिळविला.

(ब) मराठी सत्तेचा विस्तार

मराठी सत्तेच्या विस्तारास काही भौगोलिक बाबी कशा साहाय्यक किंवा मारक ठरल्या हे बघण्यासारखे आहे.

१. भौगोलिक स्थान :- शिवकालात मराठी राज्याचा विस्तार डोंगराळ प्रदेशापुरता सीमित होता; अशा राज्यासाठी राजधानी म्हणून रायगडचे भौगोलिक स्थानही अनुकूल होते. पण पुढे १८ व्या शतकात मराठ्यांचा राज्यविस्तार मोकळ्या, सपाट प्रदेशात होऊ लागल्याने, राजधानीचे केंद्र पूर्वेकडे येणे क्रमप्राप्त होते. पेशवाईत मराठ्यांच्या हालचालींचे केंद्र पुणे नगर होणे हे स्वाभाविक होते.

महाराष्ट्राच्या पठारी प्रदेशात स्थिर पाय रोवल्यावर मराठ्यांनी इ. १७२०–२५ या काळात मुघल साम्राज्याचे माळवा व गुजरात हे दोन प्रांत पादाक्रांत केले. हे दोन्ही प्रांत समृद्ध तसेच उत्तर-दक्षिण भारतास जोडणारे साखळी प्रदेश होते. त्यांच्या या विशिष्ट भौगोलिक स्थानामुळे मराठ्यांचे लक्ष प्रथम त्यांच्याकडे वेधले गेल्यास नवल नाही.

वरील प्रदेश व बुंदेलखंडाचा काही भाग व्यापल्यावर मराठ्यांनी त्यांचा राज्यविस्तार त्यापलीकडील अंतर्वेदीत (गंगा – यमुना खोऱ्याचा पश्चिम व नैऋत्य भाग) केला. त्यामुळे मुघल साम्राज्याच्या निरनिराळ्या पण परस्परांत द्वेष करणाऱ्या प्रादेशिक घटकांवर नियंत्रण ठेवणे मराठ्यांना शक्य झाले.

उत्तर भारताप्रमाणे मराठ्यांनी दक्षिणेकडील म्हैसूरच्या पठाराचे भौगोलिक महत्त्व समजावून घ्यावयास पाहिजे होते; पण तसे त्यांनी केले नाही. त्याचा दुष्परिणाम त्यांना पुढे भोगावा लागला.

२. भू-रचना : इतिहासावरून हे स्पष्ट होते की १७ व्या शतकातील राज्यविस्तारासाठी मराठ्यांचे लष्करी डावपेच पश्चिम महाराष्ट्राच्या भूरचनेशी सुसंगत होते. या काळातील काही महत्त्वाच्या घटना बघण्यासारख्या आहेत.

शिवाजीने मावळ्यांना प्रथम डोंगराळ भागात संघटित केले; मग त्याने विजापूरच्या ' पठारी ' व ' कोकणी ' भागास सांधणारा जावळी तालुका हा ' सेतु-प्रदेश ' ताब्यात घेतला. त्यामुळे त्यास पुढे विजापूर राज्याचा कोकणी प्रदेश घेण्यास मदत झाली. शिवाजीचा राज्यविस्तार दक्षिणोत्तर होता व सह्याद्री त्याच्या पाठीमागे असल्याने त्याचे राज्य पूर्णपणे सुरक्षित होते. शिवाजीने राज्यविस्तार प्रामुख्याने पायदळाच्या साहाय्याने घडवून आणला.

अठराव्या शतकातील परिस्थिती निराळी होती. विजापूर आणि गोवळकोंडा ही दक्षिणेकडील मुसलमानी राज्ये केव्हाच संपुष्टात आली होती. आणि दिल्लीची मुघल

सत्ताही विपन्नावस्थेत होती. या काळात चौथाई आणि सरदेशमुखी गोळा करण्याच्या निमित्ताने मराठ्यांनी लांब पल्ल्यांच्या स्वाऱ्या उत्तरेकडे केल्या. त्याची परिणती मराठी साम्राज्यविस्तारात झाली. या साम्राज्यविस्ताराच्या प्रक्रियेवर भूरचनेचा कसा परिणाम झाला हे खालील घटनांवरून दिसून येईल :

अ. मराठ्यांच्या उलाढालींचे केंद्र कोकणातून सरकून पुण्याच्या मैदानी प्रदेशाकडे गेले.

आ. पश्चिम महाराष्ट्राच्या पठारी मंचकावरून दूरवरच्या प्रदेशांवर स्वाऱ्या झाल्या.

इ. या लांब पल्लयांच्या स्वाऱ्यांसाठी मराठ्यांना जलद हालचालींची गरज होती. ही गरज त्यांनी सैन्याचा घोडदळ विभाग वाढवून भागविली.

ई. मोकळ्या माळरानावरील हालचालींसाठी घोडा हे सोयीचे साधन असते; पण जर जमीन दलदलीची, रेताड, भुसभुशीत किंवा डोंगराळ असेल तर ते साधन फार अवजड ठरते. या दृष्टीने मोठ्या व लांब पल्ल्यांच्या हालचालींसाठी घोडा हे साधन वापरून मराठ्यांनी, अनवधानाने का होईना, त्यांच्या साम्राज्यविस्ताराची मर्यादा निश्चित केली. जेथपर्यंत मराठी घोडा जाऊ शकला अशा प्रदेशातच मराठ्यांच्या स्वाऱ्या झाल्या, ही गोष्ट विचारात घेण्यासारखी आहे.

उ. फार क्वचित मराठी घोडा सिंधू, गंगा, यमुना व कावेरी यांसारख्या मोठ्या नद्या ओलांडू शकला. अर्थात् त्यामुळे उत्तरेकडे यमुना व दक्षिणेकडे तुंगभद्रा या नद्यांनी मराठी राज्यविस्ताराच्या सीमा निर्धारित केल्या.

ऊ. वरील निर्धारित सीमांच्या अंतर्गत भागात व समुद्रसपाटीपासून ४५० मीटरपेक्षा अधिक उंच असणाऱ्या मोकळ्या पठारी प्रदेशांत, जेथे जेथे मराठी घोड्यांच्या हालचाली सहज शक्य झाल्या तेथे तेथे मराठी राज्याचा विस्तार झाला.

ए. अशा रीतीने भू-रचनेचा परिणाम मराठी राज्यविस्तारावर तर झालाच, पण त्याहीपेक्षा तो मराठ्यांच्या स्वाऱ्यांच्या दिशांवरही झाला. मराठ्यांनी लांब पल्ल्यांच्या स्वाऱ्या ज्या मार्गांनी केल्या ते मार्ग नकाशात बघितले असता ही गोष्ट अधिक स्पष्ट होते.

३. **हवामान :** हवामानाचा परिणाम मनुष्याच्या जीवनपद्धतीत तसेच त्याच्या कार्याच्या स्वरूपातही प्रतिबिंबित झालेला आढळतो. पश्चिम महाराष्ट्राचे हवामान शेतीस फार चांगले असे म्हणता येणार नाही. स्वाभाविकपणे, हवामानाच्या दृष्टीने समृद्ध प्रदेश हस्तगत करण्याच्या मराठ्यांच्या इच्छेला धरूनच मराठी राज्यविस्ताराची प्रक्रिया झालेली दिसून येते.

अ. पश्चिम महाराष्ट्राचा पठारी प्रदेश हा निम-ओसाड, मध्यम तपमानाचा, कमी तपमान-कक्षेचा व अनिश्चित पावसाचा असा दुष्काळी 'ज्वारी-बाजरी'चा प्रदेश आहे. त्यामुळे उत्तरेकडील समृद्ध 'गव्हाचा' आणि दक्षिणेकडील 'भात-

शेती 'चा प्रदेश ताब्यात घ्यावा हे मराठयांना वाटणे स्वाभाविक होते.

आ. पश्चिम महाराष्ट्रातील पठारी प्रदेश हा उष्ण कटिबंधीय गवताळ प्रदेशात मोडतो. येथे १०० सें. मी. पेक्षा कमी पाऊस पडतो. अशा हवामानात वाढलेला मराठी पिंड, राज्यविस्तारासाठी महाराष्ट्राबाहेर पडल्यावर, मायभूसदृश हवामान असलेल्या पठारी प्रदेशात मोकळया हालचाली करू शकला. मराठी राज्यविस्ताराच्या कक्षाही त्यामुळे आपोआपच निश्चित झाल्या. भारताचा १०० सें. मी. समपर्जन्य दर्शविणारा नकाशा व भारतातील मराठी राज्यविस्तार या दोन्ही नकाशांची तुलना केली असता त्यात फार साम्य आढळते व मराठी राज्यविस्तारावर हवामानाचा परिणाम कसा झाला हे स्पष्ट होते.

इ. भारतात दोन ऋतू महत्त्वाचे समजले जातात. त्यांना 'बिनपावसाचा' व 'पावसाळा' असे म्हणता येईल. या दोन ऋतूंच्या तालबद्धतेचा परिणाम मराठी स्वाऱ्यांच्या वेळा व कालावधीवर झालेला दिसून येईल. पावसाळा संपत आल्यावर मराठयांच्या स्वाऱ्या बाहेर पडत (कारण त्यावेळी नद्यांचा पूर ओसरलेला असे) व पावसाळा सुरू होण्याअगोदर त्या मायदेशी परत येत.

(क) मराठी सत्तेचा अस्त

मराठी सत्तेचा अस्त फारच जलद, म्हणजे मराठी अंमलाच्या शेवटच्या दोन दशकांत झाला. मराठी सत्तेच्या ऱ्हासाची भौगोलिक मीमांसा करताना खालील निष्कर्ष निघतात :

१. मराठी राज्यविस्तारातील असमतोल : मराठी राज्यविस्तार प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्राच्या दक्षिणोत्तर झाला. मराठयांच्या हालचाली जसजशा नर्मदेच्या उत्तरेस होऊ लागल्या, तसतसे या हालचालींच्या केंद्राचे, म्हणजे पुण्याचे मराठी राज्यातील "भौगोलिक मध्यत्व" नाहीसे होऊ लागले. त्याचा स्वाभाविक परिणाम असा झाला की, वाढत्या राज्यविस्ताराच्या दृष्टीने आवश्यक ती क्षेत्रीय गरज पुणे शहर भागवू शकले नाही व पुण्याचे मराठे सरदारांवरील वजन कमी होऊ लागले.

२. मराठी 'सत्ता–अक्षाची' निर्मिती : थोरल्या माधवरावाच्या मृत्यूनंतर (१८ नोव्हेंबर, १७७२) मराठयांची मध्यवर्ती सत्ता कायमची दुबळी झाली. नंतरच्या काळात, उत्तरेस ग्वाल्हेर व दक्षिणेस पुणे ही मराठी सत्तेची प्रातिनिधिक केंद्रे अस्तित्वात येऊन मराठी 'सत्ता–अक्षाची' निर्मिती झाली. या अक्षाची दोन टोके, म्हणजेच वरील दोन केंद्रे परस्पराभिमुख नव्हती. धोरण, निर्णय आणि कृती यात दोहीमध्ये फारशी एकवाक्यता नव्हती. इंग्रजांनी या 'सत्ता–अक्षाचे' भौगोलिक महत्त्व ओळखले होते. या अक्षाच्या दोन्ही टोकांना सांधणारा 'बऱ्हाणपूर–हांडिया' हा घाटमार्ग ताब्यात घेऊन त्या अक्षाच्या दोन्ही टोकांतील सत्तास्थाने त्यांनी नाहीशी केली.

३. **पश्चिम महाराष्ट्रातील डोंगराळ भूमी** : या डोंगराळ भूमीतच ऐतिहासिक काळापासून जहागिरदारी पद्धती जोपासली गेली. शिवाजीच्या मराठी राज्य-संस्थापनेस स्थानिक जहागिरदारांकडून विरोध झाला. या पद्धतीची पाळेमुळे फार खोलवर रुजलेली असल्याने, ही पद्धती शिवाजी पूर्ण नाहीशी करू शकला नाही. त्याच्यानंतर त्याच्या वारसांनी मुघल आक्रमणास तोंड देण्यासाठी ती पद्धत अधिक दृढ केली. नंतर साताऱ्याच्या शाहूराजाने व पुण्यातील पेशव्यांनी थोड्या निराळ्या स्वरूपात ती स्वीकारली. ज्या मराठी संघ-राज्याच्या विस्ताराने मराठी राज्य-एकात्मता नाहीशी होऊन मराठी सत्तेचा ऱ्हास झाला ती मराठी संघ-राज्याची निर्मिती ही पश्चिम महाराष्ट्रातील डोंगराळ भूमीत जन्मलेल्या व जोपासल्या गेलेल्या दीर्घकालीन सरंजामशाहीची परिणती होय, असे दिसते.

४. **विंध्य पर्वत-एक भौगोलिक अडसर** : मराठी संघ-राज्याच्या विस्ताराचा इतिहास बघितला असता असे दिसते की विंध्य पर्वताच्या उत्तरेकडील मराठे सरदार, काही अपवाद वगळता, अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात, पुण्यातील घडामोडींबद्दल उदासीन व तटस्थ होते. या उदासीन वृत्तीस पुढील गोष्टी, अल्पांशाने का होईना, कारणीभूत असाव्यात :

अ. भौगोलिक व सामाजिक दृष्ट्या विंध्य पर्वताच्या उत्तरेकडील प्रदेश दक्षिणेकडील प्रदेशापेक्षा विभिन्न आहे.

आ. मराठ्यांनी व्यापलेला विंध्य पर्वताच्या उत्तरेकडील प्रदेश (गुजरातचे मैदान, माळव्याचे पठार, अंतर्वेद इ.) हा सपाट व सुपीक असून तेथील हवामान बरेच विषम आहे. त्या मानाने विंध्य पर्वताच्या दक्षिणेकडील प्रदेश अधिक चढउताराचा, हलक्या जातीच्या मातीचा व अनिश्चित पावसाचा आहे.

इ. वरील बाबतींतील दोन्ही प्रदेशांमधील फरक हा तेथील लोकजीवनात, सामाजिक चालचलणुकीत, तसेच मानसिक व वैचारिक दृष्टीत प्रतिबिंबित झालेला आहे.

ई. उत्तरेकडील मराठे सरदार सधन व म्हणून अधिक प्रबळ होते. दक्षिणेकडील पेशवे हे आर्थिकदृष्ट्या नेहमी हलाखीच्या स्थितीत असत. म्हणून ते उत्तरेकडील सरदारांकडे साशंक नजरेने पहात असत व त्यांच्या गरजांकडे फारसे लक्षही पुरवीत नसत.

उ. उत्तरेकडील मराठे सरदारांच्या शक्तीचे प्रतीक म्हणजे महादजी शिंदे. त्याने स्वतःचे एक स्वतंत्र कार्यक्षेत्र निर्माण केले होते. या कार्यक्षेत्राचा पाया विंध्य पर्वताशी होता आणि शिरोबिंदू दिल्ली शहर होते. दक्षिणेकडील मराठा संघ-राज्याचे नेतृत्व प्रथम नाना फडणवीस आणि नंतर पेशव्यांच्या वारसांकडे होते.

ऊ. अशा रीतीने मराठे सरदारांच्या धोरणात्मक व कृतीमधील फरकाचे एक प्रमुख कारण म्हणजे उत्तरेकडील व दक्षिणेकडील प्रदेशांमध्ये पसरलेला विंध्य पर्वत हा एक भौगोलिक अडसर होय.

ए. या दक्षिणोत्तर प्रदेशांना सांधणारा एकच घाटमार्ग मराठी राज्यात होता. तो म्हणजे, वर उल्लेखिलेला ' बुऱ्हाणपूर हांडिया ' घाट–मार्ग होय. या मार्गाद्वारे पूर्वीपासून दळणवळण होत असे व परस्परसंबंध कायम राहात. इंग्रजांनी अत्यंत काळजीपूर्वक ५ नोव्हेंबर १८१७ मध्ये हा घाटमार्ग ताब्यात घेऊन व दोन्हीकडील मराठे सरदारांना स्वतंत्र गाठून नामोहरम केले. एकमेकांशी युती करण्याची संधीही त्यांना दिली नाही.

५. जिंकलेल्या प्रदेशाबद्दलची मराठ्यांची अनास्था : मराठे सरदारांनी जे जे प्रदेश जिंकले वा जहागीर म्हणून मिळविले, त्या प्रदेशांबद्दल त्यांना पाहिजे तशी ओढ किंवा जवळीक नव्हती. दरवर्षी मुलुखगिरीसाठी ते स्वाऱ्या करीत, पण खंडणी वसूल केलेल्या प्रदेशाबद्दल त्यांना आत्मीयता नव्हती. म्हणूनच लांब अंतरावरील त्यांचे काही विजय क्षणिक ठरले. पंजाब, दिल्ली, अंतर्वेद किंवा दक्षिणेकडील निजामाचे राज्य या सर्व भागांतील त्यांचे विजय क्षणिक होते. जित प्रदेशाच्या संपत्तीचेच मराठ्यांना अधिक आकर्षण होते. त्या प्रदेशावर, म्हणजे त्या प्रदेशातील लोकांवर त्यांचे प्रेम नव्हते, हे खेदाने म्हणावे लागते. स्वाभाविकपणे, अशा प्रदेशाच्या संरक्षणाची नैतिक जबाबदारी ज्या प्रकारे त्यांनी पार पाडावयास पाहिजे होती, ती ते पार पाडू शकले नाहीत.

६. मराठी साम्राज्याचा क्रमरहित व अनियमित विस्तार : भूप्रदेशाची सलगता (Contiguity of Land) हे भौगोलिक तत्त्व पेशवेकाळात मराठ्यांना कदाचित माहीत नसावे. राज्यविस्ताराची क्रिया एका प्रदेशापासून जवळच्या दुसऱ्या प्रदेशाकडे, मध्ये कोणतीही मोकळी भूमी न सोडता झाल्यास राज्याचा प्रादेशिक विस्तार सुसंघटित व संरक्षणक्षम असतो. पण तसे मराठ्यांच्या इतिहासात घडलेले नाही. उदाहरणार्थ, मराठ्यांनी प्रथम दूर अंतरावरचे प्रदेश (माळवा, ग्वाल्हेर व लाहोर) जिंकले आणि नंतर ते नजीकच्या प्रदेशांकडे (उदाहरणार्थ, अहमदनगर आणि नाशिक जिल्हे) वळले. मराठ्यांचा राज्यविस्तार पूर्वनियोजित व क्रमबद्ध नव्हता. जेथे सहज प्रवेश मिळेल त्या मार्गाने वेडीवाकडी वळणे घेत तो झाला.

दुसरे असे की एखादा प्रदेश जिंकल्यावर त्या प्रदेशातील सर्वच महत्त्वाची ठाणी ते ताब्यात घेत, असेही दिसत नाही. जिंकलेल्या प्रदेशातील काही ठाणी शत्रुपक्षाकडे रहात असा मराठ्यांच्या इतिहासाचा दाखला आहे. अशा रीतीने जिंकलेल्या प्रदेशात बिगर मराठी सत्तेची उपकेंद्रे मधून मधून रहात असल्याने, संरक्षणाच्या दृष्टीने मराठी साम्राज्य कधीच एकात्म नव्हते. त्यात एकजिनसीपणा नव्हता.

तिसरी गोष्ट म्हणजे मराठी साम्राज्यविस्तार हा अतिवेगाने झाल्याने व्याप्त प्रदेशात स्थैर्य निर्माण करण्यास मराठे असमर्थ ठरले. पुष्कळ वेळा व्याप्त प्रदेशात आपली सत्ता संघटित व स्थिर करण्याच्या अगोदरच मराठे सरदारांनी नवीन प्रदेशांवर स्वाऱ्या केलेल्या आढळतात. त्यामुळे एकाच वेळी नवीन प्रदेश जिंकण्यासाठी व व्याप्त

प्रदेश टिकविण्यासाठी, अशा दोन प्रकारच्या लढाया करणे मराठ्यांना भाग पडले. ही गोष्ट प्रामुख्याने मराठे व निजाम यांच्या संघर्षात दिसून येते.
मराठ्यांनी आपली शक्ती उगीचच राजस्तानच्या कोरड्या व ओसाड प्रदेशात क्षुल्लक कारणासाठी खर्च केली. राजस्तानमधील मराठ्यांच्या हालचाली भौगोलिक दृष्ट्या अयोग्य व राजकीय दृष्ट्या घातक होत्या.

यावरून हे स्पष्ट होते की मराठ्यांचा राज्यविस्तार हा योजनाबद्ध व क्रमबद्ध नव्हता. त्यामुळे मराठा संघराज्याचे विघटन फार लवकर घडून आले.

७. **मराठी साम्राज्याच्या अस्पष्ट सीमा :** प्रादेशिक सार्वभौमत्वाची कल्पन शिवाजीस होती, पण त्याच्या वारसदारांकडे ती होती की नाही याबद्दल शंका आहे. भूप्रदेशाच्या सलगतेचे माहात्म्यही त्यांना ठाऊक नव्हते. जुन्नर प्रांतातील निजाम-मराठी प्रदेशांची विभागणी (१८ व्या शतकाच्या उत्तरार्धात) हे एक त्याचे उत्तम उदाहरण आहे.

दुसरे असे की, मराठे सरदारांनी व्यापलेल्या प्रदेशात मराठी सत्तेखालील ठिकाणांची व बिगर मराठी सत्तेखालील ठिकाणांची इतकी सरमिसळ झाली होती की त्यामुळे प्रादेशिक व महसुली हक्कांवरून परस्परांत नेहमी भांडणे होत. सोलापूर जिल्हा हे त्याचे उदाहरण म्हणून देता येईल.

सिद्दीकडून जिंकलेल्या प्रदेशाच्या (११ महालांच्या) महसुली उत्पन्नावर मराठे व सिद्दी यांचा दुहेरी ताबा ही एक आणखी प्रातिनिधिक स्वरूपाची बाब उल्लेखनीय आहे. त्या काळात मराठ्यांची सार्वभौमत्वाची कल्पना कशी विकृत होती, हे यावरून स्पष्ट होते. अशा दुहेरी ताब्यामुळे एखाद्या प्रदेशात बिगर मराठी सत्तेचा प्रभाव व धोका किती होता, तसेच मराठी साम्राज्याच्या सीमा अचूक कशा नव्हत्या, हे स्पष्ट होते.

८. **सीमा प्रदेश व मराठी राज्यविस्ताराचे धोरण :** दोन राज्यांमधील सीमा प्रदेशाचे ज्ञान व महत्त्व संबंधित राज्यकर्त्यांना असणे आवश्यक असते. राज्याच्या सीमा स्पष्ट नसतील तर राज्याची संरक्षण योजना करणे कठीण जाते. शिवाजीस प्रादेशिक सार्वभौमत्वाची कल्पना तर होतीच, पण त्याशिवाय किल्ल्यांच्या साहाय्याने संरक्षण फळ्या उभारून राज्याचे संरक्षण कसे करावे हेही माहीत होते. पण अशा प्रकारच्या सीमा संरक्षणाच्या योजना पेशवे काळात मराठ्यांजवळ असलेल्या दिसत नाहीत. दुसरे असे की दोन निकटवर्ती सत्तांमधील राजनैतिक संबंध त्यांच्या राज्यां-मधील सीमाप्रदेशाच्या एकूण स्वरूपावर अवलंबून असतात. मराठ्यांच्या साम्राज्याच्या पूर्वेस निजामाचे राज्य होते व दोन्ही राज्यांमध्ये दुष्काळी सीमा प्रदेश होता. वास्तविक निजामाकडून मराठ्यांना फारशी भीती नव्हती. खरी भीती त्यांना दक्षिणेकडून इंग्रजांची होती. मराठे-इंग्रज राज्यांच्या सीमा प्रदेशातच म्हैसूरच्या टिपूची सत्ता होती. पण टिपूविरुद्ध इंग्रजांना मदत करून मराठ्यांनी स्वतःचे मरण लवकर ओढवन घेतले, असे म्हटल्यास चूक ठरणार नाही.

थोडक्यात असे की, सीमा रेषा स्पष्ट असतील तर सीमा प्रदेशांतील राज्य कर्त्यांशी संबंध कशा रीतीने ठेवावेत याचे ज्ञान होते. हे ज्ञान झाल्यास राज्यविस्ताराचे व राज्यसंरक्षणाचे योजनाबद्ध धोरण आखता येते. मराठ्यांच्या इतिहासात (उत्तरार्धात) या गोष्टीचा कोठेही मागमूस आढळत नाही, हे खेदाने म्हणावे लागते.

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६२ : १–४, १९८३–८४

पेशवेकालीन दलित समाज

ना. गो. भवरे
मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

पेशवेकालीन दलित जाती

पेशवेकालातील प्रमुख अस्पृश्य अथवा दलित जातींमध्ये महार, मांग, चांभार, ढोर या जातींचा समावेश करण्यात येतो. त्यांचा उल्लेख जातीनावाशिवाय अतिशूद्र, अंत्यज अशा नावानेही पेशवाईत केलेला आढळतो. पेशवाईकाळात (इ. स. १७०८–१८१८) प्रवेश करताना हिंदु समाजातील अस्पृश्य अथवा दलित जातींच्या डोक्यावर, प्राचीन काळापासून ते मध्ययुगीन काळापर्यंत वाहून आणलेली, श्रुतिस्मृती वगैरे धर्मशास्त्रांनी लादलेली, जातिबंधने, संचारबंधने, अन्न–उदकव्यवहारबंधने, रोटीबेटीव्यवहारबंधने, इत्यादींचे भले मोठे ओझे कायमच होते. ही बंधने मुसलमानी अंमलाखाली दूर होऊ शकली नाहीत. फक्त ज्या अस्पृश्यांनी इस्लामधर्म स्वीकारला त्यांना मात्र हिंदुधर्मनिर्मित गुलामगिरीतून स्वतःची कायमची सुटका करून घेता आली. आणि काहींनी इस्लामी समाजात बहुमानाची पदे भूषविली. भागवतधर्माची पताका फडकविणाऱ्या संतांनी मात्र आध्यात्मिक लोकशाहीचा नवा प्रयोग केला, आणि विठ्ठलापुढे सर्वजातीय संत समान आहेत असा पुकारा केला. त्यामुळे चोखोबा, नामदेव, गोराकुंभार, सेना न्हाव्यासारख्या शूद्रातिशूद्रांना भक्तिमार्गाद्वारे आपल्या मुक्तीची दारे खुली झाली. परंतु समाजात आणि मंदिरात प्रत्येकाने आपल्या पायरीने वागले पाहिजे असे बंधन मात्र अधिक घट्ट बनविण्यात आले. इतकेच नव्हे तर आपले अस्पृश्यत्व हे आपल्याच पूर्वजन्मीच्या पापांचे कटु फळ आहे अशी अस्पृश्य जातींची सवर्ण समाजाने दृढ समजूत करून दिली होती. " चोखा म्हणे विटाळ आम्हा पूर्वीचे हे फळ " अशी चोखोबासारख्या थोर विठ्ठलभक्ताची सुद्धा समजूत होती. त्यामुळे चोखोबाला तो अस्पृश्य म्हणून विठ्ठलाच्या देवळात कधीच प्रवेश मिळाला नाही. परंतु देवळाबाहेरून विठ्ठलाचे दूरदर्शन घेण्याची संधी चोखोबा आणि त्यांच्या जातींच्या अस्पृश्यांना मिळत होती, हे संपूर्ण मराठी इतिहासकालाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल !

शिवकालात मराठी स्वराज्यस्थापना होत असताना शिवरायाने सर्व हिंदु जातींना ' एकदिल ' करण्याचा संकल्प सोडला होता. पण त्याचबरोबर "...ज्या ज्ञातीत जशी परंपरा चालत आली त्याचप्रमाणे चालवावी; जो कोणी द्वेषबुद्धीने, द्रव्यलोभास्तव

व ब्राह्मणशास्त्रविरहित नवीन तंटे करून खलेल करील त्या ज्ञातीयानिवाले सरकारात अर्ज करावा म्हणजे शास्त्राचे समते व रूढीपरंपरा व ग्रंथ पाहून निरंतर निरमत्छरपणे धर्मस्थापना कोणाचा उजर न धरीता परनिष्ट जेव्हांचे तेव्हांच त्वरीत बंदोबस्त होईल "[1] अशी शासकीय धोरणाची घोषणा झाल्यावर जातीपातीसंबंधात नवे परिवर्तन कसे येईल? शिवकालात धर्मस्थापना होत असतानाच श्रुतिस्मृतिप्रणीत जाती-व्यवसायबंधनांची अंमलबजावणी अधिक काटेकोरपणे सुरू झाली, आणि हे धर्मकार्य शिवकालाच्या शेवटी म्हणजे पेशवेकालाच्या आरंभीच्या वर्षात पूर्ण होऊन महाराष्ट्रीय समाज सर्व प्रकारच्या जाती–व्यवसायनिर्बंधांनी घट्ट आवळला गेला. अर्थात या सर्व प्रक्रियेमध्ये अस्पृश्य समाजावरचे श्रुति-स्मृतीप्रणीत निर्बंध अधिक दृढ बनले हे ओघाने आलेच. पेशवाईच्या आरंभापासूनच छत्रपती शाहू महाराजांनी 'जुने मोडू नये, नवे करू नये "[2] हे आपले शासकीय सामाजिक धोरण घोषित केले, आणि पेशवाईला कर्मठ बनविण्याच्या दिशेने वाटचाल करण्याची आज्ञा केली. कोकणस्थ ब्राह्मण पेशव्यांच्या प्रभावाखाली आणि कर्मठ धर्मशास्त्र्यांचे नेतृत्व लाभलेली पेशवाई धर्मस्थापना दृढ करीत असताना अस्पृश्य वर्गांच्या नशिबी गुलामीचे जीवन आले तर त्यांत नवल ते कसले! प्रख्यात इतिहासकार जदुनाथ सरकारांनी म्हटले आहे, " शिवाजीने स्थापन केलेल्या हिंदुराज्यापुढील पहिला धोका म्हणजे शिवाजी आणि पहिला बाजीराव यांच्या विजयामुळे प्राप्त झालेली राष्ट्रीय कीर्ती आणि समृद्धी यांच्या-मुळे हिंदूंची कर्मठपणाच्या दिशेने प्रतिक्रिया घडत गेली; त्यामुळे जातीजातींतील अंत-र्भेद वाढत गेले. दररोज करावयाच्या विधीतील समारंभ–पावित्र्याच्या कल्पना बळावत गेल्या, व त्यांचा प्रारंभीच्या राजकीय दृष्टीने दबलेल्या आणि गरीब अशा मराठी समाजाची साधी राहाणी आणि एकसंघ समाजप्रवृत्ती यांवर अनिष्ट परिणाम झाला. "[3] एकंदरीत पाहाता असे स्पष्ट होते की, पेशवाईतील समाज पारंपरिक रूढींनी जखडलेला, धर्मशास्त्रप्रणीत आचार–विचारांवर दृढ राहिल्याने कर्मठ बनलेला, नशिबावर विसंबून राहणारा, ऐहिक जीवनात देवदेवतांची सतत कृपा, आशीर्वाद मिळविण्यासाठी धडपडणारा होता. " धर्मो रक्षति रक्षतः " या वचनाप्रमाणे आपण चातुर्वर्ण्याधिष्ठित जातिनिर्बं ंचे धर्मपालन आणि रक्षण केल्यास तो धर्म आपलेही रक्षण करतो अशी सर्वच जातींची ठाम समजूत बनली होती. त्यामुळे सर्वच समाज परंपरा, रूढी, धार्मिक आचारविचार, खुळया समजुती यांचा गुलाम बनला होता. त्यामुळे अस्पृश्यवर्गांना भोगावी लागणारी गुलामीसुद्धा या पारंपरिक धर्माचाच भाग आहे, आणि ती पाळलीच पाहिजे, अशी सर्व सवर्णांची समजूत होती.

ग्रामव्यवस्था आणि अस्पृश्य समाज

महाराष्ट्रातील ग्रामव्यवस्थेत अस्पृश्यांना महत्त्वाचे स्थान होते. जेथे जेथे गाव वसला असेल तेथे तेथे अस्पृश्यवर्गातील महार, मांग, चांभार हे आढळणारच, कारण

त्यांच्या सेवेची सर्वत्र गरज असे. "गाव तेथे महारवाडा" ही जशी म्हण आहे तसेच गाव तेथे मांगवाडा, चांभारवाडा असावयाचा. डॉ. इरावती कर्व्यांनी म्हटले आहे, "जेथपर्यंत महार पोहोचले, तेथपर्यंत महाराष्ट्र."[४] महाराष्ट्रात महार ही फार जुनी जमात प्राचीन काळापासून रहात असल्याने महारांना भूमिपुत्र[५] असेही मराठेकालीन कागदपत्रांत म्हटल्याचे आढळते.

बलुतेदारीतील अस्पृश्य समाज

शिवकाल, पेशवेकालांत ग्रामीण जीवनात बलुतेदारी पद्धतीचे फार महत्त्व होते. बळीराजा अथवा शेतकऱ्याला लागणाऱ्या वस्तू आणि सेवा पुरविण्याचे काम गावातील विविध जातींचे बलुतेदार करीत उदा. सुतार, लोहार चांभार, महार, मांग, परीट, कुंभार, न्हावी, सोनार, गुरव, जोशी, मुलाना, कोळी वगैरे. या बलुतेदारांच्या त्यांच्या सेवेच्या महत्त्वाप्रमाणे पहिली कांस, दुसरी कांस, तिसरी कांस अशी वर्गवारी करण्यात आली होती आणि त्याप्रमाणे बलुतेदारांना बलुते अथवा धान्यरूपाने मोबदला हंगामाच्या वेळी मिळत असे.

अस्पृश्य बलुतेदारांपैकी चांभार आणि महार या जातींच्या बलुतेदारांचा समावेश पहिल्या कांसेत किंवा पहिल्या दर्जाच्या बलुतेदारांच्या यादीत होत होता. त्यामुळे त्यांना जास्त बलुते मिळे. मांगांचा समावेश दुसऱ्या दर्जाच्या यादीत होऊन त्यांना महारचांभारापेक्षा कमी बलुते मिळे.[६]

चांभार बलुतेदारांची कामे

शेतकऱ्यांकडून बलुते घेऊन चांभार कातड्याची मोट शिवणे, तिला ठिगळ लावणे, गोफणीला टवळे लावणे, जुना जोडा, चपला शिवणे, असूड दुरुस्ती ही कामे करीत असे. या कामांबद्दल प्रत्येक शेतकरी चांभाराला दोन शेर बी आणि आपल्या शेतकी उत्पादनातील सव्वा दोन टक्के बलुते देत असे. शेतकऱ्यांना नवीन मोटा, नवा जोडा, चपला, असूड आणि इतर चामड्याच्या नवीन वस्तू वेगळे पैसे देऊन विकत घ्याव्या लागत.

मांग बलुतेदारांची कामे

मांग बलुतेदार शेतकऱ्यांना दोरखंड पुरवणे, दसरा दिवळीसारख्या सणांच्या वेळी आंब्याचे तोरण गावाच्या वेशीला, गावातील चावडीला आणि पाटील-कुलकर्णी, देशमुख देशपांडे यांच्या दरवाज्यांना बांधणे वगैरे कामे करीत. अशी तोरणे मांगांनी बांधली म्हणजे या गावातील लोकांची भरभराट होते अशी लोकांची समजूत असे. याशिवाय मांग लोक शेतकऱ्यांना केरसुण्या, झाडू पुरवीतच. आणि लग्नामध्ये व सणांच्या वेळी डफडे, सूर, सनई वाजवीत असत.

महार बलुतेदारांची कामे

ग्रामव्यवस्थेत महारांचे स्थान फार महत्त्वाचे होते. महारांच्या कामाचे मुख्य दोन प्रकार असत, ते म्हणजे (१) वलुतेदारीतील शेतकऱ्यांची कामे. यालाच राबत्या महारांची अथवा घरमहारांची कामे म्हणत. (२) दुसरे काम म्हणजे महारांची पारंपरिक गावातील सरकारी कामे होत. त्याना महारांची गावकीची कामे म्हणत.

महारांची वलुतेदारीतील कामे म्हणजे : (१) शेतकऱ्यांचे नांगर, बी व इतर सामान दररोज शेतावर नेणे आणि आणणे; (२) शेतकऱ्यांच्या गुरांचे गोठे बनवणे आणि त्यांची दररोज साफसफाई करणे. ही कामे महार व त्याची बायको आणि इतर स्त्री-पुरुष करीत असत; (३) रानातून सरपणाच्या मोळ्या शेतकऱ्यांना आणून देणे, त्यांची लाकडे फोडून देणे; (४) मिरासदार, जमीनदार यांच्याबरोबर प्रवासात त्यांची सर्व प्रकारची चाकरी करणे, त्यांचे जरुरीचे निरोप बाहेरगावी पोचविणे आणि जमीन-दाराच्या लेकी, सुना माहेराला जात अथवा येत असतील तर त्यांच्याबरोबर जाऊन प्रवासात त्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेणे; (५) शेतकऱ्याच्या कुटुंबात मृत्यू झाल्यास सरण रचण्यासाठी लाकडे, गवऱ्या वगैरे डोक्यावरून वाहून स्मशानभूमीवर नेणे. अशा रीतीने बलुतेदार महारांना खूप कामे करावी लागत होती. म्हणून त्यांना ' राबते महार ' म्हणत. पेशवेकालीन एका कागदात "महार बारमाही अष्टोप्रहर राबत असावा" असे त्याच्या कामाचे स्वरूप वर्णन केले आहे. त्याला पाटलाच्या हुकमाप्रमाणे पांढरीची म्हणजे गावात रहाणाऱ्या सर्वच लोकांची सेवा करावी लागत होती.

महारांची पारंपरिक गावकीची सरकारी कामे

वलुत्याच्या कामाशिवाय गावच्या महारांना पाळीपाळीने पारंपरिक गावकीची सरकारी कामे करावी लागत. अशा कामांची विभागणी पुढीलप्रमाणे होई : (१) वेसकर महारांची कामे, (२) कामगार महारांची कामे, (३) जागले महारांची कामे. गावची लोकसंख्या ४–५ हजार असल्यास तेथे ३–४ वेसकर महार, ८–१० कामगार महार, आणि १–२ जागले महार नेमलेले असत. ही कामे महार कुटुंबांकडे पाळीपाळीने एका वर्षापुरती नेमून दिलेली असत. अशा कामाची पाळी आली म्हणजे तिला काठी आली असे म्हणत, कारण गावकीची कामे करणाऱ्या महाराला एक खुळखुळ्याची काठी मिळत असे.

गावकीची कामे पुढीलप्रमाणे असत :

१) गावातील वसूल डोक्यावर घेऊन तालुक्याला पोहोचविणे आणि सरकारी तिजोरीत त्याचा भरणा करून त्याची पावती गावातील पाटील–कुलकर्ण्याला देण.

२) सरकारचे वसुली अधिकारी गावात आले असताना शेतकऱ्यांना चावडीवर बोलाविणे.

३) सरकारी अधिकाऱ्याचे दप्तर तालुक्याला पोहोचविणे, आणि तालुक्यावरून गावची सरकारी पत्रे आणणे.

४) चावडीत सरकारी वसूल गोळा झाल्यावर दिवसरात्र देखरेख करणे.

५) गावचे पाटील–कुलकर्णी शेतीच्या हद्दी, पिके वगैरेंची पाहाणी करण्यास निघाले असता त्यांच्याबरोबर राहून त्यांना मदत करणे.

६) गावातील जन्म–मृत्यूंची बातमी पाटलाला देणे आणि मृत्यूची बातमी परगावच्या संबंधित नातलगांपर्यंत पोहोचविणे.

७) वेसकर महाराने आणि जागल्या महाराने पाटलाच्या सोबत गावात रात्रीची गस्त घालणे.

८) सरकारी आदेश दवंडी देऊन गावकऱ्यांना कळविणे.

९) मोकाट जनावरे कोंडवाड्यात दाखल करणे.

१०) गावातील बेवारशी प्रेतांची विल्हेवाट लावण्यात पाटलाला मदत करणे.

११) गावातील चोर, गुन्हेगार यांना पकडणे, आणि ते दुसऱ्या गावात पळून गेल्यास त्यांचा माग काढून पाठलाग करणे.

१२) सरकारी अधिकारी गावात आल्यास त्याची व्यवस्था ठेवण्यास तलाठ्याला मदत करणे.[७]

महारांची पारंपरिक गलिच्छ कामे

महार अस्पृश्य असल्याने गावातील गलिच्छ कामे त्यांच्या माथी मारण्यात आली होती. ही कामे त्यांना टाळता येत नसत. ती पुढीलप्रमाणे : (१) गावातील चावडीची झाडझूड करणे, आणि गावातील वेशीपर्यंतचे रस्ते झाडन काढणे, (२) गावातील सर्व रस्ते दररोज झाडून काढणे आणि गाव स्वच्छ राखणे, (३) गावात अथवा शेतात जनावरे मेल्यास ती ओढून नेणे व त्यांचे कातडे सोलून ते मालकाला परत करणे, वगैरे.

एकंदरीत पाहता असे दिसते की, अस्पृश्य बलुतेदारांना गावातील लोकांची सतत चाकरी करावी लागत होती. त्यांना कराव्या लागत असलेल्या हलक्या आणि गलिच्छ कामांमुळे आणि त्यांच्या अस्पृश्यतेमुळे या बलुतेदारांना सामाजिक प्रतिष्ठा कधीच लाभली नाही. ते फक्त काम करणारे गुलाम होते, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. पण या सर्व कामाचा योग्य मोबदला अस्पृश्य बलुतेदारांना आणि गावकीची कामे करणाऱ्यांना मिळत नव्हता, हे त्यांचे खरे दुःख होते; म्हणून त्यांच्या अप्रतिष्ठेबरोबर त्यांचे आर्थिक शोषण फार मोठ्या प्रमाणावर होत होते, हे स्पष्ट दिसते.

अस्पृश्य बलुतेदारांना मिळणारे अपुरे बलुते :

बलुतेदारांना देण्यात येणाऱ्या बलुत्याचा दर ठरलेला नसे. बलुते देताना त्या वर्षी पीकपाणी कसे आले आहे यावरूनच बलुत्याचे प्रमाण ठरत असे. एका पेशवेकालीन पत्रात म्हटले आहे, " कोणा बलुत्याची काय जिन्नस आली याची लागवड पाहून द्यावे....गृहस्थाने आपली शक्ती पाहून द्यावे व बलुत्यांनी शक्ती पाहून घ्यावे. देणे घेणे अवघे वैभवानुसार आहे.[८] म्हणजेच बलुतेदार त्या शेतकऱ्याचे किती काम करतो आणि शेतीचे उत्पादन किती झाले आहे यावरून बलुत्याचे प्रमाण ठरत असे.

दुष्काळी परिस्थिती असली, अथवा अतिवृष्टी, रोगराई, पिकांची चोरी, धामधूम वगैरेमुळे शेतीचे उत्पादन कमी झाल्यास वर्षभर खूप काम करूनही बलुतेदारांना कामाचा पुरेसा मोबदला मिळत नसे. थोडक्यांत म्हणजे, अस्पृश्य बलुतेदारांना मिळणारे बलुते हे वेभरवशी असल्यासारखे होते. बलुते देणे हे सर्वस्वी शेतकऱ्याच्या मेहेरबानीवर अवलंबून होते. सामान्यतः महार, मांग, चांभार शेतकऱ्यांची मनधरणी करून, विनंत्या करून, हातापाया पडून, त्यांच्यावर नैतिक दबाव आणून, आणि आपल्या लाचारीचे प्रदर्शन करून जमेल तेवढे बलुते मिळविण्याचे प्रयत्न करीत असत. बलुते न दिल्यास शेतकऱ्यांविरुद्ध कोठेच तक्रार करण्याची सोय नव्हती. ब्रिटिशकालांत काही ठिकाणी बलुते न मिळाल्यास महार लोक शेतकऱ्यांच्या गुरांना विष घालून ठार मारीत असत.[९] असाच प्रकार पेशवेकालातही होत असला पाहिज. त्यामुळेच शेतकरी लोक जनावरे मेल्यास बलुतेदारांवर संशय घेत, आणि अशा गोष्टी घडू नयेत म्हणून बलुते देत.

महारांना गांवकीचे आणि बलुतेदारीचे खूप काम पडत असल्याने इतरांपेक्षा त्यांना बलुते जास्त मिळत होते. पुणे जिल्हयात महारांना दर ३० बिघ्यांमागे ४० पेंढया आणि ४ शेर पाखडलेले धान्य देण्यात येई.[१०] काही ठिकाणी एका नांगरामागे १०० पेंढया बलुते देण्यात येई, तर इतर ठिकाणी औतामागे अर्धा मण धान्य देण्यात येई. काही ठिकाणी महारांना शेतातील उत्पादनाचा १० टक्के वाटा मिळे. ब्रिटिश काळातील चौकशीप्रमाणे कर्नल जर्व्हिस यांच्या पहाणीनुसार शेतकरी लोक आपल्या शेती उत्पादनाचा १० टक्के भाग बलुतेदारांना वाटीत. परंतु अस्पृश्य बलुतेदारांचे अपुऱ्या बलुत्यामुळे हाल होत असत, आणि त्यांना सतत गावकऱ्यांपुढे लाचारीमुळे भिकाऱ्यांप्रमाणे हात पसरावे लागत.

अस्पृश्यवर्गाची लाचारी आणि परावलंबित्व

अपुऱ्या बलुत्यामुळे अस्पृश्य बलुतेदारांना अन्न मिळविण्यासाठी गावातील शेतकऱ्यांपुढे अन्न मागण्याची सोय गावकीत करण्यात आली होती. महारांना गावकीची कामे करण्याची पाळी आली की, त्यांना गाववाल्यांकडून भाजी-भाकरी मागण्याची

सोय होती. त्यामुळे महार-मांग पाटी घेऊन गाववाल्यांच्या दारांत " मायबाप, महाराला भाकर वाढा, मांगाला भाकर वाढा " अशी लाचारीयुक्त आरोळी ठोकून मागीत. त्यांना मिळणारे अन्न बहुधा शिळे, उष्टे, घाणेरडेच असावयाचे ! चोखोबाने स्वतःच्या गावकीचा उल्लेख करतांना म्हटले आहे —

" बहु भुकेला जाहालो । तुमच्या उष्टयासाठी आलो ।
चोखा म्हणे पाटी । आणिली तुमच्या उष्टयासाठी ॥ "

परंतु भुकेल्या पोटाला उष्टे काय आणि चांगले काय, सर्व सारखेच ! अशी ज्या वर्गाची अवस्था होती ते लोक बलुतेदारी पद्धतीत सुखी होते असे म्हणता येईल काय ?

सणासुदीला अन्न मिळण्याची सोय

आत्यंतिक लाचारी असली तरी पेशवेकालातील ग्रामीण व्यवस्थेत अस्पृश्य कामगारांना शिळेपाके, उष्टे वगैरे कसेही का असेना, अन्न मिळण्याची सोय करण्यात आली होती. सवर्णांपैकी कुणाकडेही लग्नकार्य निघाले की, महार-मांगांनी सरपणफाटे आणणे, लग्नमांडवाच्या अवतीभोवती झाडणे, सारवणे ही कामे केली की त्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना चार दिवस जेवण वाढण्यात येत असे. त्यामुळेच गावात लग्न निघाले की अस्पृश्यांना उष्टे खाण्याची पर्वणीच आली असे वाटले तर नवल ते कसले !

होळी, दिवाळीसारख्या सणासुदीला महार, मांगांकडून सरपण आणवून घेतले की त्यांना जेवण देण्यात येई. त्याहीबाबत " आधी मोळी टाकावी, मग पोटास मागावे " हा अलिखित नियमच होता. शेतात जनावर मेले तर ते ओढून नेल्याबद्दल महारांना पाच शेर ज्वारी देण्यात येई. अशा अनेक प्रसंगी कामे करून घेऊन महारामांगांस पोटास जेवण देण्याचा रिवाजच पडून गेला होता.

मृतमांसभक्षक महार-मांग

मृतमांस भक्षण करून आपली भूक भागविणे हे एक अस्पृश्यांच्या लाचार जीवनाचे निदर्शक आहे. मांसाहारी महार-मांगांना दारिद्र्यामुळे ताजे मांस मिळविणे परवडत नसल्याने त्यांना मृतमांस खाऊनच आपली भूक भागवावी लागत होती. गावात अगर शेतात गुरे मरण पावली की ओढून महारांना इनाम मिळालेल्या " हडकी-हाडूळा " जमिनीवर नेऊन तेथे त्यांचे कातडे काढून घेण्यात येई आणि मृतमांसाची वाटणी करण्यात येत असे. कातडे विकून आलेले पैसे महार लोक आपसांत वाटून घेत. मृतमांसाच्या वाटणीचा हक्क फक्त वतनदार महारांनाच होता. मृत जनावराला " पड " म्हणत, आणि अशा मृत जनावरावर आपलाच हक्क आहे, असे महार म्हणत. ते स्वतःला " पडयाचे धनी " म्हणवीत. मृतमांसाच्या वाटणीवरून अनेक वेळा महार-

मांगांत भांडणे झाली आहेत. अशा रीतीने मुर्दाड मांस खाणारे म्हणून महार-मांगांचा गाववाले तिरस्कार करीत असत. परंतु दारिद्र्याने होरपळून निघालेल्या मांसाहारी महार–मांगांना मृत मांसाशिवाय दुसरा पर्याय नव्हता. त्यांच्या आयुष्यातील ही अत्यंत किळसवाणी गोष्ट असली पाहिजे, परंतु त्यातूनच त्यांची लाचारी स्पष्ट होते.

महारांचे ५२ हक्क : मध्ययुगीन काळात बेदरच्या मुसलमान पादशहाने, मंगळवेढ्याच्या विठ्या महाराने विशेष सेवा केली म्हणून सर्व महारजातीला ५२ हक्कांची सनद दिली होती. ह्या सनदेची एक नकल श्री. वि. का. राजवाड्यांनी भारत इतिहास संशोधक मंडळाच्या चतुर्थ संमेलनवृत्तात प्रकाशित केली आहे. ह्या सनदेने महारजातीला गावातील सर्व जातींच्या लग्नावर सव्वादोनपासून सव्वातीन रुपयेपर्यंत करवसुलीचा अधिकार; सर्व जातींतील मयतांवर साडेतीन रुपये कर; मृत जनावरांचे कातडे घेण्याचा हक्क, बाजारपेठेत येणाऱ्या मालावर जकात वसुलीचा अधिकार आणि महारांचा नवरदेव घोड्यावरून मिरविण्याचा हक्क वगैरे बहाल केले.[११] हे हक्क महारांनी किती वर्षे उपभोगले हे सांगणे पुराव्याअभावी कठीण आहे; तथापि पेशवाईतील पुण्याजवळील सासवड येथील इ. स. १७३८ सालच्या एका अस्सल साधनात "महार बावन्न हक्कांचे धनी म्हणून दुनिया बोलतात." असा उल्लेख आढळतो.[१२] त्यावरून महार ५२ हक्कांची आठवण पेशवाईत विसरले नव्हते हे स्पष्ट होते. वरील सनदेशिवाय महारांच्या बाजारात येणाऱ्या मालावरील जकात, गुरे मेल्यावर कर वसूल करण्याचा हक्क, गुऱ्हाळ, दिवाळी, पोळा वगैरे सणांच्या वेळचे हक्क, मयतावरील कर वगैरेंचा उल्लेख इतर अस्सल साधनांमध्येही आढळतो.[१३] त्यावरून महारांच्या ५२ हक्कांची अंमलबजावणी बराच काळ होत असावी असे म्हणता येईल.

अस्पृश्य बलुतेदारांचे मानपान

इतर सर्व बलुतेदारांप्रमाणे अस्पृश्य बलुतेदारांनाही निरनिराळ्या प्रसंगी, सणासुदीच्या प्रसंगी काही मानपान मिळत होते. आणि त्यातून त्यांना थोड्याबहुत प्रतिष्ठेबरोबर थोडेफार उत्पन्न मिळत होते. अशा उत्पन्नामुळे गरिबीच्या संसाराला थोडाफार हातभार लागत असला पाहिजे. मुख्य मानपान पुढीलप्रमाणे होते :

लग्नाच्या वेळचे हक्क

महारांचे हक्क– नवरा बाहेरून येईल त्याने वेशीवर शेला महारास द्यावा सरपणफाटे वगैरे चाकरी झाडवणाची – त्यास चार दिवस जेवण, लुगडे, चोळी झाडवणास द्यावी.

मांगांचे हक्क – मांगाने केरसुण्या वऱ्हाडात पुरवाव्या, डफडे वाजवावे, त्यास जेवण व शेला.

चांभाराचे हक्क – चांभारांस लग्नात हक्क नाही. नवऱ्याची पिवळी पांघुरणे.[१४]

महारांचे इतर काही हक्क

ग्रामव्यवस्थेत महारांना बरीच कामे करावी लागत असल्याने त्यांना इतर बलुतेदारांच्या तुलनेन जास्त हक्क असल्याचे दिसते. उदा. होळीचा नैवेद्य जो येईल तो महाराने घेणे, आणिकांस अधिकार नाही[१५] असे एका कागदपत्रात म्हटले आहे. मृतमांसाच्या वाटणीवरून महारमांगांत भांडणे होत, त्याचा निकाल देताना "गुरू मरते त्यास महार देतील ते मांगाने घ्यावे.[१६] असे म्हटले आहे. याशिवाय महारांना पुढील हक्क होते :

१) हराटी जमीन खाऊन पाटलाचे घरी राबावे,

२) महारीक जमीन खाऊन दिवाणाची राबणूक करावी,

३) म्हेतरे महाराने गांडूगुड्याचे बाइते घ्यावे,

४) म्हेतरे महाराने पेवाचे तलबूड घ्यावे,

५) पांढरीवर म्हणजे गावात मरणाऱ्या गुरांवर महारांचा हक्क,

६) गावाच्या होळीस महारांच्या होळीचा विस्तव आणावा लागे. त्यावेळी महाराला गावकऱ्यांनी एक खोबऱ्याची वाटी आणि पानसुपारी विडा एक द्यावा.[१७]

गावकीतील अस्पृश्य बलुतेदारांचे हक्क

वरील विविध हक्कांशिवाय इतर बऱ्याच हक्कांचा उल्लेख श्री. शं. ना. जोशी यांच्या "गावकीतील कायदे" या ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड तिसरा (भा. इ. सं. मंडळ पुणे.) या ग्रंथात प्रसिद्ध झालेल्या लेखात आढळतो. त्यात वर्षाच्या बारा महिन्यांत येणारे सण, लग्नप्रसंग, बाजार, जत्रा, त्रैवार्षिक रेडजत्रा, जावलजत्रा, गोंधळ, दरवेशी गावकचेरी, गुऱ्हाळ वगैरेसंबंधीची बलुतेदारांची कामे आणि हक्क यासंबंधीचे कायदे वर्णन केले आहेत. विस्तारभयास्तव ते येथे देणे टाळले आहे.

महारांची आपले परंपरागत हक्क अबाधित ठेवण्याची धडपड

अस्पृश्य बलुतेदारांमध्ये महारांना बरेच परंपरागत हक्क मिळाले असल्याने त्यांच्याबद्दल असूयेची भावना इतर जातींमध्ये, विशेषतः कुणबी आणि मांगांमध्ये असल्याची आढळते. अशा असूयेमुळेच महारांच्या परंपरागत हक्कांवर अतिक्रमण होत असल्याच्या तक्रारी पेशव्यांकडे करण्यात येत असत. अशीच एक तक्रार इ. स. १७७६-७७ साली सवाई माधवराव आणि नाना फडणीसांच्या काळात कसबे नगर आणि परगणे पारनेरच्या महारांनी, आपल्या हक्कावर कुणबी आणि मांग अडथळा आणतात, अशी केली. मेलेल्या जनावरांचे कातडे घेणे, दसऱ्याचे पाच नैवेद्य व पाच पैसे, पोळ्याच्या बैलाचा नैवेद्य, मांगाचे घरी मेलेले ढोर महाराचे, पेढ्याचे घागरीतील महारांचा वाटा, जरीमरीचे नैवेद्य घेण्याचा महारांचा हक्क, वगैरे हक्क हातचे जाऊ न देण्याचा महारांचा निर्धार तक्रारीतून स्पष्ट झाला. त्याशिवाय महारांचा नवरदेव घोड्यावरून मिरवतो व मांगांचा नवरदेव बैलावरून असे असता

मांगांनीसुद्धा आपला नवरदेव घोड्यावरून मिरविलेला पाहून महारांनी त्याला विरोध केला. ही तक्रार आल्यावर पेशव्यांनी पुणे आणि पैठणच्या महारांकडे या बाबतीत चौकशी केली आणि त्यात महारांची तक्रार बरोबर असल्याचे आढळले. त्यानुसार महारांचे हक्क अबाधित चालविण्यासाठी पेशव्यांनी संबंधित कमाविसदारांना आज्ञापत्रे पाठवली.[१८] अशाच एका महारमांगांमधील हक्कांबद्दलच्या सासवडच्या परिसरातील कजियाचा निकाल धर्माधिकारी आणि शास्त्र्यांनी दिला होता, आणि त्यांत महार–मांगांच्या हक्कांचे स्पष्टीकरण करण्यात आले.[१९] सारांशरूपाने असे म्हणता येईल की, पेशवेकालात विविध जातीपातींची कर्तव्ये, अधिकार, हक्क, मानपान आणि निर्बंध याबाबत समाज अतिशय जागरूक होता, आणि आपल्या हक्कांवर झालेले अतिक्रमण कोणीच सहन करीत नसत. महार, मांग हे अस्पृश्य बलुतेदारसुद्धा त्यांच्या अतिशय नगण्य आणि मामुली हक्कांबद्दलही किती जागरूक असत याची कल्पना वरील कजियावरून येऊ शकते.

अस्पृश्यवर्गाची वेठबिगार

परंपरेने चालत आलेल्या इतर अनेक अनिष्ट रूढींपैकी वेठबिगारीची रूढी पेशवेकाळातही चालू होती. वेठबिगार संस्थेचा उगम आणि तिचे स्वरूप आणि शिवकालातील तिची अंमलबजावणी याचा तपशील जिज्ञासूंनी माझ्या "शिवकालीन वेठबिगार" या लेखात (भारतीय इतिहास आणि संस्कृति, एप्रिल–जून १९८३ च्या अंकात) अवश्य पहावा. सदरील लेखात पेशवेकालीन वेठबिगार खूप संक्षेपाने वर्णन केली आहे.

शिवकालात वेठबिगारीची सक्ती पुढील जातीजमातींवर होत होती : बकाळ, ठाकुरी, अनाडी, खलक, वडवल, सर्व शूद्र आणि अतिशूद्र बलुतेदार. परंतु पेशवेकालात मात्र वेठबिगारीची सक्ती फक्त अस्पृश्य वर्गावरच पडलेली दिसते. त्यांत प्रामुख्याने महार, मांग, चांभार, जिनगर या लोकांवरच हा बोजा पडलेला दिसतो. अस्पृश्य बलुतेदार त्यांच्या गावकीच्या कामामुळे अगोदरच त्रस्त झालेले असल्याने, त्यांच्यावर झालेली वेठीची सक्ती म्हणजे मोठा अन्याय होता, असे म्हटले पाहिजे.

पेशवेकालात अस्पृश्यांकडून प्रामुख्याने सरकारी कुरणांवरील गवत कापण्यासाठी वेठबिगारीची सक्ती करण्यांत येत होती. या काळात सरकारी घोडदळ अथवा पागांना मोठ्या प्रमाणावर गवताची गरज लागत असल्याने हे गवत कापण्याचे काम वेठ्यांकडून घेण्यात येत होते. त्याशिवाय सरकारची इतर ओझी वाहण्याची कामे, अंगमेहनतीची कामे, दोरखंड वळण्याची, चामड्याची कामे वगैरे कामे वेठीत करावी लागत.

इ. स. १७५०–५१ साली पेशवे सरकारने निरनिराळ्या प्रांतांतून वेठ्यांना सरकारी कामासाठी बोलाविले होते. त्यांत जुन्नर प्रांतातून ९२ महार (अंगमेहनतीच्या

कामासाठी), १० मांग (दोरखंड वळण्यासाठी), आणि १० चांभार (चामड्याचे काम करण्यासाठी) बोलविण्यात आले होते. प्रांत गंगथडीमधून ५० महार, पुणे प्रांतातून ६० महार, करकंब परगण्यातून २५ महार, आणि परगणा भोसामधून २५ महारांना वेठीच्या कामासाठी बोलाविण्यात आल्याचा पेशवे रोजनिशीमध्ये उल्लेख सापडतो.[२०]

इ. स. १७७५–७६ सालच्या पेशवे रोजनिशीमध्ये हुजूरपागा अथवा पेशव्यांच्या घोडदळासाठी काम करण्यासाठी ठिकठिकाणाहून अस्पृश्य वेठयांना बोलाविण्यात आल्याचे दिसते. त्याचा संक्षिप्त तपशील पुढीलप्रमाणे :

तालुका हवेली-संगमनेर : ३० महार, १० मांग, १० चांभार, ५ जिनगर – एकूण ५५.

परगणा पारनेर : ४० महार, १० मांग, १० चांभार - एकूण ६०.

तालुका राहुरी : १० महार.

तालुका खेड : ९ महार, ३ मांग, ३ चांभार – एकूण १५.

प्रांत जुन्नर : २९ महार, ११ मांग, ९ चांभार – एकूण ४९.

परगणा नेवासा : ७५ महार, ५ जिनगर – एकूण ८०.

परगणे करडे : १० महार, ५ मांग, ५ चांभार – एकूण २०.

परगणे गंडापूर : ७५ महार, १० मांग, १० चांभार – एकूण ९५.

तालुका बेलापूर : १० महार.[२१]

वेठबिगार पद्धतीप्रमाणे, धर्मशास्त्रानुसार जे कारागीर अथवा शूद्रातिशूद्र वर्ग सरकारचे कर भरू शकत नसत त्यांना कराऐवजी सरकारची मोफत सेवा करावी लागत होती. अशी सेवा महिन्यातून एक वा दोन दिवस घेण्याचा प्राचीन काळापासून चालत आलेला शिरस्ता होता. वेठीचे काम केले त्या दिवशी वेठयांना सरकारतर्फे पोटास अडशेरी म्हणून धान्य देण्याची प्रथा होती. पेशवेकालात ही प्रथा अनेक वर्षे व्यवस्थितपणे चालल्याचे दिसते. पण पेशवे सवाई माधवरावाच्या काळात मात्र वेठीच्या कामांत अस्पृश्यांवर मोठा अन्याय घडत असल्याचे पेशवेरोजनिशांवरून दिसते. इ. स. १७७७–७८ सालच्या रोजनिशीतील नोंदीतील एक उल्लेख पुढीलप्रमाणे आहे : “ गांवगन्ना महारास रावणूक पडल्ये, त्यास पहिली चाल, सालांत दोन आठवडे रावणूक घेऊन, पोटास शेर द्यावा, ऐसी चाल होती. हल्ली रावणूक भारी पडते, व पोटास शेरही देत नाही, याजमुळे कित्येक गावचे महार परागंदा जाले आहेत. ” अशा तक्रारीवरून वेठबिगार पद्धतीचा सरकारी अधिकारी महारांवर जुलूम करण्यासाठी उपयोग करीत होते हे स्पष्ट होय. परंतु पेशव्याच्या नजरेस ही गोष्ट येताच त्यांनी आज्ञा केली, “ रावते महार पंधरा दिवस सालीना राबवून पोटास देणे. जाजती न घेणे. ”[२२] अशा रीतीने सरकारची नजर चुकवून अधिकारी लोक अस्पृश्यवर्गावर वेठीच्या बाबतीत जुलूमजबरदस्ती करीत होते, असे दिसते.

वेठबिगारीची ही अन्यायाची पद्धत संपूर्ण पेशवाईत चालू राहिली. थोरल्या माधवराव पेशव्याने ह्या पद्धतीवर सरकारचे नियंत्रण बसवून सरकारी परवान्याशिवाय कोणालाही वेठबिगारीचे काम करून घेण्यास सक्त मनाई केली.[२३] आणि ही शिस्त मोडणाराविरूद्ध कडक कारवाई केली. परंतु ही दुष्ट प्रथा नष्ट करण्याची बुद्धी परंपरेच्या जाळ्यात अडकलेल्या पेशवेकालातील सत्ताधाऱ्यांना कधी झाली नाही, याचे दुःख होते. उलट सातासमुद्रापलीकडून आलेल्या गोऱ्या साहेबाने मात्र ब्रिटिश राजवटीत वेठबिगार पद्धत बंद केली.[२४]

सवर्ण वतनदारांना वेठबिगार घेण्याचा हक्क

पेशवेकालात वेठबिगारीबाबत अजून एक वैशिष्टय म्हणजे गावांतील परगण्यातील पाटील, कुलकर्णी, देशमुख, देशपांडे, यांच्या बरोबर इतर सर्व वतनदारांना अस्पृश्यांकडून वेठीच्या नांवाखाली विनामूल्य सेवा घेण्याचा हक्क प्राप्त झाला होता. चांभारांसारख्या कारागिरांकडून तर वतनदार लोक वर्षाला एक जोडा विनामूल्य घेत असत. महारांकडून सणाच्या वेळी लाकडाच्या मोळ्या घेणे, मांगांकडून दिवाळी दसऱ्यासारख्या सणाला वाद्ये वाजवून घेणे, मांगांकडून दोरखंड घेणे, महारांकडून अंगमेहनतीची हमाली कामे करवून घेणे वगैरेचा समावेश वेठीतच होतो.[२५] अशा रीतीने सरकारी आणि वतनदारांची वेठबिगारी कामे अस्पृश्यवर्गाला करावी लागत. त्याबाबतीत जुलूम जबरदस्ती झाल्यास दाद मागण्याची सोय अजिबात नव्हती.

पेशवेकालीन अस्पृश्य दासी : मध्ययुगीन कालात भारताच्या पुष्कळ प्रांतांत गुलामगिरीची प्रथा रूढ होती. तिचा फैलाव होऊन पेशवेकालात महाराष्ट्रातही बटक्या, कुणबिणी या स्त्रीगुलामांचा, तसेच पोरगे अथवा पुरुषगुलामांचा सुळसुळाट झाला होता असे कागदपत्रांवरून दिसते. सामान्यतः बटक्या, कुणबिणी ह्या ब्राह्मणवर्ग आणि अस्पृश्यवर्ग वगळता सर्व जातींतील असत. मुसलमानी धर्माच्या बटक्याही होत्या. अशा बटक्याना घरादारात, स्वयंपाकघरात सर्व प्रकारची कामे देण्यात येत असल्याने, अशा कामाला अस्पृश्यवर्गातील स्त्री–पुरुष अपात्र मानण्यात येत, कारण त्यांच्या स्पर्शाने विटाळ अथवा संसर्गदोष होत असे. परंतु हा नुसता सिद्धांत झाला. व्यवहारात मात्र अनेक अस्पृश्य वर्गातील स्त्रिया जात चोरून अथवा इतर जातींच्या आहोत असे खोटेच सांगून बटक्या किंवा कुणबिणी बनत आणि सवर्णांच्या घरांतून कामे करीत. परंतु कधी कधी अशा कुणबिणींच्या अस्पृश्य जातीचा उलगडा झाला म्हणजे मालकावर मोठा बाका प्रसंग ओढवत असे आणि शुद्धिकरणासाठी प्रायश्चित्ते घेता घेता त्याच्या नाकी नव येत असत! असाच एक प्रकार इ. स. १७९५ साली बाजीराव मोरेश्वर भावे यांच्या घरातील कुणबीण चांभार जातीची असल्याचे उघडकीला आल्याने झाला होता.[२६] तशाच प्रकारचे दुसरे उदाहरण गोविंद हरी पटवर्धन या सरदाराच्या कुटुंबात घडले होते. पटवर्धनांच्या घरांतील कुणबीण महारीण निघाली.[२७]

ही उघड झालेली प्रकरणे आहेत. पण ज्यांची अस्पृश्य जात उघडकीला आली नाही अशा अनेक अस्पृश्य स्त्रिया बटक्या, कुणविणी म्हणून गुलामी करीत असल्यास नवल ते काय !

पेशवेकालीन अस्पृश्यतापालन : महार, मांग, चांभार, आणि इतर काही जातींना चातुर्वण्यव्यवस्थेने अतिशूद्र अथवा अस्पृश्य ठरविल्याने त्यांच्या स्पर्शाने (प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष) अपवित्रता अथवा विटाळ होतो अशी दृढ समजूत सर्व भारतभर पसरली होती. शिवकाल आणि पेशवाईतही ही समजूत दृढ बनली होती. पेशवेकालात मराठी समाज अधिक कर्मठ बनल्याने अस्पृश्यांचा संसर्ग टाळण्याचे जसे अनेक मार्ग शोधण्यात आले, तसेच संसर्गदोष झाल्यास त्याचे निवारण करण्यासाठी अनेक प्रायश्चित्ते आणि इतर विधी तयार झाले. अस्पृश्यांचा संसर्ग टाळण्यासाठी त्यांच्या वसाहती गावाबाहेर ठेवण्यात आल्या आणि हिंदुसमाज प्रवाहापासून अस्पृश्यांना संपूर्णतः अलग पाडण्यात आले. तथापि, अस्पृश्यांचा संसर्गदोष कधी कधी घडतच होता. आणि त्याबद्दल कठोर उपाय अवलंबिण्यात येत होते.

पेशवेकालात सुरापूरच्या बेरड संस्थानिकाने एक हत्ती मिरजेच्या पटवर्धनांना भेट दिला होता. त्या हत्तीवरील गडेकरी महाराची आणि मिरजेच्या ब्राह्मणाची शिवाशिव झाली, म्हणून त्या महाराला त्याचे हातपाय बांधून अन्नपाण्यावाचून तीन दिवस चौकीवर बसविण्यात आले. पटवर्धन सरदारांनी या प्रकरणाची दखल घेऊन तो महार " कानडा (कर्नाटकातील) व गैरमाहीत " म्हणून त्याला शिक्षेनंतर सोडून दिले. पण सोडताना महाराला ताकीद देण्यात आली की, " महाराने आपले पायरीने असावे. अतःपर असे जाहालियास मुलाहिजा होणार नाही. "[२८]

इ. स. १७९५ साली बाजीराव मोरेश्वर भावे यांच्या घरची कुणबीण चांभारीण असल्याचे उघडकीस आले. या अस्पृश्य कुणबिणीचा संसर्ग झाला म्हणून सर्व भावे कुटुंबियांना आणि त्यांच्या शेजारी राहाणाऱ्या नरहर गोपालच्या कुटुंबियांना १०० प्राज्यापत्ये प्रायश्चित्ते घेऊन आणि इतर विधींसाठी खूप खर्च करून शुद्ध करण्यात आले.[२९] गणपतराव रास्ते यांच्याकडील एका ब्राह्मण कारकुनाने भ्रमाच्या भरात दोन वेळा शूद्राच्या हातचे अन्न खाल्ले. त्याबद्दल त्याला पूर्वांग प्रायश्चित्ते, आणि त्यानंतर त्याला ब्रह्मगिरी क्षेत्राच्या प्रदक्षिणा घालण्यासाठी त्र्यंबकेश्वराला पाठविले.[३०]

अंत्यजाशी व्यभिचार केलेल्या बटकीच्या संसर्गामुळे प्रायश्चित्ते

इ. स. १७८१–८२ साली पेशवे सवाई माधवरावाच्या कारकिर्दीत पेशवाईत अस्पृश्यतेच्या भयानक कल्पनांचा कळस गाठला गेला होता, हे सिद्ध करणारा पुढील पुरावा पहा. बाळाजी महादेव या शिवनेर तालुक्याच्या मामलेदाराच्या घरी प्रभू जातीची बटकी अथवा कुणबीण अडीच वर्षांपासून सर्वत्र वावरत होती. या कुणबिणीने त्याअगोदर एका अंत्यजाशी अथवा अस्पृश्य महाराशी व्यभिचार केल्याचे

उघडकीला आले. अशा अत्यंजाशी व्यभिचार करून दूषित झालेल्या बटकीच्या घरातील सर्वत्र संचारामुळे सर्व कुटुंबियांना आणि सामानासुमानाला दीर्घकाळ संसर्ग झाला. त्याबद्दल धर्मशास्त्र्यांनी "नीचभिगतयोषित् संसर्ग प्रायश्चित प्राजापत्ये" मामलेदाराला करण्याची आज्ञा केली. शास्त्र्यांनी बाळाजी महादेवाला व त्याची बायको, आई, त्याचे चुलतबंधु, पुत्र, सून, या सर्वांना अनेक प्राजापत्ये (उपवासाने शुद्धी घडवून आणणारी प्रायश्चिते) सांगितली. ही प्रायश्चित्ते शिवनेर, जुन्नर, नाशिक, पुणतांबे, पुणे इत्यादी ठिकाणी विद्वान वैदिक पंडितांच्या मार्गदर्शनाखाली करावयाची होती. त्यावर सहा हजार रुपयांचा खर्च झाला. याशिवाय जुन्नरात १६०० ब्राह्मणभोजने घालावीत आणि घरच्या आणि घरातील सामानाच्या शुद्धीसाठी पुढील अजब उपाय सुचविण्यात आले. घरातील वस्त्रपात्र, धान्य वगैरे बाहेर काढून घरातील फरशी खणून काढून ती भाजून काढावी आणि त्यावर गाईंना फिरवावे, व त्यानंतर ब्राह्मणभोजने घालावीत. घरातील मातीची, लाकडाची भांडी, पात्रे, फेकून द्यावीत; लाकडी पाट तासून घ्यावे; चौकडी, दरवाजे, खांब खरवडून घ्यावे; तांब्याची व पितळेची भांडी तापवून घ्यावी; कथलाची आटवावी; घरातील सर्व वस्तूंवर पंचगव्य शिंपडावे आणि घरच्या देवांची अर्चाशुद्धी करावी.[31]

वरील उदाहरणावरून पेशवाईतील ब्राह्मण अस्पृश्य जातींना किती भयंकर दूषित व पापी समजत होते हे स्पष्ट होते. ब्राह्मणांच्या दृष्टीने अस्पृश्य जाती म्हणजे चालते फिरते दुर्गंधीने माखलेले पापी देह होते. आणि अशांच्या नुसत्या जवळून अथवा दूरच्या, प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष संसर्गामुळे पवित्र व पुण्यवान ब्राह्मणांना विटाळ होणार नाही तर काय होईल ? ही भयंकर अपवित्रता घालविण्यासाठी ब्राह्मण शास्त्र्यांनी धर्मशास्त्रांचे संशोधन करून. किती बौद्धिक कष्ट करून, शुद्धीसाठी प्रायश्चित्तांचे विधी शोधून काढावेत ! अस्पृश्यांशी संसर्ग म्हणजे केवढे मोठे संकट ! पण पेशवाईतील ब्राह्मण शास्त्र्यांनी नाउमेद न होता, खूप बौद्धिक कष्ट करून शेवटी शुद्धी घडविणारे विधी शोधून काढले, त्याबद्दल पेशवाईतील समाजावर त्यांचे केवढे थोरले उपकार ! अर्थात, हे सर्व विधी करण्यासाठी खूप खर्च येत होता; पण ते मात्र अटळ होते ! कारण शुद्धीसाठी हे सर्व करावेच लागत होते !

पेशव्यांच्या पुणे राजधानीत अस्पृश्यांच्या मुक्त संचारामुळे सोवळ्या ब्राह्मणांना संसर्गदोष होण्याची फार शक्यता असल्याने ते संकट आणि शुद्धीप्रायश्चित्तांवरील खर्च टाळण्यासाठी कोकणस्थ ब्राह्मण पेशव्यांनी बरेच नियम आणि कायदे केल्याचे ब्राह्मण संशोधकांनीच स्पष्ट केले आहे. इ. स. १८६८ साली (म्हणजे पेशवाईनंतर थोड्या काळातच) नारायण विष्णू जोशी या ब्राह्मण विद्वानाने लिहिलेल्या "पुणे वर्णन" या ग्रंथातील पुढील उतारा पहा ! "...ह्या काळात (उत्तर पेशवाई) पुण्यातील ब्राह्मणास फार मान आला होता व सोवळ्याओवळ्याचा आचार-विचार फारच वाढला होता. महार, मांग, चांभार, भंगी, धेड इत्यादि लोकांस रस्त्याने

थुंकायचा देखील हुकूम नव्हता. त्यांनी कंबरेस मडकी बांधून फिरावे, कोणी ब्राह्मण रस्त्यात भेटला तर लागलेच खाली बसावे, कारण सावली पडता कामा नये, असे त्यांचे हाल होत होते. अद्यापही ही चाल कोकणात आहे." [३२] ह्या गोष्टीला दुजोरा मिळतो ब्रिटिश संशोधक, मानववंशशास्त्रज्ञ, निरीक्षक आणि अधिकारवाणीने लेखन करणाऱ्या लेखकांच्या ग्रंथात. डॉ. म्यूरे मिचेलच्या 'ग्रेट रिलिजन्स ऑफ इंडिया' (पृ. ६३) या ग्रंथाचा आधार घेऊन रसेल आणि रायबहादूर हिरालाल या लेखकांनी आपल्या ग्रंथात म्हटले आहे– "मराठेकालात महारमांगाना पुण्याच्या वेशीच्या आत सकाळी नऊपर्यंत आणि दुपारी ३ वाजेनंतर प्रवेश करण्यास मनाई होती. कारण नऊ अगोदर आणि दुपारी ३ नंतर त्यांच्या शरिरांच्या लांब सावल्या पडल्याने त्यांचा संसर्ग झालेल्या ब्राह्मणांना स्नान करून विटाळ घालविल्याशिवाय अन्नग्रहण करता येत नसे. त्याप्रमाणे गावकुसाच्या आत कोणाही अस्पृश्य जातीच्या माणसाला राहाण्याची परवानगी नव्हती.[३३] बॉम्बे गॅझेटियरचा आधार घेऊन वरील लेखकद्वय म्हणतात, "मराठेकालात महारावर कष्टकारक अवमान लादण्यात आले होते. त्याला जमिनीवर थुंकण्याची मनाई होती, कारण तसे झाल्यास त्याच्या थुंकीवर पाय पडल्याने हिंदूना विटाळ व्हायचा; त्यासाठी महाराला थुंकण्यासाठी गळ्यात एक मडके बांधून चालावे लागे. त्याशिवाय जमिनीवरील आपल्या पावलांचे ठसे मिटविण्यासाठी त्याला एक काटेरी फांदी ओढीत न्यावी लागे आणि समोरून कोणी ब्राह्मण आला तर त्याच्यावर आपली सावली पडू नये म्हणून दूर अंतरावर खाली तोंड करून पडून राहावे लागत होते.[३४] मराठेकालात अस्पृश्यतेचे केवढे स्तोम माजविण्यात येत होते आणि त्यामुळे बिचाऱ्या महार, मांग, चांभारांना आपल्याच देशात आपल्याच धर्माच्या लोकांकडून जशी पशूला द्यावी तशी किंबहुना त्यापेक्षा वाईट वागणूक देण्यात येत होती, हे वाचून मान शरमेने खाली झुकते.

अस्पृश्यतेमुळे महार, मांगांची लग्ने ब्राह्मण पुरोहित लावीत नसत. महारांची लग्ने त्यांच्याच जातीच्या पुरोहितांकडून–मेढे महारांकडून–लावावीत अशी आज्ञा शासनाने काढली होती.[३५] पंढरपूरचा विठोबा महाराष्ट्रातील सर्व जातींच्या लोकांचे दैवत असले तरी त्या पतितपावन विठोबाच्या देवळात जाऊन दर्शन घेण्यास पेशवे सरकारने अस्पृश्यांना मनाई केली होती. यात्रेच्या वेळी भक्तांना अस्पृश्यांचा संसर्ग होऊ नये म्हणून पेशवे सरकारने इ. स. १७८३-८४ साली पुढील आदेश काढला : "अतिशूद्रांनी चोखामेळ्याचे दीपमाळेजवळ अथवा महारवाड्यात स्थळ असेल तेथे पूजा करीत जावी. देवालयाजवळ अतिशूद्रानी येऊ नये. कोणी आला तरी पारिपत्य करावे.[३६] अशा आदेशाने अस्पृश्यांचा आध्यत्मिक कोंडमारा झाला तर त्यांत नवल कसले!

महार, मांगांना अशा रीतीने अस्पृश्य लेखून त्यांची समाजजीवनप्रवाहातून हकालपट्टी करण्यात येत असतानाच अनेक सवर्णांनी, विशेषतः ब्राह्मणांनी, महार, मांग स्त्रियांशी व्यभिचार केल्याची उदाहरणे कागदपत्रांतून आढळतात. परंतु अशा

व्यभिचारी आणि भ्रष्ट झालेल्या ब्राह्मणांची प्रायश्चिते घेऊन सहजपणे शुद्धी होऊ शकत होती. परंतु अस्पृश्यातील पुण्यवान सदाचरणी माणूस मात्र सदासर्वकाळ अस्पृश्य आणि नीचच राहत होता, कारण त्याची शुद्धी कशानेच होत नाही, असा टाहो धर्मशास्त्र फोडीत होते ! अशा समाजविघातक रूढीविरुद्ध मात्र संपूर्ण मध्ययुगात आणि मराठेकालांत कोणी चकार शब्द काढल्याचे कुठे ऐकिवात नाही !

विषमतावादी न्यायदेवता : प्राचीन कालापासून चातुर्वर्ण्यव्यवस्थेने समाज-जीवनांत विषमतेची पेरणी केली होती. त्यामुळे जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत विषमतेचे भरघोस पीक आले होते. " न्यायदेवता आंधळी असते " अशी आधुनिक कालात म्हण आहे. परंतु मध्ययुगीन कालात, शिवकालात आणि पेशवेकालात न्यायदेवता डोळस होती. तिच्याकडे येणाऱ्या व्यक्तीची जात, सामाजिक, आर्थिक दर्जा, वतन, वगैरे गोष्टींचा विचार करूनच गुन्ह्याबद्दल शिक्षा देण्यात येत असत. मनुस्मृती आणि इतर सर्व धर्म-शास्त्रांनी कनिष्ठ जातींना कठोर आणि वरिष्ठ जातींना सौम्य शिक्षा सांगितल्या आहेत. अस्पृश्य जातीच्या महार, मांग, चांभार, बेरड लोकांना चोरी, दरोडे घालणे, व्यभि-चार, गोहत्या, खून अशा गुन्ह्यांबद्दल वतनजप्ती, दंड वगैरे, शिक्षा देण्यात येत, पण खुनी भिल्ल जातीचा असल्यास त्याचा शिरच्छेद करण्यात येई.[३७] इ. स. १७८३–८६ साली चोरी केल्याबद्दल महार आणि सोनारांना शिरच्छेद, उजवा अथवा डाव हात तोडणे, पाय तोडणे, कान कापणे, अशा क्रूर शिक्षा देण्यात आल्या.[३८] दरोडे घालण्यात बेरडांबरोबर मांग लोक सहभागी झाले म्हणून त्यांचाही शिरच्छेद करण्यात येई.[३९] अस्पृश्य जातीतील पुरुषांबरोबर व्यभिचार करणाऱ्या ब्राह्मण स्त्रियांना घटस्फोट देण्यात येत होता व किल्ल्यांवर त्यांना सक्तमजुरीची शिक्षा भोगावी लागे. पण अस्पृश्य स्त्रियां-बरोबर व्यभिचार करणाऱ्या ब्राह्मण पुरुषांना प्रायश्चित्त देऊन शुद्ध करण्यात येत होते. थोडक्यात सांगायचे म्हणजे, न्यायदेवता अस्पृश्यांना कठोर आणि क्रूर शिक्षा देण्याच्या धर्मशास्त्रकारांच्या आदेशांचे पालन करीत असे.

न्यायदान पद्धती आणि अस्पृश्य जाती

शिवकालात न्यायनिवाडा करण्यासाठी प्रत्येक गावात एक " गोतसभा " असे. या गोतसभेत गावातील पाटील, कुलकर्णी वगैरे अधिकारी, आणि बलुतेदारांचे प्रतिनिधी यांचा समावेश होत असे. गावातील प्रत्येक तंटा या गोतसभेपुढे विचारासाठी येत असे. त्यामुळे सवर्णांबरोबर अस्पृश्य बलुतेदारांना सुद्धा तंट्यातील बाबीसंबंधीच्या चर्चेत सहभागी होता येत होते. गोतसभेने दिलेला न्याय सर्वांच्याच मतांचा विचार करून देण्यात येत होता. त्यामुळे, जातीमुळे गावातील लोक विभागून जात असले तरी, न्यायदानात सर्वच जातींच्या प्रतिनिधींबरोबर अस्पृश्य बलुतेदारांना बसण्याची आणि न्यायदानात प्रतिष्ठितपणे सहभागी होण्याची लोकशाही पद्धतीसारखी संधी मिळत होती. त्यामुळे गावातील लोकांत, आपण सर्व एक आहोत ही भावना वाढीस

लागत असे. पेशवेकालात मात्र पेशव्यांनी गोतसभापद्धती बंद करून त्यांच्या जागी पंचायत पद्धती न्यायदानासाठी सुरू केली. पंचायत पद्धतीमध्ये ज्या जातींच्या, व्यवसायांच्या लोकांचा तंटा असेल, त्यांच्याच जाती-व्यवसायांची निवडक पंचमंडळी नेमण्यात येत, आणि त्यांनी दिलेला न्याय सरकारी अधिकारी मान्य करीत. पंचायत पद्धतीमध्ये इतर गुणदोष अनेक असले तरी, त्यांत एक तत्त्व हरपले गेले होते. ते म्हणजे, गोतसभेत ज्याप्रमाणे सर्व जातींचे प्रतिनिधी तंटयाचा विचार करून न्यायनिवाडा करण्यासाठी समानतेच्या तत्वावर एकत्र बसत, त्याऐवजी पेशव्यांच्या पंचायतीमध्ये प्रत्येक जातीच्या आणि व्यवसायाच्या वेगवेगळ्या पंचायती भरविण्यात येत. त्यामुळे समाजात विभक्तपणाला खतपाणी मिळाले. विशेषतः इतर जातींबरोबर प्रतिष्ठितपणे न्यायदानासाठी बसण्याची अस्पृश्य बलुतेदारांची संधी गमावली गेली; आणि ते सर्व समाजजीवन-प्रवाहापासून अलग पडले, ही फार मोठी हानी म्हटली पाहिजे.[४०]

न्यायदानातील " दिव्य पद्धती " आणि अस्पृश्य

अस्पृश्यांपैकी महार बलुतेदारांना त्यांना कराव्या लागणाऱ्या कामामुळे गावकऱ्यांच्या शेतांविषयी, वतनांविषयी खूप माहिती असे. ही माहिती केवळ स्वानुभवामुळे आणि वडील लोकांच्या कथनामुळे पिढयान्‌पिढया साठून राही. त्यामुळे महारांना गावातील शेतांच्या हद्दी, गावाऱ्या शिवा, पाटिलकीचे वतन आणि इतर वतनांची आणि त्यांच्या वतनदार मालकांची तपशीलवार माहिती असे. या माहितीचा उपयोग करण्यासाठी गावशिवेच्या, वतनांच्या वगैरे तंटयात महारांची साक्ष काढण्यात येत होती. पुष्कळ वेळा महारांना दिव्य करून निणय द्यावा लागत होता, आणि त्यांनी दिलेला न्याय अंतिम समजण्यात येत होता.[४१]

अस्पृश्यांच्या उन्नतीचा मार्ग – लष्करी पेशा

महार, मांग, चांभार या जातींना त्यांच्या अस्पृश्यतेमुळे विकासाच्या आणि समृद्धीच्या सर्व संधींना मुकावे लागले. तथापि त्यांच्या सामाजिक अवहेलनेच्या आणि अधःपाताच्या जीवनातही त्यांना कधीकधी प्रशंसा प्राप्त झाली, ती त्यांच्या लष्करी पेशातील यशामुळे आणि पराक्रमामुळे. खरे पाहिले तर महारांच्या अंगातील क्षात्रवृत्तीला आपले तेज दाखविण्याची प्रथम संधी शिवपूर्वकालातील मुसलमानी राजवटीत प्राप्त झाली होती. शिवकालात महार, मांग वीरांनी किल्ल्यांवर बसविलेल्या तोफखान्यावर अत्यंत कठीण परिस्थितीत मोठया हिंमतीने काम केले. किल्ल्यांच्या संरक्षणासाठी असलेल्या शिबंदीमध्येही महार, मांगांचा भरणा बराच होता.

किल्ल्याच्या तटाखालील पायथ्यावर संरक्षण चौक्या अथवा " मेटे " यावर रामोशी, बेरड यांच्याबरोबरच महार, मांग यांच्याही मेटेनाईक म्हणून नेमणुका झाल्या होत्या. राजाराम महाराजांच्या काळात सेटी बिन नागनाक या शूर महार वीराने

पाटिलकीची आपली मालकी सिद्ध करण्यासाठी मोगलांच्या ताब्यातील वैराटगड किल्ला काबीज केला आणि तो छत्रपतींच्या स्वाधीन केला, त्याबद्दल त्या महार वीराला पाटिलकी वतन देण्यात आले.[४२]

मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या काळात (१६८३–१७०७) शिदनाक नावाच्या महार वीराने महारांचे स्वतंत्र पलटण उभारून मोगलांविरुद्ध जोरदार लढा दिला. पुढे राजा शाहूच्या आगमनानंतर शिदनाक महाराला कळंबी गाव इनाम देण्यात आला.[४३] पेशवेकालात शिदनाक महाराचा नातू शिदनाक नावाचाच होता. हा शिदनाक मोठा सेनापती बनला आणि त्याच्या नेतृत्वाखालील महार पलटणीनें खड्र्याच्या रणांगणावर पराक्रम गाजविला.[४४] दुसऱ्या बाजीराव पेशव्याच्या काळात रायनाक महार रायगड किल्ल्याचा प्रमुख रखवालदार होता. ब्रिटिश फौजेने किल्ल्यावर तोफांचा भडिमार चालविला असताना या रायनाकाने १५ दिवसपर्यंत इंग्रज सैन्याचा धुव्वा उडविला आणि रायगडाचे संरक्षण केले. परंतु गडसंरक्षणाची कामगिरी बजावतानाच रायनाक धारातीर्थी पडला. अशा रीतीने शिवकाल आणि पेशवाईत रणांगणावरील पराक्रमाबद्दल महार वीरांचे थोडेफार कौतुक झाले, पण त्यामुळे त्यांचा सामाजिक दर्जा उंचावला नाही.

ब्रिटिश लष्करी सेवेत महारांची प्रगती

महाराष्ट्रातील अस्पृश्य जातींच्या लष्करी सेवेला खरा बहर ब्रिटिश सेवेत आला. सतराव्या शतकाच्या मध्यापासूनच भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने आपल्या जीवित आणि व्यापाराच्या संरक्षणासाठी फौजा उभारण्यास आरंभ केला होता. या फौजांत थोडे गोरे युरोपियन अधिकारी आणि शिपाई असत; बाकीचे सर्व देशी लोकच शिपाई बनलेले असत. शिवाजीमहाराजांच्या लष्करी धोरणांची स्तुती करणाऱ्या ब्रिटिशांनी मराठ्यांच्या धर्तीवरच आपल्या " बॉम्बे आर्मी "[४५]ची उभारणी केली होती. या ब्रिटिश फौजेत सर्वच जाती–जमातींच्या शूर शिपायांची भरती करण्यात आली. त्यात प्रामुख्याने बेनेइस्रैल, महार, चांभार, मोची, भंडारी, कोळी, देशी ख्रिश्चन, धनगर, माळी वगैरे लोक होते. परंतु या फौजेमध्ये कोकणातील परवारी अथवा महारांचा जोरदार भरणा होता आणि २७ पलटणीतून महार शिपायांची संख्या सुमारे ७५ हजारापर्यंत होती असे पुराव्या-वरून स्पष्ट होते. बॉम्बे आर्मीत महारांनी जमादार, सुभेदार आणि सुभेदार–मेजर सारखी अनेक पदे केवळ आपल्या पराक्रमाच्या जोरावर मिळविली होती.

स्वतः एका लष्करी अधिकाऱ्याचे –रामजी मालोजी यांचे–पुत्र असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथील बहिष्कृत परिषदेतील भाषणात म्हटले आहे, " इंग्रज लोकांनी जेव्हा या देशात आपले पाऊल ठेवले तेव्हा कोठे त्या प्रांतातील अस्पृश्य लोकांस डोके वर काढण्याची संधी मिळाली. या संधीचा फायदा घेऊन

त्यांनी आपल्या अंगी किती शौर्य आहे, किती तेज आहे व त्यांची बुद्धिमत्ता किती वरच्या दर्जाची आहे, हे सिद्ध करून दिले. याचा पुरावा जर पाहिजे असेल तर जुनी आर्मीलिस्टांची बाडे चाळून पाहिली म्हणजे बस्स होईल! या प्रांतातील अस्पृश्य वर्गात किती सुभेदार झाले, किती हवालदार झाले, नॉर्मल स्कूलसारख्या शाळांतून पास होऊन किती हेडमास्तरांच्या हुद्द्यावर चढले! एड्जुटंट क्लार्क व क्वॉर्टर मास्टर व क्लार्कसारख्या जबाबदारीच्या नोकऱ्या चालवून दाखविल्या, याचा तपशील जर देऊ लागलो तर हे भाषण मर्यादेच्या बाहेर वाढेल. इतके सांगितले म्हणजे पुरे की, एके काळी जो अस्पृश्यवर्ग सेवक म्हणून नांदत होता तोच वर्ग पलटणीतील नोकरीमुळे अधिकारसंपन्न होऊन दुसऱ्या वर्गावर सत्ता गाजविणारा झाला होता."[४६]

महार लोक ब्रिटिशांकडे का आकर्षिले गेले ?

शिवकाल आणि पेशवेकालात महारांची लष्करी सेवा आणि त्यांनी रणांगणावर दाखविलेले शौर्य बघितले म्हणजे हे अस्पृश्य लोक किती स्वामिनिष्ठ आणि देशभक्त होते याची चांगली कल्पना येते. १७९५ साली खर्ड्याच्या लढाईत महारांची एक पलटण शिदनाकाच्या नेतृत्वाखाली पेशव्यांच्या बाजूने निजामाविरुद्ध लढली. परंतु इ. स. १८१८ सालापर्यंत अनेक महार ब्रिटिश आर्मीत भरती झाल्याचे दिसते, आणि अशाच महारांच्या एका छोट्या फौजेने कोरेगावच्या लढाईत पेशवे दुसरे बाजीराव आणि सेनापती बापू गोखले यांच्या ३० हजार फौजेला एक दिवस व एक रात्र जागच्या जागीच थोपवून धरले. या ब्रिटिश फौजेत ८३४ लोक होते, त्यांत ६ ब्रिटिश अधिकारी, २ सार्जंट आणि ब्रिटिश कॅप्टन फ्रॅन्सिस स्टाँटन हे होते. शिपाई लोकांत मराठे, रजपूत, इतर हिंदू पण या सर्वांपेक्षा महार शिपायांची संख्या जास्त होती. या छोट्या फौजेतील महारांनी अन्नपाण्यावाचून त्यांचे हाल होत असतानाही पेशव्यांच्या प्रचंड फौजेला रोखून धरून महान पराक्रम केला. या लढाईत पेशव्याच्या बाजूचे ६०० लोक ठार झाले. ब्रिटिशांच्या बाजूचे २७५ ठार झाले, त्यात २२ महार होते. या २२ पराक्रमी महारांची नावे कोरेगावच्या विजयस्तंभावर कोरलेली आहेत. कर्नल टॉडने कोरेगावच्या लढाईचे वर्णन " भारतातील थर्मोपिलेची लढाई " अशा गौरवपूर्ण शब्दांत केले आहे. कोरेगावचा ब्रिटिश विजय एका दृष्टीने फार महत्त्वाचा ठरतो. कारण महार सैनिकांच्या जोरदार प्रतिकारामुळे पेशव्यांच्या फौजेचे एकदा नीतिधैर्य, अवसान गळाले ते पुन्हा कधीच वाढले नाही. यापुढे ब्रिटिश सेनापती स्मिथच्या नेतृत्वाखालील फौजेतील महार शिपायांपुढे पेशव्यांची फौज उभीच राहू शकत नव्हती. पेशव्यांच्या फौजेची हीच गत त्याच वर्षीच्या सोलापूर आणि अष्टीच्या लढायांत झाली. थोडक्यात म्हणजे, कोरेगांवच्या लढाईत महारांनी दाखविलेल्या परक्रमामुळे पेशव्यांच्या फौजेने भयंकर दहशत खाल्ल्यामुळे पुढे तिचा निभाव लागला नाही, हे स्पष्ट आहे.

इतके लढाऊ आणि पराक्रमी महार स्वराज्य अंमल सोडून ब्रिटिश सेवेकडे का वळले असावेत? महारांच्या निष्ठेत असा बदल का झाला असावा? या संदर्भात थोर समाज-सेवक विठ्ठल रामजी शिंदे यांनी म्हटले आहे."...ही निष्ठेची थारेपालट होण्याला केवळ दुसऱ्या रावबाजीचा दिवटेपणाच कारण नव्हे. इंग्रजांची समयज्ञता, शिस्त आणि वेळेवर रोख पगार देण्याची प्रसिद्धी ह्या गुणांची भुरळ पडून इंग्रजांना अस्पृश्यच भाळलेले नव्हते, तर चांगले नरपती, गजपती, क्षत्रिय आणि भूदेव सोवळे ब्राह्मणही आपल्या तलवारी आणि लेखण्यांसह वश झाले."[४७]

महारांची निष्ठापालट व्हावयाला आणखी एक कारण दिसते, ते म्हणजे उत्तर-पेशवाईत वाढलेले स्पर्शास्पर्श विचारांचे विशेष स्तोम! याचे उदाहरण द्यावयाचे म्हणजे खड्र्याच्या रणांगणावरसुद्धा शिदनाक महाराचा गोट ब्राह्मण, मराठा यांच्या गोटाजवळ असलेला बघून कित्येक सरदारांनी तीव्र नापसंती व्यक्त करून महारांचा गोट दूरच्या ठिकाणी हलविण्याची पेशव्यांकडे विनंती केली. रणांगणावर अशा रीतीने महारांविरुद्ध अस्पृश्य म्हणून भेदभाव पाळण्यात आला तर त्या महारांना काय वाटले असेल? तरी एक गोष्ट बरी झाली! हिरोजी पाटणकरासारख्या वयोवृद्ध नेत्याने पेशव्यांना म्हटले, "ही काही जेवणाची पंगत नाही....ही तरवार गाजविणाऱ्या शूरांची पंगत आहे. येथे जातीचा विचार नाही....ज्याची तलवार खंबीर तो हंबीर."[४८] खड्र्याच्या रणांगणावर महारांनी पराक्रमाची शर्थ केली; परंतु त्यापुढील काळात महाराष्ट्रातील अस्पृश्य आणि विशेषतः महार ब्रिटिश नोकरीकडे वळू लागले, कारण पुढे दुसऱ्या बाजीरावाच्या काळात अस्पृश्यांना विशेष वाईट रीतीने वागवण्यात येत होते.

महारांची निष्ठापालट होण्याला पेशव्यांचे लष्करभरतीचे धोरणही जबाबदार मानता येईल. उत्तरपेशवाईत परप्रांतीय आणि परधर्मीय उत्तर भारतातील भाडोत्री शिपायांचा मराठी सैन्यात खूप भरणा होऊ लागला. त्यात गारदी, अरब, अफगाण आणि मुसलमानांचा भरणा आढळतो. अशा रीतीने अस्पृश्यांना लष्करभरतीसाठी अयोग्य ठरविल्याने, महारांपुढे पोट भरण्यासाठी दुसरे साधन उरले नसावे आणि ते मोठ्या संख्येने ब्रिटिश सेवेत शिरले असले पाहिजेत! अशा रीतीने ज्या मराठी समाजाने आणि स्वराज्याने महार-मांगांकडे केवळ अस्पृश्य म्हणून बघितले आणि त्यांच्या क्षात्रवृत्तीची हेटाळणी केली, त्या मराठी स्वराज्याची ही फार मोठी घोडचूक ठरली, असे म्हणावे लागते. कारण त्यामुळेच महार ब्रिटिश सेवेकडे आकर्षित होत गेले आणि याच अस्पृश्यांच्या कवायती पलटणी तयार करून ब्रिटिशांनी पेशव्यांचे राज्य जिंकले! डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या लष्करी सेवेबद्दल म्हटले आहे, "लष्करी सेवा ईस्ट इंडिया कंपनीच्या काळापासूनच अस्पृश्यांची 'मक्तेदारी' बनली होती. ते इतक्या मोठ्या संख्येने लष्करात भरती झाले होते की, मार्क्विस ट्वीडलडेल या ब्रिटिश अधिकाऱ्याने १८५९ साली इंडियन आर्मी कमिशनला पाठविलेल्या खलित्यात लिहिले आहे, "हिंदुस्थान हलक्या अथवा कनिष्ठ जातींच्या

माणसांच्या मदतीनेच जिंकण्यात आला होता हे कदापिही विसरण्यात येऊ नये. "[४९] अशा रीतीने महाराष्ट्रातील अस्पृश्यांच्या क्षात्रवृत्तीचा योग्य तो उपयोग मराठी स्वराज्यात फारसा करण्यात आला नसल्याने ते अस्पृश्य ब्रिटिश सेवेकडे आकर्षित झाले; परंतु त्यांच्या निष्ठापालटामुळे मराठी स्वराज्यावर फार दूरगामी परिणाम घडून आले आहेत, याचे भान अभ्यासूंनी ठेवले पाहिजे.

लष्करी सेवेमुळे घडविलेले परिवर्तन

अस्पृश्यवर्गातील महार, मांग, चांभार समाजामध्ये लष्करी सेवेमुळे खूप परिवर्तन घडून आले आणि त्यांच्याकडे बघण्याचा इतर जातींचा दृष्टिकोन बदलत गेला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले आहे, " ब्रिटिश पलटणीतील नोकरीमुळे हिंदु समाजाच्या रचनेत एक क्रांती झाली असे म्हणण्यास काहीच हरकत नाही. ज्या महार, चांभार लोकांना गावात मराठे लोक शिवून घेत नसत व त्यांनी जोहार किंवा रामराम केला नाही तर, मराठे लोक आपला अपमान झाला असे समजत, तेच मराठे शिपाई महार व चांभार सुभेदार यांना लवून सलामी देत असत व " क्यूं बे " म्हणून जर त्यांनी म्हटले तर डोळे वर करून बघण्याची त्यांची ताकद होत नसे. "[५०]

दुसऱ्या एका प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ब्रिटिश लष्करी सेवेचा महाराष्ट्रातील अस्पृश्यांवर कसा परिणाम झाला याबद्दल लिहिताना म्हटले, " ब्रिटिश सत्तेचा उदय होईपर्यंत अस्पृश्य लोक अस्पृश्य राहाण्यातच समाधान मानीत होते. त्यांना मिळालेले स्थान हिंदूंच्या देवतांनी त्यांच्यासाठी अगोदरच नियोजित केलेले होते व त्याचीच अंमलबजावणी हिंदू राज्याने केली होती. सुदैवाने म्हणा ईस्ट इंडिया कंपनीला त्यांच्या भारतातील फौजेसाठी सैनिकांची आवश्यकता होती; पण त्यांना त्यासाठी अस्पृश्यांशिवाय कोणीच भेटले नाहीत. ईस्ट इंडिया कंपनीच्या लष्करात शिपायांना व त्यांच्या मुला-मुलींना सक्तीचे शिक्षण देण्याची पद्धती होती. लष्करात मिळालेल्या शिक्षणाने अस्पृश्यांना एक नवी दृष्टी दिली आणि त्यांच्या जीवनाला एक नवे मूल्य प्राप्त झाले. त्यांना आता जाणीव झाली कीं, त्यांचे समाजातील निकृष्ट स्थान म्हणजे काही दूर न फेकता येणारे भवितव्य नव्हते, तर तो पुरोहितवर्गाने त्यांच्या व्यक्तित्वावर दुष्ट हेतूने लादलेला कलंक होता. आता यापुढे त्यांना त्याची पूर्वी कधीही न वाटलेली लाज वाटू लागली आणि त्यापासून स्वतःची सुटका करून घेण्याचा त्यांनी निर्धार केला. "[५१]

समारोप

पेशवेकालीन अस्पृश्य अथवा दलित समाजाच्या स्थितीबद्दलच्या या लेखाचा समारोप करताना एवढेच म्हणता येईल की, महार, मांग, चांभार या अस्पृश्य जातींच्या अंगी असलेल्या गुणांचा त्यांना शिक्षणापासून वंचित ठेवल्याने आणि मुख्य

जीवनप्रवाहातून त्यांना अलग पाडल्याने, कसलाच विकास होऊ शकला नाही. त्यांना अस्पृश्य म्हणून विकासाच्या संधी नाकारण्यात आल्या आणि त्यांच्यावर गावकुसाबाहेर दारिद्र्यात खितपत पडून अपमानित जीवन जगण्याचे महाभयंकर पाप लादण्यात आले. अस्पृश्यांच्या अंगच्या शौर्यधैर्यादि गुणांची फारशी पारख मराठे राज्यकर्त्यांनी आणि समाजाने कधी केली नाही. लष्करी सेवेची संधीही त्यांना मराठी राज्यात मोठ्या प्रमाणावर देण्यात आली नाही; त्यामुळे त्यांच्या गुणांचे चीज होऊ शकले नाही. एका अस्पृश्यतेमुळे महार, मांग, चांभारांच्या जीवनाचे खूप वाटोळे झाले आहे. महात्मा ज्योतिबा फुल्यांच्या शाळेतील एका मांग मुलीने अस्पृश्यांच्या दुःखांचे विश्लेषण १८५१ साली एका निबंधात करताना म्हटले होते, " एका शिकण्याच्या बंदीपासून (अस्पृश्यता) आम्हावर किती दुःखे पडतात ह्याचा ह्या निर्दयांच्या (सवर्ण हिंदु लोक) अंतःकरणास द्रव येतो काय ? ह्याच कारणामुळे आम्हास कोणी चाकरीस ठेवीत नाहीत; जर चाकरी मिळण्याची एवढी बंदी तर आम्हास कोठून पैसा मिळणार ? बरे हे उघडच सिद्ध होते की, आमचे हाल फार होतात...मांग-महारांच्या मुलांस ब्राह्मणादिकांच्या मुलांनी दगड मारून रक्त निघाले तर ते सरकारात जात नाहीत. ते म्हणतात की, आपणास उच्छिष्ट आणावयास जावे लागते, असे म्हणून उगीच राहातात ! हाय, हाय, काय रे भगवान ! हे दुःख ! हा जुलूम विस्ताराने लिहू लागले तर मला रडू येते. "[५२] वरील विवेचनावरून महाराष्ट्रातील पेशवेकालातील अस्पृश्य समाज सर्वच दृष्टींनी पीडित राहिला आणि अस्पृश्यतेमुळे सर्व गुणांचे मातेरे होऊन त्याची आर्थिक आणि सामाजिक स्थिती अतिशय हलाखीची राहिली, हे स्पष्ट होय.

■ ■

संदर्भ

१. शिवाजीमहाराजांचे आज्ञापत्र – २८ जानेवारी, १६७७ इ. स.
२. भारतवर्ष, पत्रे यादी. क्र. ६७, ६९.
३. Sarkar J. N., Shivaji and His Times., p 374.
४. कर्वे, इरावती – परिपूर्ती.
५. ओतूरकर (संपा.), पेशवेकालीन सामाजिक व आर्थिक पत्रव्यवहार, लेखांक ९६.
६. कित्ता, ले. ७५; केतकर, (संपा.), महाराष्ट्रीय ज्ञानकोश, पृ. ५२७.
७. Govt Resolution of the Revenue Dept., Govt of Bombay, No. 7420/33, Dated 13-9-1938.
८. पवार, ए. जी., ताराबाईकालीन कागदपत्रे, खंड १ ला, ले. २३०.

९. British Gazetteer of Kolaba and Janjira Dist. Vol 11, 1883, p 87; Gazetteer of Nasik Dist., Vol 16, 1883, p 87.
१०. Gazetteer of the Bombay Presidency, Vol. 18, part 2. 1885, Dist. Poona. pp. 361–367.
११. राजवाडे, वि. का., चतुर्थ संमेलनवृत्त, भा. इ. सं. मं. पुणे.
१२. ओतूरकर (संपा.), पे. सा. आ. पत्रव्यवहार, ले. ९६.
१३. जोशी, शं. ना., ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड ३ रा; राजवाडे वि. का., मराठयांच्या इतिहासाची साधने, खंड. २०, ले. १७४.
१४. पवार, ताराबाईकालीन का. प. भाग १ ला, ले. २३०.
१५. कित्ता.
१६. कित्ता.
१७. ओतूरकर (संपा.), पे. सा. आ. प., ले. ४६.
१८. पेशवे रोजनिशी, खंड ६ वा, नोंद ८१६.
१९. ओतूरकर, पे. सा. आ. प., ले. ९६.
२०. पेशवे रोजनिशी, खंड ३ रा, नोंद २६५.
२१. पेशवे रोजनिशी, खंड ६, नोंद ६७३.
२२. पेशवे रोजनिशी, खंड ६, नोंद ७२३.
२३. ओतूरकर, पे. सा. आ. प., ले. ६.
२४. जोशी, ना. वि., पुणे वर्णन, पृ. १६५.
२५. शाहूराजाची रोजनिशी, नोंद क्र. २८३, ८४, ८६, ८७, ८८; पे. रो. सं. ३, क्र. ४, ५२१, ५२२; ऐति. संकीर्ण साहित्य, खंड ५. पृ. ७१, ७२.
२६. सरदेसाई (संपा.), पेशवे दफ्तर, खं. ४३, ले. ९२.
२७. ऐतिहासिक स्फुट लेख, भाग २ रा, ले. ३.
२८. खरे, ऐतिहासिक लेखसंग्रह, ले. २७३०.
२९. पेशवे दफ्तर, खं. ४३, ले. ९२.
३०. पेशवे दफ्तर, खं. ४३, ले. ११३.
३१. पेशवे रोजनिशी, खं. ८, नोंद क्र. ११२५.
३२. जोशी, ना. वि., पुणे वर्णन, पृ. ६१.
३३. Russel R. V. and Rai Bahadur Hiralal, Tribes and Castes of the Central Provinces of India, p 189.
३४. कित्ता – पृ. १४३.
३५. पेशवे रोजनिशी, खं. ८, क्र. ११३२.
३६. कित्ता – क्र. ११२९.

३७. पेशवे रोजनिशी, खं. ७, क्र. ८८१.
३८. पेशवे रोजनिशी, खं. ८, क्र. ९०७.
३९. पेशवे रोजनिशी, खं. ८, क्र. ८९८, ९३३.
४०. एन्. जी. भवरे, ' The role of the Panchayat in the Judicial Administratlon of the Peshwas in Maharashtra : Proceedings of the Indian History Congress – Waltair, 1979, pp 491–95.
४१. राजा शाहूची रोजनिशी, खंड १ ला, क्र. २९७, २९८, ३०१.
४२. जोशी, शं. ना., सप्तमसंमेलनवृत्त, भा. इ. सं. मं., पुणे, पृ. ५४, ५५.
४३. पारसनीस (संपा.), ऐतिहासिक गोष्टी – क्र. ३२.
४४. कित्ता.
४५. सर पॅट्रिक कॅडेल, History of the Bombay Army, p 147.
४६. बाबासाहेब आंबेडकर, कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद, महाड येथील भाषण : बहिष्कृत भारत, ३ एप्रिल, १९२७.
४७. शिंदे, वि. रा., भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न, पृ. १७२.
४८. पारसनीस – ऐति. गोष्टी – ३२.
४९. Ambedkar B. R.–Writings and Speeches, Vol. 1. p. 261.
५०. डॉ. आंबेडकर : बहिष्कृत भारत – ३ एप्रिल, १९२७.
५१. Ambedkar : What Congress and Gandhi have done to the Untouchables, p. 189.
५२. जोशी, ना. वि., पुणे वर्णन, पृ. १६३–६४.

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६२ : १-४, १९८३-८४

Socio–economic disabilities of Shudra castes in 18th century Maharashtra

P. A. Gavali

Marathwada University, Aurangabad

The caste life of eighteenth century Maharashtra was not always autonomous. Sometimes the Government (i. e. the Peshwas) intervened, protecting, controlling and strengthening its regulations. From certain decisions noted by the Peshwas in their diaries, and with the help of the other source material of the said period,[1] one can form some idea about the disabilities of various Shudra castes. It was true that disabilities were imposed upon the Untouchable Castes, but it was also a fact that the Shudra Castes did not remain aloof from the imposition of disabilities. An attempt is made in this paper to focus light on socio–economic disabilities of the Shudra castes under the Peshwa rule in the eighteenth century Maharashtra.

Who were the Shudras ?

To give an answer to this question, one need not take the help of old Sanskrit literature, because in the eighteenth century Maharashtra, except the Brahmins and the Untouchables, the rest in the society were thought to be Shudras. Tentatively, Shudra Castes were the Nhavi (barber), Kumbhar (potter), Sutar (carpenter), Lohar (blacksmith), Sonar (goldsmith), Parit (washerman), Kolis (water carriers), Gurav (a village Shudra priest), Teli (oil-maker), Tamboli (pan dealer), Sangar (blanket maker), Shimpi (tailor), Mali (engaged in

vegetable cultivation), Gondhali (a Shudra religious devotee), Thakar (family priest of certain tribes of Shudras), Jangam (a lingayat priest), Vajantri (a musician), Ghadashi (another musician), Koshti (weaver), Dhangar (shepherd), Kasar (bangle dealer), etc. These Shudra castes formed the village communities which existed as socio-economic unit in the eighteenth century Maharashtra, though there was less cohesion among its members.

Two other salient features of these Shudra castes were that (i) they are mentioned in the documents as Balutedars* and Alutedars* (i. e. village artisans)[2] and (ii) again they were divided into sub-castes based on occupational differences, as well as on the superior and inferior pedigrees of the castes. For example, the weaver caste had been split into ' weavers of good origin ' (changale jatiche Koshti) and descendents from female slaves (batkiche vansh).[3] The dispute arose between Shimpi Dyers and Indigo Dyers (i. e. Rangaris and Nilaris).[4] The conflict arose between the Patwekaris (manufacturers of silk threads etc.) and the Jangams on the privilege work in silk.[5] A dispute arose between Pardeshi Kumbhars and Marathe Kumbhars about manufacturing tiles and earthen pots.[6] These Shudra castes in village community served social and economic needs. They were assistants to the Patil (village headman) in the various social ceremonies in the village,[7] and also rendered valuable services to the whole village in its economic activity and growth.[8] These autonomous self-sufficient village communities of the artisans exercised by the state and its subordinate in the slavery.

Slavery :

The Peshwa period documents speak not of the Shudras as such, but of *Kunbini* (a female domestic slave), *Batik* (a female slave prostitute or a loose woman). These slaves

are spoken of as being employed in domestic and agricultural operations.[9] There is evidence to show that the slaves belonged mostly to the Shudra castes -- "The Peshwas distributed clothes on the occasion of the Dasara festival to the Kunbinis from the Shudra Castes viz. Sonar, Prabhu, Kumbhar, Parit, Dhangar, Sutar, Mali, Koli, Lohar, Kunbi, etc."[10] Thus slavery was exclusively confined to the members of the Shudra castes. Slavery arose out of war, debt, purchase famine, adultery, gifts, physical defects and out of fraud.[11]

While the slaves during the period, especially women slaves, were employed in domestic services of the Peshwas, feudal lords, savakars, merchants etc., they were well fed and kindly treated. The slaves may not have been starved. "In 1762-63, Rs. 1,303 were distributed to one hundred and ninety-five Kunbinis for sari and breast cover on the Dasara festival".[12] In one case we are told that they had their heads anointed with oil at the time of the death of their mistress,[13] which shows that ordinarily these slaves were given inferior dress and food.

Slave ownership was quite common in those days and the state owned the largest number of slaves.[14] the Government issued orders to its officers of the different provinces to purchase beautiful, healthy women who also ought to be quick at heels, black, tall and slender.[15] Sometimes the Government also dealt with slave trade. In 1800-1801, the following order was issued to Mamledar of Taluka Ratnagiri : "The number of female slaves at Taluka Ratnagiri being large, the officer in charge should retain for Government work only as many as necessary and to sell the rest."[16]

The feudal lords, great officers of the state, merchants, s vakars and the like doubtlessly owned slaves in large numbers. "The Subedar of Kalyan left at his death 29 slave girls.[17] The payment made to the Government officers was sometimes in kind and included slaves.[18]

All this would suggest that slavery prevailed on a considerable scale. That it was based on the brahmanical theory that the Shudras are meant for the service of the higher castes is broadly reflected in the employment of slaves.

Forced Labour :

Forced labour practised in this period was called either *Begar* (a Persian term) or *Veth* (derived from Sanskrit Visti). *Vethbegar* is a compound of the two terms. People from different castes who were engaged in such services are simply called either forced labourers (begari, vethi, vethbegar), 'men' (asami), or 'rayat or rayet' in our records.

During the period at least seven kinds of Vethbegars prevailed. The various kinds of Vethbegars were :

(i) Vethbegar exacted for construction or repair of forts (Kila), police stations (Thana), residence of local bureaucrats as well as the dams (Dharan) for irrigation,

(ii) For porterage (hajirbegar) of grains, timbers and other goods of the government,

(iii) Vethbegar exacted for cutting grass (Gavat) from government meadows (Sarkarche Kuran) scattered at various places,

(iv) It also exacted for miscellaneous labour (Rabanuk or Rabata) in the offices of local as well as the central government,

(v) They also required it for miscellaneous labour and saddlery at government stables (Hujur Paga),

(vi) Vethbegar of a watchman at chowki (Baithak Vethbegar or Chowki Vethbegar) and at market places (Bajar), and

(vii) It also exacted for Inam — (i) for construction of houses and (ii) porterage for the sake of Inamdar, in the village.[19]

From the above seven kinds of Vethbegar, porterage and cutting fodders was not imposed upon any specific castes but upon the villagers as a whole whose main body was peasantry:

" Grass in Government Kuranas (meadows) was annually cut by labourers supplied by the various Mahals (provinces)."[20] " It was usual for the ryots of Prant Gangathadi to supply labourers, free of charge, for cutting grass of the Government."[21]

It was a tradition in those days that labourers supplied for the porterage (hajir begar) such as collection of fire wood, fuel, were also used for the construction of shelters for the bullocks of the artillery etc.[22]

The imposition of forced labour on Shudra castes was in regard to construction and repair, miscellaneous labour at government offices, and miscellaneous labour and saddlery at stables. With regard to this, certain specific castes are clearly indicated in the records as those who have been requisitioned in the different services. In connection with the construction of a flight of steps leading to the river Bhima, orders were issued to abstain rom calling upon any masons or stone-cutters for forced labour.[23]

In the performance of marriage and sacrifice forced labour was exacted from Shudra castes viz. Kumbhar (potter), Sutar (carpenter), Lohar (blacksmith), and Burud (bamboo-worker).[24] Sometimes local bureaucrats harassed them. For instance, the Mehatar of the Malis of the Saswad district lodged a complaint with the authorities against the Deshmukh for harassing his castemen for Vethbegar.[25]

Thus the various Shudra castes were regularly pressed into forced labour in their traditional occupation by the Government and its local bureaucrats.

Social and Religious Disabilities :

To study the Vedas and to have their socio-religions

rites performed according to the Vedic mantras was one of such privileges as enjoyed by the Brahmins. The Shudras were to have their socio-religious rites performed according to the Puranic mantras as against the Vedic, and were forbidden to study the Vedas. Those violating this regulation could be punished. There is an instance of Sonars (goldsmiths) whose tongues were cut off for the offence of performing their religious rites according to Vedic mantras.[26] Because of the severe punishments, Shudra castes sometimes performed these religious acts secretly. But when any such act was detected, they were captured and were put in chains, tied to an elephant's feet etc.[27] In another instance, a Jangam, the priest of the Lingayatas, was fined for performing Rudra Abhiseka i. e. a certain Vedic rite.[28]

A dispute between the Brahmins and the Prabhus over caste privileges shows various civil and religious disabilities imposed on the Prabhus for the reason of their being Shudras.[29] It was settled that (i) they should not perform religious rites by Vedic Mantras, (ii) they should not use cooked rice in offering oblations to the dead, (iii) they should use only Puranic Mantras in their daily observance and worship, (iv) they should not feed any Brahmin in their houses, (v) they should not worship the Shaligram deity; (vi) they should only visit the temples frequented by Shudras, (vii) they should salute Brahmins by calling out the word dandvat and should use the same word in saluting men of their own caste, (viii) they should not employ or keep at their houses any Brahmin versed in the Vedas, any Brahmin cook or water bearer, or any Brahmin woman.

The Shudras were not allowed to enter the Brahmanical shrines. The rules and regulations framed by the Peshwas concerning the management of Tryambakeshvar temple at Nasik, for instance, clearly prescribed that the Shudras should not enter the holy shrine; they may have a

darsana of the deity from rhe outer entrance.[30] One Lakhya Thakur of Nasik was fined Rs. 1,000/– for having entered the temple of Shri Tryambakesvar; however, his fine was remitted.[31] Similarly, the Shudras were not allowed to draw water from the wells meant for the use of the Brahmins.[32]

Thus in social and religious matters the Brahmins wanted to establish their superiority as well. To achieve this, the Peshwas declared certain civil and religious rights as the exclusive privileges of the Brahmins and at the same time imposed certain disabilities on Shudra castes.

■ ■

Notes and References :

1. See the various volumes of Sardesai, G. S. (ed), *Selections from the Peshwa Daftar* (S. P. D.), Vad, G. C. (ed.), *Peshwa Diaries* (P. D.), Khare, V. V. (ed.), *Aitihasik Lekha Sangraha* (A. L. S.), Rajwade, V. K. (ed.), *Marathyanchya Itihasachi Sadhane* (M. I. S.) etc.
2. *M.I.S.*,Vol. XXV, Lekh No. 51. *Balutedars* : Under this category following Shudra castes are included viz. carpenter, blacksmith, washerman, potter, barber, gurav, goldsmith etc. *Alutedars* : Besides the Balutedars,there were as many as eighteen Alutedars viz. : Teli, Tamboli, Sali, Sangar, Shimpi, Mali, Gondhali, Daurya, Thakur, Gosavi, Jangam, Mulana, Vajantri, Ghadashi, Kalavant, Bhoi, etc. See Dr. Ketkar S. V. (ed.), *Maharashtriya Gyankosh*, Vol. VII, p. 527.
3. *P. D.* Vol. VII : 763.
4. *P. D.* Vol. I : 375, S. P. D. Vol. XXXXIII. 41.
5. *Ibid*, No. 292.
6. *P. D.* Vol. VI : 775.
7. Joshi S. N., *Marathekalin Samaj Darshan* (1960), pp. 16, 31. On festive occasions like *Pola festival* (bull worship),

Nagpanchami (snake-worship), *Ganesh Chaturthi* (worship of Ganesh image), *Dasara*, etc. Potter has to provide different types of images of God and Goddeesses. The Shudra castes performed their duties on festive occasions like Holi, Samtvant and Diwali-padva or the New Year Day. Thus the Shudra castes met the religious and social requirements of the society.

8. The artisans played an important role in the agrarian economy. They provided ploughs, carts and other similar implements to the cultivator.
9. *S. P. D.* Vol. XXXXII, pp. 32-33, 37; P. D. Vol. **II** : 295; Bhave V. K., *Peshwekalin Maharashtra*, pp. 240, 43, 44.
10. *P. D.* Vol. VII.743; S. P. D. Vol. XXXXV, p. 86.
11. P. A. Gavali, *Peshwekalin Gulamgiri Va Asprusatha* (1981, Prachar Prakashan, Kolhapur), pp. 19-23.
12. *P. D.* Vol. VII : 743. See Tikekar, p. 286. " They were clothed and fed sometimes better than free men of their standing. "
13. *P. D.* Vol. I : 368.
14. *P. D.* Vol. VII : 743.
15. *P. D.* Vol. II : 308.
16. *P. D.* Vol. V. : 233.
17. *BISM* (1926-27) Vol. VIII, p. 58.
18. Chapekar N. G., *Op. Cit.*, p. 185.
19. See Peshwa Diaries under the section of Vethbegar Vol. Nos. II-VIII.
20. *P. D.* Vol. VII : 741.
21. *P. D.* Vol. VIII : 1089.
22. *P. D.* Vol. II : 286, 288, 289 and 306; Vol. VIII : 1088; Vol. VI : 714, 716, 723 and 762.
23. *P. D.* Vol. II : 196.
24. *P. D.* Vol. IV : 57, 269; Vol. V : 238.
25. Oturkar R. V., *Op. Cit.*, No. 65.

26. *M. I. S.* Vol. XXIV : 13, 58.
27. *A. L. S.* Vol. VIII : 3152, 53, 54. Foot note, p. 4757. One Sadhu Achari lived in Karveer area and performed religious acts of Sutar and Sonars of the Patwardhan's area with the help of the Vedic Mantras.
28. *S. P. D.* Vol. XXXXIII : 108, 110.
29. *P. D.* Vol. VIII : 1144.
30. See *BISM* (Jan-March 1944).
31. *P. D.* Vol. VIII : 1111.
32. *ALS* Vol. X : 3999.

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६२ : १-४, १९८३-८४

पेशवेकालीन अल्पसंख्यांक जातींकडून घेण्यात येणारी गुन्हेगारी

एम्. एन्. माने

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पेशवेकालीन अल्पसंख्यांकांमध्ये रामोशी, महार, मांग, तराळ, चांभार, ढोर, कोळी, सोनार, तेली, परीट, जोशी (ज्योतिषी), भट, न्हावी, मेहतर इत्यादी लोकांचा समावेश करण्यात आल्याचे दिसून येते. भट, ज्योतिषी इत्यादी लोक जरी अल्पसंख्यांक असले तरी पेशव्यांकडून व समाजाकडून सर्वच क्षेत्रांत त्यांना चांगली वागणूक दिली जात असे. याउलट तराळ, रामोशी, चांभार, महार, मांग, वेरड, इत्यादी व्यक्तींना समाजाकडून योग्य अशी वागणूक दिली जात नसे. उदा. रामोशी व मांग यानी चोऱ्या केल्यास, बदअंमल केल्यास, त्यांच्याकडून गुहेगारी वसूल करून त्यांना शिक्षाही केल्या जात. मात्र ही परिस्थिती पेशवेकाळातील अल्पसंख्यांक जातींतील काही लोकांबाबत कमी जास्त प्रमाणात दिसून येते. भट, जोशी व कुणबी इत्यादी व्यक्तींनी बदअंमल केल्यास त्यांना तीर्थयात्रा पार पाडावयास लावून किंवा त्यांजकडून कमी जास्त गुन्हेगारी वसूल करून समाजामध्ये परत त्याना पूर्वीप्रमाणे स्थान दिले जाई.

गुन्हेगारी

मोल्सवर्थने आपल्या मराठी-इंग्रजी शब्दकोशामध्ये गुन्हेगारी व हरकी यांचे अर्थ खालीलप्रमाणे दिलेले आहेत :

गुन्हेगारी – A fine or mulct. A roll of offences or crimes (as periodically classified). A roll of punishment of offenders.

हरकी – Money paid to the court in token of his gratification by the successful suitor or litigant.

अल्पसंख्यांक जातींकडून गुन्हे, चोऱ्या, बदअंमल व व्यभिचार घडल्यास त्यांच्याकडून त्यांनी गुन्हे केल्यामुळे गुन्हेगारी तर घेतली जात असेच, शिवाय त्यांना मोठ्या व क्रूर अशा शिक्षेला सामोरे जावे लागे. पेशवेकालात गुन्हेगारी व हरकीची पद्धत अस्तित्वात होती. यामुळे सरकारला काही उत्पन्नही मिळे. जमिनीच्या तंट्यांत,

शिवेच्या तंटयांत उद्‌भवलेल्या प्रकरणांतून सरकार हरकी व गुन्हेगारी घेई. वाईट कृत्य केल्यास सरकार संबंधित व्यक्तीकडून गुन्हेगारी वसूल करीत असे; किल्ल्यात डांबून ठेवत असे; दंड वसूल करत असे; तसेच केलेल्या कृत्याबद्दल शिक्षा देत असे. शिक्षा ह्या गुन्ह्यांच्या स्वरूपावर कमी जास्त प्रमाणात आधारलेल्या असत. उदा. हात-पाय तोडणे, नाक कापणे, कान कापणे, डागण्या देणे, इत्यादी क्रूर शिक्षाही त्या काळी सरकारमार्फत दिल्या जात असत.

प्राचीन काळी अल्पसंख्यांक घटकांतील लोकांनी व्यभिचार, भांडण, तंटे, चोऱ्या, सरकारी कामात चुकारपणा केल्यास, असत्य बोलून ते सिद्ध झाल्यास, त्यांना अटक करून त्यांच्याकडून दंड, गुन्हेगारी राज्यकर्ते वसूल करत. १८ व्या शतकात पेशवे सरकारसुद्धा अल्पसंख्यांक घटकांतील लोकांकडून गुन्हेगारी वसूल करीत असे. प्रस्तुत शोधनिबंधात अल्पसंख्याकांकडून घडलेले गुन्हे, चोऱ्या, व्यभिचार व बदअंमल, लग्न-संबंधातील उद्‌भवलेली प्रकरणे, चाकरीमध्ये हयगय, कामचुकारपणा वगैरे बाबतीत घेण्यात येणाऱ्या गुन्हेगारीचा परामर्श घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

गुन्हे व चोऱ्या

इ. स. १७९९ च्या एका पत्रानुसार[१] महार, मांग, चांभार, सुतार, कुंभार, न्हावी, परीट, लोहार, जोशी, गुरव, सोनार व मुलाना यांचा, व इतर पत्रांतून उपाध्ये, ज्योतिषी, कोळी, साळी, तेली, माळी, रामोशी, बेरड इत्यादी जातीतील लोकांचा गुन्हेगार म्हणून उल्लेख आढळून येतो. महार – मांग, सोनार इत्यादी लोकांनी कामात चुकारपणा केल्यास, अनागोंदीपणा केल्यास, सरकार गुन्हेगारी वसूल करी. "धोंडया महार चाकरीस चुकला म्हणून ८ आणे"[२] गुन्हेगारी वसूल केली. मौजे गराडे तर्फ कडेपठार येथील रामोशाने चोरीचा माग लावून देण्याचे व माग न लागल्यास चोरी भरून देण्याचा व गुन्हेगारी देण्याचा कतबा लिहून दिलेला होता."[३] इ. स. १७६० मध्ये रविवार पेठेतील कृष्णा सोनार याने सोन्याचे कडयात काही रुप्याची कारागिरी चालविली. त्याच्याकडून ४० रु.[४] गुन्हेगारी करार केल्याचे तर बाळकिसन सोनार याने इ. स. १७८२ मध्ये मोहरा व रुपयावरील शिक्के खोडून मोहरा व रुपये गैरसिल खोटे पाडले म्हणून १७४५ रु. गुन्हेगारीचा ऐवज सरकारने त्याच्यावर बसवल्याचे दिसते.[५] मौजे देवळगांव तर्फ आलेगांव येथील बाबुजी सोनाराने गावातील कुळास खोटया रुपयावर निशाना घालून दिल्याबद्दल सरकारने रु. २०० गुन्हेगारी त्याच्यावर बसविली.[६] अल्पसंख्यांक जातीतील लोकांनी चोरी, मारहाण, भांडणतंटे केल्यास सरकार त्यांना अटकेत ठेवून त्यांच्याकडून गुन्हेगारी वसूल करीत असे. इ. स. १७७१ मध्ये आवडीतेली सातारीकर हिने सातारा शहरात मराठयाची पोरे मारली. ती सापडली, सबब तिजकडे २५ रु. गुन्हेगारी करार केली.[७] संताजी कोळी याने कोकणात दंगा करून गाव लुटला याबद्दल त्याला व त्याच्या माणसांना किल्ले शिवनेरी

येथे अटकेत ठेवले.[८] शिवाजी कोळयाचा लेक चांगदेव मारेकऱ्यांत सामील होता म्हणून त्याच्याकडून ५०० रुपये गुन्हेगारी वसूल केल्याचे दिसून येते.[९] इ. स. १७७१ मध्ये राजू तेली याने सरकारी कोठीतून दारूची बंदरे चोरल्याबद्दल त्यास अटक झाली होती.[१०] खंडया बेरड चोऱ्या करत होता म्हणून त्याची माणसे अटकेत ठेवली व सिरस्तेप्रमाणे रोजमुरा चालू ठेवला.[११] मौजे गोविली येथील लक्ष्मण परीट याने हबशाच्या लोकांकडे चाकर राहून मुलखात दंगा केल्याबद्दल त्याला शिक्षा म्हणून त्याचा एक हात व एक पाय तोडल्याचे[१२] इ. १७६५ च्या पत्रावरून दिसून येते. वळतोकर रामोश्याने शेरीतील बाजरी चोरून नेल्याबद्दल २३ रु.,[१३] तर ब्रह्माजी धनगर याच्यावर म्हादू माळी याने चोरीचा आळ घालून त्याची बेअब्रू केल्याबद्दल २ रु. गुन्हेगारी घेतल्याचे तत्कालीन कागदपत्रांवरून दिसून येते.[१४]

व्यभिचार व बदअंमल

व्यभिचार व बदअंमल करणे, स्त्रिया पळवून नेणे इत्यादी कृत्ये केल्यास सरकार संबंधित व्यक्तीकडून, गुन्हेगारीच्या स्वरूपात रुपये वसूल करीत असे. खोतीसाळी[१५] हा आपले बायकोजवळ जातो म्हणून तुपा तक्रार घेऊन हुजूर आला. त्याची चौकशी करता तुपा (साळी) खोटा झाला. सबब गुन्हेगारी करार केली. त्याचा हवाला बावाजी महादेव याने घेतला. इ. स. १७६०–६१ मध्ये कसबा खेडे येथील सिदू गंगाधर जोशी याने आपली सून कृष्णाबाई इजवर व्यभिचाराचा आरोप ठेवून मौजे वेळू, सा। कोरेगाव, परगणे वाई, येथे आपल्या हाते जिवे मारिले. ती बायको आपल्या दादल्यापासून गर्भिणी होती. सिदूने निरपराधी मारली ऐसे खरे झाले. त्यास बहिष्कृत केला. प्रायश्चित्त म्हणून यात्रेस जावयाची आज्ञा झाली. अपराधी म्हणून गुन्हेगारी ३०० रु.[१६] करार केली. दत्तू चौधरी व लिंबाजी कोळयाच्या लेकाने गुजराथी ब्राह्मणाच्या बायकोस कमाविसदार दिनकर चाकरकर यांच्या सांगण्यावरून जिवे मारिले. कमाविसदाराने ब्राह्मणाच्या बायकोशी बदअंमल केला. सरकारने १००० रु. गुन्हेगारी, घटना माहीत असताना जाहीर न केल्याबद्दल दत्तू चौधरीकडून, ५०० रु. लिंबाजी कोळी याचा लेक मारेकऱ्यात होता, त्याजकडून गुन्हेगारी म्हणून वसूल केल्याचे दिसते.[१७] इ. स. १७६४ मध्ये सिदोजी ढोळप माळी, कसबे पुणे, याजविरुद्ध येसाजी वाडेकर, वस्ती कसबे मजकूर याच्या बायकोने तक्रार केली की, मजशी याने बदअंमल केला. सरकारात फिर्याद केल्यानंतर चौकशीअंती माळी मजकूर खरा असल्याचे व नाहक तक्रार केल्याचे ठरले. नजर या सदराखाली सरकारने या प्रसंगी ५० रु. करार केले.[१८]

कुणबिणी, बटकिणी पळवून नेल्यास, त्यांना त्रास दिल्यास, सरकार संबंधित व्यक्तींकडून गुन्हेगारी घेत असे. भवानी प्यादा याने नारो बाळाजी याची कुणबीण पळवून नेली. त्याच्याकडून गुन्हेगारी रु. १०० घेण्यात आली.[१९]

वतन, मानपानसंबंधी

वतनहक्क व मानपान इत्यादी वडीलपणाच्या बाबतीत पेशवाईत भांडणे व तंटे होत तेव्हा गोतसभा जमवून निर्णय दिले जात. मानपान, हक्क खरे झाल्यास गुन्हेगाराकडून सरकार हरकी हक्क वसूल करीत असे. इ. स. १७२३ मध्ये हंस व सटवाजी म्हाळा, कसबा पुणे, या दोघात न्हावी व म्हेतरपण या वतनांबद्दल वाद लागल्याने बलुतेदार व पंचायत यांनी नागेशाच्या देवळात बसून वतनाबद्दलचा निवाडा केल्याचे दिसून येते. न्हावी व म्हेतरपण ही दोन्ही वतने निम्मी निम्मी खाण्याबद्दल पंचायतीने सूचना केल्या; तर पेशवे सरकारने गुन्हेगारी म्हणून ५०० होन घेण्याचे संबंधिताना कळविल्याचे वरील पत्रावरून दिसून येते. मौजे कुरेशी येथील नारायण भट व विश्वनाथ भट यांच्या ठिकाणाविषयी कज्जा लागला. त्यात नारायण भट खरे झाले,[२०] सबब विश्वनाथ भटाकडून गुन्हेगारी जमा करण्यात आली. मौजे हेदवी तर्फ गुहागार येथील शंकर भट उपाध्ये व शंकर दीक्षित खरे उपाध्ये याचे वृत्तीचे विषयी कज्जा लागला होता. त्यात शंकर भट खरे निम्मे वतनाचे खरे झाले. या गुन्हेगारीबद्दल जीवन माफक रुपये ९० करार केले.[२१] इ. स. १७६४-६५ मध्ये तिमाजी रोकडा, शिंपी वस्ती, रविवार, शहर पुणे याचा व नरसो मल्हार दिनकर याचा राजेश्री मधोजी राजे भोसले याजकडील मामलतसंबंधी कर्जाचा कज्जा होता. त्यात तिमाजी खोटा झाला. नरसो मल्हार यास १००० रु. गुन्हेगारी संदर्भात सूचना केल्या.[२२]

लग्नासंदर्भात उद्भवलेली प्रकरणे

लग्नासंदर्भात गुन्ह्याची प्रकरणे उद्भवत असत. पाट लावणे, पहिला नवरा जिवंत असता दुसरा करणे इत्यादी प्रकार घडत. पेशवे सरकार अशा वेळी संबंधिताकडून गुन्हेगारी घेत असे. इ. स. १७३४ मध्ये खंडोजी कुंभार याने आपली लेक एकदा एकास दिली असता पुनः दुसऱ्यास देत होता. त्याच्याकडून गुन्हेगारी रु. २५ जमा करण्यात आली.[२३] ५ जुलै १७४८ रोजी का। केंदूर ता। पाबळ येथील देवजी सोनार याने पदुमाजी सोनार याची लेक तिला दादला असता तिच्याशी पाट लावून तिला आपली बायको केली. सबब त्याच्याकडून रुपये २५ करार करून गुन्हेगारी घेतली.[२४] इ. स. १७३५ मध्ये मौजे सुखलोगी येथील दत्तो सोनार याने आपली लेक गोविंदा सोनार यास देऊ केली होती. त्यानंतर गोविंदा वयाने मोठा, त्यास मी लेक देऊ केली नाही म्हणून लटकेच दत्तो सोनार हुजूर फिर्याद झाला. त्यास विचारणा करता, गोविंदास लेक देऊ केली होती हे खरे झाले व ठरल्याप्रमाणे करार करून लग्न करण्यास आज्ञा देण्यात आली. मध्येच लटके बोलला होता याजकरता गुन्हेगारी २५ रु. करार केला.[२५] म्हेतरे व चौगुले चांभार यांच्यात एकदा लग्नावरून

लढा पडलेला होता. हा लढा उलगडल्याखेरीज कोणास मुहूर्त लावू न देण्याविषयीचा उल्लेख तत्कालीन कागदपत्रात दिसतो.[२६] पाटाचा दादला व इतर अनेक लग्न संदर्भातील तंटे इत्यादीसंबंधी माहिती व रु. ५ घेण्यात आलेल्या गुन्हेगारीसंबंधी माहिती इ. स. १७९६ च्या एका पत्रात उपलब्ध आहे.[२७]

इतर किरकोळ गुन्ह्यांबाबत सरकार गुन्हेगारी वसूल करी. सुबाना मांग याने आईजवळ गैरसनदी कटकट केल्याबद्दल ८ आणे, तर चांभार शिपायाजवळ 'बेजबाब' बोलला म्हणून रु. १[२८] गुन्हेगारी वसूल केली होती. तेली व वाण्यात व्यापार संदर्भात काही अटी ठरल्याचे उदा. भुसार सर्वांनी विकावे, तेल्यांनी विकू नये, व त्याचे पालन न झाल्यास गुन्हेगारी द्यावी असे ठरल्याचे एका तत्कालीन पत्रावरून दिसून येते.[२९]

सारांश

वरील सर्व गोष्टींचा विचार करता आपणास असे दिसून यईल की अल्पसंख्यांक जातींतील व्यक्तींकडून सरकारी कामात हयगय झाल्यास, चोऱ्या, भांडणे, तंटे केल्यास बदअंमल, व्यभिचार केल्यास, लग्ने शिरस्त्यानुसार न घडल्यास, सरकार गुन्हेगारी वसूल करीत असे. कुणबी वा ब्राह्मण लोकांकडून व्यभिचार घडल्यास पायश्चित्त म्हणून तीर्थयात्रा करून गुन्हेगारी घेतल्याचे तर फंदफितुरी केल्यास हातपाय तोडण्यासारख्या जबर शिक्षा केल्याचे दिसून येते.

निष्कर्ष

वरील गोष्टींचा आढावा घेता आपणास असे दिसते की पेशवेकाळात सर्व लोकाना समान न्याय मिळत नव्हता. न्यायदेवता दुजाभाव करणारी होती. अल्पसंख्यांक लोकांची पिळवणूक केली जात होती. त्यांना समाजात स्थान नव्हते. उच्चवर्णीय समाज व राज्यकर्ते न्यायाच्या बाबतीतही अन्याय करत होते. शिक्षा, गुन्हेगारी ह्या एकच प्रकारच्या गुन्ह्याकरता वेगवेगळया लोकांकडून कमी अधिक प्रमाणात घेतल्या जात होत्या. पेशवेकालीन शासनव्यवस्थाही सर्वांसाठी समान कायदा नसलेली शासनव्यवस्था होती.

■ ■

संदर्भ

१. ओतुरकर रा. वि. (संपा.), पेशवेकालीन सामाजिक व आर्थिक पत्रव्यवहार, पृ. ५५.
२. चापेकर ना. गो. (संपा.), पेशवाईच्या सावलीत, पृ. २९३.

३. ओतुरकर रा. वि. (संपा.), पेशवेकालीन सामाजिक व आर्थिक पत्र-व्यवहार, पृ. ५७.
४. गुणे व्ही. टी., " ज्युडिशियल सिस्टीम ऑफ दि मराठाज् ", पृ. ३६०.
५. कित्ता, पृ. ३६१.
६. भारत इतिहास संशोधक मंडळ, " त्रैमासिक ", वर्ष ३०–३१, पृ. ८२.
७. गुणे व्ही. टी., ज्युडीशियल सिस्टीम ऑफ दि मराठाज्, पृ. ३३२.
८. पेशवा डायरीज, ६, पृ. १४५–४६.
९. गुणे व्ही. टी., ज्युडीशियल सिस्टीम ऑफ दि मराठाज्, पृ. ३४७.
१०. पेशवा डायरीज, ७, पृ. ३३७.
११. कित्ता, पृ. २२४.
१२. कित्ता, पृ. २१७.
१३. पेशवाईच्या सावलीत, पृ. २९४.
१४. भारत इतिहास संशोधन मंडळ, " त्रैमासिक ", वर्ष ६, पृ. १३३.
१५. गुणे व्ही. टी., ज्युडीशियल सिस्टीम ऑफ दि मराठाज्, पृ. ३४०.
१६. कित्ता, पृ. ३५१.
१७. पेशवा डायरीज, ७, पृ. ५९०–९१.
१८. कित्ता, पृ. २१४.
१९. कित्ता, पृ. ११३.
२०. पेशवा डायरीज ६, पृ. १४५–४६.
२१. गुणे व्ही. टी., ज्युडीशियल सिस्टीम ऑफ दि मराठाज्, पृ.३०५.
२२. पेशवा डायरीज, ७, पृ. १७१–७२.
२३. गुणे व्ही. टी., ज्युडिशिल सिस्टीम ऑफ दि मराठाज्, पृ. ३६२.
२४. कित्ता, पृ.
२५. पेशवा डायरीज, ७, पृ. २१५.
२६. भा. इ. संशोधक मंडळ, " त्रैमासिक ", ३०–३१, पृ. १०५.
२७. कित्ता, पृ. २०४.
२८. कित्ता, वर्ष ६ वे, पृ. १३३–३४.
२९. कित्ता, वर्ष २४, पृ. २४७–४८.

■ ■ ■

भाग ३ : अर्वाचीन काळ

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६२ : १–४, १९८३–८४

महाराष्ट्र शासनाचे ऐतिहासिक साधनग्रंथ (इ. १९५८–८३)

वि. गो. खोबरेकर
मुंबई.

महाराष्ट्रेतिहासाची मुख्य साधने म्हणजे ऐतिहासिक कागदपत्रे होत. ही कागदपत्रे शासकीय दफ्तरखान्यात तसेच नामवंत संशोधन-संस्था व मातबर व्यक्ती यांजकडे सापडतात. मराठ्यांच्या इतिहासाची साधने महाराष्ट्राबाहेर बडोदे, इंदूर, ग्वाल्हेर, बिकानेर, दिल्ली, लंडन वगैरे ठिकाणांच्या दफ्तरखान्यांत उपलब्ध आहेत. महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर ज्या ज्या खाजगी व शासकीय संस्थांकडे कागदपत्रे आहेत, त्यांनी गेल्या पंचवीस वर्षांत बरीच ऐतिहासिक कागदपत्रे प्रसिद्ध केलेली आहेत. तथापि महाराष्ट्रेतिहास परिषदेच्या चालकांच्या विनंतीवरून, प्रस्तुत लेखात मात्र महाराष्ट्र शासनाने गेल्या पंचवीस वर्षांत प्रकाशित केलेल्या महाराष्ट्रेतिहासा-विषयीच्या साधनग्रंथांचाच आढावा घेतलेला आहे.

इ. १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर मुंबई राज्यातील सर्व दफ्तरखान्यांची कार्यालये एका संचालनालयाच्या आधिपत्याखाली आणण्यात आली आणि त्यास ' पुराभिलेख विभाग संचालनालय ' असे नाव देण्यात आले. या विभागाचे संचालक म्हणून डॉ. पु. म. जोशी यांची नियुक्ती झाली. डॉ. जोशी यांनी पुण्याच्या पुराभिलेख विभागातील (जुन्या पेशवे-दफ्तरातील) रेसिडेन्सी रेकॉर्ड प्रकाशित करण्याच्या कामास जोराची चालना दिली. तत्पूर्वी या रेकॉर्डमधील निवडक कागदपत्रांचे नऊ खंड प्रसिद्ध झालेले होते. त्यांचे संपादन सुप्रसिद्ध इतिहासकार सर जदुनाथ सरकार व रियासतकार सरदेसाई यांनी केले होते. यानंतरचा १० वा खंड ' Treaty of Bassein and Anglo-Maratha War of 1803-1804 in the Deccan ' या शीर्षकाखाली प्रसिद्ध झाला. दुसऱ्या बाजीराव पेशव्याने इंग्रजांशी वसईचा तह केला तेथपासून तो इंग्रजांच्या पूर्णपणे अंकित होईपर्यंतचा भाग या खंडातील इंग्रजी पत्रव्यवहारात आलेला आहे. पेशव्याने आणि त्याच्या मराठे सरदारांनी आपला अधिकार मानावा या हेतूने इंग्रजांनी प्रत्येक सरदाराला वेगवेगळे गाठून लढाई दिली, त्याचा वृत्तांत या खंडात वाचावयास मिळतो. पुण्याचा रेसिडेंट क्लोज याने दुसऱ्या बाजीरावाबरोबर वसईचा तह घडवून आणला

येथपासून ते अमृतरावास पेशवाईपदावरून दूर जाण्यास सांगून त्याने त्यावर दुसऱ्या बाजीरावाची स्थापना केली आणि इंग्रज फौजेकडून पुण्याच्या आसपासच्या गुंडगिरीचा बंदोबस्त करविला, येथपर्यंतचा पत्रव्यवहार या खंडात समाविष्ट केला आहे. त्याचे संपादन डॉ. रघुवीरसिंग यांनी केलेले आहे.

पुणे रेसिडेन्सी पत्रव्यवहाराचा १२ वा खंड रियासतकार सरदेसाई यांनी संपादित केलेला असून, तो मुंबई सरकारने इ. १९५० मध्ये प्रसिद्ध केला. माउंट-स्टुअर्ट एल्फिन्स्टन हा पुण्याचा रेसिडेंट म्हणून इ. १८११ त रुजू झाला. त्याने मराठ्यांमध्यें फंदफितुरी घडवून आणून त्यांचे राज्य खिळखिळे करण्याचा उद्योग आरंभिला. तत्कालीन महाराष्ट्रातील राजकारणाचा अचूक वेध घेऊन, पेशव्याची सत्ता खिळखिळी करण्यासाठी त्याने दक्षिणेंतील जहागिरदारांना पेशव्यापासून फोडले आणि पंढरपूर येथे त्यांच्याशी संरक्षणाचा तह घडवून आणला. त्याने कोल्हापूर-करांना इ. १८१२ त मांडलिक बनविले. मग मालवण ताब्यात घेऊन तेथे ब्रिटिश रेसिडेन्सी स्थापिली. अशा रीतीने पुण्यात राहून त्याने इ. १८१५ पर्यंत धूर्तपण जो उद्योग केला त्यासंबंधीचा कलकत्त्याच्या गव्हर्नर जनरलशी केलेला पत्रव्यवहार या १२ व्या खंडात आलेला आहे.

याच्या पुढील, इ. १८१६ ते १८१८ या काळात गव्हर्नर जनरलशी झालेला पत्रव्यवहार पूना रेसिडेन्सी पत्रव्यवहाराच्या १३ व्या खंडात आहे. हाही खंड रियासतकार सरदेसाई यांनी संपादिलेला असून तो मुंबई सरकारने इ. १९५३ मध्ये प्रसिद्ध केला. दुसऱ्या बाजीरावाने गंगाधरशास्त्र्यांचा खून करविला, त्याचा बदला म्हणून इंग्रजांनी त्याच्याशी इ. १८१७ मध्ये लढाई केली. त्यानंतर इ. १८१८ मध्ये बाजीरावाबरोबर त्यांची शेवटची लढाई झाली. इंग्रजांनी कपटनीती वापरून, शस्त्रांच्या साहाय्याने मराठी राज्य गिळंकृत करण्याची आखलेली योजना एल्फिन्स्टनने कशी शेवटास नेली ते या १३ व्या खंडातील पत्रव्यवहारावरून समजून येते.

मुंबई शासनाने फारसी कागदपत्रांच्या इंग्रजी भाषांतराचे दोन खंड इ. १९५३-५४ मध्ये प्रसिद्ध केले. १८ व्या शतकात मराठ्यांची सत्ता जवळजवळ सर्व हिंदुस्थानभर होती. दिल्लीचा बादशाह इ. १७८४ च्या नोव्हेंबरात मराठ्यांच्या अंकित झाला. त्याच्या वजिराशी पुण्याहून पत्रव्यवहार चालू होता. हा फारसी पत्रव्यवहार पुण्याच्या पारसनिसांच्या संग्रही होता. त्यांचे इंग्रजीत भाषांतर करून सर जदुनाथ सरकार यांनी 'Delhi Affairs' या शीर्षकाखाली तो संपादित केला. दुसऱ्या भागात, महादजी शिंदे दिल्लीच्या बादशहाचा अमीर-उल्-उमरा झाल्यापासूनची हकीगत आहे. या पत्रव्यवहारातून, शाहआलम बादशहाचे सरदार आणि त्यांची सत्तेसाठी एकमेकांविरुद्ध चाललेली कारस्थाने, इंग्रजांचे त्यांना होत असलेले साहाय्य, तसेच पैशाअभावी महादजीची झालेली दयनीय स्थिती, इत्यादी

विषयी माहिती मिळते.

इ. १९५४ मध्ये डॉ. दिघे यांनी संपादित केलेला 'Descriptive Catalogue of Secret and Political Department Series' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. त्यात, मुंबई दफ्तरखान्यातील इ. १७५५ ते १८२० दरम्यानच्या ४९८ पोलिटिकल अँड सीक्रेट डिपार्टमेंट डायऱ्यांची सूची, तसेच त्या डायऱ्यांतील मजकुराचा सारांश दिलेला आहे. याच वर्षी बडोदे रेकॉर्ड ऑफिसमधील कागदपत्रां-वरून श्री. व्ही. जी. जोशी यांनी एक ग्रंथ प्रसिद्ध केला. त्यात तिसऱ्या सयाजी-रावांचा इ. १८२० ते १८३५ पर्यंतचा मराठी पत्रव्यवहार आहे.

पेशवे दफ्तराचे ४५ खंड रियासतकार सरदेसाई यांनी इ. १९३६ पर्यंत संपादित केल्यावर, त्यात प्रसिद्ध न झालेलीं व संशोधकांस उपयुक्त अशी पेशवे दफ्तरातील अन्य कागदपत्रे निवडून ती प्रकाशित करण्याचे काम पंचवीस वर्षांनंतर मुंबई सरकारने हाती घेतले, आणि 'पेशवे दफ्तरातील वेचे' नवीन भाग १ व ३ प्रसिद्ध केले. डॉ. पु, म. जोशी हे या दोन्ही भागांचे संपादक आहेत. पहिल्या खंडात, मराठी सत्तेची अभिवृद्धी कशी होत गेली त्यासंबंधीचा मराठी पत्रव्यवहार असून, तिसऱ्या खंडात, पानिपतानंतर दुर्बळ झालेल्या उत्तरेतील मराठ्यांच्या सत्तेचे पुनरुज्जीवन कसे झाले, तसेच त्यांनी दक्षिण, माळवा, राजपुताना आणि इतरत्र आपला जम पुन्हा कसा बसविला, हे त्यातील मराठी कागदपत्रांवरून दिसून येते.

रियासतकार सरदेसाई यानी कै. वि. सी. चितळे यांच्या साहाय्याने ऐतिहा-सिक घराण्यांच्या वंशावळी जमविल्या. त्या ग्रंथरूपाने 'ऐतिहासिक घराण्यांच्या वंशावळी' या शीर्षकाखाली मुंबईच्या पुराभिलेख विभागाने इ. १९५७ मध्ये प्रसिद्ध केल्या.

इ. १९६१ पासून मुंबई पुराभिलेख विभागाने 'Archives Bulletin' प्रसिद्ध करण्याची योजना हाती घेतली. तीत प्रथम पुराभिलेख विभागाच्या संग्रहात जमविलेला, इ. १८५७ च्या युद्धात भाग घेतलेल्या नानासाहेब पेशव्यासंबंधीचा इ. १८५७ ते १९१२ पर्यंतचा पत्रव्यवहार प्रसिद्ध करण्याचे ठरले. इ. १८५७-५८ च्या धुमश्चक्रीत दुसऱ्या बाजीरावाचा दत्तकपुत्र धोंडोपंत नाना पाठलाग होत असता, कुटुंब परिवारासह नेपाळात शिरला. नेपाळच्या नरेशाने नानास आश्रय नाकारून त्याच्या बायकामुलांस नेपाळात राहू दिले. नानासाहेब तराईत निवर्तले. ही बातमी नेपाळचा राणा जंग बहादुर याने इंग्रजांस कळविली. इंग्रजांचा तिच्यावर कधीच विश्वास बसला नाही. नानासाहेब कोठेतरी बेपत्ता झाला एवढेच ते समजत होते. तो इराण-काबूलकडे गेला असावा अशी अफवा उठली. तो जिवंत असून बैरा-ग्याच्या किंवा शेतकऱ्याच्या वेषात फिरत असावा असा संशय इंग्रज अधिकाऱ्यांस नेहमीच येई. म्हणून त्यांनी नानास पकडून देणाऱ्यास लाख रुपयांपर्यंत बक्षीस लावले. नानाच्या देहयष्टीचा वर्णनपट सर्व जिल्हाधिकाऱ्यांकडे रवाना केला. सदर

वर्णनाचा माणूस दिसला तर त्यास पकडून, " तूच नानासाहेब हे कबूल कर " असे सांगून ते तो कबूल करीपर्यंत त्याचा छळ केला जाई. असे प्रकार इ. १९१२ पर्यंत झाले. अनेक खोट्या नानासाहेबांना इंग्रज सरकारचा छळ सोसावा लागला. ही सर्व हकीगत देणारी कागदपत्रे Archives Bulletin क्र. १, ९ व १० मध्ये छापली आहेत. सर जदुनाथ सरकार यानी केलेले ' इब्रतनाम्या 'चे इंग्रजी भाषांतर बुलेटिन क्र. १ व २ मध्ये छापले आहे. नानासाहेब पेशव्याचा पुतण्या रावसाहेब हा नानासाहेबाप्रमाणे नाहीसा झाला. त्याच्यासारख्या दिसणाऱ्या निरपराधी लोकांना पकडून इंग्रज अधिकाऱ्यांनी त्यांचा छळ केला. त्यासंबंधीची कागदपत्रे बुलेटिन क्र. ३ मध्ये छापली आहेत. शिवाय, कल्याण रेसिडेन्सी, कल्याण खजिना आणि हिंमतबहाद्दर चव्हाण याची कैफियत, यासंबंधीची पत्रे याच बुलेटिनमध्ये प्रसिद्ध केली आहेत.

बुलेटिन क्र. ४ च्या पहिल्या प्रकरणात मुधोळकर गोविंदराव घोरपडे यांच्या तोतयासंबंधीची कागदपत्रे प्रकाशित करण्यात आली आहेत. दुसऱ्या प्रकरणात नानासाहेब पेशवे (इ. १८५७) यांच्या संशयित अनुयायांबाबतची माहिती सांगणारी कागदपत्रे प्रसिद्ध करण्यात आली आहेत. तिसऱ्या प्रकरणात पेशवे रघुनाथरावदादासंबंधी महादजी राम करंदीकर नावाच्या त्याच्या आश्रिताने लिहून ठेवलेली हकीगत दिलेली आहे. बुलेटिन क्र. ५ मध्ये, मुन्नालाल याने लिहिलेल्या दुसऱ्या शाहअलम बादशहाच्या चरित्राचे सर जदुनाथ सरकार यांनी केलेले इंग्रजी भाषांतर छापले आहे. त्याच्या जोडीस, इ. १८५७ मध्ये तात्या टोपे याचा पाठलाग चालू असता तो गुजराथेत शिरला, तेव्हा त्यास कोणी कोणी कोठे कोठे पाहिले त्यासंबंधी बडोदे व राजपिपला संस्थानांनी इंग्रज सरकारला जी माहिती पुरविली, ती त्यात दिली आहे.

ईस्ट इंडिया कंपनीच्या सनदी नोकरांनी लष्करी अधिकाऱ्यांविरुद्ध इंग्रज सरकारकडे इ. १८२० मध्ये एक अर्ज केला. लष्करी अधिकाऱ्यांस ज्या मुलकी जागा देण्यात येतात त्यामुळे सनदी नोकरांवर अन्याय होतो, असे त्या अर्जात दाखवून दिले होते. ही सर्व हकीगत सांगणारी इंग्रजी कागदपत्रे बुलेटिन क्र. ६ मध्ये प्रसिद्ध केली आहेत. त्याबरोबरच, सांगली संस्थानाने ब्रिटिशांचे मांडलिकत्व पत्करताना झालेला पत्रव्यवहारही छापला आहे. कोकण रेल्वेची सुरुवात करण्यासाठी इ. १८६५ मध्ये ब्रिटिश अधिकाऱ्यांमध्ये पत्रव्यवहार सुरू झाला, तो इ. १८८५ पर्यंत चालला. हा पत्रव्यवहार बुलेटिन क्र. ७ मध्ये प्रकाशित करण्यात आला आहे. तसेच ' दक्षिणा प्राईझ कमिटी 'ची स्थापना झाल्यावर तिने ज्या पारितोषिक-पात्र ग्रंथांची परीक्षणे त्या त्या शाखांतील तज्ज्ञांकडून इंग्रजीत करविली त्यांचा व हरिपंत फडके यांच्या स्वाऱ्यांच्या मुक्कामांचा समावेश या बुलेटिनच्या अंकात केलेला आहे. बुलेटिन क्र. ८ मध्ये बायजाबाई शिंदे, बयाबाई आपटे व

तात्या टोपे याचा सावत्रभाऊ यांच्या हकीगती प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत.

छत्रपती शिवाजीमहाराजांच्या राज्याभिषेकाचा त्रिशताब्दि महोत्सव इ. १९७४ मध्ये महाराष्ट्रात ठिकठिकाणी साजरा झाला. त्या निमित्ताने मुंबई पुराभिलेख विभागातर्फे श्री. वि. गो. खोबरेकर यानी खालील ग्रंथ प्रकाशित केले :

१. शिवकालीन कागदपत्रे (Records of Shivaji Period) – हा ग्रंथ श्री. खोबरेकर यांनी संपादन केला असून, त्यात शिवाजीमहाराजांच्या काळातील राजकीय, आर्थिक, सामाजिक व धार्मिक इतिहासावर नवीन प्रकाश टाकणारी कागदपत्रे प्रसिद्ध केली आहेत. कोकणातील चौलच्या आसपासच्या गावातील देसाई वतने, जेजुरी येथील मशीद व पीर यांना शहाजी व शिवाजी यांनी दिलेली इनामे, पुणे–इंदापूर–सुपे परगण्यांचा १७ व्या शतकातील आर्थिक इतिहास, म्हसवडचे राजे माने आणि पाटणचे सरदार पाटणकर यांच्या घराण्यांतील शिवकालीन पुरुषोत्तमांनी पराक्रम करून संपादन केलेले सरंजाम, तसेच छत्रपतींच्या भोसले घराण्यातील पुरुषांनी आपल्या घराण्याचे तीर्थोपाध्याय त्रिंबकचे ढेरगे यांना दिलेली वतने, इत्यादि नवीन माहिती या ग्रंथाद्वारे अभ्यासकांस मिळते.

२. छत्रपतींची स्मारके–ब्रिटिश सरकारचे धोरण (Shivaji Memorials –British Attitude) – रायगड येथील शिवाजीमहाराजांची समाधी, शिवनेरी येथील शिवजन्मस्थान, लोकमान्य टिळकानी सुरू केलेले शिवाजी–उत्सव आणि शिवसमाधीच्या जीर्णोद्धाराविषयीच्या चळवळी इत्यादीसंबंधाने ब्रिटिश सरकारचे काय धोरण होते ते दर्शविणारा तत्कालीन इंग्रजी पत्रव्यवहार या ग्रंथात प्रसिद्ध झाला आहे. त्याचा काळ इ. १८८५ ते १९२५ असा आहे.

कोकणातील चौलच्या अधिकारी आणि इतर शिवकालीन घराण्यांकडून इतिहास संशोधक कै. शां. वि. आवळसकर यानी इ. १६८८ ते १८२१ या काळातील कागदपत्रे जमविली. ही कागदपत्रे ग्रंथरूपाने मुंबई पुराभिलेख विभागातर्फे प्रकाशित करण्यात आली. ग्रंथाचे शीर्षक आहे –' ऐतिहासिक साधने'. याखेरीज सर जदुनाथ सरकार यांनी केलेले भीमसेन सक्सेना याच्या ' तारीख–इ–दिलकशा ' या फारसी ग्रंथाचे इंग्रजी भाषांतर त्यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने पुराभिलेख विभागाने प्रकाशित केले.

कोल्हापूर दप्तरखान्यातील कोकणविषयक कागदपत्रे एकत्र प्रसिद्ध करण्याचा पहिला प्रयत्न ' कोकणच्या इतिहासाची साधने ' (संपा. वि. गो. खोबरेकर व शिंदे) या ग्रंथाच्या रूपाने पुराभिलेख विभागातर्फे केला गेला. अब्दुल निहलवीच्या 'इब्राहीमनाम्या 'चे भाषांतर श्री. देवीसिंग चौहान यांनी केले, ते महाराष्ट्र शासनाने ग्रंथरूपाने प्रसिद्ध केले.

वर्णनात्मक सूची – पुणे व कोल्हापूर येथील दप्तरखान्यांत जी मोडी लिपीतील मराठी ऐतिहासिक कागदपत्रे आहेत त्यांचा अभ्यास करणे सुलभ व्हावे म्हणून

त्या कागदपत्रांतील आशयाच्या वर्णनात्मक सूच्या तयार करण्याची योजना श्री. खोबरेकर यांनी कार्यान्वित केली. पुण्याच्या पुराभिलेखागारात (जुन्या पेशवे दफ्तरात) विभाग क्र. १ चे शाहू दफ्तर आहे. त्यातील सहा हजार कागदपत्रांच्या सूचीचे दोन खंड मुंबई पुराभिलेख विभागाने प्रसिद्ध केले. तसेच चिटणिशी दफ्तर व संशोधनासाठी निवडलेले कागद या दोन्ही विभागांचे कॅटलॉग प्रसिद्ध केले आहेत. कोल्हापूर दफ्तरखान्यातील निवडी दफ्तर विभागात सुमारे पंचवीस हजार कागदपत्रे आहेत, त्यांची वर्णनात्मक सूची इ. १९७१ त प्रकाशित झाली. त्यानंतर त्याच दफ्तरखान्यातील पारसनिशी व चिटणिशी दफ्तरांची सूची पुराभिलेख विभागाने प्रसिद्ध केली. राजर्षी शाहू छत्रपतींच्या (इ. १८८४-१९२२) पत्रव्यवहारातील सुमारे ६०,००० कागदपत्रे कोल्हापूर, मुंबई, दिल्ली व लंडन या ठिकाणी विखुरलेली आहेत. या सर्व ठिकाणच्या कागदपत्रांची सूची इंग्रजीत पुराभिलेख विभागाने चार विभागांत तयार केलेली असून, त्यांपैकी दोन खंड आतापर्यंत प्रकाशित झालेले आहेत. मुंबईच्या दफ्तरखान्यात नकाशांचा जो संग्रह आहे त्यातील काही नकाशांचा कॅटलॉग छापला आहे, तसेच सर जदुनाथ सरकार व डॉ. रघुवीरसिंग यांचा, श्री. एस्. आर. टिकेकर यानी संपादित केलेला पत्रव्यवहार प्रसिद्ध केला आहे. याशिवाय ' उष्ण पाण्याचे झरे ', ' काही मोडी कागदपत्रांचे नमुने ' अशी दोन तीन पुस्तकें प्रकाशित केली. ' पेशवे-दफ्तरातील हिंदी कागदपत्रे ' याही ग्रंथाची भर पुराभिलेख विभागाने आपल्या नावावर टाकली. या ग्रंथात प्रकाशित झालेली हिंदी कागदपत्रे मराठ्यांची उत्तर हिंदुस्थानातील महसूल व वसूल पद्धती कशी होती त्यावर प्रकाश टाकतात.

मुंबई पुराभिलेख विभागाने आपल्या दफ्तरखान्यातील ऐतिहासिक संग्रहांची तपशीलवार माहिती देणारे इंग्रजी भाषेतील हँडबुक इ. १९७८ मध्ये प्रसिद्ध केले. याच विभागाने इ. १९६८ मध्ये मराठे छत्रपती व सरदार यांच्या हस्ताक्षरातील पत्रांचा एक संग्रह पुस्तकरूपाने प्रकाशित केला होता. त्या पुस्तकाचे शीर्षक आहे ' Fascimile Handwriting of the Notable Personalities of Maratha History. '

पुण्याच्या पुराभिलेखागारात डेक्कन कमिशनर्स रेकॉर्ड म्हणून जो इंग्रजी कागदपत्रांचा विभाग आहे त्यातील कागद अभ्यासून, निवडून ते प्रसिद्ध करण्याची कामगिरी वाडिया कॉलेजचे भूतपूर्व प्रिन्सिपॉल आर. डी. चौकसी यांनी केली. त्यांनी संपादित केलेले ग्रंथ असे : १. Economic History of the Bombay Deccan and Karnatak (1818-1968). २. The Period of Transition (1818-1826) - इंग्रजी अमदानीस सुरुवात झाल्यावर तिचा जम बसण्यास आठ दहा वर्षे लागली. त्या काळातील घडामोडी या ग्रंथातील कागदपत्रे सांगतात. ३. The Aftermath (1818-1826) - या ग्रंथात क्र. २ च्या

ग्रंथातील हकीगतच वेगळ्या स्वरूपात आलेली आहे. ४. The Last Phase (1815–1818)-दुसऱ्या बाजीरावाचा ब्रिटिश सत्तेशी जो शेवटचा झगडा झाला त्याचे वर्णन या ग्रंथात आलेले आहे. ५. A History of British Diplomacy at the Court of the Peshwas (1786–1818) – हा ग्रंथ उत्तर पेशवाईचे अंतरंग आणि तत्कालीन सामाजिक व आर्थिक स्थिति यांचे विदारक चित्र रेखाटतो. ६. The Malwan Residency (1812–1819) – मालवण बंदर कोल्हापूरकरांकडून इ. १८१२ त घेतल्यावर इंग्रजांनी तेथे आपला रेसिडेंट नेमला; त्याने त्या भागात राहून त्याची पाहणी केली व सावंतवाडीची राणी दुर्गाबाई हिला नमविले; हा सर्व इतिहास या ग्रंथात आला आहे. ७. The Ratnagiri Collectorate (1818–1829) – हा ग्रंथ, ब्रिटिश अधिकाऱ्यांनी रत्नागिरी जिल्ह्यातील जमिनीची मोजणी व जमाबंदी कशी केली यासंबंधी आहे. त्या भागातील आर्थिक जीवन कसे होते यासंबंधीची माहिती त्यात आहे. ८. The Economic Life in the Bombay Deccan (1813–1839) ९. The Economic Life in the Bombay Konkan. (1818–1830) १०. Economic Life in the Bombay Karnatak (1818–1839) ११. Economic Life in Bombay Gujarat (1818–1839), आणि १२. Early British Administration (1818–1826). या सर्व ग्रंथांखेरीज, डॉ. चोकसी यानी, पुणे दफ्तरातील सातारा रेसिडेन्सी रेकॉर्ड या विभागातील कागदपत्रांतील काही निवडक कागद, तसेच लंडनच्या इंडिया ऑफिस लायब्ररीतील एल्फिन्स्टनसंबंधीचे निवडक कागद एकत्र करून १३. Raja Pratapsinh of Satara आणि १४. Raja Shahaji of Satara हे ग्रंथ संपादित केले. त्यातील राजा प्रतापसिंहासंबंधी ग्रंथ पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळाने प्रसिद्ध केला आहे.

मुंबई प्रांतातील स्वातंत्र्य आंदोलनाच्या इतिहासाची साधने प्रकाशित करण्याचे काम, ' भारतीय स्वातंत्र्य आंदोलन इतिहास समिती ' नेमून सरकारने नोव्हेंबर १९५३ मध्ये सुरू केले. या समितीने स्वातंत्र्य आंदोलन इतिहासाच्या साधनांचा पहिला खंड (इ. १८१८–१८८५) व दुसरा खंड (इ. १८८५ ते १९२०) प्रसिद्ध केल्यावर तिसऱ्या खंडात महात्मा गांधींविषयीची कागदपत्रे खालीलप्रमाणे प्रकाशित केली :

१. Mahatma Gandhi – Source Material for a History of the Freedom Movement in India, Collected Records, खंड ३, भाग ४ (१९३१–३२)

२. कित्ता, खंड ३, भाग ५ (१९३२)

३. कित्ता, खंड ३, भाग ६ (१९३२–३३)

४. किता, खंड ३, भाग ७ (१९३४-३५)

याच स्वातंत्र्य आंदोलन समितीतर्फे इ. १९७७-७८ त या वर्षात खालील ग्रंथ प्रसिद्ध झाले :

१. Congress Activities (1942-46), खंड ४ था.

२. History of the Non-Co-operation Movement in Sind (1919-24), खंड ५ वा.

३. Goa Freedom Struggle – Maharashtra (1946-61)

४. History of Non-Co-operation Movement, Bombay City (1920-25), खंड ६ वा.

५. Correspondence and Diaries of Shri G. S. Khaparde.

समितीने भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात ज्या महाभागांनी भाग घेतला त्यांची जिल्हानिहाय नावनिशीवार माहिती गोळा करून पुढील तीन स्वातंत्र्य सैनिक चरित्र-कोश प्रसिद्ध केले : १. विदर्भ, २. पश्चिम महाराष्ट्र, (धुळे, जळगाव व नाशिक), आणि ३. मराठवाडा विभाग. याखेरीज दर्शनिका विभागाने (गॅझेटियर्स खाते) सर्व जिल्ह्यांच्या सुधारित गॅझेटियर्सबरोबर महाराष्ट्राच्या इतिहासाचे चार खंड प्रसिद्ध केले आहेत.

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६२ : १–४, १९८३–८४

Renaissance in Maharashtra

J. V. Naik
University of Bombay, Bombay

Understanding Modern Maharashtra :

The transfer of power from the Peshwa to the British in 1818 and the forces that came to be unleashed with it, is rightly taken to be the starting point of modern era in Maharashtra. However, in a more general historical sense, the history of modern Maharashtra begins with the establishment of *Swaraj* when the region emerged as an independent political entity with a distinct identity of its own. The fact of *Swaraj* created an ethos which lasted beyond the fall of the Maratha Power, and it consciously or unconsciously exercised considerable influence in the shaping of nineteenth century " renaissance " thought in Maharashtra.

Many eminent scholars have more or less consciously used the expression 'renaissance' in their writings to describe the new spirit and the new national consciousness that came into being during the course of the nineteenth century, under the Western impact. Among them are distinguished historians like Sir Jadunath Sarkar, R. C. Majumdar, Amit Sen (Sushoban Sarkar), K. K. Datta and serious foreign scholars of modern Indian history like Stephen Hay and David Kopf, not to mention such great minds as Keshub Chandra Sen, C. F. Andrews, H. Zacharias and Suniti Kumar Chatterji. We cannot, however, find much fault with Professor Mukerjee's contention that Indian renaissance, Rammohan Roy notwithstanding, was essentially an elitist affair, and that it "suffer-

ed from a kind of original sin, detachment from the Grass-roots of Indian life. "

Indian Renaissance

The emergence of renaissance thought in Maharashtra since 1818, with its political, economic and social implications, is to be viewed in the wider context of the nineteenth century Indian renaissance. All the nineteenth century movements arising in different parts of the country and covering almost every aspect of national life were but diverse manifestations of a single phenomenon comprehensively known as " Indian renaissance. "

Despite all its inherent defects which are characteristic of any feudal society, pre-British India was not so stagnant as it is made out to be. Sufficient researches have not yet been made to fully illuminate the social and inteclletual scenario of 18th century India. Nevertheless, the researches already made by K. K. Datta, *Survey of India's Social Life and Economic Condition* (Calcutta, 1961), V. P. S. Raghuvansi, *Indian Society in the Eighteenth Century* (New Delhi, 1969), K. N. Panikkar, " Cultural Trends in Pre-colonial India : An Overview ", *Studies in History*, Vol. II, No. 2, 1980, and also his *Presidential Address*, *Modern India Section*, *Indian History Congress,* 36th Session, Aligarh, 1975, and reference therein, provide us with enough evidence of the social changes that were occurring within the Indian society. These changes were taking place " within the institution of caste-fragmentation, occupational mobility and sanskritization being some of them. " And as for intellectual activity, George Bearce in his article, " Intellectual and Cultural Characteristics of India in a Changing Era ", *Journal of Asian Studies*, Nov. 1965, has pointed out that " from 1740 to 1800 the culture of India was still the lively expression of a society that appears to be master of its destiny....The society

at its various levels, aristocratic and popular, produced in both variety and quality an impressive amount of art, music, literature and learning ". Many heterodox sects like Appapant and Shivnarayan in Uttar Pradesh, Kartha Bhajas and Balarams in Bengal, Charandasis in Rajasthan and Virbrahmas in Andhra Pradesh had denounced polytheism, idolatry and caste distinctions. Thus there is evidence to " testify to the movement of reform manifesting in society even independent of foreign influences. "

It should be noted in this connection that although Bengal experienced the western impact much before Maharashtra, the first move towards social reform in India was made in Bombay, after it came to be integrated with the rest of western India under the British rule. This early agitation for social reform in Maharashtra can be attributed to the fact that the Maratha rulers of the eighteenth century " were not indifferent to social reform " (S. Natarajan, *A Century of Social Reform in India*, Bombay, 1959). There is some evidence to show that the Maratha rulers, following the old Hindu tradition, took upon themselves the duty of regulating the social affairs of the community, such as dissuading women from becoming satis, permitting the marriage of widows, and allowing divorce and separation under certain special circumstances, prohibiting the sale of girls, regulating the begging of alms, enforcing temporance, prohibiting immoral living, and even favouring the readmission of converts to Hinduism, This state conducted social activity, restricted though it was within the narrow confines of Brahmin-dominated caste hierarchy, might have continued to exercise some latent influences, favourable to social reform, on the contemporary society (see J. V. Naik, " Social Reform Movements in the Nineteenth and Twentieth Centuries in Maharashtra-A Critical Survey " and references therein, in S. P. Sen (ed) *Social Religious Reform Movements*

in the Nineteenth and Twentieth Centuries, Calcutta, 1979).

Our idea in giving the foregoing account is not to belittle the western influences, which have been undoubtedly very great in the shaping of modern Indian thought, but only to provide a perspective which might help a better understanding of the reform movements in both the phases of the nineteenth century Indian renaissance : in its rational-liberal as well as emotional-revivalist phase.

Renaissance in Maharashtra

There are certain misconceptions about the renaissance thought in Maharashtra. In a well-argued paper " The Renaissance in Bengal and Maharashtrian thought from 1850 to 1920 " (*Artha Vijnan*, Gokhale Institute of Politics and Economics, Vol.4, No. 4, December 1962, pp. 331–342), Dr. K. Mukerji, makes a qualitative difference between the renaissance thought in Bengal and Maharashtra and propounds a thesis that " Maharashtra never had a general renaissance in the sense that Bengal had one after 1815. " He argues that " the challenge of the British Power (in Maharashtra) was not a total challenge, but a partial challenge of political and economic power, of political and economic organisation....The idea of total organisation of thought and social organisation, a pre-condition to total social awakening was, therefore, never an item of fundamental faith among the main stream of Maharashtrian thought ". "In this sense", Mukerji adds, " the dice would appear to have been leaded very heavily against the Ranade-Agarkar thought in Maharashtra from the very beginning. Ranade, Agarkar and Gokhale would thus be seen to belong to Bombay and India and never properly to Maharashtra. "

Obviously based on insufficient data and virtually no knowledge of the flow of renaissance thought in Maharashtra prior to 1850, Mukerji's thesis tends to be facile and

contains only a partial truth. He seems to suggest that while Bengal renaissance was closely linked with the socio-economic changes experienced by a whole set of people, under the East India Company's rule, which compelled them to do a total rethinking about every aspect of life, renaissance in Maharashtra, if there was any, was totally unrelated to any basic change in class structure, but was merely due to "cultural induction", that is, by exposure to the new ideas gained through English education.

In reaching his conclusions, Dr. Mukerji has relied almost entirely on secondary sources. If he was to peruse carefully the pre-1857 writings of the early Maharastrian intellectuals, especially those of Dadoba Pandurang, Bhaskar Pandurang, Ramkrishna Vishvanath and Lokahitavadi Gopal Hari Deshmukh, who were the forerunners of Ranade-Agarkar thought, Dr. Mukerji perhaps would not have reached the conclusions that he has. There was a substantial rethinking on the part of these men, which was not unrelated to the changing socio-economic life in the colonial situation. They had developed definite political and economic ideas of their own. And very much like Raja Rammohan Roy, but independent of his influence, their idea of religion was also thought out basically in secular terms, and their line of arguments, too, run from ethics to God not vice-versa. This is especially true of Dadoba Pandurang and his followers in the Paramahansa Sabha, which included Jyotiba Phule. But unlike the radical Derozians of "Young Bengal" or more fiery faction of the Brahmo Samaj, their approach to practical reform was far more cautious. It is true that compared to Bengal, their number was small, but, in Dr. Mukerji's own admission, in the realm of socio-cultural history quantity is not necessarily a quality.

Dr. Mukerji, however, is right in his observation that, given its political past, Maharashtra at no stage was fully

reconciled to the British rule, that 'the unconscious ethos of the ruling elite ln Maharashtra never accepted the transfer of power after 1817 as nothing more than tactical retreat." But he is clearly wrong in assuming that "the final effect of the British economic policy was not manifest in the Bombay-Deccan until much later." In fact, in the early 1840's, a small band of Maharastrian intellectuals were acutely seized with the problem of British economic policies and their ruinous effects on the country.

Bhaskar Pandurang Tarkhadkar (1816-1847), who, in the early 1840's, made a searching analysis of British rule in all its aspects and came to a conclusion that there is no such thing as beneficient imperialism and there cannot be anything altruistic about the colonial rule.

These groups of writers were the originators of the famous "Drain Theory", which was subsequently so very forcefully developed by Dadabhoy Naorojee, Justice Ranade and others. The more discerning among the early Maharastrian intellectuals, contrary to popular belief, did not welcome British ruls as "Divine Providence", but looked on it, in the words of Bhaskar Tarkhadkar, as "the most bitter curse."

This early denunciation of British rule was motivated by political and economic rather than by socio-religious consideration. But (at tbe same time it tries) these early anti-British writers were not against socio-religious reform but were concerned more about the alien political subjugation and the consequent economic ruination.

The later day demand of the extremists led by Tilak, for subordinating social reform to the all-powerful urge for "freedom first" was quite in line with the nature of renaissance thought in Maharashtra from the very beginning.

Rationalism and universalism were the keynotes of religious and social symphony aimed at by the pioneers of the

reform movements in Western India. The tenets given in the *Dharmavivechan* formed the ideological bases of the earliest reform associations, Manava Dharma Sabha, and the Paramahansa Sabha in Gujarat and Maharashtra respectively and the rise of the Prarthana Samaj and Satyashodhak Samaj can be traced to these early reform associations.

The object of the Paramahansa Sabha was not so much religious as it was social and national. By the abolition of the distinctions of caste, creed and custom, it aimed at uniting all in one fraternity, and in the worship of One God. Although after 1860 the Sabha became moribund, it did not completely die out as is generally believed. In 1867, it was resuscitated in the form of the Prarthana Samaj, with its emphasis shifted from the material to the spiritual; from man to God.

Although Bengal experienced the western impact long before Maharashtra, the first move towards social reform in India was made in Bombay, after it came to be integrated with the rest of Western India under the British rule; and unlike Bengal, social reform movement in Maharashtra preceded religious reform and " was not an offshoot " of the latter. The Western impact produced opposite reaction between the two sections of the small new elite in Maharashtra, and (now) the struggle that ensued between the reformist section and the traditionalists, between moderate reformers ond orthodox revivalists,between social change and eagerness to preserve the old order, constituted the essence of social history of modern Maharashtra.

No study of the sociol reform movement brings out so clearly the struggle that ensued, with the impact of the West, between the reformers and the orthodox section in matters of religious and social reform in Maharashtra, as the history of the Prarthana Samaj does. The movement originated in the combined efforts of the first generation of the English

educated men in the city of Bombay, and throughout its history it remained confined to a small section of the educated men mostly from higher castes. If we could count among its founder-workers some of the best minds truly embued with the idea of national unity and progress that country has produced, some of its bitterest critics were no less patriotic and no lesser intellectuals. The study of this movement thus forms a part of intellectual history of modern Maharashtra.

The contribution of Shahu Maharaj to educational and socio-religious reform, his patronage of the arts and sports and his all out support to the cause of the depressed classes are will known. All his thoughts and actions were in tune with the resurgence of Maharashtra in renescent India.

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६२ : १–४, १९८३–८४

पश्चिम महाराष्ट्रातील प्रॉटेस्टंट मिशनऱ्यांची चळवळ (१८१२–१९५०)

शरावती शिरगावकर
श्री. ना. दा. ठा. महिला विद्यापीठ, मुंबई

इ. १८१८ पासून महाराष्ट्राच्या इतिहासात केवळ एक नवे राजकीय पर्व सुरू झाले असे नाही तर सांस्कृतिक पर्वही सुरू झाले. या सांस्कृतिक पर्वाचा विशेष म्हणजे पाश्चात्य संस्कृती व पौर्वात्य संस्कृती यांचा संघर्ष व संगम महाराष्ट्रात झाला व पाश्चिमात्य संस्कृतीमधील काही विशेष महाराष्ट्राने स्वीकारल्यामुळे महाराष्ट्रीय संस्कृतीने एक नवे वळण घेतले. हे नवे वळण मिळण्यास ब्रिटिश राज्यकर्ते, त्यांचे कायदे, त्यांची शासनपद्धती, त्यांनी सुरू केलेली शिक्षणपद्धती बऱ्याच अंशी जबाबदार आहे; पण त्याबरोबरच औद्योगिक तंत्रे, मुद्रणयंत्रे, दळणवळणाची साधने, यांसारख्या भौतिक प्रगती साधणाऱ्या गोष्टींही जबाबदार आहेत. तसेच पाश्चात्य राष्ट्रांमधून ख्रिस्ती धर्मप्रसाराच्या इच्छेने आलेले प्रॉटेस्टंट मिशनरी हा एक फार महत्त्वपूर्ण घटक एकोणिसाव्या व विसाव्या शतकातल्या महाराष्ट्रातील सांस्कृतिक परिवर्तनास जबाबदार आहे.

ख्रिस्ती धर्माच्या प्रसारास आपल्या अंमलाखालील मुलुखात मुळीच उत्तेजन द्यावयाचे नाही हा ईस्ट इंडिया कंपनीच्या राज्यकर्त्यांच्या धोरणातील महत्त्वाचा मुद्दा होता. परंतु ब्रिटनमधील लोकमताचे दडपण येऊन इ. १८१३ च्या सनदेने मिशनऱ्यांना कंपनीच्या मुलखात कार्य करण्यास परवानगी मिळाली. तत्पूर्वीच इ. १८१२ मध्ये पहिला अमेरिकन प्रॉटेस्टंट मिशनरी मुंबईत येऊन दाखल झाला होता. त्यानंतर अमेरिका, इंग्लंड, स्कॉटलंड, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, न्यूझीलंड अशा विविध देशांमधून इ. १९५० पर्यंत महाराष्ट्रात मिशनरी येत राहिले.

ख्रिस्तीधर्मीय लोकांची संख्या वाढविण्यासाठी या मिशनऱ्यांनी पश्चिम महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये आपली केंद्रे निर्माण केली. स्थूल मानाने त्यांची कार्यपद्धती पुढीलप्रमाणे होती : एखाद्या गावी आपले एक केंद्र स्थापन करावयाचे व ईस्ट इंडिया कंपनीचा ख्रिस्ती नोकरवर्ग, व्यापाराच्या निमित्ताने आलेले ख्रिस्ती लोक यांच्या साहाय्याने आर्थिकदृष्ट्या बस्तान बसविण्यास सुरुवात करावयाची. शक्य तितक्या लवकर चर्चची एक इमारत उभी करून ख्रिस्ती धर्माचा उपदेश

करावयास नियमितपणे सुरुवात करावयाची. त्यासाठी मिशनरी गावात हिंडून माणसे गोळा करीत, लहान मुलांना खाऊ, चित्रे असली आमिषे दाखवून आकर्षित करीत. मिशनऱ्यांच्या बायकाही स्त्रियांच्यात मिसळून त्यांना उपदेश ऐकण्यासाठी येण्यास प्रवृत्त करीत. सर्वसामान्य लोकांत मिसळणे सुलभ व्हावे म्हणून ते मराठी भाषा तर शिकतच पण बोली भाषाही आत्मसात करीत. अर्थात या मार्गाने त्यांना लोकांकडून फारच कमी प्रतिसाद मिळे. मुलांमुलींसाठी प्राथमिक शाळा, दुय्यम शाळा व शहरी भागात महाविद्यालये मिशनऱ्यांनी काढली. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धातच त्यानी सर्व जातींच्या मुलांना व मुलींना शिक्षण देण्यास सुरुवात केली. क्रमिक पुस्तके, व्याकरणे लिहिली. प्रौढ शिक्षणासाठी रात्रीचे वर्ग चालविले, छापखाने घालून नियतकालिके चालविली, विविध भाषांमध्ये प्रचारपुस्तिका लिहून, छापून वाटल्या. बायबलचे मराठीत भाषांतर केले. उपासना संगीताचे पाठ चर्चमध्ये देण्यास सुरुवात केली. अनाथालये, वृद्धाश्रम उघडले, दवाखाने व रुग्णालये चालविली. ग्रामीण भागातील उपलब्ध वस्तूंचा वापर करून व्यवसाय करता येतील अशा पद्धतीचें व्यावसायिक शिक्षण सुरू केले. शहरी भागात तरुणांच्या कार्यशक्तीला उत्तेजन म्हणून युवक मंडळे स्थापून ज्ञानप्रसाराचे, करमणूक करणारे, लहानमोठयांना एकत्र आणणारे विविध उपक्रम सुरू केले. त्यांच्या या सर्व व्यापांमागे मुख्य सूत्र, अधिकात अधिक लोकांना ख्रिस्ती धर्माची दीक्षा देणे, हे होते. या कार्यात त्यांचा व्यक्तिगत स्वार्थ होता असे म्हणता येणार नाही; पण ज्या उद्देशाने व तयारीने मिशनरी महाराष्ट्रात आलेले ते ते पाहता धार्मिक स्वार्थ जरूर होता व त्यासाठी ज्या जिद्दीने व तळमळीने त्यांनी खस्ती धर्माच्या प्रसाराचें कार्य केले त्या त्यांच्या कार्यपद्धतीचें जरूर कौतुक करण्याजोगे आहे. मिशनऱ्यांच्या या प्रयत्नाना ईस्ट इंडिया कंपनी सरकारने अधिकृतरीत्या कोणतेही उत्तेजन दिले नाही, उलट मिशनऱ्यांनी या ख्रिस्तीधर्मीय सरकारविषयी नाराजच व्हावे असे सरकारचे निर्णय असत. परंतु धर्मनिष्ठ ख्रिस्ती मनुष्य या नात्याने सरकारी अधिकाऱ्यांनी पैसे देऊन, ख्रिस्ती लोकांना नोकऱ्या देऊन, मिशनऱ्यांना खूपच मदत केली. पुढे ब्रिटिश सरकारच्या हाती भारताचा कारभार गेल्यानंतर शिक्षणखाते, पोस्टखाते, धर्मखाते, अशा विविध खात्यांतर्फे महाराष्ट्रातील मिशनऱ्यांना तऱ्हेतऱ्हेच्या सवलती मिळत गेल्या. मिशनऱ्यांच्या या प्रदीर्घ चळवळीची एक परंपरा महाराष्ट्रात तयार झाली.

संख्येच्या दृष्टीने या चळवळीचे यश मोजावयाचे तर मिशनऱ्यांना उत्साह वाटेल असा प्रतिसाद महाराष्ट्रातून त्याना मिळाला नाही. धर्मांतराबाबत मिशनरी कोणावरच सक्ती करू शकत नव्हते व सरकारकडून तसे पाठबळही त्यांना मिळाले नाही. पण शिक्षणसंस्था व लोकसंपर्काचा सतत पाठपुरावा यातून काही धर्मांतरे घडली. ही धर्मांतरे प्रामुख्याने समाजातील उच्च वर्गातून, विशेषतः ब्राह्मणवर्गातून झाली. करमरकर, मोडक, खिस्ते, आठवले, सावरकर, टिळक, डोंगरे ही उदाहरणे या

संदर्भात देता येतील. तत्कालीन समाजाच्या विरोधाला तोंड देऊनही ही मंडळी ख्रिस्ती झाली. परंतु उच्चवर्णीयांमधील धर्मांतराची उदाहरणे १८८० नंतर कमी होत गेली. याचे एक प्रमुख कारण म्हणजे प्रार्थना समाजाचे कार्य. जी धर्मांतरे घडून आली त्यांपैकी बरीच दारिद्र्य, मिशनऱ्यांनी केलेल्या सेवेविषयी कृतज्ञता, सामाजिक गुन्ह्यांबद्दल वाळीत पडण्याची पाळी अशा कारणांनी घडली. परंतु त्यांचेही प्रमाण प्रचंड होते अशातील भाग नाही. गुजरात, उत्तर प्रदेश, पंजाब, आसाम, तामिळनाडू, केरळ या भागातील मिशनऱ्यांनी घडवून आणलेल्या संख्येशी तुलना केली तर पश्चिम महाराष्ट्रातील धर्मांतराचे प्रमाण कमीच भरते. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला मात्र एकदम मोठ्या संख्येने धर्मांतरे झालेली आढळतात. याचे एक मुख्य कारण म्हणजे इ. १८९८ ते १९०२ सालापर्यंत महाराष्ट्रात पडलेले भीषण दुष्काळ. दुष्काळांमुळे अक्षरशः हाडांचे सांगाडे राहिलेली शेकडो मुले मिशनऱ्यांनी रस्त्यांवरून उचलून आपापल्या ठाण्यात आणली. त्यांना त्यांनी जगवले. हीच मुले मोठी झाल्यावर ख्रिस्ती झाली. ख्रिस्ती लोकांच्या संततीचे प्रमाण भारतातील इतर वर्गांच्या संतती-प्रमाणासारखेच वाढत राहिले व महाराष्ट्रीय समाजात एका नव्या जातीची व काही अंशी नव्या उपजातींची निर्मिती झाली. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परिवर्तनाच्या दृष्टीने हा परिणाम फारसा महत्त्वाचा नाही. मिशनऱ्यांच्या खटपटीमुळे महाराष्ट्राच्या वैचारिक, धार्मिक व सामाजिक जीवनात जे नवे प्रवाह निर्माण झाले व त्यातून समाजजीवनात ज्या क्रिया प्रतिक्रिया निर्माण झाल्या त्या अधिक महत्त्वाच्या आहेत.

एक विशेष महत्त्वाचा परिणाम म्हणजे मिशनऱ्यांच्या कठोर टीकेमुळे समाजातील सुशिक्षित व विचारी वर्ग अंतर्मुख बनला व आत्मपरीक्षण करू लागला. यामधून स्वधर्माच्या चांगले वाईटपणाचा विचार झाला, एवढेच नव्हे तर धर्म म्हणजे काय, त्याची माणसाला गरजच काय, यांसारख्या मूलभूत प्रश्नांच्या विचारालाही चालना मिळाली. त्याबरोबरच धर्मांच्या तौलनिक अभ्यासाला सुरुवात झाली. यातूनच धार्मिक जीवनात स्वधर्माचे आत्यंतिक समर्थन करणारा सनातनी वर्ग निघाला, तसाच स्वधर्मातील दोष तपासून ते दूर करण्याचा प्रयत्न करणारा सुधारकवर्ग तयार झाला. या दोन्ही वर्गांनी मिशनऱ्यांनी टीकेसाठी वापरलेली साधने स्वमतप्रतिपादनासाठी वापरली. ती म्हणजे लेखणी, वाणी व संघटना. यामुळे लहान मुलांना सोप्या व सुलभ भाषेत धर्मसंस्कार शिकविणाऱ्या छोट्या छोट्या पुस्तिकांपासून 'धर्मशास्त्राचा इतिहास' या अभ्यासपूर्ण, व्यासंगी पुस्तकांपर्यंत अनेक ग्रंथ मराठी भाषेत निर्माण झाले. धर्म य विषयाला वाहून घेतलेली नियतकालिके निघाली. वादविवाद, व्याख्यानमाला, हे मार्गही अवलंबिले गेले. परमहंससभा, सत्यशोधक–समाज, प्रार्थनासमाज, गीता-धर्ममंडळ, धर्मनिर्णयमंडळ यांसारख्या संघटनाही निर्माण झाल्या. त्याबरोबरच स्वधर्मात येऊ पाहण्यासाठी शुद्धीकरणाच्या चळवळीही सुरू झाल्या. विष्णुशास्त्री

चिपळूणकरांनी मिशनऱ्यांवर त्यांच्याचइतके प्रखर व परखड हल्ले आपल्या ' निबंध-माले 'तून चढविले. मिशनऱ्यांच्या एकांगी, पूर्वग्रहदूषित टीकेतील हवाच त्यामुळे नाहीशी झाली. आपण शर्थीचे प्रयत्न करूनही आपल्याला मनासारखे यश का मिळत नाही याचा विचार मिशनरी स्वतःशी करू लागले. जॉर्ज बोएनसारखा मिशनरी इतर मिशनऱ्यांना सांगू लागला की येथल्या दरिद्री आणि अर्धनग्न माणसांत जर तुम्हाला येशू पाहता आला, त्यांच्यात त्यांच्यासारखेच तुम्हाला राहता आले तरच तुम्ही त्यांना येशूच्या मागे नेण्यात यशस्वी ठरू शकाल. ॲबटसारख्या मिशनऱ्यांनी ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम यांच्यासारख्या संतांच्या वाङ्मयाचें टीकात्मक परीक्षण केले. कीर्तनसंस्थेसारख्या एतद्देशीय संस्थेचे अनुकरण करून खिस्ती कीर्तनाची परंपरा तयार झाली.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतीय राष्ट्रवादाचा विकास होऊ लागल्यानंतर स्वधर्म, स्वदेश, स्वतःचा इतिहास याविषयी अभिमान बाळगणारा वर्ग समाजात प्रभावी ठरू लागला. परकीय राज्यकर्ते व त्यांचा धर्म या सर्वांविषयीच प्रथम उदासीनता, नंतर दुरावा, नंतर अप्रीति व पुढील काळात त्वेष निर्माण झाला. धर्मांतर म्हणजे राष्ट्रांतर हा विचार समाजात प्रभावी ठरू लागला. त्यामुळे, मिश-नऱ्यांच्या चळवळींनी एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात एतद्देशीय समाजाला जेवढे धक्के बसत होते तेवढे उत्तरार्धात बसेनासे झाले व विसाव्या शतकात तर मिश-नऱ्यांच्या चळवळी मूळ धरून बसलेल्या असल्या तरी राष्ट्रीय पुढारी समाजाला धर्मकारणाऐवजी राजकारणाकडे आकर्षित करू लागल्यामुळ त्या चळवळींकडे उपेक्षे-नेच समाज पाहू लागला. खुद्द खिस्ती समाजातही, विशेषतः खिस्ती तरुणांमध्ये, आम्ही काळे खिस्ती भारतीयच आहोत हा विचार बळावू लागला. ' प्रियकर हिंदु-स्तान 'सारखी राष्ट्रीय कविता रेव्हरेंड ना. वा. टिळक यांनी याच प्रेरणेतून लिहिली. राष्ट्रीय लढ्यामध्ये महात्मा गांधींच्या युगात भारताच्या स्वातंत्र्याबरोबरच अस्पृश्योद्धार, स्त्रियांचा उद्धार, राष्ट्रीय शिक्षण यांसारख्या कार्यक्रमांना चालना मिळाल्यामुळे मिशनऱ्यांना खालच्या वर्गातून धर्मांतरासाठी तयार होणारे लोकही मिळणे मुष्किल होऊ लागले. त्यामुळे मिशनऱ्यांच्या चळवळीची तीव्रताही जाणवेना व तिच्याविरुद्ध प्रखर आंदोलनाची गरजही वाटेना. सामाजिक, धार्मिक इतकेच नव्हे तर आर्थिक आंदोलनेही राष्ट्रीय चळवळीच्या आंदोलनात मिसळून गेली.

मिशनरी चळवळीचा प्रभाव विसाव्या शतकात कमी होण्याचे आणखी एक कारण म्हणजे शिक्षणप्रसाराच्या बाबतीत महाराष्ट्राने केलेली विशेष कामगिरी. इ. १८२० सालापर्यंत महाराष्ट्रात परंपरेने आलेली जुनी शिक्षणपद्धती चालू होती. पंतोजींच्या या शाळांमधून ब्राह्मण, वाणी यांची मुले दोन चार वर्षे पाठांतर पद्धतीने व्यावहारिक दृष्ट्या आवश्यक तेवढे ज्ञान मिळवीत व मग आपापल्या वडिलांच्या हाताखाली व्यावसायिक शिक्षणास सुरुवात करीत. ब्राह्मण मुले पाठशाळांमधून पुढचे

शिक्षण घेत. प्रॉटेस्टंट पंथाच्या तत्त्वानुसार प्रत्येकाला बायबलचे वाचन करता येणे आवश्यक होते. म्हणून मिशनरी मंडळी शिक्षणाच्या क्षेत्रात इ. १८१३ पासून उतरू लागली. याच सुमारास ख्रिस्ती व एतद्देशीय मुलांसाठी सरकारी उत्तेजनाने शाळा सुरू झाल्या. इ. १८२०–२१ पासून सरकारने स्वतःच शाळा उघडल्या. इ. १८४० पासून बोर्ड ऑफ एज्युकेशनतर्फे खेडोपाडीही सरकारी शाळा निघू लागल्या. पण जेथे सरकारी शाळा नव्हत्या तेथेसुद्धा मिशनऱ्यांच्या शाळा अधिक जोराने काम करू लागल्या.

इ. १८५४ च्या वुडच्या शैक्षणिक खलित्याने ब्रिटिशप्रणीत आधुनिक शिक्षण-पद्धतीची शिस्त लागली. मुंबई विद्यापीठ निघून उच्च शिक्षणाची सोय झाली. वुडच्या खलित्यात एक तरतूद होती. ती अशी की, जर एतद्देशीय लोक आपल्या शिक्षणसंस्था स्थापन करतील तर त्यांना विशिष्ट अटींवर सरकारकडून अनुदान मिळेल. याचा फायदा घेऊन महाराष्ट्रात हळूहळू शिक्षणसंस्था निघू लागल्या. डेक्कन एज्युकेशन सोसायटी, शिक्षण प्रसारक मंडळी ही या संदर्भातील उदाहरणे, परंतु लॉर्ड रिपनच्या कारकिर्दीत संमत झालेल्या स्थानिक स्वराज्यविषयक कायद्यामुळे प्राथमिक शिक्षण हा विषय नगरपालिका, लोकल बोर्डस् यांच्या कक्षेत आला व हळूहळू खेडोपाडीसुद्धा अनुदान मिळणाऱ्या प्राथमिक शाळांच्या सोयी सुरू होऊ लागल्या. आमच्या शाळा जेथे आहेत तेथेच सरकार का शाळा स्थापन करते असा सवाल मिशनरी करू लागले. यातच राष्ट्रीय चळवळीचा जोर वाढू लागल्यावर राष्ट्रीय शिक्षणाचे वारे सर्वत्र खेळू लागले. अनेक ठिकाणी राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळा निघाल्या. या सर्वांना तोंड देऊन लहान मुलांना स्वतःच्या शाळांकडे आकर्षित करण्यासाठी अधिक आमिषे दाखविणे केवळ अशक्यप्राय होते. राष्ट्रीय चळवळीमुळे समाजातही मिशनऱ्यांच्या शाळांचे आकर्षण राहणे कठीण होऊ लागले. त्यामुळ प्राथमिक शिक्षणामधील मिशनऱ्यांचा रसही जवळ जवळ संपला. ख्रिस्ती मुलांसाठी नमुनेदार शाळा चालविण्याकडे त्यांनी लक्ष केंद्रित केले. मुलींचे शिक्षण हा खास मिशनऱ्यांचाच प्रांत इ. १८२४ पासून होता. पण इ. १८४८ साली मुंबईत शंकरशेट, भाऊ दाजी लाड व एल्फिन्स्टन कॉलेजमधील विद्यार्थी यांच्या प्रयत्नाने मराठी, गुजराती शाळा सुरू झाल्या. ज्योतिबा फुल्यांच्या शाळा पुण्यात सुरू झाल्या. प्रार्थना-समाजाच्या शाळा सुरू झाल्या. स्त्रीशिक्षणाची वाट या काळात फार खडतर होती. परंतु विसाव्या शतकाच्या सुरुवातीला धोंडो केशव कर्व्यांच्या अनाथ बालिकाश्रमा-मुळे महाराष्ट्रात स्त्रीशिक्षणाचे नवे पर्व सुरू झाले.

इ. १९१६ साली त्यांनी स्थापन केलेल्या महिला विद्यापीठाची तर मिशन-ऱ्यांनी आपल्या वृत्तपत्रांमधून टिंगल केलेली होती. परंतु जसजशा महाराष्ट्रातील शिक्षणसंस्था बाळसे धरू लागल्या तसतसा शिक्षणक्षेत्रावरील मिशनऱ्यांचा प्रभाव उडू लागला. परंतु मुलींसाठी शाळा, अस्पृश्य मुलामुलींसाठी शाळा, प्रौढ शिक्षण या सर्वच

सुधारणा महाराष्ट्रात सुरू करण्याचा मान निःसंशयपणे मिशनऱ्यांकडे जातो हे नाकारता येणार नाही. उलट महाराष्ट्रातील शिक्षणसंस्था मिशनऱ्यांच्या संस्थांकडे आदर्श उदाहरणे म्हणून पाहात होत्या असे दिसते.

आपल्या धार्मिक स्वार्थासाठी का होईना, पण मिशनऱ्यांनी सेवाभावनेने जी कार्ये चालविली होती ती आजही चालू आहेत. यात अनाथ बालकाश्रम, खेडोपाडी जाऊन आजाऱ्यांची शुश्रूषा, मोफत रुग्णालये व दवाखाने यांचा समावेश करता येईल. नर्सेस बहुतेक ख्रिस्तीच असतात अशी परिस्थिती काही काळ महाराष्ट्रात होती. मिरजेचे आजचे वैद्यकीय महाविद्यालय म्हणजे डॉ. वानलेस या मिशनऱ्याची देणगी आहे. परंतु मिशनऱ्यांच्या प्रत्येक लहान मोठ्या ठाण्यात वैद्यकीय उपचारांची तरतूद होती.

इ. १९५० मध्ये भारतीय राज्यघटनेत निधर्मीवादाचे तत्त्व स्वीकारण्यात आले. मिशनऱ्यांच्या मागचे ख्रिस्ती सरकारचे पाठबळ संपले. भारताच्या इतिहासातील पारतंत्र्याचे पर्व जसे संपले तसेच मिशनऱ्यांच्या चळवळीतील एक पर्वही संपले. या पर्वात महाराष्ट्रीय समाजात जे परिवर्तन झाले त्यापैकी अनेक अंगांच्या बाबतीत मिशनऱ्यांनी सुरुवात करून दिलेली आहे असे दिसते.

सर्व जातींच्या मुलांसाठी समान पातळीवरून आधुनिक पद्धतीचे मोफत शिक्षण, स्त्रीशिक्षण, परिचारिकांचे शिक्षणक्रम, शेतकी शिक्षणक्रम, मराठी मुद्रण, क्रमिक पुस्तके, प्रौढशिक्षण, या सुधारणांची गंगोत्री महाराष्ट्रात मिशनऱ्यांच्या कार्यात आहे. जातीभेदांचा विचार मनात न आणता रुग्णसेवा, फिरती वैद्यकीय पथके यांची सुरुवात महाराष्ट्रात मिशनऱ्यांनीच केली. प्रार्थनासमाज, भारत सेवक समाज या एकोणिसाव्या शतकातील संघटनांनी त्यांचीच कार्यपद्धती आपल्या डोळ्यांसमोर ठेवली होती. सत्यशोधक समाजाचे निर्माते ज्योतिबा फुले यांनी मिशनऱ्यांचे ऋण उघड उघड कबूल केले आहे, तर प्रार्थना समाजाला स्फूर्ति मिळाली ती मिशनऱ्यांच्या कार्यपद्धतीमधूनच. पंडिता रमाबाईना मिशनऱ्यांकडून किती स्फूर्ती मिळाली होती ते त्यांच्या केडगावच्या मुक्तिमिशनमधून दिसते. धोंडो केशव कर्वे मिशनऱ्याच शाळेचे व महाविद्यालयाचे विद्यार्थी. धार्मिक जीवन आणि सामाजिक जीवन या गोष्टी एकरूप नाहीत हा विचारही मिशनऱ्यांच्या कार्याला झालेल्या प्रतिक्रियेमुळे रुजला. स्वतंत्र भारतात पंचवार्षिक योजनेत समाजकल्याणाच्या अनेक योजनांमध्ये मिशनऱ्यांच्या तंत्रांचा अवलंब केलेला आज दिसून येतो. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात मिशनऱ्यांच्या कार्याचा वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून अभ्यास होणे आवश्यक आहे, या जाणिवेने 'एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील प्रॉटेस्टंट मिशनऱ्यांची चळवळ' हा विषय प्रस्तुत लेखिकेने डॉक्टरेटच्या प्रबंधासाठी निवडला होता. इ. १८५८ ते १९५० या कालखंडाविषयीची माहिती गोळा करण्याचे काम चालू आहे.

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६२ : १-४, १९८३-८४

एकोणिसाव्या शतकातील दोन समाजसुधारक

अरुण जोशी
ठाणे

एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातल्या भिन्न प्रकृतीच्या दोन समाजसुधारकांबाबाबतची माझी दोन स्वतंत्र संशोधने मी येथे सादर करीत आहे : (१) लोकहितवादी, (२) गोविंद बाबाजी जोशी.

१. लोकहितवादी

लोकहितवादींवरील माझा प्रबंध[१] दोन भागांत आहे. पहिला भाग इंग्रजीत असून दुसऱ्यात त्यांचे आजपर्यंत अज्ञात राहिलेले दुर्मिळ लेखन संकलित केलेले आहे. हा दुसरा भाग ग्रंथरूपानेही[२] प्रसिद्ध झालेला आहे.

हिंदू समाजाचा तेजोभंग करणारे, स्वतःच्या व मुलाबाळांच्या फायद्यासाठी इंग्रजांची स्तुती करणारे, एक लाचखाऊ सरकारी नोकर, बोलघेवडे समाजसुधारक आणि गोंधळलेले विचारवंत अशी त्यांची प्रतिमा अगदी परवापरवापर्यंत लोकमानसात रुजलेली होती. याचे मुख्य कारण म्हणजे विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी आपल्या निबंधमालेतून त्यांच्यावर केलेली जहरी टीका. [३] पुढे त्यांच्याच प्रभावळीतील अनेकानी हीच टीका उगाळण्याचे काम केले. [४] त्यामुळे लोकहितवादींची विपरीत प्रतिमा अधिकच दृढ होत गेली. गेल्या काही वर्षांत मात्र लोकहितवादींचे विचार व कार्य यांच्याकडे डोळे उघडून बघण्याचा धीटपणा काही विचारवंतांनी दाखविला.[५] या संदर्भात डॉ. क्षेरे, गोवर्धनदास पारीख व डॉ. निर्मलकुमार फडकुले यांच्या ग्रंथांचा विशेष उल्लेख करावा लागेल. क्षेरे यांनी लोकहितवादींच्या राजकीय विचारांचा विशेष मागोवा घेतला आहे. पारिखांच्या छोटयाशा पुस्तकात लोकहितवादींच्या विचारांचे काही मूलभूत विश्लेषण केलेले आहे. फडकुले यांच्या ग्रंथराजात लोकहितवादी व त्यांचे ग्रंथ याबाबत तोपर्यंत झालेल्या बऱ्यावाईट टीकाटिप्पणींचे उत्कृष्ट संकलन केलेले आढळते. परंतु या प्रत्येक ग्रंथाचे काही विशिष्ट हेतू असल्यामुळे त्यांना मर्यादा पडणे स्वाभाविक होते. लोकहितवादींच्या समग्र कार्याचा व विचारांचा अधिक सखोल मागोवा घेणे मला आवश्यक वाटले ते यामुळेच.

इ. स. १८१८ मध्ये पेशवाई बुडाली आणि इंग्रजी राजवट सुरू झाली. याचा

सुमारास लोकहितवादींचा जन्म झाला. आधुनिक विद्या देणाऱ्या शाळा, वृत्तपत्रे व खिस्ती धर्मोपदेशकांची टीका यामुळे येथीलांच्या मनात राजकीय व सामाजिक स्थितीबद्दल उलटसुलट विचारचक्रे सुरू झाली. नवी राजवट व ती ज्याचे प्रतिनिधित्व करीत होती त्या पाश्चात्य संस्कृतीचे तत्कालीनांना नीटसे आकलन होऊ शकले नाही. आधुनिकतेकडे वाटचाल सुरू झाली तरी महाराष्ट्र अंधारातून चाचपडतच मार्गक्रमण करीत होता. अशा या संधिकाळात नवीन मार्ग शोधणाऱ्यांचे काम बिकट होते. असा प्रयत्न करणाऱ्यांत लोकहितवादी हे आद्य सुधारक होते. म्हणूनच महाराष्ट्रातल्या प्रबोधन चळवळीच्या इतिहासात त्यांना महत्त्वाचे स्थान द्यावे लागेल.

अशा या लोकहितवादींच्या चरित्र व समाजकार्याच्या तपशिलाची यथातथ्य जुळवाजुळव करण्याचा प्रयत्न मी केला आहे. त्यांची दोन छोटेखानी चरित्रे व सहा तत्कालीन चरित्रलेख, तसेच, **ज्ञानोदय**, **ज्ञानप्रकाश**, **इंदुप्रकाश**, **नेटीव्ह ओपिनियन**, **बुद्धिप्रकाश** (गुजराथी), **केसरी**, **बाँबे टाइम्स अँड जर्नल ऑफ कॉमर्स**, **दि टाइम्स ऑफ इंडया** इ. नियतकालिके व इतर संबंधित ग्रंथांतून सदर माहिती जमविलेली आहे. समाजसुधारणेच्या तळमळीने त्यांनी किती अफाट कार्य केले याचा तपशील अवाक् करणारा आहे.

इंग्रजीवर उत्तम प्रभुत्व असणाऱ्या लोकहितवादीनी १८४४ साली कारकुनीला सुरुवात केली व १८७९ त निवृत्त होताना स्मॉल कॉजेस कोर्टाच्या न्यायाधीश पदापर्यंत मजल मारली. नोकरीनिमित्ताने पुणे, वाई, सातारा, सुरत, नगर, नाशिक, अहमदाबाद, ठाणे, मुंबई असे गावोगाव ते फिरले.[६] जेथे जेथे गेले तेथे विविध प्रकारचे समाजकार्य त्यांनी केले. पुण्यातील मुलींची पहिली शाळा, **ज्ञानप्रकाश** छापखाना व वर्तमानपत्र, पुणे नेटिव्ह जनरल लायब्ररी, दक्षिणा फंड कमिटी, डेक्कन असोसिएशन, दुष्काळपीडितांसाठी मदत व फंड, वाईचे ग्रंथालय, **इंदु काश** साप्ताहिक, मुंबईची विधवा विवाहोत्तेजक सभा, अहमदाबादचे नॉर्मल स्कूल व विधवाविवाहोत्तेजक मंडळी व इतर अनेक शैक्षणिक संस्था, मुंबई आर्यसमाज, मराठी ग्रंथोत्तेजक मंडळी, स्वतःचा मोफत दवाखाना, आर्यज्ञानवर्धक सभा, पुण्याच्या कँटोनमेंटमधील तेलगू भाषिकांचे ग्रंथालय, प्रांतिकसभा, वक्तृत्वोत्तेजक सभा, सार्वजनिक सभा, युनियन क्लब, पुणे गायन समाज, पुणे लवाद कोर्ट, दीनबंधु सार्वजनिक सभा, अशा अनेक संस्थांच्या स्थापनेत, कार्यात किंवा पुनरुज्जीवनात लोकहितवादींचा सहभाग होता. दुसरीकडे त्यांचे लेखनही सुरू होते. त्यांची **शतपत्रे**च फक्त प्रसिद्ध आहेत. पण त्यांनी धर्मविषयक ६, अर्थशास्त्रविषयक ३. व्याकरणविषयक १, समाजविषयक १९ व इतिहासविषयक १० अशी लहानमोठी ३९ पुस्तके लिहिलेली आहेत. शिवाय **ज्ञानोदय**मधील २ लेख, **ज्ञानप्रकाश**मधील दशपत्रे, **बुद्धिप्रकाश**मधील व **आर्यज्ञानवर्धक** मासिकातील सुमारे दोन डझन गुजराथी लेख, **थिऑसफीस्ट** मधील ८ इंग्रजी लेख असे शेकडो स्फुट लेख लिहिले ते वेगळेच. भाषणे किती केली त्याची

तर गणतीच करता येणार नाही. अशा या सुधारकाला नुसता बोलघवडा समाजसुधारक म्हणणे निखालस चुकीचे आहे.

या चरित्रविषयक जुळवाजुळवीच्या अनुषंगाने पुढील मुद्दे प्रथमच स्पष्ट होत आहेत :

(१) त्यांची ग्रंथसंख्या निश्चित करण्यात आली आहे. **कात्यायन सूत्र** हा त्यांनी लिहिलेला ग्रंथ प्रथमच माहिती होत आहे.

(२) **शतपत्र** लेखनाचा काळ अधिक निश्चित करण्यात आला आहे (१९ फेब्रु. १८४८ ते १९ मे १८५०)

(३) इनाम कमिशनच्या कामात त्यांनी पैसे खाल्ले असा जो प्रच्छन्न आरोप केला जातो तो चुकीचा आहे.

लोकहितवादीनी स्वजन व स्वधर्मावर आपल्या शतपत्रांतून टीकेची तोफ डागली. ती बऱ्याच जणांना रुचली नाही. त्यांच्या या टीकेमागची प्रेरणा कोणती याचा शोध न घेताच त्यांना अनेक दूषणे लावण्यात आली आहेत. वास्तविक ते अगदी प्रथमपासून हिंदुत्वाचे जहाल अभिमानी होते. इ. स. १८४० नंतर ख्रिस्ती धर्मप्रसारकांकडून हिंदुधर्मातील अनेक विपरीत गोष्टींवर मुद्दाम बोट ठेवून टीकेची राळ उडविली जाऊ लागली. याचा परिणाम म्हणून अनेक सुशिक्षितांच्या मनात स्वधर्माबद्दल अविश्वास उत्पन्न होऊ लागला होता. दादोबा पांडुरंग, ज्योतीराव फुले ख्रिस्ती होता होता वाचले. श्रीपती शेषाद्री, नीळकंठशास्त्री गोरे, बाबा पद्मनजी व इतर अनेक आंग्लशिक्षित तर उघड उघड ख्रिस्ती झाले. लोकहितवादींची हिंदुधर्मावरील निष्ठा मात्र यत्किंचितही डळमळली नाही. ख्रिस्त्यांच्या टीकेतील हवा काढून घेऊन हिंदूधर्माचा मार्ग निर्वेध करावयाचा असेल तर प्रचलित हिंदूधर्मातील आक्षेपार्ह आचारांची व रूढींची कोळिष्टके झटकून टाकली पाहिजेत व हिंदुधर्माचे शुद्ध स्वरूप लोकांसमोर मांडले पाहिजे याच हेतूने त्यांनी हिंदुधर्मावर चौफेर टीका केली. आपल्या एका पत्रात ते म्हणतात, " आता जो धर्म चालला आहे, हा धर्म नव्हे. हा बेबंद गोंधळ आहे. .... मला तर धर्म कोठें दिसत नाहीं. म्हणून धर्माची स्थापना करण्याचा माझा यत्न आहे " (पत्र क्र. ६५). धर्म बुडाला की देश बुडतो. स्खलित राष्ट्राचे उत्थापन करण्याचा मार्ग एकच. तो म्हणजे राष्ट्राचे धर्मजीवन परत सुविहित करणे असे त्यांचे मत होते. एरवी सहिष्णू असणारे लोकहितवादी हिंदू लोक मुहरमच्या ताबुतात नाचायला जातात म्हणून मनस्वी चिडून बोलतात. ख्रिस्ती, इस्लाम व हिंदू धर्म यांची तुलना करून ते निष्कर्ष काढतात तो असा की, हिंदुधर्माची मूलतत्त्वेच शुद्ध आहेत (**निबंधसंग्रह**, पृ. ४४१). लोकहितवादींनी स्वीकारलेली हिंदुधर्माची व्याख्या ऐहिक जीवनाला महत्त्व देणारी, कर्तव्यपरायण व नीतिपरायण अशी आहे. विकृत सामाजिक चालीरीती या धर्माचे अंगच होऊ शकत नाहीत असे ते स्पष्टपणे सांगतात. हिंदू समाजातील याच चालीरीतींच्या विरुद्ध

ख्रिस्ती धर्मप्रसारकांचा रोख होता हे लक्षात घेणे जरूर आहे.

लोकहितवादींच्या या धर्मप्रेमामुळेच ते आर्य समाजाकडे आकृष्ट झाले. लोकहितवादी प्रार्थनासमाजी होते असा एक गैरसमज प्रचलित आहे. प्रार्थनासमाजाच्या नेत्यांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. काही वेळा ते प्रार्थनासमाजाच्या व्यासपीठावरही आले होते. पण प्रार्थनासमाजाशी ते कधीच एकरूप झाले नाहीत. उलट मुंबई आर्यसमाजाच्या स्थापनेत, प्रसारकार्यात त्यांचा फार मोठा वाटा होता. दयानंदांचे ते जवळजवळ उजवा हात होते. मुंबई आर्यसमाजाचे ते अध्यक्ष होते. दयानंदांच्या कित्येक ग्रंथ प्रकाशनासाठी लोकहितवादींनी विविध प्रकारे साहाय्य केले होते. मुंबई प्रार्थना समाजाचे ते चार आणेवाले सभासदही नव्हते. आर्यसमाजाच्या जवळिकीचे मुख्य कारण हेच होते की दयानंदांची व लोकहितवादींची हिंदुत्वविषयक मते बव्हंशी जुळणारी होती. दयानंदांचा आक्रमक पवित्रा लोकहितवादीना हवाहवासा वाटणारा होता. लोकहितवादी कट्टर हिंदुत्ववादी होते. ब्राह्मणांचे पतन साऱ्या हिंदूधर्माला लांच्छनास्पद ठरणारे आहे हाच त्यांचा मुद्दा होता. सच्च्या ब्राह्मण्याचा त्यांना अभिमान होता.

सामाजिक, आर्थिक व राजकीय विषयांवरील लोकहितवादींचे विचार आज सर्वस्वी अज्ञात राहिलेले नाहीत. त्यामुळे त्यांचे जे विशेष नव्याने प्रकट झाले आहेत तेवढयांचाच मी येथे उल्लेख करीत आहे.

स्त्रीशिक्षण, पाश्चात्य शिक्षणाचा प्रसार, बालविवाहाची रूढी, विधवाविवाहबंदी जातीभेद या सर्व प्रमुख समस्यांबाबत त्यानी विचार मांडले व कार्यही केले. विधवाविवाहविषयक त्यांची कामगिरी इतकी सज्जड आहे की महाराष्ट्राचे ते ईश्वरचंद्र विद्यासागर ठरावेत. या विषयात त्यांनी १८४८ पासूनच रस घेण्यास सुरुवात केली. आयुष्याच्या शेवटापर्यंत ते या बाबतीत कार्यरत होते. याचा थोडक्यात तपशील असा–

(१) १८४८ साली मुंबईच्या गव्हर्नरला एक अनावृत पत्र लिहिले. त्यात या समस्येचे स्वरूप व उपाय सुचविले आहेत.

(२) शतपत्रांपैकी दहा पत्रे याच विषयाला वाहिलेली आहेत.

(३) १८५५ साली **ज्ञानप्रकाश**मध्ये या विषयाबद्दल एक पत्र लिहिले. विधवाविवाहाबाबतचा कायदा सरकार आणणार याची चाहूल लागताच काही पुणेकर ब्राह्मणांनी सरकारकडे अपील करण्याची खटपट चालविली होती. त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न या पत्रात आहे.

(४) अहमदाबादेत विधवाविवाहोत्तेजक मंडळी स्थापन करण्यात वाटा.

(५) मुंबईच्या विधवाविवाहोत्तेजक मंडळीच्या स्थापनाकार्यात मोलाची मदत.

(६) मुंबईस १८६९ साली झालेल्या ब्राह्मणजातीतील पहिल्या विधवाविवाहाचे एक पुरस्कर्ते सप्तर्षी.

(७) **सौभाग्यरत्न** हा विधवाविवाहविषयक ग्रंथ लिहिला.

(८) अहमदाबादच्या संस्थेचे पुनरुज्जीवन केले व काही गुजराती विधवांचे पुनर्विवाह घडवून आणण्यास प्रोत्साहन.

(९) **आर्य ज्ञानवर्धक** या गुजराती मासिकाच्या संपादकांशी या विषयावर ५ प्रदीर्घ पत्रांतून चर्चा केली व विधवाविवाह हा सशास्त्र आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न केला.

लोकहितवादींच्या उक्तीत व कृतीत ताळमेळ नव्हता असा एक गंभीर आरोप समाजसुधारणा कार्याच्या संदर्भात केला जातो. स्वतः विधवाविवाहाचे पुरस्कर्ते असूनही १८६९ सालच्या विधवाविवाह प्रसंगी त्यांनी कच खाल्ली; बालविवाहास विरोध असूनही स्वतःच्या नातवंडांची लग्ने बालवयात होऊ दिली. हे आक्षेप अगदी सत्य आहेत. काही अंशी या बाबतींत त्यांची बाजू मांडणेही शक्य आहे. पण त्याची काही आवश्यकता नाही. त्यांच्यामधली ही उणीव मान्य केल्याने त्यांच्या इतर भरघोस कार्याला कमीपणा येत नाही. महाराष्ट्रात पुढील काळात घडून आलेल्या जवळजवळ सर्व समाजसुधारणा चळवळींचा मार्ग लोकहितवादींनी दाखवून दिलेल्या दिशेनेच जातो हे लक्षात घेतले तर त्यांचे अनन्यसाधारण महत्त्व मान्य करावेच लागेल.

राजकीय बाबतीत लोकहितवादी इंग्रजी सत्तेचे समर्थक होते. इंग्रजी राज्य ईश्वरी प्रसाद आहे असे ते मानीत हा सर्वसाधारण समज आहे. पण याही बाबतीत त्यांच्या विचारांचा एकूण मागोवा घेता असे दिसते की इतर मान्यवर राष्ट्रीय वृत्तीच्या पुढाऱ्यांप्रमाणेच तेही सच्चे देशभक्त होते. इंग्रजी राजवटीचे व पाश्चात्य संस्कृतीचे त्यांनी विश्लेषण केले व निदान काही वर्षे तरी इंग्रजी सत्तेशिवाय तरुणोपाय नाही या निर्णयाप्रत ते आले. आपला हा निष्कर्ष त्यांनी कोणताही आडपडदा न ठेवता जाहीरपणे मांडला. हे त्यांचे मत सुरुवातीच्या काळातले आहे हेही लक्षात ठेवले पाहिजे. १८५० नंतर ब्रिटिश सत्तेचे साम्राज्यवादी स्वरूप जसजसे उघड होऊ लागले तसतसे त्यांचे मतपरिवर्तन झाल्याचे त्यांच्या **हिंदुस्तानास दारिद्र्य येण्याची कारणे व ग्रामरचना** या दोन ग्रंथांत स्पष्टपणे बघावयास सापडते. आणि सुरुवातीच्या काळातही इंग्रजी सत्तेची त्यांनी प्रतिपादन केलेली आवश्यकताही गुलामी नष्ट करण्यासाठी गुलामी अशा स्वरूपाचीच आहे. विज्ञानाधिष्ठित दृष्टिकोन, आधुनिक विचार प्रगती इ. इंग्रजांच्याच साधनांनी इंग्रजांचा पराभव करता येणे शक्य आहे, पण ती साधने हस्तगत करण्यासाठी काही काळ इंग्रजी सत्ता हवी असा कावेबाजपणा त्यात दिसतो.

मला दिसलेले लोकहितवादी थोडक्यात हे असे होते : स्वतःच्या विचारांशी प्रामाणिक, नवविचारांच्या सुरुवातीच्या लाटेने थोडेसे बावरलेले पण नंतर स्थिर

झालेले, सच्चे राष्ट्रभक्त, कट्टर हिंदुधर्माभिमानी, कार्यप्रवण समाजसुधारक आणि आधुनिक महाराष्ट्राचे आद्य प्रवर्तक.

माझ्या प्रबंधाच्या दुसऱ्या भागात लोकहितवादींचे आजपर्यंत अज्ञात राहिलेले मराठी, गुजराथी व इंग्रजी लेखन समाविष्ट केलेले आहे. डेमी आकाराची सुमारे २५० छापील पृष्ठे भरतील एवढा हा मजकूर आहे. या सर्व लेखनामुळे लोकहितवादींच्या समाजसुधारणाकार्यावर, त्यांच्या ग्रंथसंख्येवर, त्यांच्या धार्मिक, सामाजिक व राजकीय विचारांच्या जडणघडणीवर, गुजरातमध्ये त्यानी केलेल्या कार्यावर भरपूर नवीन प्रकाश पडतो. नव्याने उजेडात आलेले हे लेखन या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

२. गोविंद बाबाजी जोशी

मी आता गोविंद बाबाजी जोशी (वसईकर) या दुसऱ्या समाजसुधारकाकडे वळतो.

समाजप्रबोधनाच्या विविध चळवळी प्रामुख्याने मुंबई, पुणे, अहमदाबाद यासारख्या शहरांत उगम पावल्यामुळे या चळवळी व त्यांचे पुरस्कर्ते यांना तशी बरीच प्रसिद्धी मिळाली. पण शहरांपासून दूर असलेल्या अंतर्भागात घडून आलेल्या चळवळी मात्र पुरेशा प्रकाशात आल्या नसाव्यात असा अंदाज करता येतो. असे काही कार्य घडले असल्यास त्याचा परामर्श घेतल्याशिवाय आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासाला पूर्णता येणार नाही. याचे एक उदाहरण म्हणून **गोविंद बाबाजी जोशी (वसईकर) : एक उपेक्षित समाजसुधारक** या ग्रंथाकडे बोट दाखविता येईल. गोविंद बाबाजींचा खाजगी कागदपत्रांचा संग्रह, त्यांचे मुद्रित ग्रंथ व मुद्रित पत्रके तसेच त्यांचे एक जुने छायाचित्र वसईला आज विद्यमान असलेले त्यांचे नातू आत्मारामपंत यांच्याकडून मिळाल्यामुळेच गोविंद बाबाजींच्या समाजकार्याचा प्रस्तुत आलेख मांडता आला.

गोविंद बाबाजींचा काळ १८२६ ते १९०६. शिक्षण अक्षरशः दोन इयत्तापर्यंत झालेले. १८६० ते १९०० या सुमारे ४० वर्षांत त्यांनी अनेक प्रकारचे समाजकार्य केले. यापैकी पहिल्या १५ वर्षांच्या कालखंडात लोकांची सुधारणा करण्याच्या तळमळीने त्यांनी “ सुमारे ३००० मैल प्रवास केला, ५५ गावी सार्वजनिक विषयांवर भाषणे केली. ५००० लोकांनी यांची भाषणे ऐकलीं ” असे त्यांनी स्वतःच लिहिले आहे. ही सगळी भ्रमंती त्यांनी स्वखर्चाने केली. “ हा वेळपर्यंत एकंदर बराच खर्च आला असेल; परंतु तो काशीयात्रेसारख्या पुण्यात खर्च झाला असे मला वाटते ” असे त्यांनी नमूद केले आहे. तत्कालीन सुधारणांतर्गत सर्व विषयांवरची त्यांची मते प्रागतिक स्वरूपाची होती. पण ‘ बोले तैसा चाले ’ हे त्यांचे वैशिष्ट्य डोळ्यांत भरण्यासारखे आहे. त्यांच्या एकंदर कार्याची केवळ जंत्रीवजा माहितीच येथे देत आहे—

१. वसई असोसिएशनची स्थापना (१८६२) – बंगालमधील ब्रिटिश इंडियन असोसिएशनच्या धर्तीवर गावोगावी अशा शाखा काढून त्या बाँबे असोसिएशनला जोडाव्या असे त्यांच्या मनात होते. यामुळे लोकमताचा प्रभाव वाढेल व सरकारला बाँबे असोसिएशनच्या मागण्यांचा विचार करणे भाग पडेल अशी त्यांची कल्पना होती. गावातील प्रत्येक जातीतील पाच प्रतिनिधी घेऊन त्या मंडळातर्फे वसई असोसिएशनचा कारभार चालविण्याची तरतूद होती. संस्थेने चर्चा करण्याचे विषय पुढीलप्रमाणे– (अ) शासनपद्धती व दरबारी रीतिरिवाज, (ब) शहरातील व खेड्यांतील लोकस्थिती, (क) शिक्षणाचा प्रसार करण्याचे उपाय, (ड) लोकांच्या चालीरीती व प्रथा.

२. हिंदुस्थानातील पहिल्या सहकारी पतपेढीची स्थापना (१८६२) – वरील असोसिएशनच्या तर्फे वसईस ही पतपेढी त्यांनी सुरू केली. गावातील सधन लोकांकडून प्रत्येकी २५ रुपये याप्रमाणे भांडवल जमा करण्यात आले. स्वतःची पडवी त्यांनी पतपेढीच्या कामासाठी दिली होती. स्थानिक उद्योजकांना धंद्यासाठी भांडवल पुरविणे हा मुख्य हेतू होता. वरील संस्थेबरोबरच ही पतपेढीही बंद पडली. पण सर्व भागधारकांना त्यांचे भांडवल व शिवाय ६·७५ टक्के व्याज देण्यात आले. बडोद्यास १८८९ साली जवळ जवळ याच पद्धतीने स्थापन झालेली अन्योन्य साहाय्यकारी मंडळी ही देशातील पहिली पतपेढी समजण्यात येते हे बरोबर नाही.

३. ठाणा जिल्हा असोसिएशन – (१८६८–१८७०).

ध्येय उद्दिष्टे – " राज्यकारभारावर नजर ठेवणे जरूर आहे असे समजून तशी नजर ठेवण्याच्या उद्देशाने " ही असोसिएशन स्थापन करण्यात आली. " या इलाख्याच्या सरकारचे व मुख्यत्वेकरून या जिल्ह्याच्या कलेक्टराचे अमलाखाली जे एतद्देशीय लोक राहतात, त्यांच्या अनेक गोष्टींची चौकशी करून या देशाची व जिल्ह्याची सुधारणूक करण्यास व त्यातील लोकांची कल्याणवृद्धी करण्यास कोणते उपाय अवश्य आहेत याचा विचार करून ते सरकारास नेहमी कळविणे हा या मंडळींचा मुख्य उद्देश आहे. "

" वरील उद्देशाच्या मंडळ्या इंग्लंडात व कलकत्ता, व मद्रास व मुंबई वगैरे ठिकाणी आहेत व होतील. त्यांच्याशी कारणपरत्वे पत्रव्यवहार राखावा...."

" सांप्रतच्या अडचणी दूर करण्याकरिता व सरकारचे अहितकारक ठराव मना करण्याकरिता व ज्या कायद्यांच्या योगे करून या देशाची कल्याणवृद्धी होईल असे कायदे करण्याकरिता मुंबई सरकारास व इंडिया सरकारास आणि जरुरीप्रमाणे पार्लमेंटास ही मंडळी अर्ज पाठवीत जाईल. "

असोसिएशनने केलेली कामे : (१) म्युनिसिपल कमिट्यांचे सभासद सरकारने न नेमता लोकांनी निवडावे असा ठराव केला. (२) वनखात्याच्या कारभारामुळे लोकांवर होणारा अन्याय निवारण करण्यासाठी जिल्ह्यातून माहिती

जमविली व विश्वनाथ नारायण मंडलिकांच्या मदतीने अर्ज तयार करून सरकारला सादर केला. (३) लाकूडतोडीबाबतच्या नियमांमुळे होणारा अन्याय निवारण करण्यासाठी कोर्टात दावे लावले व जिंकले. (४) सिटी सर्वे बिलाच्या उपद्रवकारक तरतुदींविरुद्ध १८०० लोकांच्या सह्या गोळा करून सरकारात अर्ज केला व कायद्यात दुरुस्ती घडवून आणली. (५) लोकल फंड व स्टँप ॲक्टबद्दल दोन अर्ज तयार करून ते सरकारकडे रवाना करण्यात आले. (६) पनवेलला अँग्लोव्हर्नाक्युलर स्कूल सुरू करण्यासंबंधी शिक्षणखात्याशी पत्रव्यवहार सुरू केला. (७) इतर संघटनांशी संबंध ठेवण्याच्या हेतूने विविध संघटनांना १५१ पत्रे पाठविली. इतरांकडून ८० पत्रे आली. (८) वसई, माहीम (केळवे), पनवेल, कल्याण व पेण व उंबरगाव या ठिकाणी तालुका संघटना सुरू करण्यात आल्या. (९) रेल्वे खात्याने लोकांच्या जमिनी घेतल्यामुळे काहीजण चिडलेले होते. त्यांच्या तक्रारींचे कलेक्टरकडून निवारण करून घेण्यात आले.

ठाणे जिल्हा असोशिएशनमुळे अनेक लोकांचा आर्थिक फायदाही झाला होता. तरी देखील सार्वत्रिक औदासिन्याच्या वृत्तीमुळे सभेला न येणे, वर्गणी न देणे असे प्रकार होऊन ही संस्था सुमारे दोन वर्षे काम करून बंद पडली. या शेवटाबद्दल गोविंद बाबाजी अगदी तटस्थ वृत्तीने लिहितात–

" श्रावण महिन्यातील मुलाच्या (मुलींच्या ?)
मंगळागौरीच्या व्रताच्या मंत्राप्रमाणे
आरड्यो पारड्यो कापूस पारड्यो
गौरी गेली सासऱ्यां आम्ही जातो माहेरी

ठाणे जिल्हा असोसिएशनरूपी गौरीस ठाणेरूपी मोठ्या तलावात बुडवून आम्ही आपल्या निजधामी वसईस निघून गेलो. "

ठाणे जिल्हा असोसिएशनची वैशिष्टये : (१) या संस्थेचे सभासदत्व सामान्यातील सामान्य कुणब्या, माळ्यांनाही मिळण्याची तरतूद होती. (२) सभासद शुल्क अत्यल्प होते, त्यामुळे ही संघटना बाँबे असोशिएशनप्रमाणे श्रीमंतांचीच मिरास बनली नाही. (३) ध्येय उद्दिष्टांत शहरी व ग्रामीण अशा दोन्ही थरांतील लोकांच्या समस्यांचा विचार करण्याची तरतूद होती. (४) संघटनेचे नेतृत्व श्रीमंत, व्यापारी, मान्यवर पुढारी अशांपेक्षा वकील, कारकून अशा मध्यमवर्गीयांकडे होते. एखाद्या लंगोट्या पाटलालाही आपले मत मांडण्याचा अधिकार होता. (५) सरकारला वेळोवेळी अर्ज करणे एवढेच मर्यादित उद्दिष्ट न बाळगता प्रत्यक्ष काम करण्यावर भर होता. प्रसंगी कोर्टात जाण्याची तयारी होती. (६) संघटनेत लोकशाही पद्धतीने नेतृत्व निर्माण करण्याची भरपूर संधी होती. (७) संघटनेची बांधणी सैल स्वरूपाची नव्हती. तालुका व शहर पातळीवरच्या संघटना या स्थायी स्वरूपाच्या व जिल्हा संघटनेशी संलग्न असाव्यात अशी तरतूद होती.

पुढे मागे प्रत्येक जिल्ह्यात एक मुख्य संघटना व तिच्या नियंत्रणाखाली तालुके व शहरात उपशाखा सुरू कराव्यात व या सर्वांचे नियंत्रण प्रांताच्या एका प्रमुख संघटनेकडून व्हावे अशी काहीशी त्यांची कल्पना असावी.

(४) बालविवाह व जातीभेद समस्या : स्वतःच्या दोन्ही मुलींची लग्ने त्या १३ व १४ वर्षांच्या झाल्यानंतर केली (१८८० व १८८४), शिवाय जातीभेद मोडण्याच्या कार्यास स्वतःपासूनच सुरुवात करावी या हेतूने स्वतः कोकणस्थ असून देखील एका मुलीला कऱ्हाडयाच्या व दुसरीला देशस्थाच्या घरात दिली. आणि हे सर्व **इंदुप्रकाश** मध्ये जाहिरात देऊन घडवून आणले.

(५) वसईत स्थानिक पातळीवर केलेले कार्य : (१) वसई नगरपालिका मिळावी म्हणून अर्ज तयार करून गावकऱ्यांच्या सह्या गोळा केल्या (१८६४). स्वतः नगरपालिकेचे ३ वर्षे सभासद होते (१८७३-७६) (२) निर्मळ तीर्थक्षेत्रात चालू असलेला सरकारी अनुदानातील गैरव्यवहार मोडून काढला (१८६४) (३) पोस्टाच्या कचेरीत डिंकाची डबी व डिंक ठेवण्याची सोय केली (१८६८) (४) तरुणांसाठी व्यायामशाळा सुरू केली (१८६९) (५) परदेशी बोट वसईजवळ फुटली असता आपद्ग्रस्तांना साहाय्य केले (१८६९) (६) परदेशातील हिंदी मजुरांवर होणाऱ्या अन्यायाबाबतचे एक टाचण तयार करून रा. सा. मंडलिकांकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविले (१८७०) (७) वसईत मुलींसाठी शाळा काढली.

(८) इंग्रजी शाळा बंद पडू नये म्हणून खटपट केली (१८७२)

(९) सरकारी दवाखाना मिळविण्याची यशस्वी खटपट केली (१८७२)

(१०) वसईचे कोर्ट इतरत्र हलविले जाऊ नये म्हणून प्रयत्न केला (१८८०)

(११) प्लेगच्या काळात वसईत सार्वजनिक आरोग्यासाठी शहर स्वच्छ ठेवण्यासाठी खटपट केली.

(६) राष्ट्रीय चळवळीतील कार्य : (अ) राष्ट्रीय सभा व तिला जोडून होणाऱ्या सामाजिक परिषदेत सातत्याने उपस्थिती. राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाच्या खर्चासाठी बडोद्यातून पैसे जमवून पाठविले. (ब) रायगडावरील शिवसमाधीच्या दुरुस्तीबाबत लोकजागृतीचे कार्य केले. समाधीच्या संकल्पित योजनेचा आराखडा व त्याच्या खर्चाचा अंदाज तयार केला. या समाधीयोजनेतूनच पुढे शिवजयंत्युत्सवाच्या कल्पनेने आकार घेतला. (क) मुंबई विभाग वगळता इतरत्र शिवराई हे नाणे १८८५ पर्यंत वापरात होते. त्या वर्षी सरकारी आज्ञेवरून ठिकठिकाणच्या मामलेदारानी लोकांकडची ही नाणी काढून घेण्यास सुरुवात केली. ही नाणी वापरातून गेली तर शिवरायांचे एक स्मारक नष्ट होईल असे वाटून ही नाणी परत वापरात यावीत अशी खटपट करण्याबद्दल त्यांनी लोकमान्य टिळकांना व इतर पुणेकरांना कळकळीची विनंती केली. (ड) स्वदेशी व तिच्याशी संबंधित पैसाफंड योजना अंताजी दामोदर काळयांच्या अगोदर त्यांनी सुरू केली (१८७३). पूर्ण विचारांती त्यानी आपल्या

पै-फंडाची योजना व त्यासाठी वापरावयाची, पैशाचा अपहार न करता येण्याजोगी एक पेटीही बनविली होती.

(७) **गोविंद बाबाजींची लेखनसंपदा :** (१) **गेल्या तीस वर्षांपूर्वीचे लोक व त्यांच्या समजुती अथवा माझे प्रवासाची हकिकत (रोजनिशी),** १८९६, हा त्यांचा सर्वांत महत्त्वाचा ग्रंथ आहे. याच ग्रंथात त्यांच्या पूर्वी प्रसिद्ध झालेल्या सात स्वतंत्र पुस्तिकाही संगृहीत करण्यात आल्या आहेत. (२) **ढोरांस देवाचा भयंकर रोग होतो त्याविषयी,** १८७७ (३) **हिंदू लोकांस विनंती,** १८८५-बालविवाहविषयक (४) **रायगड किल्ल्याचे वर्णन,** १८८७ (५) **डायरी** १८८८-मद्रासचे प्रवासवर्णन (६) **थोडासा प्रवास** १८९१-मद्रास, गोवा, कारवारचे प्रवासवर्णन. (७) **लाहोरचा प्रवास,** १८९५ (८) **वृद्धपणी लग्न करण्यापासून अनर्थ व यासबंधाने भारताचे थोडक्यात सार,** १९०१ (९) **पहिल्या बाजीरावाची समाधी** (१०) **दैव नाही** (हस्तलिखित) (११) **कृषिकर्म विचार** [हस्तलिखित]. याशिवाय पुढील तीन छापील पत्रकेही आहेत :

(१) **जातीभेद, बालविवाहाची प्रथा इ. बद्दल आवाहन**वजा पत्र, १८८९

(२) **१८८९ च्या राष्ट्रीय सभेच्या खर्चाच्या संबंधाने**

(३) **पब्लिक लेक्चररचे नेमणुकीचा उपयोग,** १८९३.

अशा प्रकारे गोविंद बाबाजी जोशी म्हणजे विचार व आचार यात मेळ साधणारा, समाजकार्याबरोबरच राष्ट्रीय चळवळीतही सामील होणारा व समाजासाठी आपला देह चंदनाप्रमाणे झिजविणारा सामान्यांतील एक असामान्य पुरुष होता.

■ ■

संदर्भ सूची

१. प्रबंधाचे शीर्षक : Renaissance in Western India : Lokahitavadi (1823-1892), in 2 parts, 1977, मुंबई विद्यापीठ.

२. **लोकहितवादी : नवे संशोधन (दशपत्रे आणि इतर लेख) :** महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ, मुंबई १९७७.

३. विष्णुशास्त्री चिपळूणकर, **निबंधमाला**

४. मुख्यतः ग. त्र्यं. माडखोलकर व श्री. म. माटे.

५. श्री. रा. टिकेकर, श्री. के. क्षीरसागर, गं. बा. सरदार, पु. ग. सहस्रबुद्धे, न. र. फाटक, ना. स. इनामदार इ. चे स्फुट निबंध व पुढील लेखकांचे ग्रंथ : (१) गोवर्धन पारीख, **लोकहितवादी गोपाळराव हरी देशमुख,** मौज, मुंबई १९७१ (२) निर्मलकुमार फडकुले, **लोकहितवादी-काल आणि कर्तृत्व,** कॉंटिनेंटल, पुणे, १९७३ (३) V. T. Kshere, *The Political thought of Lokahitavadi.*

६. नोकरीखेरीजही त्यानी अनेक गावे पाहिली. त्यानी स्वतः अशा ६० गावांची यादी दिली आहे.

■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६२ : १-४, १९८३-८४

सातारा जिल्ह्यातील स्वातंत्र्य-चळवळ

अरुण भोसले
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

' सातारा जिल्ह्यातील स्वातंत्र्य-चळवळीचा इतिहास (इ. १८८५ ते १९४७) ' हा माझा पीएच्. डी. पदवीसाठी इंग्रजीतून लिहिलेला प्रबंध. शिवाजी विद्यापीठाने या प्रबंधासाठी मला फेब्रुवारी १९७९ मध्ये पीएच्. डी. पदवी दिली. इतिहास विषयात शिवाजी विद्यापीठातून सर्वप्रथम डॉक्टरेट मिळविण्याचा मान मला या प्रबंधामुळेच लाभला.

या अभ्यासासाठी, सातारा जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीतील नेते, कार्यकर्ते यांची चरित्रे, आत्मवृत्ते, आठवणी, गौरवग्रंथ, स्मरणिका, महाराष्ट्र शासनाने स्वातंत्र्य चळवळीसंबंधी प्रकाशित केलेले विविध साधनग्रंथ, तत्कालीन स्थानिक व प्रांतिक वृत्तपत्रांच्या फाइली, तत्कालीन पोलीस रेकॉर्ड (गोपनीय), मुंबई राज्याच्या शासनाने स्वातंत्र्य चळवळीच्या अभ्यासासाठी उपयुक्त साधने जमविण्यासाठी १९५३ साली नेमलेल्या महाराष्ट्र उपसमितीने तयार केलेला टंकलिखित अप्रकाशित अहवाल, आणि स्वातंत्र्य-चळवळीतील महत्त्वाचे हयात कार्यकर्ते व चळवळीचे सातारा जिल्ह्यातील अभ्यासक यांच्या मुलाखती, इ. साधनांचा वापर केला आहे.

प्रबंधाची मांडणी करताना त्याची प्रस्तावना, सहा मुख्य प्रकरणे, समारोप, साधनसूची, अशी विभागणी केली आहे. ऐतिहासिक पार्श्वभूमी या पहिल्याच प्रकरणात, लोकांत स्वाभिमान व स्वातंत्र्यप्रेम या भावना जोपासण्यास कारणीभूत झालेल्या सातारा जिल्ह्याच्या ऐतिहासिक परंपरेची चर्चा केली आहे. चतुरसिंगाचे बंड, छत्रपती प्रतापसिंह महाराजांची पदच्युती, सातारा संस्थानचे खालसाकरण, इ. १८५७ चा स्थानिक उठाव, या महत्त्वपूर्ण घटनांची माहिती त्यात आहे. याच प्रकरणाच्या प्रारंभी सातारा जिल्ह्याची भौगोलिक स्थिती वर्णिली आहे. पश्चिमेचा सह्याद्रि व इतर सीमांलगतची एतद्देशीय संस्थाने यामुळे सातारा जिल्ह्याला काहीसा अलगपणा लाभला होता हे त्याचे उल्लेखनीय वैशिष्टय आहे. दुसऱ्या प्रकरणात, जिल्ह्यात राष्ट्रीय जागृती घडवून आणणाऱ्या ऐतिहासिक पार्श्वभूमी, क्रांतिकारकांच्या हालचाली, आर्थिक स्थिती, स्थानिक वृत्तपत्रे व सार्वजनिक सभा यांचे कार्य, इ. घटकांची चर्चा करून इ. १९०७ पर्यंतच्या राष्ट्रीय चळवळीच्या विकासाचा आढावा घेतला

आहे. 'लो. टिळक युग' या तिसऱ्या प्रकरणात, इ. १९२० पर्यंत जिल्हयात टिळक, गोखले व सावरकर यांच्या अनुयायांनी केलेल्या कार्याचा वृत्तांत आहे. सातारा जिल्हयाचे प्रमुख नते कै. दादासाहेब करंदीकर यांचे जीवनकार्य व जिल्हा सभांचा उपक्रम याबाबत उद्बोधक माहिती या प्रकरणात आहे. इ. १९२० च्या सुमारास सत्यशोधक चळवळीचा बालेकिल्ला असलेल्या सातारा जिल्हयातील बहुजनसमाजात राष्ट्रीय जागृती कशी झाली व बहुजनसमाज काँग्रेसच्या झेंड्याखाली स्वातंत्र्य आंदोलनात कसा सहभागी झाला याची चिकित्सा चौथ्या प्रकरणात केली आहे. 'सत्याग्रह युग' या नंतरच्या प्रकरणात, सातारा जिल्हयातील असहकार आंदोलन, फेरवादी–नाफेरवादी, आचार्य जावडेकरांचे गांधीप्रणीत राजकारणातील कार्य, जिल्हयातील जंगल सत्याग्रह व मागासवर्गीयांतील राजकीय जागृती, यांचा समावेश आहे. सहाव्या प्रकरणात सातारा जिल्हयातील 'चले जाव' आंदोलनातील मुख्य टप्पे व प्रतिसरकारची,चळवळ, प्रतिसरकारच्या कार्याची मीमांसा या महत्त्वाच्या गोष्टीसंबंधीचे सविस्तर विवेचन आले आहे.

प्रबंधाच्या शेवटी असणाऱ्या समारोपात, सातारा जिल्ह्यातील स्वातंत्र्य–चळवळीसंबंधीचे संशोधनपर निष्कर्ष सादर केले आहेत. सातारा जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळ ही देशातील राष्ट्रीय चळवळीचे जिल्हा पातळीवरील केवळ प्रतिबिंब नव्हते, तर चळवळीच्या अखिल भारतीय वैशिष्टयांबरोबरच काही स्थानिक वैशिष्टये-ही या चळवळीला होती. हिंदु–मुस्लीम ऐक्य, शेतकऱ्यांतील राष्ट्रीय जागृती, प्राथमिक शिक्षकांतील राजकीय प्रगल्भता आणि क्रांतिकारकांच्या सातत्याने चालणाऱ्या बेडर हालचाली इ. चळवळीचे खास स्थानिक विशेष गुण. सातारा जिल्ह्यातील राष्ट्रीय चळवळ क्रमाक्रमाने वाढत जाऊन तिला 'चले जाव' आंदोलनाच्या काळात लोकचळवळीचे स्वरूप प्राप्त झाले. त्यामुळे तेथे प्रतिसरकारची स्थापना होऊ शकली. अशा प्रकारे प्रतिसरकारची स्थापना ही येथील राष्ट्रीय चळवळीची परमोच्च परिणत अवस्था होय. स्वातंत्र्य चळवळीच्या प्रारंभीच्या काळात येथील चळवळसुद्धा शहरातील मूठभर उच्चभ्रू, सुशिक्षितांपुरती मर्यादित होती. तथापि गांधी युगात येथील राष्ट्रीय चळवळीचा आशय बदलला, तिच्या कक्षा रुंदावल्या व नेतृत्व बदलले. राजकीय आंदोलनाला विधायक कार्यक्रमाची जोड मिळाली. शेतकरी, विद्यार्थी, स्त्रिया, मागासवर्गीय, कामगार इ. विविध घटकांत राष्ट्रीय जागृती होऊन ते जसजसे स्वातंत्र्य चळवळीत सामील झाले तसतशा चळवळीच्या कक्षा रुंदावत गेल्या व पुढे तिला व्यापक जनआंदोलनाचे स्वरूप आले. सुरुवातीला वकील मंडळीकडे चळवळीचे नेतृत्व होते, परंतु गांधीयुगात कायदे मोडण्याची नीती अवलंबल्याबरोबर वकीलगण बाजूला गेले व चळवळीला नवे नेतृत्व सुशिक्षित, पुरोगामी वृत्तीच्या बहुजनसमाजा-तील तरुणांतून लाभले.

'चले जाव'च्या चळवळीची प्रगती चार टप्प्यांतून झाली. उघड चळवळ,

घातपाती कारवाया, गुंडांबरोबर संघर्ष आणि प्रतिसरकारची स्थापना व कार्य हे ते प्रमुख टप्पे. भूमिगत कार्यकर्त्यांनी राजकीय दरोडे घालून चळवळीसाठी पैसा व शस्त्रे मिळविली. प्रतिसरकारने समाजकंटकांना, ब्रिटिशांच्या हस्तकांना शासन केले, गोरगरीब जनतेला न्याय दिला. तसेच दारूबंदी, साक्षरताप्रसार, सूतकताई, ग्रामीण कर्जबाजारीपणा नष्ट करणे, विधवा व निराधार अबलांचे संरक्षण इ. विधायक कार्यक्रम राबविले. ग्रामीण गुंडगिरी मोडून काढली. गांधी विवाह या सोप्या, कमी खर्चिक विवाहपद्धतीचा प्रचार केला. साताऱ्याचे प्रतिसरकार हे ग्रामीण लोकराज्यांच्या (Village Republics) समूहासारखे होते. त्याचे कार्यक्षेत्र ग्रामीण भागातच होते.

सातारा जिल्ह्यातील राष्ट्रीय चळवळ कृष्णेच्या तीरावर जोरात फोफावली. वाई भागातील चळवळीवर पुण्याचा तर दक्षिण सातारा भागावर कोल्हापूरचा प्रभाव दिसून येई. स्वातंत्र्योत्तर काळातील महाराष्ट्राच्या अनेक नेत्यांनी सार्वजनिक कार्याचा श्रीगणेशा या चळवळीतच केला होता असे दिसते. महाराष्ट्राचे तीन मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण, बॅ. बाबासाहेब भोसले, वसंतदादा पाटील, सातारा जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीतच वाढले. सातारा जिल्ह्यातील प्रतिकार चळवळीचे पंचप्राण क्रांतिसिंह नाना पाटील पुढे महाराष्ट्रातील महत्त्वाचे कम्युनिस्ट पुढारी बनले व संयुक्त महाराष्ट्र चळवळीत ते आघाडीवर राहिले.

इ. १९८१ साली Younger Social Scientist Exchange Scheme द्वारा लंडनच्या ब्रिटिश कौन्सिलची फेलोशिप मिळवून मी प्रबंधाच्याच विषयावर अधिक संशोधन करण्यासाठी इंग्लंडला गेलो. इंडिया ऑफिस, ब्रिटिश म्युझियम व स्कूल ऑफ ओरिएन्टल ॲण्ड आफ्रिकन स्टडीज्मधील ग्रंथालये तसेच दप्तरखान्यात उपलब्ध असणारी उपयुक्त कागदपत्रे मी अभ्यासली. लंडनच्या माझ्या वास्तव्यात लंडन युनिव्हर्सिटीचे इतिहासाचे प्राध्यापक डॉ. केनेथ आर्थर बॉलहॅचेट यांनी माझा प्रबंध वाचला व त्याची चांगली प्रशंसा केली. प्रा. बी. एन्. पांडे व सर सी. एच्. फिलिप्स, या भारतीय स्वातंत्र्य–चळवळीच्या अभ्यासकांशी मी चर्चा केली व त्यांचे मार्गदर्शन घेतले. नवीन साधनांच्या अनुरोधाने मी सध्या प्रबंधाचे पुनर्लेखन करीत असून प्रबंध लवकरच ग्रंथरूपाने प्रकाशित होईल.

माझे इतर संशोधन

माझे काही शोधनिबंध व संशोधनपर लेखन मराठी, इंग्रजी नियतकालिकांतून व इतरत्र प्रसिद्ध झाले आहे. त्याचे स्थूल स्वरूप पुढीलप्रमाणे आहे—

(१) कर्मवीर भाऊराव पाटील : जीवन आणि कार्य (संयुक्त लेखन) ('तात्पर्य', मे, १९७८.)

गारगोटी येथे ऑक्टोबर १९७७ मध्ये शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र विभाग,

शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालय, पुणे, व मौनी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या परिसंवादात मी 'Role of Karmaveer Bhaurao Patil in the modernization of Southern Maharashtra' हा शोधनिबंध वाचला.

वरील दोन्ही लेखांत कर्मवीर भाऊराव पाटलांच्या व्यक्तिमत्वातील पुरोगामी प्रेरणा, तत्कालीन समाजस्थितीचे त्यांनी केलेले निदान, सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन म्हणून शिक्षणाचा ग्रामीण भागात त्यांनी केलेला प्रचार, त्यांच्या शैक्षणिक कार्याची वैशिष्ट्ये आणि कर्मवीरांच्या कार्याचे ग्रामीण महाराष्ट्रावर झालेले महत्त्वाचे परिणाम यांची सांगोपांग, विस्तृत चिकित्सा केली आहे.

(२) 'Rise of Peasant Nationalist Movement In Satara District' (Shivaji University Journal, 1978) हा लेख पुढे माझ्या Ph. D. प्रबंधात चौथे प्रकरण म्हणून समाविष्ट करण्यात आला व त्यासंबंधीची माहिती वर आली आहे.

(३) 'Satyashodhak Movement In Maharashtra' हा शोधनिबंध मी अहमदाबाद येथे भरलेल्या I. C. H. R. च्या परिषदेत वाचला. सत्यशोधक समाजाचा उद्‌गम, तत्त्वविचार, चळवळीच्या विकासातील प्रमुख टप्पे व सत्यशोधक चळवळीचा महाराष्ट्रावर झालेला परिणाम, यांची चर्चा या शोधनिबंधात मी केली आहे.

(४) 'क्रांतिसिंह नाना पाटलांचे प्रतिसरकार चळवळीतील कार्य : एक चिकित्सा' (क्रांतिसिंह नाना पाटील, संपादक डॉ. जयसिंगराव पवार, वसुधा प्रकाशन, कोल्हापूर, १९८३)

हा शोधनिबंध क्रांतिसिंह नाना पाटलांच्या स्वातंत्र्य-चळवळीतील समग्र कार्याची मीमांसा करण्यासाठीच लिहिला आहे. नाना पाटलांसंबंधी ज्या ग्रंथात अनेक मान्यवर व्यक्तींनी लेख लिहिले आहेत त्यामध्ये समाविष्ट केलेला माझा लेख म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळात जन्मलेल्या पिढीच्या प्रतिनिधीने पुराव्यांच्या अभ्यासाच्या आधाराने क्रांतिसिंहांच्या स्वातंत्र्य-चळवळीतील कार्याचे केलेले तटस्थ मूल्यमापन आहे.

(५) 'A view on Jungle Satyagrahas in Satara District' (Shivaji University Journal- प्रकाशनासाठी स्वीकृती.)

इ. १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळीत सातारा जिल्ह्यात झालेल्या महत्त्वपूर्ण जंगल सत्याग्रहांची सांगोपांग चर्चा या लेखात केली आहे. दिल्ली विद्यापीठाचे डॉ. सुमित सरकार यांच्या जंगल सत्याग्रहावरील संशोधनामुळे या लेखाला प्रेरणा मिळाली.

■ ■ ■

भाग ४ था : कला-शिल्प

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६२ : १-४, १९८३-८४

महाराष्ट्र : कला व शिल्प

म. श्री. माटे
डेक्कन कॉलेज, पुणे

महाराष्ट्राच्या कलाशिल्पविषयक इतिहासाच्या संशोधनाकडे दृष्टिक्षेप टाकला तर प्रथमच एक विलक्षण गोष्ट जाणवते. ती अशी की, सगळयात प्राचीन असा जो बौद्ध कलेचा कालखंड आहे त्याविषयी आपल्याला सगळयात जास्त माहिती आहे, तर सर्वांत अलीकडचा म्हणजे मराठेशाहीचा कालखंड आहे त्याविषयी सगळयात कमी माहिती आहे. सामान्यपणे इतिहासाच्या अभ्यासकांचा असा अनुभव असतो की कालदृष्टया नजीक असलेल्या घडामोडींविषयी आपल्याला जास्त माहिती असते आणि जसजसे मागे जावे तसतसे आपले ज्ञान कमी होत जाते. महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासाविषयी विचार करताना हा सामान्य नियम खरा आहे असेच दिसते. पण कलेच्या इतिहासाच्या बाबतीत मात्र अनुभव उलटा आहे. खिस्ती शकाच्या आगेमागे सुरू झालेल्या गिरिशिल्पाविषयी आपल्याला भरपूर माहिती आहे. तर अठराव्या शतकातील मराठेशाही शिल्पाबद्दल अगदी अलीकडेपर्यंत फारच थोडी माहिती होती. हे अज्ञान किती गाढ होते हे पाहिले, म्हणजे आश्चर्य वाटते. महाराष्ट्राला स्वतःची अशी कला व शिल्प नव्हतेच असे जाणकार समजले जाणारे लोक म्हणत असत.

असे का व्हावे याची कारणे शोधायला फार लांब जावे लागत नाही. गिरि-शिल्प हा बौद्ध परंपरेचा म्हणजे एका भारतीय परंपरेचा भाग असल्याने सबंध देशभराच्या संशोधकांचे त्याकडे लक्ष गेले. हा शिल्पप्रकार नाविन्यपूर्ण असल्याने संशोधकांना त्याचे स्वाभाविकच जास्त आकर्षण वाटले असावे. तितक्याच महत्त्वाचे आणखी एक कारण म्हणजे एकोणिसाव्या शतकातील मराठी समाजाची विशिष्ट मनोधारणा. महाराष्ट्र देशाला ‘ दगडांच्या देशा ’‘ कणखर देशा ’ अशा विशेषणांनी कवींनी संबोधले. दगडाची उशी करून झोपणारे सैनिक आणि तळहातावर कणसे चोळून खाणारा सेनापती हीच महाराष्ट्राची प्रतिमा उभी करण्यात आली. तीच लोकप्रिय झाली. या समाजाला स्वातंत्र्यलढयासाठी सज्ज करावयाचे होते, तेव्हा त्याला त्याच्या क्षात्रतेजाची, गतकर्तृत्वाची आठवण करून द्यावयाची होती, गत-वैभवाची नव्हे ! या समाजाच्या क्षात्रतेजावरच भर देण्यात आला. त्याच्या

जीवनाला सात्त्विक बाजू होती हे संतवाङ्मयाच्या नित्य परिचयाने सर्वांना मान्यच होते. पण त्याला काही राजस बाजू असू शकेल याचा आम्हाला विसर पडला. किंबहुना पडावा असेच वातावरण निर्माण करण्यात आले. इतिहास-संशोधन हा राष्ट्रकार्याचा, स्वातंत्र्यलढयाचा भाग मानण्यात आला. परिणामी संशोधन एकांगी झाले. यापलीकडे जाऊन महाराष्ट्राच्या आर्थिक आणि सामाजिक इतिहासापर्यंत पोचावयास बराच वेळ जावा लागला. आणि कलेच्या इतिहासापर्यंत जाण्यास याहीपेक्षा अधिक वेळ लागला.

गेल्या पंचवीस वर्षांत आम्ही काय साधले असा प्रश्न कोणी विचारला तर त्याला थोडक्यात पण निश्चयात्मक असे एकच उत्तर देता येते. कलाशिल्पविषयक ज्ञानाची जी खाली डोके वर पाय अशी स्थिती झालेली होती ती आम्ही दुरुस्त केली. अव्वल इंग्रजी, मराठेशाही, सल्तनती असे करीत आम्ही यादवकाळापर्यंत पोचलो. जे अज्ञात होते किंवा अल्पज्ञात होते ते आता ज्ञात झाले आहे. यातील प्रत्येक कालखंडाच्या कलाजीवनाचा आम्हाला पुरेसा परिचय झाला आहे. काय घडले आणि कसे घडले हे साधार आणि सप्रमाण सांगता येईल इतपत आमची प्रगती झाली आहे.

संशोधनाचा मुख्य निष्कर्ष सांगितल्यावर आता कालक्रमानुसार आढावा घ्यावयाचा आहे. साहजिकच आरंभ होतो तो बौद्ध-हिंदू गिरिशिल्पापासून. गिरिशिल्पाचे सर्वेक्षण व अध्ययन आज जवळजवळ शंभर वर्षे तरी होत आहे– क्वचित त्याहून थोडा अधिक काळही असेल. फर्ग्युसन आणि बर्जेस (१८९०) यांनी या प्रकाराचा साकल्याने विचार केला आहे. अशा प्रकारचा हा पहिलाच यत्न असावा. पुढच्या काळात लेखन करणारांनी त्यांचे निष्कर्ष त्यामुळेच बव्हंशी ग्राह्य धरले ते अगदी अलीकडेपर्यंत. बौद्ध शिल्पांची अधिक माहिती झाली, गुप्त शिल्पकलेचे अधिकाधिक अवशेष हाती झाले, नाणी, ताम्रपट, शिलालेख यांमधून तत्कालीन राजे व राजघराणी यांची जास्तीत जास्त माहिती हाती येऊ लागली आणि मग गिरिशिल्पाची नव्याने समीक्षा होणे जरूर आहे हे सर्वच अभ्यासकांना जाणवू लागले.

सगळ्या संशोधकांची नावनिशीवार दखल घेणे शक्य नाही. काही मुख्य संशोधक व मतप्रवाह यांचीच फक्त घेता येईल. संख्येने सगळ्यात जास्त प्रकाशने आहेत ती वर्णनात्मक आणि त्यांचे लेखक हे जाणकार असले तरी पुस्तके मुख्यतः पर्यटकांसाठी लिहिलेली आहेत. दुसरा प्रकार आहे नव्या शोधांचा. सह्याद्रीच्या बरगडयांत अनेक ठिकाणी गुंफा खोदण्यात आल्या, त्या शोधून काढणे हा संशोधनाचा एक भाग आहे. खुद्द अजंठ्याचा समूह सर्वपरिचित आहे अशी समजूत होती, पण तेथेही चारपाच तरी नवी लेणी सापडली आहेत. भारतीय पुरातत्त्व विभागाचे माजी संचालक श्री. म. ना. देशपांडे यांचे या क्षेत्रातील काम लक्षणीय आहे. पितळखोऱ्याच्या लेण्याभोवती त्यांनी केलेले उत्खनन फलदायी ठरले (देशपांडे, १९५९) कोकणा-

तील पन्हाळे–काजी येथील समूहाचे उत्खनन त्यांच्या मार्गदर्शनाने झाले आणि त्यासंबंधी काहीसा त्रोटक वृत्तांत त्यांच्या भाषणाच्या रूपाने विदर्भ संशोधन मंडळाच्या वार्षिकात (१९८१) प्रसिद्ध झाला आहे. या नव्या शोधांमुळे बौद्ध शिल्प व पंथ या दोन्हीविषयी बरीच नवी माहिती मिळाली आहे. दोन उदाहरणे घेता येतील. पितळखोऱ्याच्या लेण्यासमोर प्रचंड आकाराच्या हत्तींची एक रांग कोरलेली आहे. पुढच्या काळातील मंदिरशिल्पांचा अविभाज्य भाग बनलेल्या 'गजथरा'चा उगम या रांगेत मिळतो. पन्हाळे–काजी येथे सापडलेल्या महाचंडरोषणाच्या मूर्ती-वरून या ठिकाणच्या बौद्ध धर्माच्या तांत्रिक पंथाविषयी देडपांडे यांनी महत्त्वाचे निष्कर्ष काढले आहेत.

महाराष्ट्रातील–याला सगळे अभ्यासक पश्चिम भारतातील असे संबोधणे जास्त सोयीचें समजतात-गिरिशिल्पाचा सर्वंकष आढावा घेण्याचे जे काही यत्न झाले आणि निष्कर्ष प्रसिद्ध झाले त्यात सरकार (१९६६), विद्या देहेजिया (१९७२), नाग-राजू (१९८१) आणि त्याही अलीकडचा सुंदर राजन (१९८१) यांचा ग्रंथ हे विशेष उल्लेखनीय होत. गुंफांचा कालक्रम ठरविणे, गिरिशिल्पाचा उगम शोधणे हा या सर्वांचा मुख्य रोख आहे. या सर्वांची विद्वत्ता व चिकित्सकबुद्धी वादातीत असली तरी या क्षेत्रात एक अगदी नवीन विचारधारा आणून सोडण्याचे श्रेय वॉल्टर स्पिंक यांचें आहे. गुंफांची विधाने, सजावटीतील तपशील, रूपके, उपलब्ध शिलालेख व ताम्रपट यांचा संकलित विचार करून पिंक (१९६७) यांनी अजंठ्याच्या महायान गुंफांचा एक नवा कालक्रम आपल्यासमोर ठेवला, एवढेच त्यांच्या संशोधनाचे महत्त्व नाही. गिरिशिल्पाचे तंत्र व भारतीय शिल्पाशी गिरिशिल्पाचे असणारे संबंध यांच्याविषयी नव्याने विचार करण्याची आवश्यकता त्यामुळे स्पष्ट झाली आहे. स्पिंक यांचे सर्व प्रतिपादन येथे सांगणे शक्य नाही. त्यांच्या म्हणण्याचा इत्यर्थ सांगता येईल. वाकाटक नृपती हरिषेण याच्या काळचा अजंठ्याचा शिलालेख हा मुख्य आधार मानून गुंफा क्र. १६–१७ व १–२ या गुंफांचा, म्हणजे अजंठ्याच्या महायान पंथीयांच्या सर्वांत कलापूर्ण गुंफांचा काळ त्यांनी इ. स. ४७५ ते ५०५ असा सांगितला आहे. हा काळ त्याहीपेक्षा कमी असावा असे मत त्यांनी अलीकडे व्याख्यानातून व्यक्त केले आहे. या महायान गुंफांचा काळ यापूर्वीच्या संशोधकांनी दीडशे ते दोनशे वर्षे मानला होता हे बघितले म्हणजे स्पिक यांच्या मताला सर्व-मान्यता मिळणे जड का जात आहे हे ध्यानात येते. स्पिक यांच्या सहकाऱ्यांपैकी अनेकांनी या भागातल्या लेण्यांचा तपशीलाने अभ्यास केला आहे. डेबोरा लेव्हाइन (१९६५) यांनी औरंगाबादच्या लेण्यांची समीक्षा प्रसिद्ध केली आहे. प्रा. ढवळी-कर (१९८२) यांनी वेरूळच्या कैलास लेण्याच्या निर्मितीचा काळ पंधरा वर्षांहून अधिक नसावा असे प्रतिपादन केले आहे. याशिवाय अन्य संशोधकांचेही निबंध वा ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत.

नाशिकच्या सातवाहन गुंफांच्या शिल्पांची समीक्षा ट्रॅबोल्ड (१९६०) यांनी प्रसिद्ध केली आहे. प्रा. पथी यांनी वेरूळच्या लेण्यांचे सर्वांगीण समीक्षण आपल्या नव्या ग्रंथात (१९८०) केले आहे. त्यांची मते सिंपक यांच्याशी पूर्णपणे मिळती-जुळती नाहीत हे ध्यानात ठेवावयास हवे. गुप्तकालीन शिल्पाशी धागेदोरे जुळवून पहाण्यावर नव्या संशोधकांचा मुख्य भर आहे. शक्य तेथे नाणी, शिलालेख यातील माहितीचा आधार त्यांनी घेतलेला आहे. एक गोष्ट मात्र सांगावयास पाहिजे. तपशीलाच्या मागे लागल्याने संपूर्ण वास्तुरूपाचा जो परिणाम होतो त्याकडे आपले दुर्लक्ष होत आहे. दुसरे असे की वास्तूमधील किंवा शिल्पातील रूपे व रूपके ही विशिष्ट क्रमानेच प्रगत होतात हा सर्वसामान्य सिद्धान्त म्हणून ठीक असला तरी तो कितपत ताणावयाचा याचे भान राखले पाहिजे. कारण प्रत्येक प्रगत रूप हे कालानुसार नंतरच यावयास पाहिजे, असा आग्रह धरून चालत नाही. कलाकाराच्या प्रतिभेला व कल्पनाशक्तीला काही वाव ठेवलाच पाहिजे. वास्तुशास्त्रे आणि शिल्पशास्त्रे यांनी वास्तू, मूर्ती आणि चित्रे या तिन्हींचीही सविस्तर चर्चा केली आहे. मात्र गिरिशिल्पाची केलेली दिसत नाही. असे का व्हावे या प्रश्नाचे उत्तर शोधावयास हवे.

अजंठ्याच्या चित्रकलेची सर्वांत तपशीलवार नोंद यझदानी (१९३०-५३) यांच्या ग्रंथात आहे. पुरातत्त्व विभागाचे माजी संचालक घोष (१९६७) यांचा या चित्रकामावरील समीक्षणात्मक असा ग्रंथ उल्लेखनीय आहे. या चित्रकामासंबंधीही काही गोष्टी ध्यानात घ्यावयास हव्यात. अजंठ्याच्या चित्रांच्या गुणवत्तेसंबंधी दुमत असण्याचे कारण नाही. मात्र तत्कालीन चित्रकलेचा हा एकमेव अवशिष्ट नमुना आहे, एकमेव नमुना नाही, या गोष्टींकडे अभ्यासक फारसे लक्ष देत नाहीत. अजंठा गुंफांतील चित्रकाम हे वास्तूंच्या सजावटीच्या परंपरागत अशा मार्गाचाच एक भाग आहे. इमारतींचे सौंदर्य वाढविण्यासाठी प्राचीन काळापासून भारतीय शिल्पकारांनी मूर्तिकला, कोरीव काम आणि चित्रकला यांचा सरसहा उपयोग केलेला आहे. प्राचीन काळातल्या बहुतेक सर्व इमारतींचे बहिरंग आणि अंतरंग रंगकामाने, चित्रकामाने सजविलेले असे. गुंफाशिल्प हे बांधलेल्या वास्तूंचे प्रतिरूप आहे, अनुकरणाने घडविलेले आहे, हा सिद्धान्त सर्वमान्य आहे. वास्तूतील रचना, मूर्तिकाम या बाबतीत जर अनुकरण असेल तर चित्रकामातही असले पाहिजे असे समजणे सयुक्तिक ठरेल. अजंठ्याच्या महायान गुंफातील रंगकाम पाहिले म्हणजे हे सहज ध्यानात येते. असे जर असेल तर या चित्रकलेला ‘ बौद्ध ’ कला म्हणणे कितपत बरोबर होईल याचा विचार अभ्यासकांनी केला पाहिजे.

याशिवाय आणखीही काही प्रश्नांचा उल्लेख करता येईल. गिरिशिल्पाच्या कल्पनेचा उगम आणि आविष्कार महाराष्ट्रात नेमका केव्हा आणि कोठे झाला ? ते स्वयंभू आहे की परभृत ? गिरिशिल्पाचा इतका विकास महाराष्ट्रातच का व्हावा ? ह्या देशीची भूस्तरीय घडण हे याचे एकमेव कारण आहे का ? की आणखी काही

कारणे असू शकतील? पर्यायाने या विशिष्ट शिल्पपरंपरेच्या विकासाच्या श्रेयात अखिल भारतीय अशा बौद्ध कलापरंपरेचा वाटा किती आणि महाराष्ट्रातल्या कला-परंपरेचा किती याची सप्रमाण चर्चा व्हावयास हवी. कारण ही समस्या या एका कालखंडापुरती मर्यादित नाही तर पुढच्या दीड हजार वर्षांत हेच प्रश्न विचारावे लागतात. म्हणून त्या प्रश्नाचे उत्तर शोधण्यास येथूनच प्रारंभ होणे आवश्यक आहे. दुसरे असे की ही समस्या महाराष्ट्रापुरतीच मर्यादित नाही. एकीकडे भारतीय परंपरा आणि दुसरीकडे प्रादेशिक आविष्कार यांचे नेमके स्थान आणि परस्परसंबंध ठरविणे अगत्याचे आहे.

गिरिशिल्पाची परंपरा आठव्या–नवव्या, कदाचित दहाव्या शतकापर्यंत चालू होती. यानंतरचा महाराष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाचा काल म्हणजे यादव राजवटीचा. हा काल समृद्धीचा आणि सांस्कृतिक परिपक्वतेचा समजावयाचा की औदासिन्याचा, स्थितिप्रियतेचा, अवकळेचा समजावयाचा याबद्दल संशोधकांत असणारे मतभेद सर्वश्रुत आहेत. कलाक्षेत्रापुरते बोलावयाचे तर असे वाटते की हा काळ नवनिर्मितीचा, स्फुरणाचा आहे, नकारात्मक मनोवृत्तीचा नाही. यादवकालीन मंदिरशिल्पाची पहिली सविस्तर नोंद कझिन्स (१९३१) यांनी घेतली. कझिन्स यांनी आपले लक्ष बव्हंशी खानदेश, नाशिक आणि काही प्रमाणात नगर जिल्ह्यांवर केंद्रित केले होते. विदर्भ, मराठवाडा आणि बऱ्याच प्रमाणात दक्षिण महाराष्ट्र व कोकण त्यांच्या समीक्षणाच्या कक्षेच्या बाहेर राहिले. कझिन्स यांचा ग्रंथ मुख्यतः वर्णनात्मक आहे. यादवकालीन मंदिरांची सखोल चर्चा त्यात केलेली आढळत नाही. यादवकालीन समाज आणि संस्कृती यांवर प्रसिद्ध झालेल्या दोन ग्रंथांत यादवशिल्पाचा उल्लेख काहीसा आनुषंगिक स्वरूपाचा आहे. हे दोन ग्रंथ म्हणजे ओमप्रकाश वर्मा यांचा ' यादवाज अँड देअर टाइम्स ' (१९७०) आणि मु. ग. पानसे यांचा ' यादवकालीन महाराष्ट्र (१९६३). डॉ. अ. वि. नाईक यांनी ' आर्किऑलॉजी ऑफ द डेक्कन ' (१९४७) या प्रबंधात, कझिन्स यांनी न उल्लेखिलेल्या अनेक मंदिरांचे तपशीलवार वर्णन दिलेले आहे. दुर्दैवाने हा प्रबंध संपूर्ण स्वरूपात प्रसिद्ध होऊ शकलेला नाही. त्यातील मंदिरशिल्पविषयक जो भाग प्रसिद्ध झाला आहे तो उद्बोधक आहे (नाईक, १९४७ आणि १९५१). यादवकालीन वास्तू आणि शिल्प यांचे सूक्ष्म सर्वेक्षण आणि विश्लेषण १९७३ मध्ये वर्मा यांनी प्रसिद्ध केले. त्यानंतर गेल्या दहा–पंधरा वर्षांत तीन प्रबंधांच्या रूपाने या विषयाचे सखोल मंथन झाले काहे. डॉ. प्रभाकर देव, डॉ. गो. ब. देगलूरकर (१९७४) आणि डॉ. सु. र. देशपांडे (१९७७) या तिघांनी यादवकलेच्या चर्चेचा उत्तम पाया घातला आहे.

यादवशैलीची मंदिरे ही फक्त अंबरनाथ–बळसाणे या भागापुरतीच मर्यादित नाहीत. त्याच घाटाची मंदिरे माळव्यात परमार घराण्यांच्या आश्रयाने उभी राहिली. या संबंधाकडे जास्त लक्ष द्यावयास हवे. ही सगळी मंदिरे ' भूमिज ' या उपशैलीची

नागर घाटाची आहेत. तसेच ही मंदिरे नर्मदा-तापी यांच्या खोऱ्यातच आहेत. ह्या भौगोलिक स्थितीकडेही दुर्लक्ष करता यावयाचे नाही. या मंदिरशैलीचे प्रतिबिंब होयसळ आणि आंध्राच्या वायव्य भागातील मंदिरांत कितीतरी दीर्घकाल उमटत राहते याचीही कारणमीमांसा व्हावयास पाहिजे. म्हणजे यादव मंदिरशैलीचे नेमके स्थान आपल्याला सांगता येईल.

यादवांनंतर महाराष्ट्रभर इस्लामी सत्ता पसरली. या काळातील कलाकृतींबाबत महाराष्ट्र म्हणावा तसा समृद्ध नाही. आणि जे आहे त्याची पुरेशी दखल आम्ही घेतलेली नाही. विजापूर किंवा गोवळकोंडा यांच्यासारखे वास्तुशिल्प खुद्द महाराष्ट्रात निर्माण झाले नाही. दौलताबादच्या चांदमिनारासारख्या काही इमारतींची दखल मार्शलसारख्या अभ्यासकांनी घेतलेली आहे (१९२८). अहमदनगरच्या इस्लामी वास्तूंची नोद गॅझेटिअर्समध्ये आहे. डॉ. गद्रे यांनी आपल्या प्रबंधात (१९६९) येथील वास्तुशिल्पाचें वर्णन केले आहे. मात्र अहमदनगरच्या सर्वच इस्लामी वास्तूंचा अभ्यास अधिक तपशिलाने आणि बारकाईने व्हावयास पाहिजे असे मला दौलताबादेच्या वास्तू पाहिल्यावर वाटू लागले आहे. दख्खनमधील इस्लामी वास्तुशिल्पाचे एक समीक्षण मीच स्वतः केले आहे (१९६३). मात्र अजून असे वाटते की निजामशाही वास्तूंचा अधिक अभ्यास जरूर आहे. शेरवानी व जोशी यांनी संपादित केलेल्या दख्खनच्या मध्ययुगीन इतिहासात झेड्. ए. देसाई यानी दख्खनमधील सगळया घराण्यांच्या वास्तुशिल्पाची चर्चा केली आहे (१९७३-७४). या चर्चेमध्ये, शिलालेख आणि कालक्रम यांना जास्त प्राधान्य दिले आहे. ती पुढच्या अभ्यासकांना उपयुक्त ठरेल. मात्र वास्तुरूपाचा साकल्याने विचार करण्याची गरज देसाई यांच्या दृष्टीआड झालेली दिसते. परिणामी इस्लामी शैलीच्या यथार्थ दर्शनात काहीसा उणेपणा येतो.

इस्लामी कालखंडातील याहीपेक्षा लक्षणीय गोष्ट म्हणजे चित्रकला. ' दख्खनी कलम ' या नावाने अहमदनगर, विजापूर, गोवळकोंडा, हैद्राबाद, क्वचित् विजयनगर येथील चित्रकलेची चर्चा या विषयावरील ग्रंथात सापडते. यापैकी सर्वात प्राचीन कलम अहमदनगरचे. या कलमाचा अत्यंत प्रसिद्ध आविष्कार म्हणजे ' तारीफ-इ-हुसेनशाही ' या नावाचे हस्तलिखित. या काव्याच्या ग्रंथातील चौदापैकी बारा चित्रे आज उपलब्ध आहेत. ह्या शैलीचे उगमस्थान इराणी चित्रकलेत शोधावयास हवे. मात्र काही टीकाकारांच्या मताने माळव्यातील चित्रशैलीची काही वैशिष्टये यात आढळतात-याला दाखला देतात तो 'निमतनामा ' या सचित्र हस्तलिखिताचा. 'तारीफ -इ-हुसेनशाही' ग्रंथाचे संपादन प्रा. ग. ह. खरे आणि डॉ. गो. त्र्यं. कुलकर्णी यांनी केले असून तो ग्रंथ लवकरच प्रसिद्ध होईल. अहमदनगरच्या शैलीची काही रागचित्रे दिल्लीच्या राष्ट्रीय संग्रहालयात आहेत. या सर्व संचाची पुन्हा परीक्षा व्हावयास हवी. अहमदनगर जिल्ह्यात अजूनही निजामशाहीच्या काळातली व शैलीची हस्त-

लिखिते व चित्रे उपलब्ध होण्याची शक्यता आहे. अहमदनगर जिल्हा संग्रहालयाने, विशेषतः त्याचे संचालक श्री. सुरेश जोशी यांनी या दिशेने अधिक कसोशीने यत्न केल्यास बरे होईल. ती शोधण्याचे व त्यांचे अध्ययन करण्याचे काम तेच करू शकतील. मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास-विभाग संग्रहालयाचे अधीक्षक डॉ. सतीश देशमुख यांनाही हा उद्देश मनात बाळगून काम करता येईल. विजापूर शैलीची म्हणून जी चित्रे आज प्रसिद्ध आहेत ती पाहिल्यावर अहमदनगरच्या चित्रांशी त्यांचे असणारे साम्य मला जाणवले. साहजिकच वेगळेपणावर भर द्यावयाचा की साम्यस्थळांवर असा प्रश्न पडला. आजचे 'कला-समीक्षक' हे बारीक बारीक भेद आणि उपभेद शोधण्यात धन्यता मानतात. त्यांचे विवेचन अतिशय क्लिष्ट बनते आणि अंती वाचकाच्या पदरात निश्चित व नेमके असे फारसे काही पडत नाही. अर्थात् हे थोडे विषयांतर झाले.

मराठेशाहीतील शिल्प आणि कला यांच्या संशोधनाची समीक्षा करताना प्रस्तुत लेखकाचे नाव अथवा त्याच्या विद्यार्थ्यांची नावे बऱ्याच वेळा येतील. तथापि त्याला काही इलाज नाही. कारण या क्षेत्रात प्रथम काम करण्याची संधी आम्हाला मिळाली. तिचा उपयोगही आम्हाला करून घेता आला. माझ्या किंवा आमच्या पूर्वी या विषयावर संशोधन होण्याची गरज कोणाला भासलीच नव्हती असे नाही. भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकात, चित्रे, सचित्र हस्तलिखिते इत्यादींची नोंद वेळोवेळी येत गेली (परचुरे-कानडे १९८१). पुणे नगरातील जुन्या वास्तूंचे वर्णन करणारे चार खंड 'पुणे नगर संशोधन वृत्त' या नावाने मंडळाने प्रसिद्ध केले (१९४२, १९४३, १९४६ व १९५२). वा. कृ. भावे यांच्या 'शिवराज्य व शिवकाल' (१९५७) आणि 'पेशवेकालीन महाराष्ट्र' (१९३५) या ग्रंथांत शिल्प आणि कला यांच्याविषयी त्यांना कागदोपत्री उपलब्ध झालेली माहिती त्यांनी एकत्र आणली आहे. बडोद्याच्या संग्रहालयाचे बरीच वर्षे अधीक्षक असलेले गोएल्स यांनी मराठी कला-शिल्पाविषयी संशोधन होण्याची गरज प्रतिपादणारा दीर्घ निबंध १९४६ मध्येच प्रसिद्ध केला. आद्रिस बॅनर्जी (१९५८) यांनी नागपूरकर भोसल्यांच्या संग्रही असलेल्या 'शकुंतला' या काव्याच्या हस्तलिखितातील चित्रे प्रसिद्ध केली आणि मराठ्यांचे असे स्वतंत्र कलम असण्याची संभवनीयता बोलून दाखविली. प्रा. खरे यांनी व्यक्तिचित्रांवर काही लेख प्रसिद्ध केले होते (परचुरे-कानडे, १९८१). पण त्यांची त्याहीपेक्षा मोलाची कामगिरी म्हणजे त्यांनी कलाविषयक अभ्यासाचा पाया घातला तो लघुचित्रे आणि सचित्र हस्तलिखिते जमवून. प्रा. खरे यांच्या काही सहकाऱ्यांचा या कामी अवश्य हातभार लागला. तरी खरे यांनी स्वतः जाणीवपूर्वक केलेल्या प्रयत्नांचा विसर पडून चालणार नाही. तथापि त्यांचे आणि त्यांच्या समकालीनांचे मुख्य लक्ष मराठ्यांच्या राजकीय इतिहासावरच केंद्रित झालेले होते हे खरेच.

महाराष्ट्राच्या बाहेर पण मराठी सत्ता जेथे दृढमूल झाली होती अशा प्रदेशातील काही मंदिरे आणि त्यावरील मूर्तिकाम पाहून माझे गुरू प्रा. सांकलिया यांना मराठी कलेच्या अभ्यासाची निकड जाणवली आणि ते काम त्यांनी माझ्याकडे सोपविले. 'मराठा आर्किटेक्चर' हा माझा प्रबंध १९५९ मध्ये प्रसिद्ध झाला. मराठेशाहीतील मंदिरे, प्रासाद, दुर्ग या सर्वांची पाहणी करून मला जाणवलेली शिल्पविषयक वैशिष्टये मी त्यात स्पष्ट केली. याच पाहणीच्या वेळी जाणवलेली आणखी एक गोष्ट म्हणजे या वाड्यांच्या सजावटीसाठी वापरलेले काष्ठशिल्प. लाकडावरचे हे कोरीव काम इतके देखणे आणि वैचित्र्यपूर्ण होते की हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषयच झाला. संधी सापडताच त्याही दिशेला अधिक सर्वेक्षण करून माझे निष्कर्ष मी प्रसिद्ध केले (१९६८). माझा आवाका साधारणपणे पश्चिम महाराष्ट्रापुरता मर्यादित होता. औरंगाबाद, जालना अशा एकदोन ठिकाणांची नोंद असली तरी विदर्भाचे अथवा मराठवाड्याचे सर्वांगीण निरीक्षण मी केले नाही. डॉ. मोरवंचीकर यांनी पैठण येथील मराठेशाहीतील काष्ठशिल्पाचे सर्वेक्षण केले. वास्तूंच्या सजावटीचे दुसरे अंग म्हणजे रंगकाम– भित्तिचित्रे. या विषयाचा अभ्यास माझ्या विद्यार्थिनी डॉ. कमल चव्हाण यांनी केला आहे (१९८२). जास्तीत जास्त माहिती मिळत चालली तशी या विषयासंबंधी, म्हणजे मराठी चित्रकलेसंबंधी अधिक संशोधन होण्याची गरज मला वाटू लागली. पोथ्यांमध्ये काढलेली चित्रे हा एक आकर्षक भाग होता. डेक्कन कॉलेजमधील सहकारी व विद्यार्थिनी डॉ. उषा रानडे (१९८२) यांनी पोथीचित्रांचे अध्ययन केले. विद्यापीठ अनुदान मंडळाने याच शाखेच्या संशोधनासाठी मंजूर केलेल्या अनुदानामुळे गेल्या सात आठ वर्षांत मराठी चित्रकलेचा बराच शोध घेता आला. नाशिक येथे असणाऱ्या काही रागचित्रांसंबंधीचे विवेचनही प्रसिद्ध झाले आहे (माटे व रानडे, १९८२). औरंगाबादच्या मराठवाडा विद्यापीठाला कै. पारसनीस यांचा सर्व चित्रसंग्रह मिळविता आला आणि त्या संग्रहाचे अधीक्षक डॉ. सतीश देशमुख यांनी त्यावर प्रबंध लिहून डॉक्टरेटही मिळविली आहे.

१८६० नंतर ब्रिटिश राज्यकर्त्यांनी अनेक टोलेजंग इमारती उठविल्या. त्यांचा घाट पूर्णपणे पाश्चात्य युरोपीय होता. या वास्तूसंभाराचे साकल्याने अध्ययन डॉ. सौ. समिता गुप्ता यांनी केले आहे (१९८३). त्यांचा प्रबंध अद्याप प्रसिद्ध झालेला नाही.

गेल्या पंचवीस वर्षांत, बौद्धकालापासून ते ब्रिटिश कालापर्यंत निर्माण होत गेलेल्या महाराष्ट्रातील शिल्पविषयक संशोधनाचा हा अत्यंत त्रोटक आढावा झाला.

हा परामर्श संपविण्यापूर्वी याच क्षेत्राशी संबंधित अशा काही संघटना आणि प्रवृत्ती यांच्याविषयी काही सांगणे आवश्यक वाटते. काही वर्षांपूर्वी कै. चिन्मुळगुंद (१९६२) यांनी 'पैठण पेंटिंग्ज' असा एक चित्रसंग्रह प्रसिद्ध केला आणि पैठण

येथे कलानिर्मितीचे एक केंद्र असावे असा निष्कर्ष काढला. पुढे याच प्रकारची चित्रे कोकणात कुडाळजवळचे चित्रकथी तयार करतात असे दिसून आले. ही चित्रे पारंपरिक आहेत आणि लोककलेचे फार उत्तम प्रतिनिधित्व करतात.

'मार्ग' या नियतकालिकाने मराठी कलेवर विशेष अंक (१९८१) काढून फार मोलाची कामगिरी बजावली आहे. मराठी कला कशाला म्हणावे, तिचे गुणविशेष काय ही चर्चा जाणकारांमध्ये दीर्घ काल चालूच राहील. आणि ती शब्दांत वर्णन करण्याऐवजी प्रत्यक्ष पहावयास पाहिजे, म्हणजे त्यातले वेगळेपण जाणवेल. विविध ठिकाणी किंवा ठिकठिकाणच्या संग्रहालयांत प्रत्यक्ष जाऊन या गोष्टी पाहता येतील, पण अशी संधी फारशा अभ्यासकांना मिळत नाही. अशा जिज्ञासूंसाठी मराठी कलेची आणि शिल्पाची विविध अंगे अत्यंत वेधकपणे समोर ठेवण्याचे श्रेय 'मार्ग' नियतकालिकाचे.

यावरूनच आणखी एक अनुभव नमूद करणे आवश्यक वाटते. चित्रकलेचा अभ्यास व्हावयाचा तो चित्रांच्या साहाय्याने. आज चित्रे पहावयाला मिळत नाहीत. कलावस्तूंच्या नोंदणीचा कायदा व्यापक राष्ट्रीय हिताचा असला तरी प्रत्यक्षामध्ये त्याचा परिणाम असा झाला आहे की लोक स्वतःजवळची चित्रे, पोथ्या या गोष्टी दाखविण्यास तयार होत नाहीत. सरकारकडे नोंदविलेली चित्रे व कलावस्तू पुढेमागे सरकार ताब्यात घेईल अशी भीती बहुतेकांना वाटते. ती अनाठायी आहे हे आपल्याला माहीत असले तरी त्या वस्तूंच्या मालकांची कशी खात्री पटवायची हे समजत नाही. त्यामुळे नवीन सामग्री हाती येण्याचे काही काळ तरी बंद राहणार असे वाटते. चित्रे पाहावयास मिळण्याचे दुसरे ठिकाण म्हणजे संग्रहालये. दुर्दैवाने बहुतेक संग्रहालयांमधून चित्रे अभ्यासता येत नाहीत. काही ठिकाणचे संग्रहपाल तर अशा बुद्धीने वागतात की ती चित्रे म्हणजे त्यांचा जणू खाजगी ठेवा आहे. वस्तुतः ती एक सामाजिक ठेव आहे. संग्रहालयांची भूमिका विश्वस्ताची हवी, मालकाची नव्हे. बहुतेक ठिकाणी असेही दिसते की या चित्रांची परीक्षा करून त्यावर टीकाटिप्पणी लिहितील असे समर्थ अभ्यासक संग्रहालयांपाशी नसतात. तरीही आपला संग्रह झाकूनच ठेवण्याची वृत्ती असते. मराठी चित्रकलेच्या शोधात हा एक फार मोठा अडसर आहे. बहुतेक संग्रहालये आज शासकीय मदतीवरच चालतात म्हणून शासनानेच असा आग्रह धरावयास पाहिजे–म्हणजे अट घातली पाहिजे की, मदत घेणारे सर्व संग्रह अभ्यासकांना अभ्यासासाठी उपलब्ध व्हावयास पाहिजेत. येणारा माणूस खरोखरीचा अभ्यासक आहे की नाही याची पाहिजे तर आगाऊ खातरजमा करून घ्यावी. संग्रहालयातील चित्रांची छायाचित्रे घेणे किंवा ती प्रकाशित करणे यासंबंधी नियम असावेत, पाहिजे तर शासनाने अशी नियमावली करावी, पण चित्रसंग्रह हे ज्ञानसाधनेची साधनें आहेत हीच सर्वांची धारणा हवी.

उलटपक्षी, पुष्कळदा असे होते की चांगले चांगले अभ्यासकसुद्धा क्षुल्लक

फायद्यापोटी संग्रहालयांच्या सवलतींचा गैरफायदा घेतात. भारत इतिहास संशोधक मंडळाच्या पदरीही असे अनेक कटु अनुभव आहेत. पण त्याबरोबरच सरळपणें वागणाऱ्या संशोधकांची संख्याही मोठी आहे हे नमूद करावयास हवे. या अनुभवावरून असे वाटते की संग्रहालयांसंबंधी नियमांची आता निकड आहे.

याच्या उलट अनुभवही येतात. 'शिवपुत्र संभाजी' या ग्रंथाच्या लेखिका कै. डॉ. कमल गोखले या त्यांना मिळालेल्या जुन्या कागदपत्रांचे दप्तर तपासत असताना एक जाडजूड घडी त्यांना त्यात आढळली. थोडी उलगडून पाहता त्यावर त्यांना चित्रे दिसली. त्यांनी तो कागद तसाच उचलून माझ्याकडे आणून दिला. सबंध उलगडून, चिकटवून पाहिल्यावर, तो मराठी कलेचा आजमितीला उपलब्ध असलेला सगळ्यांत उद्बोधक नमुना आहे असे मला दिसून आले. हा कागद म्हणजे एक 'पिठोरी–पट' आहे आणि आज तो मंडळाच्या संग्रहालयात अभ्यासकांसाठी उपलब्ध आहे. मंडळाच्या एक चिटणीस डॉ. उषा रानडे यांना काही वर्षांपूर्वी उपलब्ध झालेली पांडवप्रतापाची सचित्र पोथीही त्यांनी मंडळ संग्रहालयास म्हणजेच अभ्यासकांना दिलेली आहे. ही व अशी उदाहरणे यापुढे कितीशी दिसतील हे सांगणे कठीण आहे. तथापि दिसत रहावीत अशी अपेक्षा व्यक्त करणे अनाठायी तरी ठरणार नाही.

भारतीय संस्कृतीच्या विविध अंगांची चर्चा करताना, भारतीय म्हणजे सगळ्यांना समान कोणते आणि प्रादेशिक कोणते याचा विचार अटळ ठरतो. बौद्ध गिरिशिल्पापासून ते मराठी चित्रकलेपर्यंत या दोन घटकांचे परस्पर संबंध अभ्यासकांनी पुन्हा पडताळून पहावयास हवेत. प्रादेशिक वैशिष्ट्ये दिसतात यात आता कसलीही शंका नाही. सबंध देशाचा जो एक वारसा आहे त्याचे प्रधान अंग म्हणजे सौंदर्यविषयक कल्पना. कथावस्तू आणि तंत्र समान वा निराळी असू शकतील. पण सौंदर्याचा साक्षात्कार मात्र सगळ्या भारतीयांना एकाच प्रकारे होतो. महाराष्ट्र याला अपवाद नाही. वैशिष्ट्यपूर्ण असा एक प्रादेशिक आविष्कार असे याचे सगळ्यात सार्थ वर्णन होईल.

■ ■

संदर्भसूची :

Banerjee, A., (1958), " An Illustrated Manuscript of Sakuntala, " *Lalit Kalā*, No. 7, New Delhi.

भावे, वा. कृ. (१९३५), **पेशवेकालीन महाराष्ट्र**, पुणे.

भावे, वा. कृ. (१९५७), **शिवराज्य व शिवकाल**, पुणे.

Chavan, Kamal (1982), *Maratha Murals*, Delhi.

Chinmulgund, C. J., (1962), " Paithan Paintings ", *Times of India Annual*, pp. 67-69, Bombay.

Cousins, H. (1931), *Medieval Temples of the Dakhan*, Calcutta.

Deglurkar, G. B., (1974), *Temple Architecture and Sculpture of Maharashtra*, Nagpur.

Deheja, Vidya, (1972), *Early Buddhist Rock Temples*, London.

Deo, Prabhakar, (A thesis on Yadava art).

Deshpande, M. N., (1959), " Rock cut caves at Pitalkhora in the Deccan ", *Ancient India*, No. 15, p. 66.

देशपांडे, म. ना. (१९८१), " ठाणाला-बौद्ध लेणी-स्थापत्य व कला ", " पन्हाळे काजी : कोकणातील एक तांत्रिक वज्रयान केंद्र ", " पन्हाळे काजी : शैव, गाणपत्य व नाथ संप्रदायांवर नवा प्रकाश ", **विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक**, क्र. २३, पृ. २२७-७८, नागपूर.

Deshpande, S. R., (1977), *Yadav Sculpture*, (Unpublished Ph. D. thesis, Poona University, Pune).

Dhavalikar, M. K., (1982), "Kailas–the stylistic development and chronology," *Bulletin of the Deccan College Research Institute*, Vol. 41, pp. 33-45, Pune.

Fergusson, J. & Burgess, J. (1880), *Cave Temples of India*, London.

Gadre, P. B. (1969), *Cultural Archaeology of Ahmednagar during the Nizamshahi Period*, (Unpublished Ph.D. thesis, Pune).

Ghosh, A., (1967), *Ajanta Murals*, New Delhi.

Goetz, H., (1946), " The Art of the Marathas and its Problems ", *B. C. Law Commemoration Volume*, Part II, pp. 433-444, Pune.

Gupta, Samita, (1983), *Colonial Architecture of Western Deccan* (Unpublished Ph.D. Thesis, Poona University, Pune).

Levine, Deborah B. (1965), " Aurangabad : a stylistic analysis ", *Artibus Asiae*, XXVIII, p. 175.

Marg (1981), ' The Art of the Chhatrapatis ', Vol. 34, No. 2, Bombay.

Marshall, Sir John (1928), " The Monuments of Muslim India, " *Cambridge History of India*, Vol. 3.

Mate, M. S., (1959), *Maratha Architecture*, Pune.

(1963), " Islamic Architecture of the Deccan ", *BDCRI*, 22, Pune.

(1968), *Deccan Woodwork*, Pune.

Mate, M. S. & Ranade U., (1982), *Nasik Ragamala*, Pune.

Nagaraju, S., (1981), *Buddhist Architecture of Western India.*

Naik, A. V., (1947), *Archaeology of Deccan*, (Unpublished Ph. D. thesis).

Naik, A.V.,(1947), " Structural Architecture of the Deccan," *New Indian Antiquary*, Vol. IX, No. 7–12, pp. 187–329, Bombay.

Naik, A. V., (1951), " Bhuleshvar temple at Yavat ", *BDCRI*, IV, pp. 83–119.

पानसे, मु. ग., (१९६३), **यादवकालीन महाराष्ट्र**, पुणे.

परचुरे, चिं. ना. आणि कानडे, मु. श्री., (१९८१), **भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, प्रकाशित लेख, साधने इ. सूची**, पुणे.

Pathy, T. V., (1980), *Elura, Art Culture*, Delhi.

पुणे नगर संशोधन वृत्त खंड, १९४२, १९४३, १९४६, १९५२, **भा. इ. सं. मं. त्रैमासिक**, पुणे.

Ranade, Usha (1982), *Manuscript illustrations of the Medieval Deccan*, New Delhi.

Sarkar, H. (1966), *Studies in Early Buddhist Architecture of India*, Bombay.

Sherwani, H. K. and Joshi P. M. (Ed.) (1973–74), *History of Medieval Deccan*, 2 Vols., Hyderabad.

Sunder Rajan, K. V., (1981), *Cave Temples of the Deccan*, New Delhi.

Spink, W., (1966–67), " Ajanta to Ellora ", *Marg*, XX, 2, Bombay.

Trabold, Jeanne L., (1970–71), " A Chronology of Indian Sculpture : The Satavahana Chronology at Nasik, *Artibus Asiae*, XXXII, p. 49.

Varma, O. P., (1970), *Yadavas and their Times.*
Varma, O. P., (1973), *Survey of Hemadpanti Temples of Maharashtra.*
Yazdani, G., (1930–1953), *Ajanta*, Parts I to IV.

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६२ : १–४, १९८३–८४

पैठण येथील काही ऐतिहासिक वास्तू

रा. श्री. मोरवंचीकर
मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

महाराष्ट्रात पैठणइतके प्राचीन व परिचित शहर दुसरे नाही. अगदी सातवाहनांपासून ते पेशवाईपर्यंत मराठी मनाच्या जडण–घडणीमध्ये पैठणचा वाटा सिंहाचा. सातवाहनांच्या कारकिर्दीपासूनच दक्षिण भारताच्या ऐतिहासिक कालखंडास खऱ्या अर्थाने प्रारंभ होतो. सातवाहनांची राजधानी पैठण होती. त्यामुळे या परिसराच्या ऐतिहासिक वाटचालीमध्ये या शहराचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. सातवाहनांनी या नगरीची कीर्ती आंतरराष्ट्रीय क्षेत्रात फार मोठया प्रमाणात दिगंत केली. सातवाहनांची कारकीर्द पैठण परिसरात चार शतके असल्यामुळे या कालखंडात पैठण सर्व कलांचे केंद्र असून अत्यंत भरभराटलेले नगर होते. या कालात पैठणची लोकसंख्या अफाट असावी असे गुणाढय या समकालीन लेखकाच्या बृहत्कथा कोशातील वर्णनावरून वाटते. प्रतिष्ठान नगरीचे त्याने फारच सुंदर वर्णन केले आहे. तो म्हणतो, " नगरात उत्तुंग राजप्रासाद, भव्य वास्तू, मनोरम पुष्करिणी, मनोहर उद्याने, अनेक मंदिरे व धर्मशाळा होत्या." अर्थात यापैकी आज कांही शिल्लक नाही. कदाचित् ज्या प्राचीन पांढरीच्या टेकडयांवर आजचे पैठण वसले आहे, त्या टेकडयांच्या उदरात हे सारे असण्याची शक्यता आहे. आज पैठणमध्ये केवळ शालिवाहनांच्या राजवाडयाची जागा दाखवितात. ती जागाही एका भव्य मशिदीने व्यापली आहे. या मशिदीच्या आवारात एक छोटीशी विहीर आहे. लोकपरंपरेनुसार ही विहीर पुरातन असून या विहिरीतील पाण्यातच अमृतकुंभ ओतून सातवाहन राजपुत्राने मातीच्या सैनिकांत व हत्ती–घोडयांमध्ये सचेतनत्व निर्माण केले होते. हा अमृतकुंभ सातवाहन राजपुत्राने आपल्या नागपित्याकडून नागघाटावरून आणला होता. सातवाहनांचा राजवाडा व नागघाट फक्त पैठण येथेच दाखविला जातो. म्हणून पैठणच्या ऐतिहासिक वास्तूंमध्ये याची नोंद घेणे अपरिहार्य ठरते.[१]

सातवाहन कालातील वास्तूंची अस्पष्ट कल्पना पैठण येथे इ. स. १९३७ मध्ये झालेल्या छोटेखानी उत्खननावरून येऊ शकते. या वास्तू प्रामुख्याने भाजलेल्या विटांमध्ये बांधल्या असून दोन विटांमध्ये मातीचा थर दिलेला आढळतो. लाकडाचा वापर अपरिहार्य असून छतासाठी लाकूड व कौलांचा वापर केला आहे. विटा मोठया

आकाराच्या (१०" × ५" १/२" × ३/४") (१६" × ८" × ४") आहेत. तसेच कौलारूना लाकडावर लोखंडी खिळ्यांच्या साहाय्याने बसविण्यासाठी एका बाजूस छिद्र ठेवले आहे. पाणी जलद वाहून जाण्यासाठी कौले मुळातच उतरती भाजली आहेत व त्यांच्या एका बाजूस पन्हाळ आहे. प्रस्तुत खोल्या अरुंद असून त्यामधील बोळही अरुंदच आहे.[२] परंतु यावरून गुणाढ्याच्या बृहत्कथा कोशामध्ये वर्णिलेल्या मनोहर वास्तूंची स्पष्ट अशी कल्पना करता येत नाही. यासाठी ज्या क्षेत्रात सातवाहनांचा राजवाडा दाखविला जातो, तेथे उत्खनन केल्यास त्या ऐतिहासिक वास्तूंचे काही अवशेष मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. एकंदरीत पैठण क्षेत्रात प्रासादतुल्य वास्तू निर्माण करणारे सातवाहन हे प्रथम सम्राट होते हे निश्चित.

सातवाहनांनंतर अभीर, वाकाटक, बदामीचे चालुक्य, राष्ट्रकूट, कल्याणीचे चालुक्य आणि यादवांचा पैठणशी निकटचा संबंध आला. बदामीच्या चालुक्यांपैकी दुसरा पुलकेशी अतिशय पराक्रमी होता. त्याने सम्राट हर्षवर्धनाचा पराभव करून नर्मदेपर्यंत आपले साम्राज्य विस्तारित केले. त्याच्या कालखंडातही पैठण अतिशय भरभराटलेले शहर होते, असे समकालीन चिनी प्रवासी ह्यू-एन-त्संग याच्या वर्णनावरून वाटते. त्याने येथील स्तूपांची व अन्य वास्तूंची चर्चा केली आहे,[३] तथापि आज याची साक्ष देणारा एकही स्तूप पैठणात नाही. नंतरच्या राष्ट्रकूट कालात पैठण संपन्न असल्याचे राष्ट्रकुटांच्या भिन्न ताम्रपटांवरून स्पष्ट होते. राष्ट्रकूट सम्राट कृष्ण प्रथम याच्या काळात वेरूळ परिसरातील कैलासाचे मंदिर निर्माण झाले. या कैलास मंदिराच्या निर्मितीसाठी पैठणहून आठशे कारागिरांचे एक पथक निमंत्रित केल्याचे वेरूळ शिवालयमहात्म्यात स्पष्टपणे म्हटले आहे.[४] याच आठशे कारागिरांनी वेरूळच्या कैलास मंदिराच्या निर्मितीमध्ये भाग घेतला किंवा नाही हा मुद्दा वादग्रस्त असला तरी पैठणास कारागिरांची मोठी परंपरा होती हे यावरून स्पष्ट होते. अर्थात अनेक शतके ही नगरी राजधानी असल्यामुळे व व्यापारी दृष्ट्या येथे समृद्धता असल्याने इतिहासाच्या भिन्न कालखंडांत येथे अनेक वास्तू उभारल्या गेल्या असल्यास नवल नाही. त्यामुळे या नगरीस उत्तम कारागिरांची एक परंपरा लाभली होती; व या कारागिरांनी सांचीच्या तोरणापासून ते वेरूळच्या कैलासापर्यंत अनेक उत्कृष्ट वास्तू उभारल्याच्या नोंदी सापडतात.

प्राचीन कालखंडात अशा प्रकारच्या कारागिरांच्या श्रेण्या असत व या श्रेण्या ठिकठिकाणी अशा प्रकारची निर्मिती करत असत. कार्ले येथील शिलालेखावरून या विधानाची सत्यता पटते.[५]

यादवांच्या कालखंडास पैठणच्या वास्तूकलेचा सुवर्णकाळ असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. या संदर्भात पैठणच्या संपन्नतेचे अनेक पुरावे उपलब्ध झाले आहेत. महानुभावांच्या वाङ्मयातून पैठणच्या समृद्धीचे वास्तव दर्शन घडते.

याच कालखंडात पैठणला दक्षिण काशी म्हणून गौरविले आहे. या कालातील शंभराहून अधिक मंदिरांचे वर्णन 'स्थानपोथी' या महानुभाव ग्रंथात आढळते. यांपैकी अनेक मंदिरे प्रशस्त असून त्यांना अनेक चौक होते. ढोरेश्वराचे मंदिर मोठ्यात मोठे असून त्याला तीन चौक होते. ही मंदिरे हेमाडपंती असून शिल्पकलेची ही मोठी केंद्रे होती.[६] तथापि यांच्या छिन्न-भिन्न अवशेषांशिवाय आज पैठणमध्ये काहीच सापडत नाही. कारण ही सारी मंदिरे अल्लाउद्दिन खिलजीच्या व त्यानंतरच्या धाडीत उद्ध्वस्त झाली. फक्त ढोरेश्वराचे मंदिर यातून वाचले असे म्हणतात. आजही हे मंदिर आहे. तथापि त्याच्या वास्तूरचनेत कालौघात आमूलाग्र बदल झाला आणि त्याचे यादवकालीन स्वरूप नष्ट झाले.

यादवकालानंतर पैठणमध्ये इस्लामी राजवट निर्माण झाली. बहामनी व मोगल-कालात पैठणमध्ये अनेक दर्गे व मशिदी निर्माण झाल्या. यांमध्ये जुन्या यादवांच्या कोरीव दगडांचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात आलेला दिसतो. सय्यद सादात दर्गा, मशीद-ए-इस्लाम, मौलाना मशीद आदी वास्तू इस्लामी कलाकृतीचे उत्कृष्ट नमुने आहेत- कालापहाड हा याच कलेची साक्ष देणारा प्रचंड वाडा होय. ऐतिहासिक दृष्ट्या या वाड्याची जपणूक न झाल्याने त्याचे रूपांतर खाजगी मालमत्तेत झाले व त्याचे वास्तुसौंदर्य पार धुळीला मिळाले.

यानंतर मराठा-कालखंड सुरू होतो. मराठ्यांच्या उदयामध्ये पैठणचा वाटा फार मोठा आहे. छत्रपतींच्या कालखंडामध्ये या क्षेत्रातील पैठणच प्रमुख धर्मपीठ असल्यामुळे छत्रपतींना पैठणला भेट द्यावी असे वाटत असल्यास नवल नाही. म्हणून जालन्याची लूट करून जाताना सन १६७९ मध्ये छत्रपतींनी पैठणला भेट दिली.[७] नंतरच्या दोन्ही छत्रपतींनी म्हणजे संभाजी व राजारामांनी पैठणला भटी दिल्या.

छत्रपतींना पैठणचे आकर्षण असण्याचे मुख्य कारण म्हणजे भोसले कुळाची एक शाखा पैठणजवळील मुंगी येथे स्थायिक झाली होती. तथापि या भोसले कुळाचा पुढील इतिहास समजू शकत नाही.

पेशवाईत पैठणचा आर्थिक विकास फारच मोठ्या प्रमाणात झाला. पैठण एक धर्मक्षेत्र म्हणून पेशव्यांना जितके प्रिय होते त्याहून अधिक ते एक व्यापारी केन्द्र म्हणून प्रिय होते. पैठण येथील तलम वस्त्रे, पैठण्या, पागोटी व रुमाल यांचे पेशव्यांना फारच आकर्षण होते. त्यामुळे पेशव्यांनी पैठणच्या व्यापाराकडे जातीने लक्ष दिल्याचे जाणवते. पैठणची समृद्धी या कालखंडात शिगेस पोहोचली असल्याने पैठणवर वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी पेशवे व निजाम यांच्यामध्ये नित्य संघर्ष झाल्याचे आढळते. पेशवे कागदपत्रांतून या संदर्भात अनेक नोंदी सापडतात.[८] पानिपतच्या पराभवानंतर नानासाहेब पेशव्यांचा पैठण येथील श्रीमंत व्यापारी वाखरे यांच्या कन्येबरोबर विवाह घडून आला.[९] पेशव्यांना व वऱ्हाडी मंडळींना लग्नसमारंभात उतरता यावे म्हणून वाखऱ्यांनी एक तीन चौकी वाडा बांधला होता असे सांगतात. आजही हा वाडा

उत्तम स्थितीत असून यामधील काष्ठावरील कोरीव काम साऱ्या महाराष्ट्रातील काष्ठकामाहून सरस आहे.[१०]

यानंतर माधवराव पेशवे यांचा पैठणशी असाच जवळून संबंध आला. माधवरावांना पैठणी साडी, पागोटे, धोतरजोडे व रुमाल, छीट यांची विलक्षण ओढ. पेशवे दप्तरात या विधानास पुष्टी देणारी अनेक पत्रे आहेत. एका पत्रात तर पेशव्यांनी आपणास काठावर ज्या प्रकारची नक्षी हवी होती ती नक्षीच काढून दाखविली आहे.[११] १७६३ च्या राक्षसभुवनच्या युद्धावरून परतत असताना त्यांनी पैठणला मुक्काम केला होता. पेशव्यांना पैठणला निमंत्रित करण्यात लद्दू सावकार प्रमुख होते. पेशव्यांनी लद्दू सावकाराचे घरी येण्याचे मान्य केले होते. त्यामुळे लद्दूनी आपली वास्तू शृंगारिली. वाड्यास आतून कस्तुरीचा गिलावा केल्याचे सांगतात. लद्दूंनी पेशव्यांचे भव्य स्वागत केले. त्यांना पुष्कळसे द्रव्य दिले. परंतु नंतरच्या काळात लद्दूंचा वंश खुंटित झाला. तेव्हा गावातील लोकांनी कस्तुरीचा गिलावा सारा खरडून नेला. त्यामुळे भिन्तीवरील चित्रे व इतर नक्षीकामही नष्ट झाले. ही वास्तू आज भग्न अवस्थेत पैठणच्या इतिहासप्रसिद्ध नागघाटावर उभी आहे. वास्तुकलेचा एक उत्कृष्ट नमूना म्हणून ही वास्तू अतिशय महत्त्वाची आहे. नंतरच्या काळात यातील लाकूड पळवून नेण्यात आले असले तरी ३५ फूट उंचीच्या भिंती विनाआधार अगदी ताठपणे अजूनही उभ्या आहेत.

माधवरावांच्या कारकिर्दीतच रघुनाथरावाने पैठण लुटले.[१२] या प्रकाराबद्दल पेशव्यांनी रघुनाथरावांची बरीच कानउघाडणी केली. यानंतर नारायणरावांनी पैठण येथील सिद्धेश्वर मंदिराचे जीर्णोद्धारास येथील भाकऱ्यांना मोठे इनाम दिल्याची नोंद आहे.

यानंतरच्या बारभाई कारस्थानाच्या कालखंडात शिंदे, होळकर, नागपूरकर भोसले आदी सरदारांनी पैठणला अनेक संदर्भात भेटी दिल्याचे पुरावे समकालीन कागदपत्रांतून आढळतात. खर्ड्याच्या युद्धापूर्वी निजामाने पैठणवर वर्चस्व प्रस्थापित केले असावे, कारण खर्ड्यातील तहानुसार पैठण पुन्हा पेशव्याकडे देण्यात आले.[१३] यानंतर पैठणवरील पेशव्याचे वर्चस्व अल्पावधीत नष्ट झाले. १९ व्या शतकाच्या आरंभी या परिसरात पेंढाऱ्यांचे प्राबल्य होते. निजामाने इंग्रजांच्या मदतीने पेंढाऱ्यांचा बंदोबस्त करून स्वतःचे वर्चस्व तेथे प्रस्थापित केले. ते १९४८ पर्यंत कायम होते.

एकंदरीत पेशव्यांचे पैठणशी फार निकटवर्ती संबंध होते. पेशव्यांनी पैठणच्या व्यापाराकडे व उद्योगधंद्यांकडे विशेष लक्ष दिले. त्यामुळे पैठणची पैठणी, पागोटे, रुमाल, धोतरजोडे, तलम व रेशमी कापड व छीट आदी वस्त्रोत्पादन यात विलक्षण वाढ झाली. परिणामी पैठण येथे व्यापाऱ्यांचा व सावकारांचा एक नवा वर्ग उदयास आला. यामध्ये वानवळे, वाखरे, लद्दू, भाकरे, बसवदे, गोधे, थोरात, हलकारे, लिमबोळकर आदी सावकार प्रमुख होते.[१४] तसेच समदाणी, मटार, अलाकुली व

बाऊस आदि मुस्लिम सावकारांचा व व्यापाऱ्यांचा यांमध्ये समावेश होता. खेदाची बाब म्हणजे यांपैकी एकाही सावकाराचे वंशज आज पैठणमध्ये नाहीत.

या सावकारांनी वेळप्रसंगी पेशव्यांनाही कर्जाऊ रकमा दिल्या आहेत.[१५] या सर्व सावकारांनी आपल्या इतमामास साजेशा, अनेक चौकी प्रचंड वास्तू बांधल्या. त्यांचे वंशज शिल्लक नसले तरी त्यांनी बांधलेल्या काही वास्तू आजही सुस्थितीत आहेत. आणि त्या वास्तूंमधून स्थापत्यशास्त्राचा व वास्तुकलेचा पुरेपूर विकास झालेला दिसतो. तथापि संशोधकांचे याकडे फारसे लक्ष अद्याप गेल्याचे दिसत नाही.

या वास्तूंबरोबरच पैठण येथे प्रचंड मठ व मंदिरांची निर्मिती झाली. या मठांमध्ये व मंदिरांमध्ये काष्ठशिल्पांचा प्रामुख्याने वापर केलेला आहे. हे प्रचंड मठ उभारण्याचे मुख्य कारण म्हणजे येथील संत–महंतांचे मराठा–मंडळावर असलेले आध्यात्मिक वर्चस्व होय. त्यामध्ये संत शिवदिननाथ व अमृतरायजी यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. शिंदे, होळकर, भोसले, गायकवाड आदि सरदार शिवदिननाथांचे भक्त व चाहते होते. त्यामुळे त्यांनी यांना फार मोठ्या प्रमाणात देणग्या दिल्या आणि यामधूनच या संस्थानाचे प्रचंड मठ व राहते वाडे उभारले गेले.[१६] यामध्ये एकनाथ संस्थानच्या वास्तूंचाही समावेश करावा लागेल. एकनाथांच्या सहाव्या पिढीतील छय्याबुवाने आपल्या गायकीच्या बळावर पेशवे सरकारातून जहागीर मिळविली. त्यानंतर पुढील पिढीतही काही गायनाचार्य निर्माण झाले व त्यांनीही अशाच प्रकारच्या छोट्या–मोठ्या जहागिरी मिळविल्या व स्वतःच्या वास्तू उभारल्या. या धार्मिक वास्तूंमध्ये एकनाथांची समाधी (गावाबाहेर असणारी), नाथांचा राहता वाडा आहे. यानंतर शिवदिनकेसरी मठ, धोंडीनाथ मठ, अमृतरायजीचा मठ आदि वास्तू आजही त्यांच्यामधील काष्ठशिल्पासाठी प्रसिद्ध आहेत.[१७]

याच कालखंडात मागे सांगितलेल्या मुस्लिम सावकारांनी आपल्या वास्तू व प्रचंड मशिदी उभारल्या. कारण त्यांच्या वस्त्रोद्योगातील उत्पादनाला म्हणजेच हिमरू, मशरू आणि किनखाब आदी उत्पादनास मुस्लिम जगतात प्रचंड मागणी होती.

पैठणमध्ये पैठणीचे व जरतारी रुमालांचे प्रामुख्याने उत्पादन होत असल्यामुळे जर-निर्मितीमध्ये निष्णात असणाऱ्या गुजराती कलाकारांचा एक वर्ग सुरत व बऱ्हाणपूर येथून स्थलांतरित होऊन पैठण येथे स्थिरावला होता. आता या वर्गाकडे बरीचशी संपत्ती जमा झालेली असून त्यांना गुजराती सावकार असे म्हणत होते. त्यांनी आपल्या परंपरेप्रमाणे वास्तू उभारल्या. या वास्तूंमध्ये गुजराती शैलीचे लाकडी कोरीव काम आपणास आढळते. अस्तित्वात असणाऱ्या वास्तूंवरून जाणवते की, अशा प्रकारचे नाजूक कोरीव काम करणाऱ्या गुजराती (राजस्तानी) कारागिरांचा एक मोठा वर्ग पैठण येथे कायमच्या वास्तव्यास असावा. पैठणच्या पडत्या कालखंडात काम मिळणे कठीण झाले म्हणून हा वर्ग इतरत्र, प्रामुख्याने जालना व

नाशिक येथे स्थलांतरित झाला. पेंढाऱ्यांच्या छळाला कंटाळून काही सावकार (विशेषतः ब्राह्मण सावकार) नाशिकला स्थलांतरित झाले. म्हणून आपणास जालना व नाशिक येथे पैठणच्या धर्तीवर लाकडी काम पहावयास मिळते. या पार्श्वभूमीवर आपण पैठण येथील आज उभ्या असणाऱ्या वास्तूंचा स्थापत्य व वास्तुकलेच्या दृष्टिकोनातून विचार करू या.

सध्याच्या युगात वास्तूमध्ये लाकडाचा कमीतकमी वापर करण्याची प्रवृत्ती निर्माण झाली आहे. त्यामुळे अशा प्रकारचे लाकडी कोरीव काम पुन्हा होणार नाही व जे उभे आहे ते लवकरच आडवे होण्याच्या व नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. करिता त्यांची नोंद होणे व ओळखी करून देणे हा अशा प्रकारच्या अभ्यासामागील हेतू आहे. यापूर्वी या काष्ठ-शिल्पाच्या क्षेत्रात अत्यल्प प्रमाणात संशोधन झाले आहे. डॉ. माटे यांनी दक्षिणेतील लाकडी कामाचा आढावा घेण्याचा स्तुत्य उपक्रम केला आहे.[१८] तथापि त्यांच्या संशोधनावर काही मर्यादा असल्याने त्यांना पैठणसारख्या ठिकाणाकडे जाता आले नसावे असे वाटते. अन्यथा इतक्या अप्रतिम दर्जाची कारागिरी त्यांनी दुर्लक्षिली नसती. याशिवाय संबंधित जिल्ह्यांची गॅझेटिअर्स तयार होत असताना त्या त्या भागातील वास्तु वैशिष्ट्यांची माहिती देण्यात आली आहे. तथापि त्यामध्ये औरंगाबाद जिल्हा गॅझेटिअरमध्ये पैठणच्या या अशा कामाचा केवळ निर्देशही करण्यात आला नाही. या सर्वांना अपवाद म्हणजे बर्जेसने पुरातत्त्वाच्या तिसऱ्या खंडात पैठणच्या या कामाचा ओझरता उल्लेख केला आहे. शिवाय तेथील कोरीव कामाचे काही ठसेही दिलेले आहेत.

पैठणच्या वास्तुकलेचा विकास

पेशवाईच्या उत्तरार्धात पैठण येथे अनेक भव्य वास्तू, मठ व मंदिरे उभारली गेली. ही सर्व निर्मिती मराठा-वास्तू प्रकारात मोडत असली तरी त्या निर्मितीच्या मागील प्रेरणांचा आपण यापूर्वीच मागोवा घेतला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने राजस्तानी शैली (हीच गुजराथी शैली असाही उल्लेख करण्यात येतो.), मुघल शैली किंवा दिल्ली शैली, मराठा शैली व दक्षिण शैली यांचा प्रामुख्याने समावेश झालेला आढळतो. पैठणच्या वास्तुकलेत या सर्व शैलींची पृथगात्मता नष्ट होऊन एका नव्या पैठणी शैलीचा उदय झाल्याचे आढळते.[१९]

याच कालात पुणे, सातारा, श्रीगोंदा, पिंपळनेर, नंदुरबार, कायगाव टोके, अहमदनगर, औरंगाबाद, जालना आदी ठिकाणी अशा प्रकारच्या वास्तू उभारल्या गेल्या. या ठिकाणच्या वास्तूंमध्ये काष्ठशिल्पाचा मोठ्या प्रमाणावर आविष्कार झालेला दिसतो. तथापि वास्तूंच्या निर्मितीमधील सर्व घटकांचा म्हणजेच दगड, विटा, चुना व लाकूड यांचा प्रमाणबद्ध व कलात्मक असा वापर क्वचितच झालेला आढळतो. तथापि पैठण येथे हा संगम फारच शास्त्रशुद्ध व जिवंत पद्धतीने करण्यात

आल्याचे आढळते. प्रस्तुत लेखकाने यावर छोटीशी प्रबंधिका तयार केली आहे. त्यावरून पैठण येथील वास्तुकलेची काहीं वैशिष्टये पुढीलप्रमाणे आढळतात :

१. पैठणी वाडे

इतरत्र आढळणाऱ्या मराठा कालातील वाड्यांप्रमाणेच पैठणी वाडे मध्यवर्ती चौकाभोवती उभारण्यात आले आहेत. तथापि इतरत्र ज्याप्रमाणे मध्यभागी प्रवेशद्वार असून ते चौकात उघडते व त्याच्या बाहेरच्या अंगास देवड्या असतात तसे पैठणला कोठेच आढळत नाही. पैठण प्रकारातील प्रवेशद्वार शक्यतो रस्त्याशी समान्तर असणाऱ्या दर्शनी भिंतीच्या एका कोपऱ्यात असते व प्रवेशद्वारासमोर एक प्रशस्त अशी बोळ (झाकलेली) आढळते. या बोळीच्या दोन्ही अंगांस दोन तरंगत्या लाकडी खोल्या असतात. या खोल्यांत जाण्यासाठी चौकाच्या दोन्ही बाजूंस असणाऱ्या कचेरीमधून (किंवा दुकानातून) छोटेखानी दरवाजे असतात. या खोल्या साधारणतः ४–६ फूट उंच व १०×१० फूट अशा असतात. यांमध्ये प्रामुख्याने रेशीम व जर ठेवण्यात येत असे तसेच तयार मालही ठेवण्यात येत असे. जागेचा अशा प्रकारे उपभोग घेणारे पैठणचे कलाकार श्रेष्ठच मानावे लागतील.

प्रवेशद्वाराची चौकट लाकडी असून ती दगडी बांधकामात बसविलेली असते. हे सारे दगडी काम उठावात केलेले असून पायापासून ते इमारतीच्या उंचीपर्यंत हा क्षेप कायम ठेवण्यात आलेला आढळतो. दगड चौकोनी असून अत्यंत सुबकपणे घडविलेले आहेत. ही घडणी होत असतानाच दोन प्रकारचे टाके घालून चौकोनात चौकोन घडविण्याचा प्रघात होता. अशा प्रकारच्या घडणीमुळे दगडाला एक प्रकारची भव्यता प्राप्त होत होती. चौकटीवरील अनेक ललाटबिम्बे हे पैठणी बांधकामाचे खास वैशिष्टय होय. यामध्ये प्रथमतः दोन लाकडी बिम्बे असतात. त्यांपैकी एकीवर गणेश व दुसरीवर भौमितिक आकृती किंवा कमळ हलक्या उठावात कोरलेले आढळते व त्यावरील दगडपट्ट्यांवरही एकीवर वेलबुट्टी व दुसरीवर कमळ काढलेले असते.

यानंतर काही अंतरावर एक अति सुंदर अशी दर्शनी खिडकी बसविण्यात आलेली आढळते. केवळ दुसऱ्या मजल्यावरून या खिडकीत जाता येते. हेच ते झरोका दर्शन होय. या गवाक्षातून प्रवेशद्वारात आलेल्या व्यक्तीचे निरीक्षण करणे सोपे होते. विशेषतः रात्रीच्या वेळी प्रवेश द्यावयाचा किंवा नाही हे ठरविण्यास याची मदत होत असे.

दर्शनी भिंतीत असणारी ही दर्शनी खिडकी अतिशय देखणी असते. रंगीत विटांच्या एका चौकटीत या खिडकीची नाजूक चौकट बसविण्यात आलेली आढळते. या खिडकीची चौकट लहानशा सुरूदार खांबाची असून त्यामध्ये नाजूक कमान बसविलेली असते. या कमानीच्या दोन्ही कोपऱ्यांत कमळ किंवा उगवता सूर्य कोर-

ण्यात आलेला आढळतो. कमानीच्या खालच्या टोकास मोर, पोपट किंवा द्राक्षांचा घोस कोरण्यात येत असे. खिडकीच्या दरवाज्याच्या फळ्या छोट्या पण नाजूक असतात. खिडकीतून तोल जाऊन पडण्याची शक्यता असल्यामुळे छोट्या सुरूदार खांबाच्या पायथ्याशी एक चौकोनी फळी बसविलेली असते. या फळीच्या दर्शनी मध्यभागी कमळ किंवा पोपट कोरलेला असतो. तसेच क्वचित् प्रसंगी मुलामा दिलेल्या कमी उंचीच्या लाकडी किंवा धातूच्या सळ्या बसविलेल्या असतात. अशा प्रकारची देखणी खिडकी इतरत्र क्वचितच पहावयास मिळते.

या भिंतीच्या वरील भागास अतिशय देखणे असे विटांचे तोरण बसविलेले असते. यामध्ये पाने, वेलबुट्टी, चंद्र, सूर्य, कमळ, मोर किंवा अन्य भौमितिक नक्षी काळ्या भाजलेल्या विटांच्या साहाय्याने बसविण्यात आलेली असते. अशा प्रकारची विटांची तोरणे हे पैठणी वास्तुकलेचे खास वैशिष्टय मानावे लागेल. कारण अशा प्रकारची नक्षी एका विटेवर कोरलेली नसून ती अनेक छोट्या छोट्या विटांच्या मदतीने बनविण्यात आलेली असते. त्यासाठी विटा भाजण्यापूर्वीच त्यावर आवश्यक ती नक्षी काढून त्यांची जागाही निश्चित केलेली आढळते. हे संपूर्ण तोरण उठावात बसविण्यात येत असे.

हे सारे वाडे चौकोनी असून अत्यंत टोलेजंग आहेत. त्यामुळे दुरून चौकोनी ठोकळ्यासारखे भासतात. हे वाडे सावकारांचे असल्याने संरक्षण हा यामागील प्रमुख हेतू असावा. त्यामुळे बाहेरील भिंती अतिशय मजबूत आहेत. पैठण हे शहर नदी-काठी असल्याने या प्रचंड वाड्यांना आवश्यक असणारा खडकाळ पाया तेथे कोठेच मिळत नाही. यासाठी खूप खोल पाया घेण्यात आला आहे. त्यामुळे प्रत्येक वाड्याला तळघर असतेच. तळघर दगडात व चुन्यात पक्के बांधण्यात आलेले असून त्याचा प्रामुख्याने धान्य साठविण्यासाठी उपयोग केला जात असे. या तळघरात जाण्यासाठी मध्यवर्ती चौकातून एखादा छोटासा दरवाजा बसविण्यात आलेला असतो. याशिवाय तळघरात प्रकाश व हवा येण्यासाठी चौकातूनच (त्यात दगडी जाळी बसवून) सोय करण्यात येते. त्यासाठी "जोते" थोडे उचलावे लागते. उचललेले "जोते" व त्याखाली तळघर हे पैठणी बांधकामाचे आणखी वैशिष्टय होय. अशा प्रकारच्या तळघरात काही ठिकाणी पैठणीचे माग बसविण्यात आल्याचे आढळते. म्हणजेच जागेच्या वापराबाबत ही मंडळी किती जागरूक होती हे स्पष्ट होते.

दर्शनी भिंती साधारणतः तीन ते साडेतीन फूट रुंद असत. यामधूनच अनेक प्रकारचे अरुंद व अंधारी जिने गेलेले आढळतात. भिंती विटात व चुन्यात बांधलेल्या आहेत. बांधण्यापूर्वी विटा घासून घासून अतिशय गुळगुळीत करण्यात येत असत व दोन विटांमध्ये अतिशय पातळ थर दिलेला आढळतो. वाड्याचे कोपरे वर्तुळाकृती आहेत. वर्तुळाकृती कोपरा हे पैठणचे आणखी एक वैशिष्टय. घरे अनेक मजली असून प्रत्येक मजल्याची सुरुवात दर्शनी भागात काळ्या विटांचा एक थर देऊन

सूचित केली आहे. प्रत्येक वर्तुळाकृती कोपऱ्याच्या वरील भागात दर्शनी बाजूवर विटांच्या साहाय्याने एक सुबक परंतु छोटेखानी कोनाडा बसविलेला आढळतो. हा कोनाडा हत्तीच्या अंबारीची प्रतिकृति असून केवळ पोपटांच्यासाठी ही सारी व्यवस्था केलेली आढळते. या कोनाड्यांमध्ये विटांचे सुरूदार खांब व सुबक छत असते. भिंतीत विटांची पन्हाळी ठेवून छपरावरील पावसाचे पाणी बाहेर काढण्याची व्यवस्था केली आहे. ही पन्हाळी विटांची असून पन्हाळ्यांना आधार विटांपासून बनविलेल्या मोर किंवा पोपट यांच्या आकृतीचे दिलेले असतात. ही कल्पना त्यांचा सौंदर्यविषयक दृष्टिकोन स्पष्ट करणारी असून एकमेवाद्वितीय आहे. यावरून पैठणी स्थापत्यातील वीटकामाचे श्रेष्ठत्व तर सिद्ध होतेच शिवाय त्यांची सौंदर्यविषयक कल्पनाही स्पष्ट होण्यास मदत होते. अशा प्रकारचे काम इतरत्र कोठेच आढळत नाही.

हे सारे बांधकाम लाकडी चौकटीभोवती उभारण्यात आल्याचे दिसते. उभे खांब व आडव्या तुळ्या हे या चौकटीचे प्रमुख आधारस्तंभ. खांबांमुळे समान्तर तडा जाण्याचा धोका टाळला जातो तर तुळ्यांमुळे भिंतीत येणाऱ्या उभ्या तडा प्रतिबंधित होतात. त्यामुळे संपूर्ण इमारत तडा–प्रतिबंधित होते. आणि पैठणी कारागिरांनी ही मध्यवर्ती चौकट दगडी व वीटकामात अतिशय सुबक पद्धतीने बसविली आहे. हे दोन्ही घटक प्रामुख्याने वास्तूंचे वजन पेलणारे असल्याने त्यावरील कोरीव काम कमी उठावात केलेले आहे. परंतु येथे त्यांच्या सौंदर्यदृष्टीचा फारच मोठ्या प्रमाणात आविष्कार झालेला दिसतो. काही जोड घटक या चौकटीसोबत जोडलेले दिसतात. या घटकांवरील कोरीव काम हे त्यांच्या सौंदर्याच्या जाणिवेचे प्रगल्भ दर्शन घडवितात. आता आपण पैठण येथील कोरीव कामाच्या ठळक वैशिष्ट्यांचा मागोवा घेऊ या.

प्रवेशद्वार

पैठणी दरवाजे त्यांच्या भक्कमपणासाठी प्रसिद्ध आहेत. दरवाज्यांमध्ये प्रामुख्याने द्वारशाखा, उंबरठा, गणेशपट्टी व फळ्या यांचा समावेश होतो. द्वारशाखा सामान्यपणे दोन पाखी असतात. त्या काही ठिकाणी अतिशय साध्या तर काही ठिकाणी काल्यांचे वेल किंवा वेलबुट्टी यानी सजविलेल्या. ललाटपट्टीवर गणेश, श्रीदेवी भूदेवीसह, दुर्गा किंवा कमळपुष्प असते. खालील पट्टीवर साधे कमळपुष्प असते. दरवाज्याच्या फळ्या सर्वसाधारणपणे २" ते ३" जाडीच्या अखंड असून त्यावर कोणत्याच प्रकारची नक्षी नसते. फक्त माथ्यावर आणि पायथ्याशी असे दोन आडवे बार लोखंडी खिळ्यांनी घट्ट बसविलेले असतात. हे बार बनविताना त्यांच्या कोपरावर अशा पद्धतीने खाचा घेतलेल्या असतात की दोन्ही दारे मिटताच त्या खाचा परस्परात बरोबर बसतात आणि कितीही जोर लावण्याचा प्रयत्न केल्यास त्या उघडत नाहीत. उलट दरवाजा घट्टच बसतो. अशी दारे उघडायची झाल्यास एक पुढे व दुसरे मागे ढकलावे लागते. मगच ते उघडले

जाते. याशिवाय या दारांच्या मागे मोठा आगळ असतो ते वेगळेच. मात्र घराच्या आतील अंगास असणारी दारे अतिशय सुबक पद्धतीने कोरलेली असतात.

स्तंभ

पैठणला तीन प्रकारचे स्तंभ आढळतात. गुजराती, मुघल किंवा दिल्ली व दक्षिणी. पैठणला आढळणारे गुजराती खांब गुजरातमध्ये आढळणाऱ्या खांबांपेक्षा अनेक पटींनी सुबक आहेत. हे खांब मध्यापर्यंत नक्षीविरहित असून मध्यापासून नक्षीस आरंभ होतो. नक्षीमध्ये कमळ, सूर्य, चंद्र, वेलबुट्टी व भौमितिक आकृती यांचा समावेश होतो. यानंतर स्तंभशीर्ष येते. या स्तंभशीर्षावर अतिशय सुन्दर मोर, फुले किंवा भौमितिक आकृती सुबकपणे कोरलेल्या आढळतात. पैठण येथे मोर व पोपट इतक्या कौशल्याने कोरले आहेत की अशा प्रकारचे मोर इतरत्र क्वचितच सापडतील. या स्तंभावरूनही त्यांची सौंदर्यदृष्टी व वास्तूंचा शैली प्रकार ठरविण्यास मदत होते.

यानंतरचा दुसरा प्रकार म्हणजे सुरूदार खांबांचा. सुरूदार खांब प्रामुख्याने दगडी–नक्षीदार तळखाड्यावर बसविलेले असतात. या तळखाड्यावर वेलपत्ती, कमळपुष्प, कमलकलिका किंवा खानाळे असतात. पैठण येथील सुरूदार खांबांची अनेक वैशिष्ट्ये आहेत. यामध्ये कलाकाराने पूर्ण कलश कोरण्यात कमालीचे यश प्राप्त केले आहे. तथापि या खांबांवर औरंगाबादच्या कारागिरीचा मोठा प्रभाव दिसतो. त्यामुळे हे खांब थोडेसे निमुळते आहेत. जाडीपेक्षा उंची अधिक वाटते. दोन सुरूदार खांबांमध्ये सुंदर पर्णांकित कमानी बसविलेल्या आहेत. क्वचित् प्रसंगी सुरूदार खांबांवर देवता व भक्तगण कोरलेले आहेत. असा प्रकार इतरत्र आढळत नाही.

पैठण येथील सुरूदार खांबांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या खांबांच्या स्तंभशीर्षाच्या बाजूचे चारही कोपरे आतल्या अंगास तासून तेथे स्तंभशीर्षास अनुरूप असे कोरीव काम करण्यात आलेले असते. उदा. प्रस्तुतच्या देवता असलेल्या खांबांच्या कोपऱ्यात दोन्ही बाजूंस गरुड कोरण्यात आला असून गरुडावर सर्पछत्र कोरले आहे. हा प्रकार अतिशय दुर्मिळ होय. दुसऱ्या खांबाच्या शीर्षावर वेलपत्ती व कमळ फूल असून, त्याच्या कोपऱ्यात कमळकलिकांची अतिशय सुंदर मालिका कोरण्यात आली असून, तिच्या शीर्षावर पिसारा फुलविलेला अतिशय ढंगदार मोर काढला आहे. मोरांच्या या सजावटीवरून कारागिरांचे भिन्नत्व समजू शकते. कित्येक ठिकाणी स्तंभशीर्ष व स्तंभमूल या दोन्ही ठिकाणी पूर्ण–कलश फारच आकर्षक पद्धतीने कोरण्यात आला आहे.

पैठण येथील स्तंभांचे आणखी वैशिष्ट्य म्हणजे अनेक ठिकाणी हे स्तंभ अतिशय साधे आहेत. ते चौरस अशा साध्या तळखाड्यावर उभारले असून त्यांचे शीर्ष व हस्त अतिशय साधे आहेत. क्वचित् प्रसंगी स्तंभ साधे असून त्यावर दक्षिणी पद्धतीचे शीर्ष कोरलेले आढळते.

काही वाड्यांमध्ये उपरोक्त शैलींचे अतिशय सुंदर असे मीलन झालेले आढळते. तळमजल्यावर गुजराती शैली किंवा दक्षिण शैलीचे स्तंभ असतात, तर दुसऱ्या मजल्यावर दिल्ली शैलीचे सुंदर सुरूदार स्तंभ, कमानी व जाळीचे कोरीव काम असते.

नंतरच्या काळात हे सुरूदार स्तंभ अतिशय नाजूक करण्याकड कारागिरांची प्रवृत्ती झालेली आढळते. यामध्ये स्तंभाची शक्ती कमी झाल्याचे त्यांच्या लक्षात येताच अशा प्रकारच्या खांबाबरोबर आणखी आधारखांब दिलेला आढळतो.

महाराष्ट्रात नाशिक, चांदवड, नंदुरबार, श्रीगोंदा, पिंपळनेर, औरंगाबाद आदी ठिकाणी मुघल किंवा दिल्ली शैलीचे सुरूदार खांब आढळतात. त्यावर अनेक प्रकारचे कोरीव काम केल्याचेही जाणवते. तथापि पैठणसारखे खांब क्वचितच आढळतात. त्याचप्रमाणे राजस्तानी शैलीचे पैठणच्या तोडीचे खांब कोठेच मिळत नाहीत, हे पैठणचे आणखी वैशिष्टय होय. आणि कारागिरांचा हात इतका साफ आहे की शोधूनही त्यामध्ये दोष सापडणार नाही. तसाच प्रकार गुजराती खांबा-वरील स्तंभशीर्षाच्या कोरीव कामाचा. हे कोरीव काम नाजूक व अतिशय गुंतागुंतीचे आहे. यामधील नक्षीकाम इतक्या उठावात असले तरी ते अतिशय सजीव आहे. त्यावरील पक्षी, विशेषतः मोर व पोपट, पाने-फुले व त्यांची सजावट येथील कारा-गिरांचे श्रेष्ठत्व सिद्ध करण्यास पुरेशी आहेत.

कमानी

दोन सुरूदार खांबांस जोडणाऱ्या अणीदार अथवा पर्णसत्र कमानी हे येथील कलाकारांचे खास वैशिष्टय होय. सर्वसामान्यतः पर्णसत्र कमानीचा वापर अधिक प्रमाणात केलेला आढळतो. या कमानीची जेथून सुरुवात होते तो भाग कमानीचे दोन्ही पाखे, या बिंदूत मिळतात. तो बिंदू, कमान व चौकट या दर-म्यानची जागा आणि कमानीच्या कडा हे कमानीचे विशेष सजावटीचे विषय. यामध्ये कमानीच्या तळाशी द्राक्षांचे घोस, कमलकलिका, मोर, पोपट यांच्या संयुक्त आकृती फारच मोहकपणे कोरलेल्या असतात. तसेच कमानींच्या दोन्ही कोपऱ्यांत उगवता सूर्य, पूर्ण विकसित कमळपुष्प, दोन मोर किंवा पोपट उठावात कोरलेले असतात. क्वचित् प्रसंगी दोन सुरूदार खांबांच्या दरम्यानच्या कमानीत पूर्ण फळ्या बसविलेल्या असतात, तेव्हा या फळयावर अतिशय सुरेख कोरीव काम केलेले आढळते. जालना व औरंगाबाद येथे कमानींचा फार मोठया प्रमाणावर वापर केलेला आढळतो. तथापि या कलेचा इतका विकास झालेला आढळत नाही. क्वचित् प्रसंगी कमानींच्या आतून सजविलेली फळी बसविलेली असते.

काही वास्तूंमध्ये चौकाच्या प्रवेशभागावर प्रचंड आकाराची तुळई बसविलेली असते. स्थानिक भाषेत तिला ढास असे म्हणतात. आणि ढासावरच वरील दोन

मजल्यांची उभारणी केलेली असते. सामान्यतः ढास म्हणजे २×१.५×२० फूट या आकाराचा मजबूत ओंडका. यावरील महाल हा बहुधा "झनाना" महाल असतो. त्यामुळे त्याच्या दर्शनी भागावर सुरूदार खांबांच्यामध्ये जाळीदार कमानी बसविलेल्या असतात. या जाळीने इमारतीचे सौंदर्य तर वाढतेच शिवाय ढासावर अवजड विटांचे बांधकाम करण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. मठामध्ये विविध आकृतीच्या जाळ्या, गर्भगृहासमोर बसविलेल्या आढळतात. या जाळ्यांमध्ये प्राणी व फुले कोरण्याचा प्रघात होता.

हस्त

साध्या खांबांसोबत येणारे हस्तही साधेच चौकोनी ठोकळे असतात, तर गुजराती खांबांबरोबर येणारे हस्त तरंगाचे असून त्यामध्ये उलट सुलट कमलपुष्पे व त्यावर शृंखला कोरलेली असते. हा हस्ताचा सर्वसामान्य प्रकार झाला. तथापि पैठण येथील हस्त प्रसिद्ध आहेत ते त्यांच्यावरील मयूराकृतींसाठी. काही ठिकाणी यासोबतच लोलक कोरलेले असतात. हे लोलक खोल उठावातील असून कोरीव कामाचा तो अति-उत्कृष्ट नमुना होय. हे लोलक म्हणजे लटकते कमलपुष्प असून त्यावर कोठे उड्या मारणारी माकडे, बागडणारे पोपट, क्वचित् ठिकाणी डरकाळ्या फोडणारे सिंह कोरले आहेत. नानासाहेब पेशव्यांसाठी बांधण्यात आलेल्या वास्तूत यांचे सौंदर्य खास करून जाणवते.

तीर-ताण

पैठणी वास्तूंत यांचा प्रकर्षाने अभाव जाणवतो. एक-दोन ठिकाणी ते आहेत. तथापि ते अतिशय साधे आहेत. त्याचे कारण पैठणच्या वास्तूंमध्ये अशा प्रकारच्या बाह्य आधाराची तितकी गरज भासत नाही.

तुळयांची टोके

तुळयांची टोके अतिशय कलात्मक पद्धतीने कोरलेली आढळतात. येथेही मोर आणि पोपटांचा बेछूट लपंडाव चाललेला आढळतो.

झुंबर

हाही लोलकाचाच एक प्रकार आहे. वास्तूची शोभा वाढविण्यासाठी वास्तूंच्या आतील किंवा दर्शनी बाजूंच्या कंगोरीच्या कोपऱ्यात हे बसविलेले असतात. हे पूर्ण उठावात असतात. पैठण, औरंगाबाद व जालना येथे आढळणारी झुंबरे एकाच प्रकारची आहेत.

मठ

पैठण येथील मठांची परंपरा अतिशय पुरातन आहे. मठ म्हणजे एक प्रशस्त वाडाच होय. तथापि त्याच्या एका भागात आराध्य देवतेच्या प्रतिष्ठापनेसाठी

मंदिराची रचना केलेली असते व दुसऱ्या भागात राहण्याची व्यवस्था असते.

प्रवेशद्वारास लागूनच एक लाकडी अर्धमंडप दर्शनी भिंतीच्या आतील अंगास मुख्य गर्भगृहासमोर बसविलेला असतो. यामध्येही सुरूदार खांब, कमानी, लाकडी कोरीव कंगोरी अतिशय कलात्मक पद्धतीने बसविलेल्या असतात. यासमोरचा भाग म्हणजे सभामंडप होय. सभामंडप पूर्णपणे लाकडात उभारलेला असतो. याच्या छताची बांधणी तिरप्या फळयांच्या जोडणीने केलेली असते. छताच्या चार कोपऱ्यांत कमळाकृती जोडलेल्या असतात तर मध्यभागी मोठया कमळात झुंबर बसविलेले असते. याशिवाय इतर कोपऱ्यांमध्येही झुंबरे लटकविलेली असतात. मंडप शक्यतो दोन मजली असून दुसरा मजला कोरीव कामाने अतिशय सजविलेला असतो. मठातील कोरीव लाकडी मंडप हे पैठणच्या कोरीव कामाचे आणखी एक वैशिष्टय होय. सध्याच्या शिवदिनकेसरी मठातील मंडप पैठणी काष्ठशिल्पाचा एक अप्रतिम नमुना होय. या मठातील जाळीकामही उत्कृष्ट आहे. या मंडपामागे लाकडीच गर्भगृह केलेले आहे. या दोन्हीमध्ये जाळीचा उत्तम पडदा बसविलेला असतो.

देवघरे

पैठणच्या जुन्या वाडयांतून मोठमोठी देवगृहे आहेत. ही देवघरे समकालीन मंदिरांच्या लाकडी प्रतिकृतीच आहेत. यातही सुरूदार खांब, आणदार कमानी, कोरीव शिखर, कपोताच्या बाजूची झुंबरे सारेच प्रेक्षणीय असते. येथे सर्वच खोल उठावात असल्याने कलाकारास आपल्या कलेचे प्रदर्शन करण्यास पुरेपूर अवधी मिळालेला आहे. या देवघरांमध्ये उत्तरेकडील व दक्षिणकडील शैलींचा सुरेख संगम झालेला आढळतो. या देवघरासमोर जाळीचा पडदा असतो.

मुस्लिम वास्तू

पैठण येथील वास्तूंमध्ये वाडे व मशिदी यांचा समावेश होतो. या वाडयांचा दर्शनी भाग इतर वाडयांहून थोडासा भिन्न असतो. येथे दर्शनी भागावर तोरणाच्या ऐवजी प्रचंड कमान असते व कमानीवर पारंपरिक कंगोरी असते. कंगोरीवर दक्षिणेमधील नक्षी विटांच्या सहाय्याने उभारलेली असते. तसेच येथे लाकडाचा वापर फारच अल्प प्रमाणात केलेला आढळतो. तीच स्थिती मशिदींची आहे. तथापि काही मशिदींमध्ये मुघल शैलीत सुरूदार खांब व कमानी बसविलेल्या असतात.

एकंदर पैठणच्या वास्तू या आरंभापासूनच आगळया वेगळया स्वतःच्या शैलीत बनविलेल्या आढळतात. आज दिसणाऱ्या वास्तू या पेशवेकालीन आहेत. पैठण अति समृद्ध होते. पैठणी व पागोटयांच्या व्यापाराला शासकीय पाठिंबा प्राप्त झाल्यामुळे या नगरीच्या समृद्धीत भरच पडली. त्यामुळे पैठणवर अनेक आक्रमणे झाली. अनेक वेळा पैठण लुटण्यात आले, जाळण्यात आले. आज शिल्लक असणाऱ्या वास्तू या सर्व

वरील अपघातातून वाचलेल्या आहेत. म्हणजे या वास्तूंचे मूलभूत सौंदर्य सध्यापेक्षा कितीतरी पटींनी अधिक असले पाहिजे.

पैठणला कलाकारांची एक मोठी परंपरा लाभलेली आहे. सातवाहन कालापासून थेट पेशवेकालापर्यंत ही परंपरा अखंडित होती. इतिहासाच्या या प्रदीर्घ वाटचालीत ही परंपरा खंडित करण्याचे अनेक प्रसंग आले. तथापि ती खंडित होऊ शकली नाही. कालौघात येथील कलाकारच नाशिक–जालना आदि क्षेत्रांत स्थलांतरित झाले आणि या भिन्न क्षेत्रांतही त्यांनी कलेचा प्रसार केला.

वीटकामात व लाकडी कोरीव कामात पैठणने स्वतःचा स्वतंत्र असा वारसा निर्माण केला. अद्याप हा फारसा ज्ञात नसल्याने येथे त्याचा अल्पसा परिचय करून देण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच येथे केवळ काही वैशिष्ट्यांचाच विचार करण्यात आला आहे.

■ ■

संदर्भ

१. R. S. Morwanchikar, *Paithan Through the Ages*, (Unpublished thesis, Marathwada University, Aurangabad, 1978)

२. *Annual Report* of the Archaeological Dept of Nizam's Dominion, 1935–37, pp 39–42.

३. S. Beal, *Life of Huentsang*, (N. Delhi, 1911), p. 42.

४. T. V. Pathy, "Verul Shivalaya Mahatmya : Ms of Some More Facts About Ellora in *P. B. Desai Felicitation Volume* (Dharwar, 1976), pp 105–109.

५. R.S.Morwanchikar, "Early Traders and Trade Guilds of Western India," Proceedings of Indian History Congress, Bombay, 1980, pp 912 to 921.

६. वि. भि. कोलते, **स्थानपोथी** (मलकापूर, १९५२), पृ. १३ ते १६.

७. रा. श्री. मोरवंचीकर, "दक्षिणकाशी प्रतिष्ठान", महाराष्ट्र इतिहास परिषद, धुळे, १९८० (म. सा. प. प्रतिष्ठान विद्यमाने प्रकाशित, नोव्हें.–डिसें. १९८२)

८. Sherwani & P. M. Joshi, *History of Medieval Deccan*, (Bombay, 1976), pp 50–53.

९. R. S. Morwanchikar, "Mansions & Manasteries of Paithan," *Marg* Publications (Bombay, 1982), pp. 112-115.

१०. लेखांक – प्रत्यक्ष निरीक्षणावरून

११. गो. स. सरदेसाई [संपा.], **पेशवे दप्तर,** (पुणे, १९३४) – पाहा पत्र क्रमांक ९, ९४, ९५, ९७, ९९, १००, १०१, १०३.

१२. वा. कृ. भावे, **पेशवेकालीन महाराष्ट्र,** (नवी दिल्ली, १९७६), पृ. १९१

१३. Sherwani & P. M. Joshi, *op. cit.*

१४. रा. श्री. मोरवंचीकर, "पैठण : पारंपारिक व ऐतिहासिक", **स्मृतिग्रंथ,** (पैठण, १९७९), पृ. ६३-७३.

१५. कित्ता


१६. कित्ता

१७. रा. श्री. मोरवंचीकर, **प्रतिष्ठान पथदर्शिका** (पैठण, १९७८)


१८. M. S. Mate, ***Deccan-Wood-Work,*** (Deccan College P. G. R. I. Pune, 1967)

१९. R. S. Morwanchikar, "Mansions & Monasteries of Paithan", *op. cit.*


■ ■ ■



५. पैठण : ढासावरील जाळी




६. पैठण : मोराचे आकर्षक झुंबर




७. पैठण : गुजराती शैलीतील स्तंभ व हस्त



८. पैठण : दरवाजाच्या पट्टीवरील भौमितिक नक्षी



९. मराठवाडा : नीलकंठेश्वर मंदिर, निलंगे



१०. मराठवाडा : गुप्तेश्वर मंदिर, धारासूर

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६२ : १-४, १९८३-८४

यादव शिल्पशैली : मूल्यमापन

सु. र. देशपांडे
मराठी विश्वकोश, वाई

यादवकाळात, म्हणजे साधारणतः इसवी सनाच्या ११ ते १४ व्या शतकांच्या दरम्यान, महाराष्ट्रात अनेक मंदिरे बांधण्यात आली. ही मंदिरे तथाकथित हेमाडपंती या नावाने सुपरिचित आहेत. हेमाडपंत किंवा हेमाद्रि (इ. १३ वे शतक) हा महादेव यादव (इ. १२६१-१२७०) आणि रामदेवराव यादव (इ. १२७१-१३११) ह्यांचा श्रीकरणाधिप होता. त्याने स्वतःकडे करणांचे आधिपत्य घेतले होते. ' चतुर्वर्गचिंतामणि 'सारखा धर्मशास्त्रकोश आणि इतर अनेक ग्रंथ त्याने लिहिल्याचे उल्लेख मिळतात. याशिवाय सेनापती म्हणूनही त्याने अनेक युद्धांत भाग घेतला होता. ठाणे येथे उपलब्ध झालेल्या लेखांतून तसेच ' चतुर्वर्गचिंतामणि 'तील व्रतखंडातून त्याच्या बहुविध कार्याविषयी माहिती मिळते. त्याने अनेक मंदिरे बांधली आणि मंदिर-बांधणीस उत्तेजन दिले. अशी वदंता आहे की हेमाद्रीने सुमारे तीनशे मंदिरे बांधली असावीत. त्याच्या या बहुश्रुततेमुळे या मंदिरांना ' हेमाडपंती ' ही संज्ञा रूढ झाली असावी. तथापि अशा पद्धतीने बांधलेल्या मंदिरांतील अनेक मंदिरे, उदा. महादेव मंदिर (अंबरनाथ), मांकेश्वर (झोडगे), शिवमंदिर व देवीमंदिर (बळसाणे), जब्रेश्वर मंदिर (फलटण), श्रीकृष्ण व मुधाईदेवी (वाघळी), कोप्पेश्वर (खिद्रापूर), गोंडेश्वर (सिन्नर) इत्यादी हेमाद्रीपूर्वी सुमारे शंभर दीडशे वर्षे आधी बांधली गेली आहेत. त्यामुळे या मंदिरांना हेमाडपंती म्हणणे कालदृष्टया अप्रस्तुत व चुकीचे ठरेल. याकरिता ही अपसंज्ञा बाजूला ठेवून त्यांना सोयीसाठी यादव वंशाच्या नावाने ' यादव मंदिरे ' असे उल्लेखिणे अधिक सयुक्तिक होईल. अर्थात ही सर्व मंदिरे यादव वंशातील राजांनी बांधली आहेत असे नव्हे; परंतु हेन्री कझिन्सने जे चालुक्यांच्या मंदिरांविषयी म्हटले आहे तेच तत्त्व यादव मंदिरांनाही तंतोतंत लागू पडते. यादव राजे, त्यांचे मांडलिक राजे वा घराणी (निकुंभासारखी), त्यांचे मंत्री (खोलेश्वर इ.) किंवा यादवांनी ज्यांना जिंकले असे शिलाहारांसारखे वंश, या सर्वांचा त्यात समावेश होतो. या सर्वांनी जी मंदिरे बांधली किंवा मंदिरबांधणीस उत्तेजन देऊन मंदिरउभारणी केली, ती सर्व मंदिरे सोयीसाठी ' यादव मंदिरे ' या नावाने प्रसिद्ध झाली. ही वंशावरून नाव देण्याची पद्धत भारतात कला समीक्ष-

कांनी रूढ केली आहे, जसे चालुक्य, होयसळ, गुप्त इ.

या मंदिरांची काही ठळक वैशिष्ट्ये आहेत. त्यांचा यादव शिल्पशैलीवर फार मोठा परिणाम झालेला दिसतो. किंबहुना वास्तुशैली आणि शिल्पशैली यांचा सुंदर मिलाफ या मंदिरांच्या ठिकाणी दृग्गोचर होतो. स्टेला क्रमरिश या विदुषीच्या भाषेत वर्णन करावयाचे झाल्यास 'यादव मंदिरे हीच एक वैशिष्ट्यपूर्ण सुंदर शिल्पाकृती आहे.'

कालदृष्ट्या या मंदिरांचे दोन प्रमुख भाग पडतात. सुरुवातीची म्हणजे इ, ११ व्या ते १३ व्या शतकाच्या मध्यापर्यंत बांधलेली मंदिरे आणि नंतरची म्हणजे इ. १२५० ते १३५० दरम्यान बांधलेली मंदिरे. सुरुवातीच्या मंदिरांवर शिल्पांकन विपुल प्रमाणात असून नंतरच्या मंदिरांवर ते क्रमशः तुरळक होत गेलेले दिसते व १४ व्या शतकाच्या अखेरीस शिल्पांकन जवळ जवळ आढळत नाही. क्वचित् एखाद्या मंदिरावर शिल्पांकन आढळते, परंतु कालानुक्रमानुसार मंदिरांच्या बांधणीचे नमुने उपलब्ध न झाल्यामुळे हे नंतरचे शिल्पांकित मंदिर नेमके केव्हा बांधले गेले ह्या-विषयी निश्चित पुरावा उपलब्ध होत नाही. अगर बांधलेली मंदिरे अनेक तज्ज्ञांच्या मते ओबडधोबड, शिल्परहित असून ज्यांना रूढार्थाने 'हेमाडपंती' म्हणता येईल त्या प्रकारातील आहेत.

वास्तुशैलीच्या दृष्टीने पाहता यांतील बहुसंख्य मंदिरे नागरशैलीत, विशेषतः पश्चिम भारतातील माळव्यात प्रचलित असणाऱ्या भूमिज उपशैलीत बांधलेली आहेत. ही शैली नागर आणि द्राविड यांहून काहीशी वेगळी असून तिची काही खास वैशिष्ट्ये आहेत. उत्तर महाराष्ट्रातील तसेच मध्य भारत, गुजरात आणि राजस्तानातील मंदिर बांधणीत ती मुख्यत्वे आढळतात. वास्तुशास्त्रावरील 'समरांगण सूत्रधार' (११ वे शतक) तसेच 'अपराजितपृच्छा' (१२ वे शतक) या ग्रंथांतून या शैली-संबंधी काही माहिती मिळते. सिंघण यादवाच्या इ. स. १२३१ च्या एका कोरीव लेखातही याविषयी माहिती मिळते.

या मंदिरांच्या बांधणीसाठी दोन प्रकारचे आराखडे (मानचित्रे)– चतुरस्र व वृत्त संस्थान (नक्षत्राकृती)– वापरले असून मंदिरांच्या कोनाकृती भिंती पायापासून वरपर्यंत चढत गेल्यामुळे त्या ठाशीव दिसतात आणि छायाप्रकाशाच्या परिणामामुळे त्यांच्या भरीवपणाला अधिक उठाव मिळतो. त्यामुळे पायापासून कळसापर्यंत गेलेल्या भित्तिकोनांच्या रेषांमुळे भासणारा बांधणीचा उभटपणा वेगवेगळ्या थरांच्या आड-वटीनी काहीसा कमी झाल्यासारखा भासतो.

मंदिरांची बांधणी करतांना क्वचित् काही ठिकाणी चौथरे उभारलेले आहेत, परंतु पाया खणलेला दिसत नाही. बांधणीत दगड सांधण्यासाठी चुना–सिमेंट अशा प्रकारचा कोणताही तत्सम पदार्थ वापरलेला नाही. दगडांना खाचा पाडून एकावर एक दगड रचून भिंतींची बांधणी केली जाई. मंदिराच्या पीठांवर अश्व, गज, नर

इत्यादी थर क्वचित् आढळतात. अश्वथर तर जवळ जवळ नाहीच; मात्र कणी, कमळ हि-यादी प्रकार प्रामुख्याने वापरलेले दिसतात. भिंतींवर थरांमध्ये विविध प्रकार आणि आकार असून दोन मोठया स्तरांच्या मध्यभागी योजलेल्या कणीचा आकार दुधारी सुरीच्या पात्याचा आडवा छेद घेतल्यासारखा वाटतो.

मंदिरांचे स्तंभही विविध प्रकारचे आहेत. ते एकसंध एकजात गुळगुळीत कातलेले असून त्याप्रमाणे उपलब्ध होणाऱ्या अखंड शिलाखंडाच्या लांबीनुसार मंदिराचे प्रमाण ठरविणे तत्कालीन वास्तुविशारदांना प्राप्त झाले असावे. काही ठिकाणी क्वचित् प्रसंगी जोडाचा पण बहुतेक एकसंध पाषाणाचा कातीव स्तंभ चौकोनी षट्कोनी, अष्टकोनी इ. भिन्न आकारांचे पाषाण एकावर एक रचून ठेवल्यासारखा दिसतो. स्तंभपादाजवळील साधा भाग चौरस आकाराचाच आढळतो. एकूण छाया प्रकाशाचा परिणाम साधण्यासाठी आडवटींचा उपयोग स्तंभाच्या कोरीव कामातही केलेला आढळतो. स्तंभशीर्षे किचक, कमळ व क्वचित पर्णांची आहेत. स्तंभातील कर्णिका किंवा कणी ही यादव मंदिरस्तंभाची एक वैशिष्टयपूर्ण देणगी आहे.

या सर्व मंदिरांची शिखरे इतर मंदिरांपेक्षा वैशिष्टयपूर्ण असून शिखरांची घडण आणि मंदिरांच्या पायाची आखणी यात फार मोठा समतोल साधला आहे. प्रमुख दिशांना कोन येतील असा चौरस कल्पून एका कोनासमोर प्रवेशद्वाराची व्यवस्था केलेल्या या मंदिराच्या पायाची आखणी अनेक कोनांत केलेली आहे. त्या पायांवर उभारलेल्या भिंतींनी जे कोन बनतात त्या सर्व कोनांच्या रेषा जमिनीपासून निघून थेट कळसापर्यंत उभ्या गेलेल्या दिसतात. आणि शिखरांच्या छोटया प्रतिकृती (उरुशृंगे) खालपासून वरपर्यंत एकीवर एक प्रमाणशीर पद्धतीने बसविल्यामुळे ही सर्व लहान लहान शिखरे रचूनच मोठे शिखर तयार झाल्यासारखे वाटते. शिखराच्या या सर्व प्रतिकृती जागच्या जागी स्थिर व मजबूत राहाव्यात म्हणून उपयोगात आणलेल्या साहाय्यक दगडांवर नक्षीकाम केल्यामुळे पुन्हा शिखराला उठाव आलेला दिसतो. ह्या शिखरातील लहान शिखरे (कूट) कूटस्तंभांच्या आधाराने हळूहळू वरच्या बाजूस उभी चढलेली दिसतात. त्यांचा आकार जशी ती वर जातील तसा लहान होतो आणि त्यातून एका सर्वांगीण सुरेख एकात्म शिखराचा आभास निर्माण होतो. यासंबंधी 'अपराजितपृच्छा' या ग्रंथातील वर्णन चपखल असून त्यात म्हटले आहे, 'यत्र वंशोद्भवाः कूटा ह्रस्ववृद्धिक्रमस्थिताः। दळविभक्त्या त्वङ्गैश्च भूमिजाः पुरभूषणाः॥' (अपराजितपृच्छा, १०६–२९). यादव शिखरांमध्ये बोजडपणाऐवजी नाजुकता अधिक प्रकर्षाने जाणवते.

यादवकालीन मंदिरांच्या शिखराखालोखाल यादवशैलीच्या मंदिरांची विताने (छते) वैशिष्टयपूर्ण व अलंकृत असून याही बाबतीत त्यांनी गुजरात व माळव्यातील मंदिरांचे काही बाबतीत अनुकरण केले आहे. तथापि छतांचा एकूण विचार केला असता त्यामध्ये स्थानिक गुणावगुणांचे जास्त मिश्रण आढळते आणि तुलना-

त्मक दृष्टया कमी प्रकार आढळतात. यादव मंदिराच्या मंडपाचे संवर्ण-छत असून ते प्रामुख्याने अंबरनाथ व सिन्नर येथील देवळांत आढळते, तर झोडगे येथील छत फंसाना प्रकारचे पिरॅमिडसारखे आहे. याशिवाय इतरत्र निमुळती होत गेलेली अष्टकोनी किंवा चौकोनी विताने आढळतात आणि मध्ये कमलाकृती झुंबर किंवा अलंकरण असते.

वितानांप्रमाणेच यादव मंदिराच्या द्वारशाखा अलंकृत केलेल्या आहेत आणि त्यावरील गणेशपट्टी व त्यावरील भागात मातृकामूर्ती व इतर देव-देवता कोरलेल्या आढळतात. उंबऱ्यावर कीर्तिमुखे, मकर व कमळ ही प्रतिमाने प्रामुख्याने कोरलेली असतात.

यादव मंदिरांच्या वास्तुशैलीची ही प्रमुख वैशिष्ट्ये झाली. याखेरीज त्यांच्या मंडोवरांवर विपुल शिल्पांकन केलेले आहे; तथापि हे शिल्पांकन प्रामुख्याने बाहेरच्या भिंतींवर असून सभामंडपातील अर्धभिंती व स्तंभांवरही काही प्रमाणात आढळते. एकूण यादव मंदिरांचा धावता आढावा घेतला असता शिल्प आणि वास्तु या दृष्टिकोनातून यादवकालीन निर्मितीची काही ठळक कलात्मक वैशिष्ट्ये पुढे येतात.

वास्तुकला आणि शिल्पकला यातील परिपूर्ण सुसंगती राखण्याचा प्रयत्न तत्कालीन कलाकारांनी केलेला असून शिल्पाला वास्तुरचनेच्या विशिष्ट बांधणीमुळे एक प्रकारचा उठाव मिळाला आहे; तद्वतच वास्तूतील प्रमाणबद्ध उभटपणा शिल्पांच्या प्रमाणबद्ध रूपरेषेत दृग्गोचर होतो. वास्तूच्या सर्व रूपरेखांचा परिणाम अबाधित राखणाऱ्या पुरेशा उंचीच्या मूर्ती मंदिरावर अपोत्थित आणि उत्थित शिल्पात दिसून येतात. त्याचप्रमाणे बैठ्या मूर्तीपेक्षा उभ्या मूर्ती घडविण्याकडे कलाकारांचा जास्त कल होता, कारण वास्तूच्या उत्तुंगतेला कोणत्याही प्रकारचा बाध येईल अशी शिल्परचना वा मूर्ती त्यानी घडविलेली क्वचित् आढळते.

प्रारंभीच्या काळात, म्हणजे ११-१२ व्या शतकात, प्रतिमा अधिक उठावदार करण्यात कलाकारांना यश आले. त्यामुळे वास्तुरचनेचा अभिप्रेत परिणाम द्विगुणित करण्यात ते पूर्णतः यशस्वी झाले; परंतु नंतरच्या काळात वास्तुरचनेला अधिक प्राधान्य प्राप्त होऊन प्रतिमानिर्मितीकडे कलाकारांचे दुर्लक्ष झालेले दिसते. सिन्नर येथील गोंडेश्वर मंदिर हे याचे अत्यंत बोलके उदाहरण म्हणून आवर्जून उल्लेखता येईल. साहजिकच या दोन्हींतील परस्परपूरकता कमी झाली.

एकूण यादवकालीन मूर्तिसंभाराचा विचार केला असता मंदिरात शिव-मंदिरांचे प्रमाण, तसेच शिव-प्रतिमांचे प्रमाण अधिक असून उर्वरित प्रतिमांत सुरसुंदरी, मातृकादेवता, गणपती, विष्णूचे अवतार, कृष्णलीला, महाभारत-रामायण कथानक शिल्पे, योद्धे, पशु-पक्षी, इत्यादी विविध प्रकार आढळतात. दंपती शिल्पे थोडी आहेत; त्यातही बैठ्या मूर्ती तुलनात्मकदृष्टया जास्त आहेत. आणि कुंभ, कमळ, कीर्तिमुख मकर, फळे-फुले-पाने-वेलबुट्टया इत्यादी प्रकार मंदिरांच्या सुशोभनात शुभचिन्हे

म्हणून वापरलेली दिसतात; परंतु त्यांचे शिल्पांकन अधिकतर प्रतीकात्मक आहे.

कलात्मक परंपरेचा विचार करताना या मूर्तिसंभारात प्रतिमान (ज्ञापक) सृष्टीचा जो वैविध्यपूर्ण घटक आहे, तो लक्षात घेणे आवश्यक आहे. या संदर्भात समकालीन आणि माळवा, गुजरात, कर्नाटक आंध्रप्रदेश अशा लगतच्या प्रदेशांतील मंदिरांचा आणि त्यांवरील मूर्तींचा तौलनिक विचार करणे क्रमप्राप्त होते. अनेकविध देवदेवतांच्या मूर्ती आणि बहुविध प्रतिमांनी ही शिल्पसृष्टी व्यापलेली आहे. यादव मूर्तिसंभारात सर्व हिंदु देव-देवता आहेत. दंपती-शिल्पे आहेत तसेच गणपती आणि शिवाच्या स्वतंत्र मूर्ती आहेत. मातृका देवता स्वतंत्ररीत्या खोदलेल्या आहेत; तसेच त्यांचे मातृकापट्टही आहेत आणि विशेष म्हणजे या समकालीन मंदिरांवर आढळणारी सुरसुंदरींची शिल्पे आहेत. त्यात सर्व प्रकारच्या प्रतिमानांचे (Motif). दर्पणधारी, शालभञ्जिका, वृक्षिका, शुकाशी बोलणारी, धनुष्यधारी, नृत्यांगना, अलस्यकन्या, नूपुर बांधणारी वा सोडणारी, असे विविध प्रकार आढळतात. काही मूर्ती विलक्षण सुंदर असून प्रमाणबद्धता आणि घाट या दृष्टीनी लक्षणीय आहेत. तर काही शिल्पे इतरत्र क्वचित् आढळतात. पण यादव शिल्पशैलीत ती प्रकर्षाने व अधिक्याने आढळतात. उदा. वैनायकी ही मातृकामूर्ती भुलेश्वर मंदिरात (पुणे जिल्हा) अनेक वेळा दिसते. त्याचप्रमाणे चमत्कृतिपूर्ण शिल्पेही आढळतात. भुलेश्वर मंदिरातच उत्तरेकडच्या गर्भगृहाच्या भिंतीवर दोन पायांवर उभी असलेली कमरेपासून वर तीन स्वतंत्र धडांची व मुखांची एकसंध अशी एक मूर्ती आहे. त्याचप्रमाणे बळसाणे (धुळे जिल्हा) येथे एक दशावतारांचे शिल्प खोदलेला एकसंध पाषाण आहे. त्यात कल्की-ऐवजी बुद्धाचा दहावा अवतार खोदलेला आहे. याशिवाय अंबरनाथ येथील बहुहस्तांचा नृत्यशिव, शालभंजिका या मूर्ती अत्यंत रेखीव व प्रमाणबद्ध, आणि घाट व लय या दृष्टीनी कलात्मक आहेत. भुलेश्वरची दर्पणधारी किंवा खिद्रापूरची नृत्यांगना या मूर्ती भारतीय स्त्रीसौंदर्याच्या प्रतीक असून त्यांचे उत्तान स्तन, विशाल नितंब, त्रिभंग ढंग, चेहऱ्यावरील भाव आणि घाट व गतिशीलता या सर्व दृष्टींनी त्या लक्षणीय व सुंदर आहेत.

या विविध प्रतिमानांप्रमाणे यादव कलाकारांनी मंदिरांवर कामशिल्पे खोदलेली आहेत. येथे सर्व प्रकारची कामशिल्पे आढळून येतात. त्यात सर्व प्रकारची प्रतिमाने वा आसने, उदा.चुंबन-अलिंगन-संभोगादी प्रकारांपासून मानव-पशू संभोगापर्यंतच्या कामशिल्पांतील सर्व अवस्था व त्यांचे नमुने आढळतात. काही शिल्पे कामवासने-बरोबरच यादवशिल्पांतील कलात्मक आविष्कार प्रकट करतात. उदाहरणादाखल सिन्नर येथील गोंडेश्वर मंदिरातील नंदी मंडपातील एक तीर शिल्प देता येईल. येथे ही यौवना अर्धनग्न स्थितीत उभी असून ती आपले अधोवस्त्र हळुवारपणे खाली करीत आहे, असे दाखविले आहे. त्यात तिची उत्तान नग्नता स्पष्ट दिसते, तसेच विशाल, पुष्ट स्तन, घाटदार नितंब आणि लज्जा दर्शविणारे भाव स्पष्ट दिसतात.

ती त्रिभंगात डौलदार उभी असून तिचे माफक अलंकार आणि केशभारातील पूर्ण उमललेले कमळ स्पष्ट दिसत आहे. स्त्रीसौंदर्याचा नमुना म्हणून हे शिल्प लक्षणीय आहे. यात तिच्या हालचालींचा ढंग आणि गतिमानता सुस्पष्ट दिसतात. अशा प्रकारची काही निवडक कामशिल्पे वगळली तर या मूर्तिसंभारात वैपुल्य, विविधता आणि प्रकार या दृष्टींनी खजुराहो किंवा कोणार्क येथील वैविध्य आढळत नाही, त्याचप्रमाणे या मंदिरांतून कामशिल्पांना जे अनन्यसाधारण महत्त्व दिले, तेही येथे आढळत नाही; तसेच त्यांचे प्रकार, उठावदार शिल्पांकन आणि त्याची रेलचेल यांचा अभाव येथे त्यांचे गौणत्व सिद्ध करतो. यादव मंदिरांवर, केवळ एका शिल्पशास्त्रीय परंपरेचे अनुकरण करावयाचे म्हणून, त्यांचें प्रतीकात्मक, क्वचित् उठावदार अलंकरण आढळते.

तथापि कलात्मक दृष्टीने लक्षणीय असलेली शिल्पे यादव मंदिरांतील सुरुवातीच्या काही मंदिरांतून तसेच नंतरच्या एक दोन देवळांतून, विशेषत: अंबरनाथ, सिन्नर, बळसाणे, झोडगे, खिद्रापूर, महेश्वर, पेडगाव, परळी, भुलेश्वर (प. महाराष्ट्र); औंढा नागनाथ, उमरगा, निलंगा (मराठवाडा); लोणार, सातगाव, साकेगाव, मेहकर (विदर्भ) येथे आढळतात. तथापि त्यांमध्येही विविधतेच्या दृष्टिकोनातून मर्यादा पडल्या आहेत. देव-देवतांची युगुले आहेत; पण खजुराहो येथे आढळणाऱ्या उभ्या शिव-पार्वतीच्या मूर्ती किंवा बलराम-रेवती अशा दंपतींच्या सुंदर व सुरेख मूर्ती नाहीत. सुरसंदरींच्या बाबतीतही वैविध्य व ढंग मर्यादित आहेत. विविध प्रतिमानांत मध्य भारतातील खजुराहो किंवा ओरिसातील कोणार्क या मंदिरांवर आढळणारी ज्ञापके उदा. पत्रलेखन करणारी युवती, काजळ घालणारी तरुणी, काटा काढणारी यौवना, यांचे शिल्पांकन उदाहरणादाखल क्वचित् आढळते, जवळजवळ नाहीच. हीच गोष्ट ऋषि-मुनी आणि व्याल यांच्या बाबतीतही म्हणावी लागेल. सुरसुंदरींबरोबर अपरिहार्यपणे आढळणारी ही ज्ञापके वा प्रतिमाने यादवमंदिरांवर आढळत नाहीत. ऋषि-मुनि व व्याल यांच्या मूर्ती आहेत, पण त्यांचे सान्निध्य आणि विपुलता यांबाबतीत साहजिकच येथे मर्यादा पडलेल्या स्पष्ट दिसतात. या दृष्टीने मध्यभारतातील मंदिरांपेक्षा यादवकालीन कला सीमित झालेली आहे. सामान्यत: जबडा उघडलेला, दोन पायांवर उभा असलेला व्याल येथे दिसून आला तरी कर्नाटकातील होयसळ मंदिरांत आढळणाऱ्या, चार पायांवर उभे असलेल्या अक्राळविक्राळ व्यालाप्रमाणे भव्य व्याल येथे आढळत नाही. याच गोष्टी इतर प्रतिमानांच्या बावतीतही प्रकर्षाने जाणवतात.

यादवकालीन मंदिरांची पीठे, शिल्पशास्त्रांवरील ग्रंथांचा विचार केला असता, त्यात उद्‌धृत केलेल्या नियमांचे काटेकोररीत्या पालन करताना आढळत नाहीत. केवळ शिल्पांवरील ग्रंथांचे पालन करावयाचे म्हणून प्रतीकात्मकरीत्या गजथर, अश्वथर, नरथर इत्यादी आढळतात. तुलनात्मक दृष्ट्या गुजरात, पश्चिम भारत आणि

कर्नाटक येथील मंदिरांत यांचा कलात्मक दृष्टया सातत्याने उपयोग केलेला आहे. त्यात वैविध्य आहे तसेच उठावदार शिल्पांकन आहे.

कीर्तिमुख, मकर, वेलबुट्टी इत्यादी ज्ञापकेही या मंदिरांतून सुशोभनासाठी वापरलेली आढळतात. सिन्नरच्या मंदिरातील मकरमुख उठावदार व कलात्मक आहे; पण इतरत्र त्याचा उपयोग केवळ प्रतीक म्हणूनच दिसतो. कीर्तिमुख आणि मकरमुख यांचा वापर जरी कमी प्रमाणात दिसला तरी वेलबुट्टीचे शिल्पांकन अभावानेच जाणवते.

छतांच्या बाबतीत यादवमंदिरे गुजरात किंवा राजस्तानातील मंदिरांशी कलात्मक दृष्टया सारखी असली तरी गुजरातमधील तत्समान विमानांतून आढळणारे शिल्पांकनाचे तपशील, बारीक सारीक कलाकुसर, आणि मूर्तीचे वैपुल्य यादवमंदिरांत आढळत नाही. वानगीदाखल काही ठिकाणी डोळयांत भरण्यासारखे उठावदार शिल्पांकन आहे; उदा कृष्णलीला (वाघळी), मुरलीधर कृष्ण (वारगाव नांदूर, –अहमदनगर जिल्हा), नृत्यांगना (झोडगे), अंबरनाथ इ.

या सर्वांचा सर्वांगीण विचार केला असता, यादवकालीन शिल्पशैलीची गुणवत्ता विचारात घेताना दोन गोष्टी विशेष प्रामुख्याने जाणवतात. तत्कालीन शिल्पकारांना प्रचलित प्रतिमानांचे वा ज्ञापकांचे पूर्ण अवधान होते, ज्ञान होते; त्यांच्या निर्मितीत घाट आणि मूर्तीचा आकार साधण्यात जरी त्यांना यश अनेक वेळा मिळाले असले, तरी मूर्ती चैतन्यमय करण्यात किंवा मूर्तीत जिवंतपणा आणण्यात त्यांना फारसे यश मिळालेले दिसत नाही. काही अपवादात्मक प्रतिमा वगळता एकूण सर्व प्रतिमांत हालचालींचे सौष्ठव फारसे दिसून येत नाही. त्यामुळे रेखीव, लयबद्ध अशा बाहय रेखांकनातून बंदिस्त झालेला मूर्तीच्या घाटांचा सुगम व जिवंत उत्कट आविर्भाव गुजरात व खजुराहो येथील शिल्पांप्रमाणे येथे आढळत नाही. ज्यावेळी कलाकार मूर्तीचा आशय साधण्याचा प्रयत्न करतो, त्यावेळी नेमके त्याचे बाह्य रेखांकनाकडे किंवा घाटाकडे दुर्लक्ष झालेले आढळते. परिणामतः कलाकाराने घडविलेल्या मूर्ती ढोबळ व स्थूल भासतात. तीच गोष्ट उलट प्रक्रियेत होते. कलाकार जेव्हा लयबद्ध ढबाच्या रेखांकनाचा प्रयत्न करतो, त्यावेळी मूर्तीत हावभाव या दृष्टीने जिवंतपणा येतो, पण कृषता व काटकोळेपणा दृग्गोचर होतो आणि प्रमाणबद्धतेचा अभाव जाणवतो. क्वचितच मूर्तीचा घाट, रेखांकन, गतिमानता व लयबद्धता यांचा सृजनशील मेळ प्रस्तुत कलाकारांच्या निर्मितीत आढळतो.

यातूनच यादवशिल्पशैलीच्या क्रमविकासाचा विचार दृढावतो. सुरुवातीच्या मंदिरांवरील शिल्पांकनात विविधता आणि गुणवत्ता हे गुण प्रकर्षाने जाणवतात; एवढेच नव्हे तर त्यात प्रतिमानांचे वैपुल्य आहे आणि वास्तुशिल्पशैलीच्या दृष्टीने मंदिरांचे एकूण सौंदर्य व रूपणकला उठावदार आहे. मात्र गुण आणि संख्या या बाबतीत त्यांची उत्तरोत्तर अवनती होत गेल्याचे दिसते. किंबहुना नंतरची मंदिरे

हे मूर्तिशिल्पविरहित केवळ जड ठोकळे भासतात. यातही १३ व्या शतकाच्या अखेरच्या काळात भुलेश्वर, पेडगाव येथील काही मंदिरे बांधली गेली असूनसुद्धा तेथे उच्च दर्जाचे अलंकरण आढळते. अर्थात ती शिल्पशैली माळवा आणि गुजरात येथील कलाकारांचे काम असावे, असे तेथील मूर्तिसंभारावरून व त्यांच्या शैली-वरून स्पष्ट दिसते. खिद्रापूर आणि फलटण येथील शिल्पशैलीवर कर्नाटकातील होयसळ कलाकारांची छाप असूनही तेथील मूर्तींच्या घडणीत अलंकारांचे अवाजवी वैपुल्य, कलाकुसरीचे अनावश्यक तपशील आणि शारीरिक बुटकेपणा व स्थूलता ही सौंदर्य बाधित करणारी वैशिष्टये आढळत नाहीत. त्यामुळे एकूण शिल्पशैलीचा व रूपणकलेचा मागोवा घेतला असता असे म्हणणे क्रमप्राप्त होते की सुरुवातीची काही निवडक कलात्मक मंदिरे वगळता उर्वरित बाबतीत यादवकाळातील कला-कारांनी उत्तरेकडून, विशेषतः गुजरात-माळवा येथून स्फूर्ती मात्र घेतली; पण तेथील कलेची उच्च गुणवत्ता ते आचरणात आणण्याचे पूर्णतः विसरलेले दिसतात. त्यामुळे यादव रूपणकलेत–मंदिरशिल्पात–पश्चिम आणि मध्यभारतातील कलेची दाक्षिणात्य अभिव्यक्ती ही क्रमशः अवनत होत जाऊन शेवटी ती हळूहळू नष्ट झाली.

या ऱ्हासाचे समाधानकारक व समर्पक उत्तर देणे अवघड आहे. या बाबतीत काही संभवनीय व तार्किक कारणे पुढे करता येतील, पण तीही संभाव्य अनुमाने म्हणूनच. (१) यादव कलाकारांनी प्रारंभापासून मूर्तिकलेपेक्षा वास्तुकलेकडे अधिक लक्ष केंद्रित केले; (२) उत्तरेकडून होणाऱ्या परकीयांच्या, विशेषतः मुसलमानांच्या आक्रमणामुळे मंदिरांवरील शिल्पाकडे कलाकारांनी बुद्धिपुरस्सर कानाडोळा केला असावा किंवा मंदिर-बांधणीस उत्तेजन देणाऱ्या राजांनी मूर्तिभंजक मुसलमानां-पासून मंदिरांचे संरक्षण व्हावे म्हणून या कलेस काही अपरिहार्यपणे मर्यादा घातल्या असाव्यात; (३) यादवकाळाच्या उत्तरार्धात आणि नंतर मंदिर-बांधणीवर आश्रय-दाते गेल्यामुळे बंधने वा मर्यादा आल्या आणि कलाकार राजाश्रयाच्या शोधार्थ दक्षिणेकडे वा इतरत्र गेले असावेत; (४) साहजिकच या सर्वांमुळे कलात्मक परंपरा खंडित झाली. त्यामुळे चौदाव्या शतकानंतर फारच थोडी मंदिरे महाराष्ट्रात बांधलेली दिसतात. पण जी मंदिरे बांधली गेली ती बहुतेक मूर्तिविरहित आहेत.

■ ■

संदर्भ सूची

1. Percy Brown, *Indian Architecture*, Bombay, 1956.
2. Henry Cousens, *Mediaeval Temples of the Dakhan*, Calcutta, 1931.

3. G. B. Deglurkar, Temple Architecture and Sculpture of Maharashtra, Nagpur, 1974.
4. S. R. Deshpande, ' Yadava Sculpture ' (Unpublished doctoral thesis, submitted to the University of Poona in 1977).
5. A. V. Naik, ' Archaeology of the Deccan ' (Unpublished thesis, submitted to the University of Bombay in 1948).
6. V. D. Rao (Ed.), *Studies in Indian History*, Kolhapur, 1968.
7. O. A. Varma, *The Yadavas and Their Times*, Nagpur, 1970.

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६२ : १-४, १९८३-८४

मराठवाड्यातील मंदिर-शिल्पे

गो. बं. देगलूरकर
डेक्कन कॉलेज, पुणे

प्राचीन काळच्या संस्कृतीच्या संदर्भात मराठवाड्याला महत्त्वाचे स्थान द्यावे लागेल. महाराष्ट्रीय संस्कृतीच्या अनेक अंगोपांगांचा प्रारंभ येथे झाला आणि त्यांपैकी काहींचा उत्कर्षही येथे या प्रांती झाल्याचे इतिहास सांगतो. यासंबंधीच्या तपशिलाचा ऊहापोह करण्याची येथे आवश्यकता नाही. काही वर्षांपूर्वी, महाराष्ट्रातील सर्वांत प्राचीन मंदिरे मराठवाड्यातील तेर या गावी आहेत, असे मानले जाई. आता नव्याने असे आढळून आले आहे की विदर्भातील मांढळ, रामटेक इत्यादी ठिकाणची मंदिरे अधिक प्राचीन आहेत. तेर येथील मंदिरांचा काळ नक्की ठरविण्यात तज्ञांचे एकमत झाले नाही. रामटेक येथील अभिलेखांनी या संदर्भात चर्चा करण्यास तज्ञांना वावच दिला नाही. असे असले तरी महाराष्ट्रात हेमाडपंती म्हणून प्रसिद्ध असलेली मंदिरे विदर्भापेक्षा मराठवाड्यात संख्येने अधिक भरतात असे दिसते.

मराठवाड्यावर पहिले राज्य होते ते सातवाहन राजवंशाचे. किंबहुना पैठण येथे राजधानी स्थापून त्यांनी मराठवाड्याला न भूतो असे महत्त्व प्राप्त करून दिले होते. त्यानंतरच्या वाकाटक काळात अजिंठे येथे काही लेणी कोरली गेली. पण त्यांच्या काळात तेथे एखादे देऊळ उभारले गेल्याची नोंद नाही. एवढेच काय तर वेरूळ येथे 'अद्वितीय उत्तम। सकळ कौतुका जन्मस्थान॥' असे कैलास लेणे निर्माण करणाऱ्या राष्ट्रकुटांच्या काळचे मंदिर आज मराठवाड्यात नाही. कंधार येथील तृतीय कृष्णाच्या शिलालेखात मात्र मंदिरे उभारल्याचे उल्लेख आढळतात. मात्र ती मंदिरे अस्तित्वात नाहीत. बदामीच्या चालुक्यांची मंदिरे मराठवाड्यातील नाहीत हे खरे असले तरी उत्तर चालुक्यांची मंदिरे येथे आढळत नाहीत असे या क्षेत्रातील काही तज्ञांनी केलेले विधान आज मान्य केले जात नाही. कारण, मराठवाड्यात नांदेड जिल्ह्यातील होट्टल, मुखेड, खानापूर, बीड जिल्ह्यातील धर्मपुरी इत्यादी ठिकाणी चालुक्यकालीन मंदिरे आहेत हे आता स्पष्ट झालेले आहे. मराठवाड्यावर राज्य करणाऱ्या आणि सातवाहनांनंतर महत्त्वाची कामगिरी करणाऱ्या यादवांच्या काळात पुन्हा सांस्कृतिक घडामोडींना येथे जोर आला. महाराष्ट्र संस्कृती फोफावली, अंगांगांनी बहरली ती याच काळात. यादवकाळात येथे मोठ्या प्रमाणात

मंदिरे उभारली गेली (सगळ्या महाराष्ट्राच्या संबंधातही हे लागू आहे). यादव नृपती महादेवराय व रामचंद्र (इ. १२७१ ते १३१०) यांचा करणाधिप हेमाद्री तथा हेमाडपंत याने यात पुढाकार घेतला असण्याची दाट शक्यता आहे. म्हणूनच कदाचित् या स्थापत्यशैलीला हेमाडपंती शैली म्हणून संबोधिले जात असावे. वस्तुत: अंबरनाथ, जि. ठाणे, येथील मंदिरशैलीचे ऊत्क्रांतरूपच या मंदिरांत आढळते व अंबरनाथचे देऊळ शिलाहार राजाने बांधलेले आहे. हेमाडपंताचा येथे संबंध आलेला नाही. तरीसुद्धा अशा शैलीतील बरीच मंदिरे हेमाडपंताच्या कार्यकालातील असल्याने ही शैली लोकप्रिय करण्याचे श्रेय त्याच्याकडे जाते आणि त्यामुळेच ही शैली त्याच्या नावे ओळखली जाते, असे म्हणावे लागते. शिलाहार राजांच्या कारकीर्दीतही महाराष्ट्रात मंदिरे उभारली गेली. आणि 'तगरपुरवराधीश्वर' हे बिरुद धारण करणाऱ्या या राजवंशाने येथे कदाचित् काही मंदिरे उभारलीही असतील. पण आता ती आढळत नाहीत हे खरे.

मराठवाड्यात आज उपलब्ध असलेल्या मंदिरांमध्ये तेर येथील त्रिविक्रम-मंदिर, कालेश्वर आणि उत्तरेश्वर ही तीन मंदिरे इसवीच्या ५ व्या व ६ व्या शतकातील असावीत. याखेरीज कल्याणी चालुक्यांची काही आणि यादवकालीन मंदिरेही भरपूर आढळतात. सातवाहनांची मंदिरे नाहीत, पण हाल राजाच्या गाथांतून, ती गावाबाहेर असत, त्यांना समोर प्रांगण असे आणि शंकूच्या आकाराची शिखरे त्यांना असत, अशी माहिती येते.

भाषावार प्रांतरचना होईपर्यंत मराठवाडा हा निजामाच्या राज्यात होता. त्या राज्यात विशेष लक्ष पुरविले न गेल्यामुळे हा भाग मोठ्या प्रमाणात अविकसित आणि मागासलेला राहिला. त्या काळी दळणवळणाची साधने विशेष उपलब्ध नव्हती आणि संशोधनाला सोयी-सवलती नव्हत्या. आणि जेव्हा अशा प्रकारचा अभ्यास करण्याची इच्छा संशोधकांना झाली नेमक्या त्याच काळात हैद्राबाद संस्थानात एक प्रकारच्या दहशतीचे वातावरण पसरलेले होते. साहजिकच या विषयाचा विशेष अभ्यास करणाऱ्या मंडळींचे मराठवाड्याकडे म्हणावे तसे लक्ष गेलेले नव्हते. ते त्या परिस्थितीत शक्य नव्हते हे त्याचे महत्त्वाचे कारण. मराठवाड्यातील फार थोड्या देवालयांचा अभ्यास केला गेला होता असे आढळते ते त्यामुळेच. फर्ग्युसनने औरंगाबाद जिल्ह्यातील अन्वा येथील मंदिरांचा (हिस्टरी ऑफ इंडियन अँड ईस्टर्न आर्किटेक्चर, भाग २ रा, पृ. ५७), तर बर्गेसने निलंगे येथील मंदिराचा आढावा (रिपोर्ट ऑन दि अँटिक्विटीज इन द बिदर अॅण्ड औरंगाबाद डिस्ट्रिक्टस्) घेतल्याचे आढळते. औंढा नागनाथ येथील मंदिरावर आणखी एका आंग्लदेशीय विद्वानाने–हेन्री कझेन्सने (दि मेडिव्हल टेंपल्स ऑफ दि डेक्कन)—लिहिलेले आहे. महाराष्ट्रातील मंदिरांचा व मूर्तींचा व्यासंगपूर्ण अभ्यास करणारे या क्षेत्रीचे अग्रणी श्री. अ. वि. नाईक यांनीही उपरोक्त तीनचार देवळांचाच आढावा

घेतलेला आढळतो.

यावरून मराठवाड्यातील मंदिर-शिल्पांचा अभ्यास खरोखरच गेल्या पंचवीस वर्षांतील आहे, असे दिसून येते. इ. १९६० साली प्रस्तुत लेखकाने जेव्हा अशा प्रकारचा अभ्यास हाती घेतला तेव्हाही अनेक अडचणी होत्याच. त्या काळात चांगले रस्ते नव्हते, त्यामुळे वाहने नव्हती; पुरातत्त्व खाते होते, पण ते संस्थानचे व संस्थानी होते. मंदिरांची सविस्तर माहिती तर सोडाच, त्यांची परिपूर्ण यादीही उपलब्ध नव्हती. हेन्री कझेन्सने केलेली एक यादी उपलब्ध होती, पण ती एक तर अपुरी किंवा थोड्याफार प्रमाणात चुकीची आहे. पाच जिल्ह्यांपैकी (आता सात) फक्त औरंगाबाद जिल्ह्याची दर्शनिका (गॅझेटियर) तयार केलेली होती. अन्य जिल्ह्यांबद्दल काहीच माहिती उपलब्ध नव्हती. इ. १९५६ च्या सुमारास भारत सरकारच्या पुरातत्त्व सर्वेक्षणाच्या नैर्ऋत्य विभागाचे मुख्यालय औरंगाबादेस आले. पण त्यानंतर परिस्थितीत आजपर्यंत काहीही फरक पडलेला नाही. अजिंठे आणि वेरूळ येथील लेणी या बाबतीत मराठवाड्याला शाप ठरली असे म्हणण्याची पाळी आली. कारण संशोधकांचे सर्व लक्ष तिकडेच केंद्रित झालेले. नाही म्हणायला आता महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व विभागाच्या संचालकांनी आस्थापूर्वक दुर्लक्षित प्रदेशाकडे लक्ष द्यायचे ठरविलेले दिसते, हा एक आशेचा किरण म्हणावयास पाहिजे.

नव्याने या क्षेत्रात संशोधन करणाऱ्या मंडळींच्या अशा प्रकारच्या अभ्यासाने मराठवाड्यातील बहुधा सर्व मंदिरे आणि बऱ्याच मूर्ती आज अभ्यासकाला उपलब्ध होऊ शकतील एवढे म्हणता येईल. तेथील मंदिरांचा शास्त्रशुद्ध अभ्यास होण्यास अजूनही बराच वाव आहे हेही सांगितले पाहिजे.

तेर (जि. उस्मानाबाद) येथील मंदिरे

तेर हे तेरणा नदीवरील इवलेसे गाव. हे गोरोबाकाकांचे तेर म्हणूनही प्रसिद्ध आहे. टोलेमीने या गावाची नोंद इसवीच्या प्रारंभीच केलेली आहे. मग फ्लीटनेही केली. सातवाहनकालीन असंख्य अवशेष तेथे उपलब्ध झालेले आहेत. तेथील त्रिविक्रम, उत्तरेश्वर आणि कालेश्वर ही मंदिरे परस्परांपासून थोड्याथोड्या अंतरावर आहेत. ती सारी विटांची आहेत.

त्रिविक्रम मंदिर

गावाचे मध्यात हे मंदिर उभे आहे. प्राकारयुक्त असून त्याला गर्भगृह आणि नंतरच्या काळी बांधलेला गूढ मंडप आहे. काहींच्या मते मूळच्या चैत्यगृहाचे परिवर्तन त्रिविक्रमाच्या मंदिरात केले गेले, तर काहींचे म्हणणे, चापाकृती पदविन्यासाचे (ग्राऊंड प्लॅन) गजपृष्ठाकृती वितान असलेले महाराष्ट्रातील हे एकमेव मंदिर होय. अशा प्रकारची मंदिरे चेझंला (आंध्र प्रदेश) येथेच नव्हे तर अन्य अनेक ठिकाणी आता आढळून आली आहेत. नागार्जुनकोंडा, आलमपूर, महाबलि-

पुरम् इत्यादी ठिकाणी अशी मंदिरे आहेत. प्रस्तुत त्रिविक्रम मंदिर १६ फूट लांबीचे आणि १२ फूट रुंदीचे चापाकार मंदिर आहे. विटा १७"×९"×३" अशा आकाराच्या आहेत. दुपाखी मुख (गेबल फ्रंट) आणि कपोताच्या खालील मंदिरवास्तूला विळखा घालणारा स्तर येथे आढळतो.

या मंदिराच्या कालाविषयी मतमतांतरे आढळतात. कझेन्स याचा काळ ४ थे शतक ठरवितो, तर नाईक आणि पर्सी ब्राऊनच्या मते त्याचा काळ ५ व्या शतकाचा ठरतो. स्मिथ या देवळाला आठव्या शतकात नेतो आणि म. श्री. माटे, हे त्रिविक्रमाचे मंदिर मुळापासूनच असे असून ते ७ व्या शतकातले आहे, असे मत मांडतात.

उत्तरेश्वर

हे शिवमंदिर छोटेखानी असून पूर्वाभिमुख आहे. याच्या विटेचा आकार १६"×९"×२½" असा आहे. गर्भगृह आणि मुखमंडपयुक्त असे हे मंदिर गर्भगृहाला असलेल्या कलाकुसरयुक्त लाकडी प्रवेशद्वारासाठी प्रसिद्धीस आलेले आहे. धर्मयश, अर्धस्तंभ, नर, व्याल आणि लता यांनी युक्त पंचशाखांचे हे दार असल्यामुळे याला ज्येष्ठद्वार पद्धतीतील नंदिनी प्रकारचे मानता येईल. ललाटावरील उत्तरांगावर शिव, ब्रह्मा आणि विष्णू यांच्या आसनमूर्तीही कोरलेल्या आहेत. लाकडातील हे कोरीव काम इसवीच्या सहाव्या शतकातील एक उत्कृष्ट कामाचा नमुना आहे असे मानावे लागते.

कालेश्वर

या देवळाची खूपच पडझड झालेली दिसते. तेरणेच्या काठावर गावाच्या उत्तरेला हे देऊळ आहे. द्वारललाटावर गरुडाची प्रतिमा आहे. ह्यामुळे हे मंदिर शिवाचेच होते किंवा कसे याबद्दल शंका वाटते. पण मौज अशी की पट्टदकल येथील निरूपाक्ष मंदिराच्या शिखरासारखे वा वेरूळ येथील कैलासाच्या शिखरासारखे येथील शिखर आहे; ते सध्या पडक्या अवस्थेत आहे.

ही मंदिरे कुणी बांधली असावीत ?

ही मंदिरे कोणी बांधली हे अजून नक्की करता आलेले नसले तरी कलचुरींच्या काळात, म्हणजे इसवीच्या ५ व्या–६ व्या शतकात ही बांधली गेली असावीत. मराठवाड्याच्या वायव्य भागात कलचुरींचे या सुमारास राज्य होते असे वा. वि. मिराशी सांगतात (बी. आय. एस्. एम्. क्यू., १९, पृ. ५६). शिवाय पश्चिम महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारची मंदिरे होती. आणि राजस्तान, मध्यप्रदेश, बंगाल येथेही या सुमारास अशी विटांची मंदिरे बांधली गेली होती.

मराठवाड्यातच केवळ नव्हे तर महाराष्ट्राच्या इतर भागातही यानंतरच्या सुमारे ३–४ शे वर्षांच्या काळात मंदिरे उभारली गेल्याचा ठोस पुरावा उपलब्ध होत नाही. म्हणजे मग तेथे जी मंदिरे आढळतात ती ११ व्या शतकातली व त्यापुढील

काळची असली पाहिजेत. आणि या दृष्टीने पहाता हा काळ मराठवाड्याच्या संदर्भात समृद्ध-संपन्न होता असे दिसते. महाराष्ट्रात अंबरनाथ येथील (इ. १०२६ चे) मंदिर हे या कालखंडातील सर्वात आधीचे टिकून राहिलेले मंदिर होय.

मराठवाड्यात नव्याने शिलालेख उपलब्ध होण्याआधी या क्षेत्रातील तज्ज्ञांचा असा होरा होता की शिलाहार व यादव हे कल्याणी चालुक्यांचे मांडलिक असताना त्यांनी उभारलेल्या मंदिरांवर चालुक्य शैलीचा प्रभाव जाणवतो, एवढेच ! कल्याणी चालुक्यांनी स्वतः काही येथे देवळे उभारली नव्हती. पण आता या मताचा आग्रह धरता येत नाही. कारण होट्टल, तडखेल, करडखेल, खानापूर (सर्व नांदेड जिल्ह्यातील) येथे तसेच गणेशवाडी, धर्मपुरी येथे उपलब्ध झालेल्या शिलालेखांद्वारे व यांपैकी काही ठिकाणी असलेल्या मंदिरांच्या आधारे असे स्पष्टपणे म्हणता येते की उत्तर चालुक्यांची मंदिरे मराठवाड्यात आजही दिसतात.

या उत्तर चालुक्य मंदिरांपैकी सिद्धेश्वर (परमेश्वर), सोमेश्वर व महादेव या नावानी ओळखली जाणारी तीन मंदिरे होट्टल येथे आहेत. वहनी कुलातील चालुक्यांच्या मांडलिकांनी ही उभारल्याचा उल्लेख शिलालेखात आढळतो. याच नांदेड जिल्ह्यात खानापूर, मुखेड, सगरोळी येथेही चालुक्यकालीन मंदिरे आहेत. बीड जिल्ह्यातील धर्मपुरी येथील केदारेश्वराचे मंदिरही याच वेळचे व धाटणीचे आहे.

या कल्याणी चालुक्यकालीन मंदिरांची काही वैशिष्ट्ये सांगता येतील. मंदिरांची सविस्तर वर्णने करण्याला या लेखात वाव नाही. ही मंदिरे एका गाभाऱ्याची वा त्रिदल म्हणजे तीन गाभाऱ्यांची असतात. म्हणजेच यांना एक वा तीन प्रवेशद्वारे असतात. याचा अर्थ असा की एक गाभारी मंदिरांना एक वा तीन प्रवेशद्वारे व तीन गाभारी मंदिरांना एक प्रवेशद्वार असते. सभामंडप गूढ पद्धतीचा म्हणजे सगळीकडून भिंत असलेला वा उघडा असतो. उघडा असेल तर भोवती अर्धभिंत असते व त्यावरील लहान लहान स्तंभांवर मंदिराचे छत पेललेले असते. सभामंडपाच्या वा गर्भगृहाच्या, किंवा क्वचित् ठिकाणी दोन्हींच्या ललाटस्थानी लक्ष्मीचे बिंब (प्रतिमा) असते. वितानावर अष्टदिक्पालांची शिल्पे असतात, तर उत्तरांगावर वा मंडोवरावर सप्तमातृका असतात.

या काळच्या मंदिरांची विमाने नवरंग पद्धतीची, क्वचित् उत्क्षिप्त पद्धतीचीही असतात, पण करोटक पद्धतीची नसतात. वितानाच्या मध्यभागी म्हणजे रंगशिलेच्या वरील बाजूस चौकोन, त्यावर आयताकार पुन्हा चौकोन अशी रचना केलेली असते. मराठवाड्यातील एकाही चालुक्यकालीन मंदिरावर शिखर दिसत नाही.

मंदिरांच्या अधिष्ठानाला फारसे थर नसतात, पण असतात त्यात पद्म (उलटे), कणी, उपान आणि कुमुद एवढे थर आढळतात. मंडोवर मात्र बहुधा जंघास्थानी सुरसुंदरी आणि मूर्तिशिल्पे यांनी व्यापृत असते. होट्टल, मुखेड, धर्मपुरी येथील मंदिरे या बाबतीत खरोखरच नावाजण्यासारखी आहेत. सुरसुंदरींच्या शिल्पात पुत्र-

वल्लभा, नृत्यांगना, नायिका आणि पोपट, नायिका आणि माकड, नायिका आणि नाग, आलसिका इत्यादींची मनोहारी शिल्पे आढळतात, तर मूर्तिशिल्पात नृत्यगणेश, गणेश, उमामहेश्वर, काली, भैरव, नटराज, त्रिविकम, वामन, नृसिंह, वराह यांच्या मूर्ती आढळतात.

मराठवाड्यात यादवकालीन मंदिरे अगणित आहेत. बहुधा प्रत्येक जिल्ह्यात पाच–पंचवीस सहज असावीत. पैकी काही रचनेने बरी, काही बऱ्या अवस्थेत आणि काही पडझड झालेल्या अवस्थेत आढळतात. या सगळ्या मंदिरांची गणना दक्षिणी प्रकारच्या नागरशैलीतील मंदिरे म्हणूनच करता येईल.

पदविन्यास आणि कलाकुसर या बाबींवर या सर्व मंदिरांची विभागणी खालील तीन गटांत करता येईल :

(अ) अनेक थरांच्या मोठ्या अधिष्ठानावर उभारलेली आणि मंडोवरावर आणि अन्यत्र विपुल मूर्तिशिल्पे व नक्षीकाम असलेली मंदिरे. अशी मंदिरे अन्वा, औंढा नागनाथ, माणकेश्वर, बीड, निलंगे, धारासूर इ. ठिकाणी आढळतात.

(ब) अधिष्ठानाला असलेले मोजके थर आणि मंडोवरावरील देवकोष्ठातच असलेल्या मूर्ती ही वैशिष्ट्ये या गटातील मंदिरांची सांगता येतील. मंडोवरावर अन्यत्र अर्धस्तंभांची योजना व धर्मयश नक्षी असते. मंदिरांच्या बाह्यांगी क्षिप्त आणि उत्क्षिप्त रचना फार कमी प्रमाणात असते. त्यामुळे या गटातील मंदिरे चतुरस्त्र वा आयतस्त्र (आर्थोगोनल किंवा रेक्टँग्युलर) असतात.

अशा प्रकारची मंदिरे आंबेजोगाई (४ मंदिरे), केशवपुरी, उमरगे, इत्यादि ठिकाणी आहेत. या मंदिरांची शिखरे बहुधा विटांची असावीत. अर्थातच ती आता नाहीत. ही मंदिरेही ‘ अ ’ गटातील मंदिरांप्रमाणे एका गाभाऱ्याची वा तीन गाभाऱ्यांची आहेत.

(क) या तिसऱ्या गटातील मंदिरे नक्षीकामविरहित आणि मूर्तिशिल्पे नसलेली अशी अत्यंत साधी आहेत. पदविन्यासात अर्थातच चतुरस्त्र वा आयतस्त्र पद्धतीची असतात, कारण बाह्यांग क्षिप्त आणि उत्क्षिप्त प्रकाराने बांधलेले नसते. शिवाय त्यावर आता अर्धस्तंभांचीही रचना नसते. आतून ही मंदिरे साधी असतात. गाभाऱ्यांची दारे तीन शाखांची म्हणजे कनिष्ठद्वार गटातील असतात. ही सर्व मंदिरे यादवांच्या पडत्या काळात, म्हणजे इसवीच्या १३ व्या शतकाच्या अखेरीस व १४ व्या शतकाच्या प्रारंभी उभारलेली असावीत. अशी मंदिरे पिंगळी, चारठाणे, राहेर, येळंब, भोगाव, सिल्लोड, रामलिंगमुद्‌गड, रामपूर, इत्यादी ठिकाणी आहेत.

ही सर्व मंदिरे पदविन्यासाच्या दृष्टीने दोन गटांत विभागता येतील—(अ) चतुरस्त्र (आर्थोगोनल) व (ब) वृत्तसंस्थान म्हणजेच तारकाकृती. या प्रकारात चौकोन स्वकेन्द्रबिंदूभोवती फिरविल्याने जेवढे कोन येतात त्या कोनांनुसार मंदिरांची (बहुधा गर्भगृहांची) रचना केलेली असते. यातील काही मंदिरे, उदा. निलंगे,

बीड, उमरगे, माणकेश्वर येथील, त्रिदल असूनही तारकाकृती रचनेची आहेत.

गर्भगृह आणि सभामंडप भिन्न स्वरूपांचे वा वेगळ्या पद्धतींनी सांधले जात असत असे वरील सर्व मंदिरांचे पदविन्यास पाहता ध्यानात येते. त्यांची थोडक्यात माहिती अशी :

(अ) चौकोनी गर्भगृहासमोर चौकोनीच सभामंडप, पण सांध्याच्या ठिकाणी मात्र दोन्ही चौकोनांचे कोन एकमेकांसमोर आलेले आहेत अशी रचना.

(ब) गर्भगृहाच्या चौकोनाचा एक कोन सभामंडपाच्या चौकोनाच्या एका बाजूला भिडलेला असतो. अशी रचना निलंगे, आंबेजोगाई इ. ठिकाणी आढळते.

(क) चौकोनी गाभाऱ्यासमोर चौकोनी सभामंडप. ही त्यातल्या त्यात अगदी सरळ, सोपी रचना होय.

(ड) चतुरस्र गर्भगृहासमोर आयतस्र सभामंडप.

अशा सर्व प्रकारानी बांधलेली मंदिरे मराठवाड्यात आढळतात. इतरत्र आढळतो त्याप्रमाणे येथील मंदिरांचा गाभारा आतून अगदी साधा, नक्षीकामविरहित भिंतींचा असतो. गर्भगृहाच्या मध्यभागी शिवलिंग प्रस्थापिलेले असते. क्वचित् ही शिवमंदिरे सभामंडपापेक्षा थोड्या खोलवर असतात. दोनतीन पायऱ्या प्रसंगी उतरून गाभाऱ्यात जावे लागते. अन्य देवतांच्या मंदिरांत गाभाऱ्याच्या मागील भिंतीस लागून मुख्य देवतेची मूर्ति अधिष्ठानावर प्रतिष्ठापिलेली आढळते.

अधिष्ठान

यापैकी काही मंदिरे उंच जोत्यांवर उभारलेली आहेत. त्यामुळे खजुराहो येथील मंदिरांची जगती असते तसे येथे उंच अधिष्ठान आढळते. अशी मंदिरे अन्वा, उमरगे, धारासूर, आंबेजोगाई (येथील गणेश मंदिर), पिंगळी इत्यादी ठिकाणी आहेत. यांना आपण उपपीठ म्हणू या. त्यांवर विविध थरांचे अधिष्ठान असते. या उपपीठांमुळे मंदिरांना प्रदक्षिणापथ उपलब्ध झालेला आहे. काही ठिकाणची मंदिरे कमी उंचीच्या ओट्यावर उभी आहेत, उदा. माणकेश्वर, निलंगे, इत्यादी आणि काहीतर ओट्यावर नाहीतच. जमिनीतून एकदम वर आलेली अशी ती दिसतात, अशोकस्तंभासारखी !

मंदिरांच्या अधिष्ठानाला पद्म (उलटे), कणी, कुमुद, कुंभ, पद्म (सुलटे), उपान इत्यादी प्रकारचे थर असतात. याशिवाय कीर्तिमुख, गज, अश्व आणि नर थरही असतात. मराठवाड्यात औंढा नागनाथ येथील अधिष्ठान सोडले तर बाकी ठिकाणी असलेल्या अधिष्ठानाना (पीठाला) चार थर नाहीत. आणि पेडगावच्या लक्ष्मीनारायण मंदिराचे अधिष्ठान सोडले तर ते महाराष्ट्रातही अन्यत्र आढळत नाहीत. गुजरातेत मात्र अशी अधिष्ठाने बरीच आढळतात.

मंडोवर

मंडोवर म्हणजे अधिष्ठानावरची व कपोतापर्यंतची मंदिराची भिंत. याचा प्रारंभीचा भाग जंघा म्हणून संबोधिला जातो. आणि या भागावर असतात शिल्पे. यापैकी क्षिप्त भागावर देवदेवतांच्या मूर्ती असतात तर उत्क्षिप्त भागावर बहुधा सुरसुंदरींच्या प्रतिमा असतात. मराठवाड्यात अशी शिल्पयुक्त जंघा असलेली मंदिरे अन्वा, अंभई, औंढा नागनाथ, धारासूर, आंबेजोगाई (आमलेश्वर मंदिर), बीड, निलंगे, इत्यादी ठिकाणी आढळतात. पैकी औंढा नागनाथ येथील मंदिराचे आणखी एक वैशिष्टय सांगता येईल. येथे द्विजंघा आहे. म्हणजेच शिल्पांची दोन आवर्तने (पट्ट्या) वा वेढे मंडोवराला आहेत. खजुराहो येथील मंदिरांना असे तीन वेढे (त्रिजंघा) आढळतात. महाराष्ट्रात त्रिजंघा असलेले फक्त एक मंदिर मार्कंडी येथे आहे.

शेवटच्या गटातील मंदिरांच्या मंडोवरांवर क्वचित् थोडे नक्षीकाम व अर्ध-स्तंभांची रचना आढळते.

शिखर

महाराष्ट्रातल्या इतर भागांतील मंदिरांप्रमाणेच मराठवाड्यातील मंदिरांनीही शिखरे गमावलेली आहेत. काही मंदिरांना ती मुळातच नसावीत. असलेल्या शिखरां-वरून असे अनुमान काढता येते की येथील शिखरे उत्तरेकडील नागर पद्धतीची मूलमंजिरीभोवती उरुशृंगांचे पुंजके वा वेढे असणारीही नाहीत, आणि द्राविड पद्धतीची पायऱ्या-पायऱ्यांचीही नाहीत. येथील शिखरांना चार मुख्य दिशांना रहपग (लता) असतात. या पट्टिका कपोतापासून निघून वर आमलकाला भिडतात. त्यांच्या अंगावर नक्षी असते. तळाशी असलेल्या चैत्याकृती कोनाड्यात एखादी प्रतिमा (सिन्नरचे देऊळ) वा कलश (सातगावचे देऊळ) असतो. या चारही पट्टि-कांच्या (रहपगांच्या) मधल्या जागेत शिखराच्या लहान लहान प्रतिकृती (शिखरिका) एकावर एक रचलेल्या असतात. या शिखरिकांना कूट म्हणायचे व ते ज्या स्तंभिकांवर असतात त्याना कूटस्तंभ म्हणायचे. बहुधा प्रत्येक भागात एकावर एक असे सात कूट असतात. साऱ्या महाराष्ट्रात, जेथे शिखर आहे तेथे अशाच पद्धतीचे ते आढळतात. फक्त अंबरनाथ येथील शिखर कूट व कूटस्तंभ यांनी युक्त नसून तेथे फक्त कूटस्तंभांचीच उतरंड आढळते. कदाचित् हे सर्वांत आधीचे शिखर असलयामुळे पूर्णपणे विकसित झालेले नसावे.

येथे आणखी एक गोष्ट सांगायला हवी. ही शिखरे विटांची वा पाषाणांची असतात. मराठवाड्यात पैठणजवळ सांवखेड येथील शिखर पाषाणाचे होते, तर धारासूर येथील गुप्तेश्वर मंदिराचे शिखर विटांचे आहे. या प्रकारच्या शिखरांना (दगडांचे वा विटांचे) भूमिज पद्धतीचे शिखर म्हणतात.

मंडपावरील छत सामान्यपणे सपाट असते. पण काही ठिकाणी ते संवरण म्हणजे घंटेच्या आकाराचे व काही ठिकाणी फनसन पद्धतीचे म्हणजे लहान लहान होत जाणाऱ्या पायऱ्यांचे असते. मराठवाड्यातील मंदिरांच्या मंडपांवर काही ठिकाणी फनसन पद्धतीचे शिखर आढळते, उदा. धारासूर येथील मंदिर.

अंतरालावरही छत असते ते गजपृष्ठाकृती. त्याच्या समोरील बाजूस देवकोष्ठ असून त्यात मंदिरातील देवतेची प्रतिमा असते. या छताला शुकनासिका म्हणतात. क्वचित् ठिकाणी तिच्या दोन्ही अंगांसही मूर्ती कोरलेल्या असतात.

प्रवेशद्वारे

सभामंडपासमोर येते त्याला मुखमंडप म्हणायचे. ते मराठवाड्यातील अनेक मंदिरांत आहे आणि जर मंडपाला तीन प्रवेशदारे असतील तर दोन्ही अंगांच्या दारांसमोर असतात त्यांना अर्धमंडप म्हणतात. औंढा नागनाथ येथे अशी रचना आहे.

गाभाऱ्याच्या दारांची चौकट उभ्या पट्टिकांची असते. त्यांना शाखा म्हणतात. मराठवाड्यात तीन, चार, सहा व सात अशा शाखांची प्रवेशदारे आहेत. एक ते तीन-पर्यंत शाखा असतील तर अशी दारे कनिष्ठद्वार, चार असतील तर मध्यमद्वार आणि पांचापेक्षा अधिक असतील तर त्यांना ज्येष्ठद्वार म्हणतात. ज्येष्ठद्वार पाच शाखांचे असेल तर ते नंदिनी प्रकारचे, सहाचे असेल तर मालिनी आणि सात शाखांचे असेल तर हस्तिनी प्रकारचे असते. अशी प्रवेशद्वारे अनुक्रमे उत्तरेश्वर, नीलकंठेश्वर, माणकेश्वर इत्यादी ठिकाणी आहेत. येथील शाखा अशा : पुष्पशाखा, व्याल, स्तंभ, पद्म, नर, विद्याधरशाखा इत्यादी. या शाखांच्या तळाशी गंगा, यमुना, शैव वा वैष्णव द्वारपाल, चामरधारिणी इत्यादींची योजना आढळते. दाराच्या चौकटीची खालची बाजू म्हणजे उंबरठा व वरची ललाटपट्टिका. उंबरठ्याला मधोमध मंदारक (क्षिप्त-भाग) व त्याचे आजूबाजूस कीर्तिमुखे असतात. ही रचना बहुधा सर्वच मंदिरांत आढळते. या उंबरठ्याच्या समोर क्वचित् चंद्रशिलाही असते. औंढा नागनाथ येथे ही आढळते. ललाटावर जी प्रतिमा असते तिला ललाटबिंब म्हणतात. येथील देवळांत या ठिकाणी श्रीगणेश, लक्ष्मी, देवी, गरुड वा भैरव यांची बिंबे आहेत. ललाट-पट्टिकेच्या वरील अंगाला उत्तरांग असे संबोधतात. काही ठिकाणच्या उत्तरांगांवर शेषशायी, सप्तमातृका, नवग्रह वा ब्रह्मा–विष्णु–महेश यांची योजना आढळते. काही उत्तरांगे कोरीच आहेत.

अंतराल

गर्भगृह व सभामंडप यांना सांधणारे हे लहानसे दालन असते. हे फार लहान असेल तर प्राग्रीवा म्हणायचे. या अंतरालाच्या दोन्ही भिंतींत देवकोष्ठ असते व त्यात मूर्तींची स्थापना केलेली आढळते. बऱ्याच ठिकाणी ती रिती आढळतात.

अंतरालाला प्रवेशद्वार असे नसते. काही देवळांत, अंतरालात जायचे तर दोन खांबांतून जावे लागते. हे खांब काही ठिकाणी स्तंभपुत्तलिकायुक्त आहेत, उदा. होट्टल, राजापूर.

सभामंडप

सामान्यतः मराठवाड्यातील मंदिरांत हे दोन प्रकारचे आहेत. पहिला प्रकार गूढ मंडपाचा, म्हणजे चोहोकडून भिंती असलेल्या मंडपाचा व दुसरा प्रकार उघडा मंडप होय. आकाराने हे चौकोनी व आयातस्त्र असतात. मंडप उघडा असेल तर त्याच्याभोवती अर्धभिंत असते व तिच्यावर ठेंगणे स्तंभ छत तोलून धरण्यासाठी असतात. धारासूर येथील मंडप जालवातायनाने युक्त आहे. हा मधला मार्ग झाला. उघड्या मंडपाला समोरच्या बाजूस कक्षासने असतात.

मंडपांच्या मधोमध रंगशिला असते. ही चौकोनी वा वृत्ताकार असते. तिच्या चारी कोपऱ्यांत स्तंभ असतात. क्वचित् आठ स्तंभही असतात (उदा. औंढा नागनाथ). मंडपाच्या चोहोबाजूंस ओसरी वा कक्ष असतात. तेथेही स्तंभ असतात. काही सभा-मंडप स्तंभविरहित असतात. असा मंडप भोगाव येथे आहे आणि महाराष्ट्रातील झोडगे, लोणार, कोकमठाण, कोथली इत्यादि ठिकाणीही आहे.

स्तंभ

मराठवाड्यातील मंदिरांचे स्तंभ चौकोनी स्तंभपादाचे, अष्टकोनी मध्यभागाचे आणि शीर्षभागी गोल असलेले आहेत. मात्र निरनिराळ्या ठिकाणच्या स्तंभांवरील कलाकुसर भिन्न स्वरूपाची आहे. काही स्तंभांचा खालचा पीठाचा भाग लहानसे पञ्जर व त्यांत एखादी प्रतिमा असलेला असतो, तर काही स्तंभांचा आयताकार भाग कोरा वा शिल्पव्यापृत असतो (उदा. अन्वा, माणकेश्वर, येळंब). यावर येतो स्तंभमध्याचा चौकोनी भाग. त्याच्या चारही पृष्ठभागी कीर्तिमुखे वा रामायण महाभारतातील प्रसंग वा अन्य देवता–प्रतिमा असतात. हा चौकोनी भाग खालील भागाशी एका अष्टकोनी पट्टिकेने सांधलेला असतो. यावरचा भाग वर्तुळाकार असून वर किंचित् निमुळता होत जातो. त्यावर एकादा त्रिकोण वा उद्‌गमाची नक्षी असते.

स्तंभशीर्ष कणी भागाने स्तंभमध्याशी जोडलेले असते. मराठवाड्यातल्या मंदिरांतील स्तंभशीर्षे दोन प्रकारची आहेत : (१) पद्माकाराची, (२) घट–पल्लव पद्धतीची. दुसरी पद्धत फारशी लोकप्रिय नव्हती असे आढळते.

या स्तंभशीर्षांवर येतो तो चौफुली आकाराचा भाग. याला हस्त म्हणतात. येथे बदामीच्या लेण्यांतील हस्तांसारखे तरंग हस्त आढळत नाहीत. यांना बहुधा कीचक वा भूत यांनी उचलून धरलेले असते (औंढा, बीड, निलंगे). काही ठिकाणी उलटे नागशीर्षही आहे (अन्वा, माणकेश्वर).

औंढा नागनाथ व अन्वा येथील स्तंभ विष्णुक्रांत म्हणजे पदविन्यासात अष्टकोनी आहेत.

वितान

गुर्जरदेशी आढळतात तशी शिल्पसमृद्ध विताने मराठवाड्यात क्वचितच आढळतात. मात्र येथील मंदिरांतील वितानेही प्रामुख्याने दोन प्रकारची आहेत– समतल आणि उत्क्षिप्त क्षिप्त.हे दोन प्रकार मिळून जेवढे उपप्रकार होऊ शकतील– उदा. क्षिप्तोक्षिप्त, सम-क्षिप्त इत्यादी– तेवढे प्रकार येथेही अर्थातच आढळतात, पण ते साधे आहेत. बारीक व खूप मोठ्या प्रमाणात त्यांवर नक्षी आढळत नाही. अन्वा येथील मंदिरांतील वितान करोटक पद्धतीचे व देखणे आहे. ते विद्याधरपट्टिका, कोल, गजतालु, लूम यांनी युक्त असून त्यांच्या मध्यात मदनिकांची शिल्पे आहेत. शिवाय केंद्रस्थानातून पद्मशिलेचे लंबक लोंबते आहेत. सोन्याचांदीत असते तसे नक्षीकाम त्याला आहे.

शिल्प

इतरत्र आढळते तशीच स्थिती येथे या बाबतीत आहे. मंदिरांच्या अंगोपांगांवरील शिल्प मराठवाड्यातही आढळते–स्तंभावर, वितानावर, मंडोवरावर व शिखरावर. यातील भूमिती पद्धतीचे व कलाकुसरीचे नक्षीकाम सोडले तर स्त्रीपुरुषांच्या आणि देव-देवतांच्या प्रतिमा येथे आढळतात. काही ठिकाणचे शिल्प उत्कृष्ट आहे हे मान्य करावे लागते (उदा. धर्मपुरी, व्होट्टल, मुखेड). यात प्रामुख्याने सुरसुंदरींची शिल्पे येतात. शेलाट्या बांध्याच्या, सद्‌असद्‌संशयगोचरोदरी, करभोपमोरू असलेल्या स्त्रियांची अनेक शिल्पे विविध विभ्रमांत आढळतात. पदीची नूपुरे सोडणारी, कुंतलात गुंतलेले कुंडल काढणारी, कर्पूरमंजरी वा आरशात पाहून केशरचना करणारी ललना येथे हमखास आढळते.

मूर्तिशिल्पांचा विचार करताना औंढा नागनाथाचे देऊळ विचारात घ्यावेच लागते. त्याचे मुख्य कारण असे की, सामान्यतः कोरीव लेण्यात आढळतात त्या मूर्तीही येथे मंडोवरावर आढळतात, आणि दुसरे म्हणजे, मराठवाड्यातील मंदिरांवर साधारणपणे न आढळणाऱ्या वा क्वचित् आढळणाऱ्या मूर्ती येथे आढळतात. त्यामध्ये कल्याणसुंदरमूर्ती, रावणानुग्रहमूर्ति-शिव, रावण आपली दहा तोंडे शिवाला अर्पण करीत असलेले शिल्प, लिंगोद्भवमूर्ति, गजासुर, सदाशिव, उच्छिष्ट गणेश, मधु·कैटभारि विष्णु, विश्वरूप विष्णू, इत्यादी मूर्तींचे उल्लेख करता येतील.

इतर नेहमी आढळणाऱ्या, म्हणजे उमामहेश्वर, पार्वती, नृत्यगणेश, भैरव, अंधकासुरवधमूर्ती, दुर्गा, महिषमर्दिनी, विष्णू, दशावतारपट्ट, सप्तमातृका, अष्टदिक्पाल, इत्यादी मूर्ती येथील देवळात अर्थातच आडळतात. मात्र हरिहर आणि

अर्धनारीश्वर या दोन प्रकारच्या मिश्र मूर्ती सोडल्या तर बाकीच्या ब्रह्मेशानजनार्दनार्क वगैरेसारख्या मिश्रमूर्ती मराठवाड्यात आढळत नाहीत.

मराठवाड्यातील मंदिरांची रचना, तिच्यातील विविधता, त्या मंदिरांची वैशिष्ट्ये, इत्यादि संबंधीचा ऊहापोह येथपर्यंतच्या विवेचनातून केला. औंढा नागनाथ, अन्वा, माणकेश्वर, अशी चार सहा मंदिरे वगळता येथे भव्य वा प्रचंड म्हणावीत अशी मंदिरे नाहीत हे मान्यच करावे लागते. पूर्वेकडील मंदिरांचे देखणेपण, चित्ताकर्षकता येथे नाही की दक्षिणेकडील मंदिरांचा प्रचंडपणा येथे आढळत नाही. गुजरातेतील वितानांची दर्शनीयता, मनोरमपणा येथे नाही, की मध्यप्रदेशातील मंदिरांचा नाजूकपणा येथे आढळत नाही. हे खरे असले तरी या देवळांचे स्वतःचे असे काही वैशिष्ट्य आहे हे नाकारता येत नाही. मुख्य म्हणजे अन्य ठिकाणच्या देवळांतून आढळणारी कामशिल्पे येथे नाहीत. मोजकी शिल्पे व तीही बहुधा नेटक्या रूपात येथे आढळतात.

येथील काही मंदिरे त्यांवरील शिल्पांसह मुसलमान आक्रमकांनी विरूप केलेली आहेत, तर काही तिकडे दुर्लक्ष होत आल्यामुळे धुळीला मिळत असल्याचे आढळते. असे असूनही मूर्तिभंजक हात आणि सर्वनाशी काळ असहाय ठरल्याचे दाखविणारी काही देवळे अजूनही ताठ उभी आहेत. त्यांचा दिमाख आणि डौल आजही दिसतो आणि महाशिवरात्रीसारख्या पवित्र दिवशी ती मंदिरे चैतन्याने सळसळतात. भक्तांचा महापूर तेथे लोटतो. हे दृश्यही काही देवळांचे भाग्यात असल्याचे आढळते.

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६२ : १-४, १९८३-८४

दुर्गद्वार-शिल्पे

प्र. के. घाणेकर
आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे

किल्ला शब्द उच्चारला की एखादी तटबंदीयुक्त जागा आपल्या नजरेसमोर येते. या तटबंदीने बंदिस्त असणाऱ्या जल, स्थल वा गिरिदुर्गावर जाण्यास काही मार्ग व प्रवेशद्वारे असतात. बऱ्याच किल्ल्यांवरील अशा दारांवर काही शिल्पे कोरलेली आढळतात. त्यांचा थोडाफार मागोवा या निबंधात घेण्याचा प्रयत्न केला आहे. दुर्गशिल्पे या विषयात (१) दुर्गांचे शिल्प वा दुर्गरचना, (२) किल्ल्यांवरील इमारतींचे शिल्प, (३) किल्ल्यांवर असणाऱ्या देवळांतील व अन्यत्र आढळणाऱ्या मूर्तींचे शिल्प, (४) किल्ल्यांच्या दारांवर आढळणाऱ्या काही आकृती, असे अनेक प्रकार अंतर्भूत आहेत. यामधील किल्ल्यांच्या दारांवर आढळणाऱ्या आकृतींसंबंधी केलेल्या निरीक्षणाबरोबरच अशा आकृतींविषयी मिळणाऱ्या इतरही माहितीचा विचार प्रस्तुत निबंधात केला आहे.

पुण्यातील भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेत उपलब्ध असलेल्या 'आकाशभैरवकल्प' या ग्रंथात २१ ते २७ षट्कांत दुर्गांची माहिती मिळते. त्यात प्रथम दुर्गाचे द्वार, तेथे वापरलेल्या शिलांचे स्त्री-पुरुष-नपुंसक शिला इ. प्रकार ह्याबद्दल माहिती सांगितल्यावर दुर्गद्वारशिल्पांसंबंधीची नोंद आढळते ती अशी—

> "प्रत्येक बाह्य दरवाजाखालील उंबरठ्यावर भद्रमुख कोरावे. वरच्या भागावर यक्ष राक्षसांच्या प्रतिमा उठावदार अशा कोरण्यात याव्यात. त्यांवर अतिभयंकर सिंहांच्याही आकृती ठसठशीत कोराव्यात."

यानंतर दारावरील गच्ची, दरवाजांचे प्रकार याबाबत विवेचन केल्यावर निरनिराळ्या दिशांना असणाऱ्या दारांवर कोणत्या आकृती कोराव्यात याबद्दल मार्गदर्शन केलेले आढळते :

> 'पूर्वदारावर विघ्नराज, पश्चिम दारावर भद्रकाली, दक्षिण दारावर उग्रदेवी (कालिका), तर उत्तर दारावर हनुमंत कोरावा,' असे म्हटले आहे.

मात्र माझ्या निरीक्षणात याप्रमाणे शास्त्रशुद्ध कोरलेल्या आकृती आढळल्या नाहीत. या आकृतींविषयी चर्चा करताना बऱ्याच अभ्यासकांनी या सर्वांनाच

'गंडभेरुंड' संबोधले होते. वस्तुतः गंडभेरुंड हा एका धडाला दोन शिरे असणारा एक काल्पनिक पक्षी आहे. विजयनगरचे राजे त्याचा राजचिन्ह म्हणूनही वापर करीत असत. शिवनेरी, रायगड, नळदुर्ग अशा मोजक्याच किल्ल्यांवर गंडभेरुंड कोरलेले आढळतात.

शरभ हा वाघसिंहांच्या कोटीतील काल्पनिक पशू बऱ्याच ठिकाणी कोरलेला आढळतो. त्याच्या चारही पायात तोंडे व कमरेत कमरपट्टाही कोरलेला आढळतो. काही ठिकाणी चार पायांच्या नखांमध्ये तसेच क्वचित् तोंड व शेपटीतही पकडलेले हत्ती कोरलेले आढळतात. बहुधा शरभ हा मुख्य सत्तेचे सांकेतिक प्रतीक व हे हत्ती त्याने जिंकलेल्या सत्तांचे प्रतिनिधित्व करत असावेत. शिवनेरी व रायगडावरील शरभांच्या पायात गंडभेरुंड पकडलेला आढळतो.

या दोन काल्पनिक प्राण्यांखेरीज घोरपडीचे चित्र प्रतापगडावर बालेकिल्ल्याच्या राजपहाऱ्याच्या दिंडीत तसेच शिवनेरीवर तिसऱ्या दरवाजावर कोरलेले आढळते.

हत्ती या प्राण्यासही दुर्गद्वार शिल्पांमध्ये स्थान मिळालेले आढळते. देवगिरी, रोहिडा, सिंहगडचा कल्याण दरवाजा इ. ठिकाणी हे हत्ती आढळतात.

दुर्गद्वार शिल्पांच्या अभ्यासकाला अलिबागचा पाणकोट उर्फ कुलाबा किल्ला फारच महत्त्वाचा वाटतो. या किल्ल्यास दोन प्रवेशद्वारे आहेत. पैकी मुख्य दरवाजावर ऋद्धि–सिद्धीसह गणपती, महालक्ष्मी, मोर, कोंबडा, हरीण इ. आकृती आढळतात, तर दुसऱ्या यशवंत/धाकटा/दक्षिण/दर्या दरवाजावर तर ऋद्धि–सिद्धीसह गणपतीबरोबर गरुड, हनुमंत कोरलेले आढळतात. त्याशिवाय दोन मगरी एकमेकांना विळखा घातलेल्या स्थितीत आढळतात. भंडारदरा धरणाजवळील प्रवरेचा उगम असणाऱ्या रतनगडाच्या प्रवेशद्वारावर देखील गरुड–हनुमंत कोरलेले आढळतात.

रायगडाच्या महाद्वारावरील शरभाच्या पायात पकडलेल्या एकाच हत्तीबरोबर त्या शरभाच्या डोक्यावरील शिंग विशेष लक्ष आकर्षून घेते. तर विजापूरच्या शर्जा बुरुजावर (जेथे मलिक-इ-मैदान म्हणजे रणस्वामिनी उर्फ मुलुख मैदान ठेवली आहे त्या बुरुजावर) शरभाबरोबर माकडासारखी एक आकृतीही कोरलेली आढळते.

जुन्नर परिसरातील चावंड किल्ल्यावर श्रीगणपतीस दरवाज्यावर स्थान मिळालेले आढळते. लोहगडावरील दारावर सुद्धा गणेशप्रतिमा आढळते.

पन्हाळा किल्ल्यावर तीन दरवाज्यांवरील मोर आणि उडणारा वाघ ही शिल्पे अशीच वैशिष्ट्यपूर्ण आहेत. तर जुन्नर गावास असणाऱ्या आठ वेशींपैकी सदर बाजारातील वेशीच्या दक्षिण बुरुजावर एक अभ्यसनीय शिल्प आढळते. त्यात एक हत्ती, त्याच्या पाठीवर शुक म्हणजे पोपट व त्यामागे तोंडात तारा धरलेला वाघ आहे. याचा अर्थ 'या शहरात गजांतलक्ष्मी, शुकासारखी विद्वत्ता आणि वैराग्य

तसेच वाघासारखे शौर्य असणारे व ताऱ्यांप्रमाणे तळपणारे शूर सेनानी राहतात.'

प्राण्यांइतके महत्त्वाचे स्थान वनस्पतींना मिळालेले आढळत नाही. बऱ्याच ठिकाणी कमळांच्या वेगवेगळ्या आकृती आढळतात. विशेषतः पद्मदुर्ग उर्फ कांसा किल्ल्यावर कमळाकृती अनेक प्रकारच्या आढळतात.

काही किल्ल्यांवर आकृतींबरोबर शिलालेखही आढळतात. सिंहगडच्या कल्याण दरवाज्यावरील जंजिरा उर्फ जझीरे मेहरूबा येथील दारावरचा, रोहिडा उर्फ विचित्र-गडावरील मराठी व फार्सी शिलालेख ज्ञात आहेतच. अर्नाळ्याचा शिलालेखही प्रसिद्ध आहे.

परंतु या शोधकार्यात राजगडासारख्या अतिचर्चित व असंख्यजणांनी पाहिलेल्या किल्ल्यावरील असंशोधित शिलालेखाचा मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो. आत खोदलेल्या अक्षरांचा हा शिलालेख पाली दरवाज्यातील पहारेकऱ्यांच्या देवड्यांच्या जोत्यावर जमिनीलगत कोरलेला नुकताच आढळला आहे. त्याचा पूर्ण अभ्यास करून मी त्याविषयी नंतर केव्हातरी शोध निबंध सादर करीन.

साताऱ्याच्या अजिंक्यताऱ्यावर सातारा दरवाज्याच्या पहारेकऱ्यांच्या देवड्यांवर वाली–सुग्रीव युद्धकथा आणि श्रीकृष्णासंबंधी काही प्रसंग कोरलेले आहेत, तर दरवाज्याच्या प्रत्येकी दोन्ही बुरुजांवर तळवटीत पूर्ण वेढा घातलेला नाग कोरलेला आढळतो.

या दुर्गद्वार-शिल्पांचा अभ्यास पूर्ण झालेला नाही. निरनिराळ्या कालखंडांतील, निरनिराळ्या राजवटीतील, निरनिराळ्या भूप्रदेशातील या किल्ल्यांच्या दारांवरील आकृत्यांचा पूर्ण ताळेबंद व त्यावरून काही निष्कर्ष आणखी अभ्यासानंतर सादर करण्याचा विचार आहे. पण किल्ल्यांच्या मुख्य दरवाज्यांवर अशा आकृती मोठ्या प्रमाणावर आढळतात. तर कमी महत्त्वाचे दरवाजे अनलंकृत आढळतात एवढेच सध्या सांगता येईल.

या दुर्गद्वार-शिल्पांचा तातडीने अभ्यास, किमान सर्वेक्षण करणे आता निकडीचे बनले आहे. कारण किल्ल्यांचा उपयोग संपल्याने तिकडे होणारे कमालीचे दुर्लक्ष, वारा–वादळ उन-पाऊस यांचा आघात, सतत होत असणारी पडझड आणि अलीकडे तेथे जाणाऱ्या मंडळींच्या अज्ञानामुळे त्यांची होणारी नासधूस, यामुळे या दुर्गशिल्पांचा अभ्यास जमला तर आताच नाहीतर कधीच नाही अशी स्थिती आली आहे.

या दुर्गद्वार-शिल्पांचे फोटो, रेखाचित्रे, मोजमापे याचबरोबर त्यांच्यापैकी किमान काही महत्त्वाच्या शिल्पांच्या प्लॅस्टर ऑफ पॅरीसच्या प्रतिकृती किंवा मूळ शिल्पे यांचा संग्रह एखाद्या मध्यवर्ती ठिकाणी होणे अगत्याचे वाटते.

या विषयावरील ह्या टाचणाचा मुख्य उद्देश, या शोधास काही दिशा व विचारप्रवाह मिळाल्यास त्यामुळे पुढील अभ्यास अधिक सुकर होईल हा आहे.

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६२ : १-४

मराठेशाहीतील भित्तिचित्रे

कमल चव्हाण
डेक्कन कॉलेज, पुणे

जुन्या वास्तूंच्या दर्शनी दरवाज्यावरील ललाटनिम्न हे आपल्या नेहमीच्या पाहण्यातले. या ललाटनिम्नाच्या ठिकाणी गणेशशिल्प कोरण्याची प्राचीन प्रथा आहे. मराठेशाहीत प्रवेशद्वारावर हा मंगलमूर्ती रंगरेषेच्या माध्यमातूनही विराजमान झालेला आढळू लागतो. भिंतीवर मंगलमूर्तीच्या या वारंवार घडणाऱ्या दर्शनाने, मराठेशाहीतील भित्तिचित्रांच्या माझ्या अभ्यासाचा श्रीगणेशा करून दिला असे म्हटल्यास वावगे होणार नाही. डेक्कन कॉलेजच्या पुरातत्व विभागात डॉ. म. श्री. माटे यांच्या मार्गदर्शनाखाली मराठेशाहीतील भित्तिचित्रांचा सांगोपांग अभ्यास करण्याचे मी ठरविले. जुन्या अणि जाणकार लोकांनी, कोणकोणत्या ठिकाणी चित्र-काम पहावयास मिळेल याची माहिती मला पुरविली. विशेषतः कै. प्रा. ज. द. गोंधळेकर यांनी दिलेल्या माहितीचा अतिशय उपयोग झाला, याचा मुद्दाम उल्लेख केला पाहिजे. तळेगावच्या सेनापती दाभाड्यांच्या भव्य वाड्यात सुंदर भित्तिचित्रे होती. आता मात्र या वाड्याचे भग्नावशेषच उरलेले आहेत. त्यातील चित्रकामही नष्ट झाले. पण तत्पूर्वी १९५७ मध्ये डेक्कन कॉलेजचे डॉ. झेड. एम्. अन्सारी यांनी या चित्रकामाची सुरेख छायाचित्रे घेऊन ठेवलेली होती, ती त्यानी आठवणीने माझ्या हवाली केली. अशा प्रकारे दाभाड्यांच्या वाड्यातील तसेच मराठेशाहीतील सुंदर चित्रकामाचे नमुने माझ्या हाती आले. दाभाडेवाड्यातील या भित्तिचित्रांवर १९७४ मध्ये भा. इ. सं. मंडळाच्या वार्षिक संमेलनात मी एक निबंध वाचला. मंडळाचे त्या वेळचे अध्यक्ष कै. दत्तो वामन पोतदार यांनी आपल्या भाषणात मराठा संस्कृतीच्या या शाखेच्या अभ्यासाचे महत्त्व प्रतिपादन करून मला प्रोत्साहन दिले. यापूर्वी मराठा वास्तुशिल्प आणि कलेच्या अभ्यासाच्या निकडीचा उपोद्घात प्रसिद्ध संशोधक हर्मन गोएटस् यांनीही आपल्या एका लेखात करून ठेवलेला आहे.[1]

मराठेशाहीतील भित्तिचित्रांचा शोध घेण्यासाठी, मराठाकाळात भरभराटीत असलेल्या ठिकाणी भ्रमंती करावी लागते. हे काम तितकेसे सोपे नाही. कारण कित्येक इमारती जमीनदोस्त झालेल्या किंवा खूप पडझड झालेल्या स्थितीत आढळून येतात. सजावटीचे कसलेच अवशेष त्यातून प्राप्त करणे अवघड. अनेक जुन्या वास्तूंतून नवीन फेरबदल झाल्यामुळे त्यातील चित्रकाम नष्ट झाले आहे.

काही ठिकाणी चित्रकामावर चुन्याचा हात दिल्यामुळे किंवा डी. डी. टी. चा फवारा मारल्यामुळे रंगकाम दृष्टीआड झालेले आढळून येते. मात्र नष्ट होण्याच्या मार्गावर असलेले, वाठार आणि वाई या ठिकाणचे काही चित्रकाम घरमालकाच्या परवानगीने गिलाव्यासकट काढून आणण्यात यश मिळाले आहे. हे नमुने डेक्कन कॉलेजच्या संग्रहालयात ठेवलेले आहेत. अशा प्रकारे जुन्या चित्रकामाच्या जतनाचा हा प्रयत्न अर्थातच अतिशय अपुरा आहे.

मराठा अमदानीतील चित्रकामाची सामान्यपणे अशी दुरवस्था असली तरी या चित्रकामाचा काही भाग पेशवाईतील काही वास्तूंतून अजूनही शिल्लक उरलेला आहे. त्या वेळच्या मातब्बर आणि श्रीमंत मंडळींचे वाडे, हवेल्या तसेच देवालये, मठ इत्यादी धार्मिक वास्तूंतून प्रामुख्याने चित्रकाम पहावयास मिळते. चित्रकामाचे सर्वांत जास्त नमुने सातारा जिल्ह्यात आजमितीला उपलब्ध होतात. खुद्द साताऱ्याला, तसेच वाई, मेणवली, वाठार, पाल, वडगाव आदी ठिकाणी छत्रपती, रास्ते, फडणीस पटवर्धन, जोशी, निंबाळकर आदि नामवंत मंडळींच्या वास्तूंतून चित्रकाम आढळून येते. पुणे जिल्ह्यात, खुद्द पुण्यात, पेशव्यांच्या शनवारवाड्याच्या दर्शनी दरवाज्याच्या आतील भागात गणेश आदी देवतांची मोठी चित्रे आहेत. याखेरीज पुण्यात नाना फडणविसाचा वाडा, बेलबागेतील विष्णुमंदिर, बारामतीकर नाईक यांचा वाडा आदि इमारती चित्रकामाचे नमुने पुरवितात. पुण्याच्या नजीक पाषाणच्या सोमेश्वर महादेवाच्या मंदिरातून पौराणिक दृश्यांची रेलचेल आहे. मोरगावच्या मोरेश्वराच्या देवालयात, तसेच नजीकच्या पांडेश्वर येथील पांडेश्वर महादेवाच्या मंदिरातूनही काही चित्रकाम मानवी उपद्रवाला तोंड देत तग धरून आहे. दरेकर इनामदारांच्या आंमळ या गावी शिवमंदिरात चित्रकाम टिकून आहे. नाशिक शहरी जगद्गुरुमठ, भद्रकालीमंदिर आणि इतर ठिकाणी चित्रावशेष सापडतात. या जिल्ह्यातील सर्वांत उल्लेखनीय चित्रकाम चांदवड येथील होळकरांच्या रंगमहालात पहावयास मिळते. याखेरीज सायखेडा, चांदोरी या ठिकाणी चित्रांची नोंद होते. अठराव्या शतकात निपाणी येथे मराठ्यांचा अंमल होता. या ठिकाणी निपाणीकर देसायांच्या वाड्यात कृष्णलीलेची अतिशय उत्कृष्ट चित्रे आहेत. नगर जिल्ह्यात बेनवडी गावी हरि नारायणस्वामी मठात विविध पौराणिक दृश्यांचे अंकन केलेले आहे. ही तर झाली मराठाकालीन चित्रकाम असलेली काही प्रमुख ठिकाणे. याखेरीज महाराष्ट्राबाहेर जेथे जेथे मराठ्यांची सत्ता नोंदली तेथे तेथे मराठ्यांनी आपल्या इमारतींतून सुंदर चित्रकाम करवून घेतले. गुजरातेत गायकवाड, तसेच माळव्यात शिंदे, होळकर, पवार आणि त्यांच्या सरदार मंडळींच्या आश्रयाने विपुल चित्रकाम झाले. अर्थात् तो सर्व तपशील या छोट्या लेखात देणे अशक्य आहे.

आता मराठा इमारतींतून कोणत्या ठिकाणी चित्रकाम असे ते आपण पाहू. वाड्याच्या दर्शनी भागावर, दिवाणखान्याच्या भिंतीवर, तसेच देवघर, शयनगृह,

चौकातील भिंतींवर प्रामुख्याने चित्रे रंगविलेली असत. देवालयात गाभारा, सभागृह, कळस, मुख्य देवालयाच्या भोवतालच्या ओवऱ्या यातून चित्रकाम असे.

भित्तिचित्रांचे थोडक्यात तंत्र असे असे : प्रथम कुडाच्या किंवा विटा–चुन्याच्या भिंतीवर गिलावा करण्यात येई. मग या गिलाव्यावर चुन्याचा हात किंवा कावेचा लाल रंग–ज्याला आबाशाही रंगही म्हणतात– देण्यात येई. आणि या पांढऱ्या किंवा लाल रंगाच्या पार्श्वभूमीवर इतर रंगांच्या साहाय्याने रंगकाम केले जाई. चित्रकामात वनस्पतिजन्य, खनिज, तसेच कृत्रिम रंगांचा वापर करण्यात येई. सोनेरी रंगांचा वापरही बऱ्याच ठिकाणी दिसून येतो. बाह्यरेषा काळ्या रंगात असत.

हे सर्व चित्रकाम पाहिल्यानंतर एक गोष्ट स्पष्ट जाणवते ती अशी की भिंतीवर चित्रकामाची योजना ही प्रामुख्याने इमारतीचे सौंदर्य वाढविण्याकरिता असे. किंबहुना प्राचीन काळापासूनच वास्तू, मूर्ती आणि चित्र, या गोष्टी अविभाज्य समजण्यात आलेल्या आहेत. इमारतीच्या निरनिराळ्या भागांतील चित्रकामाची योजना करताना चित्रतलाची उपलब्धता, त्या जागेचे महत्त्व, आणि रंगकामाचा परिणाम यांचा विचार केलेला असे. थोडक्यात अभिव्यक्तीचे एक स्वतंत्र माध्यम यापेक्षा वास्तुशिल्प सुशोभनातील एक प्रमुख घटक या रूपातच चित्रकलेला अधिक महत्त्व होते. आणि चित्रकलेला हा दर्जा प्राप्त होण्याला कारणीभूत होत्या तत्कालीन वास्तुशिल्पशैलीतील प्रवृत्ती.

साधारणपणे १७३० नंतर महाराष्ट्रात बांधकामनिर्मितीला खूप वेग आला. या निर्मितीमागे उत्तर भारतातील, मुख्यत्वे राजस्तान आणि माळव्यातील कला आणि संस्कृतीच्या प्रेरणा व प्रभाव यांचा मोठा वाटा होता. या प्रभावाच्या अंतर्गत मराठा इमारतींमध्ये चित्रकामाच्या योजनेत राजस्तानी परंपरेचा स्वीकार झालेला दिसून येतो. पण यामुळे महाराष्ट्रातील चित्रकाम म्हणजे राजस्तानी किंवा माळव्यातील चित्रकामाची प्रतिछाया आहे असे म्हणणे बरोबर नाही. महाराष्ट्रातील चित्रकामाची स्वत:ची अशी वैशिष्ट्ये आणि प्रवृत्ती निश्चितच विकसित झाली होती. या संदर्भात प्रथम आपण चित्रविषयांकडे वळू. मराठेशाहीत निर्मित झालेल्या चित्रकामाचे विषय उत्तर भारतातील चित्रकामापेक्षा फारसे निराळे नाहीत असे वरवर पाहता वाटते. दोन्ही ठिकाणच्या चित्रकामांतून पौराणिक आणि धार्मिक विषयांचे प्राधान्य आहे. पण उत्तर भारतातील चित्रकामात पौराणिक दृश्यांच्या खालोखाल तत्कालीन वाङ्मयातील विषय म्हणजे रागमाला, बारहमासा आदींचे विपुल चित्रण झालेले आहे. महाराष्ट्रात या विषयांची चित्रमाला, एखादा अपवाद सोडता, चित्रित झालेली दिसून येत नाही. या विषयाच्या मालिकेतील काही चित्रे मात्र सुट्या रूपात काही ठिकाणच्या चित्रकामात आपली हजेरी लावतात. पण संपूर्ण चित्रसंयोजनात त्यांचे स्थान अतिशय गौण स्वरूपाचे असे आहे. जागा भरून काढण्यासाठी दुय्यम स्वरूपाची रूपके एवढाच त्यांचा उपयोग झालेला दिसून येतो.

मराठा चित्रकामात वाङ्मयीन प्रसंगांवर आधारित दृश्यांचा अभाव असला तरी काही मराठा संस्कृति-निदर्शक विषय मात्र रंगविलेले आढळतात. अशी दृश्ये म्हणजे फुगडी, राजपुरुषांची भेट, दरबारातील नाचरंग, राजपुरुषांची मिरवणूक इत्यादी. पण भक्तिमार्गाचा विलक्षण पगडा असलेल्या परंपराप्रिय मराठा समाजाच्या कलाविलासाच्या कल्पनेत देवलीलांचे स्थानच सर्वांत मोठे होते हेच खरे.

दुसरे म्हणजे धार्मिक विषयांच्या निवडीमध्ये आणि प्रस्तुतीकरणात देखील मराठा चित्रकामात इतर प्रांतीय चित्रकामापेक्षा निराळेपणा जाणवतो. मराठा भित्ति-चित्रांतील आकृतीची महाराष्ट्री पद्धतीची वेषभूषा हे तर या चित्रकामातील अगदी ढोबळ असे वैशिष्टय दाखविता येईल. स्त्री-आकृती नऊवारी साडी आणि चोळी या वेषात दिसते, तर पुरुषाच्या वेषभूषेतील पेशवाई पगडी आणि लालकाठाचे धोतर लक्ष वेधून घेतात. स्त्रियांच्या कपाळावरील आडवी चिरी, नाकातील नथ, केसांचा खोपा किंवा डोक्यावरचा पदर ही खास मराठा संस्कृतीची निदर्शक आहेत. पार्श्व-भूमीतील वास्तुशिल्पाच्या चित्रणातही वेगळेपणा जाणवतो. कमी उंचीच्या, शरिराच्या मानाने मोठे डोके असलेल्या आकृती चित्रणाचा निराळेपणा दाखवितात. जोमदार आणि गतिमान रेखांकन हेही मराठा चित्रकामाचे सुस्पष्ट असे वैशिष्टय आहे.

मराठा चित्रकामातील ही वैशिष्टये, महाराष्ट्रात स्थानिक आणि जुनी अशी चित्रकलेची परंपरा होती काय या दिशेने विचार करायला प्रवृत्त करतात. या संदर्भात प्रथम आठवण होते ती या भूभागातील अजिंठ्याच्या प्राचीन भित्तिचित्रांची. यानंतर दहाव्या शतकातील वेरूळ येथील व इतर ठिकाणचे काही तुरळक नमुने वगळता चित्रकाम दृष्टीस पडते ते उत्तर मराठेशाहीत. म्हणजेच, दहावे शतक ते अठरावे शतक यांच्या मधला जो काळ आहे त्यातील चित्रकलेच्या नमुन्यांचा अभाव आहे. आता ज्या भूभागातून अजिंठ्यासारखी श्रेष्ठ कलापरंपरा, जवळजवळ सात शतके एवढ्या लांबलचक कालखंडात नांदली ती अचानक नष्ट होणे शक्य नाही. चांगल्या वा वाईट रूपात तिचे सातत्य कायम राहाणे हेच सयुक्तिक दिसते. पण हे मान्य करायला दुर्दैवाने प्रत्यक्ष नमुन्यांचा आधार नाही. अशा परिस्थितीत चित्रकलेच्या या अज्ञात काळाचा मागोवा घेण्यासाठी आपल्याला जे साधन उपलब्ध आहे ते म्हणजे महाराष्ट्रातील वाङ्मय.

अगदी प्राचीन काळापासून महाराष्ट्रात विपुल वाङ्मयनिर्मिती झालेली आहे, आणि चित्रकलेविषयीचे उल्लेखही ' गाथा सप्तशती ' या महाराष्ट्री प्राकृत आदि-काव्यापासूनच मिळू लागतात. पुढे अजिंठा, वेरूळ या ठिकाणी चित्रकामाचे प्रत्यक्ष नमुने उपलब्धच आहेत. चालुक्य राजा सोमेश्वर याने लिहिलेल्या ' मानसोल्लास ' या बाराव्या शतकातील ग्रंथात चित्रकलेच्या तंत्राविषयी सांगोपांग चर्चा येते.[२] राष्ट्रकूट-कालीन ' यशस्तिलक ' या जैन ग्रंथात जैन मंदिरांतील भित्तिचित्रांचा उल्लेख आहे.[३] चित्रकलेच्या संदर्भात ' विष्णुधर्मोत्तरपुराण ' या प्राचीन आणि महत्त्वपूर्ण ग्रंथातील

चित्रविषयक संज्ञांचा वापरही 'यशस्तिलका'च्या रचनाकाराने केलेला आहे. मराठीचे सुरुवातीचे वाङ्मय महानुभावांचे. महानुभावी वाङ्मयात चित्रकलेचे विपुल उल्लेख येतात. यातून प्रामुख्याने तत्कालीन चित्रविषयांची माहिती मिळते. पुढे ज्ञानेश्वर आदि संतकवींनी अध्यात्मचर्चेच्या संदर्भात भित्तिचित्रांच्या रूपकांचा वारंवार केलेला वापर, या कलाशाखेच्या प्रचलनाची साक्ष देतो. पंडित कवींपैकी 'चोभा' या कवीच्या 'उषाहरण' काव्यातील भित्तिचित्रांचा उल्लेख प्रस्तुत संदर्भात खूपच महत्त्वाचा आहे.[४] वर्णनाच्या ओघात कवीने भित्तिचित्रांचे तत्कालीन तंत्र शब्दबद्ध केलेले आहे. या तंत्राचे अजिंठा[५] येथील तसेच 'मानसोल्लास' या ग्रंथातील चित्रतंत्राशी बरेच साम्य आहे. शिवकालीन चित्रकामाचे अस्तित्व रामदासस्वामींच्या कारखाने प्रकरणातील चित्रशाळेच्या संदर्भात स्पष्ट जाणवते. पुढे शाहिरी वाङ्मयांत तर चित्रकामाच्या उल्लेखांची रेलचेल आहे.[६] या उल्लेखांपैकी शाहीर प्रभाकराने, खाशा स्त्रीच्या रंगीत हवेलीतील भित्तिचित्रांची जी यादी काव्यबद्ध केली आहे, त्याबरहुकूम प्रसंगांची चित्रमालिका काही जुन्या वाड्यांतील भितींवर अजूनही विद्यमान आहे.

मराठा भित्तिचित्रविषयक प्रत्यक्ष नमुने आणि वाङ्मयीन उल्लेखांतील सर्व माहितीचा परामर्श घेतल्यानंतर काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात येतात. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे या भागात चित्रकलेची अखंडित अशी परंपरा होती याविषयी संशय राहत नाही, एवढेच नव्हे तर मराठा चित्रकामाची गंगोत्री ज्या परंपरेत होती ती या भागापुरती मर्यादित नसून तिचे स्वरूप देशव्यापी असे होते. म्हणूनच अजिंठा परंपरेतील चित्रे मध्यप्रदेशातील बाघगुंफेतही दिसतात, तर वेरूळ येथील जैनशैली किंवा पश्चिम भारतीय शैलीतील आकृत्या, उत्तर भारतातील मदनपूरच्या विष्णुमंदिरात[७] किंवा ग्वाल्हेरच्या[८] मानतोमरच्या महालातील सजावटीत आढळतात. यावरून असे वाटते की देशात निरनिराळ्या कालखंडांत, निरनिराळ्या भागांत स्थानिक वैशिष्ट्ये अवश्य विकसित होत आणि त्याच आधारावर विशिष्ट भागातील, काळातील चित्रकामाची ओळख पटे, हे जरी खरे असले तरी काही प्रवृत्ती, प्रवाह हे सर्वत्र समान असत.

मध्ययुगात कला आणि संस्कृतीच्या क्षेत्रात खूपच महत्त्वपूर्ण अशा घडामोडी घडल्या. त्यांचे पडसाद देशातील सर्वच भागांत कमीअधिक प्रमाणात उमटले. मध्ययुगीन कलेत प्रविष्ट झालेल्या इस्लामी कलाप्रवाहांनी भारतीय संस्कृती आणि कलाक्षेत्रात मोठे बदल निर्माण केले हे सर्वविदित आहे. या परदेशी प्रवाहाना उत्तर भारतीय कलेत प्रथम प्रवेश मिळाला. त्यांची व्याप्तीही या भागात लक्षणीय अशी होती. मूळ प्रवाहाला धक्का न लावता येऊन मिळालेल्या या नवीन प्रवाहांनी कलेच्या सर्वच शाखांना चैतन्य आणले. भित्तिचित्रकलेच्या संदर्भात पाहिले तर सर्वांत लक्षणीय गोष्ट म्हणजे नवीन वास्तुशिल्पशैलीला अनुकूल असणारी बदललेली चित्ररचना. अशा चित्रकामाने नटलेल्या इमारती सर्वत्र दिसू लागल्या. अठराव्या शतकात

महाराष्ट्रात येऊन दाखल झालेल्या उत्तरभारतीय संस्कृति आणि कलेच्या प्रवाहाबरोबर या नवीन प्रवृत्ति महाराष्ट्रातही लोकप्रिय झाल्या. मराठा चित्रकामाला कर्नाटकातील, तसेच पाश्चात्य चित्रशैलीतील कलाप्रवाहांनीही समृद्ध केले. या प्रकारे पेशवाईतील शांतता आणि सुबत्तेच्या काळात रसिक मराठ्यांच्या आश्रयाने जुन्या चित्रपरंपरेचाच अभिनव आविष्कार प्रगट झाला. राजकीय इतिहासात मराठ्यांच्या कामगिरीची सांगोपांग नोंद घेणाऱ्या इतिहासकारांनी, मराठ्यांना कला आणि संस्कृतीचे वावडे होते असे जाहीर करून ठेवलेले आहे. या निबंधातील विवेचनामुळे हा गैरसमज दूर व्हावा. भारतीय चित्रकलेच्या इतिहासाच्या संदर्भात मराठा कलेचा विचार होणे आवश्यक आहे याबद्दल दुमत नसावे.

■ ■

संदर्भ

1. Goetz, Herman
   'The art of the Marathas and its Problems,'
   B C. Lqw volume, Part 2, pp. 433-444, (Pune 1946).
2. Bhattacharya, B. (ed.)
   'Manasollasa Of King Someshvara', Vol 2, (Baroda, 1939).
3. Handiq, K. K.
   'Yasastilak and Indian culture', pp. 120-21, (Sholapur, 1949).
4. राजवाडे, वि. का.
   'उषाहरण' (चोभाकृत), पृ. १३, १४, भा. इ. सं. मं., अहवाल, शके १८३३, (पुणे, शके १८३४).
5. Spink W.
   'Ajanta Chronology, the Problems of Cave No. 11,'
   Ars orientalis, Vol 7, p. 167 (Michigan, 1968).
6. प्रभाकर
   'पदे, पोवाडे व लावण्या', लावणी क्र. २०, पृ. १८-२०, (पुणे, १९२०).
7. Kramrich, Stella
   'A painted ceiling', J. I. S. O. A., Vol 7, pp. 175-182, (1939).
8. Anandkrishna
   'Malwa Painting', p. 8, (Benaras, 1963).

■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६२ : १-४, १९८३-८४

मराठेशाहीतील पट, हस्तलिखिते व लघुचित्रे

उषा रानडे
डेक्कन कॉलेज, पुणे

मराठा शैलीने चित्रित केलेले चित्रप्रकार म्हणजे भित्तिचित्रे, पत्रिका, पट, सचित्र हस्तलिखिते, पोथ्या बांधण्याच्या लाकडी फळया, इत्यादी. पैकी भित्तिचित्रांची चर्चा अन्यत्र केली आहे.

पत्रिका ह्या कागदाच्या गुंडाळयांवर लिहीत. दहा ते बारा सें. मी. रुंद व चार-चार मीटर लांब अशा कागदाच्या पट्ट्या एकमेकांना जोडत. त्यांवर जन्म-कुंडल्या काढत. यांवर ग्रहराशींची चित्रे काढत. याशिवाय मधूनच चक्रांच्या आकृती असत. भारत इतिहास संशोधक मंडळात बळवंतराय बाजीराव पेशवे यांची शके १७३७ (सन १८१५) मधील कुंडली आहे. या कुंडलीतील चित्रे ही खास मराठा शैलीची आहेत. अशाच अनेक पत्रिकांच्या गुंडाळया इतर संग्रहालयांतही आहेत.

कागदी पटांपैकी संक्रातीफलपट हे असेच दर्शनीय आहेत. दोन फूट चौकोनी कागदांवर हे पट चितारले जात. कागदाच्या वरच्या एक तृतीयांश भागात गणपती, ऋद्धि-सिद्धी हे प्रमुख चित्र असते. डाव्या उजव्या चौकटीत संक्रांतीचे चित्र काढत. एकीकडे संक्रातीची मुख्य देवता, तिचे वाहन, दुसरीकडे उपदेवता, तिचे वाहन. खाली संक्रांतीचे फल दिलेला मजकूर असे. मंडळात असे अनेक पट आहेत. त्यातले तीनचार पट १८१० ते ३५ च्या दरम्यानचे आहेत. यात देवीच्या, गणेशाच्या आकृती काळया रंगाच्या बाह्यरेषांनी चित्रित केलेल्या आहेत. ह्या रेषा जोरकस पण तुटक आहेत. ह्या आकृतींची रंग-संगती, पोषाख हे मराठा शैलीचे द्योतक आहेत. ह्यांची तत्कालीन मराठी भित्तिचित्रांशी तुलना करता येईल.

याच प्रकारातील आणखी एक महत्त्वाचा पट म्हणजे पिठोरी पट. यावरची चित्रे प्रारंभी भिंतींवर रंगवत असत. कालांतराने त्याचे पटात रूपांतर झाले. हा पट एका व्रताशी संबंधित आहे. महाराष्ट्रात श्रावण अमावास्या ही पिठोरी अमावस्या म्हणून प्रसिद्ध आहे. ज्या स्त्रियांची मुले जगत नाहीत अशा स्त्रिया हे व्रत करतात. बालमृत्यू, अपमृत्यू यांच्या संरक्षक देवतांची म्हणजे योगिनींची ही पूजा. ही लोक-कथा चित्ररूपाने घरोघर पोहोचली. सात वेळा मुले गमावलेल्या एका पतिव्रतेची ही कहाणी. ह्या कथेतील सात मृत मुलांचे देवकीच्या सात मृत अपत्यांशी साम्य असल्याचे पाहून चित्रकाराने लोककथा व कृष्णचरित्र ह्यांची सांगड घातली. पटाच्या

वरच्या पट्टीत चौसष्ट योगिनींच्या आकृती आहेत. नऊवारी साडी, खोपा, डोक्यावर पदर असणाऱ्या या आकृतींच्या खालच्या पट्टीत सात बाळबाळंतिणींच्या आकृती आहेत. मधूनच यक्ष, यक्षी, शिवपार्वती, देऊळ, विहीर यांचे चित्रण आहे. याशिवाय कृष्णाला पायावर न्हाऊ घालणारी यशोदा, दानलीला, राधाकृष्ण फुगडी, असे देखावे दिसतात. तसेच रोजच्या जीवनातील म्हणजे दळण-कांडण करणाऱ्या स्त्रिया, मोट चालविणारा शेतकरी असे प्रसंगही आहेत. या सर्व प्रसंगांना काही कालानुक्रम आहे असे नाही. या पटातील आकृती प्रमाणबद्ध, सुबक आहेत. यातील स्त्री-पुरुषांचे पोषाख तर मराठी आहेतच, पण देवालय, दीपमाळ हे मराठाकालीन वास्तु-विशेषही आहेत. यातील आकृती काहीशा ठेंगण्या व स्थूल म्हणजे भित्तिचित्रांतील आकृत्यां-सारख्याच आहेत. फरक आहे तो रंगसंगतीत. लाल, हिरवा, पिवळा असे रंग वापरले आहेत. विहिरीतील पाणी रेघांनी सूचित केले आहे. योगिनींच्या आकृती एकचष्म असल्या तरी शिवपार्वतीपैकी शिवाचे चित्र समोरून काढण्याचा प्रयत्न केला आहे.

या पटचित्रांपूर्वी म्हणजे कागदी पटापूर्वी कापडी पट असत. महाराष्ट्राबाहेर वसंतविलास आणि बालगोपालस्तुती हे जैन शैलीचे पट प्रसिद्ध आहेत. पण महाराष्ट्रात आंबेजोगाई येथे दासोपंतांनी कापडी पटाच्या धर्तीवर लिहिलेले काव्य 'दासोपंतांची पासोडी' या नावाने प्रसिद्ध आहे. यावर चित्रे आहेत (काळ शके १४७३ ते पुढे). परंतु याव्यतिरिक्त महाराष्ट्रात मराठा शलीचा कापडी पट अजून तरी मिळालेला नाही.

यानंतरचा चित्रकलेचा महत्त्वाचा नमुना म्हणजे सचित्र हस्तलिखिते. महानुभाव मठांनी आणि पेशवाईतील सरदार दरकदारांनी ग्रंथ लिहवून व सजवून घेतले.

या कलाप्रकाराचा अधिक शोध घेण्याची संधी मला मिळाली. खुद्द भारत इतिहास संशोधक मंडळातच दीडशे सचित्र पोथ्या मिळाल्या. महाराष्ट्रातील संग्रहालये, खाजगी संग्रह अशा ठिकाणी शोध घेतला. तेव्हा नाशिक, त्र्यंबकेश्वर, वाई, सातारा, पैठण, औरंगाबाद, धुळे, मुंबई, बडोदा अशा अनेक ठिकाणच्या पोथ्या पहावयास मिळाल्या.

या पोथ्या तयार करताना सर्वत्र हाताने तयार केलेला कागद वापरला आहे. आपल्या पूर्वजांनी केवळ हस्तलिखिते लिहिली नाहीत तर ती कशी लिहावीत, लिहिताना कागद कोणता घ्यावा, दोन ओळींत अंतर किती सोडावे, अक्षर कसे काढावे, रंग व साहित्य कोणते वापरावे याचा आदर्श वस्तुपाठ दिला आहे. इतकेच नव्हे तर पोथीला दोन्हीकडे फळया बांधत त्याही 'चित्री चिताराव्यात' असे वर्णन आहे. महाराष्ट्रात हा आदर्श खुद्द समर्थांनी 'दासबोधा'त घालून दिलेला आहे. तेव्हा महाराष्ट्रात तरी मोठया काळजीपूर्वक पोथ्या लिहीत असत.

ही हस्तलिखिते धार्मिक व धार्मिकेतर असून धार्मिक पोथ्यांची संख्या जास्त

आहे. पैकी काही नित्यपठणाच्या आहेत. सचित्र पोथ्यांत गीता, गीतापञ्चरत्नी, सप्तशती, भागवतपुराण अशा आहेत. सचित्र धार्मिकेतर विषयांत नरपतिजयचर्या, नारायणीशिक्षा अशा ज्योतिषाच्या, गीतगोविंदासारख्या रागचित्रांच्या, वैद्यकाच्या, शकुनवंतीच्या, तंत्र-यंत्र-मंडले यांच्या आकृतींच्या, ग्रहराशींची माहिती देणाऱ्या, कामशास्त्राच्या योगासनांची चित्रे देणाऱ्या आढळतात.

भाषेच्या दृष्टीने गीता पञ्चरत्नी, सप्तशती यांसारख्या संस्कृत तर मराठी भाषेत श्रीधरकवीच्या सर्व रचना लोकप्रिय झालेल्या आढळतात. त्यात पांडवप्रताप हरिविजय, रुक्मिणीस्वयंवर ह्या प्रमुख आहेत. शिवाय ज्ञानेश्वरी, दासबोध, गुरुचरित्र शिवलीलामृत हेही ग्रंथ लोकप्रिय होते.

वर उल्लेखिलेल्या सर्व सचित्र पोथ्यांचे विषय हे बहुधा पोथीच्या मजकुरावरून ठरत. परंतु बरीच चित्रे पारंपरिक आढळतात. मुख्यतः दशावतार, गणपती, ऋद्धिसिद्धी. कृष्णलीला, समुद्रमंथन, विभूतियोग, विश्वरूप, ही चित्रे लोकप्रिय होती. धार्मिकेतर विषयांत व्यक्तिचित्रणे, नायकनायिका, दरबार, लढाया, रागचित्रे असे प्रसंग आढळतात. चित्ररचना विविध प्रकारची आहे.

या चित्रांची शैलीच्या दृष्टीने पाहणी केली तर त्यांचे चार पाच प्रकार आहेत. येथे शैली हा शब्द व्यापक अर्थाने घेतला पाहिजे. यात चित्रविषय, मांडणी, आकृती रेखाटन, त्यांची संख्या, पृष्ठभूमी, रंगसंगती, पोशाख, दागदागिने, सांस्कृतिक व प्रादेशिक वैशिष्टये ह्या सर्वांचा साकल्याने शैलीत अंतर्भाव होतो. या दृष्टीने यातील हस्तलिखिते (१) काश्मिरी पहाडी, (२) राजस्तानी, (३) पश्चिमशैली, (४) स्थानिक लोककला (Folk Style) व (५) मराठा शैली या गटात विभागली जातात. यापैकी पहिल्या तीन शैलींचा विचार येथे करण्याचे कारण नाही. कारण त्या उघडउघड परप्रांतीय आहेत. ज्याला स्थानिक लोककला म्हणता येईल असा प्रकार महत्त्वाचा आहे. कारण मराठा शैली ही त्याचीच प्रगतावस्था आहे. स्थानिक शैलीतील पोथ्यांत प्रामुख्याने मराठी पोथ्या येतात. त्यात पांडवप्रताप, हरिविजय, रुक्मिणीस्वयंवर अशा श्रीधराच्या काव्याच्या प्रमुख आहेत. खेरीज शिवलीलामृतालाही तितकीच लोकप्रियता मिळालेली दिसते.

मराठी पोथ्यांचे विषय खास मराठी आहेत. तशी काही चित्रे अन्यत्र न दिसणारी आहेत. उदा. पुंडलिक-विठ्ठल कथा, शिवलीलामृत, संक्रांतीफल, ज्ञानेश्वरी हे महाराष्ट्राचे आवडते विषय. महाराष्ट्राच्या संस्कृती व लोककलांचे दर्शन घडविणाऱ्या या विषयांना स्वतःचे असे स्थान आहे.

स्थानिक लोकशैलीतील या पोथ्या खास महाराष्ट्रात तयार झाल्या आहेत. त्यांचे विषय पौराणिक. या पोथ्यांच्या सुरुवातीच्या व शेवटच्या पानाची सजावट लक्षणीय दिसते. साधारणपणे १५ × २२ सें. मी. आकाराच्या या पोथ्यांवर मजकुरासाठी समांतर चौकोन आखून त्याभोवती हत्ती किंवा मराल यांच्या ओळी

आढळतात. कधी वेल तर कधी भौमितिक आकृती दिसतात. प्रत्येक अध्यायाच्या सुरुवातीस कथाविषयाचे चित्र असते, पण चित्ररचना पाहिली तर या कलाकारांनी आकृती, त्यांचे सौष्ठव, याकडे दुर्लक्ष केले आहे असे दिसते. उदा. यज्ञपत्न्या. यज्ञमंडपात अन्नपदार्थ डोक्यावरून वाहून नेणाऱ्या या आकृती काळ्या रंगाने चित्रित केल्या आहेत. आकृतींचे रेखाटन पाहता खांद्याचा भाग रुंद असून पायाकडे त्या निमुळत्या होत गेल्यामुळे त्रिकोणाकृती दिसतात. साहजिकच इथे प्रमाणबद्धता आढळत नाही. पोशाख, दागिने यासाठी केवळ एकच रंग वापरला आहे. या रेखाकृती दणदणीत असून त्यांच्या ठसठशीत जोरकस रेषाच त्यांचे स्वरूप स्पष्ट करतात. सजावटीसाठी पृष्ठभूमीवर नैसर्गिक वा इतर कोणत्याही वास्तुशिल्पाचा वापर केलेला नाही. काळ्याखेरीज इतर रंग न वापरल्यामुळे रंगसंगतीकडे संपूर्ण दुर्लक्ष केले आहे हे उघड आहे. यात डोळ्यांत भरतात त्या आकृती, विशेषतः त्यांचा त्रिकोणी आकार, उतरती कपाळपट्टी, टोकदार नाके, मोठे डोळे, मधोमध लक्ष वेधून घेणारी डोळ्याची बाहुली, ओठ पुढे, किंचित मागे गेलेली हनुवटी इत्यादि. अशा प्रकारची चित्रे शैलीच्या दृष्टीने चित्रकथींच्या पोथीचित्रांशी साम्य दाखवतात. चित्रकथी ही चित्रकथकांची भटकी जमात. सध्या पिंगुळी येथे राहणाऱ्या चित्रकथींकडच्या हस्तलिखितांतही याच प्रकारची चित्रे आहेत.

यातील पुरुषाकृतींचे पोशाख म्हणजे कमरेखाली धोतर आणि वरचा भाग उघडा दिसतो. डोक्यावर कधी पुणेरी पगडी तर कधी करंड मुकुट. स्त्रिया नऊवार साडी, पुतळ्यांच्या माळा घातलेल्या दिसतात. परंतु नथेऐवजी काही ठिकाणी राजस्तानी सुंकले घातलेले आढळते. काही ठिकाणी केवळ रेखाचित्रे नाहीत तर रंगीत चित्रेही आढळतात. त्यात विटकरी तांबडा, हिरवा, निळा असे रंग वापरले असून ते भित्तिचित्रांची आठवण करून देतात. पण रंगांत शेडिंगचा वापर केलेला दिसत नाही. मुख्यतः रंगांपेक्षा रेखांवर अधिक भर दिलेला दिसतो. अशा प्रकारची शैली केवळ महाराष्ट्रातच अठराव्या शतकात लोकप्रिय झाली. आणि स्थानिक लोककला म्हणून तिचे वर्णन करता येईल. येथील तेव्हाचे चित्रकार तत्कालीन भित्तिचित्रपरंपरेशी परिचित होते.

यानंतरचा महत्त्वाचा गट या लोककलेचाच प्रगताविष्कार आहे. पण त्यातील सांस्कृतिक दुवेही महत्त्वाचे आहेत. हा गट मात्र खास मराठा शैलीचा. अर्थात् हा त्या शैलीच्या विकासाचा सुरुवातीचा काळ म्हणता येईल. कारण यानंतरच्या काळात जर मराठ्यांचे स्वातंत्र्य टिकले असते आणि स्थानिक कलाकारांचा राजाश्रय टिकून राहिला असता तर मराठा शैलीचे एक स्वतंत्र स्थान दिमाखाने नजरेत भरले असते, असा तर्क करता येतो. परंतु राजकीय अस्थैर्य आणि पाश्चिमात्यांचे वर्चस्व यामुळे कलेवरही पाश्चिमात्यांचे परिणाम झाले. नाना फडणिसाने स्थानिक कलाकारांना

शिक्षण देण्यासाठी पाश्चात्य चित्रकार पदरी बाळगले. त्यामुळे अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात पाश्चात्य संस्कृतीचे परिणामही या कलेवर झाले.

बॅनर्जींनी प्रसिद्ध केलेले शकुंतला हस्तलिखित, राजवाडे संग्रहातील 'गंगालहरी,' बडोद्याचे ' पांडुरंग महात्म्य, ' शिवकाव्य, मंडळातील गीता, शिवलीलामृत, पांडवप्रताप आणि एका खाजगी संग्रहातील शिवलीलामृत ही मराठी शैलीची उल्लेखनीय हस्तलिखिते होत.

या गटातील पोथ्यांचा साकल्याने विचार केला तर खालील निष्कर्ष निघतात : (१) हस्तलिखिते चित्रित करताना मराठी शैलीचे रेखाटन, स्थानिक पोशाख, दागिने, इमारती यांचा वापर होऊ लागला. (२) रंगसंगतीत एकसुरी मातकट रंगांऐवजी चमकदार रंग आले, शेडिंगचा वापर होऊ लागला. (३) भित्तिचित्रांतील मंद रंग जाऊन हिरवा, गुलाबी, निळा, सोनेरी असे रंग आले. (४) चेहेऱ्याची किंवा आकृतींची बाह्यरेषा, नाकडोळे अजूनही भित्तिचित्रांप्रमाणे होते, परंतु पोथ्यातील चित्रे नाजूक झाली. (५) आकृतींची संख्या कमी झाली. पृष्ठभूमीसाठी कोणताही रंग न वापरणे या गोष्टी जाऊन आता वाडे, महाल, बागा यांचा वापर होऊ लागला.

मराठी चित्रकलेत हस्तलिखितातील चित्रांच्या मानाने लघुचित्र अल्पायुषी ठरली. इ. स. १७५० नंतर हा प्रकार महाराष्ट्रात आला असावा. वाङ्मयातही याचे फारसे उल्लेख नाहीत. तसबिरींचा उल्लेख आहे पण तोही क्वचितच. नर्मदेच्या दक्षिणेला हा प्रकार अनोखा होता असे नाही. दक्षिणेतील अहमदनगर, विजापूर, गोवळकोंडा येथे लघुचित्रांना वाव मिळाला. गोवळकोंड्यात ती उशिरा तयार झाली. अहमदनगर, विजापूर यांनी काव्य व इतिहासाच्या पोथ्या करवून घेतल्या. यात निळा, तांबडा, सोनेरी रंग वापरत. सुलतान आपली स्वतःची चित्रे काढवून घेत. या चित्रांबरोबरच रागमाला व योगिनी चित्रे तयार झाली. नंतर निजामशाही इ. पाच शाह्यांचा अस्त झाला. आणि हा कलाप्रकार नष्ट होत चालला. कारण कलाकारांचा राजाश्रय गेला.

भित्तिचित्रे किंवा पोथीचित्रे याप्रमाणे लघुचित्रांना धार्मिक परंपरेत स्थान नव्हते. ती केवळ धार्मिकेतर कला होती. त्याला विशिष्ट परंपरा नव्हती. राजस्तान किंवा पहाडी प्रदेशापेक्षा महाराष्ट्रात उलट स्थिति होती. इतरत्र राजकारणाइतकेच जहागिरदार फावला वेळ इतर गोष्टीत दवडत. कवि, गायक, चित्रकार, नर्तक हे आपापल्या परीने राजाला रिझवत असत. आपल्या आश्रयदात्याच्या आवडीची चित्रे काढणे, खुद्द राजे वा सुलतान, त्यांच्या स्त्रिया, त्यांची मुले यांची चित्रे काढणे हा त्यांचा मुख्य व्यवसाय. यानंतर भागवतातील कृष्णाला आदर्श मानून बारामासा, रागमाला अशी चित्रे काढलेली दिसतात. या विषयाच्या चित्रांत आता कृष्णाऐवजी स्वामीचित्रण होऊ लागले. नायक नायिका चित्रणात राजाचे व विशेषतः परकीय

नायिकांचे चित्रण होऊ लागले. म्हणून चित्रकार लोकप्रिय झाले. महाराष्ट्रातील चित्रकारांजवळ उत्तरेतील चित्रकारांप्रमाणेच विषय, चित्रणक्षमता असली तरी पुरेशी फुरसत, राजाश्रय, आर्थिक स्थैर्य यांचा अभाव होता.

महाराष्ट्रात संभाजीमहाराजांनंतर आलेला शाहू (सुमारे १७१०–५०) मुघली सहवासाने विलासी व हौशी झालेला होता. पुढे पहिल्या बाजीरावाने आपल्या पराक्रमाने रजपुतांची मने जिंकली. बाजीरावाचा उत्तरेकडील दरारा, त्याची स्त्री मस्तानी, त्याने पुण्याला दिलेले राजधानीचे स्वरूप, यामुळे पेशव्यांच्या काळात पुण्याच्या वाड्यात दरबार भरू लागला. आता इतर दरबारांशी देवाणघेवाण सुरू झाली. जयपूर, बिकानेर येथे दरबारी परिचयामुळे तेथून अशी लघुचित्रे आणण्यात येऊ लागली. दुसरे म्हणजे तेथून चित्रकारही पुण्यात आले. त्यांनी स्थानिक संस्कृतीशी परिचित अशी लघुचित्रे आणली. काही दिवसांनी स्थानिक कलाकारही अशी चित्रे काढू लागले. १७६० च्या सुमारास महाराष्ट्रात एक स्वतंत्र शैली निर्माण होऊ लागली. पण ती अल्पायुषी ठरली. ज्यांना मराठा म्हणता येईल अशी स्वतंत्र चित्रे तयार झाली. त्यांचे वेगळेपणही दिसू लागले. या शैलीची काही चित्रे ज्ञात आहेत. पण अजून बरीच हाती आली तर काही निश्चयात्मक सांगता येईल. तत्कालीन लघुचित्रसंख्या बरीच आहे. यांपैकी काही बैठ्या छत्रपतींची, काही छत्रपती व सरदारांची, नानासाहेब व समोर नाचगाणी करणाऱ्या स्त्रियांची, अशी चित्रे आहेत. पण या सर्वांत बाजीराव पहिला याचे चित्र सर्वोत्कृष्ट आहे. व्यक्ति-चित्रणात माधवराव, सवाई माधवराव, महादजी शिंदे, हरिपंत फडके, पिलाजी जाधव, सगुणाबाई यांची चित्रे उल्लेखनीय आहेत. देवताचित्रणात शिवपार्वती, कालियामर्दन, गणपतीची मिरवणूक ही चित्रे चांगली आहेत. नाशिकला मात्र चित्र-कारांची काही घराणी असली पाहिजेत. त्यांनी तत्कालीन चित्रपद्धतीने सजवलेली रागमाला उल्लेखनीय आहे. क्षेमकर्णाने दिलेल्या वर्णनानुसार चित्रे काढताना त्यांचे रंग, पोशाख, इ. स्थानिक संस्कृतीच्या निदर्शक गोष्टी लक्षपूर्वक रंगवल्या आहेत. छोट्या आकृती, टोकदार नाक, हनुवटी आत गेलेली, पगडी, नऊवार साडी ह्या गोष्टी मराठी शैलीच्याच आहेत. या आकृतींच्या रेघा क्वचित् जोमदार असून रंगात शेडचा वापर आहे. ‘ नाशिक रागमाला ’ असे त्याचे स्वतंत्र स्थान मानावे लागेल.

याच प्रकाराप्रमाणे मंडळातील ‘ तालचित्रे ’ ही अठराव्या शतकातील वैशिष्ट्य-पूर्ण चित्रे. रंग किंवा रेखाटनाच्या पद्धतीवरून ही चित्रे दख्खनी किंवा गोवळकोंडा हैदराबादी शैलीशी मिळतीजुळती असली तरी त्यांची सांस्कृतिक वैशिष्ट्ये व आकृती मराठी शैलीच्या आहेत.

याच काळात कामचित्रेही लोकप्रिय होऊ लागली. घाटाची चित्रे हा असाच एक प्रकार. मंडळात वाराणसीच्या घाटाचे दर्शन घडविणारी चित्रे आहेत. अहिल्या-

बाई होळकर व इतरांनी अनेक घाट, देवळे बांधली. या घाटांवर तीर्थक्षेत्रांचे ठिकाणी स्नान, पूजा, धुणी, दीपदान असे कार्यक्रम चालत. त्यांचे उत्कृष्ट चित्रण केले आहे. यातील अंतरांच्या यथार्थ चित्रणावरून पाश्चात्य शैलीचा यावरील परिणाम दिसून येतो. परंतु घाटांची बांधणी, दीपमाळा, काठावरचे वाडे, खिडक्या इ. मात्र मराठी वास्तुशिल्पाची वैशिष्ट्ये दाखवतात.

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६२ : १–४, १९८३–८४

Stylistic changes in European architecture in Western Deccan (18th and 19th centuries)

Somita Gupta
N. Wadia College, Pune.

Colonial architecture of the English in Western Deccan was the outcome of the many strands of political, intellectual, social and economic factors which came to be woven together in a complex tapestry which provided the impetus for the growth of an architectural policy. In what way this policy was put into effect in the extant buildings of this area ?

Since this subject was a virtually uncharted field, the individual structures had to be identified and documented. Their original plans were missing in most cases, so new ones had to be made. A persistent difficulty was the time-consuming process of getting permission to study these structures. The difficulty was further compounded by the fact that most of them are still in use as government offices etc. Therefore, in some cases permission was not granted at all. Documentary sources in the various archives in Bombay, Pune, and London were fragmentary and unsatisfactory. In this kind of a situation, the most encouraging factor is that the majority of representative structures are extant, and are in themselves the most effective primary source. By grouping them according to their functions, and by conducting a detailed as well as comparative study of the individual buildings, a fairly accurate picture emerges. A short survey of the typical domestic architecture of the English in this area completes the picture and

also gives valuable pointers to the lifestyles and ethos of the colonial elite.

We have to remember that in spite of an existing informal policy, the actual designers on the ground, as well as the local authorities had certain other constraints.The structures obviously had to have adequate ground plans to suit their functions. Moreover, even if it was agreed that they should be large or ornate, the problem of what stylistic garb they should wear had to be solved. On top of all this, the climatic conditions had to be taken into account so as to be able at least partially to control its rigours. Last but not the least, the designers also wanted their buildings to be related to the current trends in the mother-country.

Here again, the various architectural movements in England tied in very handily with the overall policy. England in the 18th and 19th centuries had gone through the similar architectural phases that marked other European countries. Very briefly, we can say that in the 18th century, the two most important movements were Palladianism and Neo-classicism. The former was a re-interpretation of renaissance ideals in architecture, and was used mainly for the mansions of the landed gentry; the latter was a rervival of the pure Greek forms and was used mostly for public buildings, but also for houses. Neo-classical buildings are solid and rather severe, decoration is strictly limited and the 'orders' are used structurally and not for decoration. The principles of ancient Greek architecture were seen to be based on nature and were interpreted as being most rational, having a noble simplicity and a calm grandeur (two well-known examples of this style of which there are comparatively few in Bombay, are the Town Hall and the Mint.)

Later in the 19th century, historicism was taken very seriously as a matter of social or religious responsibility. Architecturally England passed through a number of 'revi-

vals', the most important for our study being the Gothic revival. By 1840, the style became the order of the day and was first used for churches, and later adapted to secular buildings. Origin of the movement was in Romantic literature and the cult of Romanticism. Soon it was used for all kinds of structures like stations, clubs, colleges, and most notably in the Houses of Parliament. Eminent architectural theorists like Ruskin and Pugin gave it new principles. They saw in it such virtues as 'honesty', which in the 19th century parlance also amounted to 'morality'. It was also thought to be adaptable, as well as being close to nature in its ornamental aspects. Moreover, some architects like Gilbert Scott, thought it to be the most 'English' or 'National' of styles. It is this high-victorian neo-Gothic that was transported to the western Deccan in the 1860's (in fact, Scott designed the University Library and the Senate Hall in Bombay). The point to remember is that ideological connotations like 'moral', 'honest', 'christian', or 'national' could fit well into the Imperialist framework, while it would allow the planners to remain in fashion with the contemporary trends at home, even if a decade or so late. The choice, however, was momentarily complicated when it was realised that except for Elizabethan domestic architecture, Britain had no national style. All her architectural languages were regional variations of the major European movements. When the critics labelled neo-Gothic to be national, the choice became simpler.

At a more mundane level too, neo-Gothic was particularly suited to these parts, because of the abundant supply of all types of stones, blue basalt and granite (from Poona), soft-white stone for decorative carving from Gujarat; buff-coloured stones (Kurla) etc. were all easily available, and the Gothic style was specially suitable for stone. However, it had either to be modified for the Bombay / Poone climate, or a most suitable form of medieval Gothic revived. It was

assumed that, Italy was the closest to the tropical climate, and that 'Venice with its eastern connections' the most suitable. So, the Bombay structures acquired Italianate additions, — arcades, verandahs, porticoes and polychromatic effects and cusped arches. The verandahs shielded the walls from the sun and kept the building cool, even though the driving monsoon rains could not be so effectively kept away from entering through the arcades.

In the last two decades of the 19th century, the neo-Gothic advanced to incorporate some new features. The B. B. & C. I. headquarters, and the Municipal building raised during this time made use of some noticeably Indian or Islamic features — domes with constructed bases, deep cornices, carved brackets and surface decoration comprising of Indian flora and fauna were used in varying degrees of repetition. This new 'style', if it may be so called, was a deviation from the old policy of transplantation. The aim was still to dazzle and impress, but now a fresh thinking was noticeable. A halting attempt at synthesis was taking place, and it was a part of movement that was taking place in other parts of the country as well. It is tempting to read a political meaning into this attempt, specially if we remember that this period also saw the beginning of the National Movement. Could the complacency of the authorities have been shaken by it, leading to a reappraisal of cultural policy? An attitude of reconciliation, a sigh of sympathy and a new understanding of India's architectural traditions could be an explanation for the changing pattern.

On another dimension, the attempt can also be partly explained by the rise of a new movement in England. This was the Arts and Crafts Movement led by William Morris (1834–1896). He had a great influence on practising architects though he himself was not one. Briefly, Morris and his followers advocated a return to medieval idealism as well

as a socialistic theory to improve the towns, buildings, designs, products and the life of the labourer. They wanted to bring back the old joy of creativity, where labour could take pride in its own handiwork. They believed that all art should be ' by the people,for the people. ' In India, some outstanding critics and officials like Havell, P. Brown and I. L. Kipling were his followers. They made impassioned pleas to change the official P. W. D. policies and for bringing back the ' mistry ' in association with the architect. Kipling tried to revive traditional craftsmanship at School of Arts where he was principal. The students carved many capitals and sculpted some of the statuary for the Bombay buildings.

The furtherest development of this ' Indo-saracenic ' style, as it was labelled by contemporaries, can be seen in Bombay today. The Prince of Wales Museum and the Gateway of India, though raised in this century, were a continuation of this style. Both were designed by George Wittet, Consulting Architect to the Governor. The blending of Indian architectural elements with the neo-Gothic style was stronger and the resemblance to Indian prototypes more discernible in these two structures. The former was modelled after the Gol Gombuz of Bijapur, and the latter traces some of its elements to 15th century Gujarat, specially the entrance arch of the Jami Masjid at Champaran and that of Ahmedabad. However, the basic neo-Gothic and western nature could not be done away with.

The basic problem was that the new structures had to perform specialised functions for the administration, ranging from school house to station sheds. So they had to adhere to the European patterns because no previous traditions for such modern functional structures existed in India. The division or movement of space within a structure, i. e., the plan, was not changed, in any way perhaps because of this. There was a basic difference in the way the concept of space was treated

in indigenous architecture and in that of Europe. The plans
of most of the European public buildings were symmetrical
and often axial. Entry was through a porch onto a covered
verandah and through it to a central hall. On the outside,
this hall could be located by the main dome (as in the V. T.,
Municipal building, B. B. & C. I. building) or by a tower (as
in the High Court, P. W. D. Secretariat at Bombay, and
Sassoon Hospital and Deccan College at Poona) or a high
gable pierced by long arched windows (as in the Old Secre-
tariat, Bombay). On both sides of this hall which also housed
the main staircase, arms extend which are divided into sepa-
rate rooms. These wings are sometimes carried forward or
backwards to form the shape of the letter 'E' or 'H'.
Surrounding the whole building on all its storeys are the
arched verandahs forming the Sun Screen. This symmetrical
plan has some minor variations, but the basic pattern is
almost constant, whatever may be the function of the stru-
cture. Only in churches and in that other church-like build-
ing, the Senate- Hall, is the plan different.

In churches, the plans reflected those of English parish
churches. Neither in style, nor in size, nor plan were the
churches of Bombay or Poona very remarkable. The military
barracks were again distinctive in plan and peculiar to the
demands of military utility. Since the plans remained basically
European in concept as well the facade, the incorporation of
a few Indian ornamental motifs or a change in the shape of
the domes did not make these structures Indian nor even the
product of a synthesis. These new devices only served to turn
the structures into an exotic branch of neo-Gothic.

The true synthesis is perhaps to be looked for elsewhere
than in the public buildings. It is in the sphere of domestic
architecture that it may be found. The particularly distinctive
and typical houseform that we know today as the 'Bunga-
low' was difinitely an European creation taking the most

suitable elements from indigenous house forms and transforming them to suit European requirements. It is now established that both the wood and the style of house it generally represents in India is lineally descended from the Bengal hut. This well-known curvilinear form with its *chār-chala* and *āt-chala* roof construction was first copied by the early settlers. Then through a process of trial and error and through transference from mud into wood and brick it was metamorphosized into the Bungalow. In its new incarnation the curvilinear form disappeared as the supple bamboo was replaced by more durable and solid wooden beams.

Typically, the bungalow is square or rectangular and raised on a high plinth. It has thick walls and a verandah running the whole way round. The ideal bungalow is one-storeyed. The most striking part of this structure which also directly traces its ancestry to the Bengal hut is the roof formation. The early Bungalows had the four-sided roof, which was brought over the walls to protrude over the verandah and was supported by pillars or posts. Later, the roof was broken into two parts. The verandah roof sloping against the house mid-way up the walls, was narrower than the main hipped roof which covered the central living rooms. This double roof proved to be remarkably suitable for the requirements of the English, specially at Poona. It could be used to cover a high-ceiling, but single-storeyed house, which was spacious and cool at the same time. From here, the design kept on evolving further taking in sophisticated devices like the columns & pediments of classicism or pointed arches and carved capitals of Gothicism. In plan they were symmetrical but capable of endless variation and adaptation. It proved to be the most convenient and inexpensive home for the Europeans providing adequate climate control and functional use of space. Though borrowing heavily from the outward form of the indigenous hut, it became a uniquely European house for the

colonial elite.

At the end, a few words have to be written about the architects. The structures that have been discussed have all been attributed to specific architects in the records. However, it is difficult to think of them as personalities in an architectural sense. They were mainly military engineers from the Bombay Sappers, and they designed for the P. W. D. when necessity for new buildings arose. Virtually, nothing is known about their views and ideas, and except in a very few cases, about their careers. Considering that their training hardly equipped them for design, they managed to put forth a great amount of work. Working under difficult conditions, and guided only by disign books of the reputed architects of England, they accomplished a difficult task. Consequently, their work has the stamp of anonymity. Later on, when qualified civil architects were employed, we can detect some personal manifestation of stylistic language. Men like Emerson (Crawford Market), J. Trubshawe (Engineering College, Poona & Government House, Poona) and F. W. Stevens (V. T., Municipal building and B. B. & C. I. Hq.) put their own stamp on the buildings to an extent.

Lower level Indian staff was supplied by the Poona Engineering College to act as supervisors, foremen etc. Indian contractors, mainly from the Kamathi group, supplied labour and materials.

Eventually, the promising beginning of an integrated style which Lutyens had brought into being at Delhi, hardly percolated to this area, and after 1930, Bombay buildings began to be built in more modern styles.

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६२ : १-४, १९८३-८४

मंडळ-वृत्त

१९८४ च्या जानेवारी महिन्याच्या प्रारंभी कारभारी मंडळाची मुदत संपत असल्याने घटनेच्या कलम ८, ९ आणि १० अ यानुसार १९८४ ते १९८७ या तीन वर्षांसाठीच्या कारभारी मंडळाची निवडणूक डिसेंबर १९८४ या काळात घेण्यात आली. ठरलेल्या मुदतीत निवडणूक झालीच पाहिजे असा कारभारी मंडळाचा कटाक्ष होता आणि त्यानुसार सर्व निवडणूक १५ जानेवारी १९८४ रोजी पूर्ण झाली. त्या दिवशी मतमोजणी पूर्ण होऊन निवडणुकीचे निकाल १२-३० वाजता जाहीर करण्यात आले.

एकूण मतदार ५२० इतके असून त्यांपैकी ३२८ मतदारांनी मतदान केले. ६० टक्क्यांहून अधिक मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. इतक्या मोठ्या प्रमाणात मतदान मंडळाच्या निवडणुकीत यापूर्वी क्वचितच झाले. मतदार-सभासदांनी मंडळाच्या व्यवस्थापनाबद्दल दाखविलेली ही आस्था विशेष स्वागतार्ह म्हटली पाहिजे.

कार्याध्यक्ष या पदासाठी विद्यमान कार्याध्यक्ष प्राध्यापक ग. ह. खरे यांचा एकट्याचाच अर्ज असल्याने ते विनविरोध निवडून आले.

खजिनदार या पदासाठी श्री. क. नी. किंकर यांचा एकट्याचाच अर्ज होता व तेही विनविरोध निवडून आले.

उरलेल्या नऊ जागांसाठी सोळा उमेदवार उभे होते. उमेदवारांची नावे व त्यांना मिळालेली मते खालीलप्रमाणे :

(१) म. श्री. माटे	२८३
(२) उषा रा. रानडे	२७२
(३) गो. त्र्यं. कुलकर्णी	२५४
(४) कमल कृ. चव्हाण	२४७
(५) वा. द. दिवेकर	२४६
(६) द. रा. मेहेंदळे	२४४
(७) ग. गं. मजुमदार	२३९
(८) गो. चिं. मालशे	२३३
(९) ना. भा. आदमणे	२३०
(१०) स. मा. गर्गे	११०

(११) बा. रं. सुंठणकर १०९
(१२) दा. मो. पेठे ९१
(१३) ग. ऊ. थिटे ८१
(१४) ह. बा. शिंदे ७१
(१५) कि. वं. होळकर ६१
(१६) र. वा. पाळंदे ६०

म. श्री. माटे, उषा रानडे, गो. त्र्यं. कुलकर्णी, कमल कृ. चव्हाण, वा. द. दिवेकर, द. रा. मेहेंदळे, ग. गं. मुजुमदार, गो. चिं. मालशे आणि ना. भा. आदमणे हे नऊ उमेदवार यशस्वी झाले.

दि. १८-१-८४ रोजी नव्या कारभारी मंडळाची विशेष बैठक भरून घटना कलम १० (आ) प्रमाणे जे दोन सभासद नियुक्त करावयाचे असतात ते करण्यात आले. ते पुढीलप्रमाणे-

डॉ. विश्वास वि. राणे डॉ. भा. कृ. आपटे

दि. २२-१-८४ रोजी विद्यमान कारभारी मंडळाची दुसरी सभा भरली आणि त्यात पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.

१९८४-८७ या तीन वर्षांसाठी मंडळाच्या चिटणीसपदी डॉ. म. श्री. माटे, डॉ. उषा रानडे आणि डॉ. गो. त्र्यं. कुलकर्णी या विद्यमान चिटणिसांचीच सर्वानुमते निवड करण्यात आली.

याच सभेत कारभारी मंडळाला साहाय्य करण्यासाठी पुढीलप्रमाणे सल्लागार समित्या नेमण्यात आल्या :

प्रकाशन समिती –
श्री. वि. त्र्यं. शेटे, प्रा. कृ. ना. चिटणीस, डॉ. वा. द. दिवेकर, डॉ. मा. रा. कंटक, डॉ. गो. त्र्यं. कुलकर्णी (निमंत्रक)

ग्रंथालय समिती –
श्री. ना. भा. आदमणे, सौ. प्रमिला देवधर, श्री. रवींद्र ठिपसे, डॉ. म. श्री. माटे (निमंत्रक)

सेवकवर्ग समिती –
श्री. क. नी. किंकर, श्री. वि. वि. राणे, श्री. गो. चिं. मालशे, डॉ. म. श्री. माटे (निमंत्रक)

वास्तुसमिती –
श्री. क. नी. किंकर, श्री. द. रा. मेहेंदळे, श्री. गो. चिं. मालशे, डॉ. गो. त्र्यं. कुलकर्णी (निमंत्रक)

न्यायालय –

श्री. वि. त्र्यं. शेटे, श्री. म. पां. नेने, श्री. घ. के. फाटक, श्री. गो. त्र्यं. कुलकर्णी (निमंत्रक)

संशोधन –

डॉ. भा. कृ. आपटे, डॉ. कृ. ना. चिटणीस, डॉ. वा. द. दिवेकर, प्रा. सदाशिव आठवले, डॉ. स. मा. गर्गे, डॉ. कमल चव्हाण, डॉ. ग. गं. मुजुमदार, डॉ. उषा रानडे (निमंत्रक)

सभा–समारंभ–सहली –

श्री. ना. भा. आदमणे, श्री. चंद्रकांत अभंग, श्री. अनिल दातार, प्रा. प्र. के. घाणेकर, डॉ. उषा रानडे (निमंत्रक)

अर्थसमिती –

श्री. क. नी. किंकर, डॉ. वि. वि. राणे, डॉ. आनंद केळकर, डॉ. म. श्री. माटे (निमंत्रक)

अभ्यासवर्ग –

प्रा. भा. कृ. आपटे, डॉ. कृ. ना. चिटणीस, डॉ. सौ. शोभना गोखले, डॉ. म. श्री. माटे (निमंत्रक)

१९८५ या वर्षी मंडळाच्या स्थापनेस पंचाहत्तर वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्ताने मंडळाच्या स्थैर्याच्या व प्रगतीच्या दृष्टीने काही कार्यक्रम हाती घ्यावेत असा कारभारी मंडळाचा विचार आहे. हे सर्वच सभासदांच्या जिव्हाळ्याचे कार्य आहे. म्हणून सर्व सभासदांना असे आवाहन करीत आहोत की या अमृत-महोत्सवासंबंधी निश्चित स्वरूपाच्या सूचना मंडळाकडे लवकरात लवकर कळवाव्यात. तसेच या योजनेच्या पूर्तीसाठी सूचक–सभासद कोणता भार उचलू शकेल याचाही उल्लेख त्यात असावा. या सर्व सूचना विचारात घेऊन कारभारी मंडळ निश्चित असा कार्यक्रम तयार करील. सर्व सभासद या कामी जास्तीत जास्त सहकार्य करतील असा विश्वास वाटतो.

आतापर्यंत दिलेल्या सहकार्याबद्दल कारभारी मंडळाच्या वतीने सर्व सभासदांचे आभार मानीत आहोत.

म. श्री. माटे
उषा रा. रानडे
गो. त्र्यं. कुलकर्णी

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६२ : १-४, १९८३-८४

वाचकांचा पत्रव्यवहार

अनंत निवास, ३३५ अ,
सावरकर मार्ग, दादर
मुंबई ४०००२८
दि. १ नोव्हेंबर, १९८३

स. न. वि. वि.

मंडळाचे त्रैमासिक (खंड १४, अंक २-४, शक १९०४-०५, सन १९८३) वाचले. नेहमीप्रमाणे हा 'शिवचरित्रसाहित्या'चा अंक दर्जेदार निघाला आहे. मला तो आवडला.

सदर अंकातील खालील कालनिर्देश बरोबर वाटत नाहीत. त्यांची दुरुस्ती सुचवीत आहे.

१. पृ. १५, पत्र क्र. ४, इ. १६८९ डिसें. १९ ऐवजी इ. १६८९ नोव्हें. १९

२. पृ. १७, पत्र क्र. ७, फ १११६ सफर २४ ऐवजी फ. १११६ सफर २२

३. पृ. २९, पत्र क्र. १९, सु. १०७४ रबिलाखर १२ ऐवजी सु. १०७४ रविलावल ३ आणि इ. १६७४ जुलै ७ ऐवजी इ. १६७४ मे २९ (आधार : खरे जंत्री)

४. पृ. १९ वरील पत्रे 'चिंचवडकर देव' विभागातील नसून 'वाईकर देशपांडे' विभागातील आहेत. अर्थातच हा मुद्रणदोष दिसतो.

चूकभूल द्यावी घ्यावी. कृपया पत्राची पोच द्यावी. मंडळास माझ्या शुभेच्छा. कळावे ही विनंती.

आपला,
र. वि. हेरवाडकर
आजीव सदस्य क्र. २५८७

(१. पत्र क्र. ४. डॉ. हेरवाडकरानी सुचविलेली १९ नोव्हेंबर १६८९ ही तारी
बरोबर आहे.

२. पत्र क्र. ७. मूळ तारीख, २४ सफर १११६ बरोबर आहे. तथापि इंग्रज
तारीख २४ मे ऐवजी २६ मे १७०६ पाहिजे.

३. पत्र क्र. १९. मूळ तारीख, १२ रबिलाखर १०७४ बरोबर आहे. इंग्रज
तारीखही बरोबर आहे. तथापि तिथी ज्येष्ठ शु. ४ ऐवजी आषाढ शु
१५ शके १५९६ पाहिजे.

४. पृ. १९. विभागाचे शीर्षक मुद्रणदोषामुळे ' चिंचवडकर देव ' असे पडले
आहे. ते ' वाईकर देशपांडे ' असेच पाहिजे होते.

डॉ. हेरवाडकर यानी पत्रांच्या तारखा काळजीपूर्वक तपासून त्यातील चुक
निदर्शनास आणल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. संबंधित मुद्रणदोषाबद्दल
दिलगीर आहोत.

—संपादक)

५६३

भारत इतिहास संशोधक मंडळाची अलीकडील प्रकाशने

मराठी प्रकाशने

१. ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड १७ (१९७३), पृ. ८० — रु. १२–००
२. ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड १४ (१९७३), पृ. ११२ — रु. १२–००
३. ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड १५ (१९७४), पृ. ११२ — रु. १२–००
४. ब्राह्मणकालीन समाजदर्शन, ले. वि. वि. भिडे (१९७४), पृ. ३३ — रु. ४–००
५. ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड १६ (१९७५), पृ, १११ — रु. १२–००
६. ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड १८ (१९७६), पृ. १०८ — रु. १२–००
७. ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ६, सं. ग. ह. खरे, सह सं. गो. त्र्यं. कुलकर्णी (१९७६), पृ. ४२३ — रु. ३०–००
८. मराठी इतिहासाची विस्तृत शकावली, सं. ग. ह. खरे (१९७७), पृ. ९८ — रु. १६–००
९. ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड १७ (१९७८), पृ. ११९ — रु. १६–००
१०. ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड १९ (१९७९), पृ. १६८ — रु. २०–००
११. भा. इ. सं. मंडळ–प्रकाशित लेख, साधने इ.–सूची, सं. चिं. ना. परचुरे, मु. श्री. कानडे (१९८१), पृ. ३४७ — रु. ४०–००

इंग्रजी प्रकाशने

12. Tal Paintings, by Usha Ranade, Kamal Chavan (1976), pp. 36 — Rs. 50–00
13. Bhagavata Purana, by M. S. Mate, Usha Ranade (1979), pp. 36 — Rs. 50–00
14. Survey of Material in Marathi on the Economic and Social History of India, by V. D. Divekar (1981), pp. 116 — Rs. 25–00